# माणूस

दिवाळी ७६

६ रुपये

# माणूस
दिवाळी

संपादक
श्री. ग. माजगावकर

सहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे


## दीपावली शुभेच्छा


**उत्खनन**
दि. वा. मोकाशी — २

**मंथरे, तुला लागले पिसे**
वि. ग. कानिटकर — ६

**एक दिवा विझताना**
रत्नाकर मतकरी — ८

**पुनर्जन्म : एक प्रश्नचिन्ह**
प्रदीप प्रभाकर गोखले — ३०

**वासांसि जीर्णानी....?**
मानवेंद्रनाथ रॉय — ३६

**गुस्ताव्ह फ्लॉबर्ट व मदाम बोव्हारी**
अनुवाद : माधव मनोहर — ५५

**आम्ही दोघी**
सौ. शुभदा साने — ७१

**श्वाइट्झर : अखेरचे पर्व...**
सुमती देवस्थळे — ७३

**दि आर डॉक्युमेंट**
अनुवाद : अशोक जैन — ७९

**हिंदी चित्रसृष्टी**
तरंगणाऱ्या डोक्याची... लटपटत्या पायांची...
शिरीष सहस्रबुद्धे – अरविंद भोमे — १४०



किंमत
सहा रुपये

वार्षिक वर्गणी
छत्तीस रुपये

परदेशाची वर्गणी
पंचावन्न रुपये

अंक वीस ते तेवीस
१६ ऑक्टोबर ते ६ नोव्हेंबर ७६



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

माणूसचा या पुढील अंक शनिवार १३ नोव्हेंबर १९७६ या दिवशी प्रसिद्ध होईल.



# उत्खनन

## दि. बा. मोकाशी

जपून खण. तुझ्या दांडक्याच टोक माझ्याशी ठेपलं आहे. काळजी घे. खणू नको. बोटानं उकर. मी हे माझ्यासाठी सांगत नाही. मी मेलेला आहे. सापळ्याशिवाय माझं काही उरलेलं नाही. तुम्ही सुखात जगायला हवं असेल तर जपून खण.

छान! माझं ऐकलंस. उत्तम केलंस. आता बोटांनी हलकेच उकर. कंद काढताना आपण उकरतो तसं. अरे ! अरे ! हे काय करतो आहेस ! 'भर का टाकतो आहेस माझ्यावर ? तू काय बुजवीत आहेस तुला कल्पना आहे का ? पुढच्या पिढ्यांचं हित तू बूजवीत आहे. ठीक आहे. टाक माती. पण निदान माझा कमरेवरचा भाग मोकळा राहिल अशी टाक. कमीत कमी माझा उजवा हात आणि मिटलेली बोटं मोकळी राहू देत.

तू घर बांधण्यासाठी चौथरा करीत आहेस. याच जागी आधीच्या उखळलेल्या चौथऱ्यावर चौथरा करून मी घर बांधलं. तुझ्यानंतर, आणखी कुणी घर बांधायला इथं चौथरा करील. म्हणूनच सांगतोय माझ्यावर भर टाकू नको. तुला मी आत्ता सापडलो नाही, तरी तुझ्या नंतरच्यांना सापडेन. मी सांपडणं तुमच्या सुखाचा व जीवन मरणाचा प्रश्न आहे.

अरे रे ! शेवटी माझा सगळा सापळा तू बुजवून टाकलास. तू या लोकांचा नायक आहेस काय ? अरे उद्दाम नायका ! तुझं माती टाकणंही उद्धट आहे ! तुझी जात मी ओळखतो. एका तुझ्यासारख्यामुळेच मी इथ सांपळा होऊन पडलो. कदाचित तू चागला नायक असशील. मी खाली आहे हे तुला कसं कळणार ? मी घरासाठी चौथरा तयार केला तेव्हा मी विचारलं का-' खाली कोण आहे?' मी भर घालीत चौथरा वाढवीत गेलो. पण माझी खात्री आहे की ज्याच्यावर मी भर टाकली त्याला माझ्या सापळ्याइतके महत्त्व नव्हते. माझा हात खणून काढल्याशिवाय तुला ते महत्त्व कळणार नाही.

मी इथं आलो तेव्हा काटक्यांच्या पिंजऱ्यांत ठेवलेला मांजराचा एक सापळा सापडला. मी तो या चौथऱ्यावर कोपऱ्यांत पुरला. भुताखेतांचं त्यामुळं निवारण झालं. नायका ! तू आत्ता पाहतो आहेस तसाच नदीच्या पुरानं उद्ध्वस्त चौथरा इथं होता. आम्ही नदी उतरून आलो. हे चौथरे पाहिले. आमच्या नायकान इथं राहायचं ठरवलं, तो फार बलवान, धोरणी नायक होता. त्याच्यामुळे टोळीत कधी कुणी उपाशी राहिलं नाही. नदी माशांनी फुलली होती. प्रवाहांतून येता येताच त्यानं हातानं दोन मासे पकडले. हे सुचिन्ह होतं. देवता अनुकूल होत्या. त्याने दोन्ही मासे लगेच नदीला परत अर्पण केले.

दोन हातांच्या बोटाएवढे पुरुष आम्ही इथं आलो. आणि येथे नेमके तेवढेच चौथरे होते. आम्ही जिथून आलो त्यापेक्षा हे फारच चांगले ठिकाण होतं. पक्षांचे थवे उडत होते. म्हणजे घरटी होती. म्हणजे अंडी होती. हरिणं होती. वनगायी होत्या. त्यांच्या शेणाच्या गोवऱ्या मिळणार म्हणून स्त्रिया प्रसन्न झाल्या. एखादी वनगाय पकडता आली तर दूध मिळणार म्हणून मुले खूष होती. झाडांना जाळी बांधून हवे तेवढे पक्षांचे थवे व लुसलुशीत मास खावयास मिळणार होते.

आम्ही मागच्या ठिकाणाहून इथं आलो याचं कारण त्या रानांतील वाघदेवता आमच्यावर कोपली. आम्ही खूप उपाय केले. वाघाच्या कातड्याची पूजा केली, त्याला आम्ही एक बळीदेखील दिला. पण वाघाचा कोप वाढतच गेला. पाण्याला गेलेली बाई परत येईनाशी झाली. मुलांना बाहेर खेळता येईना, जरा आतरानात शिकार करायला गेलेला शिकारी, वाघ ओढून नेऊ लागला. आमच्या वस्तीला वाघांनी वेढले. भोवताली पहावं त्या झुडुपांत वाघ दिसू लागला. अन्न नाही, पाणी नाही अशी आमची अवस्था झाली. तेव्हा आमच्या नायकानी ती वस्ती सोडायचं ठरवलं.

वाघ झोपायला आलेले असतात त्या सूर्योदयाचे वेळी आम्ही ते ठिकाण सोडून निघालो. वाघांना सुगावा लागणार नाही अशी आम्ही रात्रभर निघण्याची तयारी करीत होतो. मला निघण्याची फारच थोडी तयारी करावयाची होती. कारण मी एकटा होतो. बाकीच्यांना स्त्रिया व मुले होती. त्या

रात्रभर मी विचार करीत होतो, हे ठिकाण सोडायचंच का ? आणि अशा किती जागा सोडायच्या ? त्यापेक्षा वाघाना पकडण्याची किंवा मारण्याची युक्ती शोधली तर ? माझं डोकं नेहमी असं चाले. एकदा एका खड्ड्यांत मी पडलो होतो. खड्डा कळला नव्हता. कारण वर फांदी पडली होती व पुन्हा पुन्हा फांदीवर पाचोळा पडून खड्डा कळतच नव्हता. वाघाला असा खड्ड्यांत सापडवला तर ? मी तसाच आमच्या नायकाकडे गेलो. पण माझी कल्पना ऐकून आमचा नायक हसला. कदाचित या आधी मला ही युक्ती सुचली असती तर त्यानं ऐकलं असतं. आता आमचे लोक फारच घाबरले होते.

आम्ही तेथून बाहेर पडलो. प्रत्येकाजवळ वेलींनी बांधलेले कातड्याचे गाठोडे होते. त्यात नदीकाठचे थोडे धान्य, शिळे मांस, अणकुचीदार दगडी हत्यारे, आणि हातात टोकदार दांडकी होती. पाणी पिण्यासाठी काही खापरं होती. आणि अग्निसाठी गारगोटयांचे खडे व कापसाचे बोळे होते. सगळे समजत अग्नि करण्याचे एका देवाने आम्हाला शिकवले. पण आमच्याचपैकी कुणीतरी ही युक्ती काढली होती यात मला संशय नव्हता. अग्नि करता आला नसता तर आमचे काय झाले असते याची मला कल्पनाच करवत नाही. म्हणूनच ती कल्पना शोधून काढणाराचे मला नेहमी कौतुक वाटत आले. कारण कल्पना सुचणं किती कठिण आहे मला कळत होतं. आमच्या स्त्रिया सपाट कातळावर धान्य कुटत. ते चहूकडे उडे. कातळात खड्डा करून, उखळ करून दिले होते. मला ते कसं सुचलं सांगता यावयाचं नाही.

हे नायका ! तुझ्या टोळीत माझ्यासारखा कल्पक असेल आणि त्याला माझ्या मुठीत काय गाडले गेले हे कळले तर भयंकर वाईट वाटेल. नायका ! लक्षात ठेव. शौर्यामुळे, दुसऱ्या टोळीस मारल्यामुळे, त्यांची जमीन घेतल्यामुळे, फक्त आपली जमात सबल होते. आणि फक्त काही काळच. पण तीच शक्ती जर अग्निसारखा शोध लावण्याकडे गेली, तर सगळ्या जमाती सबल होतात. सगळ्यांना सुख लाभते. नायका ! ज्या जमातीत कल्पनेबद्दलचा आदर गेला, ती टोळी नाश पावलीच समज. अरे झाडाखाली पडावे, नदी काठी रमावे, लोकांपासून दूर बसून कल्पना स्वैर सोडाव्या, नायकाने असे कुणाला करू दिले नाही तर ती टोळी लवकरच आमच्या टोळीसारखी नामशेष होणार असं जाण.

आम्ही वाघाच्या भीतीनं निघालो आणि आमच्यावर इतकी संकटे कोसळली! आमचा नायक सर्वांच्या पुढे, सर्वात मागे स्त्रिया व मुले व त्यांच्याही मागे मी असे चालत होतो. पहिल्यांदा वादळाने आम्हाला तडाखा दिला. ओले चिंब होऊन आम्ही चालत होतो. वरून वीजा कडाडत होत्या. हवेतल्या गारगोटयाने आम्ही कुडकुडू लागलो. आमच्यातले दोन म्हातारे मेले. एक लहान मुलगी फांदी पडून मेली. दोघा तिघांना नंतर ताप आला. झाडावरून जळवा अंगावर पडून आमच्या अंगावरून लोंबत रक्त शोषू लागल्या.

निःशक्त, निःसत्त्व होऊन आम्ही या नदीशी आलो तेव्हा हे चौथरे पाहून उरल्यासुरल्या शक्तिनिशी अम्ही आनंदाने आरोळ्या ठोकू लागलो. नायका ! तुम्हीही आरोळ्या ठोकल्या असतील. कारण हा परिसरच सुंदर आहे. येथे आपल्या मुलाबाळांनी मुलांच्या मुलाबाळांनी, ही नदी वाहती असे पर्यंत रहावे असं मला वाटत आले. माझा आत्माही येथे घुटमळतो आहे. नायका ! शिकारी आणि लढाया करून असं एके जागी राहता येत नाही. कधी शिकार संपते. कंदमुळे नासून जातात. दुसरी काहीतरी कल्पना काढायला हवी. इथे आल्यापासून मी त्याच विचारात होतो. अरे ! पावसांत भिजून आणि थंडीत कुडकुडून जेवढी आपली माणसं मेली तेवढी वाघानी मारली नसतील किंवा लढायांत मेली नसतील.

आमच्या नायकानं इथले चौथरे वाटून, दिले. माझ्या वाटणीला एक चौथरा आला. माझ्या वाटणीला कधी चौथरा येत नसे. पण इथे जास्त चौथरे होते. मला स्त्री नव्हती. टोळीतील कुणीही मुलगी माझ्याजवळ राहायला येणं शक्य नव्हतं. मी किरकोळ, खुजा वेड्यावाकड्या हातपायांचा होतो. माझे डोके खूप मोठे होते. मला बटबटीत डोळ्यांचा म्हणत. माझी सर्वजण चेष्टा करीत. पण माझे डोके कधी कधी विलक्षण चालते हे ठाऊक असल्यामुळे ते भीतही असत.

सर्वजणांनी आपापले चौथरे करायला घेतले. मीही घेणार होतो. पण इथे येताना वाटेत आमचे सर्व परळ फुटले होते. जेव्हा आमच्या बायांनी ओंजळीतून मासे नदीकडून वर आणताना पाहिलं तेव्हा मला फार वाईट वाटलं. पुरुष आपल्या कामात मला घेत नसल्याने आणि बायात राहिल्याने त्यांच्याविषयी मला जास्त अनुकंपा असल्याने मी माझे चौथऱ्याचे काम सोडून परळ करायला घेतले. नदीशी जागा पाहून मी माती मळायला घेतली. तेथली माती पिवळी आहे. छान आहे. मग हाताने लहान मोठे परळ केले. मडकी केली. माझे हात लहान, बोटे वाकडी, पण या कामाला फार उपयोगी होती. गुळगुळीत मोठ्या दगडावर दुसरा लहान चपटा दगड ठेऊन त्यावर मी मातीचा गोळा ठेवी. एका हाताने मी चपटा दगड वाटोळा फिरवीत दुसऱ्या हातांनी गोळ्याला आकार देत राही. माझी परळे, मडकी भराभर तयार होत. त्या दिवशी सर्व बायांना पुरतील इतकी भांडी तयारी केली. मग अग्नि पेटवला. गवत, पाचोळा, वाळलेले शेण पसरले. भट्टी तयार करून धुमसत पेटून दिली.

रात्री प्रत्येक बाई आपल्या चौथऱ्यावरून भट्टीचा लाल उजेड उठून पाहत होती. दोन चार दिवसांनी भट्टी निवल्यावर प्रत्येक बाई तिच्या वाटणीची भांडी घेऊन जेव्हा नदीकडे जाऊ लागली तेव्हा मला इतके बरे वाटले. त्या दिवशी माझ्या चौथऱ्यावर बसून नदीकडून येणाऱ्या आमच्या बाया मी पाहत होतो. पाणी त्यांच्या डोक्यावरून अंगावर निथळत चकाकत होते. कुणाच्या कंबरांवरून खाली ओघळत होते. आपापसांत विनोद करीत, गाणं म्हणत, आनंदात त्यांना पाहून इतकं ऊर भरून येत होतं. नायका ! शत्रूच्या स्त्रिया जिंकण्यापेक्षा शत्रूची मुंडकी तोडून आणून नाचण्यापेक्षा आपल्या स्त्रियांना सुखी ठेवण्याचा आनंद जास्त टिकाऊ आहे हे लोकांना कळेल तेव्हा खरे. मी आमच्या लोकांना नेहमी सांगे जे आपल्यापाशी असेल ते दुसऱ्यांना द्या. आपल्याला कळले तर दुसऱ्यांना सांगा. आपली मडकी पलीकडे वस्ती करणाऱ्यांना भेट द्या. कुणी दगडाची चांगली धारदार कुऱ्हाड करीत असेल तर ती शिका. वाघ येवो कुणी येवो जागा सोडू नका. जागा सोडण्याने सर्व गमावते.

नायका ! कदाचित शरिरानं असा वेगळा झाल्यानं मला स्थिरता हवी होती, कधी कधी मला इतर पुरुषांचा हेवा वाटे. कधी नदीपलीकडील रानांत सगळे माझ्यावयाचे तरुण शिकारीला जात. मला ते नेत नसत. बरोबर दांडक्यांना बांधलेली अणकुचीदार दगडाची हत्यारे, टोकदार बांबू, आणि

दोर घेऊन ते नदी ओलांडून जात. मी पाहत बसे. आमचा नायक धाडशी, बलवान, चपळ होता. नदीपलीकडे काळवीटांचा थवा दिसताच तो सर्वांना हाकारा देई. मग सारे तरुण हत्यारे घेऊन बाहेर पडत. आमचा नायक सर्वांच्या पुढे असे. त्याच्या दोन हातांत दोन अणकुचीदार बांबू असत. एकाच वेळी दोन्ही बांबू मारण्याचे विलक्षण कसब त्याच्यात होते. नदीपलीकडे जाऊन सारे चपळाईनं काळविटांना वेढा देऊन तुटून पडत. कधी तो एकटाच रानडुकराच्या मागे जाई. क्षणांत तो या झुडुपांत दिसे, क्षणांत त्या झुडुपात दिसे. आमच्या सर्व बाया मुले या तीरावरून पाहत उभ्या असत. त्यांच्या डोळ्यात कौतुक असे. मग एकदम आमच्या नायकाची आरोळी ऐकू येई. सर्व बाया हसत रडू लागत. मुलं नाचत. आणि मग झुडुपे वादळासारखी बाजूला करीत खांद्यावर मारलेला डुक्कर टाकून नायक येताना दिसे, तेव्हा तरुणींच्या तोंडावरचे भाव पाहून मी मत्सराने जळे. तो नदीतून पुढे येऊ लागला की आरोळ्या सुरू होत. मग त्याला पाण्यातून वर घ्यायला बाया धावत. त्याने एकट्याने आणलेला डुक्कर त्या आपल्या खांद्यावर घेत आणि आमचा-नायक डौलाने पुढे चालत येई.

माझ्याकडे कुणाचे लक्ष नसे. माझी तडफड कुणाला कळत नसे. मग मी पुष्कळदा एकटाच आपण अशी शिकार करायला गेलो आहोत, असा डुक्कर आणायला, बाया धावत येताहेत, तरुण मुली लोभस डोळ्यांनी आपल्याकडे पाहत आहेत अशा कल्पना करी. पण डुक्कर वगैरे मारण्याच्या कल्पनांचा मला कंटाळा येई. खरे एकाच तरुण मुलीचे माझ्या मनात राही. काही करून तिचे मन वेधले आहे असे मनात आणावेसे वाटे. ही आमच्यातील एका म्हाताऱ्याची मुलगी होती. सर्व तरुणीत ती सुंदर होती. ती वीज होती. तिचे हसणे ओढ्यासारखे होते. चाल हरणासारखी. तिच्यामागे सर्वच तरुण होते. आमचा नायक तर तिच्यासाठी वेडा होता. ती त्यालाच मिळणार यात माझ्या-शिवाय कुणाला संशय नव्हता. तिच्यासाठी मीही जीव द्यायला तयार होतो. पण तिचे डोळे माझ्याकडे कधी लागलेच, तर दुर्बल प्राण्याकडे लागावे तसे लागत. माझ्या डोक्यावरून कधी ती जाताना हात फिरवी.

त्या रात्री डुक्कर भाजल्यावर सर्वजण नाचत असता मी उदास होत होतो. त्या उदासपणांतच मी ठरविले की आपल्याला शिकार करता येत नसली तर आपण चित्रें काढू. मी फुलांचे रंग तयार केले आणि काटकीनं मी हरीण डुक्कर यांची चित्रे काढू लागलो. मग मी माझ्या प्रेयसीचे चित्र काढण्याचा सराव केला. ती पाणी घेऊन येताना, ती उभी असताना. चित्रे काढताना ती जवळ असल्यासारखे वाटू लागले. आमचे लोक काळविटाची शिकार करीत आहेत असेही एक चित्र काढले. ती चित्रे मुलांनी पाहिली. मग आया बाया तरुण मुली ती पहायला आल्या. मग पुरुष आले प्रत्येकाला गम्मत वाटली. पुन्हा लोकांचे विशेषतः माझ्या प्रेयसीचे माझ्याकडे लक्ष वळले याचे मला बरे वाटले.

पण जसजसे तिचे माझ्या मनात येत होते तसतसा मी अधिक कष्टी होत चाललो. नायका! मात्र माझ्यासारख्या विकृत देहाच्या माणसालाही भावना का नसाव्यात? मला हवी ती तरुणी का मिळू नये? आमच्यांतील तरुण जेव्हा एखाद्या तरुणीला मांडीवर घेऊन बसे किंवा दोघे एकमेकांना बिलगून रानात झाडीत जात, जेव्हा तरुण तरुणी हातात हात घालून नृत्य करीत तेव्हा माझे अंग तापू लागे. माझी प्रेयसी जिंकाय-चीच असा निश्चय मी पुन्हा पुन्हा करी.

तिला जिंकायला माझ्याजवळ एकच गोष्ट होती. माझं डोकं. आमचा नायक शिकार आणली की, तिच्या झोपडीपुढ ठेवी. तिला हवा तेवढा भाग तिला देई. माझ्या मनात आले, आपण तिला बाहूतही चांगल्या भेटी देऊ. तिला काय देता येईल असा विचार करता करता एक कल्पना आली. पुन्हा मडकी खास तिच्यासाठी केली. दिवसभर मी त्या मडक्यावर काळविटाची, डुकराची, फुलापानांच्या नक्षीची व एकावर तिचेच अशी चित्रे कोरली. आणि ती वेगळी अशी भाजायला ठेवली.

मग जेव्हा भट्टी निवून मडकी बाहेर काढण्याची वेळ आली नि सर्व बाया मंडळी ती घेण्यास उभ्या राहिल्या तेव्हा काळविटाचे चित्र काढलेले मोठे मडके घेऊन माझ्या प्रेयसीपुढे गेलो आणि आमचा नायक जसा तिच्यापुढे शिकार ठेवी तसे ते मडके तिच्या-पुढे ठेवले. नंतर तिचे चित्र काढलेले मडके ठेवले. जेव्हा तिने ती चित्रे काढलेली मडकी हातांत घेतली. वरची चित्रे पाहिली आणि तिने माझ्याकडे पाहिले तेव्हा आयुष्यात तरु-णीचा पहिला कटाक्ष मी अनुभवला. तिचे तोंड लाल झाले. डोळे खाली गेले. माझे सगळे अंग शहारले.

नायका! ती माझ्यावर प्रेम करू लागली असे मी म्हणत नाही. पण माझ्याविषयी तरुण भावना तिला आली. तिचा तो कटाक्ष आमच्या नायकानं पाहिला. तो संतापून पाय आपटीत निघून गेला. तेव्हापासून तो माझे शत्रुत्व करू लागला.

नायका! त्याला हवी असलेली तरुणी मलाही हवीशी वाटली हा माझा दोष होता का? तिने माझ्याकडे आकर्षून पाहिले यात माझा दोष होता का? आम्ही दोघे तिच्या मागे होतो. तिने हवा तो पसंत करावा हे बरोबर नव्हते का? तिच्या एका कटा-क्षावर मी भराऱ्या मारीत होतो असे समजू नको. पण सुंदर तरुणी माझ्यासारख्या कुरुपाबरोबर रहायला येऊच नये असे आहे का? पराक्रम काय एकच शिकारीचे असतात. माझ्या मनात त्या दिवसापासून नवी आशा फुलली. मी ठरवले की अशा कल्पना काढून तिच्यापुढे ठेवी की ती माझ्या मागे मागे येऊन माझ्या झोपडीत रहायला येईल. माझ्याकडे ती येईल तेव्हा मला तिला समृद्धीत ठेवता आले पाहिजे. मला शिकार करता येत नाही. तरी तिला पोटभर खायला देता आले पाहिजे. थंडी वाऱ्यापासून तिचे नेहमी निवारण होत राहिले पाहिजे.

मी नाना युक्त्या शोधू लागलो. तिच्या वागण्यात आता फरक पडला होता. ती कनवाळूपणे माझ्या डोक्यावर हात फिरवून जाई. आता ते तिने थांबवले होते. ती आता माझ्या झोपडीशी उभी राही. मी करीत असलेले पाहत राही. मग गालांत हसे आणि पुढे जाई. पण दिवसादिवसाला त्यामुळेच आमचा नायक संतापत चालला. माणूस संतापला की, त्याचा वाईट भाग कळू लागतो. ती माझ्या झोपडीशी उभी राहून पुढे गेली की तो तिला अडवून तिला बोलू लागला. पण त्याला न जुमानता ती झोप-डीशी येतच राहिली. तेव्हा एकदा तो मला रागावून गेला.

ती माझ्याकडे वळणार याची मला खात्री वाटू लागली. एके दिवशी मी वेळाचे वावे-एवढे तुकडे करून त्यातले तुकडे जमिनीवर एक एक बोटावर हंथरून विचार करीत होतो की हे तुकडे असे एकत्र बसले तर झोपायला किती मऊ अंथरूण होईल. त्याच वेळी ती नदीकडून आली. मांडलेले तुकडे पाहत ती म्हणाली हे काय करता?'

मी म्हटलं, 'तुला झोपायला मऊ अंथरूण.'

ती अतिशय लाल पडली. मी म्हटलं 'जरा थांब.'

मग बाजूला ठेवलेले वेळाचे साल उचलून मी मांडलेल्या एका तुकड्याखालून, शेजारच्या तुकड्यावरून, मग पुन्हा शेजारच्या

तुकड्याखालून घालीत गेलो. तो तुकडा संपल्यावर, मी दुसरा तुकडा तसाच पहिल्याच्या शेजारी, वरखाली ओवीत गेलो, असे चार तुकडे ओवल्यावर मी बोटानं वीण चाचपली. तेवढा भाग घट्ट बसला होता. तेव्हा मी भराभर पुष्कळ तुकडे वर खाली करीत ओवले. आता हातभर वीण झाली होती आणि वेल हलवले तरी निसटत नव्हती. मी तिला त्यावर बसायला सांगितले. ती भीत भीत बसली. मग सर्वभार टाकून बसली. तिचा त्यानंतर झालेला आनंदी चेहरा मी कधी विसरणार नाही. मी तिला म्हटले, ‘ उद्या ये.’

माझं डोकं विलक्षण चालायचं. ते त्यावेळी चाललं होतं. आणि तुकडे वरखाली गुंफायचं सुचलं होत. मी दिवस रात्र काम करून माझ्या उंचीएवढी वीण पुरी केली. एक बाब वीण पुरी झाल्यावर मी ते उचललं, झटकलं, फेकलं. विणलेले तुकडे मला हवे होते तसे घट्ट चिकटून बसले होते. रात्री मी त्याच्यावर झोपणार होतो. पण तिच्या शरिराचा, याला पहिला स्पर्श व्हावा असं वाटलं. मी जमिनीवर झोपलो.

दुसऱ्या दिवसाइतका आनंदाचा दिवस माझ्या आयुष्यात आला नव्हता. ती नदीकडून येऊन उभी राहताच मी वावभर उंचीची वीण तिच्यासमोर धरली. मग सबंध तिच्याच हातात दिली. तिने ती अंगाशी लावली. अंगाभोवती लपेटली. आनंदाने तिच्या तोंडून शब्द फुटेना. तशीच धावत ती आपल्या झोपडीकडे गेली. मी ओरडलो, ‘उद्या आणखी एक घेऊन जा.’

मी माझ्या चौथऱ्यावरून पाहत होतो. जी ती बाई तिच्या झोपडीकडे धावत होती. मी दिलेली हातरी जमिनीवर पसरून त्यावर सर्वजणी झोपून पाहत होत्या. मग तरुण पुरुष ती पाहचला आले. त्या सर्वांना ती दाखवीन. माझी प्रेयसी माझ्या दिशेने माझ्या प्रेमभावाने पाहत होती.

हे सगळं आमचा नायक दुरून पाहत होता. काळानिळा पडला होता.

मला तेव्हाच पुढचं कळायला हवं होतं.

पण नायका ! मी पुढच्या कल्पना करीत राहिलो. त्या वेळेसच मी माझ्या मुठीतील वस्तू शोधून काढली आणि त्याच वेळेस माझी दुसरी एक कल्पना करून पाहिली. जे धान्य आम्ही पीठ करून खावयाचो ते नदीकाठचे धान्य मी चौथऱ्यामागच्या मोकळ्या जागेत लावले.

नंतर महिनाभर मी वेलाच्या विणी करीतच होतो. प्रेयसीच्या बापाला एक दिली. मग सगळ्या स्त्री पुरुषांनी माझ्याकडून एक एक करून नेली. आमचा नायक मागायला आला नाही. तो संतापानं डोळे लाल करून आपल्या झोपडीतून पाहत होता. मला तेव्हाच पुढचं कळायला हवं होत.

नायका ! शेवटी तो सत्यनाशाचा दिवस आला. आकाशांत खूप ढग आले होते. दुपार नंतर वारा सुरू झाला. माझी प्रेयसी माझ्याकडे धावत आली. धापा टाकीत ती म्हणाली,’ आपला नायक तुला रात्री ठार मारणार आहे.’

मी म्हटलं, ‘ मी पळून जाईन. पण तू बरोबर आलीस तरच पळून जाईन.’

ती म्हणाली, ‘ मी येते.’

मी म्हटलं, ‘ सूर्य मावळताच ये.’

आकाशांतले काळे ढग वाढतच होते. मी एकदा काही पुरुषांकडे जाऊन, ‘ आपला नायक मला ठार मारायला येणाराय, तुम्ही आडवा’ असे सांगणार होतो. पण मग ठरवले की नको. कारण ते म्हणतील एका तरुणीसाठी तुमचा झगडा आहे. तुम्ही द्वंद करा. जो जिंकील त्यानं त्या तरुणीशी लग्न करा.’ आमच्या नायकाशी द्वंदास उभं राहणं म्हणजे मला मरणंच होतं.

संध्याकाळी ढगामुळे लवकर काळोख झाला. ती येताच मी निघालो. मी माझ्या मुठीत माझी नवी वस्तू धरली होती. आम्ही रानांत शिरलो तोच मागून आमच्या नायकाची संतापाची आरोळी आली. आम्ही दाट रानातून धावू लागलो. माझ्या हातांत काय वस्तू आहे हे मला तिला सांगायला झाले नाही. ती फार घाबरली होती. आमचा नायक आम्हा दोघांना मारील ही खात्री होती. पण माझे भय पळाले होते. माझ्यावर एका तरुणीने प्रेम केले होते. माझ्यासारख्या कुरूप पुरुषांवर, मला आयुष्यांत हवे ते मिळाले होते. रानात शिरताच इतर तरुण तरुणी प्रमाणे आम्ही बिलगुन चाललो होतो. मला आणखी काय हवे होते ?

इतक्यात वादळ सुरू झालं. वरून कडाकड् विजा सुरू झाल्या. झाडे उन्मळून पडतील अशी वाकू लागली. अजूनही मधूनच आमच्या नायकाच्या पुसट आरोळ्या ऐकू येत होत्या. ती दमली होती. मी दमलो होतो. एका झाडाला टेकून उभा राहिलो. इतक्यात वीज कडाडली. इतका प्रचंड लोळ मी पाहिला नव्हता. कडाडणे तिला ऐकूही गेले नसेल. विजेचा लोळ ती उभी होती. त्याच झाडावर कोसळला. कुणी फेकावे तसा मी उडालो, मग सावध होऊन पाहू लागलो. माझ्या प्रेयसीची राख झाली होती.

वादळ वाढते होते. आता पळून जाण्यात अर्थ नव्हता. पळून जायला आता काय उरले होते ? मी तसाच वसतीकडे परतलो. आमचा नायक वाटेत भेटला तर, त्याला मारीन किंवा मी मरेन–असे काही निश्चय करीत चाललो. पण अगदी माझ्या झोपडीशी येईपर्यंत कुणी भेटलं नाही. आमच्या नायकाची मी खूप वेळ वाट पाहिली. मी भयंकर दमलो होतो. मला केव्हा झोप लागली हे कळलं नाही. आणि झोपेत, आमच्या नायकानं येऊन मला केव्हा ठार केलं हे कळलं नाही.

दुसऱ्या दिवशी त्याच ठिकाणी थोडा खड्डा करून मला पुरून सर्वांनी तो नदीकाठ. ते चौथरे सोडले. माझ्या मुठीतील वस्तू माझ्याशीच राहिली. नायका ! आता तू वर भर टाकलीस ! काय केलंस हे ?

नायका ! मी गाडलो गेलो. तूही गाडला जाशील. थंडीवाऱ्यात कुडकुडत तुम्ही मराल. माझ्यावर तुझा साफळा पडेल. पण त्या साफळ्याच्या मुठीत माझ्या मुठीत आहे ते नसेल. तुझ्यावर आणखी एक नायक घर टाकील. तोही साफळा होऊन आणखी घरा खाली गाडला जाईल. माझ्या मुठीत आहे ते न सापडल्याने तुम्ही थरावर उरावर घेऊन उंचवटे होऊन पडाल.

नेवासे येथे उत्खनन करण्यास गेलेल्या डॉ. अशोक बापट -यांना तेथे पूर्व मानवाच्या वस्तीचे पाच थर मिळाले. मातीची भांडी, धार लावलेली दगडाची हत्यारे, उखळे. वरवंटा अशा वस्तू मिळाल्या. त्याविषयी बोलताना डॉ. अशोक बापट फार उल्हसित होते. ते म्हणाले, ‘ महाराष्ट्रात फार प्राचीन काळापासून मानव रहात होता हे त्यावरून सिद्ध होईल.’

चौथ्या थरांत त्यांना माणसाचा हाडाचा सांगाडा सापडला. सांगाड्याच्या हाताची मूठ मिटलेली होती. त्या मुठीत डॉ बापट यांना आश्चर्य म्हणजे एक हाडाची सुई सापडली. त्या सुईला नेढे होते ट्वाईनचा दोरा ओवला जाईल एवढे ते भोक मोठे होते. डॉ. बापट म्हणाले, ‘हे मानव निःसंशय प्रगत होते. त्यांना सुई वापरण्याचे ठाऊक होते.’



# मंथरे तुला लागले पिसे !

वि. ग. कानिटकर

महिना झाला. भास्करचे पत्र नव्हते, की येणाऱ्या-जाणाऱ्याजवळ खुशालीची चिठ्ठी नव्हती. जानकीबाईंनी बडोद्याच्या तलाठ्या-बरोबर, संक्रांतीला दिलेल्या गुळाच्या पोळ्या त्याला नक्की पोचल्या असल्या पाहिजेत. त्याला देखील पंधरा दिवस होऊन गेले होते. मध्येच संताप आणि मध्येच काळजी उसळी घेत होती. उघड्या अंगाने परसदारी झाड-लोट करताना रघुनाथराव स्वत:शीच बड-बडत होते.

'गाणं बजावणं चालू असेल सारखं. रात्री जागरणं आणि दिवसा झोपा काढीत असेल. गधड्याला पत्र लिहायला वेळ व्हायचा कसा ?...'

मग काही वेळ सारवलेल्या अंगणात हिराची केरसुणी फिरल्याचा 'फर-फर' आवाज होत होता आणि पुन्हा रघुनाथरावांचे बाण सुटत होते.

'आम्ही आहोत कोण म्हणा त्याचे ! देव मामलतदार जेवायला घालतो. तेलंग-शास्त्री शिकवतो. विष्णुबुवाला कीर्तनात फुकटचा सुरकरी गवसलाय. इकडे आई-बाप मरेनात का...'

चुलीतली लाकडं बाहेर ओढून अखेर जानकीबाई पडवीत आल्या. नवऱ्याचा हा संताप आता तिच्या अंगवळणी पडलेला होता. नोकरी सुटल्यापासून नवऱ्याला रिकामपण खायला उठते आहे. पहाटे उठून देवापुढे दोन तास पोथी वाचतात, तेवढीच काय ती घरात शांतता. नुसतं तोंडानं म्हणायचं, 'विरागी झालोय–विरागी झालोय !' राग तर पाचवीला पुजलेला आहे. डोळे मिटेपर्यंत हा राग सुटायचा नाही. भास्कर तलाठी झाला नाही. व्हायचं नाही म्हणतो. म्हणून सगळा राग आहे ! जगातली सगळी मुलं काय तलाठी होतात का ? विष्णुबुवासारखे भास्कर कीर्तन करील, नाहीतर वन्संच्या नवऱ्यासारखी पुराणं सांगेल देवळातून ! तलाठी झाला नाही म्हणून काही दरोडे का घालणार आहे ! शेवटी ज्याचं त्याचं कर्म असतंच.

'ऐकलंत का. जिवाचा उगीच संताप करू नये. पोर वाराने जेवतोय–शिकतोय. टोपले शास्त्र्यांचे लक्ष आहे त्याच्यावर. नसेल वेळ झाला चिठ्ठी लिहायला.'

रघुनाथरावांनी हातातला खराटा दणकन अंगणात टाकला. गोळा करून कमरेवर खोचलेला धोतराचा सोगा खाली सोडला आणि ते पायठणीपाशी तरातरा आले.

'तुम्ही लेकाचीच बाजू घेणार, पण सांगून ठेवतो,–पस्तावाल. शेवटी पस्तावाल...'

'मला कुणाचीच बाजू घ्यायची नाही. आणि आम्ही पस्तावलो तर आनंद होणार आहे का तुम्हाला ?'

जानकीबाईंच्या प्रश्नाने रघुनाथरावांचा स्वर अधिकच करडा झाला.

'तुम्ही जबाबदार आहात सगळ्याला. पोरांचे हाल नकोत म्हणून तुम्हाला बडोद्याला बिऱ्हाडात ठेवले. मी शिळेपाके खात नोकरीमागे हिंडलो. माझंच चुकलं.'

जानकीबाई आत वळत म्हणाल्या–

'कुणाचंच काही चुकलेलं नाही. कुलकर्णीपणा करणाऱ्यांची मुलं आणखी काय करतात ? फायनल होतात, नाही तर संस्कृत शिकतात. त्र्यंबक फायनल झाला, हा संस्कृत शिकला. गळा गोड आहे म्हणून विष्णुबुवा शिकवतात. आता गोड गळादेखील माझ्या माहेरकडून आला म्हणून रागवा वाटलं तर तुम्ही !'

पडवीतून आत जाता जाता जानकी हे बडबडत गेली, म्हणून त्यातले काही रघुनाथरावांना नीट ऐकू आले नाही. ते बरेच झाले, नाही तर ते पुन्हा आणखी उसळलेच असते.

काही वेळाने जानकीबाई पुन्हा पडवीत डोकावल्या, तेव्हा स्वारी विहिरीवर घंगाळापुढे बसून स्नान करीत होती. तोंडात स्तोत्र होते. आता निदान काही मिनिटे तरी तोंडाला स्तोत्रांचा चाळा राहणार होता. बाहेरच्या ओटीवर भेटायला आलेल्या जमिनीच्या कुळांशी बोलत असलेला त्र्यंबक तेवढ्यात आत आला. त्याच्या हातात, नुकतेच फोडलेले टपाल होते. वाचत वाचत तो माजघरातून स्वयंपाकघरात येत होता. त्याच्या पाठोपाठ थोरली सूनही माजघरातून पुढे आली होती.

'आलं का बाबा भास्करचं पत्र आज तरी ?' चुलीत फुंकणीने जाळ मोठा करीत जानकीबाईंनी विचारले.

'पत्र नाही आलं, पण 'सयाजी विजय' चा अंक आलाय. त्यात भास्करचं कौतुक आलंय. तुला वाचूनच दाखवतो.'

चुलीवरचा तवा बाजूला काढून जानकीबाई ऐकू लागल्या. त्र्यंबक वाचत होता.

'बडोदे : मौलाबक्षांच्या संगीत शाळेचा वार्षिक समारंभ काल झाला. अध्यक्षस्थान सरसुभे गजाननराव भाटवडेकर यांनी मंडित केले होते. बडोद्याच्या गायन-वादन क्षेत्रातील नामवंत मंडळी व राजदरबारची सर्व ठळक ठळक मंडळी समारंभाला आलेली होती. गायन-वादन खूप झाले. नवीन विद्यार्थी भास्कर बखले, याचेही गाणे झाले. एवढ्या मोठ्या समाजात हा मुलगा फारच धीटाइने उत्तम गायला, सारी सभा खूष झाली. सरसुभेसाहेबांनी व मौलाबक्षसाहेबांनी त्याची पाठ थोपटली. स्वरांचा जिवंतपणा, रागाचा सच्चेपणा आणि तालाचे लालित्य हे गुण या मुलाच्या गाण्यात आढळत होते. त्याची तान अव्वलपासून अखेरपर्यंत निर्मळ अशा समांतर स्वरांनी लगडलेली असे.'

त्र्यंबक मोठ्याने वाचत होता. त्याचा आवाज परसात रघुनाथरावांच्या कानावर गेला असावा. भास्करसंबंधी काहीतरी असणार, या अपेक्षेने रघुनाथराव घाईघाईने धोतराच्या निऱ्या खोचीत आत आले आणि पंचाला जानवे पुशीत ऐकू लागले. शेवटची तीन-चार वाक्येच काय ती त्यांनी ऐकली.

'सयाजी विजय'चा अंक तिथेच टाकून त्र्यंबक बाहेर निघून गेला. वडिलांच्या देखत भास्करचे कौतुक केले तर नसता वाद माजतो, हे त्र्यंबकला ठाऊक होते. काही महिन्यांपूर्वी तो भास्करला भेटायला बडोद्याला गेला होता. त्या रात्री विष्णुबुवा पिंगळ्यांचे कीर्तन होते. कीर्तन होते लष्करी कँपमध्ये. डिसा–कँन्टोन्मेंटमधल्या या कीर्तनाला तो रात्री भास्करबरोबर गेला. गाण्याची मंदार भास्करवर होती. ध्रुपद गायकी वळणाची तालासुरात बसवलेली दोन पदे भास्कर इतका छान गायला की, लष्करातल्या कॅप्टनसाहेबांनी तीन तोळ्याचे सोन्याचे कडे भास्करच्या हातात घातले. ही गोष्ट विसनगरला परत आल्यावर त्र्यंबकने घरात सांगितली. त्याच्या आईचे डोळे आनंदाने डबडबलेले त्याने पाहिले. पण रघुनाथराव म्हणाले–

'स्वतःच्या पोराला गाणं शिकीव म्हणावं ! सोन्याचं कडं काय जन्मभर का पुरणार आहे. तलाठ्याला महिना दहा रुपये मिळतात ते खरे...!'

त्र्यंबकला त्यावेळी वडिलांचा अगदी संताप आला होता, पण आईच्या मुद्रेकडे त्याचे लक्ष गेले आणि तो काही बोलला नाही. आता तर काय 'सयाजी विजया'त भास्करचे कौतुक छापून आले होते. म्हणून अंक तिथेच टाकून तो तडक ओटीवर निघून गेला होता.

जानवे पुसून झाल्यावर रघुनाथरावांनी तो अंक उचलला आणि माजघरात खिडकीपाशी त्यांनी आपली अधू नजर त्या अंकावरून फिरवायला सुरुवात केली. बऱ्याच वेळाने त्यांना ती बातमी सापडली. पत्र अगदी डोळ्याजवळ नेऊन त्यांनी एक एक शब्द आत्मसात केला. 'सयाजी विजया'त नाव येणे ही साधी गोष्ट नव्हती. महाराजांपर्यंत आता हा डिंडीम जाणार. महाराजांपुढे कदाचित भास्करचे पुन्हा गाणे होईल. महाराज खूष झाले तर, सरकारवाड्यात भास्कर हुद्देकरीदेखील होईल. तसे झाले तर फारच छान ! पोर फुकट जाणार आहे, तो वाचेल. तो कमवू लागला की, बडोद्याला जागा घेईल. त्याचे लग्न करू. जानकी आणि आपण अखेरचे दिवस मग बडोद्याला काढू.

पृष्ठ ४५ वर



# एक दिवा विझताना

रत्नाकर मतकरी

ही एक सत्य घटना आहे.
तिचा विषय आपल्या ओळखीचा
नाही. तो अत्यंत गूढ आहे.
—गूढ म्हणजे काय ? तर विज्ञानाच्या
चौकटीत न बसणारा.
पण ज्याला आपण प्रमाण मानतो ते
विज्ञानच अपुरे असेल तर—?
आजवर आपल्याला माहीत असलेले
सर्व विज्ञान पंचेंद्रियांच्या जाणिवांवर
आधारलेले आहे. मनाचे सामर्थ्य
आपण गृहीत धरलेले नाही.

दुसरे असे, की आपले सर्व ज्ञान भौतिक. भूतलाशी संबंधित. परंतु परलोकाचा अभ्यास करण्यासाठी अगदी वेगळ्याच प्रकारच्या विज्ञानाची गरज असेल तर–? विज्ञानाची ती शाखाच आपल्याला ठाऊक नसल्यामुळे परलोकाविषयी काहीच सांगणे सध्या शक्य नाही.

आज पाश्चात्य देशात जी संशोधने होत आहेत, त्यांत पारलौकिक जगाचा वेध घेणे चालू आहे. एकदा या संशोधनांचे निष्कर्ष आपल्यासमोर आले, की विज्ञानाच्या कक्षा रुंदावतील, आणि आजचे जे विज्ञान आहे ते आपोआपच तोकडे ठरेल.

हे ध्यानात न घेता आपण एकतर कशाहीवर अंधळा विश्वास ठेवतो, किंवा जे आजच्या ज्ञानाने समजत नाही ते सहज धुडकावून लावतो. स्वतःला बुद्धिप्रामाण्यवादी समजणारे, प्रत्येक गोष्टीला भौतिक ज्ञानाचा कस लावतात; पण हे ज्ञानच अपुरे ठरल्यानंतर त्यांनी काढलेल्या निष्कर्षांचे काय होणार ? उदाहरणार्थ, ज्या काळी पृथ्वी चौकोनी आहे, अशी समजूत होती, त्या काळच्या बुद्धिवाद्यांनी, ती गोल आहे, असे म्हणणाऱ्यांचे धिंडवडे काढले; न दिसणाऱ्या ध्वनिलहरींना ताब्यात आणून देशोदेशी संबंध ठेवणे, ही पूर्वीच्या बुद्धिवाद्यांना कविकल्पना वाटली असेल. आज आपल्याला, विचारलहरींचा सांधा जुळवणे किंवा ' टेलिपथी ' हे थोतांड वाटले तरी, इतर ग्रहांवरील जीवसृष्टीशी संबंध जोडता यावा म्हणून रशियामध्ये तिचे सखोल संशोधन चालू आहे. ' स्पीरिच्युअल हीलिंग ' किंवा परलोकवासी आत्म्यांनी येऊन केलेल्या रोगमुक्ततेची उदाहरणे ब्रिटनमध्ये सापडतात. ही राष्ट्रे आपल्यापेक्षा अधिक बुद्धिनिष्ठ आणि व्यवहारी आहेत. म्हणूनच, ज्या गोष्टी आपण आज थोतांड मानून सोडून देतो, त्यांचे शास्त्रशुद्ध संशोधन करून काही अज्ञात शक्ती आपल्याशा करण्याचा प्रयत्न ती करीत आहेत. त्यांना यश आल्यास आजच्या भाकडकथा ही उद्याची शास्त्रीय सत्ये ठरतील.

मी सांगत आहे त्या घटनेमागचे गूढ कधी उलगडेल तेव्हा खरे. त्याचे स्पष्टीकरण भविष्यात मिळेल. आजच्या आपल्या तुटपुंज्या ज्ञानाच्या कक्षेत ते बसत नाही.

सध्या फक्त एवढेच सांगता येईल की, हे असे घडले. ते प्रत्यक्ष घडले नसते तर, इथे सांगण्यातच काही मुद्दा नव्हता. कल्पनेत काहीही होऊ शकते, आणि गूढ गोष्टीचे एका विशिष्ट तर्कशास्त्राने कथेच्या चौकटीत बसेल असे काल्पनिक स्पष्टीकरणही देता येते. पण ही घटना सत्य असल्यामुळेच तिच्यात नेमके प्रसंग नाहीत, तिला नाट्यपूर्ण शेवट नाही; आणि स्पष्टीकरण, आज तरी नाहीच नाही.

एवढे मात्र सांगतो की, या घटनेशी ज्यांचा संबंध आला, त्या व्यक्तींना मी प्रत्यक्ष भेटलो. ती माणसे अत्यंत विश्वसनीय आहेत, आणि एखादी खोटी हकीकत रंगवून सांगण्याचे त्यांना कारणही नाही. या मंडळींची एकूण भूमिका सत्यकथनाची होती, आणि कथनाला अद्‌भुताचा रंग देण्याची प्रवृत्ती त्यांच्यात नव्हती. बहुतेक संबंधित व्यक्ती आजही हयात आहेत. त्यांच्याकडून या हकीकतीचा खरेपणा पारखणे सहज शक्य आहे. परंतु त्यांना चौकशांचा त्रास होऊ नये म्हणून मी त्यांची खरी नावे देणे टाळले आहे. दुसरे अधिक महत्त्वाचे कारण म्हणजे त्या कुटुंबाला पुन्हा एकदा या शोककारक घटनेची आठवण देणे रास्त नव्हे.

कथानकाचा ओघ टिकवण्यासाठी तपशीलाची फिरवाफिरव करण्याचे स्वातंत्र्य मी घेतलेले आहे. परंतु त्यामुळे मूळ हकीकतीला फारसा धक्का पोचलेला नाही. तिच्यातील सत्य अबाधित आहे. ◘ ◘

# बाळ

आम्ही भावंडे चार. तीन भाऊ आणि एक बहीण. थोरला विवेक, दुसरा राजा, तिसरा मी. सगळ्यांत धाकटी मुक्ता.

ही घटना घडली त्रेसष्ट–चौसष्टमध्ये. त्या वेळेस माझ्या वडिलांची साठी उलटून गेली होती.

माझ्या वडिलांनी जन्मभर मास्तरकी केली. हे आपले पैपैशांचा हिशेब करणाऱ्या माणसांच्या शब्दांत म्हणायचे तर! प्रत्यक्षात मात्र त्यांनी जन्मभर विद्यादानाचे पवित्र व्रत सांभाळले. या व्रताकडे 'मास्तरकी' म्हणून पाहिले की माणूस एकदम लहान होऊन जातो. पण मुलांवर संस्कार मी नाही तर कुणी करायचे, या वृत्तीने माणूस वागला तर म्युनिसिपालिटीच्या शाळेतही त्याला जगण्याचा हेतू सापडतो, आणि त्याची मान उंच होते.

शाळा सुटली तरी दादांचे शिकवणे संपत नसे. या शिकवणीत कसल्याही गुरुदक्षिणेची अपेक्षा नसे. विद्यार्थी कुठल्याही विषयात कच्चा राहू नये एवढाच हेतू असायचा! मुलांना आमचे घर स्वतःचेच वाटायचे. दोन खोल्यांच्या आमच्या जागेत मुलांची हीऽ वर्दळ!

विद्यार्थ्यांशी मायाळूपणाने वागणारे दादा आम्हाला मात्र धारेवर धरीत. माणसाला नाही म्हटले तरी राग काढायलाही एखादी जागा लागतेच. विवेकने दादांच्या हातचा भरपूर मार खाल्ला. कधी इंग्लिश सुधारण्यावरून, तर कधी हस्ताक्षरावरून! त्या काळच्या बहुतेक शिक्षकांप्रमाणे दादांचाही उत्तम हस्ताक्षर हा 'विक् पॉइंट' होता. स्वतःचे अक्षर वळणदार, मोत्यासारखे! मुलांकडूनही तेच पक्के घोटवून घेतलेले.

एकदा गंमत झाली. शाळेत इन्स्पेक्शन होती. सगळ्या पोरांच्या पाटयांवर एकच एक वळणदार अक्षर पाहून इन्स्पेक्टरला वाटले, बहुधा मास्तरांनीच सर्वांना लिहून दिले. दादांना हा आरोप कसा सहन होणार? ते मुलांना म्हणाले, 'पुसा रे लिहिलेलं. आणि परत लिहा.' पुन्हा तेच अक्षर प्रत्येकाच्या पाटीवर झळकू लागलेले पाहून इन्स्पेक्टरांनी हात जोडले.

कुठलेही काम मनापासून केले की माणूस मोठा होतो. दादांचे असेच झाले. उत्तम शिक्षक म्हणून त्यांचा नावलौकिक झाला. सरकारी पारितोषिक मिळाले. कुठल्याशा संस्थानिकाचे बोलावणे आले. राहण्याची जागा, इतर खर्च आणि शिवाय महिना पाचशे रुपये पगार इतके सगळे मिळणार होते. काम एकच–संस्थानिकाच्या एकुलत्या एक मंदबुद्धी मुलीला शिकवायचे, त्या काळात म्युनिसिपालिटीतल्या शिक्षकाला ही 'ऑफर' भलतीच मोठी होती, आम्ही हुरळून गेलो. पण दादांनी नकार कळविला. म्हणाले, 'एका मुलीसाठी मी इथल्या इतक्या मुलांना विद्या नाकारू?'

पुढे दादांची योग्यता ओळखून एक नावाजलेले शिक्षणतज्ज्ञ त्यांच्याकडे आले, त्यांनी संपादित केलेल्या पाठ्यपुस्तकमालेतील भूगोलाचे पुस्तक दादांनी लिहावे म्हणून. त्यांना मानधनांत पन्नास टक्के वाटा मिळायचा होता. या पुस्तकाने दादांची आर्थिक स्थिती सुधारली. आमची शिक्षणे वगैरे कशी होणार, ही काळजी दूर झाली.

आमची शिक्षणे नीट पार पडली; पण थोरल्या विवेकला मात्र परिस्थितीची झळ लागल्याशिवाय राहिली नाही. विवेक अतिशय बुद्धिमान होता. त्याची ग्रहणशक्ती असामान्य होती. टाकाने सुरेख अक्षर काढण्यापासून रेडिओ दुरुस्तीपर्यंत आणि वायरिंगपासून कपडे शिवण्यापर्यंत जे जे म्हणून शिकायची संधी मिळेल, त्यात त्याने प्रावीण्य मिळवले. स्कॉलरशिप्स मिळवीत मिळवीत तो मॅट्रिक पास झाला. पंचेचाळीस साली मॅट्रिकला पंचाहत्तर टक्के मार्कस मिळवणे तेवढेसे सोपे नव्हते. पण त्याने ते जमवले. व्ही. जे. टी. आय्. ला त्या वेळी डिग्री कोर्स नव्हता. तीन वर्षांचा एल इ. इ. डिप्लोमा घेऊन विवेकने बेस्ट कंपनीत नोकरी धरली. अधिक काही करणे त्या वेळच्या आमच्या परिस्थितीत शक्यच नव्हते.

त्या मानाने आम्हा इतर भावंडांची शिक्षणे मजेत झाली. राजा टेक्स्टाईल इंजिनीअर झाला आणि मी आर्किटेक्ट. मुक्तादेखील ग्रॅज्युएट झाली. आम्हा भावंडांमध्ये एकमेकांविषयी फार ओढ होती. मला वाटते, श्रीमंत घरांपेक्षा ओढगस्तीत मोठे झालेल्या भावंडांमध्ये अधिक एकोपा असतो; कारण एका तुकड्याचे चार चतकोर करून खाण्याची वृत्ती परिस्थितीनेच शिकवलेली असते.

विवेक मात्र जगन्मित्रच होता. गल्लीतल्या आजोबांपासून कडेवरच्या मुलापर्यंत सगळ्यांची दखल तो घेई. त्यातून त्याचा स्वभाव हरहुन्नरी. कुणाची सायकल दुरुस्त करून दे. कुणाच्या गणपतीचे मखर कर, कुणाचे दिवे गेले की फ्यूज घालून दे. असा तो सगळ्यांना उपयोगी पडायचा. आम्हा सगळ्या भांवडात तो अधिक धष्टपुष्ट आणि रुबाबदार! पोरांना जमा करून लाठी चालवायला शिकवायचे, मारामारीत मध्ये पडायचे, पोहण्याच्या टँकवर सर्वांत वरून उडी मारायची, गल्लीतल्या नारळाच्या झाडावर चढायचे, असे त्याचे उद्योग! गल्लीतली मुले त्याला 'डेअर–डेव्हिल' म्हणायची. पण आईला मात्र त्याची एकसारखी काळजी वाटायची. पचेचाळीसच्या नाविकांच्या बंडात तो तीन दिवस घरात नव्हता. आम्ही सगळेच हवालदिल झालो होतो. घरी परत आल्यानंतर मोठ्या वयातही त्याला दादांच्या हातचा मार खावा लागला. पण त्याचे रात्री–अपरात्री निवडणुकांचे पोस्टर्स चिकटवायला जाणे, दंग्याच्या भागात जाऊन बातम्या काढून आणणे असले उद्योग काही बंद झाले नाहीत.

शेवटी त्याचा आडदांडपणा कमी करण्याचा उपाय म्हणूनच की काय, दादांनी त्याला लग्न करायला लावले. त्या वेळेस विवेक बेस्टमधे फॉल्ट ड्यूटीवर होता. फॉल्ट रिपोर्ट झाला की ताबडतोब तो तिकडे धाव घ्यायचा. त्यासाठी त्याने जीप चालवणेदेखील शिकून घेतले. अत्यंत भरंवशाचा माणूस म्हणून तो ओळखला जाऊ लागला.

एव्हाना राजाचा टेक्स्टाइलमधे जम बसायला लागला होता. सोलापूरच्या जॅम मिलमधे त्याला मॅनेजरची जागा मिळाली. दरम्यान त्याचेही लग्न झाले. मीदेखील कोल्हापूरला माझी स्वतःची पार्टनरशिप फर्म सुरू केली. मुक्ताचे लग्न आम्ही चांगले थाटामाटात केले. कारण आता घरात पैशाचे वारे खेळू लागले होते. सुदैवाने मुक्ताला चांगला नवरा मिळाला. आम्हा भावंडांसारखाच तो घरच्या सुख दुःखाशी एकरूप होऊन गेला.

सगळी मुले मार्गाला लागली याचे दादांना विलक्षण समाधान! त्यांना कधी कुणी देवळात जाताना किंवा तसबिरीपुढे हात जोडताना

पाहिले नाही. म्हणायचे. 'मला सगळं मिळालंय्. मागायचंच नाही काही देवाकडे, तर देवळात कशाला जाऊ ?'

मध्यंतरी विवेकने बेस्टमधली नोकरी सोडून सरकारी नोकरी पत्करली. ताबडतोब त्याची कोयना प्रकल्पावर डेप्युटी इंजिनीअर म्हणून बदली झाली. म्हणजे योग असा विलक्षण की तीन मुलगे असून त्यांच्यापैकी एकहीजण दादांच्या उतारवयात त्यांच्याजवळ राहिला नव्हता. आता पूर्वीसारखी विद्यार्थ्यांची वर्दळही नव्हती. एकेकाळी आमच्या घरात उभे राहायला जागा नसायची, तिकडे आता सोबतीला माणूस नाही असे होऊन गेले. मग आई-दादांनी मुक्ताला विचारले. जयवंत लगेच तयार झाले. आणि दुसऱ्या दिवसापासून सामान घेऊन आमच्या जागेत राहायला आले. अगदी सहजपणे दादांचा चौथा मुलगाच होऊन गेले.

तरी आम्ही कुणी जवळ नाही, याची खंत दादा-आईंना असणारच. विशेषतः आईच्या पत्रांतून ती फार जाणवे. सणासुदीला तर ती हटकून तिकडे येण्याचा आग्रह करायची. आम्हांला सगळ्यांनाच मुंबईची ओढ होती. पण जायला जमले पाहिजे ना ? तरी मी तीन-चार महिन्यांतून एकदा तरी मुंबईचे काम काढतच असे. आई-दादांना मग तेच दिवस सणासुदीचे वाटत. तसा राजाही सोलापूरहून कधीकधी जात असेच. विवेकला मात्र फुरसत मिळणे कठीण झाले होते.

म्हणून या वेळेस दादांचे पत्र आले, तेव्हा मला थोडेसे आश्चर्यच वाटले. दादांनी लिहिले होते–

'विवेकची तब्येत गेला महिनाभर ठीक नाही, म्हणून मी त्याला मुंबईला बोलावून घेतले आहे. कालच तो आला. आज डॉक्टरांची अपॉइन्टमेंट घेतली आहे.'

विवेक ? आणि आजारी ? मला विचार पडला. आजवर विवेक आजारी पडल्याचे कधी कुणी ऐकलेच नव्हते. आणि त्यासाठी मुद्दाम कोयनेहून मुंबईला ? म्हणजे याला असे झाले आहे तरी काय ?

*

# रेखा

यांनी नोकरी बदलली आणि लगोलग आम्ही कोयनेला आलो.

असे म्हणतात की, यांनी कोयनेच्या ऑफिसचे वातावरणच बदलून टाकले.

त्या दिवसांत अशा ऑफिसांमध्ये माणसे एकमेकात मिसळत नसत. सगळे आपापला हुद्दा सांभाळून असत. हाताखालच्या माणसाशी बोलणेसुद्धा कमीपणाचे समजत. पण हे मात्र सर्वांशी हसतमुखाने आणि मैत्रीच्या नात्याने वागत. भेदभाव न ठेवता. त्यामुळे थोड्याच दिवसांत मुंबईसारखा कोयनेमध्येही यांचा मित्रपरिवार जमला.

स्टाफसाठी एक क्लब होता. तिथेही हा वरचा-तो खालचा असे गुदमरून टाकणारे वातावरण होते. पत्ते खेळायला, जेवायला माणसे एकत्र जमत तीदेखील आपापल्या हुद्द्याप्रमाणे. दर शनिवा स्टाफला सिनेमा दाखवत. पण एस्. इ.-म्हणजे सुपरिंटेंडि इंजिनीअरसाहेब आल्याशिवाय काही तो सुरू होत नसे.

हे क्लबचे सेक्रेटरी झाले आणि त्यांनी सगळ्या नवीन पद्धत सुरू केल्या. जेवणासाठी एक मोठे गोल टेबल टाकले. सगळे ति मांडीला मांडी लावून बसू लागले. एस. इ. साहेब येवोत वा येवोत, सिनेमा आठ म्हणजे आठ वाजता सुरू होऊ लागला. प्रथ हे बदल वरच्या लोकांना थोडे खटकले. पण नंतर त्यांनीही पटवू घेतले. हळूहळू क्लबमध्ये इतरही अनेक कार्यक्रम सुरू झाले.

क्लबतर्फे एक छोटेसे नाटक बसवायचे ठरले. पण नाटकात काम करायला मुली अजीबात मिळेनात. हे मला म्हणाले, 'तू का नाही काम करीत ?'

'मी नाही. मला लाज वाटते' मी म्हणाले.

'अग, त्यात लाजण्यासारखं काय आहे ? सगळी आपलीच तर माणसं आहेत.'

'मला नाही येत ॲक्टिंग.'

'इथं कुणाला येतंय् ? गंमत म्हणून करायचं. तूच जर केलं नाहीस, तर मी इतरांना कसं सांगू ?'

'यासाठी मी करायला हवंय् होय ?' मी हसू लागले.

'यासाठी असं नाही.' हे म्हणाले, 'पण तुझाही तेवढाच वेळ जाईल. नाहीतरी तुला आहे काय दुसरं करायला ?'

मी हसता हसता एकदम गप्प झाले. माझ्या डोळ्यांत पाणी आले.

खरेच, घरात करायला काही नव्हते. लग्नाला जवळजवळ आठ वर्षे झाली–पण अजून आम्हाला मूल नव्हते. आज होईल, उद्या होईल असे म्हणता म्हणता पहिली तीन-चार वर्षे निघून गेली. मग निरनिराळी औषधे झाली, व्रतवैकल्ये झाली. पण कशाचा काही गुण आला नाही. शेवटी डॉक्टरांनी माझे ऑपरेशन करायचा सल्ला दिला. पण यांना एवढी लांब रजा घेता येण्यासारखी नव्हती, म्हणून ते सारखे लांबणीवर पडत चालले होते.

मला वाईट वाटल्याचे यांच्या लक्षात आले. मग काहीतरी बोलून त्यांनी मला हसवण्याचा प्रयत्न केला; आणि मीही त्यांना बरे वाटावे म्हणून इवलेसे स्मित केले.

त्यांना बरे वाटावे म्हणूनच मग मी क्लबच्या नाटकात कामही केले.

नेहमीप्रमाणे नाटक बसवण्यापासून ते आमंत्रितांना बसवण्यापर्यंत सारी धावपळ यांनीच केली. मध्यंतरात झालेल्या कौतुक-अंकात एस्. इ. ने त्यांची तोंड भरून तारीफ केली.

नाटक संपल्याबरोबर हे लगेच म्हणाले, 'चल, लौकर घरी जाऊ या.'

मला जरा आश्चर्यच वाटले. नेहमी अशा कार्यक्रमानंतर गप्पांचा मोठा कार्यक्रम असायचा. मग आजच घाई का ? शिवाय आज माझे नाटकातले पहिलेच काम ! लोकांनाही ते आवडलेले ! त्यांच्या कौतुकाच्या वर्षावातून इतक्या लौकर बाहेर पडणे माझ्याही जिवावर आले होते. त्यातून फोटोग्राफर यांचे फोटोमागून फोटो काढीत होता. याच्याबरोबर, त्याच्याबरोबर. पण एवढ्यात, सहनशक्ती संपल्यासारखे हे ओरडले–

'नो नो, आय ॲम टेरिब्ली एक्झॉस्टड.' आणि ते सरळ चालू लागले.

मी चकित झाले. आजवर त्यांनी कधीच असे कुणाला तोडून टाकताना मी ऐकले नव्हते.

पण मी त्यांच्याकडे पाहिले मात्र-कारण लगेच माझ्या लक्षात आले.

उतरलेला चेहरा, जडावलेले डोळे! कुठल्याही क्षणी ते खाली पडतील असे वाटत होते.

कंपनीची गाडी दारात उभी होती. मी त्यांना धरून गाडीत बसवले आणि दार ओढून घेतले. त्यांनी लगेच माझ्या खांद्यावर मान टाकली.

कशाला एवढी दगदग करायची? धावपळ-जागरणं-पण यांचं हे असंच. एक नाद घेतला की, दुसऱ्या कशाची शुद्ध नाही.

गाडी घराशी थांबली. हे जेमतेम स्वत:च्या पायांनी दारापर्यंत चालत गेले-आणि दाराजवळच्याच दिवाणावर त्यांनी अंग टाकले.

मी त्यांच्या कपाळाला हात लावून पाहिला-ते चांगलेच तापले होते!

*

ही चार जुलै त्रेसष्टची गोष्ट. आजदेखील ती तारीख माझ्या चांगली लक्षात आहे. यांच्या क्लबचे नाटक, माझे पहिलच काम आणि यांच्या आजाराची सुरुवात!

रात्रभराच्या झोपेनंतर दुसऱ्या दिवशी सकाळी त्यांना थोडे बरे वाटले. सकाळी उठून त्यांनी चहा घेतला. थोडा ब्रेकफास्ट केला. पडल्यापडल्या पेपर वाचू लागले. तिथेच त्यांना परत झोप लागली.

दिवसभर झोपल्यानंतर त्यांना संध्याकाळी चांगलीच हुशारी वाटली. ताप अजीबात उतरला होता. आजूबाजूला चक्कर मारून येतो म्हणून ते बाहेर गेले.

कोणीतरी दार वाजवले म्हणून बघते तर रहीम-काल गाडी चालवत होता तो. 'साब अच्छे है ना?' तो विचारीत होता.

'हां. अभी ठीक है. घूमने गये है.' मी म्हटले.

'चलो. खुदाकी मेहरबानी.' असे म्हणून तो गेला.

अंधार पडायच्या आधी हे परत आले. पण आल्या आल्या त्यांनी पुन्हा अंथरुणावर अंग टाकले. ताप थोडाफार होता-पण म्हणण्यासारखा नव्हता. थकवा मात्र फारच आला होता.

दुसऱ्या दिवशी ते कामावर जायला निघाले. 'आजचा दिवस विश्रांती घ्या,' म्हणून मी खूप आग्रह केला. पण ते ऐकेचनात. 'काम अर्धवट राहिलं आहे, ते पुरं करून येतो. निदान चाव्या तरी दुसऱ्या माणसाकडे देऊन येतो,' अशी माझी समजूत काढून ते कामावर गेलेच.

दुपारी मात्र थोडे लवकर परत आले. दिवसभर अंगात ताप नव्हता, पण काम मात्र होत नव्हतं, अशी कबुली त्यांनी दिली. म्हणाले, 'परवा एस. इ. ची दृष्ट लागली, असं सगळे म्हणतात.' आणि हसले.

मी हसले नाही. 'आपण आज डॉक्टरकडे जाऊ या.' मी म्हटले.

'डॉक्टर कशाला हवाय साडेशंभर तापाला?' त्यांनी मला धुडकावून लावले.

पण संध्याकाळी पुन्हा ताप आला. माझी काळजी वाढली. मी यांना न विचारताच डॉक्टर मालकमबाईकडे जाऊन तिचे औषध आणले. यांना ते बळेबळेच घ्यायला लावले.

ताप तात्पुरता उतरला. पण दुसऱ्या दिवशी परत आला.

तसा ताप फार नसे. साडेशंभर-एकच्या दरम्यान असे. पण येई मात्र रोजच्या रोज. त्यामुळे यांना ऑफिसात जाण्याचे भानच राहिले नव्हते. ऑफिसमधले कुणी ना कुणी दररोज येऊन जाई. अगदी शिपायापासून ते एस. इ. पर्यंत सारे येऊन बघून गेले. ज्याला जो सुचला तो उपाय त्याने सांगितला. त्यातला जो करता येईल तो आम्ही केला. काहींनी घरगुती औषधे आणली, ती घेतली. रहीमने कुठल्याशा पिराची उदी आणली होती, ती लावली. कुणी 'बाहेरची बाधा' आहे म्हटले, त्यावर मात्र आम्ही विश्वास ठेवला नाही. मालकमबाईची औषधे, गोळ्या चालूच होत्या. गुण मात्र कशानेच येत नव्हता.

असे तीन आठवडे गेले. हे अगदी अंथरुणाला खिळल्यासारखे झाले होते. भरीत भर म्हणून त्यांचे सांधे दुखायला लागले होते. गुडघे, कोपरे सारे ठणकल्यासारखे व्हायचे. हे म्हणायचे, 'काळजी करू नकोस. तापामुळेच हे सगळं होतं.' आता तर गळ्याच्या दोन्ही वरच्या बाजूला दोन्हीकडे सूजही दिसत होती. मला काय करावे समजत नव्हते. दिवस कामात जाई. पण रात्री मात्र मी काळजीने वेडीपिशी होई. मालकमबाईच्या औषधाचा दोन पैसेदेखील गुण नव्हता. माझा धीर सुटत चालला. हे वरकरणी दाखवत नसत. पण यांनाही बहुधा काळजी वाटायला लागली असावी.

शेवटी मी मुंबईला पत्र लिहून कळवले. दादांना कशाला उगाच काळजी, म्हणून अजूनपर्यंत यांनी मला खुशालीखेरीज काही कळवू दिले नव्हते. पण आता मात्र कळवणे भागच होते.

उलट टपाली उत्तर आले-'मुंबईला निघून या.'

यांचा रजा वाढवण्याचा अर्ज घेऊन मी एस. इ. साहेबांना भेटले. ते अतिशय गोड वागले. म्हणाले,

'लवकर बरा करून घेऊन या हां त्याला. ही इज अ जेम. असला माणूस जास्त दिवस रजेवर ठेवायला आम्हाला नाय परवडेल.'

माझ्या डोळ्यांत टचकन् पाणी आले.

'डोन्ट वरी.' ते मायाळूपणे म्हणाले, 'एव्हरीथिंग विल बी ऑल राइट. गॉडवर फेथ ठेव. गॉड इज ग्रेट.'

आम्हाला एस. टी. पर्यंत सोडायला रहीम आला होता. तो गदगदून म्हणाला, 'साहेब, कुछ गलती हुवा होगा तो माफ करना!'

यांनी त्याच्या खांद्यावर थोपटल्यासारखे केले. 'वेडा कुठला!' हे म्हणाले, 'अरे, मी काही कोयना सोडून नाही चाललो. परत येणारच आहे मी! पंधरा दिवसांत येतो की नाही बघ!'

आणि आम्ही बसमध्ये चढलो.

*

# बाळ

दादांच्या पहिल्या पत्राच्या पाठोपाठ सविस्तर पत्रे आली. त्यातून मला मुंबईचा वृत्तान्त समजला.

धामणसकर आमचे फॅमिली डॉक्टर ! घरात कुणालाही काही झाले तरी, धामणसकरांवर भार टाकून आम्ही निश्चित होत असू. अर्थात विवेकला घेऊन दादा धामणसकरांकडेच गेले. त्यांनी त्याला तपासले. कुठली औषधं घेत होतास, विचारले. नाव सांगितल्यावर ते चकित होऊन म्हणाले, ' यू डोन्ट से ! एक महिनाभर ही बाई तुला अँटी- बायॉटिक्स देत होती ! ताप कंट्रोलमध्ये राहिला असेल, बट् व्हॉट् अबाउट द साइड्-इफेक्ट्स ?'

विवेक काय बोलणार ?

धामणसकरच पुढे म्हणाले, ' जास्त अँटी-बायॉटिक्सनं रक्तात दोष तयार होतो. मूळची कंडिशन अॅनिमिक असली तर मग बघायलाच नको. तू आधीच यायला हवं होतंस मुंबईला. एनी वे. घाबरायचं कारण नाही. पण आजच ब्लड चेक करून घेतलेलं बरं. '

पॅथॉलॉजिस्ट डॉ. वेलिंगांची लॅबोरेटरी आमच्या घराजवळच होती. दुसऱ्या दिवशी सकाळी दादा विवेकला घेऊन वेलिंगांकडे गेले. संध्याकाळी रिपोर्ट मिळाला.

धामणसकरांनी तो पाहिला. म्हणाले, ' काळजी करू नका. पण तुम्ही डॉ. पारिखना दाखवलेलं बरं. ते यातले स्पेशॅलिस्ट आहेत. मी चिठी देतो त्यांना. '

दादा विवेकला घेऊन डॉ. पारीखांकडे गेले. पारिखांनी इंजेक्शन्सचा कोर्स सांगितला. शिवाय गोळ्या लिहून दिल्या.

याच सुमाराला राजा काहीतरी कामासाठी मुंबईला आला होता. विवेक आजारी आहे असे कळल्यावर तो थोडे दिवस थांबला. दादांना तेवढेच बरे वाटले.

डॉ. पारिखांच्या औषधाने विवेकला लगेच गुण येऊ लागला. त्याला ताप येत होता, तो येईनासा झाला. थकवा कायम होता, पण सांधेदुखी कमी होती.

त्या महिन्यात राजा सोलापूरला परत गेला आणि आठ-पंधरा दिवसांनीच परत आला. मला याचे नवल वाटले, कारण राजा मुंबईत इतका वरचेवर येत नसे. विवेकसाठी आला म्हणावे तर, आता विवेकला बरे वाटू लागले होते.

महिन्याभराने मी स्वतःच माझ्या कामासाठी मुंबईला जाऊन थडकलो. विवेकला बघायचे होतेच, पण त्यासाठी मुद्दाम जावे इतकी काळजी आता राहिली नव्हती.

विवेकला पाहिले तेव्हा मात्र मला कसेतरीच वाटले. तो बराच अशक्त झाला होता. ते साहजिकच होते, कारण त्याचा आजार भलताच रेंगाळला होता. त्याने रजाही वाढवली होती. त्याचे हसणे-बोलणे मात्र नेहमीसारखेच उत्साहाचे होते. आता त्याच्या आजाराची सवय झाल्यामुळे घरातही, आई सोडली तर, बाकी कोणी फारसे चिंतेत नव्हते. त्यामुळे मग माझ्याही मनावरचे दडपण कमी झाले.

ती रात्र मला अजून आठवते. मी जोगळेकरकडे गेलो होतो. जोगळेकर माझा वर्गमित्र. मुंबईला आलो की, काही काही ड्रॉइंग्ज काढायला मी त्याची मदत घेत असे. आम्ही दोघे त्याच्या गच्चीत दिवा लावून काम करीत बसलो होतो.

बोलता बोलता विवेकच्या आजाराचा विषय निघाला. मी म्हटले, डॉक्टर पारिखांची ट्रीटमेंट चालू आहे आणि आता बरीच सुधारणा आहे.

' पण झालंय् काय त्याला ?' जोगळेकरने विचारले.

' अॅनिमियासारखंच काहीतरी आहे. राजेशाही आजार आहे. बरा व्हायला वेळ लागेल. '

' नाव नाही सांगितलं पारिखांनी ?'

' सांगितलं. ल्युकेमिया आहे म्हणाले. '

' काय ?' जोगळेकर दचकून ओरडला. ' नक्की ल्युकेमिया म्हणाले ?'

' हो नक्की ल्युकेमिया. दादांनी पत्रात लिहिलं होतं तसं. '

जोगळेकर घरात जाऊन पाणी पिऊन आला. एखादे भूत पाहिल्यासारखा त्याचा चेहरा भयचकित झाला होता.

' काय झालं ?' मी विचारले, ' असं का पाहतोय्स तू ?'

' सांगतो तुला, ' आवाज शांत ठेवण्याचा प्रयत्न करीत जोगळेकर म्हणाला, ' तू ज्या सहजपणानं सांगितलंस, त्यावरून तुला हा आजार किती गंभीर आहे याची कल्पना दिसत नाही. ल्युकेमिया अॅनिमियाचा भाऊ नाही. त्याहून कितीतरी अधिक भयंकर प्रकरण आहे.




ल्युकेमिया म्हणजे रक्ताचा कॅन्सर. या रोगांतून मरणाशिवाय सुटका नाही. आणि हे मरणही साधं नसतं. हालहाल करणारं, बघवणार सुद्धा नाही इतकं भयंकर.'

मला पुढचे ऐकवेना. मी सामान गोळा न करता घरीच निघालो. मला आजूबाजूचे भानच राहिले नव्हते. कोणीतरी डोक्यावर प्रत्यक्ष प्रहार करावा तसा मी सुन्न झालो होतो. ▫

त्या रात्री मला झोप लागली नाही. पण जागेपणीच तंद्री लागल्यासारखी झाली होती. जसा काही मी एखाद्या भयंकर दुःस्वप्नातच वावरत होतो. सारख वाटत होते की, हे खोटे आहे. असे काही प्रत्यक्षात असणार नाही. आणि त्याच वेळी कुठेतरी ते खरेच आहे अशी विचित्र जाणीवही मनाला चाटून जात होती.

सकाळ झाली आणि हे खरेच असल्याची खात्री वाटू लागली. मग एकेक विचार सुचू लागले. पारिखांनी दादांना कल्पना दिली असेल का? बहुतेक नसावी. आज ना उद्या हे कळल्यावर दादांचे काय होईल? आणि आई? पहिला मुलगा म्हणून तिची विवेकवर भलतीच माया. दादांच्या रागापासून तिने त्याचा कितीदा तरी बचाव केला. आता त्याला कोण वाचवेल? या संकटामध्ये कोण त्याला पदराआड करील?

वहिनीचे आता काय होईल? आणि स्वतः विवेक सबंध आयुष्यात सर्दी-पडसेदेखील माहीत नसलेला, बांधेसूद शरीराचा 'डेअर-डेव्हिल' विवेक–आपल्यासमोर काय वाढून ठेवले आहे, याची त्याला कल्पना तरी असेल का?

बहुधा नसावीच. घरात सगळे काही अगदी 'नॉर्मल' होते. हसणे, बोलणे, जेवणे, खाणे, सगळे व्यवस्थित. मलाच तेवढी घरावर पडलेली काळी सावली अगदी अचानक दिसली होती. त्यामुळे मी स्वतः हबकलो होतो; पण दुसऱ्या कुणाला ती दाखवणेही शक्य नव्हते. एकट्यालाच ठाऊक झालेल्या त्या गुपिताच्या भाराखाली मला वेड लागेल असे वाटू लागले.

शेवटी माझा विचार ठरला. मी सोलापूरला राजाकडे गेलो.

मला अचानक असा आलेला पाहून राजाला आश्चर्य वाटले. पण त्याने मला 'का आलास?' असेही विचारले नाही.

जेवणखाण आटोपल्यानंतर आम्हाला बोलायला सवड मिळाली. तोवर मी काय बोलावे याची शेकडो वेळा स्वतःशी उजळणी करीत होतो. कसे सांगितल्याने राजाला कमीत कमी धक्का बसेल, हेच मला समजत नव्हते. पण बोलणे जितके लांबणीवर पडत होते तितका माझ्या मनावरचा ताबा वाढत होता.

शेवटी ती वेळ आली. मी जोगळेकरचे शब्द राजाला जसेच्या तसे सांगितले.

एक शक्यता अशी होती की, राजा माझ्यासारखाच गडबडून जाईल. दुसरी आशा होती की तो जोगळेकरला मूर्ख ठरवील, आणि ल्युकेमिया असाध्य नाही असे मला पटवून देईल.

पण राजाने यातले काहीच केले नाही. तो फक्त एवढेच म्हणाला, 'मला कल्पना आहे या गोष्टीची. जोगळेकर म्हणाला ते शंभर टक्के खरं आहे. मला आधीपासूनच ठाऊक आहे ते.'

'म्हणून तू मुंबईला एवढ्यातल्या एवढ्यात दोन वेळा गेलास?' माझ्या डोक्यात आत्ता प्रकाश पडत होता!

राजाने मान डोलावली. 'मला वाटतं, जयवंतनाही माहीत आहे– आणि त्यांनी ते मुक्तालाही सांगितलं असावं.'

कमाल आहे या माणसांची! इतकं असून यांतल्या कुणी मला सांगितलं नाही?

'दादा–आईना मात्र अजून माहीत नाही. तूही बोलू नकोस. त्यांना हा धक्का एकदम झेपणार नाही.'

'आणि स्वतः विवेक?'

'त्याला माहीत नाही बहुतेक. नाहीतर तो एवढा आनंदी राहिला नसता.'

मला त्याचे म्हणणे पटले. विवेक भलताच बेफिकीर होता. स्वतःच्या आजाराविषयी तो बोलायचा–पण ते अगदी सहजपणाने. एखाद्याने एन्फ्लुएंझाविषयी बोलावे तसे.

त्यानंतर आम्ही कधीच या विषयावर बोललो नाही. त्याची माहिती असल्याचे एकमेकांना जाणवूनही दिले नाही. जसेकाही उल्लेख न करून आम्ही ते भयंकर सत्य पुसून टाकण्याचा प्रयत्न करीत होतो. ▫

विवेकची रजा सप्टेंबरपर्यंत होती. पारिखांच्या औषधाने त्याला थोडाफार गुण आला होता. पण अजून त्याच्यात शक्ती फारशी आली नव्हती. सांधेदुखीही होती तशीच होती. पण आता तो हिंडू-फिरू लागला होता. मित्रमंडळीत जाऊ–येऊ लागला होता. शिवाय त्याचा पवार नावाचा एक फोटोग्राफर–मित्र होता. तोही वरचेवर येऊन विवेकला बाहेर घेऊन जायचा. दुपारी मात्र वेळ जाता जात नसे. ज्यात श्रम होतील, असा उद्योग टाळायचा. मग राहिले *काय? तर पुस्तक वाचणे नाहीतर* सिनेमा पाहणे. विवेकने मॅटिनी पाहण्याचा सपाटा लावला.

पण हळूहळू सिनेमा पाहणे, वाचणे आणि गप्पा मारणे या उद्योगांचा विवेकला कंटाळा आला. एके दिवशी तो सरळ उठला आणि मर्कंटाइल बँक बिल्डिंगमध्ये त्याचे हेड ऑफिस होते, तिथे जाऊन सुपरिंटेंडिंग इंजिनीअरना भेटला. त्यांना सगळी परिस्थिती समजावून सांगितली आणि मुंबईच्या ऑफिसात बदली होऊ शकेल का ते विचारले.

सुपरिंटेंडिंग इंजिनीअरना बहुधा विवेकची सगळी माहिती असावी. त्यांनी अतिशय आस्था दाखवली. दोन-चार दिवसांत त्यांनी त्याची बदली करून घेतलीच, शिवाय त्याला दुपारी फक्त चार तास काम करून घरी जाण्याची सवलतही दिली. रोज बारा वाजता जेवून विवेक कामावर जाऊ लागला.

एके दिवशी आपटे नावाचे एक गृहस्थ विवेकच्या ऑफिसात काही कामासाठी आले. या आपटेंचा व्यवसाय सामानाची ने-आण करणे हा होता. त्यांची 'कार्टिंग एजन्सी' जोरात चालली होती आणि बरीच सरकारी कामे त्यांच्याकडे होती. कोयनेला याच संदर्भात त्यांची विवेकशी ओळख झाली होती.

विवेकची तब्येत खालावली असल्यामुळे प्रथम त्याला आपटेंनी ओळखलेच नाही. हे लक्षात येऊन विवेकने आपणहूनच त्यांना हाक मारली. जवळ येताच त्याला ओळखून आपटे चकित झाले.

'काय आपटेसाहेब, ओळख विसरलात?' विवेकने हसतहसत विचारले.

'नाही. विसरेन कसा ? पण तुमची तब्बेत जरा–' आपटे.

'–अहो, जरा नाही, चांगलीच ढासळलीय. म्हणून तर मी कोयनेहून इथं आलो.'

'काय म्हणता ? झालंय काय तुम्हाला ? व्हॉट्स् रॉंग विथ् यू ?'

'मला ल्युकेमिया झालाय.' विवेकने सहजपणे सांगितले.

आपट्यांच्या छातीत धस्स झाले. ते काहीच बोलू शकले नाहीत.

'माझं एक काम होतं आपटेसाहेब.' विवेक म्हणाला. 'मला एक रिसीट करून हवीय. कोयनेहून इथं सामान हलवल्याची.'

'म्हणजे ? तुम्ही कोयनेहून–'

'अजून सामान तिथंच आहे. आलो तेव्हा पंधरा–वीस दिवसांत परत जाईनसं वाटलं होतं. पण आता नाही वाटत कोयना दिसेलसं. आज ना उद्या सामान हलवावंच लागणार–मग आधीच रिसीट दिलीत तर, पैसे तरी क्लेम करता येतील ऑफिसकडून. सध्या पाण्यासारखा पैसा लागतोय औषधाला.'

आपटेंनी रिसीट देण्याचे कबूल केले. त्यांना त्यात काही नवीन नव्हते. कित्येकांना वेळप्रसंगी अशा रिसीट्स् देऊन त्यांनी मदत केली होती. माणसे टिकवायची असतील तर ते भागच होते.

डॉ. पारिखांच्या औषधाचा गुण चार–पाच महिनेच काय तो टिकला. त्यानंतर डिसेंबरपासून हळूहळू तब्बेत पुन्हा बिघडायला लागली. त्याचे रक्त आम्ही वरचेवर तपासून घेत असू. पण आता रक्ताचे काउंटस् वाढू लागले. घशाजवळच्या ग्लॅंड्स चांगल्याच सुजून आल्या. सांधेदुखी होतीच. पण त्याच्या जोडीला अंगावर लहान लहान गाठीही दिसू लागल्या. थकवा इतका भयंकर आला की ऑफिसला जाणे तर सोडाच, पण गल्लीतल्या गल्लीत फिरणेदेखील मुष्किल झाले. विवेकने पुन्हा अंथरुण धरले. डॉ. पारीख निरनिराळी औषधे देऊन पाहत होते. पण त्यांचा नाइलाज होतो आहे, हे आम्हाला स्पष्ट कळत होते.

मी कोल्हापूरला राहत असलो, तरी माझे मन मुंबईतल्या घराच्या भवतीभवतीच फिरत असायचे. मुक्ता मला पत्र लिहून सगळा वृत्तान्त कळवायची. तरी पण दररोज धाकधूक होतीच. पानावर बसलो, तरी मनात येई–या क्षणी विवेकची काय परिस्थिती असेल ? सुधारणेनंतर परत त्याची तब्बेत बिघडू लागली होती–हे लक्षण फारच वाईट ! त्यातून हा आजार नवीनच ऐकलेला. किती दिवस पेशंट जगतो हे तरी काय माहीत ? सगळीच अंधारातली वाटचाल ! कधीही तार येईल आणि मुंबईला जावे लागेल, यासाठी मनाची तयारी ठेवली होती.

आणि त्याप्रमाणे खरेच एके दिवशी तार आली. 'स्टार्ट इमिजिएटली.'

तारेचा शिपाई गेला आणि मी दरवाजातच डोके धरून खाली बसलो.

शेवटी जे होणार होते ते झाले होते. निदान होण्याच्या वाटेवर होते.

या वेळी हातपाय गाळून चालण्यासारखे नव्हते. ताबडतोब गेलो, तरच माझी काही मदत होणार होती. निदान विवेक जिवंत बघायला मिळण्याची शक्यता होती.

मी दहा मिनिटांत एस्. टी. स्टॅंडवर हजर झालो. तार दाखवून एस्. टी. त जागा मिळवली.

एस्. टी. चा तो प्रवास मी जन्मात कधी विसरणार नाही. रात्री सगळे प्रवासी अंगाची मुटकुळी करून झोपले होते. मी मात्र टकटकीत उघड्या डोळ्यांनी बाहेरच्या काळोखात पाहत बसलो होतो. अंधारामध्ये दगडांचे, झाडांचे वेडेवाकडे आकार दिसत होते. पण मनात त्याहूनही अक्राळविक्राळ आकार नाचत होते. काय पाहायला मिळेल घरी गेल्यावर ?

–बिछान्यात शेवटच्या घटका मोजीत पडलेला विवेक ?

–की त्याचा चादरीत गुंडाळलेला देह ?

–की सारे काही सामसूम ? आणि घरात जळणारी पणती ?

त्या कल्पनेसरशी माझ्या अंगावर शहारे आले.

बाहेरच्या काळोखात मला पणत्या दिसू लागल्या. एक–दहा–शेकडो–हजारो–

नाही–देव इतका क्रूर नाही–मी त्याला शेवटचे नक्कीच पाहू शकेन–मी निघालोय–तार हातात पडताच–जराही वेळ फुकट न घालवता मी निघालोय–मग तो मला भेटणार नाही असे कसे होईल?

एस्. टी. तून उतरलो तेव्हा जवळपास एकही टॅक्सी उभी नव्हती. घरही तसे जवळच होते. मी बॅग हातात घेऊन चालत निघालो. पाच मिनिटांचा तो प्रवास ! पण तो संपणारच नाही असे वाटत होते. घरी येऊन पोहोचेपर्यंत मला ब्रह्मांड आठवले.

दरवाजा बंद होता. सगळे शांत होते. दाराच्या पलीकडे काय पाहायला मिळणार होते ?

मी सारा धीर गोळा करून बेल वाजवली.

पण दार खुद्द विवेकनेच उघडले.

विवेक–अजून जिवंत होता–आपल्या पायांवर उभा होता–आणि मी मात्र त्याला–

मी त्याला दारातच मिठी मारली आणि धो धो रडू लागलो.

'अरे रडतोस काय ?' काही न समजून विवेक म्हणाला–'आता बरे आहेत दादा. काल मात्र घाबरवून सोडलं होतं.'

'दादा ?' मी चकित होऊन विचारले.

'हो. काल त्यांना एकाएकी पक्षघाताचा झटका आला. म्हणून तुला तार केली. आता बरे आहेत. पण हॉस्पिटलमधे आहेत. डॉक्टर म्हणतात, उजव्या बाजूला धोका आहे. कदाचित लुळी पडेल.'

माझी एक काळजी तात्पुरती मिटली होती.

आणि दुसरी सुरू झाली होती. *

॥श्री कलेश्वर प्रसन्न॥
व्ही. एस. माळंडकर
आणि कंपनी
फोन: ४५८०४४
ज्युवेलर्स
हनुमान मंदिर समोर, एन. सी. केळकर रोड, दादर, मुंबई-२८
BY.P

# रेखा

दादांना आलेला पक्षघाताचा झटका अकल्पितच होता.

तसे म्हटले तर, दादांची तब्बेत या वयातही ठणठणीत होती. पण कधी काय होईल याचा भरंवसा नसतो ! त्या दिवशी आम्ही सगळे गप्पा मारीत बसलो होतो. यांनादेखील जरा बरे वाटत होते. यांच्या लहानपणच्या आठवणी आई सांगत होत्या. कसे एकदा हे एका माकडाची खोडी काढायला गेले. आणि माकडांची टोळीच्या टोळी यांच्या मागे लागली, हे ऐकता ऐकता दादांना एकदम हसू आले. वास्तविक ते तसे गंभीर स्वभावाचे. कधीच मोठमोठ्याने हसत नाहीत. त्यातून यांच्या आजारापासून ते अधिकच गंभीर झालेले. पण कसे कोण जाणे त्या दिवशी त्यांना एवढ्या जोराने हसू आले ! व हसताहसता एकदम आपले बसल्या जागेवरून खालीच कोसळले.

आम्ही सगळे घाबरून गेलो. पाणी वगैरे मारून त्यांना शुद्धीवर आणण्याचा प्रयत्न करू लागलो. पण ते नुसते बेशुद्ध नव्हते. बेशुद्धीतही जागच्या जागी तडफडत होते. त्यांचा तो झटका पाहून आई भीतीने रडूच लागल्या. घरात पुरुषमाणूस दुसरे कुणीच नव्हते. शेवटी यांच्यात कुठून बळ आले कुणास ठाऊक ! यांनी फोन करून धामणसकरांना बोलावून घेतले. तोवर जयवंत आलेच होते. मग हॉस्पिटलमध्ये पोचवण्याची धावाधाव मुक्ताने आणि जयवंतांनीच केली.

दोन–चार दिवसांत दादांना बरे वाटले. पण त्यांचा उजवा हात मात्र ताठच राहिला होता. त्याची फारशी हालचाल होत नव्हती. पायावरही परिणाम झाला होता. पण डॉक्टर म्हणाले की, वरचेवर मसाज केल्याने तो बरा होईल.

दहावारा दिवसांत दादा हॉस्पिटलमधून परत आले. त्यांच्या हाताचा आणि पायाचा मसाज चालूच राहिला. बऱ्याच वेळा जयवंत त्यांना मसाजसाठी घेऊन जात. क्वचित जयवंत नसले तर, मग हे जात. हात सुधारण्याची लक्षणे नव्हती. पण निदान मोठे संकट टळले होते. दादांनी एकदम खूप घाबरवले हे खरे. पण त्यांना गुणदेखील पटकन् आला. नाहीतर यांचा आजार ! आज जवळ जवळ सात महिने होत आले, पण अजून काही यांना बरे वाटलेले नाही. निदान कधी बरे होणार याची शाश्वती हवी ! पण इथे पाहावे, तर आजचा दिवस कालच्यासारखा. प्रकृती कणभराने अधिकच बिघडलेली. पण सुधारणा नाही. मी असे बोलू नये, पण दादा हॉस्पिटलमधून परत आले तेव्हा मला आईचा हेवा वाटल्याखेरीज राहिला नाही.

कधी कधी मला एक भयंकर शंका यायची. यांचा हा आजार आहे तरी कसला ? असाध्य तर नाही ? पण विचारणार कुणाला ? आणि विचारले, तरी मला खरे कोण सांगणार ? कधीकधी वाटायचे की, आपणच तेवढे अंधारात आहोत. बाकी सर्वांना खरे काय ते माहीत आहे. मग मन प्रत्येकाच्या वागण्यातून अर्थ काढीत बसायचे. राजाभाऊ सोलापूरहून वरचेवर का येतात ? बाळभाऊजी यांच्या मनाला एवढे का जपतात ? भावंडांचे एकमेकांवर खूप प्रेम आहे, हे खरे. पण म्हणून यांचा प्रत्येक शब्द झेललाच पाहिजे असे नाही. हे अगदी चिडून काही बोलले तरी कोणी उलट उत्तर देत नसे. का हे असे ? जे मनात येई त्याने जिवाचे पाणी पाणी होई. कधी वाटायचे, देवाचे काही करावे. पण दादांनाच देवाचे विशेष काही नसल्यामुळे घरात पूजासुद्धा होत नसे. मग मी कुणाच्या तरी सांगण्यावरून आपली आपणच शिवलीलामृताचा अठरावा अध्याय वाचू लागले. पण खरा आधार होता तो यांचाच. ह्यांचा हास्यविनोद पूर्वीसारखाच चालू होता. डॉक्टरांबरोबर ते रिपोर्टविषयी चर्चा करीत. त्यावरून त्यांना आजाराची नीट माहिती असावी हेही नक्कीच. ते जोवर काळजीत दिसत नव्हते, तोवर मला आशा सोडायचे कारण नव्हते.

पण जानेवारी उलटला, आणि सगळ्यांच्याच तोंडचे पाणी पळाले. यांनी कामावर जाणे तर पूर्वीच सोडले होते. पण आता तर त्यांना अंथरुणातूनही उठवेना, इतका अशक्तपणा आला. त्यांना शुद्ध रक्त वरचेवर द्यावे लागायचे. पण ते घेतानाही हुडहुडी भरल्यासारखे होई. हळूहळू घरातले हास्यविनोद संपले. आम्ही एकमेकांशी कामापुरते बोलू लागलो. एरवी गप्पच असू. मनात नाना विचार येत. ते टाळण्यासाठी मी काम शोधत राहायची किंवा स्तोत्र म्हणत बसायची. पण तरीही एखादवेळी धडकी भरायची. वाटायचे, पूर्वीच ऑपरेशन करून घेतले असते तर, एखादे मूल तरी झाले असते. असल्या काही बाही विचारांनी डोळे भरून यायचे आणि ते यांच्यापासून लपवता लपवता पुरेवाट व्हायची.

आता घरातल्या सगळ्यांचीच मनाची तयारी होऊ लागली होती आणि लपवाछपवीचे कारणच उरले नव्हते. पक्षघाताचा झटका आल्यानंतर दादांच्या हातून पूर्वीसारखे काम होत नव्हते आणि त्यांना मदतीची गरज होती. मग बाळभाऊजींनी तात्पुरती कोल्हापूरची रजा घेतली आणि ते इकडेच येऊन राहिले.

पारिखांच्या ट्रीटमेंटचा आता काही उपयोग होईनासा झाला होता. तेव्हा आम्ही सुचतील ते ते उपाय करू लागलो होतो. आजवर दादांनी कधी देवाला हात जोडले नव्हते. पण आता ते आणि आई राजाभाऊबरोबर पंढरपूर, तुळजापूर, गाणगापूर अशा सगळ्या ठिकाणांची यात्रा करून आले.

गावचा एकजण आला आणि सांगून गेला की, यांच्यावर करणी केलेली आहे. आपल्या ओळखीच्या एका नामवंत मांत्रिकाला तो साताऱ्याजवळच्या पाडळी गावाहून घेऊन आला. प्रवासखर्च म्हणून आमच्याकडून दोनशे रुपये घेतले. मांत्रिकाने लिंबामध्ये उदबत्त्या खोचून मंत्रतंत्र केले आणि कोयनेच्या कोणा मद्रासी माणसाने करणी केल्याचे सांगितले. अवसेच्या रात्री पोतेभर चुरमुरे वाटून शांती करावी लागते, असे सांगून त्याने आमच्याकडून पाचशे रुपये काढले.

एके दिवशी टाइम्समध्ये जाहिरात वाचली की, सरदारगृहात एक मद्रासचा मांत्रिक उतरला आहे. त्याने म्हणे पंडितजींच्या समोर सापाचे विष मंत्राने उतरवून दाखवले. बाळभाऊजी आणि जयवंत जाऊन त्याला टॅक्सीने सरदारगृहातून घेऊन आले. माणूस इतका रुबाबदार आणि मिठ्ठासवाणीचा होता की, आम्हाला लगेच तो म्हणेल ते खरे वाटू लागले. अकरा ब्राह्मणांचे एक महिना अनुष्ठान करतो, मुलाला महिनाभरात बरे वाटेल, असे सांगून तो पाचशेएक रुपये घेऊन गेला.

आता विचार केला, तर पैसे असे उधळण्याचा मूर्खपणा आम्ही का करीत होतो, ते समजत नाही. पण तेव्हा सगळे म्हणायचे की, देऊ या पैसे. या माणसांचं आपण पूर्वजन्मीचं देणं लागत असू. कशानेही का होईना, गुण आला म्हणजे पुरे. त्यातून सध्या पैसे खर्च करण्याची परिस्थिती आहे, हेही कमी नाही. पूर्वी ती तरी कुठे होती? आपल्या माणसासाठी खर्च करायचा नाही, तर कोणासाठी ?

मार्च महिना लागला आणि यांच्या शरीरावर लहान लहान काळे डाग दिसायला लागले. त्यांनीच ते मला दाखवले. डोळ्यांतले पाणी लपवण्यासाठी मी तोंड फिरवले. पण ते हसत हसत म्हणाले, 'वेडी ! अग, या डागांनी काय फरक व्हायचाय् ? आधीच आम्ही मोठे गोरे पडलो की नाही ? मूळच्या रंगात डाग दिसतसुद्धा नाहीत?'

त्यांचे ते हसणे ऐकले आणि मला कळले की, आता शेवटची आशादेखील संपली. कारण त्यांचे हसणे केवळ आमच्यासाठीच होते. सारे काही त्यांना कळले होते. कदाचित यापूर्वीच कळले असेल आणि तेव्हाही ते आताच्यासारखेच खोटे हसत असतील. मीच बापडी खुळ्यासारखी त्यांच्या हसण्यामुळे फसत होते.

आता नशीब सोडून बाकी कुणावरच भिस्त नव्हती.

राजाभाऊंनी सोलापूरमधली नोकरी सोडली आणि ते मुंबईच्या फिन्ले मिल्समधे वीव्हिंग मास्टर म्हणून आले. खरे तर, ही नोकरी आधीच्या नोकरीपेक्षा काहीशी कमी दर्जाची होती. पण मुंबईत राहायला मिळणे सध्या त्यांना महत्त्वाचे वाटत होते. मध्यंतरी कोल्हापूरला परत गेलेल्या बाळभाऊंनाही राजाभाऊंनी परत बोलावून घेतले. का बोलावले याचे काहीतरी चिल्लर कारण त्यांनी माझ्या समाधानासाठी सांगितले. पण मी काहीच बोलले नाही.

यांच्या मनात काय चालले असेल याची कल्पनाही येत नसे. ते शांतपणे रेडिओ ऐकत पडलेले असायचे. पवार नावाचा त्यांचा एक फोटोग्राफर मित्र होता, त्याने यांना टेपरेकॉर्डर आणून दिला होता. त्यावर हे एकसारखे कुमार गंधर्वांच्या आणि भीमसेन जोशींच्या टेप्स लावायचे. मला वाटते, त्यांचे गाणे सोबतीला होते म्हणूनच यांना जिणे सुसह्य होत होते. जिथे आम्ही कुणी पोहोचू शकत नव्हतो, तिथे ते सूरच त्यांना साथ देत होते.

मध्यंतरी त्यांचा आहार बऱ्यापैकी झाला होता. मासे वगैरे ते आवडीने खात. पण आता त्यांची भूकच मंदावली. ब्लड-ट्रान्सफ्युजनच्या वेळी हुडहुडी भरणेही वाढले. केस तर साफ गळले होते. त्यामुळे आता त्यांना ओळखणेही कठीण झाले.

एके दिवशी यांच्या मनात काय आले कोण जाणे, यांनी पवारकडे हट्ट धरला की, आमचा दोघांचाच एक फोटो काढ. लग्नानंतर काढू काढू म्हटले तरी, कधीच काढला गेला नव्हता—आता तरी काढ ! पवारने पुष्कळ समजूत घातली की, तू बरा झाल्यावर फोटो काढू. पण हे ऐकेचनात.

बिचारा पवार दुसऱ्या दिवशी सकाळी कॅमेरा घेऊन आला. उशा वगैरे लावून यांना साधारण बसते केले. यांनी चेहरा हसरा ठेवला होता. पण मला ते कसे जमणार ? मी दातांत पदर धरून हुंदका कसाबसा थांबवला. पण पवार म्हणू लागला, चेहरा झाकला जातोय. मी महत्प्रयासाने हुंदका दाबला. तरी यांना तो कळल्याखेरीज राहिला नाहीच. अगदी हलक्या आवाजात ते म्हणाले, 'आय् अॅम् सॉरी रेखा.'

मग मात्र मी रडे आवरले. कसाबसा फोटो उरकला.

एवढ्यात डॉक्टर पारिख आले. अलीकडे ते दररोज येऊन चेकिंग करीत.

पवार जायला निघाला—एवढ्यात यांनी त्याला आठवण केली : 'अरे, ते आपटे तुमच्याच कॉलनीत राहतात ना ? ते मला रिसीट देणार होते सामानाची. अजून दिली नाही. मग विसरले की काय कोण जाणे ! आज आठवण करशील का त्यांना ?'

पवार 'हो' म्हणाला. 'नक्की सांग हं त्यांना.' हे मिस्कीलपणे हसून म्हणाले, 'म्हणावं, जरा घाई करा.'

डॉक्टरांनी त्यांना तपासले. मग माझ्याकडे पाहिले. बोलले काहीच नाहीत. पण ते जरा गंभीर झाले होते. राजाभाऊंना आणि बाळभाऊंना निसटती खूण करून ते निघाले.

ते दोघेही त्यांच्या पाठोपाठ खाली गेले.

मी समजून चुकले.

ज्याचे भय वाटत होते तो दिवस आता लांब नव्हता.

माझ्या डोळ्यांसमोर अंधारी आली. मी त्यांच्या पायागतीच अंथरुणावर कोसळून पडले.

*

## बाळ

मी आणि राजा—आम्ही दोघे पारिखांच्या पाठोपाठ खाली आलो. कारमधे बसण्यापूर्वी डॉक्टर थांबले.

माझ्या खांद्यावर हात ठेवीत म्हणाले, 'वेल्, यू मस्ट प्रिपेअर युअरसेल्फ फॉर व्हॉट इज् इन् स्टोअर. विवेकची ही शेवटची स्टेज आहे. ही विल् नॉट सर्व्हाइव्ह फॉर मोअर दॅन टेन डेज्. जास्तीत जास्त दहा दिवस !'

राजाने डोळ्यांच्या कडा पुसल्या. डॉक्टरांनी त्याच्या पाठीवर थोपटल्यासारखे केले. त्यांना कधीच इतके कनवाळूपणे बोलता—वागताना पाहिले नव्हते. जणू काही ते डॉक्टर नसून आमच्या कुटुंबातलेच एक होते.

'आय् नो यू विल् मिस् हिम्. इव्हन् आय् अॅम गोईंग टू मिस् हिम्. मी असं सरळ तुमच्या तोंडावर सांगतोय्—माफ करा. पण सांगतो त्याला कारण आहे. तुम्ही तुमच्या आई-वडिलांनाही सांगून ठेवा. सगळ्यांनीच मनाची तयारी करायला हवीय. पण शक्य असेल तर, शेवटच्या दिवसांत त्याच्या बायकोला इथं ठेवू नका. कारण जे दिसेल ते तिला सहन होणार नाही. ल्युकेमियाच्या पेशंटचं मरण भयानक असतं. त्याच्या अंगावर आता जिथं जिथं काळे ठिपके उठले आहेत तिथं तिथं त्याची कातडी फुटेल आणि रक्त वाहायला लागेल. नाक, कान, नखांच्या कडा, सगळीकडून सडकं रक्त वाहत राहील. जायच्या दिवशी त्याला डायरियासारखा एखादा लहानसा आजार होईल किंवा त्याहीपेक्षा वाईट म्हणजे विलक्षण गुदमरल्यासारखं होईल. गळा दाबल्यासारखे हाल दोन—चार तास होतील. ते बघायचं म्हणजे माणूस धीराचं हवं. तो धीर तुम्हाला यावा, म्हणून आत्तापासूनच सांगून ठेवलं.'

डॉक्टरांची कार गेली, तरी आम्ही कितीतरी वेळ एका जागी खिळल्यासारखे रस्त्यातच उभे होतो. एकमेकांशी काहीच न बोलता. बोलण्यासारखे उरलेच होते काय ?

आता फक्त दिवस मोजायचे. दहा–नऊ–आठ–सात...

डॉक्टर भविष्य सांगून चुकले होते. आता ते खोटे ठरणे अशक्य होते.

– आणि त्याच दिवशी दुपारी आपटे घरी आले.

ते विवेकने मागितलेली रिसीट द्यायला आले होते. बहुधा पवारने गेल्या गेल्या त्यांना सांगितले असावे.

आमचे बोलण्यात लक्ष नव्हते. आपटेंशी आम्ही तुटकपणेच वागत होतो. ते केव्हा एकदा जातील असे झाले होते.

पण आपटे चांगलेच गप्पा मारण्याच्या मूडमध्ये दिसत होते.

शेवटी ते जायला निघाले. 'जरा खाली येता का ?' ते आम्हाला म्हणाले.

'चला.' मी आणि जयवंत त्यांना खालपर्यंत पोचवायला गेलो.

'मला एक सांगायचं होतं.' आपटे म्हणाले.

'हे बघा आपटे, आपण नंतर कधीतरी बोलू.' जयवंत म्हणाले. 'आज आम्ही कोणीच बोलण्याच्या परिस्थितीत नाही. विवेकचं जरा जास्त आहे.'

'हो. मी त्याच्या ऑफिसात गेलो होतो, तर ओळखताच आलं नाही मला. म्हणाला, मला ल्युकेमिया झालाय. मी तर हादरूनच गेलो.'

'हो—पण आता त्याची शेवटची अवस्था आहे ! आम्ही जातो. नमस्कार.' आम्ही निघालो.

'थांबा.' आपटे म्हणाले. 'ल्युकेमियाचं नाव घेतल्याबरोबर मी का हादरलो ते सांगतो. गेल्या वर्षी माझी बायको याच आजारानं वारली.'

आम्ही एकदम थबकलो. आपल्यासारख्याच दुःखातून गेलेला एक माणूस आपल्यासमोर उभा आहे याची आम्हाला इतका वेळ जाणीव नव्हती.

'मी आज नुसता रिसीट द्यायला आलो नव्हतो' आपटे म्हणाले. 'मला एक प्रयत्न करावासा वाटतो. तुमच्या भावाला बरं वाटावं म्हणून. त्यात माझा काडीचा स्वार्थ नाही. तुम्हाला पैचा खर्च येणार नाही. फक्त विश्वास हवा. विश्वास ठेवण्याच्या तयारीनं या तुम्ही माझ्याकडे. आज रात्री या. तुम्ही दोघेही.'

भारल्यासारखे आम्ही आपटेंचे बोलणे ऐकत होतो. आज–रात्री–माझ्याकडे—या...

※

# आपटे

मी आणि माझी बायको. आमचा जोडा तसा विजोड होता. म्हणजे मी दिसायला चारचौघांसारखा, तर ती काहीशी देखणी. मला चारचौघात मिरवण्याची आवड, तर तिला साधेपणा प्रिय. मी व्यवहारी. त्या मानाने तिचे व्यवहारात लक्ष कमी.

पण इतके असूनही आमचे एकमेकांवर फार प्रेम होते. म्हणजे सर्वसाधारणपणे नवराबायकोचे असते त्याहीपेक्षा अधिक. ती आमच्या नात्यातली; आम्ही दोघे लहानपणापासून एकत्र वाढलो, खेळलो, म्हणून असेल कदाचित.

कदाचित तिचा समजूतदारपणाही याला कारण असेल. ती माझे दोष ओळखून मला सांभाळून घ्यायची. तिची शरीरयष्टी चांगली मजबूत होती. मॉंटेसरी स्कूलमधली आपली नोकरी सांभाळून ती दोन मुलांकडे लक्ष ठेवायची; शिवाय घर विलक्षण टापटीप ठेवायची.

आम्ही दोघेही अगदी सामान्य होतो. मला कुठल्याही मार्गाने का होईना, पण पैसा कसा मिळवावा हे ठाऊक होते. कार्टिंगचा धंदा बऱ्यापैकी चालत होता. पण यापलिकडे विशेष सांगण्यासारखे माझ्यात काहीच नव्हते. तिच्यात मात्र एक काहीसा असामान्य गुण होता. काही काही गोष्टींची सूचना तिला नकळत मिळायची. कधी कधी संध्याकाळी घरी येताच ती मला विचारायची, 'आज कुणाशी भांडण तर नाही झालं ? दुपारी अडीचच्या सुमाराला ?'

'भांडण नाही, थोडी कुरकुर मात्र झाली पार्टनरशी. पण तुला कसं कळलं ?'

'कसं कोण जाणे. पण मला दुपारी अगदी बेचैन वाटत होतं खरं.'

असे क्वचित कधीतरी जगावेगळं व्हायचे. पण यापलिकडे काही नाही. आमचा संसार तसा चारचौघांसारखाच चालला होता

एकदा रात्री जेवण झाल्यावर आम्ही गप्पा मारीत बसलो होतो. मुले पलिकडे झोपली होती. निर्मला एकदम म्हणाली,

'आता मोठी झाली नाही मुलं?' आता काय, त्यांना आई नसली तरी चालेल !'

मला ते ऐकून कसेतरीच वाटले. 'असं काय बोलतेस वेड्यासारखं ?' मी म्हणालो, 'मुलांना आई नसून कसं चालेल ?'

'कोण जाणे! पुढल्या महिन्यात मी कुठं असेन, ती कुठं असतील?'

आज हिने हे काय बोलणे काढले होते कुणास ठाऊक ! मला ते अधिक ऐकवेना. मी विषय बदलला. मग मात्र ती नेहमीसारखी बोलायला लागली.

त्यानंतर होळीचा सण आला. घरात गोडधोडाचे जेवण होते. जेवताना वाटते हिच्या दाढेत काहीतरी अडकले. ते काढण्याचा तिने प्रयत्न केला. पण दाढ अधिकच ठणकू लागली. संध्याकाळी 'ॲनासिन' घेऊन ती झोपली.

पण दुसऱ्या दिवशी सकाळी गळ्याजवळ एका बाजूला चांगलीच सूज आलेली ! आम्ही संध्याकाळी डेन्टिस्टकडे जायचे ठरवले. पण संध्याकाळपर्यंत दुसरीही बाजू सुजली.

ते पाहिल्यावर मात्र मनात चर्रर्र झाले. हा नुसता दातांचा आजार नाही, अशी भीती वाटली. मी तिला घेऊन लगेच फॅमिली डॉक्टरकडे गेलो. त्यांच्या सांगण्यावरून लगेच रक्त वगैरे तपासून घेतले. माझी अभद्र शंकाच खरी ठरली. निर्मलेला 'ल्युकेमिया' झाला होता. आणि तोही 'गॅलपिंग.' औषधोपचार करायलाही वेळ नव्हता. ती आता आठदहा दिवसांचीच सोबतीण होती.

दुसऱ्या दिवशी तिला 'बॉम्बे हॉस्पिटल'मध्ये ॲडमिट् केले. मुलांना आजीकडे ठेवून मी सगळा वेळ निर्मलेच्या उशाशी बसून राहू लागलो.

रात्रीची वेळ होती. बसल्यावसल्या मला मधेच डुलकी लागली. एवढ्यात निर्मलेने मला उठवले.

'अहो–उठा. मला भयंकर गुदमरल्यासारखं–जरा ऑक्सिजन–'

मी धावतच नर्सकडे गेलो. तिने ऑक्सिजन दिला.

हळूहळू निर्मला स्वस्थ झोपल्यासारखी दिसू लागली.

सकाळी मी उठलो. बॉम्बे हॉस्पिटलच्या डॉ. शहांकडे गेलो. विचारले, कितपत आशा आहे? माझा धीर सुटत चालला आहे!

शहांनी माझी कशीबशी समजूत घातली. मी नाइलाजाने परत येऊन निर्मलेच्या उशाशी बसून राहिलो.

ही अवस्था भलतीच वाईट! आपले प्रिय माणूस तडफडत असताना बघावे लागते–पण त्याला आराम देण्यासाठी आपण काहीही करू शकत नाही!

निर्मलेने डोळे उघडले. विचारले– 'कुठं गेला होता?'

'कुठं नाही– इथेच तर होतो.'

'खोटं! मी सांगू कुठं गेला होता?'

'कुठं? मुलांकडे?'

'नाही. डॉक्टर शहांकडे. माझी कितपत आशा आहे हे विचारायला. होय ना?'

'तुला कसं कळलं?'

'मी होते तिथंच.'

'म्हणजे?'

'म्हणजे तुम्ही शहांकडे गेलात तेव्हा मी तुमच्याबरोबरच गेले. ही आता तुमच्यापुढे परत येते आहे–'

निर्मला नक्की वातात बडबडत होती! मी अधिकच घाबरून गेलो.

'माझ्यावर विश्वास ठेवा. काल रात्री तुम्ही ऑक्सिजन दिलात ना, तेव्हाच एक झालं. मी या शरीरातून बाहेर पडले. बाजूला उभी राहून या माझ्या शरीराकडे पाहायला लागले. काय भयंकर अवतार झालाय् हो या शरीराचा! सगळीकडून नुसतं फुटून निघालंय्. जागा मिळेल तिथून रक्त बाहेर यायला पाहतंय्. चेहरा तेवढा अजून जरा बरा आहे–'

'जास्त बोलू नकोस. तुला धाप लागेल–'

'ऐका तरी. आता फार वेळ नाही बोलणार मी तुमच्याशी–' ती म्हणाली–'तर काय सांगत होते? बाहेर पडले आणि मोकळी झाल्यासारखी सगळीकडे भिरीभिरी फिरले. घरी जाऊन आले. मग आठवलं, मुलं आजीकडे आहेत. मी तिथं जाऊन त्यांना पाहून आले. सकाळी तुमच्याबरोबर आले– शहांकडे. ही आताच परत येतेय्. इतका वेळ माझ्या सगळ्या वेदना थांबल्या होत्या. पण आता शरीरात परत आलेय् ना– तर दुखणं जाणवायला लागलंय्–'

वेदना असह्य व्हायला लागल्यामुळे ती बोलायची थांबली.

मी चक्रावून गेलो होतो. ती बोलली त्यात एक प्रकारची सुसंगती होती. ती केवळ भ्रमात बोलत होती असे कसे मानायचे? आणि तसे असेल तर मी डॉक्टर शहांकडे गेल्याचे तिला कळले कसे?

अगदी विलक्षण असामान्य परिस्थितीत जीव शरीरातून बाहेर पडून अशरीरी फिरू शकतो अशी उदाहरणे मी कुठे कुठे वाचली होती. वाचली तेव्हा मी त्यावर मुळीच विश्वास ठेवला नव्हता. निव्वळ रंजक माहिती म्हणूनच मी ती सोडून दिली होती. पण आता वाटू लागले की, असा काही प्रकार खरोखरच असेल का?

थोड्या वेळाने तिने डोळे उघडले. मला म्हणाली–

'मी जाणार आहे तिथं सारं चांगलं आहे, शांत आहे, सुखाचं आहे. मला नीट समजलंय्. आता मला भीती वाटत नाही तिथं जाण्याची–

'असं काहीतरी बोलू नकोस. तू बरी होशील–'

मी तिची समजूत घातल्यासारखे बोललो. पण माझा मलाच स्वतःच्या शब्दांचा पोकळपणा जाणवला. माझी आशा एका सामान्य माणसाची होती. या जगातली. तिला त्या पलीकडचे काहीतरी जाणवले होते. कसली तरी नवीन ओळख पटली होती. तिला आता कसल्याही लौकिक आश्वासनांची गरज नव्हती.

'आज रात्री नऊ वाजता मी जाणार. जवळच्यांना निरोप घ्यायला बोलावून ठेवा.' ती म्हणाली.

एवढे बोलून ती डोळे मिटून पडून राहिली. दिवसभर ती बेशुद्धच होती.

मला काय करावे ते कळेना. मी जवळच्या नातेवाइकांना रात्री नऊपर्यंत या म्हणून सांगून ठेवले.

आठ वाजल्यापासूनच तिच्या रूममध्ये आणि बाहेरही गर्दी जमली. आजचा प्रसंग वेगळा आहे, हे ओळखून हॉस्पिटलच्या अधिकाऱ्यांनी हरकत घेतली नाही. निर्मला अजूनही बेशुद्धच होती. तिचा श्वासोच्छ्वास नीट होत नव्हता.

काटा जसजसा नऊकडे सरकू लागला, तसतसा माझ्या पोटात खड्डा पडू लागला. भीती म्हणावी तर भीतीही वाटत नव्हती. चिंताही वाटत नव्हती. पण रोजच्या व्यवहाराचे सगळे विचार सुटले होते एवढे खरे. मोहिनीमंत्र घातल्याप्रमाणे मन फक्त 'नऊ वाजले की–' एवढाच विचार करीत होते. डोळे घड्याळाच्या काट्यावर बांधल्यासारखे झाले होते.

बरोबर नऊ वाजता तिने डोळे उघडले. एकदा जमलेल्या माणसांकडे पाहिले. माझ्याकडे पाहून किंचित स्मित केले. हे तिचे पाहणे अगदी नेहमीसारखे होते. क्षणापूर्वी ती बेशुद्ध होती, हे खरेसुद्धा वाटले नसते. सगळ्यांकडे पाहून तिने एकदाच हात जोडले. मग हात तसेच खाली झाले आणि पापण्या मिटल्या गेल्या.

एका सर्वसामान्य आयुष्याचा अशा रीतीने लोकविलक्षण शेवट झाला... ¤

निर्मला गेली आणि काही दिवस मनच संसारातून उडाल्यासारखं झाले. मुले एकसारखी आईची आठवण काढून खिन्न होत. शिवाय त्यांची रोजची काळजी घ्यायलाच हवी होती. ते काम मुलांची मामा–मामी करू लागली. पण तरीही कशात चित्त लागेना. झाले ते सगळे इतक्या अचानक होऊन गेले होते, की अजूनही मला आपण एखाद्या स्वप्नात आहोत, त्यातून जागे झाल्यावर ती अजूनही या जगात दिसेल, असेच वाटायचे.

मी नाइलाजाने ऑफिसात जात होतो. पण घरी आल्यानंतर एकटाच खिन्नपणे बसून राही. ती असताना आमचा बराचसा वेळ हितगुज करण्यात जाई. आता ती गेल्यामुळे वेळ मला खायला उठला. काहीतरी आठवणी काढीत, कसले तरी विचार करीत मी वेळ काढू लागलो.

असाच त्या दिवशी बसलो होतो. हातात उघडे पुस्तक होते. पण एक ओळ वाचली जात नव्हती.

एवढ्यात शब्द आले—

'ऐकलं का ? तुम्ही एकदा ऋषीकडे जा—'

मी विलक्षण दचकलो. नक्की हा निर्मलेचाच आवाज—अगदी स्पष्ट ऐकू आला !

मी आजूबाजूला पाहिले. सारे जिथल्या तिथे. सगळे खरेखुरे. मी पूर्णपणे जागा.

मग हे कोण बोलले ? आणि अर्थ तरी काय याचा ? 'ऋषी'-कडे जा', म्हणजे काय ? आमच्या ओळखीत किंवा नात्यात अशा नावाचे कुणीच नव्हते.

मी बेचैन झालो. पण उपाय नव्हता. भास म्हणून सोडून देणे, एवढेच शक्य होते. स्वप्नात येऊन ती काही सांगेल अशी अटकळ होती, पण स्वप्नात ती कधीच आली नाही. स्वप्ने पडायची ती नेमकी कंपनीच्या कामाची.

एके दिवशी मी ऑफिसला जाण्याची तयारी करीत होतो. बुटाची नाडी बांधताना एकदम ओळखीचा आवाज आला.

'ऋषींकडे जाऊन या हा एकदा-'

नाडी बांधता बांधता माझा हात थबकला. या वेळेस हा भास नव्हता. शब्द अगदी स्पष्ट आले होते. आवाजही निर्मलेचाच. पण मी काय करायचे ? ऋषींकडे म्हणजे कुठे जायचे ?

आणि अचानक मला या प्रश्नाचे उत्तर मिळाले. एकदा काही कामासाठी गिरगावात गेलो होतो. सेंट्रल सिनेमाजवळ बससाठी उभा होतो.

आणि एकाएकी रस्त्यावरची माणसांची, वाहनांची गजबज सेकंद-भरच बंद झाली आणि स्पष्ट शब्द आले—

'ऋषी जवळच राहतात. चौकशी करा.'

पुन्हा रस्त्यावरची गडबड चालू झाली. मी भानावर आलो. हा भास नक्कीच नव्हता—या मागे काहीतरी हेतू होता—कसली तरी योजना होती—

मी बसस्टॉप सोडून निघालो.

चारदोन माणसांना विचारले. शेवटी एका वृद्ध माणसाने एका उंच इमारतीकडे बोट दाखवले. इमारतीच्या दाराशीच उसाच्या रसाचे दुकान होते. म्हातारेबुवा म्हणाले, 'या इमारतीमध्ये जा. शेव-टच्या मजल्यावर टोकाची खोली.'

इमारत तशी बरी होती, पण जिना उभाच्या उभा. खालपासून थेट वरपर्यंत गेलेला. प्रत्येक मजल्यापाशी थोडी थोडी जागा सोडलेली.

टोकाच्या खोलीशी जाऊन थांबलो. दारावर पाटी होती, 'मिस्टर ऋषी. स्पीरिच्युॲलिस्ट.'

मी दार ठोठावले.


कठिण समय येता कोण कामास येतो?

रौप्यमहोत्सवी वर्ष १९५२ ते १९७६
२५
सेवेची पंचवीस वर्षे
पुणे पीपल्स को ऑप बँक लि
सेवा आणि सुरक्षितता

१९५२ ते १९७६
दोन तपांची यशस्वी वाटचाल.....

अन् ही आमची तपश्चर्या : (३० जून १९७६ अखेरचे आकडे)
ठेवी : रु. १ कोट १ लाखाचेवर खेळते भांडवल : रु. १ कोटी ३३ लाखाचेवर
भाग भांडवल : रु. ५ लाखाचेवर राखीव निधी : रु. ६ लाखाचेवर
● डिपॉझिट इन्शुअरन्स कॉर्पोरेशनकडून ठेवीदारांना सुरक्षिततेची हमी
● आर्थिक दुर्बल घटकांना सक्रीय सहाय्य ● लघु-उद्योगांना सहकार्य
● व्यापार-व्यवसाय यांना पतपुरवठा ● वैयक्तिक कौटुंबिक व प्रासंगिक
'कठिण समयी' मदतीचा हात पुणे पीपल्स को.ऑप.बँक लि.

मुख्य कार्यालय : ६०६, सदाशिव पेठ, लक्ष्मी रोड पुणे : ३०. फोन : ४२३७३/४५०३२
शाखा : पेरूगेट, सदाशिव पेठ पुणे : ३०. फोन : ४३१७२ मॉडेल कॉलनी पुणे : १६. फोन : ५४१७५ (सकाळ-सायंकाळ)
चिं. वि. जोग चेअरमन श्री. रा. जोशी मॅने. डायरेक्टर श्री. गं. जोशी मॅनेजर

सेवेची पंचवीस वर्षे
सेवा आणि सुरक्षितता

एका मध्यमवयीन बाईंनी दार उघडले. दारातूनच विचारले, 'कोण पाहिजे ?'

मी म्हटले, 'मला ऋषींना भेटायचं आहे.' किंचित नाराजीनेच त्यांनी मला आत घेतले. समोर एक वृद्ध गृहस्थ अंथरुणावर शरीर लुळे पडल्याप्रमाणे बसून होते. बाई काही बोलल्या नाहीत. पण मी तर्काने ओळखले की, हेच ते ऋषी. 'स्पीरिच्युअॅलिस्ट.'

अनोळखी माणसांना तिथे सहसा एकदम प्रवेश दिला जात नसावा. कारण ऋषींनी कपाळाला आठी घालून विचारले, 'कुठून आलात ?'

मी नाव, पत्ता सांगितला.

'पुढचा प्रश्न : काय काम होतं ?'

या प्रश्नाचे उत्तर देणे अतिशय अवघड होते. मला तिथे का धाडण्यात आले आहे, हे माझे मलाच ठाऊक नव्हते. मी माझी अडचण सविस्तर सांगितली.

'हल्ली आम्ही बाहेरच्या कुणाला दिवंगत आत्म्याशी संवाद करू देत नाही, पण तुमची केस थोडी वेगळी आहे. तुम्ही असं करा' ऋषी समजूत घातल्यासारखे म्हणाले, 'बुधवारी संध्याकाळी सातच्या दरम्यान या. तेव्हा आम्ही जमतो. काही आत्म्यांशी संवाद करतो. त्यावेळी तुम्ही या. मग आपण पाहू.'

त्यांनी सांगितल्याप्रमाणे मी बुधवारी सात वाजता गेलो. एका गोल टेबलाभोवती दोघे-तिघे आधीच बसले होते. त्यात त्या दिवशीच्या बाई होत्या. मी दाराजवळच्या एका खुर्चीत अवघडल्यासारखा बसून राहिलो.

एवढ्यात दोघे-तिघे आले. त्यांनी पुडीतून हार आणले होते. ते त्यांनी तिथल्या तसबिरींना घातले. त्यातली एक एका तरुण स्त्रीच्या फोटोची होती. ही बहुधा ऋषींची पहिली पत्नी असावी. दुसरी प्लॅस्टर ऑफ पॅरिसची चौरस शिल्पाकृती होती. त्यात डोक्याला रुमाल बांधलेल्या एका देखण्या पुरुषाचे चित्र कोरले होते.

लगेच सारे शांत झाले. सगळे टेबलाशी जाऊन बसले. त्यांनी टेबलावर दोन्ही हात ठेवले. टेबलावर एक अक्षरांचा तक्ता होता आणि एक लाकडी तिपाई त्यावरच ठेवली होती.

ऋषींनी हात जोडून प्रार्थना केली. मग सगळ्यांनी नमस्कार केल्यासारखे करून परत टेबलावर हात ठेवले. बाईंनी तिपाईवर हात ठेवताच तिपाई तक्त्यावर मागेपुढे होऊ लागली. अक्षरांनी तयार होणारी वाक्ये बाई वाचू लागल्या. मधेच प्रश्न विचारू लागल्या. त्यांनी प्रश्न विचारावेत आणि तयार होणाऱ्या वाक्यातून उत्तरे मिळावीत, असे संभाषण बराच काळ चालू राहिले.

आणि एकाएकी ते संभाषण थांबवून बाई म्हणाल्या :

'इथे निर्मला आली आहे. तिला आपल्याशी बोलायचं आहे.'

☐

मला अतिशय आश्चर्य वाटले. तत्क्षणी माझा त्या मंडळींवर


We are a part of these

"Cylinder block cylinder head . brake drum master cylinder. ."


Words you hear in our shops As if we were in the automotive industry. But we are! With our castings

Mopeds, mobikes, scooters, cars, trucks and tractors come to life, are guided and controlled by forces born in our castings

Castings backed by specialized techniques, experience and vast resources We offer you these and technical guidance too

Range: 5 kg—100 kg
IS Grade 20-30
grey and low alloy cast iron.

Let us know your requirement
We'll be delighted to serve you





SHIVAJI WORKS LIMITED
Shivashahi,
Sholapur-413 224

PRATIBHA 763

विश्वासही बसला. कारण मी अजून त्यांना माझ्या बायकोचे नाव सांगितलेले नव्हते.

मी टेबलाशी जाऊन बसलो. इतर माणसे माझ्याकडे नवलाने पाहू लागली.

तिपाई फिरू लागली. तिच्या पुढच्या बाजूच्या कासवासारख्या तोंडाच्या काटचाने नेमके अक्षर कळू लागले. मला सवय नसल्यामुळे इतके भराभर वाचणे शक्य होत नव्हते, पण बाई वाचून सांगत होत्या.

'आलात–बरं–झालं.'

'तू काळजी करू नकोस मुलांची.' मी म्हणालो.

'मुलांची काळजी नाही. पण तुमची काळजी वाटते. अजून तुमचं लक्ष लागत नाही. तुम्हाला दुसरं लग्न करावंसं वाटतं का?'

प्रश्न ऐकून मी चकित झालो. पण याचा विचार मी यापूर्वीच स्वत:शी केला होता. नाही असे नाही. शरीरसुखाकडे मन ओढ घेत होते. उगाच खोटे कशाला सांगू? पण इतक्या वर्षांच्या सहवासाच्या आठवणी पुसणेही अशक्य होते. मी ठरवून टाकले होते. शरीराची भूक एक वेळ कशीही भागवता आली असती, पण तेवढयासाठी मन नव्या पाशात अडकवणे योग्य नव्हते.

तिपाई अजून थांबलेलीच होती. मी म्हटले, 'नाही. दुसरं लग्न करायचं नाही असंच मी ठरवलंय्.'

'मग–मी–सांगते–तसं–करा. तुम्ही–साधना–करायला–लागा.'

मी काही दिवस ऋषींकडे सतत जात राहिलो. त्यांच्याकडे प्लँचेटवर 'महाराज' येत. भिंतीवरचे शिल्पचित्र त्यांचेच होते. हे महाराज म्हणजे कुणी व्यक्ती नव्हतेच. एक प्रकारची दिव्य शक्तीच होते. तुमचे एखादे रूप दाखवा, या भक्तांच्या आग्रहावरून त्यांनी मुंबईतल्या एका नामवंत शिल्पकाराला स्वप्नात दर्शन दिले. त्या रूपावरून त्याने तयार केलेली ती शिल्पकृती. या महाराजांचे जणू त्या जागेला संरक्षण होते. त्यामुळे तिथल्या प्लँचेटवर येण्याचे धाडस भलतेसलते दिवंगत आत्मे करीत नसत. महाराज या शक्तीचे नेमके स्वरूप समजून घेण्याचा मी अजून प्रयत्न करतो आहे. पण ते समजणे अवघड आहे. किंबहुना ते समजेल तेव्हा माझी साधना पूर्ण होईल.

त्या वेळेस तरी मला त्यातले काहीच ठाऊक नव्हते. पण निर्मलेने मला एक नवीन रस्ता दाखवून दिला होता. मी घरातली एक खोली साधनेसाठी ठरवून टाकली. तिथे मी रात्री सगळे शांत झाल्यावर समई लावून बसू लागलो. पहिल्यांदा नुसते चित्त एकाग्र करून मी समईच्या ज्योतीकडं पाहत राही. पण दिवसचे दिवस गेले तरी काहीच घडेना.

मी कंटाळून महाराजांना हे सांगितले. महाराजांनी मला दृष्टान्त होईल असे आश्वासन दिले. रात्री मी स्तोत्र वाचत तिपाईवर हात ठेवून बसलो होतो. अचानक, तिपाई दळणाचे जाते फिरावे तशी फिरू लागली. अर्थात हा काही चमत्कार नव्हता. फक्त मला जे दिसत होते आणि समजत होते त्यापलीकडेही एक जग आहे, याची ती चाहूल होती.

त्यानंतर एके दिवशी मी ध्यान लावून बसलो असताना एकदम विजेचा लोळ यावा तसा लखलखाट खोलीभर झाला. डोळे दिपवणारा तो प्रकाश क्षणार्धही टिकला नाही. पण मी ज्या मार्गावर चाललो होतो तोच मार्ग माझ्यापुरता तरी कायमचा त्या प्रकाशात उजळल्यासारखा झाला.

हे सारे चालू असताना माझ्या ध्यानाचा काळ वाढत वाढत चालला होता. ऑफिसमध्ये जेमतेम दोन तास मी काम करीत असे. दुपारी लौकर घरी येऊन ध्यानाला बसे. संध्याकाळी मुले शाळेतून आल्यानंतर जेवणापर्यंत मी त्यांच्याकडे लक्ष देई. जेवणानंतर रात्री पुन्हा मी ध्यान लावून बसत असे ते जवळजवळ पहाटेपर्यंत. पण या जागरणाचा माझ्या तब्येतीवर काहीही वाईट परिणाम झाला नाही. दुसरी आश्चर्याची गोष्ट म्हणजे केवळ दोन तास काम करूनही माझे उत्पन्न पूर्वीच्या चौपट झाले, इतके काम माझ्याकडे येऊ लागले.

मी या विषयावर बरेच वाचनही करू लागलो. काय वाचावे याचे मार्गदर्शन महाराज मला पुस्तकाच्या नावासकट करीत. हळूहळू मला अध्यात्माची गोडी लागू लागली होती. एके दिवशी एकाएकी, आपण ज्याला माकडहाड म्हणतो तिथे विजेचा धक्का बसावा तसे झाले. आणि सबंध शरीरभर ठिणग्या उडाल्यासारखे वाटून माझे भान गेले. हा भासहि क्षणार्धच टिकला असेल. परंतु माझी साधना योग्य मार्गावर होती, याचे प्रत्यंतर मला या दृष्टांतामधून मिळत होते. आता ऋषींकडे फारसा जात नव्हतो. कारण परलोकातल्या आत्म्यांशी संवाद करणे हे माझे उद्दिष्ट राहिले नव्हते. मला स्वत:लाच साक्षात्कार हवा होता. तो फार दूर आहे याची जाणीव होती. पण त्याच्या मार्गावर यथाशक्ती वाटचाल करणे एवढेच आता माझ्या हातात होते.

हळूहळू मला निर्मलेशीही बोलण्याचा मोह राहिला नाही. मी केलेल्या वाचनाच्या योगाने मला इतके कळले होते की, अगदी हुबेहूब आपल्या या लोकासारखाच परलोक असतो. तो या लोकाच्या वर, ढगात कुठेतरी नसून आपल्या लोकाबरोबरच असतो. मात्र आपल्या नजरेचा जो तांबडया रंगापासून जांभळ्या रंगापर्यंतचाच टप्पा असतो त्यापेक्षा या लोकाचा किरणांचा वर्गच साफ वेगळा असल्यामुळे त्यातले काही आपल्याला दिसत नाही. पृथ्वी आणि आप ही जडत्व आणणारी महाभूते त्यात नसल्यामुळे तो स्पर्शाला लागत नाही. आकाश या घटकाला त्यात प्राधान्य! त्याचे अस्तित्व वायुरूप असले तरी त्याचा आकार म्हणजे मात्र मानवी आकाराची निव्वळ प्रतिकृती. आपल्याला परलोक जितका खोटा, तितकेच परलोकवासी आत्म्यांना आपणही खोटे! आपल्यापैकी काहींना त्यांचे अस्तित्व जाणवते, तसे त्यांच्यापैकी काहींनाच आपल्याशी संबंध जोडणे जमते. रेकॉर्डरच्या टेपवर जसे दोन ट्रॅक्स एकाच वेळी असूनही एका वेळी एकच ट्रॅक वाजतो, त्यावेळेस दुसऱ्याच्या अस्तित्वाची जाणीवही असत नाही, तसेच हे थोडेफार असावे. पण केवळ देह पृथ्वीवर सोडून परलोकात वावरणारे हे आत्मे आपले रूप–स्वभाव तेच ठेवतात आणि ज्या गोष्टी इथे करतात, त्याच तिथेही करतात. इहलोकात मन:शांती त्यांना लाभते, तेवढीच परलोकातही मिळते. निर्मलेचे अंत:करण अतिशय शुद्ध होते. तेव्हा तिला तिथेही शांती मिळत असेल, याविषयी मला शंका नव्हती.

दिवसेदिवस मला कंपनीचे काम नकोसे वाटू लागले होते. कंपनीत लाखो रुपयांची उलाढाल होत होती आणि माझ्यावर पैशांचा पाऊस पडत होता. पण तरीही वाटू लागले की, एका बाजूने साधना करायची आणि दुसऱ्या बाजूने हे विष जवळ करायचे, हे काही खरे नाही. आज ना उद्या मी हे सारे सोडून द्यायचे ठरवून टाकले होते.

त्या दिवशी कंपनीच्या कामासाठी सरकारी ऑफिसात गेलो. तिथे विवेक रायकर भेटला. त्याला ल्युकेमिया झाल्याचे कळले आणि निर्मलेच्या आजाराच्या आठवणीने काळजात चर्रर्र झाले. त्याने रिसीट मागितली. ती देण्याचे मी कबूल केले, पण दुःखापोटीच की काय, मी त्याविषयी साफ विसरून गेलो.

नंतर एके दिवशी कॉलनीतला पवार घरी आला आणि त्याने रिसीटची आठवण केली. म्हणाला, 'विवेकची अवस्था अतिशय खराब आहे. बहुधा शेवटची अवस्था आहे.'

*मी हादरून गेलो. शेवटची अवस्था?—म्हणजे मरणाच्या दारात* असलेल्या माणसाला दिलेले वचन मी मोडले होते!

मरणाच्या दारात असलेला विवेक—हसतमुख विवेक...कुणाच्याही मदतीला कायम तत्पर असलेला विवेक—ऐन तारुण्यात जगाचा निरोप घ्यायला निघालेला विवेक—निर्मला जशी मला सोडून गेली तसाच—अर्ध्या डावावरून उठून जाऊ पाहणारा विवेक—

मला निर्मलेला वाचवता आले नाही. निदान विवेकला तरी वाचवता येईल का?

मी ठरवले. महाराजांना शरण जायचे. त्यांना गळ घालायची—काहीही करून या तरुण मुलाला वाचवा.

मी तसाच उठलो आणि रिसीट घेऊन विवेकच्या घरी गेलो.

विवेकची परिस्थिती खरोखरच गंभीर होती.

मला सुचलेला उपाय करायलाच हवा होता. आजच. नाहीतर फार उशीर झाला असता.

पण माझ्यावर विश्वास कोण ठेवणार? रायकरांची माणसे स्वतःला बुद्धिवादी समजणाऱ्यांपैकी असली, तर—तर ती मला वेड्यात काढतील...

काही का असेना, सांगून तर पाहावे. बुद्धिवादी म्हणविणारेदेखील मरणापुढे लीन होतात. अशा प्रसंगात कुणाचेही ऐकायला तयार होतात.

मी बाळला आणि त्याच्या मेहुण्याला खाली बोलावले. त्यांना सारे काही सविस्तर समजावून सांगितले. रात्री घरी येण्याची विनंती केली,

*त्या दोघांनी रात्री घरी येण्याचे कबूल केले....*

*

## बाळ

आपटयांची सगळी हकीकत ऐकून आम्ही चाटच पडलो. या हकीकतीवर विश्वास ठेवायचा की नाही? ठेवायचा तर, आमच्या आजवरच्या माहितीमध्ये हे बसत नव्हते. नाही ठेवायचा म्हटले तर, त्यांच्या हकीकतीत एक प्रकारची सुसूत्रता होती. सांगण्याच्या पद्धतीत प्रामाणिकपणा होता.

आम्ही रात्री त्यांच्याकडे जाण्याचे कबूल केले. जाण्यात आमचे नुकसान काहीच नव्हते. असला तर फायदाच होता. त्यातून आता विवेकवर सगळे इलाज करून झाले होते. एवढा एकच उरला होता. तो करायला आमचे काय जात होते?

रात्री आठच्या सुमाराला मी आणि जयवंत आपटयांच्य घरी गेलो.

आपटयांनीच दार उघडले. ते आम्हाला म्हणाले, 'हातपाय धुऊन घ्या आणि मग या खोलीत या.'

आम्ही त्याप्रमाणे केले. खोलीचे पॅसेजमधले एकच दार उघडे होते. दुसरे बाहेरचे दार बंद होते. खिडक्याही बंद होत्या. उजेड आत येऊ नये म्हणून त्यांना काळे कागद लावून टाकले होते. फक्त *वरच्या झडपा हवा येण्यापुरत्या उघड्या होत्या.*

खोलीत एक देवघर होते आणि एक तसबीर. रुमाल बांधलेल्या सस्मित गृहस्थाची. तसबिरीला ताजा हार घातलेला दिसत होता. उदबत्त्यांचा मंद गंध दरवळला होता. त्या गंधामुळे असेल, किंवा माझ्याच मनाचा खेळ असेल, पण मला त्या खोलीत पाऊल टाकल्यावर इतके शांत, इतके पवित्र वाटले की, तसे एखाद्या देवळातही वाटल्याचे मला आठवत नाही.

आपटयांनी आम्हाला बसायला पाट दिले. एक छोटी तिपाई ठेवली आणि आपल्या मुलाला हाक मारली, 'विलास—'

विलास आला. तो चौदा—पंधरा वर्षांचा होता. वयाच्या मानाने थोडा गंभीर दिसत होता. त्याने तिपाईवर हात ठेवले.

आपटे थोडा वेळ डोळे मिटून गप्प राहिले. मग त्यांनी हात जोडले. गंभीर आवाजात, अगदी जवळ उभे असलेल्या कुणाशी तरी बोलावे, तसे ते म्हणाले—

'ही मंडळी आली आहेत. यांचा भाऊ ल्युकेमियानं आजारी आहे. सगळे उपाय थकले आहेत. आता आपल्याच कृपेवर सारं काही अवलंबून आहे. मुलगा तरुण आहे. या वयात त्याला असं भयंकर मरण येऊ नये असं वाटतं. आपण त्याच्यासाठी काहीतरी करावं.'

क्षणभर शांतता. आता काय होणार हे आम्हाला कळत नव्हते.

विलासचे डोळे मिटलेले. हात तिपाईवर ठेवलेले.

—आणि अचानक तो बोलायला लागला:

त्याचा आवाज नेहमीचाच होता. पण बोलण्याची पद्धत मात्र लहान मुलाला शोभणारी नव्हती. शब्द त्याचे नव्हते—

'प्राक्तन ठरलेलं आहे. योगी ते बदलू शकत नाही. फक्त काही काळापुरते ते पुढे ढकलू शकतो.'

काही क्षण शांतता.

पुन्हा मुलगा बोलू लागला—

*'या मुलाचं प्राक्तन पाहून नंतर मी सांगेन. मात्र त्याला आराम* वाटेल असं करतो. त्याच्या शरीरावर काळे डाग उठले आहेत ते नाहीसे होतील. रक्त बदलताना त्रास होणार नाही. जेवण नीट जायला लागेल. इथलं माझं चित्र त्यांच्या घरी द्या. मुलाच्या बिछान्यासमोर लावा. त्याला ध्यान करू द्या. चित्त एकाग्र होण्यासाठी रामनाम जपायला सांगा. घरात कुणाला तरी गुरुचरित्र वाचायला सांगा.'

आम्ही घरी आलो आणि घडलेले सारे घरच्या मंडळींना सांगितले.

दुसऱ्या दिवशी आम्ही सांगितल्याप्रमाणे करायला सुरुवात केली. रेखावहिनींनी गुरुचरित्र वाचायला घेतले.

सर्वात अधिक शक्तिशाली धुलाईची पावडर




# नवीन फॉर्म्यूला डेट
# अधिक शक्तिशाली
# भरपूर फेस
# ताजा सुगंध

शानदार सफेदी, डेटची सफेदी

Shilpi dm 11b/76 mar

त्या दिवशी संध्याकाळी विवेकच्या अंगावरचे काळे डाग जायला सुरुवात झाली. एक–दोन दिवसांत त्याची कांती पहिल्यासारखी नितळ झाली.

आम्ही थक्क झालो. आमच्या नजरेसमोरच एक चमत्कार घडत होता.

चार–पाच दिवसांत विवेक अंथरुणात उठून बसायला लागला. दोन वेळा थोडेफार जेवू लागला.

हळूहळू विवेकची तब्येत सुधारू लागली. त्याचे ब्लड काउंट्स वाढले होते ते 'नॉर्मल'च्या जवळ येऊ लागले. बाहेरच्या रक्ताचीही गरज उरली नाही.

डॉक्टर वेलिंगांकडे आम्हाला रक्त–तपासणीसाठी वरचेवर जावे लागे. त्यामुळे विवेकच्या आजाराचे सारे लहानमोठे टप्पे त्यांना माहीत होते. आता अचानक झालेली ही अनपेक्षित सुधारणा पाहून त्यांनाही आश्चर्यच वाटले. आम्ही त्यांना खरा प्रकार सांगितला. ते म्हणाले, 'आपण हे डॉक्टर पारिखांच्या कानांवर घालायला हवं.'

त्याप्रमाणे मी आणि जयवंत, पारिखांकडे गेलो. त्यांनी दिलेली दहा दिवसांची मुदत त्याच दिवशी संपत होती. त्यांच्या भाकिता-प्रमाणे हा विवेकचा शेवटचा दिवस होता.

आम्हाला पाहिल्यावर त्यांना वाटले की, विवेक शेवटचे क्षण मोजत असेल, म्हणून आम्ही त्यांना बोलवायला आलो असू. तरी पण खात्री करून घेण्यासाठी त्यांनी म्हटले, 'आय् होप् ही इज् स्टिल् अलाइव्ह.'

मी विजयी स्वरात म्हटले, 'ही इज् इम्प्रूव्हड् डॉक्टर.'

'काय म्हणालात?'

'त्याला पुष्कळच बरं वाटतंय् आता.' मी म्हणालो.

'इम्पॉसिबल्! आय् डोन्ट वॉन्ट टू डिस्करेज् यू. पण त्याच्या गेल्या आठवड्यातल्या अवस्थेनंतर त्याची सुधारणा होणेच शक्य नाही. कधी कधी काय असतं की, आपल्याला वाटतं, रोग्याची तब्येत सुधारावी–त्यामुळे ती खरोखरच सुधारली, असा ग्रह आपण करून घेतो...'

आम्ही त्यांना आमच्याबरोबर येण्याची विनंती केली. ते आले.

दार उघडल्याबरोबर त्यांना समोरच, विवेक वाचत बसलेला दिसला.

त्याला पाहून, त्याची तपासणी केल्यावर पारिखांची खात्री झाली की, जे त्यांना अशक्य वाटत होते ते शक्य झाले होते. त्यांच्या सगळ्या हिशेबांना धुडकावून लावून विवेकची तब्येत सुधारली होती. आणि त्याचे कारण त्यांच्या वैद्यकीयशास्त्रात बसणारे नव्हते.

आम्ही ते कारण त्यांना सविस्तर सांगितले.

त्यांनी एकदम अविश्वास दाखवला नाही. पण त्यांना ते पुरते पटलेही नाही.

'आय मेक नो कॉमेंट्स्.' ते म्हणाले. 'पण एवढंच लक्षात ठेवा, फार आशा बाळगू नका. नाहीतर नको ते झालं तर फार मोठा धक्का बसेल. तुम्हाला यात यश मिळालं तर मला आनंदच आहे. आय् विश् यू गुडलक्.' ◻

डॉ. पारिखांनी आम्हाला जो सल्ला दिला, त्याची आम्हाला अतिशय जरूरी होती. कारण विवेकच्या तब्बेतीमध्ये दिवसादिवसाला होणारी सुधारणा पाहून आम्हाला इतका आनंद झाला होता, की तो नक्की बरा झालाच असे आम्ही धरून चाललो होतो. विवेक जेवूखाऊ लागल्यामुळे त्याला आवडणारे पदार्थ घरात केले जाऊ लागले. रेखावहिनीच्या अंगात नव्या उत्साहाचा संचार झाला होता. मरगळून गेलेले सारे घरच जसे एकदम मंतरलेले पाणी शिंपडावे तसे ताजेतवाने होऊन उठून बसले होते. विवेक जाणार, ही गोष्ट इतके दिवस आम्ही सतत मनाशी घोकली. आता मात्र ती आम्ही पार विसरून गेलो.

हे चालू असताना आम्ही दररोज आपट्यांकडे जाऊन विवेकमध्ये होणाऱ्या सुधारणेविषयी त्यांच्या महाराजांशी बोलतच होतो. पण एके दिवशी विलासच्या तोंडून महाराजांचा काही वेगळाच संदेश ऐकायला मिळाला.

'मुलाच्या प्राक्तनात मृत्यू आहे. तो काही झाले तरी टळणार नाही. प्राक्तनामधे ढवळाढवळ केली जाणार नाही. पण तरीही त्याचे आयुष्य शक्य तितके वाढवण्याचा प्रयत्न आम्ही करू.'

त्यानंतर शांतता पसरली.

'इथे एक ब्रिटिश डॉक्टर आहेत. त्यांचे नाव डॉक्टर लॅंब. त्यांचे या विषयावर संशोधन चालू आहे. ते या बाबतीत काही करू शकतील. त्यांनी केलेल्या या प्रकारच्या उपचारांची माहिती पुस्तकात दिलेली आहे.'

यानंतर पुस्तकाचे नाव, पान, लायब्ररी याविषयी तपशील सांगण्यात आला.

आम्ही दुसऱ्या दिवशी त्यांनी सांगितलेले पुस्तक आणले आणि सांगितलेल्या विशिष्ट पानावरची माहिती वाचली.

लंडनमध्ये एका हॉस्पिटलात काही डॉक्टर्स एकत्र जमून एका केसविषयी विचारविनिमय करीत होते. केस अशाच ल्युकेमियाच्या पेशंटची होती. सगळे उपाय करून झाले होते. पण मुलगा जगण्याची आशा नव्हती.

एवढ्यात त्यांच्यापैकी एकाची तंद्री लागली. डोळे मिटलेले. आजूबाजूचे भान नाही. अशा तंद्रीतच तो बोलू लागला–

'मी डॉक्टर लॅंब बोलतो आहे.'

'डॉक्टर लॅंब कोण?' आश्चर्यचकित झालेल्या डॉक्टर्सपैकी एकाने धीर करून विचारले.

'इथल्या युनिव्हर्सिटीच्या मेडिकल फॅकल्टीचा डीन. डिपार्टमेंटच्या बिल्डिंगला माझंच नाव दिलंय्.'

'आपल्याला या केसविषयी काय वाटतं?'

'या रोगावर संशोधन चालू आहे. अजूनही निश्चित उपाययोजना सापडलेली नाही. पण माझ्या पद्धतीनं मुलाचं रक्त बदलून पाहू.'

'रक्त बदलायचं? तुमच्या पद्धतीनं?'

'होय. एका खोलीत पेशंटला एकटाच निजवा. पडदे सोडून खोली बंद करा. बिछान्यावर पांढरी शुभ्र चादर घाला. खोलीत कोणीही डोकावू नका.'

'ब्लड ट्रान्सफ्युजन झाले हे कळणार कसे?'

'चादरीवर रक्ताचा एक थेंब सकाळी दिसेल. त्यावरून कळेल.'

डॉक्टर्सनी सारी व्यवस्था सांगितल्यासारखी केली. ब्लड ट्रान्स-

फ्युजन झाले. मुलाला हळूहळू गुण येऊ लागला. ◻

त्या रात्री आपट्यांचा मुलगा अचानक शुद्ध इंग्रजीमध्ये बोलू लागला.

ते डॉक्टर लॅब होते. त्यांनी विवेकला पाहिलेले होते. पुस्तकात ज्याचा उल्लेख होता तोच उपाय ते करणार होते. विवेकला बाहेरचे रक्त देण्यात येणार होते.

रात्री आम्ही विवेकच्या बिछान्यावर स्वच्छ पांढरी चादर घातली. त्याच्या अंगात एकही डाग नसलेला पांढरा शुभ्र गंजिफ्रॉक आणि पांढरा लेंगा घातला. त्याला वेगळी खोली नव्हती. पण आम्ही मध्ये पडदा लावून टाकला.

आता विचार केला की नवल वाटते. पण त्या रात्री आम्ही सगळे शांत झोपी गेलो. पडद्यापलिकडे काही वेगळे घडणार आहे, याची जरासुद्धा आशंका आमच्या मनात नव्हती. ज्या शक्तीने दाखवलेल्या मार्गावरून आम्ही चाललो होतो, तिच्या सामर्थ्याविषयी आम्हाला यत्किंचितही शंका नव्हती.

फक्त ते होऊन गेले अशी आमच्या दुबळ्या मनुष्यस्वभावाची खात्री पटावी म्हणून चादरीवर रक्ताचा डाग दिसणार होता.

सकाळी उठलो आणि रात्रीचे सारे काही डोक्यात आले.

मी पडदा बाजूला करून पाहिले.

विवेक शांत झोपला होता. त्याची मुद्रा प्रफुल्लित दिसत होती.

मी त्याच्या बिछान्याशी गेलो. चादरीवर रक्ताचा डाग कुठे दिसतो का हे पाहिले.

पण चादरीवर कुठेही कसलाही डाग नव्हता.

माझे डोके एकदम चक्करल्यासारखे झाले. म्हणजे इतके दिवस आम्हाला लागलेला हा नाद खोटाच होता तर ?–हे सगळे थोतांड होते ? माझ्या भावाला वाचवण्यासाठी या कशाचाही उपयोग नव्हता?

त्याच तिरिमिरीत मी टॅक्सी बोलावली आणि शीवला आपटेंकडे जाऊन थडकलो.

आपटे माझ्या चेहऱ्याकडे पाहून म्हणाले–' काय झालं ? असा का दिसतोय्स तू ?'

मी कारण सांगितले. आपट्यानी विलासला बोलावले. तिपाईवर हात ठेवायला सांगितला.

जेमतेम अर्धा क्षण गेला–

–एवढ्यात शुद्ध इंग्रजीत शब्द आले.

' रक्ताचा डाग आहे. उशीच्या अभ्र्याच्या खालच्या बाजूला. इतर कुठल्याही मार्गाने पडणं शक्य नाही, अशा जागी. तुमची खात्री पटावी म्हणूनच.'

मी तसाच टॅक्सी करून घरी परत आलो.

विवेकला उठवले. त्याच्या डोक्याखालची उशी उचलली.

तिची मागची बाजू पाहिली.

अभ्र्यावर खालच्या बाजूला, रक्ताच्या थेंबाचा एक डाग होता.

तो पाहिला आणि मला गलबलून आले. काय आले होते माझ्या मनात ? कुणावर अविश्वास दाखवला होता मी ? कुणाला खोटे ठरवले होते ? कुणाची शंका घेतली होती ?

ती उशी छातीशी धरून मी कितीतरी वेळ तसाच उभा राहिलो. मनातल्या मनात लाख वेळा क्षमा मागत !

मग कर्तव्याची आठवण झाली.

मी उशी अभ्र्याबाहेर काढली; तो अभ्रा नीट घडी करून घेतला आणि डागाचे रक्त तपासून घेण्यासाठी डॉ. वेलिंगांच्या लॅबोरेटरीची वाट धरली.

*

## डॉ. वेलिंग

बाळ तो उशीचा अभ्रा घेऊन माझ्या लॅबोरेटरीत आला. मी तपासणी केली. रक्ताचा ग्रूप बरोबर होता. विवेकला ज्या ग्रूपचे रक्त लागत असे त्याच ग्रूपचे हे होते. मात्र फार शुद्ध होते.

गेले कित्येक दिवस मी विवेकशी संबंधित होतो. पहिल्या दिवशी जेव्हा त्याचे वडील त्याला माझ्याकडे घेऊन आले, तेव्हा मला तो माझ्याकडे येणाऱ्या इतर चारचौघा पेशंट्ससारखा वाटला होता. त्याचे रक्त मी तपासले, तेव्हा त्याला ल्युकेमिया झाल्याचे माझ्या लक्षात आले. इतक्या तरुण वयात या मुलाला अशी असाध्य व्याधी जडल्याचे माझ्या लक्षात आले आणि मी त्याच्यासाठी अतोनात हळहळलो.

नंतर विवेक वरचेवर येऊ लागला आणि त्याच्या मनमोकळ्या स्वभावामुळे मला त्याच्याविषयी आपुलकी वाटू लागली. मीही वरचेवर चौकशीसाठी त्याच्या घरी जाऊ लागलो. होता होता त्यांच्या कुटुंबात आणि माझ्यात एक स्नेहाचा धागाच तयार झाला.

विवेकचा आजार दिवसेंदिवस वाढत गेला आणि डॉ. पारिखांनी त्यांची आशाच सोडली. राजा येऊन सांगून गेला, की डॉक्टरांनी फक्त दहाच दिवसांची मुदत दिली आहे.

त्या रात्री मला झोप आली नाही.

डॉक्टरने पेशंटबद्दल इतके हळवे असून कसे चालेल ? अशा कित्येक केसीस येऊन जातात. मग एखाद्याच केसविषयी हळहळ का ? मी मनाची समजूत काढण्याचा खूप प्रयत्न केला. पण ते काही केल्या ऐकेचना.

आणि मग एके दिवशी बाळ एक विलक्षण बातमी घेऊन आला. एका दिव्य शक्तीच्या कृपेने विवेकला आराम वाटू लागला होता. प्रथम माझा विश्वासच बसेना. पण प्रत्यक्ष पाहून आल्यानंतर त्यांचे म्हणणे खरे मानावेच लागले. मी डॉक्टर पारिखांना हे सारे कळवण्याचा सल्ला दिला.

आणि आज बाळ तो उशीचा अभ्रा घेऊन आला होता. हे रक्त कोणी दिले असे मी त्याला विचारले. त्याने जी लोकविलक्षण हकीकत सांगितली ती थक्क करणारी होती. मी किंवा इतर कुठल्याही डॉक्टरने बाहेरचे रक्त दिले नव्हते. आणि तरीही विवेकच्या शरीरात शुद्ध रक्त आले होते.

पंधरा दिवस विवेकला दुसरे रक्तच द्यावे लागले नाही. पण तरीदेखील त्याच्या शरीरातले रक्त सतत अशुद्ध होतच होते. प्रकृती

हळूहळू बिघडतच होती.

विवेकला स्वतःला हे जाणवत होते. ल्युकेमियाविषयी आता त्याने पुरेसे वाचले होते. माझ्याबरोबरही तो पुष्कळदा चर्चा करीत असे. आपण मरणार हे तो समजून चुकला होता; पण ते कधी एवढेच त्याला हवे होते. त्यासाठी तो आपल्या आजाराची नेमकी कुठली अवस्था आहे, हे समजून घ्यायला उत्सुक असायचा.

त्याला फसवणे सोपे नव्हते. पण सत्य सांगणे त्याहूनही कठीण होते. लपवणार तरी कसे ? माझा रिपोर्ट तो बाळकडे मागत असे. रिपोर्टवरून स्वतःचे निदान करीत असे. शेवटी मी दोन रिपोर्टस तयार करून देऊ लागलो. एक खरा आणि दुसरा पुष्कळच चांगला, पण खोटा. हा दुसरा रिपोर्ट बाळ त्याला वाचायला देई. त्याची आशा जागती ठेवी.

या दिवसांमध्ये आणखी एक विलक्षण अनुभव आला.

एके दिवशी रात्री अकराच्या सुमारास माझ्याकडे एक भय्या आला. माणूस अगदी गरीब दिसत होता. तो घाटकोपरहून आला होता. म्हणाला, माझी बायको फार आजारी आहे. तिला रक्त देण्याची गरज आहे. तुम्हीच माझ्याबरोबर यायला हवं.

मला जरा विचित्र वाटले. मी विचारले, ‘ इतक्या लांबून तू आलास कुणी पाठवलं तुला इथं ?’

भय्याच्या घरी एक योगी आला होता. कुठून आला, कुठे जाणार, कुणालाच माहीत नव्हते. तो आला आणि भय्याच्या घरी राहू लागला. त्याच्यात काहीतरी विशेष वाटले म्हणून भय्याने त्याला ठेवून घेतले. त्यातून त्याच्या गरजा फार नव्हत्या. दिवसाला जेमतेम एक ग्लास दूध पिऊन तो राहत असे. भय्याच्या बायकोला अॅनिमिया झाला होता. आज ती फारच घाबरी झाली होती. म्हणून त्या योग्याने भय्याला माझा पत्ता देऊन पाठवले होते.

पण माझाच का ? आणि तो त्यांना माहीत कसा ? विवेकच्या आजाराशी सध्या मी संबंध ठेवून होतो. तिथे विवेकला कुठली तरी योगशक्ती साहाय्य करीत होती. त्या प्रकाराशी या योग्याचा काही संबंध होता का ?– कुणास ठाऊक ! ते गूढ कधीच उलगडणार नव्हते.

मी भय्याबरोबर इतक्या रात्री त्याच्याकडे गेलो. मला पेशंट-पेक्षाही त्या योग्यालाच पाहण्याची अधिक उत्सुकता होती.

एका टिनपाट चाळीत आम्ही शिरलो. म्युनिसिपालिटीच्या दिव्याचा थोडासा उजेड पडल्यामुळेच ती चाळ दिसून येत होती. कोपऱ्यातली खोली भय्याची होती. त्याच्या दारापुढल्या पॅसेजमध्ये पथारी टाकून कुणीतरी झोपले होते.

मी भय्याच्या बायकोला तपासले. तिला खरेच रक्त देण्याची जरूरी होती. माझे काम चालले असतानाच दारात कोणीतरी येऊन उभे राहिले.

बाहेर पथारी टाकून झोपलेलीच ही व्यक्ती होती.

हाच तो योगी असावा ! जवळजवळ सहा फूट उंची– पण अगदी किडकिडीत शरीर. अंगावर कणभरही मांस नाही. जणू हाडे आणि चामडी यांनीच त्याचे शरीर बनवलेले होते. त्वचा ताणल्यामुळे की काय, पण अगदी पातळ वर्खाचा हात फिरवल्याप्रमाणे चकचकत होती. चेहरा अतिशय उभट, गाल बसलेले, नाक लांब. दृष्टी मात्र इतकी तीक्ष्ण की नजरेला नजर भिडवताच डोळे दिपून जावेत.


सांगली बँक

* हिरक महोत्सवी वर्ष *

दीपावली शुभेच्छा

*



आपल्या उत्कर्षातील साथीदार

दि सांगली बँक लि.

रजि. ऑफिसः राजवाडा चौक; सांगली

चेअरमन : एम. आर. रणदिवे.

Parkerson/SBL/7613

डोक्यावर भरपूर जटा होत्या, त्या खांद्यापर्यंत आल्या होत्या. पण आश्चर्य म्हणजे त्याला दाढी अजीबात नव्हती किंवा दाढी केल्याच्या हिरवट खुणाही नव्हत्या. अगदी लहान मुलासारखी त्याची हनुवटी गुळगुळीत होती. असा विलक्षण म्हातारा मी कधी पाहिलाच नाही. त्याचे वय किती असेल सांगणेही कठीण होते, इतका वृद्ध तो दिसत होता.

मी त्याला विचारले–'माझी आपल्याला माहिती कशी ?'

त्याने उत्तर दिले नाही. उत्तर देण्याची त्याला गरज वाटली नाही.

मी भय्याच्या बायकोवर उपचार करून निघालो. पण त्या योग्या-विषयी मनात कुतूहल राहिलेच.

दुसऱ्या दिवशी बाळ आला होता. त्याला त्या योग्याविषयी सांगितले. तो म्हणाला, 'मी आपटयांना घेऊन त्यांच्याकडे जातो. विवेकच्या आजाराविषयी ते काही तरी नक्कीच सांगू शकतील.'

मी त्याला म्हटले, 'जे काही सांगतील ते लगेच मला येऊन सांग.'

माझा स्वतःचा मुलगा आजारी पडावा, इतका मी विवेकमध्ये गुरफटून गेलो होतो. *

## बाळ

दुसऱ्या दिवशी मी आणि आपटे घाटकोपरला त्या भय्याकडे गेलो. योगीबुवांना भेटण्यासाठी.

योगीबुवांचे वर्णन डॉक्टरांनी केलेच होते. तरीही मी त्यांना पाहून चमकलो, इतके ते सर्वसामान्य माणसांपेक्षा वेगळे दिसत होते. विशेषतः त्यांची चमकणारी कांती.

आम्ही योगीबुवांना विवेकला पाहण्यासाठी आमच्याबरोबर चलण्याची विनंती केली. ते तयार झाले. आम्ही त्यांना घरी घेऊन आलो.

घरी आल्यावर त्यांनी विवेकला पाहिले. आपल्या खांद्यावरच्या झोळीतून त्यांनी एक कडे काढले. ते कुठल्या धातूचे होते कुणास ठाऊक–पण त्याचा रंग मात्र तांब्यासारखा होता. त्यांनी ते विवकेच्या हातात घातले. तो बापडा आता इतका कृश झाला होता की, ते थेट त्याच्या दंडांत गेले.

योगीबुवांनी त्याच्या डोक्यावर हात ठेवून, काहीतरी पुटपुटून त्याला आशीर्वाद दिला.

त्यांनी आमच्याकडे काहीही घेतले नाही. चहासुद्धा.

बाहेर आल्यावर ते आम्हाला इंग्रजीत म्हणाले–

'त्याचं प्रावतन संपलेलं आहे. आता प्रयत्न करण्यात काही अर्थ नाही. पण त्याला मृत्यू शांतपणे यावा, म्हणून त्याच्या हातात कडं घातलं आहे. आता त्याच्या व्याधी त्या कड्याला होत जातील, आणि त्याचा त्रास कमी होईल.'

आम्ही योगीबुवांना टॅक्सीने घरी सोडले. वाटेत आमच्यापैकी कुणीच बोलत नव्हते.

पुढे आपटयांनी योगीबुवांना महिनाभर आपल्या घरी ठेवून घेतले. एके दिवशी अकस्मात योगीबुवांना इंदूरच्या महाराजांच्या एडीसीची तार आली आणि ते निघून गेले. आपटेंकडे असताना ते कधीच बाहेर पडले नाहीत की त्यांनी कुणाला पत्रही लिहिले नाही. तरीही तार नेमकी आपटयांच्याच पत्त्यावर कशी आली, हे आम्हाला कुणालाच न सुटणारे कोडे होते. ◻

विवेकच्या प्रकृतीतले चढउतार मी आपटयांकडे जाऊन कळवतच होतो.

एके दिवशी त्यांच्या विलासच्या तोंडून शुद्ध इंग्रजीत संदेश आला.

'त्याला नुसतं रक्त देऊन आता भागणार नाही. त्याचं सगळंच रक्त बदलायला हवं आहे. आज रात्री मी ते बदलीन. मूळ रक्त बेंबीतून काढून घेतलं जाईल, आणि नवीन रक्त हृदयातून दिलं जाईल. आज रात्रीच मी ही क्रिया करीन.'

त्या रात्री आम्ही पूर्वीप्रमाणे सारी व्यवस्था केली. या वेळेस पुराव्याची गरज नव्हती. पण तरीही सकाळी पुरावा सापडलाच.

गंजीफ्रॉकवर रक्ताचे दोन डाग होते. एक हृदयाच्या ठिकाणी आणि दुसरा बेंबीच्या.

यानंतर काही दिवस विवेकची प्रकृती थाऱ्यावर राहिली. रक्ताचे काऊंट्सहि खाली आले.

पण मे च्या तिसऱ्या आठवड्यात आपटयांकडे आम्हाला संदेश मिळाला. या वेळी संदेश महाराजांकडून येत होता. पण त्याचे शब्द जवळजवळ योगीबुवांनी सांगितल्यासारखेच होते–

'आम्ही आता अधिक काही करू शकत नाही. तिथल्या आणि इथल्याही वैद्यकीय संशोधनातून या आजारावर काहीतरी नवीन उपाय सापडेल, या आशेनं इतके दिवस आम्ही त्याला जिवंत ठेवलं आहे. नाहीतर यापूर्वीच त्याचं आयुष्य संपलेलं आहे. यानंतर त्याला जिवंत राहून काहीही साध्य करायचं नाही. तो आता लौकरच मृत्यू पावेल. मात्र त्याचा मृत्यू भयंकर असणार नाही. अतिशय शांतपणे तो तुमच्या जगाचा निरोप घेईल.'

त्या काळोखलेल्या खोलीत, त्या चौदा वर्षाच्या मुलाच्या तोंडून हे शब्द उमटले ते अत्यंत ठामपणे. आणि आम्हाला समजले–आता अधिक काहीही करण्यासारखे उरलेले नाही. सारे संपत आले आहे.

आम्ही सगळे अवाक् बसून होतो. सगळीकडे निःशब्द शांतता पसरली होती. कुठेतरी काहीतरी थांबले होते. सगळे निश्चल वाटत होते.

फक्त समोरच्या समईतल्या वाती थरथरत होत्या. ◻

योगीबुवांनी विवेकच्या हातात घातलेले कडे दररोज थोडेथोडे झिजत चालले होते. विवेकचे अंग पुसताना, त्या कड्याच्या खपल्या पडल्याचे जाणवे.

विवेकची कांती मात्र अजूनही नितळ होती. फक्त तो विलक्षण कृश झाला होता. तीस मे ला त्याला अतिशयच अशक्तपणा जाणवू लागला.

कडे आता एखाद्या दोरीसारखे बारीक झाले होते.

दोन जूनला विवेकला डायरिया झाला.

संध्याकाळी आम्ही महाराजांशी शेवटचे बोललो.

'आज रात्री तो जाईल.' आपटयांच्या मुलाच्या तोंडून शब्द आले. 'शोक करू नका.'

आज रात्री...एक दिवा विझणार होता...कुठल्यातरी शक्तीने आजवर आपले तेज ओतून त्याला तेवत ठेवले होते...तेज संपत

झाले होते... कारण दिवा विझणारच होता... कुठल्यातरी जगड्व्याळ योजनेमध्ये हा संकेत ठरलेलाच होता... ती योजना थोडीफार हलली होती. पण ती पार बदलू शकत नव्हती. दिवा विझायलाच हवा होता. पण तो खरेच विझणार होता का?... की त्याचा प्रकाश कुठल्या तरी चिरंतन तेजात मिसळून जाणार होता? ... की त्याची ज्योत तेवतच राहणार होती? फक्त मानवी चक्षूंनाच ती दिसेनाशी होणार होती?

या साऱ्या प्रश्नांची उत्तरे आज तरी मिळणार नव्हती. कधी काळी मिळतील की नाही, हे आज सांगता येत नव्हते.

आता विवेकची आशा नाही हे आम्हा दोघातिघांना निश्चित ठाऊक झाले होते, पण इतरांनाही ते जाणवल्याशिवाय राहिले नव्हते. दादा आरामखुर्चीत लुळेपणाने बसून होते. आई विवेकच्या उशाशी निःशब्द बसली होती. रेखावहिनी सकाळपासून काही न खाता, न पिता गुडघ्यात डोके खुपसून एका कोपऱ्यात बसली होती. आपटे शांतपणे खिडकीशी उभे होते.

विवेकचे सगळे मित्र जमा झाले होते. कुणीच काही बोलत नव्हते. नुसता एक घोळका करून ते दाराबाहेर उभे होते.

रात्री दोनचा सुमार. मी बाहेर येऊन पायऱ्यांवर बसलो होतो.

जयवंत बाहेर आले. मला खुणेनेच बोलावून घेऊन आत गेले.

विवेक सगळीकडे भिरीभिरी पाहत होता. संध्याकाळपासून आता पहिल्यांदाच तो शुद्धीवर आला होता. त्याची नजर माणसे टिपत होती. मी आत आलेला पाहताच क्षणभर त्याच्या नजरेत हवे होते ते माणूस भेटल्याचा भाव आला.

क्षणात त्याची नजर ओढल्यासारखी झाली. पण डोळे उघडेच होते. ते मिटता मिटेनात. जसे काही त्याचे प्राण कशात तरी अडकले होते.

आपटयांनी राजाच्या कानात काहीतरी सांगितले.

राजा पुढे वाकला आणि हलक्या आवाजात विवेकला म्हणाला—'हे बघ, वहिनींची चिंता करू नकोस; आम्ही आहोत त्यांची काळजी घ्यायला.'

विवेकच्या चेहऱ्यावर स्मित पसरले. त्याने डोळे मिटून घेतले. ◻

विवेक गेल्यानंतर काही दिवसांनी मी आपटयांकडे गेलो होतो.

फारसे बोलणे झालेच नाही. रीत म्हणून बोलायचे तेवढेच आम्ही बोललो. त्यांनी मला सहानुभूती दाखवली. मी त्यांच्याविषयी कृतज्ञता दाखवली.

निघताना मात्र ते दारात म्हणाले—

'बाळ, आता मात्र असल्या संदर्भात माझ्याकडे परत येऊ नकोस. मला साधना करायची आहे. प्लँचेट करणं, त्याचा रोजच्या व्यवहारासाठी उपयोग करून घेणं माझ्या साधनेत बसत नाही. विवेकविषयी मला फार वाटलं, म्हणून मी हे आरंभलं. आता ते संपलं आहे. पुन्हा कुणासाठीच मी ते परत सुरू करणार नाही...'

—आणि दरवाजा बंद झाला.

गेले काही दिवस मी एका अनोळखी विश्वाचे दार किलकिले करून आत डोकावू लागलो होतो. आज तेही दार बंद झाले होते.

या साऱ्यांचे तात्पर्य काय असेल?

या साऱ्याला काय अर्थ असेल?

या साऱ्याची संगती कशी लावता येईल?

अनेक प्रश्न ठोठावीत राहिले होते.

पण त्या रहस्यांची दारे आज तरी बंदच होती. ●



# पुनर्जन्म : एक प्रश्नचिन्ह

## प्रदीप प्रभाकर गोखले

प्राचीन भारतीय तत्त्वज्ञानाच्या विविध शाखांमध्ये काही महत्त्वाच्या प्रश्नांबाबत स्पष्ट मतभिन्नता दिसते. चार्वाकाचा अनुभवनिष्ठ बुद्धिवादी संप्रदाय जरी बाजूला ठेवला, तरी ईश्वरवाद व पोथीनिष्ठा यांविषयी सर्व भारतीय दर्शनांत एकमत असल्याचे दिसत नाही. किंबहुना भारतातील आस्तिक (वेदप्रामाण्यवादी) मानली जाणारी सर्व दर्शने 'ईश्वरवादी' या अर्थाने आस्तिक नाहीत व तथाकथित वेदप्रामाण्यवादी दर्शनांनीसुद्धा वेदप्रामाण्य हे सारख्याच अभिप्रायाने व सारख्याच तीव्रतेने पुरस्कारलेले नाही.

पण इतके सारे असूनही एका गोष्टीचे नवल वाटते की, चार्वाक वगळता सर्व भारतीय दर्शनांना कर्मसिद्धांत व पुनर्जन्मकल्पना मान्य आहे. बहुसंख्य सनातनी भारतीयांच्या श्रद्धा या पूर्वजन्म-पुनर्जन्मावरील श्रद्धेमुळे एकात्मता पावल्या आहेत असेही म्हणता यावे. अर्थात केवळ एकादी श्रद्धा सर्वांमध्ये समान आहे म्हणून ती आपण योग्य ठरवावी असे कुठलाही बुद्धिवादी मानणार नाही आणि म्हणून या श्रद्धामागे बुद्धीचे अधिष्ठान कितपत आहे आणि पलायनवाद कितपत आहे; किंवा या श्रद्धांमधील भावनिक व भावुक दृष्टिकोन वगळला तर, बुद्धिगम्य असे त्यात काहीच शिल्लक राहणार नाही की काय याचा शोध घेणे हे आवश्यक वाटते. याची पहिली पायरी म्हणजे पुनर्जन्मकल्पना ही केवळ श्रद्धा म्हणून न मानता सिद्धान्त म्हणून मानतात त्याचे म्हणणे समजावून घेणे होय.

म्हणून मी डेक्कन कॉलेजमधील दोन महापंडित श्री. शिवरामकृष्णशास्त्री व श्री. श्रीनिवासशास्त्री यांना भेटलो. त्यांना मी प्रथमच प्रश्न टाकला की, पुनर्जन्माला प्रमाण काय आहे? केवळ शब्दप्रमाणाने–पोथीनिष्ठा म्हणून पुनर्जन्म गृहीत धरला जातो, की त्याला तर्काचा पाठिंबा आहे? तेव्हा शिवरामकृष्णशास्त्री म्हणाले–'प्रथम तुम्हाला शब्दप्रमाण कोणते ते सांगतो. 'तद्य इह रमणीयचरणाः रमणीयां योनिमापद्यन्ते' (छान्दोग्योपनिषद) अर्थात जे सदाचरणी असतात ते चांगल्या योनीत जन्म घेतात. अशा प्रकारे त्यानी उपनिषदवाक्यांची मालिकाच सुरू केली. श्रीनिवासशास्त्री म्हणाले–'तुम्ही गीता वाचली आहे की नाही?'

म्हणालो ‘हो.’ मग त्यांनी गीतेतील वचन सांगितले–‘ध्रुवं जन्म मृतस्य च’ (मेलेल्याला जन्म येणार हे निश्चित) ‘हे पुरेसे आहे का?’ मी म्हणालो, ‘शब्दप्रमण पुरे झाले, अनुमान सांगा ?’

श्रीनिवासशास्त्रींनी नैयायिकांचे अनुमान सांगितले. शिवरामकृष्णशास्त्रींनी वेदांत्यांचे व मीमांसकांचे अनुमान सांगितले. त्यांच्या म्हणण्याचा आशय असा.

न्यायदर्शनकार मुख्यतः अनुमानावर भिस्त ठेवतात. प्रसिद्ध नैयायिक आचार्य विश्वनाथ न्यायपंचानन अनुमान मांडतो–मूल जन्मल्याबरोबर आईचे स्तन्य पिण्याकडे त्याची ओढ दिसते. ही ओढ, ही प्रवृत्ती कशी निर्माण होते ? आपोआप झाली असे म्हणता येत नाही. काहीतरी कारण दाखविले पाहिजे. कुठलीही प्रवृत्ती उत्पन्न होण्यासाठी आपल्याला ‘जे हवे ते मिळण्याचे हे साधन आहे’ असे कळले पाहिजे. (इष्ट साधनताज्ञान) पण बालक जन्मल्याबरोबर त्याला ते कळण्याचा उगम, तिथे त्या जन्मात काही दिसत नाही. साहजिकच त्याचे ते ज्ञान स्मरणात्मक असले पाहिजे. स्मरण होण्यासाठी पूर्वानुभवामुळे मुलाच्या आत्म्यावर ‘कोणत्या साधनाने हवे ते मिळेल’ याविषयीचे संस्कार घडले असले पाहिजेत. आणि पूर्वी म्हणजे कधी ? तर पूर्वजन्मीच. (कारण गर्भ पोटात असतानाही तोंडाने दूध पिण्याचे सस्कार नाहीत) पूर्वजन्माची नैयायिकांनी दिलेली ही उपपत्ती (चुकीच्या किंवा बरोबर) जीवमानसशास्त्रावर आधारलेली आहे.

या उपपत्तीवर मी शंका घेतली की, मनुष्याला पूर्वजन्म हा मनुष्याचाच आला असेल अशी खात्री नाही. किंबहुना सस्तन प्राण्याचा आला असेल अशीही खात्री नाही. मग पूर्वजन्मातील स्मृतींमधून ही प्रवृत्ती आणावी तर दूध चोखण्याचीच प्रवृत्ती कशी ?

तेव्हा श्रीनिवासशास्त्री म्हणाले–‘एखाद्या मुलाच्या बाबतीत असे घडेलही की, संस्कार झालेले असूनसुद्धा ते जागृत होणार नाहीत व स्मरण घडणार नाही. एखाद्या वेळी (पूर्वी सस्तन प्राण्याचा जन्मच नसेल तर) सस्कारही होणार नाहीत. अशा वेळी प्रवृत्तीच उत्पन्न न होऊन ते मूल मृत्यूही पावेल. पण एखादे मूल जन्मतःच रोगी असते, त्याची उपपत्ती कशी लावणार ?’

शिवरामकृष्णशास्त्री म्हणाले, ‘ते राहुदे. तसे उत्तर देऊ नका. तो म्हणेल (म्हणजे मी) की आईवडिलांमधील दोषांमुळे गर्भात दोष उत्पन्न होईल व मूल रोगी निपजेल, तसे नको. त्याचे उत्तर हे की, पूर्वीच्या कुठल्यातरी जन्मात त्याला स्तन्यपानाचा अनुभव आला असेल, त्याचा संस्कार या जन्मी जागृत होईल. कर्म अनादी आहे. आत्म्याच्या पुनर्जन्माची (देहांतरांची) साखळी अनादी आहे. कुठल्या ना कुठल्या जन्मात त्याला तो अनुभव आला असेलच.

‘तेव्हा हे एक अनुमान झाले. दुसरे असे, या जगात विविध आकारांची, रगरूपांची, बौद्धिक उंचीची माणसे दिसतात. जगातील या वैचित्र्याचे नियमन कोण करतो ? ईश्वराच्या ठिकाणी तर याचे कर्तृत्व देता येत नाही. नाही तर त्याचे दोन अर्थ होतील. एक तर ईश्वराला प्राण्यांमधील विषमता ही हवीच आहे. दुसरे म्हणजे (या जन्मात) ज्यांनी दुष्कृत्ये केलेली नाहीत अशाही माणसाला तो दुःखी करतो, म्हणजे तो निर्घृण, निर्दय आहे. पण ईश्वराला एखाद्याला जास्त सुखी किंवा दुःखी, लहान किंवा मोठा, काळा किंवा गोरा करून काहीही मिळवावयाचे नाही. तो निरपेक्ष आहे. साहजिकच ज्याच्या त्याच्या लहानमोठेपणाची काळेगोरेपणाची, सुखदुःखाची जबाबदारी ज्याच्या त्याच्यावरच टाकावी लागणार. माणसांमधील किंवा एकूण प्राण्यांमधील ही विषमता प्रत्येक वेळी या जन्मी उत्पन्न झाल्याचे दिसत नाही पण जन्माच्या वेळीही ती असते. या विषमतेचे दृश्य असे कारणही दिसत नाही. अशा स्थितीत ‘अदृष्ट’ असे कारण (प्रारब्ध कर्मांमुळे उत्पन्न होणारे कारण) कल्पावे लागते. विषमता ‘कशीही’ होते, तिला नियमच नाहीत असे म्हणाल तर कुठले शास्त्रच होणार नाही. तेव्हा ही विषमता ही ‘यदृच्छया किंवा आपोआप असते असे म्हणता येत नाही. तुम्ही दृश्य कारण दाखविलेत तर आम्ही मानू. नाहीतर तुम्ही हे अदृष्ट कारण माना.

‘तुम्ही असे उदाहरण घ्या ना ! एकाच आईवडिलांपासून जन्मलेली दोन जुळी मुलं, सारख्याच शरीरयष्टीची, सारख्याच बुद्धिमत्तेची, सारख्याच परिस्थितीत वाढलेली, सारखाच योगक्षेम चालत असलेली, पण त्यांतील एखाद्याला यातना भोगाव्या लागतात, दुसऱ्याला सुखे चालून येतात याची संगती कशी लावणार ? तेव्हा जगातील वैचित्र्य पुनर्जन्माचा पुरावा आहे असं मी म्हणतो.

‘एखादा मुलगा लहान वयातच भागवतग्रंथ घडाघडा म्हणून दाखवितो, या जन्मी वाचलेला नसतानाही ! तुम्ही वृत्तपत्रात वाचत नाही का ?’

मी म्हणालो, ‘वाचतो.’

‘याचे संस्कार पूर्वजन्माशिवाय कसे शक्य आहेत ?’

मी विचारले, ‘ठीक आहे. पण काय हो, बौद्धांनीसुद्धा पुनर्जन्म मानला आहे, मग त्यामागचे युक्तिवाद हेच आहेत की दुसरे काही आहेत ?’

‘हेच आहेत. बुद्धाच्या जातककथा प्रसिद्धच आहेत. त्यात तर बुद्धाचे कितीतरी लहानमोठ्या प्राण्यांच्या योनीतील जन्माचे वर्णन आहे.’

‘पण क्षणिकविज्ञानवादी जे बौद्ध आहेत, त्यांच्या मते ‘मी’ ‘मी’ असे ज्ञान हेच आत्म्याचे स्वरूप आहे. पण हे ज्ञान क्षणिक आहे मग माणूस मेल्यावर त्याचे ज्ञान कसे राहील ?’



श्रीनिवासशास्त्री म्हणाले, 'खरोखर माणूस मेल्यानंतर बौद्धांच्या मते त्याचे ज्ञान कुठे राहते हे मी अजून ग्रंथातून पाहिलेले नाही. बौद्धांच्या मरणाचे स्वरूप काय हा पाहण्यासारखा विषय आहे.'

शिवरामकृष्णशास्त्री म्हणाले 'बौद्ध हे *आलयविज्ञान* ('*मी*' '*मी*' *अशी स्वतःची* प्रचीती–जो त्यांच्या मते आत्मा आहे,) क्षणिक मानत असले तरी त्यांचे संतान (साखळी, एकातून दुसरे उत्पन्न होऊन निर्माण झालेली) मानतात तेव्हा माणूस मेल्यावरसुद्धा ही साखळी राहीलच. आता, माणूस जेव्हा गाढ झोपेत असतो, तेव्हा तर 'मी' 'मी' अशी प्रतीती नसते, मग त्यावेळी काय ती साखळी बंद पडते की काय? नाही. त्याचप्रमाणे मृत्यूनंतरही मानावे.'

थोडा वेळ शांतता पसरली. चर्चा संस्कृतातून चालली होती. त्यामुळे माझं मन पवित्र होऊ लागलं होतं आणि आपल्या मनात पुनर्जन्मावरील श्रद्धा उत्पन्न होईल की काय असेही वाटू लागले. तेव्हा मी म्हणालो, 'मला वाटते, हे पुनर्जन्माच्या बाजूने तुमचे म्हणणे पुरेसे होईल.' त्यांना विजयानंद देऊन मी उठलो. ☐

या चर्चेतून असे वाटले की पुनर्जन्मवाद्यांच्या म्हणण्यामध्ये काही प्रबळ युक्तिवाद आहेत आणि त्या युक्तिवादांना समर्थ उत्तर दिल्याखेरीज आपण या प्रश्नाकडे हेटाळणीपूर्वक दुर्लक्ष करू शकणार नाही.

सर्वसाधारण माणसे ज्यावेळी पुनर्जन्मावर किंवा सर्वसाधारणपणे मरणोत्तर अस्तित्वावर श्रद्धा ठेवतात, त्यावेळी त्यांच्या मनात प्रथम सांगितलेला जीवमानसशास्त्रीय युक्तिवाद नसतो. पण दुसरा, जगातील वैषम्याविषयीचा युक्तिवाद मात्र अनेक लोकं करताना दिसतात. विशेषतः एखादा सदाचरणी माणूस ज्यावेळी दुःख भोगतो, त्यावेळी त्याला असे तरी वाटते की पूर्वजन्मात आपल्या हातून काही दुष्कृत्ये घडली असावीत. किंवा त्याला असे वाटते की जरी पूर्वजन्मीसुद्धा मी दुष्कृत्ये न करताही मला दुःख भोगावे लागत असेल तर त्याची भरपाई पुढील जन्मात किंवा मरणानंतर निश्चित होईल.

आदर्श न्यायाची कल्पना माणसाला स्फुरली. परंतु *व्यवहारतः* मात्र आदर्श न्याय हा कधीच वास्तव न्याय होऊ शकत नाही, असे लक्षात आल्यावर या आदर्शाला कुठेतरी वास्तव स्थान देण्यासाठी तो न्याय त्याने ईश्वराच्या हातात दिला. प्रत्येक अपराध्याला आणि अपराध्यालाच शिक्षा व्हावी आणि कुठल्याही निरपराधी माणसाला शिक्षा होऊ नये हा आदर्श न्याय झाला. उलट मानवी न्याय एकतर असा तरी असतो की, 'हजारो अपराधी सुटले तरी चालतील, पण एकाही निरपराध्याला शिक्षा होऊ नये' किंवा कधी असाही असतो की 'हजारो निरपराध्यांना शिक्षा झाली तरी चालेल, पण एकही अपराधी सुटता कामा नये,' हे दोन्हीही निकष खऱ्या अर्थाने न्यायाचे निकष नाहीतच. आणि अशा प्रकारे खरा, आदर्श न्याय आणि वास्तव मानवी न्याय यांच्यातील तफावत दूर करण्यासाठी मरणानंतर अस्सल न्याय ईश्वराच्या दरबारात मिळेल अशी कल्पना माणसाला करावीशी वाटते. एरवी मानवी ज्ञानाचा, विश्वाचा चिकित्सकपणे विचार करणारा कांटसारखा विचारवंतही नैतिक नियमांचे समर्थन करण्यासाठी कर्मांची फळे मरणोत्तर देणाऱ्या ईश्वराचे अस्तित्व हे हेतुवादी युक्तिवादाच्या (Teleological argument) साहाय्याने स्वीकारतो. तेव्हा जगातील वैचित्र्य आणि वैविध्य यांची कारणे दुसरीकडे शोधता आली, तरी 'आदर्श न्याय या जीवनात कुठेच प्रस्थापित होत नाही, या विचारातून उद्‌भविणाऱ्या पुनर्जन्मावरील किंवा मरणोत्तर अस्तित्वावरील श्रद्धेचा सात्त्विक विचार करणे अगत्याचे ठरते.

या प्रश्नाच्या उत्तराची दिशा शोधताना प्रथम एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, 'आदर्श व परिपूर्ण न्याय हा कुठेतरी–कुठल्या तरी न्यायालयात–वास्तव असलाच पाहिजे.' या श्रद्धेचे समर्थन करण्याची जबाबदारी *आपण घेतलेली नाही*. आदर्श व परिपूर्ण न्याय वास्तव असेल किंवा नसेल. मरणोत्तर अस्तित्व ही वास्तवता आहे का हा प्रश्न स्वतंत्र, सत्याला आवाहन करणारा प्रश्न आहे; न्यायावरील श्रद्धेला आवाहन करण्याचा त्यात भाग असू नये. किंबहुना उलटच्या दिशेने असाही प्रश्न विचारता येईल की, आदर्श न्याय हा ईश्वराच्या दरबारात वास्तव असेल तर मानवी न्यायदान संस्थांची गरजच काय? अर्थात हा माझा प्रश्न हे मरणोत्तर अस्तित्वाच्या सिद्धतेसाठी केल्या जाणाऱ्या युक्तिवादाला निर्णायक उत्तर नाही. पण पुनर्जन्मवाद्यांनी हा स्वतःला विचारावा अशी अपेक्षा आहे.

अपरिपूर्ण न्यायाकडून परिपूर्ण व खऱ्या न्यायाकडे वाटचाल करणाऱ्या सुजाण मानवांचा प्रयत्न अर्थपूर्ण आहे असे मला वाटते. परंतु आदर्श न्याय हा ईश्वराच्या हाती सोपवून आपण या मानवी प्रयत्नशीलतेला शैथिल्य आणतो असेही वाटते. जे असावे असे आपल्याला वाटते ते तसे नसते म्हणूनच वाटते. पण 'जे असावे ते' आणि 'जे आहे ते' यांच्यात गल्लत करण्याची परंपरा सामान्य माणसांतच नव्हे, तर तत्त्वज्ञांतही दिसून येते. 'जे असावे' अशा स्वप्नाचा चष्मा लावून वास्तवतेचे चित्र रंगीत पाहण्याची व नंतर ते तसे मुळात रंगीतच आहे असे सांगण्याची स्वप्नाळू प्रवृत्ती काव्यात शोभून दिसेल, सत्यचिंतनात नव्हे. ही जाणीव प्रकर्षाने अलीकडे अलीकडेच विज्ञानवादी तत्त्वज्ञांना होऊ लागली आहे. विज्ञानवादी होणे म्हणजे मानवी मूल्यांचे अस्तित्व नाकारणे नव्हे तर मूल्ये आणि वस्तुस्थिती यांच्यात गल्लत न करणे होय. पुनर्जन्मसिद्धान्ताला अशा गल्लतीचे स्वरूप येऊ न देण्याची खबरदारी आपण घेतली पाहिजे.

मी ज्याला जीवमानसशास्त्रीय म्हटले, तो युक्तिवाद अधिक सूक्ष्म आहे. जन्मलेल्या मुलाचे वर्तन हे सहज स्वाभाविक प्रवृत्तीच्या –instinct च्या स्वरूपाचे कितपत असते आणि (learned) कितपत असते याचा अभ्यास या संदर्भात व्हायला हवा. जीवशास्त्रानुसार, जन्मलेल्या कुठल्याही अर्भकाची जन्मजात गरज असते–शरीर तगवून धरणे. त्यासाठी नेमकी कशी धडपड करावी याचे शिक्षण त्याला मिळालेले नसते. बऱ्याचदा माता ही *प्रत्यक्ष–अप्रत्यक्षपणे त्याला योग्य* त्या मार्गाला प्रवृत्त करते; परंतु ज्यांची धडपड योग्य दिशेने होत नाही अशी बालके मरतातही.

पण शरीर तगवून धरण्याची ही प्रेरणा तरी जन्मजातच का? ती पूर्वानुभवावर *आधारलेली नसेल कशावरून?* असा प्रश्न खरे तर विचारता येऊ नये. कारण पूर्वानुभव घेण्यासाठी तो माणूस जिवंत असेल त्यावेळीही

त्याच्या ठिकाणी ही प्रेरणा नसेल, तर तो जिवत राहणार नाही. जर ती प्रेरणा तेव्हाही असेल, तर पुन्हा ती पूर्वानुभवांवर आधारलेली असे म्हणावयाचे; मग ज्याला भारतीय तर्कशास्त्रात अनवस्था प्रसंग म्हणतात आणि पाश्चात्य तर्कशास्त्रात ad infinitum म्हणतात तो तर्कदोष.

या तर्कदोषातून सुटण्याचीही भारतीय दर्शनकारांची एक क्लृप्ती आहे. ते कर्म अनादी मानतात. अशा स्थितीत अनवस्था हा दोष होत नाही तर अनादित्व ही वस्तुस्थितीच त्याची जागा घेते. पण कर्म अनादी मानायचे म्हणजे आपण ज्याला अगदी आदिम प्राणी म्हणतो त्या अमिबाला दुसऱ्या कुठल्या तरी प्राण्याचे वंशज मानायचे, किंवा उत्क्रांतीनंतर अपक्रांतीही घडते तसे सृष्टीचे एक गुतागुतीचे चित्र आपल्यापुढे येते. ते बरोवर असेल वा नसेल. पण या चित्रात विश्वातील प्राण्यांच्या उत्पत्तिविनाशाना एका सातत्यात गोवले जाते.

पुन्हा इथे हे लक्षात घेतले पाहिजे की पुनर्जन्मवाद्यांची उत्क्रान्ती आणि जननशास्त्रज्ञांचा उत्क्रान्तिसिद्धान्त एकच नाही. प्राण्यांचे आकार, रंगरूप, स्वभाव यांचा शोध जीवशास्त्रज्ञ हे त्यांच्या पूर्वजाच्या रंगरूप आकारांच्या व बाह्य भौतिक परिस्थितीच्या संदर्भात घेऊ इच्छितात, त्यांच्या पूर्वजन्मामध्ये नव्हे. प्राण्यांच्या विविध रगरूपांचे व स्वभावधर्मांचे कोडे हे त्यांच्या या पद्धतीने उलगडेल असा विश्वासही या शास्त्रज्ञाना वाटतो.

माणसामाणसांतील रंगरूप, स्वभाव, बुद्धिमत्ता इत्यादीमधील जन्मजात फरकांचे स्पष्टीकरण देण्याचा प्रयत्न प्राचीन दर्शनकारानी कर्मसिद्धान्ताच्या आधारे केला. दृश्य कारणे दाखविता येत नसतील, तर आम्ही सांगतो ती कारणे माना असा त्यांचा पवित्रा होता. हल्लीची विज्ञानाची वाटचाल दृश्य कारणे दाखविण्याच्या दिशेने आहे व म्हणून त्याचे सूक्ष्म परिशीलन पुनर्जन्मसमस्येच्या संदर्भात आवश्यक आहे.

पुनर्जन्माच्या बाजूने होणारे वरील दोन्ही युक्तिवाद हे आमच्यातुमच्या जीवनातून स्फुरू शकणारे आहेत. ते समजावून घेण्यासाठी असामान्य उदाहरणे पहायला नकोत. पण काही अशी असामान्य उदाहरणे पुनर्जन्माचा पुरावा म्हणून पुढे आली, तर ते पुनर्जन्म नाकारणाऱ्यांना एक प्रबळ आव्हान ठरेल परामानसशास्त्रीय संशोधनसंस्थांमधून अशा असामान्य उदाहरणांचा अभ्यास होतही असतो. या संदर्भात मांडता येणारा एक तात्त्विक मुद्दा उपस्थित करून लेख पुरा करतो.

चार्वाकवादी म्हणतात की, शरीर आणि त्यातील जाणीव यांच्यात जरी वैचारिक पातळीवर फरक करता आला, तरी त्यावरून जाणीव किंवा जाणीव होणारा आत्मा शरीरापासून अक्षरशः अलग होऊ शकेल हे सिद्ध होत नाही. माणूस मेल्यावर तो नसतो, त्याचा आत्माही दिसत नाही. मृतदेह फक्त दिसतो, तेव्हा त्यातील जाणीवही नष्ट होत असली पाहिजे.

दुसरे दार्शनिक म्हणतात की, जाणीव होणारा आत्मा अलग होताना दिसत नाही एवढ्यावरून तो शरीरापासून अलग होत नाही हे सिद्ध होत नाही. किंबहुना 'द्रष्टा' किंवा दृक्-स्वरूप आत्मा हा दृश्य नाही आणि दृश्य शरीर हे (त्याचा आत्म्याबरोबर संपर्क नसेल तर) द्रष्टृ (पाहणारे) किंवा दृक्-स्वरूप नाही असा दोघांच्या स्वरूपात मूलभूत फरकच आम्ही मानतो. अर्थात हा आत्मा किंवा ही जाणीव शरीरापासून अलग झाल्यावर दुसऱ्या शरीरात प्रवेश करते हे मानणेही सोपे नाही. कारण तसे म्हणताना आपण आत्म्याला किंवा जाणिवेला शरीरासारखे कृतिशील मानतो. (एक वस्त्र टाकून दुसरे परिधान करणाऱ्या देहाचे रूपक ही कृतिशीलताच सूचित करते). पण शुद्ध जाणिवेत ही कृतिशीलता मानण्यासाठी त्या




जाणिवेवरोबर लिंगदेह किंवा सूक्ष्मशरीर मानावे लागते आणि या सूक्ष्म शरीराबरोबर पूर्वकर्माचे संस्कार वगैरे नवीन देहात प्रवेश करितात असे मानावे लागते. म्हणजे पुनर्जन्म हे शुद्ध जाणिवेचे किंवा आत्म्याचे देहांतर नसते तर सूक्ष्मशरीरधारी जाणिवेचे किंवा आत्म्याचे असते. या सूक्ष्मशरीराचे स्वरूप हे एक गूढच आहे. पण पूर्वजन्माची स्मृती जागृत होणे, लहान वयात (समजा,) भागवत ग्रंथ घडाघडा म्हणून दाखवणे यासारख्या असाधारण घटनांची उपपत्ती ही अशी लावली जाते खरी !

स्मृतीचे एका देहातून दुसऱ्या देहात संक्रमण हे जीवशास्त्रानुसारसुद्धा शक्य आहे. रशियन शास्त्रज्ञांनी केलेल्या एका प्रयोगानुसार एका कुत्र्याच्या मेंदूतून प्रोटीन्सची विशिष्ट साखळी (की जीत ' उंच उडविलेला चेंडू तोंडात पकडण्याच्या ' सवयीचे संस्कार ग्रथित झाले होते) काढून तिचे दुसऱ्या कुत्र्याच्या मेंदूत अवरोपण केले गेले व त्या दुसऱ्या कुत्र्याला पूर्वी न शिकताही तसा चेंडू पकडण्याची कला अवगत झाली.

बेलर येथे डॉ. युंगर व डॉ. बुझिन्स्की यांनी उंदरावर केलेला प्रयोग प्रसिद्ध आहे. काही उंदरांना दर पाच सेकंदांनी याप्रमाणे दररोज एक दोन तासपर्यंत घंटी ऐकविली गेली व ही घंटी ऐकली तरी धोका नाही, अशी कल्पना त्यांच्यात दृढ केली गेली. नंतर त्या उंदरांना मारून त्यांच्या मेंदूतील अमिनो आम्लाचे रसायन दुसऱ्या काही उंदरांना टोचण्यात आले. त्या उंदरांना तशीच घंटी ऐकविल्यावरही ते धोका नाही असे समजून वावरू लागले. दुसरे, रसायन न टोचलेले उंदीर मात्र धोका समजून पळू लागले. या दोन्ही उदाहरणांत स्मृतीच्या संक्रमणासाठी आत्म्याच्या देहांतराची आवश्यकता भासली नाही, तर शरीरातीलच काही भाग दुसऱ्या शरीरात अवरोपित करून काम भागले. हा ' शरीरातील काही भाग ' आणि पुनर्जन्मवाद्यांनी मानलेले या देहातून त्या देहात संस्कार घेऊन जाणारे सूक्ष्म शरीर यांच्यात आपाततः काही गुणधर्मात्मक साम्य दिसत नाही. तसे शोधता येईल का ? की वरील पुरावा पुनर्जन्माच्या विरोधी जाऊ शकेल ?

डॉ. भट यांसारख्यांनी क्रोमोसोम्स, जीन्स या अतिसूक्ष्म वंशसूत्र–रंगसूत्रांची व सूक्ष्म शरीराची तुलना केलेली आढळते. (पहा- योगसिद्धी व ईश्वरसाक्षात्कार–डॉ. वि. म. भट) पण या ठिकाणीही योगशास्त्रात अभिप्रेत असलेली सूक्ष्मता व वंशशास्त्रज्ञांना अभिप्रेत असलेली सूक्ष्मता यात फरक आहे. योगिजनांना अलौकिक दृष्टीने कळू शकणारे असे तथाकथित सूक्ष्मशरीर किंवा लिंगदेह आहे तर क्रोमोसोम्स, जीन्स ही जनकजीवाणूतील सूत्रे आकाराने अतिसूक्ष्म, अतिशय शक्तिशाली, सूक्ष्मदर्शकयंत्रानेच पाहता येतील अशी, या अर्थाने सूक्ष्म आहेत. याशिवाय वंशशास्त्रानुसार रंगसूत्रांतील संदेशांचा उगम हा मातापित्यांमध्ये दाखविला जातो व मातापित्यांच्या जनकजीवाणूतील संदेश, की जे अगदी उत्क्रांतीच्या प्रक्रियेतील पहिल्या प्राण्यापासून बाह्य परिस्थितीचा परिणाम घडून प्रवाहित होत आलेले असतात, त्यांचे उगमस्थान एकच असल्याने त्यांचा हा पुनर्जन्मच असतो. या सिद्धांतानुसार वंशसूत्र–रंगसूत्रांचे संघटन व बाह्य परिस्थिती हे सर्व पूर्वीसारखेच जुळून आले तर, पूर्वी होऊन गेलेल्या प्राण्यासारखा–अगदी सर्व रंगरूपासह जसाच्या तसा प्राणी आज पुन्हा जन्माला येईल हेही शक्य आहे. अर्थात अशा घटनेची संभाव्यता फारच थोडी असते. यावरून असे म्हटले जाते की, वंशशास्त्रानुसार पुनर्जन्म शक्य आहे. पण पुनर्जन्माचा हा वंशशास्त्रीय अर्थ आपल्याला येथे अभिप्रेत नाही, तर माणूस मेल्यानंतर त्याच्या सूक्ष्म देहाचे (आत्म्याबरोबर) स्थलांतर होऊन त्याचा पुनर्जन्म होतो का? असा प्रश्न आपण विचारत आहोत. त्यामुळे योगशास्त्रातील सूक्ष्मशरीराची कल्पना आपण शरीरशास्त्रातील प्रमेयांच्या साहाय्याने राबवू शकू, ही आशा दूर राहते.

परामानसशास्त्राचे (Parapsychology)



या क्षेत्रातील संशोधनही अद्यापी तितकेसे परिपक्व झालेले नाही. परचित्तसंवेदन (Telepathy), दूरवस्तुसंवेदन (Clairvoyance) यांसारख्या मनाच्या काही विशेष शक्ती असू शकतात, हे परामानसशास्त्रज्ञांनी मान्य केले आहे. पण मरणोत्तर अस्तित्व मान्य करण्याबाबत मात्र त्यांच्यात एकमत नाही. शास्त्रीय पद्धतीने निष्कर्ष काढताना प्रत्येक उदाहरणाबाबत कसून छाननी करावी लागते. मृतात्म्यांनी एखाद्या माणसाला माध्यम बनवून संवाद साधण्याचा प्रयत्न करणे, न शिकलेल्या भाषेत बोलू शकणे, पूर्वजन्मीचे स्मरण झाल्याचे सांगणे व खाणाखुणांसह पटवणे यांसारखी उदाहरणे काही शास्त्रज्ञ मरणोत्तर अस्तित्वाचा पुरावा म्हणून मान्य करतात. त्यातही, माध्यमाच्या साहाय्याने मृतात्म्यांनी संवाद केल्याची उदाहरणे अनेक पाश्चात्य व पौर्वात्य देशांत आढळतात. पूर्वजन्माच्या स्मृतीची उदाहरणे मात्र मुख्यत: भारतात व पुनर्जन्म मानणाऱ्यांच्या देशातच आढळतात, ही एक मजेदार वस्तुस्थिती आहे. याचा एक अर्थ असा निघतो की, मरणोत्तर अस्तित्वाची अनुभूती जे प्रकट करतात त्यांच्या त्या अनुभूतीसुद्धा त्यांच्या धार्मिक श्रद्धांनी नियंत्रित झालेल्या असतात. अशा स्थितीत शास्त्रज्ञांना वस्तुनिष्ठ निष्कर्ष काढणे कठीण होऊन बसते.


काही परामानसशास्त्रज्ञांनी वरील उदाहरणांवरून मरणोत्तर अस्तित्व मान्य केले आहे. तर दुसरे काही परामानसशास्त्रज्ञ या बाबत साशंक आहेत. उदाहरणे दोघांसमोर तीच असली तरी त्यांचा नेमका अर्थ कसा लावायचा याबाबत मतभेद आहेत. मनाच्या अतींद्रिय शक्ती हाच त्या दोघांचाही अभ्यास विषय असल्यामुळे व मनाच्या अतींद्रिय शक्ती इंद्रियांच्या कक्षेत आणून त्यांचे स्वरूप पडताळून पाहणे शक्य नसल्यामुळे शास्त्रज्ञांना तर्क ( speculations ) करावे लागतात. पण जिथे निव्वळ तर्काने उत्तर देण्याचा प्रसंग येतो तिथे पर्यायी तर्कही असू शकतात. त्यामुळेही मरणोत्तर अस्तित्व हा संशयास्पद तर्क झाला आहे. या तर्काला विरोध करणाऱ्या शास्त्रज्ञांच्या मते मरणोत्तर अस्तित्वाचा पुरावा म्हणून दिली जाणारी उदाहरणे परचित्तसंवेदन, दूरवस्तुसंवेदन यांचाच पुरावा आहे. फक्त त्यात वास्तव संवेदन आणि स्वत:च्या व्यक्तित्वाविषयीचा भ्रम यांची सरमिसळ झाली आहे. अज्ञात भाषेत बोलू शकणे हा एक परचित्तसंवेदनाचा प्रकार होऊ शकेल, तर वाचत असल्याप्रमाणे न वाचलेला एखादा ग्रंथ घडाघडा म्हणून दाखविणे हा दूरवस्तुसंवेदनाचा प्रकर होऊ शकेल. ज्याला आपण माध्यमाच्या साहाय्याने मृतात्म्याचा संवाद म्हणतो, त्यातही मृतात्म्याची माहिती ( जिवंत असतानाची ) असलेल्या व्यक्तीपासून परचित्तसंवेदन होऊन तो मृतात्माच आपल्यातून बोलत आहे असा स्वत:च्या व्यक्तित्वाविषयीचा भ्रम त्यात मिसळून हे घडू शकेल.तसेच पुनर्जन्म स्मृतीच्या म्हटल्या जाणाऱ्या उदाहरणातसुद्धा असाच संकर शक्य आहे. तेव्हा एखादे उदाहरण दूरवस्तुसंवेदन किंवा परचित्तसंवेदनाचे नसून ते मरणोत्तर अस्तित्वाचेच आहे हे ठरविण्याचे निकष कोणते ठरवावयाचे व ते निकष कसे लावावयाचे हा परामानसशास्त्रज्ञांच्या समोर एक महत्त्वाचा प्रश्न आहे.

परामानसशास्त्रज्ञांसमोर अभ्यासासाठी असलेली उदाहरणे ही संख्येने फारच थोडी आहेत व या शास्त्रज्ञांच्या काटेकोर व संशयवादी दृष्टिकोनामुळे ती आणखी कमी होत असण्याचीही शक्यत: आहे. डॉ. गार्डनर मर्फी यांच्या मते हे एक चक्रच आहे. उदाहरणे कमी म्हणून अधिक संशयवादी दृष्टिकोन, अधिक संशयवादी दृष्टिकोन म्हणून पुन्हा उदाहरणे कमी, मानसशास्त्राच्या इतर शाखांचे ( विशेषत: वर्तनवादी विचारसरणीचे ) शास्त्रज्ञ तर बहुधा परामानसशास्त्राकडे तुच्छतापूर्वक पाहतात. त्यामुळे एकीकडे अशा तथ्यपूर्ण उदाहरणांकडेसुद्धा दुर्लक्ष करण्याची ( मानसशास्त्रज्ञांची सुद्धा ) वृत्ती, तर दुसरीकडे संशोधनात्मक दृष्टी न ठेवता श्रद्धेने खरी वा खोटी उदाहरणे पुरावा म्हणून स्वीकारण्याची सामान्यांची, विशेषत: धार्मिकांची प्रवृत्ती या दोन प्रवृत्तींतून परामानसशास्त्रज्ञ वाट काढीत आहेत.

भारतातील धार्मिक व आध्यात्मिक लोकांवर या संशोधनाचा एक विचित्र परिणाम होत आहे व अजून होण्याची शक्यताही आहे. समजा, पुनर्जन्मसिद्धान्त खरा आहे अशी उद्या परामानसशास्त्रज्ञांनी घोषणा केली तर भारतातील धार्मिक व आध्यात्मिक मंडळी त्यातील संशोधनात्मक भागाकडे लक्ष देणार नाहीत, तर आपल्या पूर्वजांना हा सिद्धान्त अगोदरच कळला होता, त्यालाच या आधुनिक संशोधनाने पुष्टी मिळाली आहे असे म्हणून आपल्या श्रद्धांना गोंजारत राहण्यात समाधान मानतील. प्राचीन ग्रंथकारांना हे असेच कसे अभिप्रेत होते हे सिद्ध करण्याचा ( अर्थांची ओढाताण करून ) खटाटोपही करतील आणि मग सर्वसामान्यांच्या लेखी या संशोधनाची संशोधनात्मक किंमत शून्य होईल.

शेवटी असे म्हणू या, की पुनर्जन्मावरील श्रद्धेचा भारतीय समाजात स्वैर वापर केला जातो. हे खरे असले तरी एक सिद्धान्तकल्पना म्हणून पुनर्जन्माचा विचार होण्यास अडचण दिसत नाही. पुनर्जन्मसिद्धान्त खरा असल्याचे जरी सिद्ध झाले, तरी तेवढ्यामुळे सर्वसाधारण जनतेत त्या संदर्भातील सर्व श्रद्धा-समजुतींचे समर्थन होईल असेही समजण्याचे कारण नाही. ●





# वासांसि जीर्णानि.... ?

## लेखक : मानवेंद्रनाथ रॉय

चाळीस वर्षापूर्वी उत्तर प्रदेशात-दिल्ली-मथुरा भागात पुनर्जन्माची एक कथा वृत्तपत्रांतून बरीच गाजली. रॉय त्यावेळी तुरुंगात शिक्षा भोगीत होते. गजाआड जे कानावर आले, वाचले गेले, त्यावरून त्यांनी एक लेखच लिहून काढला. तो त्यांच्या Science and Superstition या पुस्तकात संग्रहित करण्यात आला आहे. हा लेख व पुस्तकातील इतर भाग यावर हा अनुवाद आधारित आहे.

या आमच्या लहानशा जगातील रहिवाशांत सध्या एक नवाच प्रक्षोभ निर्माण झाला आहे. परंतु त्याला प्रक्षोभ म्हणणेही योग्य होणार नाही.खळबळ किंवा रिकामा फड-फडाट असेच म्हटले पाहिजे. आपल्या स्वत:वर परिणाम घडवून आणणाऱ्या घटनांमुळे प्रक्षोभ निर्माण होतो. तसे काही एक घडलेले नाही. आमच्या चार भिंतीच्या बाहेरून एक कथा आत झिरपली आणि स्वत:चा थोडा मीठ–मसाला घालून तीच सारेजण पुन:पुन्हा सांगत आहेत. इतका कडे-कोट पहारा आणि बंदोबस्त असता अशा गोष्टी आमच्यापर्यंत येऊन पोचतात हेच एक आश्चर्य आहे. तरी देखील ही नाकेबंदी मोडून एकदा का त्या आत आल्या, की वणव्यासारख्या पसरतात आणि बाहेरील जगाची काही बातमी समजण्यासाठी आसुसलेल्या एकाकी जीवांना त्या तृप्त करतात. विशेषत: या गोष्टी कपोलकल्पित किंवा भोळसटांना खाद्य पुरविणाऱ्या असल्या, की त्यापासून मिळणारी तृप्तता अधिक. एखादा वॉर्डर एकाकी बाजारगप्प ऐकतो आणि विकृत किंवा फुगवलेल्या स्वरूपात ती पसरवून देतो. तुरुंगातील कारकुनांच्या गप्पाष्टकातील काही भाग तेथे काम करणारा एखादा कैदी ऐकतो आणि आपल्या कैदी-बांधवाना सांगतो. सध्या खळबळ उडवून देणाऱ्या गोष्टीचा उगम असाच आहे. या गोष्टीमुळे बाहेरच्या जगातही लहानसे वादळ उठले आहे असे म्हणतात. एका मुलीला आपल्या पूर्वजन्मातील घटना आठवल्या आणि त्याही इतक्या स्पष्टपणे, की त्यामुळे पुनर्जन्माबाबत शंका उपस्थित करणाऱ्या आणि जडवादी पाश्चात्यांच्या प्रभावामुळे भ्रष्ट झालेल्या लोकांना आणखी एक चांगला जबर तडाखा बसला आहे.

या कथेचा उगम मथुरेत आहे. ज्या मथुरेत बालवयात खोडचा आणि तरुण वयात प्रणयक्रीडा करणाऱ्या श्रीकृष्णाने असंख्य चमत्कार करून दाखविले तेथून आलेल्या गोष्टीबद्दल अविश्वास व्यक्त करणे कोणाला तरी शक्य आहे काय? दररोज अनेकदा ही अद्भुत कथा सांगण्यात येत आहे आणि भाविक लोक ती ऐकताना तल्लीन होऊन जात आहेत. त्यामुळेच या कथेत कितपत तथ्यांश आहे हे समजणे अत्यंत कठीण झाले आहे. दृढ श्रद्धा हीच अचूकतेचे मापन करीत आहे आणि ही श्रद्धा जितकी आंधळी, तितका तिचा पीळ अधिक.

## पूर्वजन्मीचा पती

या कथेची नायिका शान्तीदेवी हिचा जन्म नऊ वर्षांपूर्वी दिल्लीजवळील एका गावातील एका ब्राह्मणाच्या पोटी झाला. मागच्या जन्मात आपण मथुरेमध्ये राहत होतो, तेव्हा तिकडे मला घेऊन चला असे टुमणे तिने आपल्या आईबापांच्या मागे काही काळ लावले होते. प्रथम प्रथम त्यांनी तिच्या या हट्टाकडे दुर्लक्ष केले. पण तिच्या या जगावेगळ्या आग्रहाची बातमी तिच्या कुटुंबाबाहेरील इतरांना समजली. स्थानिक लोकांनी एक 'चौकशी समिती' स्थापन केली व ते शान्तीदेवीला मथुरा येथे घेऊन गेले. तेथे पोचताच तिने पुढील चमत्कार करून दाखविले. स्टेशनच्या फलाटावरच तिने एक ब्राह्मण माणसाला आपला पूर्वजन्मीचा पती म्हणून ओळखले; रस्त्यावर तिला पाहण्यासाठी जमलेल्या लोकांपैकी एकाला आपला सासरा म्हणून हुडकून काढले; आपण पूर्वीच्या जन्मात राहत असलेले घर तिनेच समितीच्या सदस्यांना दाखवून दिले. या घराची तिला खडान् खडा माहिती असल्याचे दिसले. आपण जेथे स्नानासाठी जात होतो ती यमुनेच्या घाटावरील जागा तिने दाखविली; आपल्या पूर्वजन्मीच्या पतीच्या मुलाबद्दल तिने विलक्षण जिव्हाळा दाखविला. नऊ वर्षांपूर्वी या मुलाला जन्म देतानाच आपली बायको वारली होती असे या 'पती'ने सांगितले. या सर्व गोष्टी स्पष्टपणे पुढे आल्यावर पुनर्जन्म सिद्धान्ताच्या खरेपणाबद्दल कोण शंका व्यक्त करू शकेल?

शान्तीदेवीच्या कथेला वस्तुस्थितीचा संपूर्ण आधार असल्याचा निष्कर्ष अर्थातच समितीने काढला. आणि हा निष्कर्ष वृत्तपत्रांतून आणि भाषणांतून जाहीर करण्यात आला. शान्तीदेवीने स्वतः अनेक जाहीर सभांतून भाषणे करून आपली कथा लोकांना ऐकविली. हिंदू संस्कृतीच्या पुरस्कर्त्यांनी वृत्तपत्रांकडे धाव घेतली आणि आधुनिक विज्ञान आणि मानसशास्त्र यांची टर उडविली. विज्ञान आणि मानसशास्त्र यांचे नावही न ऐकलेल्या या नऊ वर्षे वयाच्या बालिकेने दिलेले आव्हान विज्ञानाने स्वीकारावे असे जोरदार आवाहन त्यांनी केले.

शान्तीदेवीची ही कथा पुन:पुन्हा ऐकल्यावर साहजिकपणेच तिने माझ्या मनाचा ताबा घेतला व ती माझ्या मनात घोळू लागली. पुनर्जन्माच्या सिद्धान्ताविषयी मला मूळीच आस्था नाही. त्याबद्दल मी उदासीन आहे. कोणे एके काळी आत्म्याचा शोध लावण्याची आवश्यकता माणसाला वाटली आणि एकदा त्याची प्रतिष्ठापना केल्यावर त्यावर श्रद्धा ठेवणे त्याला भाग पडले. ज्या काळात वास्तव सत्य हुडकून काढण्यास मानव अक्षम होता, त्या काळात त्याने लावलेल्या 'शोधा'-वर विश्वास ठेवणारांपैकी मी नाही. भौतिक वस्तुस्थितीलाच मी सत्य हे नाव देतो. या भौतिकतेत मनाचाही अंतर्भाव आहे. अध्यात्मवाद्यांना या विधानाचा राग येईल; पण संताप किंवा 'ठोकून देतो ऐसाजे' ची कृती तर्कशास्त्राशी सुसंगत नाही. माणसाने स्वत:ची प्रतिमा पुढे ठेवूनच देवांची निर्मिती केली. या देवांबद्दल त्याच्या निर्मात्यांपेक्षा अधिक आदर मला नाही. देवांच्या या निर्मात्यांचे 'मातीचे पाय' मी पाहिलेले आहेत. आणि म्हणूनच शान्तीदेवीच्या कथेमुळे पुनर्जन्म सिद्धान्तावर चिंतन करण्याची प्रेरणा मला झाली नाही. या कथेवर माझा विश्वासच बसला नाही. आपण मूलतः पशू असलो, तरी विचार करू शकणारे पशू आहोत व म्हणून आपल्याला अधिक अक्कल आहे असा विश्वास माणसाला असला पाहिजे. परंतु बहुतेकांना तो नसतो. विचार करण्याची क्षमता न वापरणे हे दुर्दैवच मानले पाहिजे. माणसे आपण देव आहोत अशी बतावणी करतात आणि विकृत कल्पनाशक्तीतून निघालेल्या बनावट गोष्टींमागे आपली वास्तवता दडविण्याचा प्रयत्न करतात. सत्यापेक्षा असत्यच त्यांना परवडते.

पुरावा कितपत विश्वासार्ह आहे हाच मूलभूत प्रश्न आहे. आत्म्याच्या पुनर्जन्मावर विश्वास ठेवण्याचेच ठरविले, तर मग प्रश्नच मिटला. श्रद्धेबाबत युक्तिवाद होऊ शकत नाही. पुनर्जन्माविषयीची श्रद्धा अगदी थोडचा विचारप्रक्रियेतून जन्माला येते. माणसाच्या जीवशास्त्रीय अस्तित्वाच्या पलीकडे आत्मा ही चीज आहे, येथपासून या विचारास प्रारंभ होतो. हे प्रमेय प्रयोग करून सिद्ध करणे अशक्यच आहे. ते मान्य केले, की मग आत्मा हा अविनाशी आहे हे गृहीतकृत्य पुढे येते. आत्मा हे मानवाचे अमर असे सत्व असल्यामुळे मृत्यूनंतरही ते टिकून राहाते. जीवशास्त्रीय नियमांमुळे हा आत्मा अनेकदा गृहहीन होतो व त्याला पुन:पुन्हा नवीन घरठाव शोधायला लागतो. अशा रीतीने अमर-सत्याच्या प्रमेयातूनच आत्म्याच्या स्थलान्तराचा सिद्धान्त निर्माण झाला आहे. आदिमानवाच्या विश्वसत्वाच्या कल्पनेखेरीज या अमरत्वाच्या कल्पनेला आधार नाही.

## अज्ञानात जन्म

आत्म्याच्या अमरत्वाची कल्पना ही माणसाच्या आध्यात्मिक उच्च पातळीचा परिपाक नाही, तर आदिमानवाच्या अज्ञानात तिचा जन्म झालेला आहे. रानटी जमातीत आजही या कल्पनेच्या खुणा दिसतात. मलायामधील आदिमानव जमातीतील लोक आत्म्याचा रंग लाल असतो व तो मक्याच्या दाण्याएवढ्या आकाराचा असतो असे मानतात. काही जमातींनी त्याचे स्वरूप बाष्पयुक्त, अंधुक आणि धूसर असे मानले असून त्याचा आकार हाताच्या अंगठ्याएवढा असतो, अशी त्यांची समजूत आहे. पॅसिफिक बेटांमधील काही भागातील लोक आत्मा हा शरीराच्या एका विशिष्ट भागात राहत नाही, तर तो द्रवरूप असल्यामुळे शरीराच्या सर्व भागात पसरलेला असतो असे मानतात. जपानमधील मागासलेले लोक आत्मा म्हणजे एक लहानशी, गोल आणि कृष्णवर्णीय गोष्ट आहे, अशी ग्वाही देतात. ऑस्ट्रेलियातील बुशमेन माणसाची

छाती हे आत्म्याचे वसतिस्थान असल्याची कल्पना करतात.

युगानुयुगे माणसाच्या मनात भुताखेतांवरील विश्वास आणि आत्मसत्व (Soul stuff) यांची गल्लत होत आली आहे. आत्म्याच्या देहान्तराची कल्पना ही शरीर व आत्मा यांच्या फारकतीच्या आणि आत्म्याचे स्वरूप अव्यक्त आणि अशरीरी आहे या प्रमेयातूनच पुढे आली आहे. पुनर्जन्माचा सिद्धान्त ही त्याचीच आर्थिक परिणती आहे. तरीदेखील बुद्धिवादाची आणि विज्ञानाची चाड असलेले काही आधुनिक महान अध्यात्मवादी आत्म्याचा सिद्धान्त हा आदिमानवाच्या अज्ञानातून जन्म पावलेला आहे हे मान्य करतात.

आत्म्याचा सिद्धान्त हा अशा रीतीने रानटी अवस्थेचा आध्यात्मिक अवशेष असल्यामुळे अज्ञानी लोकांच्या मनावर त्याचा अद्यापही प्रभाव आहे. या सिद्धान्ताला वैज्ञानिक आणि प्रायोगिक कसोटया लावून तो खरा असल्याचे सिद्ध करणे ही अगदी वेगळी गोष्ट आहे. आत्म्याच्या कल्पनेचे मूलकारण काहीही असले, तरी त्याचे स्थलांतर अगदी आज व इथे घडत असल्याचा दावा करण्यात येत असल्यामुळे, ती वस्तुस्थिती असेल, तर तिचे प्रायोगिक निरीक्षण करण्याचा काही मार्ग असलाच पाहिजे. विज्ञानाची वास्तवता नाकारली, वैज्ञानिक विचारपद्धतीचा मार्ग सोडला, तर मग विज्ञानाला अंधश्रद्धेपुढे हात टेकून गप्प बसणेच भाग आहे. परंतु धार्मिक समजुतींना शास्त्रीयतेचा आणि बुद्धिवादाचा आधार आहे हे सिद्ध करण्याचा दावा करण्यात आला, तर मात्र परिस्थिती धोक्याची बनते. विज्ञानाला तुम्ही आव्हान दिले, तर विज्ञानाचे नियम मान्य करूनच हा संघर्ष चालला पाहिजे. एखादे गृहीत कृत्य अपरिवर्तनीय असे सत्य आहे असे सांगणारी धार्मिक विचारपद्धती विज्ञानाला मान्य नाही. विज्ञान आणि बुद्धिवाद धर्म अमान्य करतो याचे कारण धार्मिक ठाम समजुती विज्ञानाच्या व बुद्धीच्या कसोटीला उतरत नाहीत म्हणून नव्हे, तर ही विचारपद्धती तर्कदुष्ट आणि आंतरिक विरोधांनी युक्त असते म्हणून. विज्ञान व बुद्धिवाद यांच्या मैदानावर धर्मनिष्ठांना मुकाबला करावयाचा असेल, तर हा मुकाबला वैज्ञानिक आणि बुद्धिवादी पद्धतीनेच झाला पाहिजे. आपल्या समजुतीच्या पुष्टयर्थ हे लोक शास्त्रीय पुरावा दाखल करून आपल्या पद्धतीची श्रेष्ठता शाबीत करू पाहत असतील, तर पुराव्याचे काही साधे नियम त्यांना पाळावे लागतील. हा पुरावा गोळा करण्याच्या पद्धतीने विश्वासार्हतेचा हवाला दिला पाहिजे.

## श्रद्धेने पछाडलेले

एका लहान मुलीने एक निवेदन केले व पडताळा आला असा दावा करण्यात आला आहे. ही चौकशी निःपक्षपातीपणाने करण्यात आली, या गृहीतकृत्यावरच हे सारे प्रकरण आधारित आहे. परंतु अशा तऱ्हेच्या चौकशीत निःपक्षपातीपणा असणे शक्य आहे काय? अगोदरच उराशी घट्ट बाळगलेल्या कल्पनांनी टीकेला अर्धचंद्र दिलेला आहे. अंधश्रद्ध लोकांनी दिलेल्या व छाननी न करता नोंदल्या गेलेल्या पुराव्यावर कधीही विश्वास ठेवता येणार नाही. या प्रकरणातील चौकशी अशाच दोषांनी डागळलेली आहे. आपल्या पुनर्जन्मविषयक सिद्धान्ताला आणखी एक दुजोरा म्हणून या प्रकरणाकडे पाहणाऱ्या लोकांनीच ही चौकशी चालविली. शास्त्रशुद्ध चौकशीत भाग घेण्यास लायक नसलेल्या लोकांनी पुरावे



दाखल केले. सर्वजण श्रद्धेने पछाडलेले होते. संशयवादी आणि चिकित्सात्मक चौकशी-पद्धतीचा त्यांना गंधही नव्हता. या पद्धतीनेच सत्याचा शोध लागत असतो.

अमर अशा आत्म्याची कल्पना ही गृहीत-तत्त्व म्हणून यथार्थ आहे हे दाखविल्यावाचून पुनर्जन्माचा सिद्धान्त सिद्ध करण्याची भाषा करणेही तर्कशास्त्रदृष्ट्या विहित नाही. आत्मा आणि त्याचे अमरत्व यावरील श्रद्धेवरच हा सिद्धान्त आधारित आहे. या श्रद्धेचा पाया चिकित्सक पद्धतीने तपासून पाहणे आवश्यक आहे. विज्ञानाने या समजुतीस आव्हान दिले आहे आणि त्याचा भुसभुशीतपणा उघड केला आहे. पुनर्जन्माची कल्पना विचारात घेण्या-आधी आत्म्याचे अस्तित्व सिद्ध झाले पाहिजे.

शांतीदेवीची कथा किंवा अशाच इतरही गोष्टींवरून अमर अशा आत्म्याचे अस्तित्व सिद्ध होत नाही, मग या कथांचा खरेपणा प्रायोगिकरीत्या तपासलेला व सिद्ध झालेला असो वा नसो. माणूस मेल्यानंतरही त्याची स्मृती टिकून राहू शकते, एवढेच काय ते त्यावरून सिद्ध होऊ शकेल. परंतु हे विधानही आभासयुक्त असून आत्म्याच्या सिद्धान्ताला छेद देणारे आहे. कारण स्मृती हा जीव-शास्त्रीय व्यापार किंवा कार्य आहे. शरीर मृत झाले, की त्याबरोबर मेंदूमध्ये साठविलेल्या स्मृतींचाही नाश होतो. मेंदूमध्ये बिघाड झाल्यामुळे विस्मृती निर्माण होते हे सर्वज्ञात आहे. मेंदू हा शरीराचाच भाग आहे व तो व्यवस्थितपणे चालण्यावरच स्मृती नीट राहणे अवलंबून असते. आणि सर्व शारीरिकता ही जडच असते. शरीरावाचून मेंदूचे अस्तित्व संभवतच नाही.

आत्म्याचा एक गुणधर्म म्हणून मृत्यूनंतरही स्मृती टिकून राहू शकत असेल, तर मग आत्म्याच्या कल्पनेचे काय? त्यालासुद्धा जडवस्तूच मानायचे काय? परंतु तो तर, विदेही मानला गेला आहे आणि त्यावरूनच त्याची स्थलांतर–क्षमता कल्पिली गेली आहे. आत्म्याचे व शरीराचे स्वभावधर्म आणि गुणधर्म वेगळे असतात; तो शरीरात राहतो, पण त्याच्यावर शरीराचा कोणताही परिणाम होत नाही. अलिप्तपणे तो शरीराकडे पाहत असतो आणि म्हणूनच शरीराबरोबर तोही मृत होत नाही. जीर्ण वस्त्र टाकून द्यावे, त्याप्रमाणे तो शरीराचा त्याग करतो आणि नव्या देहाचा आश्रय करतो. परंतु पुनर्जन्मासंबंधीच्या कथांवरून तर असे दिसते की, ही जीर्ण वस्त्रे त्याला चिकटून बसलेली आहेत, किंवा खरे तर, तो त्यांचा पूर्णपणे त्याग करू शकत नाही. कारण तसे तो करू शकला, तर स्मृतीचाही त्याला त्याग करावा लागला असता. परंतु या जुन्या, जीर्ण आणि घाणेरड्या वस्त्रांचा दर्प येऊन आत्म्याची शुद्धता नाहीशी झाली आहे असे या कथा दर्शवितात.

अशा रीतीने पुनर्जन्मासंबंधीचा शास्त्रीय पुरावाच आत्म्याच्या सिद्धान्ताचा निकाल लावीत आहे. आत्मा जर असेल, तर त्याला पूर्वस्मृती असता कामा नये. तशी ती असेल आणि पुनर्जन्मासंबंधीच्या पुराव्यावरून तसे शाबीत होत असेल, तर अशरीरी आत्म्याचे अस्तित्वच धोक्यात येते. स्वतःच्या बैठकीलाच सुरुंग लावल्याप्रमाणे हे होते.

**'सूक्ष्म शरीर'**

आत्म्याचा सिद्धान्त ज्यांनी मांडला व प्रस्थापित केला त्यांनी त्याला 'सूक्ष्म शरीर' बहाल केले आणि त्यावरच पुनर्जन्माच्या सिद्धान्ताची उभारणी केली. राधाकृष्णन् यांनी म्हटल्याप्रमाणे, 'आपले महान पूर्वज मोठे धैर्यवान होते.' पुनर्जन्माच्या कल्पनेसाठी आत्म्याच्या कोणत्या स्वरूपाची आवश्यकता आहे हे त्यांनी जाणले व त्याप्रमाणे आत्म्याची कल्पना घडविली. त्यांनी कल्पिलेला आत्मा विदेही नाही. त्याचा आकार हाताच्या अंगठ्याएवढा आहे. उपनिषदांमध्ये या साऱ्या विलक्षण कल्पना विस्ताराने आल्या आहेत. हे आपले पूर्वज धीट होते, याचे कारण त्यांना आव्हान देणारे विज्ञान अद्याप अस्तित्वात आले नव्हते. लोकांत प्रचलित असलेल्या भ्रामक समजुतींचा उपयोग करून घेऊन त्यांनी या कल्पना निर्माण केल्या. कर्म-सिद्धान्ताला मान्यता मिळविण्यासाठी त्यांनी पुनर्जन्म सिद्धान्ताचा प्रसार केला. प्रचलित प्रस्थापित समाजरचना टिकवून धरून ज्याला त्याला आपले नियत-स्थान दाखवून देण्यासाठी व कोणीही ही समाजरचना बदलण्याचा वा उलथण्याचा प्रयत्न करू नये यासाठी त्यांनी हा सिद्धान्त बद्धमूल केला.

त्यांच्या सिद्धान्ताप्रमाणे पुनर्जन्म घेतो, तो विदेही आत्मा नव्हे, तर 'सूक्ष्म शरीर.' मृत्यूनंतर देहाची एक अगदी छोटी प्रतिकृती शिल्लक उरते असे त्यांचे म्हणणे आहे. ते


गृहिणींना नेहमी सतावणारा प्रश्न!!



**तोंडी लावणे काय करावे हा प्रश्न नेहमी गृहिणींना सतावतो पण आतां तसला प्रश्न पडण्याचें कारण नाहीं. पावसाळ्यांत किंवा इतर कोणत्याही ऋतुमध्ये खराब न होणारी आणि सहज वापरतां येतील अशी ठाकूर यांची लोणची, पापड, मसाले, चटण्या व मेतकूट घरांत असल्यावर गृहिणींना कोणताच प्रश्न पडणार नाहीं.**

- लोणची
- पापड
- मसाले
- मेतकूट
- चटण्या

ठाकूर मंडळी,
माहीम, मुंबई-

मान्य केले तर, पूर्वजन्माची स्मृती कायम राहते अशी शक्यता गृहीत धरता येईल. पण ही भूमिका धोक्याची आहे. ती घेतली तर, सुटकेची आशाच नाही. कारण हे गृहीत कृत्य वैज्ञानिक स्वरूपाचे असून प्रयोगासाठी ते प्रयोगशाळेत आले पाहिजे. मृत्यूनंतर जे शिल्लक राहते, ते जड स्वरूपाचे असेल, तर पुढील जन्मापर्यंत त्याचे काय होते ते शोधून काढण्याचा एखादा मार्ग असलाच पाहिजे.

शरीराचा मृत्यू म्हणजे त्याच्या जड *घटकांचा नाश नव्हे, तर त्या घटकांचे* रासायनिक विघटन होय. जड वस्तू (मॅटर) ही अमर असते. परंतु 'सूक्ष्म शरीरा'च्या कल्पनेप्रमाणे माणसाचे शरीर पूर्णपणे विघटित न होता त्याची सुघटित प्रतिकृती शिल्लक उरते. या प्रमेयाची शास्त्रीय कसोटी घेणे *शक्य आहे. माणसाच्या मृत्यूची प्रक्रिया* अगदी तपशीलवारपणे निरीक्षता येते. या प्रक्रियेतून सूक्ष्म शरीर निसटून शाबूत राहिल्याबद्दलचा कोणताही पुरावा पुढे आलेला नाही. स्मृती किंवा अनुभव यांचा साठा करून ठेवण्यासाठी या सूक्ष्म शरीराला जड सुघटितपणाची आवश्यकता आहे आणि म्हणून ते विज्ञानाच्या निरीक्षणातून निसटून जाणे अशक्य आहे.

## खोटे प्रमेय

मृत्यूच्या गूढाचा भेद करणाऱ्या आधुनिक शरीरशास्त्रापुढे या सूक्ष्म शरीर–सिद्धान्ताचा पाड लागणार नाही. शरीररचना आणि जीवनाचे स्वरूप यांबद्दल जेव्हा अज्ञानाचे वातावरण होते, तेव्हा ही कल्पना तग धरू शकली. परंतु 'सूक्ष्म शरीरा'चे गृहीतकृत्य मानल्याखेरीज पुनर्जन्माची प्रक्रिया मुळी सिद्धच होऊ शकत नाही. विज्ञानाच्या दृष्टीने म्हणूनच शांतीदेवीच्या किंवा अशाच इतर कथा कितीही 'अधिकृतपणे' सांगितल्या आणि 'शास्त्रीय दृष्ट्या' सिद्ध झाल्या तरी, *त्या अखेर बिनबुडाच्या* भाकडकथाच ठरतात. विदेही आत्म्याला पूर्वस्मृती असू शकत नाही आणि तो देहधारी असेल तर, त्याची वैज्ञानिक छाननी व तपासणी करणे शक्य झाले पाहिजे. आत्म्याची एकंदर कल्पनाच अशा खोट्या प्रमेयांवर उभारलेली असल्यामुळे तिचा अधिक विचार करण्याची गरज नाही.

आत्म्याच्या सिद्धान्ताचा हा सारा मामलाच तर्कदुष्ट आहे. जे सिद्ध करायचे, ते गृहीत धरून त्यावर तो उभारलेला आहे. मृत्यूनंतरचे अस्तित्व प्रत्यक्ष गोष्टींनी आणि वस्तुस्थितीने सिद्ध केले की, आत्म्याचे अमरत्व आणि अस्तित्व आपोआप सिद्ध होते, असा हा युक्तिवाद आहे. परंतु शरीराच्या आत्म्याबरोबर जे नष्ट होत नाही त्याचे अस्तित्व गृहीत धरून हा सिद्धान्त मांडण्यात आला आहे. हे गृहीतकृत्य स्वीकारले नाही, तर शांतीदेवीसारख्यांच्या *गोष्टींकडे अत्यंत संशयाने पाहणे भाग पडते.* आणि मग वैज्ञानिक अलिप्तपणाने आणि वेगळ्या पद्धतीने या घटनांची छाननी करणे अवश्य होते.

## मानसिक पूर्वधारणा

*पुरावा गोळा करणे* हे काही सोपे काम नाही, असे अलीकडच्या मानसशास्त्रीय *संशोधनावरून* दिसून *आले आहे. साक्ष* देणाऱ्याचा प्रामाणिकपणा गृहीत धरूनही *त्याने दिलेला पुरावा* कितपत विश्वासार्ह आहे हे अनेक गोष्टींवर अवलंबून असते. *त्यात* मानसिक पूर्वधारणा (प्रि–ऑक्युपेशन) हा घटक महत्त्वाचा आहे. त्यामुळे इतरांना न दिसणाऱ्या गोष्टी अशा लोकांना कल्पनेने दिसतात. उलट भावनेचा पगडा बसल्यामुळे ढोबळ गोष्टीही त्यांच्या दृष्टीतून निसटतात. यासंबंधी अनेक प्रयोग झाले असून एकाच घटनेचे वर्णन निरनिराळ्या लोकांनी निरनिराळ्या पद्धतीने केल्याचे आढळून येते. अत्यंत चाणाक्ष आणि प्रशिक्षित निरीक्षकच एखाद्या घटनेचे वर्णन वस्तुनिष्ठपणे व यथातथ्य करू शकतो. ज्याला वस्तुस्थिती म्हटले जाते ती खरोखरच वस्तुस्थिती आहे काय, याचा छडा प्रथम लावावा लागतो. नाहीतर हवेत इमले बांधले जातात, आणि बुद्धिवादाच्या लहानशा धक्क्यानेही ते जमीनदोस्त होतात. एकदा एखादी कल्पित गोष्ट वास्तव मानली की, मग पुढचे सारे काही अगदी सोपे आणि सरळ होते. कल्पित गोष्टी कल्पनाचक्षूंनाच दिसू शकतात आणि त्यांची वास्तवता कल्पनाशक्ती टिकेल तोवरच टिकते. केवळ पाहणे म्हणजे निरीक्षण नव्हे, हे रहस्यकथा वाचणाऱ्यांना चांगलेच अवगत आहे...आणि म्हणूनच शांतीदेवीच्या कथेची सत्यता विश्वासार्ह नाही, तिला शास्त्रीय आधार नाही. चौकशी समितीच्या पुढे दिलेल्या पुराव्यावर जरा जपूनच विश्वास ठेवला पाहिजे. या सज्जनांच्या सत्यनिष्ठेवर आणि प्रामाणिकपणावर मला कोणताही संशय व्यक्त करावयाचा नाही. परंतु अगदी प्रामाणिक व सुबुद्ध साक्षीदारांची 'चक्षुर्वैसत्यं' अशी साक्षही क्वचितच विश्वासार्ह असते. संपूर्ण सत्य सांगण्याऐवजी ते कित्येकदा अर्धसत्य वा असत्य सांगतात.

या प्रकरणातील 'वस्तुस्थिती' तरी काय आहे? (१) *या मुलीने* गर्दीतून कित्येक लोकांना आपला पूर्वजन्मीचा नवरा, सासरा इत्यादी म्हणून ओळखून काढले. (२) तिने समितीच्या सदस्यांना आपल्या पूर्वजन्मीच्या घराकडे नेले. (३) या घराची तिला खडान् खडा माहिती आहे असे दिसून आले.

*ही वस्तुस्थिती* बाहेर आली त्या परिस्थितीचा थोडा विचार करू या. समितीचे *लोक येत आहेत,* हे मथुरावासीयांना अगोदरच समजले होते. ज्यांना शान्तीदेवीने *आपला पूर्वजन्मीचा नवरा, सासरा म्हणून* हुडकून काढले, त्यांना शान्तीदेवीची कथा अगोदरच माहीत होती. चमत्कार घडण्याच्या अपेक्षेने लोकांनी रेल्वेस्टेशनवर गर्दी केली होती *त्यांची* मने उत्कंठेने व भावनावेगाने भरून गेली होती. थोडक्यात म्हणजे तेथील मानसिक वातावरणात पूर्वधारणा आणि अपेक्षा यांचे वर्चस्व अगोदरच प्रस्थापित झाले होते. शान्तीदेवीच्या तथाकथित पूर्वजन्मीच्या नातेवाइकांच्या वागणुकीत आणि मुद्रेवर या चमत्काराची अपेक्षा प्रतिबिंबित झाली असण्याचीही शक्यता आहे. गर्दीतील काहीजण आपातत: 'तो पहा सासरा' आणि 'हा तिचा नवरा' असेही उद्गारले असतील. त्यांचा हेतू त्या मुलीला पूर्वसूचना देण्याचा नव्हता असे मान्य केले, तरीही असे काही घडले असण्याची शक्यता आहे. चौकशी समितीच्या सभासदांचे लक्ष फक्त शान्तीदेवीवरच केन्द्रित असल्यामुळे त्यांचे इतर लोकांच्या या सूचक वर्तणुकीकडे दुर्लक्ष होणे साहजिक आहे...आणि म्हणून केवळ शान्तीदेवीने या आपल्या नातेवाइकांना ओळखले, यावरून तो विश्वासार्ह पुरावा ठरू शकत नाही. कारण अशा प्रयोगासाठी आवश्यक ती दक्षता व खबरदारी घेण्यात आली नव्हती. शास्त्रशुद्ध संशोधनाची पद्धती ही


नव्हे. समितीच्या आगमनापूर्वीच शान्तीदेवीची कथा मथुरेतील सर्वांना माहीत होती, या एका गोष्टीमुळेच ही चौकशी पूर्वग्रहाच्या दोषाने डागाळलेली होती. ही कथा माहीत असल्यामुळेच शान्तीदेवीचे 'नातलग' मोठ्या अभिमानाने व प्रामुख्याने स्टेशनवर उपस्थित झाले होते. शान्तीदेवीने आपले पूर्वजन्मीचे घर हुडकून काढले ही गोष्टही तितकीच व त्याच कारणांनी अविश्वासार्ह वाटते. एकदा तिने आपल्या 'नातलगां'स ओळखल्यानंतर साहजिकच लोकांचा लोंढा तिच्या घराच्या दिशेने वाहू लागला असेल. घरात गेल्यानंतरही तेथील लोकानी मोठ्या आतुरतेने तिला तिच्याबरोबर हिंडून 'हे न्हाणीघर, ही झोपायची खोली आठवते ना तुला?' अशा तऱ्हेचे प्रश्न विचारले नसतील कशावरून? तेथील प्रत्येकजण तेथे 'चमत्कारा'च्या अपेक्षेने आला होता व ही अपेक्षा विफल होऊ नये यासाठी 'मनोमन' प्रयत्न करीत होता. अगोदरच दक्षता घेतली असती, तर समितीला परिस्थितीवर ताबा ठेवून नि:पक्षपातीपणे निरीक्षण करता आले असते. पण आता ते शक्य नव्हते.

## पुराव्यातील विसंगती

आपल्या स्वत:च्या श्रद्धेची चाचणी कोणीही करू शकत नाही. मानसशास्त्रीयदृष्ट्या ते अशक्य आहे. तशी चाचणी करण्याची इच्छा होणे याचाच अर्थ श्रद्धा गमावली असा आहे. जोपर्यंत एखादी गोष्ट सत्य आहे यावर तुमचा विश्वास असतो, तोपर्यंत ती तपासून पाहण्याची आवश्यकता तुम्हाला वाटत नाही. तशी ती वाटली, तर ती केवळ इतरांना तुमच्या श्रद्धेत सहभागी होण्यास प्रवृत्त करण्यासाठीच होय. शान्तीदेवीच्या कथेची चौकशी करण्यामागे हाच हेतू होता असे मानण्यास जागा आहे. ही शास्त्रीय चौकशी नव्हती, तर अगोदरच सत्य मानलेल्या गोष्टीला दुजोरा देऊन ती सिद्ध करण्याचा हा प्रयत्न होता. चौकशीमध्ये संशयाला जागा असते. ही चौकशी समिती पूर्वग्रहव्याप्त होती. सत्य शोधून काढण्याचा तिचा हेतू नव्हता, तर सत्य म्हणून मानलेल्या गोष्टीला दुजोरा देण्याचा होता.

या प्रकरणासंबंधी जी वृत्ते प्रसिद्ध झाली आहेत त्यांतही तपशीलाच्या विसंगती आहेत. समितीने या विसंगती बाजूला सारल्या आहेत. परंतु वार्ताहरांनी मात्र त्या उघड केल्या असून, हे सर्व प्रकरण म्हणजे एका निरक्षर अल्पवयीन मुलीने ज्या गोष्टी सांगितल्या त्यातील सत्य पडताळून पाहण्यापेक्षा घडलेल्या 'चमत्कारा'चा उदो उदो करण्याचा हेतूच याच्या बुडाशी होता हे दाखवून दिले आहे. समितीच्या अहवालाला पुरावा म्हणून शून्य किंमत आहे त्यावरून सदस्यांची कष्टाळू वृत्तीच केवळ व्यक्त होते. ही चौकशी व तिचे निष्कर्ष विज्ञानाला आव्हान देऊ शकत नाहीत, कारण या चौकशीसाठी आवश्यक ते प्राथमिक नियमही पाळण्यात आलेले नाहीत. आता पुन्हा एकदा असेच प्रकरण उपस्थित झाले व त्याचा आगाऊच प्रचार होण्यास बंदी घालता आली, तरच शास्त्रशुद्धरीत्या त्याची छाननी करून निष्कर्ष काढता येतील....अशा गोष्टींची सत्यता प्रथम गृहीत धरून नंतर केलेली चौकशी शास्त्रशुद्ध मानता येणार नाही. या गोष्टीची विश्वासार्हता प्रथम पडताळून पाहिली गेली पाहिजे. नैतिक प्रामाणिकपणाचा हा प्रश्न नसून बौद्धिक क्षमतेचा आणि ज्या मानसिक अवस्थेत हा चमत्कार घडला ती तपासून पाहण्याचा आहे. ही छाननी केल्यानंतरच अशा चमत्काराची सत्यता व त्याला मिळणारा दुजोरा याबद्दलची चौकशी करावी लागेल. हीच खरी वैज्ञानिक प्रयोगाची पद्धती आहे.

कोणी विचारील, 'शान्तीदेवीसारखी लहान मुलगी बनावट गोष्ट रचून कशाला सांगेल?' पण त्याबरोबरच असाही प्रश्न विचारता येईल की, 'मागासलेल्या आणि वेडगळ समजुतीने भारलेल्या वातावरणात वाढलेल्या एका मुलीने सांगितलेल्या गोष्टीवर प्रथमदर्शनी एकदम विश्वास ठेवणे कितपत योग्य ठरेल?' इतर कोणीतरी ही गोष्ट रचून तिच्या तोंडातून कशावरून वदविली नसेल? अभावितपणेही असे घडण्याची शक्यता आहे. शान्तीदेवीची कथा बनावट असली पाहिजे असे माझे म्हणणे नाही; पण अशा अनेक गोष्टी बनावट असतात हे मात्र सत्य आहे आणि म्हणूनच या अनपढ मुलीने सांगितलेल्या गोष्टीची सत्यता प्रथमच पडताळून पाहणे आवश्यक होते.



## कहाणीचा उगम

या कथेचा उगम कसा झाला ? तिच्या आई-बापाच्या किंवा मुलीच्या तोंडून ही कथा आपण प्रथम ऐकली असा ज्या इतरांचा दावा आहे, त्यांचा पुनर्जन्मावर विश्वास होता काय ? बहुधा होताच आणि म्हणून त्या मुलीच्या एखाद्या बालिश व अभावित उद्‌गारावर ही सारी कथा रचली गेली असण्याचाही संभव आहे आणि म्हणून ज्यांच्यामार्फत घराबाहेरील लोकांना ही चमत्कारिक कहाणी समजली त्यांची कसून उलटतपासणी घेतली जाणे आवश्यक होते. तसे झाले असते तर, कदाचित या कथेचा पोकळपणा उघड झाला असता आणि पुढील चौकशीचे सारे सोपस्कार टळले असते. या कथेचा उगम काहीही असो, तिच्याशी संबंधित अशा सर्वांची पुनर्जन्म सिद्धान्तावर श्रद्धा होती आणि म्हणून ही कहाणी लोकांमध्ये पसरली, त्यावेळी तिच्यात बराच मीठमसाला भरला गेला असला पाहिजे. मूळ कथा कशी असेल याची कल्पना करू या.

आपले आईबाप आणि कुटुंबातील मंडळी आपसात गतजन्मासंबंधी बोलताना या मुलीने ऐकले. भाविक हिंदू नेहमीच गतजन्मीच्या कर्मभोगाबद्दल बोलत असतात. गतजन्मीची आठवण अनेकांना कशी होते, याविषयीची काही उदाहरणेही या गप्पात सांगितली गेली असतील. आणि कुणीतरी सहज या छोटया मुलीला, 'पोरी, तू गेल्या जन्मी कोण होतीस ग ?' असे गमतीने विचारले असेल आणि त्यामुळे या मुलीच्या कोवळ्या कल्पनाशक्तीस चेतना मिळाली असेल. या मुलीची वृत्ती कल्पनाविश्वात रंगून जाण्याची होती की नाही, हे मानसशास्त्रीय चाचणी घेऊन सहज शोधून काढता आले असते. परंतु हे प्रथमच करावयास हवे होते. इकडच्या तिकडच्या ऐकलेल्या गोष्टींवर एखाद्या विलक्षण गोष्टीचा डोलारा उभारण्याची प्रवृत्ती बालवयात अनेकांची असते. परीकथा वाचणाऱ्या मुलांना खरोखरच्या पऱ्या भेटतात व या भेटीचे अगदी तपशीलवार आणि विश्वास बसावा असे वर्णन ती करतात. शान्तीदेवीच्या मूळ कथेत तपशील किती होता हे आता सांगणे कठीण आहे. हा तपशील तिची कहाणी लोकांना सांगताना शान्तीदेवीच्या नातेवाइकांनी घुसडून दिला असण्याचीच शक्यता अधिक आहे. मथुरेतील ज्या लोकांना तिने आपले पूर्वजन्मीचे नातलग म्हणून ओळखले, ते शान्तीदेवीच्या कुटुंबियांना सर्वस्वी अपरिचित होते हे प्रथम सिद्ध करण्यास हवे होते. हा महत्वाचा मुद्दा चौकशी समितीने विचारातच घेतला नाही. हे लोक पूर्वपरिचित असतील, तर त्यांची नावे व माहिती घरातील लोकांच्या बोलण्यातून शान्तीदेवीच्या कानावर पडली असतील. मुलाला जन्म देताना मरण पावलेल्या मथुरेतील त्या स्त्रीची हकीकत या मुलीने ऐकली असेल व तीच स्त्री पुन्हा जन्माला आली आहे असे कोणीतरी म्हटले असेल. 'मथुरेची ती बाई तर तू नव्हेस ?' असे कोणीतरी शान्तीदेवीला गमतीने आणि सहजपणे विचारले असेल व या मुलीनेही सहजच 'हो मीच ती !' असे उत्तर दिले असेल आणि मग या तिच्या उत्तरावरून ही तपशीलवार कहाणी रचण्यात आली असेल. हे सारे अगदी प्रामाणिकपणे आणि निर्हेतुकपणे घडले असेल, पण या कथेवर पूर्णपणे विश्वास शान्तीदेवीच्या घरच्या मंडळींचा, त्याचप्रमाणे बाहेरील लोकांचा बसला यात आश्चर्य नाही. आपण आपातत: एक बनावट कथा फैलावत आहो हे त्यांच्या ध्यानीमनीही नसेल, कारण त्यांची या कहाणीवर पूर्णपणे श्रद्धा बसण्याला पोषक अशीच मनोधारणा होती.

## जीवशास्त्रीय संगती

मथुरा येथे बाळत होताना मरण पावलेल्या स्त्रीची हकीकत शान्तीदेवीच्या आईबापांना माहीत होती असे गृहीत धरले, तर या तथाकथित चमत्काराची जीवशास्त्रीय (बॉयॉलॉजिकल) दृष्टीनेही संगती लावता येईल. शान्तीदेवीच्या आईला गर्भधारणा झाली, त्यावेळी मथुरेत नुकत्याच मरण पावलेल्या स्त्रीचे विचार तिच्या मनात घोळत असतील. ती स्त्रीच आपल्या पोटी जन्म घेईल असाही विचार तिच्या मनात रुजला असेल. गर्भारपणी जे विचार व कल्पना आईच्या मनावर पगडा बसवितात त्यांची छाप गर्भावर पडते, हे जीवशास्त्रदृष्टया सिद्ध झालेले आहे. शान्तीदेवीने आपले हे विचार आणि समजूत इतरांजवळही बोलून दाखविली असेल. शान्तीदेवीचा जन्म झाला, त्यावेळी तिच्या मदूत ही कल्पना बद्धमूल झाली असेल. तिच्या अंतर्मनातील हा विचार योग्य वेळ येताच अभावितपणे बाहेर पडला असेल.

परंतु इतर तपशीलाचे काय ? हा प्रश्न शिल्लक राहतोच. मथुरेचा उल्लेख होताच या मुलीने अंतर्मनातील जाणिवेच्या पोटी 'मला मथुरा माहीत आहे. मी तिथेच राहत होते,' असे उद्‌गार काढले असतील. आणि ते ऐकताच मथुरेत मरण पावलेली बाईच आपल्या पोटी आली आहे याबाबत शान्तीदेवीच्या आईची खात्रीच पटली असेल. आणि या बीजाभोवतीच बाकीचा तपशील गोळा झाला असेल. ही मुलगी तर कधीच मथुरेला गेली नव्हती, मग तिने आपण तिथे राहत होतो हे कसे सांगितले ? नक्कीच तिला आपल्या पूर्वजन्माची याद आली असली पाहिजे, असेच तिच्या आईबापांना व घरातील श्रद्धाळू मंडळींना वाटले असण्याची शक्यता आहे.

शान्तीदेवीच्या या अजब कहाणीने एकच खळबळ उडाली. तिच्यात दैवी अंश असल्याचे अनेकांना वाटले. पतियाळाच्या महाराजांनी आणि महात्मा गांधींनीही तिची भेट घेतली. असे असूनदेखील या कथेवरून पुनर्जन्माचा सिद्धान्त खरा ठरतो असे मानण्यामध्ये बऱ्याच अडचणी आहेत.

उदाहरणार्थ, प्रत्येक माणसाला आपल्या पूर्वजन्मातील घटना का आठवत नाहीत ? या प्रश्नाचे जोवर उत्तर देता येत नाही, तोवर काही तुरळक कथांवरून पुनर्जन्म शाबीत होऊ शकणार नाही. कोणत्याही माणसाला मरण चुकत नाही हा निसर्गाचा नियम आहे. पुनर्जन्माबाबत मात्र काही अपवाद वेठीला धरून त्यावरून नियम सिद्ध करण्याचा प्रयत्न वैज्ञानिकदृष्टया विहित नाही. काही माणसे शंभरी ओलांडतात यावरून त्याहून अल्पवयात मेलेली माणसे खरोखरी मृत झालेलीच नाहीत असे मानण्यासारखे हे आहे. प्रत्येकाला आपल्या गतजन्माची आठवण का होत नाही, याचे स्पष्टीकरण देण्याची जबाबदारी पुनर्जन्म शास्त्रीय दृष्टीने सिद्ध होतो असा दावा करणाऱ्यांवर आहे.

भूत आणि भविष्याचा वेध घेण्यास दिव्य


दृष्टीची आवश्यकता असते असे आपल्या धर्मग्रंथात म्हटले आहे. ज्यांची आध्यात्मिक पातळी उचावली आहे त्यांनाच ही दृष्टी लाभते असे सागण्यात येते. शान्तीदेवीची म्हणूनच संतपदावर स्थापना झाली आहे. आधुनिक संस्कृतीने होत असलेल्या आध्यात्मिक अधःपाताचा या युगात साधारणतः अडाणी आणि दुर्बल लोकांतच या दिव्य दृष्टीचा आढळ होत असल्याचे दिसते ! पुनर्जन्माचा पुरस्कार करणाऱ्या सुशिक्षित लोकांपैकी कोणालाही या शक्तीचा लाभ होत नाही. भारतीय आध्यात्मिकतेचा प्रचार करणाऱ्या आमच्या आधुनिक स्वामी–संतांनादेखील ही 'दिव्य दृष्टी' लाभत नाही. आणि म्हणून अज्ञान आणि तज्जन्य भ्रामक समजुती हाच या दिव्यशक्तीचा अपरिहार्य असा पाया आहे असे म्हणावे लागते. अडाणी लोक हे शरीराच्या आणि संसाराच्या मायामोहात गुरफटलेले आणि बुडालेले असतात, त्यामुळे त्याना भूतकाळाचा वेध घेणारी आध्यात्मिक दिव्य दृष्टी लाभू शकत नाही, असेही सागण्यात येते. या दोन परस्परविरोधी गोष्टींची सांगड कशी घालायची ?

आत्म्याच्या अमरत्वाच्या कल्पनेवर आधारलेली एक श्रद्धा म्हणजेच पुनर्जन्म-सिद्धान्त असेच म्हटले पाहिजे. तो वैज्ञानिक पद्धतीने सिद्ध होऊ शकत नाही. अध्यात्मवाद्यांनी विज्ञानवाद्याशी याबाबत मुकाबला करण्याचे धाष्टर्य करू नये हेच बरे.

पुनर्जन्मवादी ज्यांची उत्तरे देऊ शकत नाहीत असे आणखीही काही प्रश्न आहेत. मृत्यू आणि पुनर्जन्म याच्यामधील अवधीत काय घडते ? नव्या शरीरात आत्मा किंवा 'सूक्ष्म शरीर' प्रवेश कसा करते ? गर्भाला कोणत्या अवस्थेत आत्म्याचा लाभ होतो ? नव्या शरीराची निवड आत्मा कशी करतो ? श्रद्धेने ज्याना अधत्व आलेले नाही त्यांना हे प्रश्न सहजच विचारावेसे वाटतील. या प्रश्नांची पारपरिक उत्तरे विज्ञानापुढे टिकू शकत नाहीत. परंतु या प्रश्नांची समाधानकारक उत्तरे मिळाल्याखेरीज पुनर्जन्मवाद शाबीत होऊ शकत नाही. विज्ञान कोणतीही गोष्ट न तपासता गृहीतकृत्य म्हणून स्वीकारू शकत नाही. अध्यात्मवाद्याची दृष्टी वैज्ञानिक नसते. उलट विज्ञानालाच ते मूर्खपणा मानतात. अशरीरी आत्मा ही आधिदैविक (सुपरनॅचरल) कल्पना आहे. निसर्गनियमांच्या पलीकडची ती आहे. तर्कदृष्ट्या किंवा पुरावे देऊन शाबीत करण्याची ती गोष्टच नाही. गृहीतकृत्य, निरीक्षण आणि वस्तुनिष्ठ पुरावा याच्या कसोटीस उतरले नाही, तर विज्ञान त्याला बाजूला सारते. या भूमिकेवरून अध्यात्मवाद विज्ञानाला आव्हान देऊ शकत नाही. बचावासाठी प्रथम हल्ला चढविणे हे धोरण प्रत्येक वेळी यशस्वी ठरतेच असे नाही. पुष्कळदा ते मूर्खपणाचे आणि विनाश ओढवून घेणारे ठरते. विज्ञानावर प्रहार करताना अध्यात्माची अशीच स्थिती झाली आहे. विज्ञान आणि बुद्धिवाद मात्र प्रतिस्पर्ध्याच्या क्षेत्रात घुसून यशस्वी मुकाबला करू शकतात.

### स्त्री-पुरुष भेद कशासाठी ?

पुनर्जन्मवादात 'सूक्ष्म शरीरा'ची कल्पना अनुस्यूत आहे. आत्मा अशरीरी आहे या कल्पनेला ही कल्पना छेद देते. सूक्ष्म शरीर हे वास्तव असेल, तर त्याचा नव्या शरीरात प्रवेश होण्यासाठी संभोगाची व गर्भधारणेची आवश्यकता काय आहे ? ईश्वराने तरी स्त्री व पुरुष असा भेद कशासाठी केला आहे ? सूक्ष्मशरीराच्या प्रवेशासाठी पुरुषाची गरज काय आहे ? ईश्वराने पुरुष जात निर्माणच केली नसती, तर स्त्रीला एकाकी जिणे जगावे लागले असते व संभोगसुखावाचून गर्भधारणा करून घेणे तिच्या नशिबी आले असते. 'कुमारी माता' असा शिक्का स्वतःवर मारून घेणे किती स्त्रियांना आवडेल याबद्दल मला शंका आहे. परंतु ईश्वरप्रणीत निसर्ग हा सुदैवाने इतका निर्दय आणि राक्षसी नाही. गर्भसंभव ही शारीरिक व जड अशी प्रक्रिया आहे. सूक्ष्मशरीर प्रवेशाला तिच्यात स्थान नाही. गर्भसंभव झाल्यापासून त्याचा टप्प्याटप्प्याने कसा विकास होतो हे विज्ञानाला अवगत झालेले आहे. आईच्या पोटातून बाहेर



येईपर्यंत नव्या जीवाचा बाह्य जगाशी संबंध येत नाही. स्त्रीबीज वीर्यजंतूनेच फलित होते व नवा जीव तयार होतो. यात आत्म्याचा संबंध कोठे आला ? तो अशरीरी असेल, तर पुनर्जन्मवाद टिकू शकत नाही. कारण त्यासाठी सूक्ष्म का होईना पण शरीराची आवश्यकता असते. प्रत्येक जिवंत शरीरात आत्मा असतो असे मानले, तर प्रत्येक गर्भधारणेत दोन आत्मे गुंतलेले असतात. एक या जन्मीचा व दुसरा पूर्वजन्मीचा. मग दुसऱ्या आत्म्याचे काय होते ? दोघांपैकी कोणता आत्मा हे नवे शरीर बळकावतो ? या दोन आत्म्यातील संघर्षाचा निरास कसा होतो ? या प्रश्नांची उत्तरे मिळाल्याखेरीज पुनर्जन्मवाद सिद्ध होऊ शकत नाही.

## आत्म्याचे तुकडे

दोन वेगवेगळ्या शरीरांच्या संबंधातून नवा जीव निर्माण होतो. आईबापांचे कित्येक गुणधर्म या नव्या शरीरात उतरतात हे सिद्ध झालेले आहे. मानसिक, भावनिक व शारीरिक असे हे गुणधर्म असतात. परंतु पूर्वजन्मीची आठवण या गुणधर्मात मोडत नाही. स्त्रीचे बीजांड आणि पुरुषाचा वीर्यजंतू यांना स्मृती नसते. आणि म्हणून या दोघांच्या संभोगातून निर्माण झालेल्या जीवाच्या ठायी ही शक्ती स्थापित होण्याची मुळीच शक्यता नाही. बालकाचे जीवन आईबापांच्या शरीरांच्या मीलनातून निर्माण होते. नवे शरीर शोधीत असलेल्या आत्म्याला या नव्या शरीरात प्रवेश करण्यास मुळी वावच नसतो. प्रवेश करणेच असेल, तर त्याने प्रथम आईबापांच्या शरीरात ठाण मांडले पाहिजे. तसे करण्यासाठी देखील या आत्म्याला स्वतःचे दोन तुकडे करून घ्यावे लागतील. एक तुकडा बापाच्या व दुसरा आईच्या शरीरासाठी. आणि हे दोन भागही गर्भसंभवाच्या वेळी पुन्हा एकजीव होतील याची हमी काय ?

पुरुष वयात आला म्हणजे त्याच्या शरीरात कोटयवधी वीर्यजंतू निर्माण होतात व त्यांच्यापैकी काही थोडयांनाच बीजांड फलित करून नवा जीव निर्माण करण्याची संधी मिळते. आणि म्हणूनच दबा धरून बसलेले आत्म्याचे दोन तुकडे पुन्हा एकत्रित होण्याचा संभव अगदीच कमी. असंख्य वीर्यजंतूंपैकी बहुतेक संभोगाच्या व गर्भसंभवाच्या वेळी गारद होतात. त्यात संधीची वाट पाहत बसलेला आत्म्याचा भाग निकालात निघण्याचाच संभव अधिक.

आणखी एक अडचणीचा प्रश्न आहे. ज्या वीर्यजंतूंमुळे शान्तीदेवीचा जन्म झाला, ते गर्भसंभवापूर्वी बराच काळ तिच्या बापाच्या शरीरात असले पाहिजेत. याचाच अर्थ, मरण पावलेल्या मथुरेतील स्त्रीचा आत्मा अगोदर पासूनच शान्तीदेवीच्या निर्मितीची वाट पाहत बसला होता, असा घ्यावा लागेल. फार पूर्वी जर ही स्त्री मरण पावलेली असती, तरच तिचा आत्मा शान्तीदेवीत प्रविष्ट झाला असण्याचा संभव गृहीत धरता आला असता. ती स्त्री मरण पावताच तिचा आत्मा तातडीने गर्भावस्थेतील शान्तीदेवीच्या शरीरात प्रविष्ट झाला असे मानले तर, त्यापूर्वी शान्तीदेवीला स्वतःचा असा आत्माच नव्हता असे मानावे लागेल. अध्यात्मवादी तरी तसे मानू शकणार नाहीत.

विज्ञानाच्या दृष्टीने जीवन हीच एक रासायनिक प्रक्रिया आहे. तीमध्ये आत्म्याला स्थान नाही. आत्म्याची संकल्पनाच अंधश्रद्धेवर आधारित आहे. आत्मा नव्या शरीरात प्रवेश कसा करतो हा व इतर अनेक प्रश्नांची उत्तरे देता न आल्यामुळे अध्यात्मवाद्यांना आत्मा व पुनर्जन्म यांचे सिद्धान्त प्रस्थापित करण व शास्त्रशुद्धतेचा दावा करणे अशक्यप्राय आहे. निसर्गनियमांचे आकलन न झाल्यामुळेच अध्यात्माची निर्मिती झाली. विज्ञानाने त्याची मृत्युघंटाच वाजविली. आता केवळ अंधश्रद्धा आणि पूर्वग्रह या स्वरूपातच ते तग धरून राहिले आहे.

## भूतकालाची भूते

भारतातील बहुतेक जनता अद्यापही विज्ञानपूर्व युगातच जगत आहे. आणि म्हणूनच चमत्कारांवर आणि अध्यात्मावर तिचा हवाला आहे. आधुनिक मूठभर सुशिक्षितांवरही सार्वत्रिक अडाणीपणाचे दडपण एवढे आहे, की, विज्ञानाची जळती मशाल घेऊन धडाडीने पुढे जाण्याऐवजी ते पारंपरिक समजुती व श्रद्धा यांचाच पुरस्कार करीत आहेत. भारताला जगावयाचे असेल, तर त्याने विज्ञानाला आव्हान देण्याचा विफल मार्ग व प्रयत्न सोडला पाहिजे. पुनर्जन्मवादामुळे दैववाद बळावतो. दैववाद उपक्रमशीलता खच्ची करतो. आध्यात्मिक संस्कृती लोकांना निष्क्रिय बनवते. बंडखोरीची वृत्ती त्यांना अज्ञातच आहे. परंतु त्यांनी बंडाचा उठाव केलाच पाहिजे. नाहीतर आपल्या आध्यात्मिक संस्कृतीचा संदेश देऊन जग वाचविण्याच्या प्रयत्नात स्वतःच लुप्त होऊन जाण्याचा भारतावर प्रसंग येईल. भविष्यावर मात करावयाची असेल, तर भूतकालाची कास सोडली पाहिजे. माणूसच स्वतःची नियती घडवितो ही गोष्ट भारतीय लोकांना पटली पाहिजे. कर्म, दैव, पुनर्जन्म, अनासक्ती, आत्म्याचे अमरत्व इत्यादी गोष्टी या मृत झालेल्या भूतकालाची पिशाच्चे आहेत. हा भूतकाळ पूर्णपणे गाडून टाकला, तरच भारताचा भविष्यकाळ सध्यापेक्षा अधिक उज्ज्वल होईल. ●

*अनुवादक : मा. पं. शिखरे*


**पुरंदऱ्यांचा सरकारवाडा**

लेखक
ब. मो. पुरंदरे

मूल्य : सात रुपये
राजहंस प्रकाशन, पुणे ३०

# मंथरे, तुला लागले पिसे

पृष्ठ ७ वरून

नाना-नाना स्वप्ने रघुनाथरावांच्या डोक्यात पिंगा घालू लागली. पण काही निमिषापूर्वी त्यांनी भास्करवर तोंड टाकले होते. आता इतक्या लगबगीने त्याच्यासंबंधी कौतुकाचे बोलणे त्यांच्या जिवावर आले. अशा वेळी माणसाला पहिलं सांगणंच खरं आहे, असं ठासून सांगणं सोयीचं असतं. भास्करविषयी ओठावर आलेले कौतुकाचे शब्द त्यांनी निग्रहाने पोटात ढकलले. अंक माजघरात घडवंचीवर सारून रघुनाथराव पूजेसाठी स्वयंपाकघरात आले. स्वयंपाकघराच्या दुसऱ्या टोकाला पूजाघर होते. कोपऱ्यात भिंतीवर देवदेवतांच्या चित्रांची गर्दीच गर्दी होती. लाकडी चौरंगाचा शिसवी देव्हारा होता. आत चांदीच्या ताम्हनात चांदीचे आणि पितळेचे देव दाटीदाटीने बसलेले होते.

नवरा पूजेला आला म्हणून समईतील वात सारण्याकरता जानकीबाई तेलाची बुडकुली घेऊन आल्या. समईत तेलाची धार सोडताना सहज बोलल्यासारख्या म्हणाल्या—

'सयाजी विजयातलं वाचलंत असेल ना सगळं ?'

निर्माल्य काढताना रघुनाथरावांनी नुसतेच घुम्यासारखे 'हूँऽऽऽ' केले. त्याचा अर्थ लागत होता—'काही अर्थ नाही त्यात.' वर्षानुवर्षे संसार केल्यावर नवऱ्याच्या नुसत्या 'उं' आणि 'हूं' मधूनदेखील बायकांना सगळं सविस्तर कळतं. जानकीबाईंना वाटलं, उगाच विचारलं आपण. भास्करविषयी काही चांगलं बोलण्याचीच चोरी झाली घरात.

एकीकडे पूजा चालू होती. देव ताम्हनात उतरले. दुधा-गंधाचे आणि उष्णोदकाचे स्नान करून देव पुन्हा स्थानापन्न झाले, पण रघुनाथरावांचे पूजेवर लक्ष नव्हते. मौलाबक्षांच्या शिष्यांत आता भास्करची वर्णी लागणार, हे तर्काने त्यांनी ओळखले होते. मौलाबक्षांचा उग्र चेहरा त्यांच्यापुढे सारखा येत होता. थोराड भव्य व स्थूल अंगाचा हा मुसलमान गवई—रंगीबेरंगी पोषाख करून; बिल्ले लटकवून आणि टोकदार रंगीत फेटा बांधून, रस्त्यानं जाताना त्यांनी बडोद्याला असताना पाहिलेला होता. त्याचे ते दाट कल्ले, झुपकेदार मिशा पाहणाऱ्याच्या मनात दरारा निर्माण करीत. परंतु हा माणूस फार चढेल आहे, दुसऱ्याला विद्या देण्यात कंजुष आहे, दुसऱ्याचे चांगले त्याला पाहवत नाही, असे असंख्य प्रवाह होते. मुख्य म्हणजे या खाँसाहेब मंडळीकडे शिकणाऱ्या ब्राह्मण मुलांना, त्याची थुंकीदेखील ओंजळीत घेणारी किळसवाणी सेवा करावी लागते. पिकदाणी धुणे, त्यांचे कपडे धुणे, त्यांच्यासाठी अभक्ष्य बाजारातून आणणे, अशी घाणेरडी कामे करावी लागतात, असे सर्वत्र बोलले जात असे. शिवाय या खाँसाहेबांकडे जाणे येणे असते, ते दरबारातील बड्या लोकांच्या रखेल्यांचे, ही गोष्ट अगदी जगजाहीर होती. या वातावरणात भास्कर जाणार आहे, या कल्पनेने रघुनाथराव स्वास्थ्यच हरवून बसले होते. देवांना दोन-दोनदा गंध लावीत होते, आरतीचे चरण चुकले होते.

काही वेळापूर्वी भास्करच्या गाण्याचे कौतुक वाचून रघुनाथरावांच्या मनात प्रथम जे आशेचे कोंब लवलवले, ते नव्या निखाऱ्यात, पार जळून गेले. पूजा संपवून ते ताम्हनातले तीर्थ परसात तुळशीवृंदावनात टाकण्यासाठी जेव्हा उठले, तेव्हा त्यांचा चेहरा पहिल्यासारखाच कमालीचा व्यथित झाला होता. गरिबी ब्राह्मणांच्या मुलांचे असे धिंडवडे करते, असे मनोमन नक्की झाल्याने, झाल्या गोष्टीला आपणही जबाबदार आहोत, या विचाराने त्यांच्या व्यथित अवस्थेत आत्मदोषाचाही भाग मिसळू लागला होता.

परत आत येताना जानकीबाईंना ऐकू जाईल, एवढ्या मोठ्याने रघुनाथराव एवढेच म्हणाले,

'आता यातून काही आणखी वेडेविद्रे घडले नाही म्हणजे मिळवली.' ◻

काही दिवस लोटले. एके दिवशी सकाळी बडोद्याहून अप्पाराव कोल्हटकरांचे पत्र आले, तेव्हा जानकीबाईंना रघुनाथरावांचे शब्द आठवले. नवऱ्याची बत्तिशी खरी ठरली होती. अगदी वेडेविद्रे घडू लागले होते. अप्पाराव कोल्हटकरांचे नावही जानकीबाईंच्या कानांवर आले नव्हते. त्र्यंबकच्या आणि नवऱ्याच्या बोलण्यावरून त्यांना कळले की, ते बडोद्याचे कुणी गवई आहेत. तबला चांगला वाजवतात. त्यांचा भाऊ 'किर्लोस्कर कंपनी'त नाटकांतून बायकांची सोंगे काढतो. अप्पारावांनी लिहिले होते,

'सयाजी विजयचा अंक किर्लोस्कर कंपनीत जातो. काही दिवसांपूर्वी त्यात आपल्या द्वितीय चिरंजीवांच्या गाण्याचे वर्तमान सविस्तर आले होते. ते पनवेल मुक्कामी गुरुवर्य अण्णासाहेबांच्या वाचनात आले. त्यांचा निरोप घेऊन चि. भावड्या माझ्याकडे आला व मुलगा योग्य वाटल्यास किर्लोस्कर नाटक कंपनीत चि. भास्कर यास घेऊन यावे, असा गुरुवर्य अण्णासाहेबांचा निरोप त्यांनी दिला. कंपनीला सध्या गायक-नटाची जरूरी आहे. चि. भावड्या वगळता, गाणारे स्त्री-पात्र कंपनीजवळ नाही. कंपनीची मोठीच अडचण होते. शंकरराव मुजुमदार स्त्री-पार्टी आहेत. पण त्यांना गाता येत नाही. तेव्हा चि. भास्कर कंपनीत गेल्यास कंपनीची अडचण दूर होईल व आपल्या चिरंजीवांच्या गुणांचेही चीज होईल, असे वाटते. मुलाचे रंग-रूप स्त्री-पार्टीस अनुकूल आहे,' असे चि. भावड्या म्हणतो. आपले मेहुणे श्री. दक्षिणदासशास्त्री, तसेच श्री. तेलंगशास्त्री व श्री. पिंगळेबुवा या सर्वांच्या मते, चि. भास्कर याने अण्णासाहेबांच्या कंपनीत जावे, असे आहे. चि. भास्करची तर तयारी आहेच. परंतु आपण त्याचे जन्मदाते पिता म्हणून आपली परवानगी मागण्यासाठी हे पत्र लिहिले आहे. अवधी कमी आहे. आपले टपाल लगेच यावे. येत्या आदितवारीच पनवेलीस निघायला हवे आहे. आपण पत्र परस्पर पनवेलीस पाठवले तरी चालेल. पनवेलीस सावकार गुळवे यांच्या वाड्यात कंपनीचा मुक्काम आहे. सावकार गुळवे, पनवेल, एवढ्या पत्त्यावरही टपाल व्यवस्थेशीर पोचेल.'

अप्पाराव कोल्हटकरांच्या पत्राने रघुनाथराव अगदी हतबुद्ध झाले. क्षणभर त्यांना हे काय झाले हेच कळेना. मुलगा तलाठी होत नाही म्हणून आतापर्यंत ते रुष्ट होते, परंतु गवई झाला अथवा कीर्तनकार झाला तरी, धर्मबाह्य असे काही तो करणार नाही, असा विश्वास त्यांच्या मनात धुगधुगत होताच.


मुद्दाम हौसेने बांधलेल्या व्हरांड्याची
फिरून बंदिस्त जाळीदार सोय
हात आत जाऊ नये इतपत शंकरपाळी डिझाइन
गच्चीच्या कठड्यावर
उगाच अधिक रेललेली सायंकाळ
कुत्र्याच्या भरोशावर अर्धवट उघडे
रिटायर्ड फाटक
चकचकीत वस्तीतल्या टापटिपी गॅरेजचं सरकतं दार,
बोगनवेलीनं झाकलेल्या खिडकीच्या गच्च सळ्या
कारखान्याच्या छपरात हरवलेल्या तुळ्या,
लोखंडाचं जग,
तसं अनिवार्य,
थंड नि अवजड,
पण रंगवल्यानं जरा सलगी साधणारं, असं
आणि त्यासाठी फक्त
नेरोलॅक
NEROLAC
ACRYLIC EMULSION
NEROLAC
SYNTHETIC
NEW SOLDIER
Washable Oil Bound Distemper

पण आता अगदी हद्द झाली होती. अप्पारावांचे धाष्टर्च तरी किती! आपल्या पत्राचीदेखील वाट पाहायची त्यांना गरज वाटली नाही. म्हणे, 'पत्र परस्पर पनवेलीस पाठविले तरी चालेल!' मुलगा एकदा पनवेलीस गेला की, परत येणे जवळजवळ अशक्य आहे, ही गोष्ट काय या अप्पारावांना कळत का नव्हती? आज गुरुवार. पत्र टपालात पडून ते बडोद्याला पोचण्यापूर्वीच बहुधा भास्कर भाऊरावांबरोबर पनवेलीकडे निघालेला असणार. स्त्रियांचे सोंग काढायला या भाऊरावांना नेमका भास्करच बरा दिसला. मुलगा नाटकात गेला, ही गोष्ट उद्या सर्वत्र झाली तर, आपली अब्रू ती काय राहिली. डोईवर केसांचा संजाब ठेवून, लुगडं नेसून, आता हा कार्टा नाटक्यांच्याबरोबर गावोगाव फिरणार!

एक त्र्यंबक सोडला, तर रघुनाथराव आणि जानकीबाई आता एका पक्षाची झाली होती. नाटकी मंडळींचे दारू पिणे, त्यांची व्यसने आणि त्यापायी कुटुंबाची झालेली वाताहत, याची खरी-खोटी वर्णने जानकीबाईंच्याही कानावर गेलेली होती. आपला सोन्यासारखा भास्कर या अरिष्टात आता गुरफटणार, या कल्पनेने त्या हवालदिल झाल्या. त्यांनी अगदी तळमळून नवऱ्याला म्हटले,

'अगदी आजच्या आज तुम्ही भास्करला पत्र घाला. म्हणावं, तू परत आला नाहीस, तर मी काही जिवंत राहायची नाही! एक पत्र बडोद्याला घाला आणि एक पनवेलीला घाला. किर्लुस्करांना लिहा की, म्हणावं, आमचा मुलगा आम्हाला नाटकात पाठवायचा नाही.'

त्र्यंबकने आईला समजावण्याचा प्रयत्न केला. त्याचे म्हणणे एवढेच होते—'गणू जोशासारखा भास्कर काही पळून गेलेला नाही. शिवाय किर्लोस्कर कंपनी निराळी आणि इतर कंपन्या निराळ्या. किर्लोस्कर कंपनीच्या खेळांना टिळक, आगरकर, डॉ. गद्रे यांच्यासारखी माणसे येऊन बसतात. कंपनी निघाली तेव्हादेखील या सर्वांनी हँडबिलावर सह्या केल्या होत्या. तेव्हा वाटल्यास आपण त्याला परत आणू, पण अगदी काही फार विपरीत झालेले नाही.

पण त्र्यंबकच्या या सांगण्याचा सूर शेवटी हाच असे की, भास्कर नाटकात गेलाच नसता, तर ते केव्हाही बरेच झाले असते.

रघुनाथरावांनी लगबगीने बडोद्याला पत्र रवाना केले. पण अपेक्षेप्रमाणे ते पोचण्यापूर्वीच भास्कर भाऊरावांबरोबर निघून गेलेला होता. नाही म्हणायला रघुनाथरावांचे मेहुणे दक्षिणदासशास्त्री यांनी कळविले,

'आपली भेट न घेता चि. भास्कर यास जावे लागले, ही गोष्ट त्याच्या मनास फार लागली आहे. विसनगरला जाऊन प्रथम तुम्हास व सौ. जानकीमातोश्रींना प्रत्यक्ष भेटून, सर्व कानावर घालावे, असे त्याच्या मनात फार होते. परंतु तेवढा अवधी नव्हता. 'रामराज्य-वियोग' हे नवे नाटक किर्लोस्कर कंपनी बसवीत आहे. तालमींना जेमतेम तीन आठवडे मिळणार आहेत. म्हणून तातडीने निघणे भाग होते. सर्वांचा आग्रह पडला की, त्याने तडक निघावे. म्हणून शेवटी नाइलाजाने मीदेखील संमती दिली. चि. भास्करने जाताना त्याला बक्षीस मिळालेले सोन्याचे कडे व विष्णुबुवांकडून गाण्याच्या बिदागीचे वेळोवेळी मिळालेले असे सात रुपये, आपल्याकडे देण्यासाठी बजावून माझ्याजवळ ठेवले आहेत. हा सर्व ऐवज कोणी येणारा-जाणारा खात्रीशीर, विश्वासाचा माणूस भेटला तर तिकडे पाठवीन. बाकी सर्व क्षेम.'

हे पत्र आल्यावर रघुनाथराव व जानकीबाई दोघे थोडी शांत झाली. आपण भास्करविषयी जे काही तर्कवितर्क करीत आहोत, ते खोटेही ठरू शकतील, अशी सुशंका त्यांच्या मनात येऊ लागली. भास्करचे नम्र वागणे मोठ्यांविषयी त्याच्या मनातला आदर, या सर्व गोष्टी शाबूत असताना कदाचित नाटक कंपनीतदेखील तो निर्व्यसनी राहू शकेल, अशी आशा करायला जागा होतीच.

आषाढाचा महिना असल्याने पावसाची सतत झोड चालू होती. कधी नव्हे तो विसनगरला पाऊस कोसळत होता. नद्यांना पूर आले होते. गाड्यांची वाहतूक सारखी विस्कळीत होत होती. यामुळे पनवेलीस जाऊन भास्करला परत आणण्याचा रघुनाथरावांचा विचार सारखा मागे पडत होता. रघुनाथरावांनी या वयात एवढा लांबचा प्रवास करू नये, असेच त्र्यंबकचेही मत होते. तो पैसे खर्चायला तयार होता, पण जरा पावसाचा जोर ओसरला की, पुण्या-मुंबईला नाटकाचा प्रयोग लागेल, तेव्हा तिथेच वडिलांनी जावे; असे त्याने सुचवले.

मिळवता मुलगा सांगतो तसेच हजार हिश्श्याने वागणे रघुनाथरावांना भागच होते. वाटखर्च त्र्यंबक करणार होता, तेव्हा तातडीने काही जाऊ नये, हा त्याचा सल्ला रघुनाथरावांनी ऐकला. वातावरण आणखी शांत व्हायला चि. भास्करचे पत्रही कारण झाले.

पनवेलीस पोचल्यावर आठ दिवसांनी चि. भास्करचे खुशालीचे सविस्तर पत्र आले. त्याने लिहिले होते—

'चार घरी मधुकरी मागून मिळेल ते जेवण करण्याचा माझ्यासारख्या मुलाला, किर्लोस्कर कंपनी म्हणजे अगदी चंगळीचे स्थान वाटल्यास नवल नाही. इथे जेवणास चांदीची ताटे व दोन दिवसांपूर्वीच्या सणास बासुंदीची मेजवानी होती. कंपनीतल्या खास नटांप्रमाणे तीर्थरूप भाऊराव व गुरुवर्य अण्णासाहेब मला वागवतात. याचा पुरावा म्हणजे खास नटांप्रमाणे मला आल्या दिवसापासून दूध पिण्यास मिळते. कोठीत बदाम, पिस्ते, बेदाणा, जर्दाळू, काजू वगैरे मेवा भरपूर असतो. केव्हाही तोंडात टाकावा. मला अजून कोणते सोंग द्यावयाचे ते ठरलेले नाही. पण मला तालीम देण्यासाठी हरिपुराहून गुरुवर्य गोविंदराव देवल येणार आहेत, असे कंपनीत ऐकले. नाटक कंपनीत मी इतरांशी फारसा मिसळत नाही. माझे गायन-



गुरुजी गुरुवर्य बाळकोबा नाटेकर म्हणून आहेत. ते बीन, सतार काय नामी वाजवतात. मी नेहमी त्यांच्याबरोबरच राहणार आहे. गुरुवर्य बाळकोबा मला सौभद्रातील नारदाची पदे शिकवू लागले आहेत. पनवेलीहून आमचा पुढचा मुक्काम ग्वाल्हेरीस होणार आहे. तिथले विख्यात सतारीचे कुणी अमीरखाँ म्हणून आहेत. ते गुरुवर्य बाळकोबांचे गुरू आहेत. त्यांच्याकडे काही शिकायला मिळाले तर बरेच होईल. मी सगळे माझेच लिहीत बसलो. तुम्ही म्हणाल, मला तुमची कुणाची आठवण येत नाही. पण तसे नाही. ती. सौ. आईचे चरणी शि. सा. न. माझे सोन्याचे कडे ती. सौ. आतेकडून आपल्याकडे पोचेल. अडीअडचणीला ते मोडून टाकायला हरकत नाही. त्यात मला अधिक आनंद होईल. माझे पत्र येण्याला विलंब झाला तरी काळजी करू नये. साठे मॅनेजरांनी मला हे मुद्दाम लिहिण्यास सांगितले आहे.'

भास्करच्या या पत्राने रघुनाथरावांचे मन आणखी थोडे निवले. या नव्या मार्गाने का होईना, भास्करचा उत्कर्ष होत असेल, तर होऊ द्या, असे त्यांच्या मनात येऊ लागले. मुलाच्या अंगावर उंची कपडे पडले आहेत, तोंडात चांगलेचुंगले रोज पडते आहे, थोरा-मोठ्यांच्या संगतीत तो मानाने जगतो आहे, हे लक्षात येऊन रघुनाथरावांची बडबड हळू-हळू कमी होत गेली. आता अधेमधे विषय काढीत तो जानकीबाईच. पूर्वी नवरा बडबडू लागला की, भास्करसंबंधी काहीतरी बोलणे तरी होई. ते बंद होऊ लागले तशी जानकी-बाईच अधिक अस्वस्थ होऊ लागल्या. त्याच मग जेवताना, रात्री जमिनीला पाठ लावण्या-पूर्वी स्वतःशीच बोलल्यासारख्या मोठ्याने म्हणत–

'भास्कर एकदा येऊन गेला असता म्हणजे ठीक झाले असते.'

यावर रघुनाथरावच समजावण्यासाठी म्हणत–

'मध्येच कसा येईल तो! कंपनीची नाटके सारखी चालूच असतात. शिवाय त्याचं गाणं शिकणं काही थांबलेलं थोडंच असणार आहे.'

नवऱ्याने धारण केलेल्या या समजूतदार-पणाचा अचंबाच जानकीबाईंना उलगडत नव्हता. म्हातारपणी कशावरही चटकन विश्वास बसतो हेच खरे. जवळजवळ महिना–दीड महिना भास्करचे दुसरे पत्र येईल या अपेक्षेने गेला. कंपनी ग्वाल्हेरीस गेली की नाही? की तेथून आणखी कोठे गेली? काहीच कळले नव्हते.

आणि एकाएकी रघुनाथरावांच्या बाह्यतः शांत वृत्तीचा स्फोट झाला! या स्फोटाने जानकीबाई चक्रावून गेल्या. नवऱ्याला कसले-तरी कुणाचे पत्र आले आणि ते वाचून रघुनाथराव पुन्हा भास्करच्या संबंधात बिथरले, एवढेच जानकीबाईंच्या लक्षात आले. कुणाचे तरी पत्र आले ते रघुनाथ-रावांच्या नावावर. ते पत्र त्यांनी वाचले आणि लगेच त्याचे फाडून तुकडे केले, ही गोष्ट त्र्यंबकने पाहिली होती.

त्या पत्रातला मजकूर रघुनाथरावांनी कुणाला सांगितला नाही. तो मुळी सांगण्या-सारखाच नव्हता. पुण्याच्या कुणी रावसाहेब जोशी यांनी रघुनारावांना त्यांचा एक हित-चिंतक म्हणून लिहिले होते–


**Put your hard earned savings to profitable use.**

For sound investment advice regarding shares and Fixed Deposits with Companies etc.

*Contact :*

**J. M. FINANCIAL & INVESTMENT CONSULTANCY SERVICES PRIVATE LIMITED**

*Registered Office :*
112, Jolly Maker Chambers No. 2
11 th Floor
225 Backbay Reclamation
Nariman Point
BOMBAY 400 021
Tel. No. 314151

*Administrative Office :*
5-A Hamam Street
Stock Exchange Building
Ground Floor
Office No. 21, Fort,
BOMBAY 400 023
Tel. No. 270522

*Poona Office :*
F-11 Shanti Nagar
1 st floor
4 Sadhu Vaswani Peth
POONA 411 001
Tel. No. 25965

'आपले चिरंजीव नाटक कंपनीत पळून गेले आहेत, असे कानावर आले. मनस्वी दुःख जहाले. अखेर मन न राहवून हे पत्र लिहीत आहे. तुमच्या कुटुंबाचा परिचय नसताना असे पत्र लिहावे की नाही, यावर मनाशी अनेक दिवस खल केला. जेव्हा 'पत्र लिही' असा मनाचा कौल आला, तेव्हाच लेखणी उचलली. आणखी एक ब्राम्हण मुलगा नाटक्यांच्या टोळीत वाममार्गाला लागू नये, अशी आमची इच्छा आहे. स्त्री-पार्टी पोरांच्या शोकाने अनेकांनी आपल्या संपत्तीचे वाटोळे केले, हा आरोप वृथा आहे, असे मुळीच नाही. स्त्री-पार्टी पोरांच्या पुठ्ठ्याचा नाद कोणत्या नाटकमंडळीत नाही? ज्याला सत्याची चाड असेल, त्या नाटकवाल्याने मी 'दोषमुक्त' आहे असे सांगायला छातीला हात लावून पुढे यावे, असे आमचे आव्हान आहे. सर्कसवाल्यांना कसरत करणाऱ्या पोरांचे पुठ्ठे सुटत नाहीत, तर स्त्रियांची सोंगे करणाऱ्या पोरांचे पुठ्ठे नाटकी लोकांना नाहीत, असे प्रत्यक्ष शुक्राचार्य सांगू शकणार नाही! मालकमंडळीपैकी कोणाच्या तरी पुठ्ठ्यात शिरल्याखेरीज, ज्या धंद्यात बरकत नाही, अशा धंद्यात आपण मुलाला राहू देणे इष्ट नाही. आपण त्वरित मुलास कंपनीतून परत आणावे. आम्ही हे सर्व हितचिंतक भूमिकेतून लिहिले आहे. कारण आम्हास देणे ना घेणे. याउपर आपल्या मर्जीस येईल ते करावे–

रावसाहेब जोशी'.

पत्र कुणाचे होते? भास्करसंबंधी काही वेडेवाकडे कळले का? या कोणत्याच प्रश्नाला रघुनाथरावांनी उत्तर दिले नाही. त्यांनी एकच घोषा लावला–

'आत्ताच्या आता मुंबईला जातो आणि भास्करला घेऊन येतो!'

त्र्यंबकने सांगून पाहिले...'तुम्ही मुबईला कधी गेलेला नाहीत. शहरात आपले कोणी नाही. उतरणार कोणाकडे? एकटे जाऊ नका. कुणीतरी सोबतीला पाहा. रजेची व्यवस्था करून मी वाटल्यास बरोबर येतो.'

रघुनाथराव एकेरीवर आले–

'तुला रजा मिळणार कधी? नाहीच मिळाली म्हणजे? मला आता मिनिटभर थांबायचे नाही. तुझ्याजवळ पैसे नसले तर तसे सांग. साठी शांतीचे कोरे उपरणे तसेच आहे, ते विकून टाकतो...'

शेवटी त्र्यंबकने माघार घतली. तो देखील मनोमन चिडला. मनात आले की तसे घडले पाहिजे, हा बापाचा स्वभाव त्याला माहीत होता. त्याने मुंबईच्या तिकिटाची सोय केली आणि दोन दिवसांच्या दशम्याचा डबा ट्रंकेत टाकून, त्याने रघुनाथरावांना मुंबईला रवाना केले. इतकेच नाही तर वडिलांचा एक मराठे नावाचा परिचित गृहस्थ मुंबईला बदामवाडीत आहेत, ही माहिती काढून त्यांचा पत्ताही त्याने रघुनाथरावांना दिला. ¤

बदामवाडीतून रघुनाथराव बाहेर पडले, तेव्हा सायंकाळचे आठ वाजून गेले होते. श्री. मराठे यांनी नाटकाचे काढून आणलेले तिकीट त्यांच्या पैरणीच्या खिशात होते. व्हिक्टोरिया थिएटरचा पत्ता त्यांनी मिळविला होता. 'रात्रीच्या वेळी कसल्याच छानछोकीच्या कार्यक्रमाला जायचे नाही,' असा श्री. मराठे यांचा नियमच असल्याने, पत्ता शोधीत थिएटर गाठणे व भास्करला भेटणे, ही सर्व कामगिरी रघुनाथरावांनाच करायची होती.

नाटकाला जाण्यासाठी माणसे विशेष पोषाख करीत असावीत, याचा रघुनाथरावांना गंधही नव्हता. आदल्या दिवशी प्रवासात वापरलेले रेशीमकाठी धोतर फारच मळले होते, म्हणून त्यांनी ट्रंकेतले दुसरे काढले होते. पण ते देखील धुतलेले आहेच, असा विशेष पुरावा नव्हता. डोक्यावर कडांना काळसर झिलई चढलेली पगडी होती. भव्य कपाळावर दुबोटी गंधाचे पाखरू होते. श्मश्रू केलेली नसल्याने, पांढऱ्या दाढीचे खुंट चेहऱ्यावर सर्वत्र डोकावत होते. दोन्ही ओठांवर पिकलेल्या मिशांचे दाट सुरवंट हनुवटीपर्यंत खाली आलेले होते. गळ्याभोवती उपरण्याचा अपसव्य वेढा होता. आणि पैरणीवरून त्याचे एक टोक उजव्या गुडघ्यापर्यंत पोचलेले होते. कमरेला खोचलेले धोतर उजव्या गुडघ्यापर्यंत एक अंगाने वर होते, तर डावीकडचा सोगा डाव्या पायाच्या अंगापर्यंत खाली लोंबत होता. रस्त्याच्या कडेने विचारमग्न स्थितीत चालणाऱ्या अशा व्यक्तीकडे कुणाचे लक्ष जाण्याची शक्यताही नव्हती.

किर्लोस्करांच्या नाटकाला चोहोबाजूंनी माणसांच्या झुंडीच्या झुंडी लोटत असतील, अशी रघुनाथरावांची कल्पना होती. परंतु रस्त्यानं त्यांना शुकशुकाटच दिसत होता. नाही म्हणायला गायवाडीच्या कोपऱ्यावर घोड्याच्या बग्गीभोवती जमलेले, फरकॅप घातलेले आणि झुळझुळीत धोतर नेसलेले चार-पाच तरुण त्यांनी पाहिले. आणि पुढे वाटेत त्यांना झकपक पोषाख केलेली तीन–चार जोडपी दिसली. बरोबर चालणाऱ्या बायकांचे अंगावर शालू होते, खांद्यावर शेले होते. पुरुषमाणसेही ऐटदार होती. पारशी फॅशनचे कोट आणि पगड्या घालून सर्वजण बरोबरच्या बायकांना लगबग करीत होते.

ही सर्व माणसे नाटकाच्या थिएटरकडे जात आहेत, हे रघुनाथरावांनी ताडले व थिएटरचा रस्ता कुणाला विचारण्याच्या भानगडीत न पडता, रघुनाथराव झपझप पावले टाकू लागले. त्यांच्या अंगावरून चार-दोन बग्ग्या पुढे गेल्या. बरोबर चालणारी माणसेही रिकामी घोडागाडी भेटताच आत चढून चटकन दिसेनाशी होत होती.

काही क्षण मग असे आले की, रघुनाथरावांच्या आसपास, नाटकाला निघालेला कुणीच उरला नाही. ते थोडे गांगरले. पण रस्ता न सोडता चालत राहिले.

बोरीबंदर स्टेशनची भव्य इमारत त्यांना दिसली, आणि त्यांच्या जिवात जीव आला. स्टेशनच्या समोरच्या अंगालाच थिएटर आहे, असे मराठ्यांनी सांगितले होते. काही पावले चालून जाताच त्यांना थिएटर दिसले.

थिएटरचा परिसर लखलखलेला होता. गॅसच्या बत्त्या चोहो अंगाने लटकलेल्या होत्या. माणसेच माणसे कोलाहल करीत होती. गुजराथी, भाटिये, खोजे आणि नामांकित माणसे प्रयोगाला लोटलेली दिसत होती. दोन्ही–तिन्ही अंगांनी घोड्याच्या गाड्या येऊन थांबत होत्या. माणसे खाली उतरत होती. रघुनाथरावांना या घोळक्यात गडबडून गेल्यासारखे झाले. नाटकाला आलेल्यांत स्त्री-प्रेक्षकांची जी संख्या होती, ती पाहून तर ते थक्कच झाले. सळसळणाऱ्या रेशमी साड्या, उंची शालू-शेले आणि केसात घातलेल्या नयनमनोहर वेण्यांतील बहारदार फुलांचा घमघमाट त्यांना सर्वांगांनी घेरीत होता. जवळ जवळ येणारा प्रत्येक धनिक प्रेक्षक रघुनाथरावांकडे लक्ष गेले की, क्षणभर त्यांच्या कडे टक लावून पाहत पुढे जात होता.

तापलेल्या जमिनीत पाणी पाहता पाहता रिचावे, तशी ही अलोट गर्दी थिएटरच्या

# किर्लोस्कर ऑईल इंजिन्स लिमिटेड

रजि. ऑफिस:
१३ लक्ष्मणराव किर्लोस्कर पथ, खडकी,
पुणे ४११ ००३

## ठेवी स्वीकारीत आहोत

| मुदत वर्षे | १ | २ | ३ | ५ | ७ | १० |
|---|---|---|---|---|---|---|
| सर्वसाधारण जनतेसाठी व्याजाचा दर-द.सा.द.शे. | ९½ | १० | ११ | १२ | १२½ | १४ |
| भागधारकांसाठी व्याजाचा दर-द.सा.द.शे. | १० | १०½ | ११½ | १२½ | १३ | १४½ |

ठेवीच्या तारखेपासून दर सहा महिन्यांनी व्याज दिले जाते.

### गुंतवणूक करणाऱ्यांसाठी नवीन योजना

| | अ | ब | क |
|---|---|---|---|
| मुदत वर्षे | २ | ३ | ५ |
| ठेवीची रक्कम | रु. ८०० | रु. ७०० | रु. ५७५ |
| परत केली जाणारी रक्कम | रु. १००० | रु. १००० | रु. १००० |
| सरळ व्याजाचा दर द.सा.द.शे. (अंदाजे) | १३% | १४% | १५% |

## मुदत ठेवींसाठी आवाहन आणि स्वीकृति–

कंपनी स्थापन झाल्याची तारीख–२६ जून १९४६

व्यवहार:
३ अश्वशक्तीपासून ४४० अश्वशक्तीपर्यंत क्षमतेची इंटर्नल कम्बशन इंजिन्स, पंपिंग सेटस, जनरेटिंग सेटस् आणि तदनुषंगिक अन्य औद्योगिक उत्पादने त्याचप्रमाणे थिन-वॉल्ड बायमेटल बेअरिंग्ज आणि बुशेस याची निर्मिती व विक्री

उपकंपन्या:
- शिवाजी वर्क्स लिमिटेड
  शिवाजी, जि. सोलापूर
  व्यवहार: कास्टिंग्जचे उत्पादन व विक्री
- किर्लोस्कर किसान इक्विपमेन्ट लिमिटेड
  कोथरूड, पुणे ४११ ०२९
  व्यवहार: पेट्रोल इंजिनाचे उत्पादन व विक्री

शाखा:
- किर्लोस्कर ऑईल इंजिन्स लिमिटेड
  २५ कैपन् मथुरा रोड, फरिदाबाद (हरयाना)
- कोएल सेल्स अँड सर्व्हिस
  कोथरूड, पुणे ४११ ०२९
- किर्लोस्कर ऑईल इंजिन्स लिमिटेड
  २२७-२२९ राजवोंगसे रोड,
  बँकॉक (थायलंड)
- किर्लोस्कर ऑईल इंजिन्स लिमिटेड
  C/o के. ए. बी. मोजेक्टस प्रायव्हेट लिमिटेड
  २६ अल्बनी स्ट्रीट, क्रोजनेस्ट
  एन्. एस्. डब्ल्यू. २०६६ (ऑस्ट्रेलिया)

कंपनीचे व्यवस्थापन:
संचालक मंडळाच्या नियंत्रण व मार्गदर्शनानुसार आणि अधिपत्याखाली श्री. शं. ल. किर्लोस्कर हे, अध्यक्ष आणि कार्यकारी संचालक या नात्याने कंपनीचे व्यवस्थापन करीत असतात.

संचालक मंडळ:
- श्री. शं. ल. किर्लोस्कर
  अध्यक्ष आणि कार्यकारी संचालक
  'लकाकी' शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६
  उद्योगपति
- श्री. चं. शं. किर्लोस्कर उपाध्यक्ष
  'लकाकी' कम्पौंड, शिवाजीनगर,
  पुणे ४११ ०१६ ... उद्योगपती
- श्री. वा. पुं. वर्दे
  २९८ ऑफ टर्नर रोड, बांद्रा,
  मुंबई ४०० ०५० ... व्यापार
- श्री. श्री. बा. खेर
  'अलका' १४ वा रस्ता, खार,
  मुंबई ४०० ०५२ ... सॉलिसिटर
- श्री. वि. [illegible]
  'दि [illegible]' [illegible] रस्ता, खार,
  मुंबई ४०० ०५२ उद्योगपती
- डॉ. रा. ज. राव
  मेसर्स [illegible] लिमिटेड
  १६२ [illegible] रोड, पुणे ४११ ००१
  उद्योगपती
- श्री. प्र. गो. पवार
  ७८४ [illegible], [illegible] उद्यानाजवळ,
  पुणे ४११ ००४ व्यापार
- श्री. के. मा. राव (आय एफ सी – निवृत्त)
  १७ सुयोजना सहकारी गृहरचना संस्था
  कोरेगाव पार्क, पुणे ४११ ००१
  सेवानिवृत्त मध्यवर्ती सरकारी अधिकारी
- श्री. वि. ना. दात्ये
  ५९५ शनवार पेठ, पुणे ४११ ०३०  व्यापार
- श्री. भ. न. त्रिवेदी
  ज्युपिटर अपार्टमेन्ट्स, अँनस्टे रोड,
  कबाला हिल, मुंबई ४०० ०२६ ... व्यापार

जाहिरात प्रसृत होण्यापूर्वीच्या तीन आर्थिक वर्षांतील नफ्याचा तपशील:

| ३० जून रोजी संपणारे वर्ष | नफा/(तोटा) करपूर्व | नफा/(तोटा) करपश्चात् |
|---|---|---|
| * १९७३ | १,०९,२७,९५२ | १,०२,९२,७६१ |
| १९७४ | २,१२,८५,१७१ | ८८,१४,९६६ |
| १९७५ | २,४२,७२,७९२ | ८५,२१,५३० |

(* १५ महिन्यांच्या कालावधीसाठी)

लाभांश:

| | * ३०-६-१९७३ | ३०-६-१९७४ | ३०-६-१९७५ |
|---|---|---|---|
| अ) इक्विटी कॅपिटल | १२.५ % | ७ % | ६.५ % |
| ब) क्युम्युलेटिव्ह पार्टिसिपेटिंग प्रेफरन्स कॅपिटल | ८ % | ८ % | ८ % |
| क) क्युम्युलेटिव्ह प्रेफरन्स कॅपिटल | ९.५ % | ९.५ % | ९.५ % |

(* १५ महिन्यांच्या कालावधीसाठी)

३० जून १९७५ रोजी संपलेल्या वर्षाचा आढावा

| | | |
|---|---|---|
| १) वसूल भाग भांडवल | | रु. ४,६२,१२,५०० |
| २) मुक्त राखीव निधी | | रु. ४,७३,८२,७७४ |
| ३) ठेवी | रु. १,५९,०९,५२५ | |
| भागधारकाकडून कर्जे | रु. ८२,३३,६०० | रु. २,४१,४३,१२५ |
| ४) तारणावरील कर्जे | | |
| दीर्घ मुदतीची | रु. १,७७,५९,१६४ | |
| अल्प मुदतीची | रु. ८,२४,९१,९६० | रु. १०,०२,५१,१२४ |
| ५) तोट्याची एकत्रित रक्कम (असल्यास) | | रु. — |

ठेवी/कर्जे या द्वारा स्वीकारित रकमेचा विनियोग कंपनीच्या नित्य व्यवहारासाठी केला जाईल.

*अधिक तपशील व अर्जाचा नमुना यासाठी कृपया कंपनीकडे पत्रव्यवहार करावा.*

ठेवी/कर्जे स्वीकारण्याचे स्थगित करणे आणि त्यासंबंधीच्या शर्तींमध्ये बदल किंवा सुधारणा घडवून आणणे याबद्दलचे सर्वाधिकार कंपनीने स्वतःकडे राखून ठेवलेले आहेत.
दिनांक २७ डिसेंबर १९७५ रोजी झालेल्या सभेमध्ये, जाहिरातीचा मसुदा संचालक मंडळाने संमत केलेला असून त्या अधिकारान्वये ही जाहिरात प्रसृत करण्यात येत आहे.
संचालक मंडळामधील प्रत्येक व्यक्तीच्या स्वाक्षरीसह ही जाहिरात रजिस्ट्रार ऑफ कंपनीज (महाराष्ट्र राज्य) यांच्याकडे दिनांक १९ फेब्रुवारी १९७६ रोजी नोंदविण्यात आली आहे.
१९५६ च्या कंपनी कायद्यामधील कलम ५८ अ तथा ५८ ब मधील तरतुदीनुसार तसेच १९७५ च्या कंपनीविषयक (ठेवी स्वीकृती संबंधीच्या) नियम क्रमांक ४ प्रमाणे ही जाहिरात देण्यात येत आहे.

PRATIBHA 762M


कृपया वाचकांनी पत्रव्यवहार करताना ह्या दिवाळी अंकाचा उल्लेख करावा.

दरवाज्यातून काही मिनिटांतच खालच्या भागात अदृश्य होत गेली. ज्या दरवाज्यातून ही गर्दी आत शिरत होती, तिथल्या दरवाज्याने रघुनाथरावांना मात्र जिन्याकडेअंगुली दाखविली. या अजब दुनियेत भरलेल्या मयसभेत, आपल्याला भास्कर भेटणार कसा, या विवंचनेत असलेले रघुनाथराव तीन जिने चढून, वरच्या गॅलरीत आले. तिथल्या तिकीटनिसाने मात्र त्यांना तिकीट पाहून आत सोडले.

रघुनाथराव आत आले, तो बहुतेक जागा भरल्याचे त्यांच्या लक्षात आले. जिथून नाटक उत्तम दिसेल अशी जागा पकडून माणसे बसलेली होती. इथे बहुतेक सडेफटिंगच बव्हंशाने होते. जागा धरून एके ठिकाणी अंमळ बसावे, तो नाटक दुसऱ्या ठिकाणाहून चांगले दिसेल, असे मनात येऊन जागा बदलावी, असे लोकांचे चालू होते. असाच एक इसम कठड्याजवळची जागा सोडून गेलेला पाहताच रघुनाथरावांनी ती जागा पकडली.

त्यांनी खाली वाकून पाहिले. थिएटरचा खालचा मजला गच्च भरला होता. गॅसचे भरपूर फिटिंग केलेले असल्याने झगमगीत प्रकाश सगळीकडे पसरलेला होता. रगभूमी-समोरचा मखमली पडदा डोळ्यांचे पारणे फेडीत होता. पड्याच्या अगदी वरच्या अंगाला फुलांचा जाड हार घातलेली तसबीर होती. देवाबिवाची असावी. हार इतका डेरेदार होता की, तसबीर जवळजवळ झाकलीच गेली होती. पड्यामागून उदाचे लोटच्या लोट बाहेर पडत होते.

रघुनाथराव विचार करीत होते. इतकी भली भली भली माणसे खालच्या मजल्यावर पैसे मोजून जमली आहेत, तो धंदा इतका घाणेरडा असेल? खेळ करून दाखविणारी माणसे नीतीने अतोनात खालावलेली असली, तर त्यांची सोंगे लोकांना आवडतील? पण रावसाहेब जोशांच्या फाडून टाकलेल्या पत्रांचे कपटे त्यांच्याभोवती पुन्हा फेर धरू लागले–'मुलाला परत आणा... ब्राह्मणाचा मुलगा नाटक्यांच्या टोळीत वाममार्गाला लागतो आहे.'

इतक्यात पडदा गुंडाळला गेला. थिएटरमध्ये टाळ्यांचा कडकडाट झाला. मिशावाले सूत्रधार मध्ये उभे होते. रघुनाथरावांच्या आसपास बसलेल्या प्रेक्षकांतून कुजबुज झाली 'स्वतः अण्णासाहेब बरं!' कुणीतरी खालच्या आवाजात विचारले– 'मग दशरथाचे काम कोण करणार!' उत्तर आले. 'अण्णासाहेबच.'

रावसाहेब जोशांच्या पत्रावरून अण्णासाहेब किर्लोस्कर हा एखाद्या लफंग्याच्या टोळीचा सूत्रधार आहे, असा रघुनाथरावांचा समज झाला होता. तो समज सूत्रधाराचे ते अुंचनिच प्रसन्न आणि देखणे रुप पहाताच, मिठाच्या खड्यासारखा विरघळू लागला. दोन्ही बाजूला दोन तबोऱ्याचा सुखद सूर होता. अण्णासाहेबांचा स्वर उमटताच प्रेक्षक वर्ग चित्रासारखा स्तब्ध झाला.

हेम घंटा नाद घणघण।
दोन्ही भागी सर्वही गण।
नंदी भृंगी धरिती वेसण।
उडवी तीवर छत्र चामरे॥

ही शंकरस्तुती एकीकडे ऐकताना रघुनाथरावांच्या पुढे देवघरातले शिवपंचायतनातले शकराचे रूप साकार होऊ लागले. नांदी संपली. टाळ्या विरल्या. रघुनाथरावांच्या तोंडून वा: वा· असे शब्द अचानक बाहेर पडले. सूत्रधार पुढले पद आळवीत होता. रघुनाथराव मनाशी म्हणत होते–खेळाच्या सुरुवातीला काय सुंदर पद ऐकले. देवाची आळवणी करणारा हा स्वर लफंग्याचा असेल? देवाची आठवण ठेवणारा माणूस वाईट कसा असेल?

पुढच्या काही मिनिटांतच 'रामराज्यवियोग' नाटकाचे यश निश्चित झाले. सूत्रधाराच्या प्रवेशापासूनच प्रेक्षक नाटकाच्या अंतरंगाशी एकरूप होऊ लागले. मंथरेच्या भूमिकेत भाऊराव कोल्हटकरांनी एका पाठोपाठ रंगभूमीत पदांचे असे भुईनळे उत्पन्न केले की, हे पद सरस की, मघा एकले ते सरस, याचा निर्णय करणे प्रेक्षकांना कठीण होऊ लागले मंथरा–गोरी, घारी, नाक सरळ तततरीत, डोळे किंचित बारीक, चेहरा नाजूक, आवाज मात्र चढा आणि असा पल्लेदार की, प्रेक्षकांचे भान पाहता पाहता हरपले. मंथरेचे ते देखणेपण पाहताना अंगावर सरसरून काटा उभा करणाऱ्या चपळ तेजाळ सर्पिणीचे रूप पाहात आहोत असा रघुनाथरावांना भास झाला. इतकी सुंदर बाई मन.पूत एकटक पाहण्याचे सुख




UH 743

त्यांना कधी भेटलेच नव्हते. लग्नाच्या मांडवात अशी एखादी बाई दिसे. पण ती इकडून तिकडे लगेच अदृश्य होई. मोरोबा वाघोलीकरांनी सोंग केलेला वसिष्ठ रंगभूमीवर पाहताना रघुनाथरावांना पुराणातला ऋषी प्रत्यक्ष पाहिल्याचा भास होत होता. वसिष्ठांच्या साकीबरोबर पहिला अंक संपला फराळाच्या दुकानाकडे प्रेक्षकवर्गाची रीघ लागली. रघुनाथराव मात्र जागीच बसून होते. त्यांना नाटक पाहताना झालेला आनंद सहन होत नव्हता. अण्णा किर्लोस्करांचे हे मनोहर इंद्रधनुष्य मोडण्यासाठी आपण इथवर आलो आहोत, याचाच त्यांना क्षणभर विसर पडला. पुढच्या अंकात काय घडेल या विचारात गढलेले मन त्यांनी, भास्करची आठवण होताच, निग्रहाने मागे खेचले. भास्कर कुठे आणि कसा भेटणार? ही विवंचना त्यांना पुन्हा ग्रस्त करू लागली.

दुसरा अंक पुन्हा मंथरेने काबीज केला. सुकुमार असुनी तू *'या पदाला पुन्हा पुन्हा* वन्समोअर घेत राहिल्याने, नाटक पुढे सरकायला मध्यरात्र झाली. दासींच्या घोळक्यात बसलेली कैकयी पुढे आली, तेव्हा तिनाचा सुमार झालेला होता. कैकयी आरशात पाहून म्हणत होती—

'मालिनी, आज भांग बरोबर आला नाही ग! किंचित वाकडा आलाय—'

मालिनीकडे रघुनाथराव एकटक पाहत होते. हा भास्कर असावा असा त्यांचा ग्रह झाला होता. त्यांच्या हिशोबाने कैकयीचे सोंग हे भास्करने काढणे शक्यच नव्हते. नऊ वारांच्या घोळात वावरण्याची ती सहजता, नथ सारखी करण्याचा तो लाडिक हावभाव, दोन्ही पदरांवरून पुढे आपल्या त्या दोन तिपेडी वेण्या, पदर सारखा करण्याची ती बायकी रीत, आणि मुख्य म्हणजे ते लालवट गोरेपण! भास्कर असलाच तर मालिनीचे सोंग घेतलेला मुलगाच असणार!

दासी दृष्टीआड झाल्यावर मग रघुनाथरावांचा तो चाळा सुटला. कैकयी—मंथरेच्या प्रवेशात गाण्याची अगदी लयलूट झाली. सरीवर सरी कोसळल्या, तशी टाळ्यांवर टाळ्यांनी प्रेक्षागृह थरथरून उठत होते. संगीताच्या त्या अपूर्व नादब्रह्मात, रघुनाथराव भास्करचा शोध पुन्हा हरवून बसले.

तिसऱ्या अंकात दशरथाने कैकयीला जवळ घेऊन तिचे वर्णन सुरू केले.

'प्रिये! मजविषयी ही इतकी कठोरता! नेत्र—मुख—अधर, हे सर्व कोमल असताना हृदय तेवढेच कठोर का?' रघुनाथराव म्हणाले—'खरंच! काय सुंदर रूप आहे या मुलीचे!' पुढे अंकभर अण्णासाहेबांच्या तोडीस तोड कैकयीने जी गाण्याची सुरावट पेरली, तिने तर रघुनाथरावांना वेडेच केले. मात्र अखेर शेवटी दशरथाला लाथ मारून *'निर्बल्या! नपुंसका-षंढा'*—असे म्हणणाऱ्या कैकयीचे सोंग पाहताना त्यांना त्या पात्राविषयी विलक्षण तिटकारा आला. जानकी पूर्वी रागावली की अगदी असे करी, याची आठवण जागी झाली. पुत्रप्रेमाने विव्हल झालेल्या राजाला लाथ मारणाऱ्या त्या सोंगाचे ते वर्तन पाहताना मात्र रघुनाथरावांच्या डोळ्यांतून अश्रुपात सुरू झाला. उपरण्याने ते पुन्हा डोळे पुशीत असतानाच नाटक संपले.

सुरेल सुरांनी जागीच पाच तास बांधून टाकलेले प्रेक्षक हळूहळू भानावर आले. एखादी मोहिनी संपावी तशी त्यांची मंत्रमुग्धता त्यांना हळूहळू सोडून जाऊ लागली शतमुखांनी अण्णासाहेबांविषयी धन्योद्‌गार रघुनाथरावांच्या आजूबाजूला निघत होते. मंथरेच्या आणि कैकयीच्या गाण्यांची जो तो स्तुती करीत थिएटराबाहेर पडताना जिने उतरत होता. गर्दीच्या लोंढ्याबरोबर रघुनाथराव पुढे पुढे सरकत होते. *अभिनयाचे अजब थरथरते, काळजाला* हात घालणारे जग त्यांनी आयुष्यात प्रथमच पाहिले होते. कृष्णाजी जोशींची 'शाहूनगरवासी' कंपनी विसनगरला कधी आलेलीच नव्हती, आणि नाटक म्हणजे काय असते, याचे रघुनाथरावांचे गूढ उकललेलेच नव्हते. माणसांनी घेतलेली पौराणिक सोंगे किती जादू करू शकतात, याची त्यांना आतापर्यंत यामुळे कल्पना देखील नव्हती. दशरथाची साधी गोष्ट काही त्यांना नवीन नव्हती. पण ही नुसती गोष्ट नव्हती. ती समोर घडत असताना माणसे रडत होती, उसासे टाकीत होती. आणि या सगळ्यांतुन निर्माण होणारा आनंद त्यांना सारखा हवाहवासा वाटत होता. आनंदाच्या इतक्या विस्तीर्ण आणि खोल डोहात रघुनाथराव कधीच डुंबलेले नव्हते. गेल्या पाच तासांतला प्रत्येक क्षण ते रसरशीतपणे जगले होते. या अनुभवाने त्यांच्या वृत्ती अगदी थरथरून आलेल्या फुलासारख्या कोमल झाल्या होत्या.

पाहता पाहता आसपासची माणसे पांगली. अनेक घोडागाड्या सुटल्या. घोड्यांच्या टापा दूरदूर गेल्या, तरी थिएटरच्या दरवाज्यापाशीच रघुनाथराव खिळल्यासारखे उभे होते. आता काय करावे, हे त्यांना समजत नव्हते. पडद्यामागे लपलेल्या सोंगाच्या दुनियेत *आपला भास्कर आता काय करत असेल,* हे त्यांना उमजेना. भास्करला शोधण्यासाठी ते नाटकाला आले आणि अजून भास्कर कोठे आहे, याचाही सुगावा त्यांना लागलेला नव्हता. मालिनीचे सोंग घेतलेला मुलगा दुसरा अंकात चार वाक्ये बोलून नाहीसा झाला, तो पुढे सबंध नाटकात पुनः मालिनीच्या सोंगाचा प्रवेशच झाला नाही. तो जर भास्कर असला तर तो आता सोंग उतरून अंमळशाने बाहेर पडेल, या हिशोबाने रघुनाथराव अवघडलेल्या अवस्थेत भिंतीशी सरून उभे राहिलेले होते.

थिएटरबाहेर आता शुकशुकाट पसरला होता. पहाटेची वेळ असल्याने गार वारे सुटले होते. रघुनाथरावांखेरीज बाहेरच्या अंगाला आता कुणीही नव्हते. मध्येच एक रस्त्यावरचे कुत्रे क्षणभर त्यांच्यापुढे थांबले आणि ओळख न पटल्यासारखे तुरूतुरू पळत दृष्टीआड झाले. काय करावे, या विचारात रघुनाथराव असतानाच ज्या दरवाज्यातून *रात्री खालच्या मजल्याने प्रेक्षक आत गेले,* तिथून गडबडीने तीन—चार माणसे बाहेर आली. त्यातली जी उंचनिंच पगडी घातलेली ठसठशीत व्यक्ती होती, ती दशरथाचे सोंग केलेल्या अण्णासाहेबांची आहे, हे रघुनाथरावांच्या लक्षात यायला वेळ लागला नाही. अंगात भारी किंमतीचा अंगरखा आणि त्यावर भरजरी शालजोडी त्यांच्या खांद्यावर होती.

इतक्यात अण्णासाहेबांचे लक्ष भिंतीच्याकडेला उभ्या असलेल्या रघुनाथरावांकडे गेले. त्यांनी थबकून जवळच्या माणसाला विचारले,

'हे कोण उभे आहेत? विचारा काय हवंय त्यांना?'

रघुनाथरावांनी देखील ते शब्द ऐकलेच आणि त्यांना कुणी काही विचारण्यापूर्वीच,

गडबडीने पुढे होत त्यांनी म्हटले,

'मी रघुनाथराव बखले, आमच्या भास्करला भेटायचंय मला–'

अण्णासाहेब सर्द झाल्यासारखे त्यांच्याकडे पाहत राहिले. कपाळावरच्या गंधाच्या मुद्रे. खालचे त्यांचे डोळे, एकदम लखलखले. भास्करचे वडील त्याला शोधत उभे आहेत– ते खूप लांबून आलेले असणार आणि असंख्य शंकांनी आणि वेदनांनी त्यांचा जीव अर्धमेला झालेला असणार–हा सगळा संदर्भ अण्णासाहेबांच्या तात्काळ ध्यानात आला. जवळ उभ्या असलेल्या भरदार शरीराच्या गौरवर्ण आणि नीतळ कांतीच्या माणसाकडे वळून अण्णासाहेब म्हणाले,

'गोविंदराव, जरा आत चला. यांची आणि भास्करची गाठ घालून देऊ.'

गोविंदरावांनी रघुनाथरावांकडे निरखून पाहिले. रघुनाथरावांच्या चेहऱ्यावर पसरलेल्या आनंदोर्मी त्यांनी बारीक नजरेने टिपल्या होत्याच. सर्वजण आत वळताना अण्णासाहेबांनी विचारले,

'आपण आमचा आजचा खेळ पाहिलात?'

रघुनाथरावांनी मान डोलावली. तेव्हा ते म्हणाले,

'आपण आधी आम्हाला कळवले असतेत तर, आपली बसायची सोय पुढे केली असती.'

मग गोविंदरावांकडे वळून त्यांनी म्हटले,

'हे गोविंदराव देवल. तुमच्या मुलाला यांनी शिकवलाय. त्यासाठी हरिपुराहून मुद्दाम बोलावले होते त्यांना.'

रघुनाथरावांच्या मनात आले, सोंग काढायलादेखील शिकावे लागत असेल हे आपल्या कधी लक्षातच आलेले नव्हते. शिकायला लागणारच म्हणा! पुरुषाचा जन्म असून बायकासारखे हुबेहूब लाजायचे, मुरडायचे...मघा ती कैकेयी उभी राही ती थेट बायकांसारखी. पदर सावरणे, ठसक्यात बोलणे आणि शृंगाराच्या तऱ्हा दाखवणे शिकण्याशिवाय का येणार आहे? पण गोविंदराव हे सगळे कुठे शिकले? उगाच काहीतरीच प्रश्न त्यांच्या मनात डोकावून गेला

सर्व मंडळी पुन्हा आत गेली. रंगघरात मंडळी आल्यावर कुणीतरी तिथल्या दिवाणाची वात चांगली मोठी केली. खोलीत लोडापाशी अण्णासाहेब आणि गोविंदराव बसल्यावर, रघुनाथरावही समोर बसले. बाहेर गेलेले अण्णासाहेब पुन्हा परत आत आल्याचे कळताच, नाटकातली रंगाळलेली काही माणसे खोलीच्या दरवाजातून डोकावू लागली.

'अरे, भास्करला पाठवा–' असा अण्णासाहेबांचा खणखणीत निरोप उच्चारला जाताच, आतल्या अंगाला थोडी गडबड झाली.

काही क्षणांतच भास्कर आला. त्याने अद्याप दागिने पुरते उतरवलेले नव्हते.कानातली कुडी अजून काढायची होती. त्याने वाढवलेले लांब केस पाठीवर खांद्यापर्यंत मोकळे सुटलेले होते. बैठकीवर अण्णासाहेबांच्या शेजारी कोण आहे, तिकडे त्याचे प्रथम लक्ष गेले नाही. पण अण्णासाहेब जेव्हा म्हणाले, 'भास्कर, कोण आलंय बघितलंस का?' तेव्हा त्याने रघुनाथरावांकडे पाहिले. वडिलांच्या अनपेक्षित दर्शनाने भास्करचा


Need a Reliable Printer

for

Printing Prospectus & Application Forms?

We have specialised ourselves in the printing of Prospectus & Application Forms, Brochures, Share Certificates, Memorandum & Articles of Association, Bank Stationery etc.

We provide Courier Service, Mailing Service too!

*Contact :*

Western Printers & Publishers

Todi Estate, Sun Mill Compound, Lower Parel, Bombay-400 013.

Tel. Press : **376611**

Office : **271894**

चेहरा एकदम ओशाळा झाला. पुढे होऊन तो रघुनाथरावांच्या पाया पडला, तेव्हा रघुनाथरावांच्या तोंडून शब्द फुटेना. कैकेयीचे सोंग घेतलेला मुलगा हाच भास्कर होता, ही जाणीव त्यांना होताच, अभिमानाचा एक अपरिचित स्पुल्लिंग त्यांच्या अंतःकरणात एकदम धगधगू लागला. डोळे डबडबून आल्याने आणि आवाज दाटून आल्याने, 'आई कशी आहे? सर्व ठीक आहे ना?' या भास्करच्या पाठोपाठ आलेल्या प्रश्नांना उत्तर देणेही त्यांना कठीण झाले. त्यांनी हातांनीच सर्व ठीक असल्याची खूण केली आणि डोळ्यांना उपरणे लावले.

मध्यंतरी अण्णासाहेबांनी दरवाजात डोकावणाऱ्यांना निघून जाण्याची खूण केली. खोलीत फक्त अण्णासाहेब, गोविंदराव आणि दोघे बापलेकच उरले होते. भावनांचा आवेग ओसरल्यावर अण्णासाहेबांनी विचारले,

'आपण इथे केवळ भास्करला भेटण्यासाठी आलेले नाही, हे मी जाणतो.'

'भास्करला न्यायलाच मी आलेलो आहे, हे लपवून कशाला ठेवू?' रघुनाथरावांनी कशीबशी कबुली देऊन टाकली.

मग अण्णासाहेबांनी शांतपणे सुरुवात केली,

'माझं ऐकाल तर मुलाला नेऊ नका. तुम्ही त्याचे वडील आहात. तुमच्या परवानगीवाचून आम्ही भास्करला इथे ठेवून घेणार नाही, याबद्दल आपण खात्री बाळगा. सुसंस्कृत आणि प्रतिष्ठावानांनी हा व्यवसाय केला तर, या व्यवसायात सोने पिकविता येईल. लक्षात ठेवा, सरकारी नोकरी सोडून मी या उद्योगात पडलेलो आहे. तुमचा मुलगा थोडेफार शिकलेला आहे. पोस्टात नाहीतर रेव्हेन्यू खात्यात त्याला नोकरी मिळणार नाही असे नाही, पण यासाठी त्याचा जन्मच नाही! गोविंदरावांनी त्याला चांगला तयार केला आहे. तो नाव काढील याबद्दल सर्वांची खात्री आहे. आज त्याने जवळजवळ सर्व पदांना भाऊराव समोर असतानाही वन्समोअर घेतलेले तुम्ही पाहिलेच आहे...'

अण्णासाहेबांचे सुरुवातीचे शब्द रघुनाथरावांच्या मनात घर करीत शिरले आणि मग पुढील शब्दांची पाखरे नुसतीच फडफडत राहिली.

आनंदाची सरोवरे निर्माण करणारी ही सुसंस्कृत देवमाणसे असताना रावसाहेब जोशी यांच्या मनात यांना घाणेरडे आरोप चिकटविण्याचे का यावे, हेच त्यांना कळेना. पण रावसाहेब जोशींना तरी खोटे बोलायचे काय कारण? त्यांनी देखील आपल्या हिताचे म्हणूनच लिहिले होते ना? सोंगे काढण्यात ही माणसे तरबेज आहेत. आता आपण जे ऐकले आहे, ते सगळे एक सोंग नसेल कशावरून? पण छे: छे:! सोंग घेतलेले शब्द इतके मनात घर करून बसत नाहीत. असे बाणासारखे सलत नाहीत. मघा अण्णासाहेब म्हणाले—'सुरुवातीला थोडा वनवास असतोच. पण त्याशिवाय सिंहासन भेटत नाही.' सोन्याची द्वारका उभी करणारा हा पुरुष इतके जीव तोडून सांगतो आहे, त्यात काहीच का तथ्य नाही?

'तुम्ही काहीच बोलत का नाही रघुनाथराव?'

गोविंदरावांनी अप्पासाहेबांचा ओघ थांबवीत मध्येच रघुनाथरावांना हा प्रश्न केला.

रघुनाथरावांच्या तोंडून शब्द उमटेना. कुणाचा जन्म कशासाठी असतो, हे कोडे त्यांना कधीच उलगडलेले नव्हते. जानकी, त्र्यंबक, त्र्यंबकची बायको यांच्याशी वागताना हा अवघड प्रश्न देखील त्यांच्यापुढे कधी आला नव्हता. पण जगात हे कोडे उलगडलेले पुरुष असले पाहिजेत आणि अशातला एक त्यांना पुन्हा पुन्हा सांगत होता—'रेव्हेन्यू खात्यात नोकरी करण्यासाठी त्याचा जन्म नाही! गायक नट म्हणून तो नाव काढणार आहे.'

मुलाला तलाठी करण्यासाठी परत नेण्याचे ते एक स्वप्न उराशी जपत आपण विसनगरहून इथवर आलो. त्या स्वप्नातले रंग मुळीच खरे नाहीत, ही जाणीव रघुनाथरावांना होऊ लागली. त्या स्वप्नातला सगळा दळभद्रीपणा त्यांच्या नजरेसमोर भसदिशी आला. त्यांच्या मनात आले, आपल्या मुलाला पंख आहेत, हे देखील आपण ओळखू शकलो नव्हतो—आता निदान ते कापण्याचे पाप तरी शिरावर नको!

पण काहीतरी बोलायला हवे होते. शब्द आठवीत रघुनाथरावांनी म्हटले—

'पण ही मोहनगरी आहे. भय वाटते.'

अण्णासाहेबांची मुद्रा तत्क्षणी पालटली. करारी स्वरात ते म्हणाले,

'मी आहे तोपर्यंत हे भय नको आणि जेव्हा मी नसेन तेव्हा त्याचा तो ताठ उभा राहिलेला असेल. यापरती तुमची मर्जी!' ◻

विसनगरला परतल्यावर रघुनाथराव घरात शिरले तेव्हा त्यांच्याबरोबर भास्कर नाही, हे पाहताच जानकीबाई चरकल्या. नाना शंकांनी त्यांना घेरले. रस्त्यावरून ते घराच्या फाटकाकडे वळले. तेव्हाच त्र्यंबक ओटीवर मोठ्याने म्हणाला, 'भास्कर आलेला दिसत नाही!'

वडिलांच्या हातातली ट्रंक त्र्यंबकने भिंतीपाशी सारली आणि रघुनाथराव बैठकीवर बसले. गूळ-पाणी पुढे ठेवून जानकीबाई दारातच थांबल्या होत्या. त्यांच्यामागे मोठी सून डोकावत होती. जानकीबाईंना दम निघत नव्हता. त्यांनी विचारले, 'हे काय? भास्कर नाही आला?'

पगडी उतरवून ठेवीत आणि डोईवरचा घाम दोन्ही हातांनी उपरण्याला पुशीत रघुनाथराव हसत सांगू लागले—

'सगळं बेश आहे त्याचं! अण्णासाहेबांच्या नवीन नाटकात तो कैकेयीचे सोंग काढतो. नाटकाला गर्दी का गर्दी म्हणायची? भास्कर गात होता आणि टाळ्या म्हणून काही संपायच्या नाहीत! लोक विग्रजोत 'मोर', 'मोर' ओरडले की, तेच गाणे पुन्हा सुरू. जसं काही सुरांचं चांदणं कोसळत होतं. काय बरं ते पहिलंच भास्करचं पद— हां—'मंथरे तुला लागले पिसे.' एकदा झाले, दोनदा झाले. पोर शेवटी कंटाळला. अण्णासाहेब नाटक संपल्यावर भेटले. म्हणाले, 'हवा तर भास्करला न्या.' पण मी म्हटलं— 'काही नको. तलाठी होऊन एक मुलगा कागद चिवडतोय तेवढा पुरे. दृष्ट लागावी अशी ही सोयरिक आहे. शेकड्यांनी लोक नावाजतायत, आवाजाची वाहवा करतायत. अण्णासाहेबांसारखी शिकलीसवरलेली, ग्रंथ लिहिणारी माणसं पाठीशी आहेत. काही कमी नाही पडणार त्याला.'

रघुनाथराव थडाथडा बोलत होते. रघुनाथरावांच्या कैकेयीचे कौतुक ओसंडत असताना ते जानकीबाईंकडे अशा तऱ्हेने पाहत होते की, जणू त्यांना मुंबईला धाडणारी 'मंथरा' बायकोच होती. जानकीबाई सगळं ऐकत मनाशी म्हणत होत्या,

'काय बाई तरी ही जादू झाली! इकडचंच का हे बोलणं चाललंय?'

●

सॉमरसेट मॉमने लिहिलेली
जगातील सर्वोत्तम अशा दहा
कादंबरीकारांची चरित्रे व जगातील सर्वोत्तम अशा दहा कादंबऱ्यांची मार्मिक परीक्षणे म्हणजे जिज्ञासू सर्वसामान्य वाचकांसाठी एक पर्वणीच आहे.
या दहातून एकाची निवड दिवाळी अंकासाठी करणे खरोखरच अवघड होते. एकाहून एक सरस लेखांची ही मालिकाच आहे.

तरीपण या नमुन्यावरून एकूण लेखमालेची कल्पना येऊ शकते.



# गुस्ताव्ह फ्लॉबर्ट व मदाम बोव्हारी

लेखक : सॉमरसेट मॉम
अनुवाद : माधव मनोहर

गुस्ताव्ह फ्लॉबर्ट हा एक लोकविलक्षण पुरुष होता. तो फ्रेंच होता. आणि फ्रेंच टीकाकारांच्या मताने तो एक प्रतिभाशाली लेखक होता. प्रतिभेला समानार्थक असा इंग्रजी शब्द आहे तो जीनियस. प्रतिभा किंवा जीनियस हे शब्द अलीकडे फार शिथिल अर्थांनं योजिले जातात. ऑक्स्फर्ड इंग्लिश डिक्शनरीत जीनीयसची व्याख्या अशी केलेली आहे. ‘ कल्पनाप्रचुर लेखन, मौलिक विचार किंवा वैज्ञानिक संशोधन यांस प्रवृत्त करणारी सहजस्फूर्त, अलौकिक अशी निर्माणक्षमता. ’

जीनियस व टॅलेन्ट या दोन शब्दांतील अर्थाचा फरक सदरहू शब्दकोशाने असा दाखविला आहे: जीनियस अंगी असलेला मानव जे साधतो, ते सहजप्रेरणेच्या उत्स्फूर्त अशा बळावर. ही जी स्वाभाविक निर्माणक्षमता आहे, तिची व्याख्या तर्कागत नियमानुसार करता येण्यासारखी नाही. जीनियसचे हे व्यवच्छेदक लक्षण लक्षात घेतले, तर कोणत्याही एका शतकात तीन किंवा चार प्रतिभावन्त पुरुष फार फार तर असू शकतील. आणि म्हणून कानाला गोड लागेल अशी चाल देणारा एखादा संगीत-

नियोजक, हलकीफुलकी नाटके लिहिणारा नाटककार किंवा आकर्षक चित्रकार यांच्या संबधात प्रतिभेचा निर्देश करणे म्हणजे त्या शब्दात अनस्यूत असलेल्या गूढ अर्थाचा उपमर्द करणे होय. हलकीफुलकी चाल, हलकेफुलके नाटक किंवा हलकेफुलके चित्र ही सर्वच निर्मिती आपआपल्या परीने रंजक असते. आणि अशा कृतींच्या निर्मात्यांची टॅलेन्ट निर्विवाद कबूल करावयास हवी.

टॅलेन्ट देखील तशी दुर्मिळच होय. पण टॅलेन्टच्या तुलनेने जीनियसची पातळी किती तरी वेगळी आणि स्वभावतःच उच्चतर अशी आहे. या आपल्या चालू विसाव्या शतकात असा खऱ्या अर्थाने प्रतिभावन्त पुरुष कोण आहे, असे मला कोणी विचारले, तर केवळ एका आइन्स्टाइनचेच नाव प्रतिभेच्या संबंधात मला सुचते. प्रतिभेच्या संबंधात गेले एकोणिसावे शतक अधिक संपन्न होते, यात काही एक शंका नाही. परंतु *अपूर्ववस्तुनिर्माणक्षम अशी* प्रतिभेची देणगी त्यात एखाद्या लेखकाला लाभलेली होती किंवा नाही, प्रतिभावन्तात त्याची गणना करता येईल किंवा नाही, हे अखेरीस ललित वाङमयाच्या अभ्यासकानेच प्रतिभेचे उपर्युक्त व्यवच्छेदक लक्षण लक्षात ठेवून ठरवावयाचे आहे.

फ्लॉबर्ट प्रतिभावन्त असो वा नसो, त्याच्या निर्मितीसंबंधी एक विधान निर्विवाद करता येण्यासारखे आहे. आजच्या वास्तववादी कादंबरीचा जनक फ्लॉबर्ट हाच होय, असे निःशंक म्हणता येईल. त्याच्या विशिष्ट लेखनप्रवृत्तीचा परिणाम तदनन्तरच्या सर्वच लेखकांवर प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष झालेला आहे, यात संशय नाही. काळोखाची जी काटेरी वाट फ्लॉबर्टने प्रथम उजळली व ज्या वाटेने निर्भय प्रवास करण्याचे साहस त्याने अंगीकारले, त्याच वाटेने तदनंतरच्या काळात '*बडेनब्रुक्स*' लिहिणारा टॉमस मॅन, '*ओल्ड वाइव्हज् टेल*' लिहिणारा अर्नोल्ड बेनेट व '*सिस्टर कॅरी*' लिहिणारा थिओडोर ड्रायझर हेही फ्लॉबर्टला अनुसरत गेले.

वाङमयकलेच्या साधनेस स्वतःला इतक्या संपूर्ण निष्ठेने सर्व शक्ती पणाला लावून वाहून घेणारा अन्य लेखक साहित्याच्या इतिहासात आढळत नाही. बहुतेक सर्व लेखकांच्या लेखी लेखन हे एक महत्तम असे व्यवधान निःसंशय असते. पण याचा अर्थ असा नव्हे की, *मनास विश्रान्ती प्राप्त करून देणाऱ्या*, शरीराला आराम देणाऱ्या वा अनुभवसंपन्न करणाऱ्या अन्य उद्योगात त्यांना रस नसतो. किंबहुना हे अन्य उद्योग प्राप्त करून घेण्याचे लेखन हे एक प्रभावी साधन म्हणूनच लेखनाचा ते स्वीकार करतात. फ्लॉबर्टचे तसे नव्हते.

जगणे हेच जीवनाचे उद्दिष्ट आहे, असे तो निखालस मानीत नव्हता. त्याच्या लेखी लेखन हेच जीवनाचे एकमेव उद्दिष्ट होते. परमेश्वराच्या प्राप्तीसाठी सर्व ऐहिक सुखांचा बुद्धिपुरःसर त्याग करून ज्या निष्ठेने मुमुक्षू विजनातील एकांतवासात तपश्चर्येची साधना करतो, त्याच निष्ठेने फ्लॉबर्ट लेखनास उद्युक्त झालेला होता. कलात्मक लेखनकृती निर्माण करावी, या एकमेव आकांक्षेने त्याला असे झपाटलेले होते की, त्या आकांक्षेच्या पायी त्याने जीवनातील अनेकविध सुखांचा व समृद्धतेचा त्याग मोठ्या खुषीने केला होता.

लेखक कोण व कसा आहे, त्याच्या व्यक्तित्वाची जात काय आहे, यावरच त्याच्या लेखनाचे स्वरूप सर्वस्वी अवलंबून असते. आणि म्हणूनच तो जर चांगला लेखक असेल, तर त्याच्या व्यक्तिगत चरित्राचे ज्ञान व भान वाचकाला उपकारक ठरते. फ्लॉबर्टच्या संबंधात तर त्याच्या चरित्राची माहिती असणे विशेषच अगत्याचे आहे.

इ. स. १८२१. मध्ये रुएन येथे फ्लॉबर्टचा जन्म झाला. तेथील रुग्णालयाचा प्रमुख म्हणून त्याचा बाप तेथे काम करीत असे व तेथेच, आपल्या बायकोमुलांसह तो राहत असे फ्लॉबर्ट कुटुंब हे मोठे सुखी, संपन्न व विलक्षण मानमान्यता पावलेले असे कुटुंब होते. अशा वरिष्ठ वर्गाच्या कुटुंबातील मुले जे व जसे शिक्षण घेत असत, ते व तसे शिक्षण फ्लॉबर्टलाही घ्यावे लागले. तो शाळेत गेला. आणि नित्याप्रमाणे दुसऱ्या मुलांशी त्याने मैत्रीचे संबंध जोडले.

अभ्यासात त्याचे विशेष लक्ष नव्हते. पण वाचनात मात्र तो विलक्षण रंगून जात असे. वृत्तीने तो भावविश होता. एका काल्पनिक जगात रममाण होऊन राहण्याचा छन्द त्याला शैशवापासूनच जडलेला होता. संस्कारक्षम मनाची मुले जशी अंतरंगात एकाकी जीवन जगतात, तसेच जीवन फ्लॉबर्टही बाल्यावस्थेत जगला. एवढेच केवळ नव्हे, तर बालवयातच एकाकीपणाने पछाडलेला फ्लॉबर्ट *वृत्तीने आमरण तसाच एकाकी राहिला.*

बालवयातील अनुभवांविषयी फ्लॉबर्टने काही मनोरंजक आठवणी लिहिलेल्या आहेत. तो म्हणतो, 'वयाच्या केवळ दहाव्या वर्षी माझे नाव शाळेत घातले. आणि तदनंतर लगेच एकूण मनुष्यजातीविषयीच विलक्षण तिरस्कार माझ्या मनात निर्माण झाला.' वरवर दिसते, तसे हे विधान वाचकावर काही एक विशिष्ट परिणाम कर*ण्याच्या हेतूने लिहिलेले नाही, तर त्याच्या* लेखी तर ते सर्वस्वी खरेच होते.

बालवयापासून हा जो निराशावाद त्याने जोपासला, तो निराशवाद आमरण तसाच कायम टिकून राहिला. आता एक गोष्ट खरी की, रोमॅन्टिक प्रवृत्तीचा तो उत्कर्षकाल होता आणि निराशवाद तर तसा सर्वत्रच हवेत होता. फ्लॉबर्टच्या शाळेतील एका मुलाने मस्तकात गोळी घालून घेऊन आत्महत्या केली होती. तर दुसऱ्या एका मुलाने नेकटायचा गळफास लावून घेऊन जीव दिला होता. हे सर्व खरे असले, तरी फ्लॉबर्टच्या स्वाभाविक निराशेचा उलगडा त्यामुळे होत नाही.

त्याच्या बापाची सांपत्तिक स्थिती हेवा वाटण्यासारखी होती. त्याचे आईबाप प्रेमळ व मनापासून मुलांचे लाड करणारे असे होते. एका बहिणीचे त्याच्यावर विलक्षण प्रेम होते. आणि काही मित्रांविषयी त्याच्या अंतरंगात भावविवश असा जिव्हाळा होता. परिस्थिती सर्व बाजूंनी अशी अनुकूल असताना फ्लॉबर्टला मात्र जीवन असह्य वाटावे आणि माणसे तिरस्करणीय वाटावीत, हे असे का व्हावे, त्याचे समाधानकारक स्पष्टीकरण खरोखरच देता येत नाही. कारण प्रकृतीने तो तसा निरोगी होता, सशक्त होता, चांगला तगडा जवान होता.

बालवयातच त्याने लिहिलेल्या काही गोष्टी आजही उपलब्ध आहेत. या गोष्टीत स्पृहणीय असे फारसे काही नाही. त्या काळात रोमॅन्टिक वृत्तीचे कवी असे अतिरेकी, कृत्रिम, अलंकारिक व भडक लिहीत; तसेच फ्लॉबर्टचे बालवयातील हे लेखन आहे. या लेखनातही निराशेचे जे भयप्रद दर्शन घडते ते, त्या काळात प्रचलित असलेल्या लेखनाच्या एका अविभाज्य प्रवृत्तीचे द्योतक आहे, असे


आम्ही एकियाच्या बळे
एक धागा सुखाचा-अनंत उपयोगांचा
असा हा धागा-अखंड निर्माण करून
जीवनाच्या विविध दालनांत
सुख-समृद्धी फुलविण्याचे कामी आम्हास
यश येवो
या दीपावलीच्या शुभ-दिनी हीच प्रार्थना
GARWARE
गरवारे
गरवारे नायलॉन्स् लिमिटेड
मुंबई-पुणे रस्ता, पुणे-४११०१८
TOM & BAY/GN-7648/M

सकृद्दर्शनी वाटते.

पण वस्तुस्थिती मात्र तशी नाही. एक तर त्याचे हे लेखन केवळ प्रचलितास अनुसरणारे आहे, असे वाटत नाही. किंवा काही परदेशी लेखनप्रवृत्तींचा परिणाम या लेखनावर झालेला आहे, असेही दिसत नाही. त्याचा स्वभाव मूलतःच निराशाप्रवण होता. या सर्वंकष निराशेचे कारण शोधावयाचे असेल, तर ते त्याच्या शारीर विकृतिविशेषातच शोधावे लागेल.

फ्लॉबर्ट जेव्हा पंधरा वर्षांचा होता, तेव्हा असा एक प्रसंग घडून आला की, ज्या प्रसंगाचा संस्कार त्याच्या मनावर निरन्तर जन्मभर टिकला. त्या वर्षीच्या उन्हाळ्यात फ्लॉबर्ट कुटुंब ट्रोव्हिल येथे राहावयास गेले होते. त्या काळात ट्रोव्हिल हे एक सागरतीरावरील छोटेसे खेडेगाव होते. गावात फक्त एकच एक हॉटेल होते आणि या हॉटेलमध्ये या वर्षी मॉरिस श्लेसिंजर नावाचा एक संगीतप्रकाशक सपत्नीक येऊन राहिलेला होता. कालान्तराने फ्लॉबर्टने श्लेसिंजरच्या पत्नीचे रेखाटलेले शब्दचित्र उल्लेखनीय आहे.

'एलिसा चांगली उंचनिंच होती. तिचा वर्ण किंचित काळसर होता. तिचे काळे केस मोठे सुंदर होते आणि ते तिच्या खांद्यावर रुळत असताना मोठे विलोभनीय दिसत. तिचे नाक सरळ धारदार होते. डोळे तेजस्वी होते. भुवया उंचावलेल्या व धनुष्याकृती होत्या. तिची श्यामवर्ण अंगकांती तेजस्वी होती. आणि कशी कुणास ठाऊक, त्या तेजात सोनेरी छटा होती. तिचा बांधा अटकर आणि प्रमाणबद्ध होता. मस्तकापासून स्कंधापर्यंत उमटून दिसणाऱ्या तिच्या जांभळी मानेवरील नीलवर्ण रक्तवाहिन्या भारी सुंदर दिसत. तिच्या वरच्या ओठावर अत्यंत मुलायम अशी काळसर, रेशमी लव होती. त्यामुळे *तिच्या मुद्रेवर मर्दानी झाक उमटून दिसत* असे. तिच्या मुद्रेवरील खेळकर उत्साहाचा आविर्भाव इतका पराकाष्ठेचा लोभसवाणा होता की, गौरवर्णाच्या स्त्रियांशी तिची तुलनाही अशक्य वाटावी. तिचे बोलणे संथ होते. तिच्या आवाजात एक विलक्षण लय होती आणि तिच्या स्वरातील मार्दव केवळ संगीतमय होते.'

आता मान जांभळी कशी असते; असे सहजच तुम्ही विचाराल. *पण ते मानेचे* विशेषण चुकून पडलेले नाही. जांभळी मान हे भाषान्तर बिनचूक आहे. आता हे विशेषण तितकेसे आकर्षक वाटत नाही, चमत्कारिक वाटते; ही गोष्ट तर खरीच. माझी अशी समजूत आहे की, रोन्सार्कच्या एका अत्यन्त प्रसिद्ध कवितेच्या स्मरणातून नेमके हे विशेषण फ्लॉबर्टने उचलून योजिले आहे आणि एखाद्या सुंदर स्त्रीच्या मानेचे वर्णन करीत असताना 'जांभळी मान' असे म्हणणे कितपत सयुक्तिक दिसेल, *याविषयी त्याने* फारसा विचार केलेला नसावा. रोमॅन्टिक वृत्तीतून स्फुरलेल्या वर्णनाची गत अखेर ही अशीच व्हावयाची !

वरील वर्णन एवढ्या विस्ताराने उद्धृत करण्याचे कारण उघड आहे. वयाच्या केवळ पंधराव्या वर्षी फ्लॉबर्ट या स्त्रीच्या प्रेमात पडला. त्यावेळी तिचे वय होते सव्वीस. आणि तिचे मूल इतके लहान होते, की ती त्याला अंगावर पाजीत असे. फ्लॉबर्ट भित्रा होता. *आणि तिच्यासमोर ब्र काढण्याची* हिम्मत त्याला कधीच झाली नसती. पण तिचा नवरा मोठा दिलखुलास, आनंदी, गमत्या माणूस होता. आणि अशा माणसावरोबर दोस्ती करणे किती सोपे असते, हे तर सांगावयास नकोच.

घोड्यावरून रपेट करतेवेळी मॉरिस श्लेसिंजर पुष्कळ वेळा या कोवळ्या मुलाला बरोबर बाळगीत असे. आणि एकदा तर ते तिघे मिळून पडावात बसून जलपर्यटनासाठी गेले होते. पडावात फ्लॉबर्ट आणि एलिसा श्लेसिंजर शेजारी शेजारी *एकमेकांना खेटून* बसले होते. त्यांचे खांदे आणि बाहू परस्परांना स्पर्श करीत होते आणि तिच्या अंगावरील तलम वस्त्र त्याच्या हातावर हुळहुळत होते. अगदी हळूहळू मधुर आवाजात ती काही काही बोलत होती. पण त्या क्षणांना त्याच्या मनाचा इतका गोंधळ झाला *होता की*, तिच्या त्या सुंदर बोलण्यातील एक शब्दही मागाहून त्याला आठवेना !

अखेरीस तो उन्हाळा संपला. श्लेसिंजर मंडळी ट्रोव्हिलहून *परतली. फ्लॉबर्ट मंडळी* रुएनला आपल्या घरी आली आणि गुस्ताव्ह परत आपल्या शाळेत जाऊ लागला. अशा रीतीने फ्लॉबर्टच्या आयुष्यातील सर्वंकष अशा लोकविलक्षण प्रेमप्रकरणाची सुरुवात झाली होती.

*एलिसावरील त्याचे हे प्रेम आमरण* टिकून राहणार होते. तदनंतर दोन वर्षांनी तो परत ट्रोव्हिल येथे गेला आणि त्याने तेथल्या एकाकी हॉटेलमध्ये एलिसा श्लेसिंजरची चौकशी केली. तेव्हा त्याला कळले की, त्या वर्षीही तेथे येऊन काही दिवस ती राहिली होती. आणि तो तेथे येण्यापूर्वीच घरी परतली होती. आता तो सतरा वर्षांचा होता. दोन वर्षांपूर्वी जे काय घडले होते, त्यावेळी त्याची मनोवस्था मोठी चमत्कारिक झालेली होती *आणि त्या कोवळ्या वयात* प्रेम करणे म्हणजे नेमके काय, त्याचा धड अर्थही त्याला समजलेला नव्हता. एलिसाविषयी त्याच्या अंतरंगात तेव्हा उमटलेल्या अर्धस्फुट भावनेचे स्वरूप आता त्याच्या पूर्णपणे लक्षात आले होते.

आताचे त्याचे तिच्यावरील प्रेम पूर्वीपेक्षा सर्वस्वी वेगळे होते. त्या वेळी तो मुलगा होता आणि ती बाई होती. तर आता तो पुरुष होता आणि ती स्त्री होती. ती तेथे नाही, हे कळून आल्यामुळे त्याची वासना आता अधिकच उद्दीपित, प्रज्वलित झाली होती. रुएन येथे घरी परत आल्यावर पूर्वीच प्रारंभ केलेल्या एका *कथाभागाच्या लेखनास* त्याने परत नव्या दमाने हात घातला. ही कथा म्हणजे 'मेमॉयर्स ऑफ ए मॅडमन.' एका वेड्या माणसाची कहाणी. एलिसा श्लेसिंजरच्या प्रेमात तो कसा पडला, त्याचा सर्व वृत्तान्त या 'वेड्या माणसाच्या कहाणी'त त्याने मोकळेपणाने सांगून टाकला आहे.

एकोणिसाव्या वर्षी तो पदवीधर झाला, म्हणून बक्षिसादाखल त्याच्या बापाने कोणा डॉ. क्लोकेबरोबर *त्याला किरिनीस आणि* कॉर्सिका येथे सहलीसाठी पाठविले. त्याच्या समकालिनांनी या वयात त्याला 'जायन्ट'–राक्षस–म्हणून संबोधिलेले आढळते. पण त्याची उंची केवळ पाच फूट आठ इंच होती. त्यावरून तो काही राक्षस ठरत नाही !

उपर्युक्त वर्णनाचा इत्यर्थ एवढाच की, *त्या वेळी अंगापिडाने* तो चांगला मजबूत, भरलेला होता. त्याचा बांधा एकूण रोडातच जमा करावयास हवा. पण त्याचे व्यक्तित्व मनस्वी आकर्षक होते. *त्याच्या काळ्याभोर* भुवयांखालचे डोळे गडद हिरव्या रंगाचे होते. त्याचे लांबसडक रेशमी केस मानेवरून

खांद्यापर्यंत रुळत असत. या वेळी त्याच्याशी परिचित झालेल्या एका स्त्रीने चाळीस वर्षांनंतर त्याच्या आठवणी जागवीत असताना 'त्याचे दर्शन एखाद्या ग्रीक देवासारखे सुंदर होते,' असे लिहून ठेवले आहे.

कॉर्सिकाहून परत येतेवेळी हे दोघे प्रवासी वाटेत मार्सेल्स बंदरात मुक्काम करून राहिले. राहिले ते अर्थातच एका हॉटेलमध्ये. एक दिवस सकाळी समुद्रस्नान करून खोलीवर परत येत असताना हॉटेलच्या अंगणात बसलेली एक स्त्री त्याच्या डोळ्यांत भरली. ती तरुण होती आणि तिच्या अंगप्रत्यंगांतून उफाळणाऱ्या वासनेचे दर्शन विलक्षण उत्तेजक होते. थोड्या वेळाने त्याने तिची ओळख करून घेतली आणि नंतरच्या संभाषणात दोघेही रमून गेले.

त्या नवयौवनेचे नाव होते युलेली. तिचा नवरा फ्रेंच न्यायनामध्ये एक बडा अधिकारी होता आणि बंदरातच त्याचे स्वागत करावे, म्हणून ती मार्सेल्स येथे त्या हॉटेलमध्ये मुक्काम करून होती. गुस्ताव आणि युलेली या उभयतांनी ती रात्र एकत्र घालवली. याही आकस्मिक भेटीचे वृत्त त्याने लिहून ठेवले आहे. ज्वलंत वासनेचे शमन करणाऱ्या त्या मधुर मीलनरात्रीची तुलना त्याने हिमव्याप्त प्रदेशातील सूर्यास्ताशी केलेली आहे. तदनंतर त्याने मार्सेल्स सोडले आणि पुढील आयुष्यात तरी त्या उभयतांची फिरून गाठभेटही झाली नाही. संभोगाचा हा पहिला अनुभव त्याच्या मनावर अविस्मरणीय असा एक संस्कार उमटवून गेला.

या प्रसंगानंतर कायद्याचा अभ्यास करण्यासाठी म्हणून तो पॅरिसला गेला. वकिलीच्या व्यवसायात त्याला विशेष रस होता, असे मुळीच नाही. पण आयुष्यात कोणता तरी व्यवसाय पत्करणे तर भागच होते. पण लौकरच त्याला पॅरिसचा कंटाळा आला. कायद्याच्या लठ्ठ लठ्ठ ग्रंथांचा कंटाळा आला. विद्यापीठातील दिनक्रमाचा कंटाळा आला. तेथील सर्व विद्यार्थी अगदी सामान्य असल्यामुळे त्यांच्याविषयी त्याच्या मनात तिरस्कार उपजला होता. त्यांची मध्यमवर्गीय अभिरुची आणि त्यांचे आविर्भाव बघून तो अत्यंत बेचैन झाला होता.

याच काळात 'नोव्हेंबर' नावाची एक छोटी कादंबरी त्याने लिहिली. या दीर्घ कथेत त्याने युलेलीचे व आपले एका रात्रीचे ते अविस्मरणीय प्रेमप्रकरण रंगवले आहे. युलेलीच्या वर्णनातहि एक विशेष गंमत आढळून येते. एलिसाच्या उंच धनुष्याकृती भुवया, तिचे तेजस्वी डोळे, तिच्या वरच्या ओठावर निळसर छटेची रेशमी लव हे सारे एलिसाचे रूपविशेष त्याने युलेलीला बहाल करून टाकले आहेत !

अर्थातच एलिसा श्लेसिजरचा नाद त्याने मुळीच सोडला नव्हता. तिच्या नवऱ्याची फ्लॉबर्टने त्याच्या ऑफिसमध्ये एकदा भेट घेतली होती. त्या भेटीत मॉरिसने त्याला पुढील बुधवारच्या मेजवानीचे निमंत्रण दिले होते. दर बुधवारी त्याच्या घरी मोठा मेजावानीचा बेत असे. तेव्हा त्या बुधवारी फ्लॉबर्ट मोठ्या उत्साहाने मॉरिसच्या घरी घेऊन दाखल झाला.

एलिसाच्या रूपात यत्किंचितही बदल झालेला नव्हता. अगदी पहिल्या भेटीत ती जितकी सुंदर दिसली होती, तितकीच सुंदर याही वेळी ती त्याला दिसली. पहिल्या भेटीच्या वेळी तिच्या लेखी गुस्ताव्ह हा केवळ एक छोकरा होता, तर या भेटीच्या वेळी एकाएकी तो पुरुष झालेला तिला आढळला. तिच्या भेटीसाठी पराकाष्ठेचा उत्सुक असलेला असा तरुण, उमदा, देखणा, भावनोत्कट वृत्तीचा पुरुष. त्याचे आपल्यावर प्रेम जडले आहे, ते तिने तत्काळ ओळखले. गुस्ताव्हने श्लेसिजर पतिपत्नीशी जिव्हाळ्याचे निकट संबंध जोडले आणि तदनन्तर प्रत्येक बुधवारी श्लेसिजर कुटुंबातच त्याचा खाना झडू लागला. आणि ते तिघे एकत्र छोट्या छोट्या सहली काढू लागले.

पण फ्लॉबर्ट अजूनही पूर्वीसारखाच लाजाळू आणि भित्रा होता. आणि पुढेही कित्येक दिवसपर्यंत आपले मनोगत प्रेम शब्दातून प्रकट करण्याचे धैर्य त्याला झाले नाही. जेव्हा ते धैर्य त्याने पैदा केले आणि आपले प्रेम तिच्याजवळ प्रकट केले, त्यावेळी त्याच्या अपेक्षेप्रमाणे ती रागावली तर मुळीच नाही. त्याला मनातून भय वाटत होते, ते तिच्या रागाचे. ती रागावली तर मुळीच नाही, फक्त आपले शरीर त्याच्या स्वाधीन करण्यास तिने स्वच्छ नकार दिला. त्याची राख होऊन राहण्यास ती कबूल नव्हती.

एलिसाचीही कथा मोठी विलक्षण होती. फ्लॉबर्टने तिला इ. स. १८३६ मध्ये प्रथम पाहिले होते आणि त्या पहिल्या भेटीच्या वेळी आणि तदनंतरही दीर्घकाळपर्यंत इतर सर्वांप्रमाणेच त्याची ही समजूत अशीच झाली होती की, एलिसा मॉरिसची लग्नाची बायको आहे. पण वस्तुस्थिती मात्र तशी नव्हती.


एमिल ज्यूडी नावाच्या एका माणसाशी एलिसाचे पूर्वीच लग्न झालेले होते. पुढे हा ज्यूडी काही आर्थिक विपत्तीच्या कचाट्यात सापडला होता. तेव्हा मॉरिस श्लेसिजरने एका विलक्षण अटीवर त्याला जरूर ते आर्थिक साहाय्य देऊ केले होते. अट अशी की, त्याने फ्रान्स सोडून दूर देशी निघून जावे. आपल्या बायकोला त्याच्या हवाली करून. ज्यूडीने आपली अट–वचन दिल्याप्रमाणे पाळली. आणि तेव्हापासून मॉरिस श्लेसिजर आणि एलिसा ज्यूडी पतिपत्नीच्या नात्याने एकत्र राहू लागले. अर्थातच कायद्याप्रमाणे ती त्याची बायको होऊ शकत नव्हती. कारण त्या काळात फ्रान्समध्ये घटस्फोटाला अनुज्ञा नव्हती.

कालान्तराने इ. स. १८४० मध्ये ज्यूडी वारला. आणि मगच या उभयतांचा विवाहविधी शक्य झाला. ज्यूडीच्या अनुपस्थितीत आणि त्याच्या निधनानन्तरही एलिसाचे त्याच्यावरील प्रेम तसेच अखंड, अभंग राहिले होते, असे म्हणतात. हे पहिले प्रेम तर होतेच, पण आता अन्य एक निष्ठा तिच्या अन्तरात जागी झालेली होती. ज्याने तिला आपले घर आणि मूल दिले होते, त्या मॉरिसविषयीही कृतज्ञतेची भावना तिच्या मनात होतीच. या दोन्ही कारणांमुळे असेल कदाचित पण फ्लॉबर्टची वासना शमविण्यास तिने नकार दिला; ही गोष्ट खरी.

पण तरीही आपल्या उत्साही निश्चयापासून फ्लॉबर्ट तसूभरही ढळला नाही. आणि एक दिवस आपल्या खोलीवर येण्यासाठी त्याने एलिसाचे मन वळवले. धगधगत्या वासनेने पेटून उठलेला तरुण गुस्ताव्ह आपल्या खोलीवर तिची वाट बघत बसला. आपल्या प्रदीर्घ तपश्चर्येचे फळ कालावधीनन्तर का होईना, पण हस्तगत होणार अशा आनन्दभरात तो निमग्न होता. पण त्या वेळी संकेतस्थळी एलिसा आलीच नाही !

तदनन्तर इ. स. १८४४ मध्ये आणखी

# सिंदिया



**जहाजवाहतुकीसंबंधीची आपली कसलीही अडचण असो,**
**आपल्याला उत्तम सेवा हवी असेल तर सिंदियाकडे या.**
**आम्हाला फोन करा की झाले!**

किनारी वाहतुक
भारत, पाकिस्तान, श्रीलंका, बंगलादेश व ब्रह्मदेश

महासागरी वाहतुक
इंग्लंड, युरोप खंडातील देश, रशिया, ए.आर.ई., पोलंड, अमेरिका (यू.एस.ए.), पूर्व कॅनडा, ग्रेट लेक्स, पॅसिफिक पोर्टस, कॅरिबिअन पोर्टस.

पश्चिमी आशिआ (गल्फ), लाल समुद्र, स्ट्रेटस् पोर्टस, भूमध्य समुद्रातील बंदरे व पूर्व आणि पश्चिम आफ्रिका.

**दि सिंदिया स्टीम नॅव्हिगेशन कंपनी लिमिटेड**
सिंदिया हाऊस, नरोत्तम मोरारजी मार्ग,
बॅलार्ड इस्टेट, मुंबई-४०० ०३८
फोनः २६८१६१ ● टेलेक्सः ०११-२२०५
१५ पार्क स्ट्रीट, कलकत्ता-७०० ०१६
फोनः २४३४५६ ● टेलेक्सः ०२१-७३०५

**सिंदिया वर्कशॉप लि.**
(जहाज दुरुस्त करणारे, मरीन इंजिनियर्स, भारतात हॅच कव्हर्सच्या उत्पादनासाठी मॅक्ग्रेगॉर लायसन्सी)
पेटंट स्लीप, माझगांव, मुंबई ४०० ०१०
फोनः ३९२१५१
पी-२ टाराटोला रोड, कलकत्ता-७०० ०२४
फोनः ४५३१४४

AS-58

अशी एक घटना घडून आली की ज्या घटनेचे परिणाम त्याला पुढे जन्मभर भोगावे लागले. एका रात्री आपल्या आजोळहून रुएन येथील आपल्या घरी घोडागाडीतून आपल्या वडीलभावाबरोबर तो परत येत होता. त्याचा हा थोरला भाऊ त्याच्यापेक्षा नऊ वर्षांनी मोठा होता. आणि बापाच्याच व्यवसायात तो गढून गेला होता. या छोट्या प्रवासात काय आणि कसे घडले कोणास ठाऊक, पण एकाएकी आपले सर्व शरीर ज्वालांच्या गदारोळात जळून खाक होत आहे; असे त्याला वाटले. आणि बसल्या जागेवरून गाडीच्या तळाशी एखाद्या शिलेसारखा तो खाली कोसळला आणि तेथेच निपचीत पडून राहिला.

तो जेव्हा परत शुद्धीवर आला, तेव्हा त्याचे सर्वांग रक्ताने माखलेले होते. जवळच्याच एका घरात त्याच्या भावाने त्याला उचलून नेले आणि तेथे त्याच्या शरीरातून बरेच रक्त त्याने काढले. नन्तर मग भावाने त्याला तसाच गाडीत घातला आणि रुएनला आपल्या घरी आणला. तेथे त्याच्या बापाने परत त्याच्या अंगातून पुष्कळ रक्त काढले. त्याच्या गळ्यातून रक्तस्राव व्हावा, अशी योजना करण्यात आली होती. तेथील जखमेमुळे काही काळपर्यंत तो मनस्वी अस्वस्थ होता.

फ्लॉबर्टने धूम्रपान करू नये किंवा काही खाऊ वा पिऊ नये, अशी दक्षता काळजीपूर्वक घेण्यात येत होती. तदनंतर काही काळ त्याला अपस्माराने यावेत, तसे जोरदार झटके येत असत. त्याच्या दृष्टीत आणि श्रवणशक्तीत काही बिघाड होणार की काय, अशी परिस्थिती निर्माण झाली. तदनंतर मोठ्या आवेगाने त्याने हातपाय झाडले. आणि तत्क्षणी त्याची शुद्धबुद्ध हरपली. या सर्व श्रमयातनांनी त्याची शक्ती मनस्वी क्षीण झाली आणि त्याचे रक्ताभिसरण एकाएकी बंद पडते की काय, अशी भीती निर्माण झाली. नर्व्हस् ब्रेकडाऊनची ती सर्व पूर्वचिन्हे असावीत असे वाटले.

या त्याच्या विलक्षण आजाराचे गूढ अजूनपर्यंत नीटसे उकललेले नाही. नामवंत डॉक्टरांनी अनेकविध दृष्टिकोनांतून त्याच्या या आजाराची चिकित्सा केलेली आहे. काही तज्ज्ञांनी हे फेफरेच होय, असा अभिप्राय स्वच्छ नोंदवून ठेवला आहे. त्याच्या मित्रांचीही समजूत तशीच होती. त्याच्या पुतणीने त्याच्या आठवणी लिहिल्या आहेत. पण त्या आठवणीत त्याच्या या विलक्षण आजाराचा ओझरताही निर्देश केलेला आढळून येत नाही.

एम्. रेने दुमेस्निल हा स्वतः त्याच्याकाळातील एक प्रसिद्ध डॉक्टर होता. त्याने फ्लॉबर्टविषयी एक महत्त्वाचा ग्रंथ लिहिला आहे. त्याचे म्हणणे असे दिसते की, फ्लॉबर्टच्या रोगाचे निदान अपस्मार या रोगविशेषाने करता येणार नाही. तो म्हणतो; 'त्याचा रोग एपिलेप्सी नव्हे, तर हिस्टेरी–एपिलेप्सी होय.' फ्लॉबर्टसारखा एक जगद्विख्यात लेखक अपस्मारासारख्या रोगाने पछाडलेला होता, असे म्हटले तर त्याच्या लेखनाच्या महत्तेत काही उणीव उत्पन्न होण्याचा संभव आहे, अशी या डॉक्टरमहाशयांची समजूत झालेली दिसते !

संभव असा आहे की, त्याच्या कुटुंबातील मंडळींना गुस्ताव्हच्या आजाराचा हा धक्का फारसा जाणवला नसावा. आणि तो अगदी अनपेक्षित तर नसावाच. वयाच्या बाराव्या वर्षीच दृष्टिभ्रमाने आपल्याला पछाडलेले होते, असे फ्लॉबर्टने मोपासांला सांगितल्याचे प्रसिद्धच आहे.

फ्लॉबर्टच्या वयाच्या एकोणीसाव्या वर्षी त्याला किरिनीज–कॉर्सिकाच्या सफरीवर पाठविण्यात आले होते, तेही क्लोके नावाच्या एका डॉक्टरच्या सक्त देखरेखीखालीच. थारापालट हा नंतर त्याच्या बापाने त्याच्या व्याधीवरच्या उपाययोजनेचा एक भाग म्हणून जो योजलेला दिसतो, त्याचे तरी कारण काय ? फेफऱ्यासारख्या कोणत्या तरी व्याधीने त्याला पछाडल्याचेच हे द्योतक असावे. लहानपणी देखील इतर चार जणांसारखेच आपणही आहोत असे फ्लॉबर्टला केव्हाच वाटले नव्हते. त्याच्या वृत्तीत भिनलेल्या निराशेचा उलगडाही कदाचित या गूढ रुग्णावस्थेच्या परिणामी होण्यासारखा आहे.

ते काही असो, यापुढे आपल्याला एका भयावह अशा व्याधीशी सतत सामना द्यावयाचा आहे, हे त्याच्या लक्षात येऊन चुकले होते. ती व्याधी पुन्हा आणखी अशी की, जिची पूर्वचिन्हे सर्वस्वी अनपेक्षित असणार. परिणामी आपला जीवनक्रम आमूलाग्र बदलणे भाग आहे, असे त्याच्या मनाने घेतले असावे. तेव्हा कायद्याच्या अभ्यासाचा नाद–बहुतकरून आपखुषीनेच–सोडून देण्याचा त्याने निश्चय केला. आणखी दुसराही एक निर्णय त्याने त्याचवेळी बहुतकरून मनाशी घेतला असावा. हा निर्णय म्हणजे लग्न न करण्याचा !

इ. स. १८४५ मध्ये त्याचा बाप मरण पावला. आणि तदनंतर लगोलग दोनच महिन्यांनी त्याची बहीण कॅरोलिन हीही बाळंतपणात मरण पावली. कॅरोलिनवर गुस्ताव्हचे विशेष प्रेम होते. लहानपणी ही दोन भावंडे सदैव एकत्र असत. आणि तिच्या लग्नाच्या दिवसापर्यंत तीच त्याची निकटतम आणि सर्वांत लाडकी अशी मैत्रीण होती.

आपल्या निधनापूर्वी काही थोडे दिवसच आधी डॉ. फ्लॉबर्टने क्रॉयसेत नावाची एक सुन्दर वास्तू खरीदलेली होती. सीन नदीच्या काठावर दोनशे वर्षांपूर्वीचे हे जुनेपुराणे घर कोणा हौशी माणसाने बांधले असावे. घर चिरेबंद, दर्शनी एक मोकळा व्हरांडा आणि नदीच्या पाण्यावर ओणवलेले असे एक चिमुकले आउट हाऊस अशी या वास्तूची एकूण रचना होती. आपला मुलगा गुस्ताव्ह आणि नात यांना बरोबर घेऊन डॉ. फ्लॉबर्टची आई या क्रॉयसेत नावाच्या वास्तूत वास्तव्यासाठी येऊन राहिली. तिचा थोरला मुलगा हा व्यवसायाने आपल्या बापासारखाच सर्जन होता. रुएन येथील हॉस्पिटलचा व घराचा ताबा स्वाभाविकच त्याच्याकडे आला. त्याचे लग्न झालेले होते. तेव्हा आता त्याची तशी काहीच चिन्ता नव्हती. क्रॉयसेत हेच तदनंतर फ्लॉबर्टचे निवासस्थान अखेरपर्यंत राहणार होते.

अगदी लहानपणापासून फ्लॉबर्ट काही ना काही लिहीत होताच. सर्वसामान्य माणसांच्या सहवासाला तो तेव्हापासूनच मुकलेला होता. आणि आता तर आपले सर्व उर्वरित आयुष्य वाङमयालाच अर्पण करण्याचा निर्णय त्याने लगोलग घेतला. तळमजल्यावरील एक मोठी खोली आपल्या लेखन–कामासाठी त्याने पसंत केली. या खोलीच्या खिडकीतून बाहेर डोकावले की, सभोवारची शानदार बाग आणि पलीकडची ओघवती नदी या प्रसन्न दृश्याचे दर्शन सहज घडत असे.

क्रॉयसेतला आल्यावर त्याने आपल्या जीवनक्रमाला कठोर शिस्तीचे वळण लावले.

सकाळी दहा वाजता तो उठत असे. नंतर पत्रे व वृत्तपत्रे चाळून झाली की, अकराच्या सुमारास तो न्याहारी करी आणि एक वाजेपर्यंत व्हरांड्यात, गच्चीवर किंवा आऊटहाऊसमध्ये तो वाचन करीत बसे. एक वाजला की, निश्चयाने तो जो लेखनासाठी म्हणून बसे, तो सात वाजेपर्यंत उठत नसे. भोजनोत्तर सभोवतालच्या बागेत तो शतपावली करीत फिरे आणि नंतर पुन्हा तो स्वतःला कामास जुंपून घेई, तो अमर्याद काळपर्यंत. थकवा आला की, तो बिछान्यावर जाऊन पडे.

येथे तो कोणाच्याही भेटीगाठी घेत नसे. अधूनमधून त्याच्या अंतरंगातील विश्वस्त अशा एक-दोन खास मित्रांना तो आपल्या घरी बोलावून ठेवून घेत असे. आपल्या लेखनाची चर्चा तो फक्त त्यांच्याशीच करी. अन्यथा क्रॉयसेतबाहेरच्या जगाशी त्याचा संबंध जवळपास तुटल्यासारखाच होता.

परंतु काही लिहावयाचे असेल तर, जीवनानुभवाची नितांत आवश्यकता आहे, याची जाण त्याला होती. आणि म्हणून जीवनाच्या धवडग्यापासून दूर एकांत विजनात संन्यस्त वृत्तीने राहून भागण्यासारखे नाही, हेही त्याला समजत होते. त्यामुळे वर्षातून तीन-चार महिने पॅरिसला जाऊन राहणे तो कधी चुकवीत नसे.

लेखक म्हणून कालांतराने त्याचा लौकिक सर्वदूर पसरल्यावर त्याच्या काळातील बुद्धिमंतांचा आणि प्रतिभावंतांचा परिचय त्याने करून घेतला. त्याची स्तुती सर्वांनीच केलेली आढळते. पण त्याच्यावर प्रीती करावी असे स्तुतिपाठकांना फारसे वाटले नसावे, अशी काही कारणांनी माझी समजूत झालेली आहे. त्याचे परिचित व तो स्वतः यांजमध्ये फारसा जिव्हाळा उत्पन्न झाल्याचे आढळून येत नाही.

परिचितांना त्याची संस्कारक्षमता मनस्वी त्रासदायक वाटत असावी. भरीस भर म्हणून तो चिडखोर होता. आपल्या मताचा प्रतिवाद कोणी केलेला त्याला खपत नसे. कोणी कधी मतभिन्नता व्यक्त करण्यास धजावलेच, तर त्याचा राग केवळ अनावर होत असे, या जाणिवेने त्याच्याशी वाद घालण्यास त्याचे मित्रही धजावत नसत. दुसऱ्यांच्या लेखनावर त्याने केलेली टीका नेहमीच मर्मभेदक व जहाल असे व आपल्याला जे करणे जमत नाही, ते सर्वच तद्दन निरुपयोगी असले पाहिजे, अशी त्याची धारणा होती. ती धारणा बहुतकरून सर्वच लेखकांची असल्याचे मला आढळून आले आहे.

उलट पक्षी अन्य कोणी त्याच्या लेखनावर प्रामाणिक टीका केली तर, तो मनस्वी संतप्त होत असे व आपल्यावरील टीकेचा उगम मत्सरभावनेत, दुष्ट सूडबुद्धीत वा असमंजस मूर्खपणात झालेला असल्याचे तो बिनदिक्कत म्हणत असे. हीही वृत्ती अनेक प्रसिद्ध लेखकांच्या स्वभावाची एक अविभाज्य घटक असल्याचे मला दिसून आले आहे. उदरनिर्वाहासाठी लेखन करणारे वा जगात पुढे येण्यासाठी धडपडणारे लेखक त्याला मंजूर नव्हते. आणि अशा लेखकांविषयी सहानुभूतीचा अंशही त्याच्या मनात नसे. पैशासाठी लिहिणे म्हणजे अधःपतनाचा मार्ग धरणे, असे त्याचे निश्चित मत होते. पैशाविषयी कलाकाराने निरपेक्ष असावे, हे मत निग्रहाने मांडणे त्याच्या लेखी तसे सोपे होते. कारण उदरनिर्वाहासाठी विवंचना करण्याचा प्रसंग त्याच्यावर आयुष्यात कधी आलेला नव्हता.

पण हे सर्व पुढील काळाविषयी झाले. इ. स. १८४६ मध्ये पॅरिसच्या एका मुक्कामात शिल्पकार प्रादिएरच्या स्टुडिओत लुइसा कोलेत नावाच्या एका कवयित्रीशी त्याचा परिचय घडून आला. तिचा पती हिपोलाइत कोलेत हा संगीताचा प्राध्यापक होता. तर तिचा प्रियकर व्हिक्टर कझिन हा तत्त्वज्ञानाचा अभ्यासक होता. जगात पुढे पुढे करण्याची वृत्ती व समाजाच्या वरच्या थरात मिसळण्याची कला अंगी असली की, लेखनक्षमतेची उणीव सहज भरून काढता येते. अशा भ्रमात मिरवणाऱ्या अनेक स्त्रियांपैकी ती एक होती.

सुदैवाने लुइसाला सौंदर्यही लाभलेले असल्यामुळे वाङमयाच्या क्षेत्रात स्वतःच्या नावाचा तिने काही एक दबदबा निर्माण करून ठेवला होता. तिच्या स्वतःच्या निवासस्थानी अनेक सुप्रसिद्ध स्त्री-पुरुषांना ती आकृष्ट करू शकत असे. आणि तिच्या तालावर नाचणारे लोक तिचा निर्देश कलादेवता म्हणून करीत. आपल्या रुपेरी कुरळ्या केसांची वलये मुद्रेच्या सभोवार ती लोंबती सोडत असे. भावनेत भिजून चिंब झाल्यासारखा तिचा आवाज प्रसंगी पराकाष्ठेचा कोमल होत असे.

एका महिनाभराच्या अवधीतच फ्लॉबर्ट या भावविवश कवयित्रीवर मनस्वी प्रेम करू लागला. तिचा प्रियकर होण्याचे भाग्य नंतर त्याला लाभलेले असले तरी, तिच्या तत्त्वज्ञानी प्रियकराची जागा तो घेऊ शकला नाही. कारण त्या संबंधाला अधिकृत मान्यता होती, असे दिसते. फ्लॉबर्ट या रूपवती कवयित्रीचा प्रियकर झाला, असे मी म्हणतो, ते देखील एका विशेष मर्यादित अर्थाने. कारण तदनंतर काही काळपर्यंत तरी निदान अंतःकरणातील प्रक्षोभामुळे असो वा स्वाभाविक भीरुतेमुळे असो, तो तिला वश करून घेऊ शकला नाही, ही वस्तुस्थिती आहे.

पहिल्या परिचयानंतर तो क्रायसेत येथे परतून घरी आला आणि तेथून त्याने आपल्या या प्रेयसीला उद्देशून लोकविलक्षण असे एक पहिले प्रेमपत्र लिहिले. तदनन्तर अशी असंख्य प्रेमपत्रे तो लिहीत राहणार होता. जगातील कोणत्याही प्रेमिकाने आपल्या प्रेयसीला उद्देशून अशी जगावेगळी विचित्र प्रेमपत्रे लिहिलेली नसतील.

या सुंदर कवयित्रीचे फ्लॉबर्टवर प्रेम होते. पण तिच्या प्रेमात अहंकार आणि मत्सर या भावनांचे काही एक चमत्कृतिजनक असे संमिश्रण होते. परिणामी त्याच्यावर तिला एकटीलाच सर्वस्वी, संपूर्ण असा अधिकार हवा होता. फ्लॉबर्टचे प्रेम या जातीचे नव्हते. एका सुप्रसिद्ध आणि सुंदर स्त्रीचे प्रेम आपण संपादन केले आहे, यामुळे त्याचा अहंकार व स्वाभिमान जरूर सुखावला होता. पण फ्लॉबर्टची वृत्ती कल्पनाचित्रात रंगून जाणारी होती. आणि स्वप्नरंजनात देहभान विसरणाऱ्या बहुतेक सर्व कामुकांची जी अवस्था होते, तीच त्याची झाली.

मीलनरात्रीची वाट पाहण्यात एक अनावर असा उन्माद होता. पण अपेक्षेच्या तुलनेने अपेक्षापूर्ती फारच कमी पडली. अपेक्षेत जो उन्माद होता, त्या उन्मादाचा अंशमात्रही ऐन अपेक्षापूर्तीच्या क्षणी त्याला लाभला नाही. पॅरिसमध्ये प्रत्यक्ष तिचा सहवास भोगत असताना त्याला तिचे जे आकर्षण वाटे, त्यापेक्षा कितीतरी पटींनी विरहकाळात तो क्रॉयसेत येथे असताना ते आकर्षण वाढल्याचा अनुभव त्याला येत असे. आणि तसे त्याने तिला स्वच्छ लिहूनही कळवले होते. त्याने पॅरिसलाच बिऱ्हाड करून

राहावे, अशी तिची इच्छा होती. तर त्यावर त्याचे उत्तर असे होते की, आईला सोडून दूर राहणे केवळ अशक्यच आहे.

मान्तेस येथे क्वचित कधी ती दोघे भेटत, तेथे किंवा पॅरिस येथे त्याने वारंवार यावे. असा लकडा तिने त्याच्यामागे लावला. तेव्हा विश्वसनीय अशी चांगलीशी सबब असल्याशिवाय घर सोडून आपल्याला दूर राहता येणार नाही, असे त्याने निक्षून सांगितले. त्याच्या या उत्तराचा स्वाभाविकच तिला राग आला, आणि रागारागाने तिने त्याला विचारले, 'अरे, वयात आलेल्या एखाद्या मुलीवर जशी पाळत ठेवतात, तशी पाळत का कोणी तुझ्यावर ठेवली आहे?'–तू पॅरिसला येऊन राहणार नसशील तर मग मीच क्रॉयसेतला तुझ्या घरी येऊन राहते. असेही निर्धाराने तिने त्याला सांगून पाहिले. पण कोणत्याही परिस्थितीत तिला तसे करता येणार नाही, म्हणून त्याने तिला निक्षून सांगितले.

'हे कसले तुझे मुलुखावेगळे प्रेम?' एका पत्रात तिने त्याला विचारले. निदान तुझ्या या प्रेमाची किंमत तुला फारशी वाटत नाही, असे दिसते. तिच्या या टोमण्यावर त्याने जे प्रत्युत्तर लिहिले, ते त्याच्या अवघ्या व्यक्तित्वावर प्रकाश पाडणारे असे आहे. तो लिहीतो; 'माझे तुझ्यावर खरोखरच प्रेम आहे काय? असे तू मला विचारले आहेस. होय! माझे खरोखरच तुझ्यावर प्रेम आहे. पण माझ्या प्रेमाची मर्यादा तू जाणून घ्यायला हवीस. माझ्या आयुष्यात प्रेमाचा क्रमांक पहिला नाही, तर दुसरा आहे.' खरोखर, या असल्या उत्तरप्रत्युत्तरातून त्याचे अंतरंग स्वच्छ प्रगट झालेले दिसते. प्रेमात पडलेल्या स्त्रीशी प्रेमिकाने कसे वागावे, या विषयातील समजूत त्याला मुळीच नव्हती; असे वाटते. या संबंधातील एक दोन गमतीची उदाहरणे मनोरंजक ठरावीत.

मार्सेल्स येथे जिचा सहवास एक रात्र भोगला, त्या युलेली फौकौदचा पत्ता जवळपास कायेन येथे राहणाऱ्या आपल्या एका मित्राच्या मदतीने आपल्या या प्रेयसीने शोधावा, आणि एवढेच केवळ नव्हे; तर आपले पत्र तिने युलेलीला पोचवण्याची व्यवस्था करावी, असे त्याने तिला खुशाल सांगितले. त्याला खूष करण्यासाठी तिनं ही कामगिरी पत्करली खरी. पण या बाबतीतील तिची चीड बघून त्याला जो अचंबा वाटला तो केवळ अतर्णनीय असा आहे.

बरे, येथपर्यंत तो जाऊन थांबता, तरी हरकत नव्हती. पण एवढ्यावरच त्याचे समाधान होण्यासारखे नव्हते. बाजारात लिलाव मांडून बसलेल्या वेश्यांकडे जाऊन आपली देहलालसा आपण असंख्य प्रसंगी तृप्त करून घेतली होती, हे तर त्याने स्वतःच स्वच्छ लिहून ठेवले आहे. पण वेश्यांशी झालेल्या या भेटीगाठींचे वृत्तान्त आपल्या प्रेयसीला असे सादर करण्याची काही आवश्यकता होती काय? पण फ्लॉबर्टने तेही केले!

आता वेश्यासंबंधीचा विषयच निघाला आहे, म्हणून त्याविषयी थोडे लिहिणे भाग आहे. स्त्रीसंबंधाविषयी पुरुष जितके खोटे खोटे बोलतात वा लिहितात, तितके अन्य कोणत्या एका विषयाविषयी ते लिहीत अन् बोलत असतील; असे वाटत नाही. वेश्यांच्या भेटीगाठीविषयी फ्लॉबर्ट जो एवढ्या मोठ्या उत्साहाने लिहितांना आढळतो, त्याचे कारण मला वाटते की आपल्या पौरुषाचे ते प्रत्यन्तर मानले जावे, अशी त्याची इच्छा असावी. पौरुष वेगळे, आणि पौरुषाचे प्रदर्शन वेगळे! एखादा माणूस आपल्या पौरुषाचे प्रदर्शन

*With Best Compliments*

*of*

**D. S. P. Financial Consultants Ltd.**

**10, Stock Exchange Building,**

**Apollo Street,**

**Bombay–400 023**

मांडून आपल्याला भेटलेल्या स्त्रियांच्या संबंधी तो बोलू लागतो, तेव्हा त्याच्या या अशा बोलण्यात काही खामी आहे; असे मला वाटते.

फ्लॉबर्टची पौरुषवासना फारशी प्रबळ नसावी. व ती तशी अनावर तर नव्हतीच नव्हती. *अपस्माराचे वा अपस्मारसदृश अशा* दुसऱ्या कोणत्या एखाद्या वातविकाराचे झटके त्याला आले की, तो किती दुर्बळ आणि उदासवाणा होत असे, ते त्याचे त्यालाच माहीत! अशा शरीरावस्थेत उत्तेजकांच्या अंमलाखाली तो नेहमी असे. आपल्या या तरुण आणि सुंदर व भावविवश प्रेयसीची भेट वारंवार घेण्यासंबंधी तो असा उदासीन दिसतो, आणि या वेळी तो ऐन पंचविशीत होता, तेव्हा त्याच्या या लोकविलक्षण उदासीनतेचे कारण एकच संभवते. स्त्री-संभोगाविषयी त्याची वासना तितकीशी प्रज्वलीत नसावी.

हे प्रेमप्रकरण– का काय असेल ते– एकूण नऊ महिने टिकले. इ. स. १८४९ मध्ये फ्लॉबर्ट मॅक्झिम कॅम्प नावाच्या आपल्या दोस्ताबरोबर पूर्वदिशेच्या सफरीवर निघाला, आणि ईजिप्त–पॅलेस्टाइन, सीरिया व ग्रीस हे देश पाहून इ. स. १८५१ च्या वसंत ऋतूत ते दोघे फ्रान्सला परत आले. तदनंतर लगेच फ्लॉबर्टने लुइसा पोलेतशी पूर्वसंबंध प्रस्थापित केले. पूर्वसंबंध म्हणजे अर्थातच पत्रव्यवहाराचे. हा पत्रव्यवहार उत्तरोत्तर अधिकाधिक त्रासदायक ठरू लागला. उभय पक्षी. ती त्याला पॅरिसला येऊन राहण्याविषयी किंवा आपल्याला क्रॉयसेतला येऊ देण्याविषयी आग्रह करू लागली. तर अनेक सबबी सांगून तिची मागणी पुरी करण्याची टाळाटाळ तो करू लागला. पॅरिसला जाण्याचे त्याने टाळले. आपल्या घरी येऊन राहण्यासाठी त्याने तिला परवानगी दिली नाही. आणि इ. स. १८५४ मध्ये त्याने तिला अखेरचे पत्र लिहून कळविले की, यानंतर आपली भेट कधीच होणार नाही!

ते पत्र मिळताक्षणी घाईघाईने ती स्वतःच क्रॉयसेतला निघून आली. पण त्याने तिला उद्धटपणाने आपल्या घराबाहेर काढले. फ्लॉबर्टच्या आयुष्यातील चित्तनीय असे हे शेवटचेच प्रेमप्रकरण होय. या प्रेमप्रकरणात वाङ्मय अधिक होते. आणि त्यामानाने प्रेम कमी होते! भावनोत्कट अनुभवाची जागा या अंतिम प्रेमप्रकरणात भावविवश अभिनयानेच अधिक घेतलेली दिसते.

आपल्या सर्व आयुष्यात ज्या एका स्त्रीवर त्याने अगदी मनापासून भावनोत्कट प्रेम केले, अशी स्त्री म्हणजे फक्त एलिसा श्लेसिजर हीच होय. तिच्या नवऱ्याला जुगारात मोठी खोट बसली होती. आणि आर्थिक दुरावस्थेमुळे श्लेसिजर कुटुंब बेडन येथे राहवयास गेले होते. तदनंतर वीस वर्षांत फ्लॉबर्टने एलिसाचे दर्शनदेखील घेतले नव्हते. तोपर्यंत दोघेही पुष्कळच बदलली होती. मध्यंतरी ती रोड झालेली होती. तिच्या त्वचेच्या रंगांची नाजूक लय बिघडली होती. आणि तिचे केस रुपेरी झाले होते. तर तो आता खूपच लठ्ठ झाला होता. पहिल्या भेटीत ज्या ओठावर मिसरूडदेखील उगवलेली नव्हती. त्या ओठावर आता मिशांचे दाट जंगल माजले होते. आणि डोक्यावरील टक्कल लपविण्यासाठी तो आता एक काळी टोपी वापरू लागला होता.

अशा वेळी ते एकदा परस्परांस भेटले व पुन्हा वेगळे झाले! इ. स. १८७१ मध्ये मॉरिस श्लेसिजर मरण पावला. त्या वेळी ज्या स्त्रीवर त्याने पस्तीस वर्षे अखंड प्रेम केले होते, त्या स्त्रीला उद्देशून त्याने पहिले प्रेमपत्र लिहिले! नेहमी आपल्या पत्रांच्या प्रारंभी 'डीअर मदाम' असा मायना तो योजीत असे. तर या प्रेमपत्राची सुरुवात त्याने– 'माझ्या पूर्वप्रेमा, माझ्या चिरप्रेमा', अशी केली. एकदा काही कामकाजाच्या निमित्ताने ती फ्रान्समध्ये परत आली. उभयतांची भेट प्रथम क्रॉयसेत येथे झाली. नंतर आणखी एकदा पॅरिसमध्ये भेट झाली. तदनंतर उभयतांची भेट कधीच झाली नाही. आणि तशी भेट झालीच असल्यास जगाला त्याची वार्ता नाही.

पूर्व प्रदेशातून प्रवास करीत असते वेळी फ्लॉबर्ट आपल्या मनात सर्वतोपरीनी नवीन असलेल्या अशा एका कादंबरीची कल्पना मनात घोळवीत होता. ही कादंबरी म्हणजेच नंतर विख्यात झालेली 'मदाम बोव्हारी' ही होय. ही कादंबरी त्याने कशी लिहिली, त्याविषयी साद्यन्त वृत्तांत उपलब्ध आहे. या कथेची कथा मोठी विलक्षण आहे.

इटलीतील प्रवासात जिनोआ येथे ब्रूघेल नामक एका नामांकित चित्रकाराने काढलेले एक चित्र त्याच्या डोळ्यात आणि मनात फार ठसले. चित्राचे नाव होते 'टेम्प्टेशन ऑफ सेन्ट ॲन्थनी.' तदनंतर फ्रान्समध्ये परत आल्यावर कालोत नामक एका कलाकाराचे याच विषयावरील एक चित्रशिल्प त्याने खरेदी केले. या चित्रांच्या संबंधातील सर्व उपलब्ध साहित्याचा त्याने मनःपूर्वक अभ्यास केला. आणि आवश्यक ती सर्व माहिती गोळा केल्यावर त्या माहितीतील तुटक दुव्यांची त्याने आपल्या मनाशी काही एक संगती लावली. या दोन चित्रांनी सुचविलेली कथा त्याने लिहून काढली.

लेखन संपल्यावर ती वाचून दाखविण्यासाठी आपल्या अंतरंगातील दोन निकट मित्रांना त्याने क्रॉयसेत येथे बोलावून घेतले. दुपारी चार तास आणि रात्री चार तास, याप्रमाणे सतत चार दिवस त्या कथेचे वाचन त्याने आपल्या मित्रांच्या उपस्थितीत केले. सर्व कथा वाचून पुरी झाल्याशिवाय तिच्याविषयी एका अवाक्षरानेही कोणी काही बोलावयाचे नाही, असे अगोदरच त्या तिघांचे आपसात ठरले होते. चौथ्या दिवशी मध्यरात्री कथेचे वाचन संपल्यावर पुढचातील टेबलावर दणक्यात मूठ आदळून त्याने आपल्या दोस्तांना जोरात दटावले : 'हूं' बोला आता.'

तेव्हा त्यांच्यापैकी एक मोठ्या निग्रहाने म्हणाला : 'आम्हाला वाटते की, हे तुझे हस्तलिखित तू जाळून टाकावेस आणि फिरून कधी याविषयी तू कधी अवाक्षरही काढू नये.' हा आघात केवळ असह्य असा होता. त्या आघाताचा परिणाम किंचित सौम्य करण्याच्या उद्देशाने दुसऱ्या दिवशी तोच मित्र फ्लॉबर्टला पुन्हा म्हणाला : 'अरे, तू असे का करीत नाहीस? देला मेअरची गोष्ट तू का लिहून काढत नाहीस?' ही सूचना ऐकताच क्षणभर सुन्न झाल्यागत तो स्तब्ध बसला. नंतर त्याची मुद्रा उजळली आणि तो म्हणाला : 'हो, हो. जरूर! का नाही?'

देला मेअर हा रुएन येथील रुग्णालयात कायम वास्तव्य करून राहणारा असा एक रोगी होता आणि त्याची गोष्ट सर्वांनाच माहीत होती. रुएनपासून जवळ असलेल्या एका छोट्या गावात या देला मेअरचा छोटासा दवाखाना होता. आपल्यापेक्षा वयाने पुष्कळच अधिक असलेल्या एका विधवेशी त्याने लग्न केले होते. ती मरण पावल्यावर शेजारच्या शेतकऱ्याच्या एका तरुण, सुंदर मुलीशी त्याने फिरून लग्न केले होते.

दुसऱ्या लग्नाची ही छटेल बायको श्रीमंतीची स्वप्ने पाहणारी आणि बेसुमार उधळपट्टी करणारी अशी होती. आपल्या वयस्क आणि निरुत्साही नवऱ्याचा तिला लवकरच कंटाळा आला आणि तिच्या सुंदर

रूपाने आकृष्ट झालेल्या अनेक प्रेमिकांशी तिने संबंध जोडले. छानछोकीचे नवे नवे वस्त्रविशेष खरेदी करण्यासाठी तिने अतोनात पैसा उधळला. घरचा सर्व पैसा संपला, तेव्हा तिने कर्ज काढून वस्त्रालंकार विकत घेण्याचा सपाटा चालवला. अखेरीस विष खाऊन तिने आत्महत्या केली. ही अशी होती देला मेअरची शोककथा. फ्लॉबर्टने मोठ्या निष्ठेने देला मेअरच्या या गोष्टीचा पाठपुरावा केला. गोष्ट तशी लहानशीच होती. सर्वसामान्य क्षुद्र माणसाची. हीच गोष्ट त्याने नंतर लिहून पुरी केली.

'मदाम बोव्हारी' लिहावयास सुरुवात केली, तेव्हा तो तीस वर्षांचा होता. तोपर्यंत त्याने लिहिले होते पुष्कळ; पण त्या लेखनातील एक अवाक्षरही त्याने केव्हा प्रसिद्ध केले नव्हते. 'टेम्प्टेशन ऑफ सेन्ट अँथनी'चा एक अपवाद वगळला, तर त्याचे महत्त्वाचे सर्व लेखन सर्वथा वैयक्तिक असे होते.

खरे तर आपल्या पूर्वायुष्यातील अनेक प्रेमप्रकरणांना त्याने कथारूप दिले होते. स्वानुभवाचे ते निवेदन होते. 'मदाम बोव्हारी'च्या लेखनास तो उद्युक्त झाला तेव्हा प्रारंभापासूनच त्याचे उद्दिष्ट पूर्वनिश्चित होते. केवळ वास्तववादी कथा लिहावयाची, एवढाच मर्यादित असा त्याचा उद्देश नव्हता. तो तर होताच, पण आपले कथानिवेदन सर्वथा निर्लिप्त, निःपक्षपाती व्हावे, याविषयी तो मनस्वी दक्षता घेत होता.

जे काय घडले होते, त्याचे प्रामाणिक निवेदन करावे, त्या निवेदनात कल्पित असत्याची भेसळ होणार नाही, अशी काळजी घ्यावी, कथेतील कोणत्याही भल्याबुऱ्या व्यक्तींपैकी कोणाचीच स्वतः बाजू घेऊ नये, कथेतील कोणत्याही व्यक्तीत वा घटनेत स्वतःला गुंतवू नये, हे धोरण त्याने प्रारंभापासूनच अंमलात आणले होते. जे काय लिहावयाचे, ते केवळ वस्तुस्थितीला स्मरून. कोणत्याही घटनेसंबंधी वा त्या घटनेत गुंतलेल्या व्यक्तीसंबंधी टीकेचे एक अवाक्षरही उच्चारायचे नाही, कोणाचीही कोणत्याही कारणासाठी स्तुती करावयाची नाही, अर्थातच निंदाही करावयाची नाही, कोणत्या एखाद्या व्यक्तीविषयी सहानुभूती वाटली तरी ती शब्दमात्राने दाखवावयाची नाही, कोणाच्या मूर्खपणामुळे वैताग उत्पन्न झाला वा कोणाच्या दुष्टपणाचा संताप वाटला, तरी त्याविषयी सर्वथा मौन धारण करावयाचे; थोडक्यात म्हणजे स्वतःला गोष्टीत मिसळू द्यावयाचे नाही, अशा बाण्याने फ्लॉबर्टने 'मदाम बोव्हारी'ची ही कथा लिहून काढली आहे.

आणि याच कारणामुळे असेल कदाचित, अनेक वाचकांना या कथेत उत्साह वाटेल, असे काहीच आढळत नाही. त्यांना ही कथा थंड वाटते. ज्या निवेदनातून लेखकाने स्वतःला बुद्धिपुरस्सर वगळून बाजूला काढले आहे, अशा या लेखनात कोणाला उत्तेजक असे काहीच आढळले नाही तर त्यात आश्चर्य वाटावयास नको. कथेतील स्त्री-पुरुषांच्या नानाविध वर्तनाचे जे संस्कार वाचकांच्या मनावर उमटतात, त्या संस्कारात स्वतः लेखकही सहभागी आहे, ही जाण—क्वचित आपल्या दुर्बलतेची द्योतक असेलही पण—वाचकांना मोठी सुखप्रद वाटते, अशी माझी समजूत आहे.

सर्वथा लेखकनिरपेक्ष अशा निवेदनाचा फ्लॉबर्टचा हा यत्न काही एका प्रमाणात अपेशी ठरणे क्रमप्राप्तच ठरते. निर्लिप्त निवेदनाची आकांक्षा धरणाऱ्या प्रत्येक कथाकाराची गत अशीच होते! कारण निवेदनात संपूर्ण निर्लिप्तता केवळ अशक्य आहे. कथाकाराने आपल्या कथेतील स्त्री-पुरुषांना स्वतःच बोलू द्यावे आणि त्यांच्या त्यांच्या स्वभावविशेषातून त्यांची कृत्ये कशी जन्मास

**ARVIND DYES and CHEMICALS**

YOGESHWARA, 3rd FLOOR
135/137, KAZI SAYED STREET, KHARD BAZAR,
BOMBAY 400 003.

*DEALERS IN :*

**DYES and CHEMICALS**

**Tel. No. Office : 345315**
**Resi. : 252296**

आली ते दाखवावे.

उलटपक्षी लेखक स्वत: कथेत घुसला की, त्याचे अनावश्यक अस्तित्व वाचकाला मनस्वी त्रासदायक वाटते. आपल्या नायिकेच्या सौंदर्याकडे वा खलनायकाच्या दुष्टतेकडे लेखकाने जाणूनबुजून वाचकांचे लक्ष वेधले की, काही वाचकांना कसेसेच वाटते. तो उपदेशाचे डोस पाजू लागला, अनावश्यक विषयांतरात रमू लागला, किंबहुना ज्यांची गोष्ट तो सांगतो आहे, अशा व्यक्तींपैकी तो स्वत:च एक झाला, तर ते आजच्या वाचकाला फारसे आवडत नाही. खरे तर निवेदनाची ही केवळ एक रीत आहे.

काही श्रेष्ठ कथाकारांनी हीच रीत योजून आपल्या कथा विलक्षण परिणामकारक केलेल्या आहेत. ही रीत आज सर्वथा कटाप झालेली दिसत असली तरी, ही रीत फार वाईट आहे, असे त्यामुळे ठरत नाही.

बरे, जो कथाकार स्वत:ला आपल्या कथेतून कटाक्षाने वगळून टाकतो, त्याला तरी या अशा यत्नात कितपत यश लाभते? कदाचित कथेच्या निवेदनात तो स्वत: डोकावत नसेलही, पण कथाविषयाची निवड, कथेतील पात्रांची निवड, त्या पात्रांचे दर्शन ज्या दृष्टिकोनातून घडवावयाचे त्या दृष्टिकोनाची निवड, अभिव्यक्तीच्या रीतीची निवड, या सर्व निवडींतून कथाकाराच्या व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडणे केवळ अपरिहार्य नाही काय?

फ्लॉबर्ट स्वत: निराशावादी होता, हे तर प्रसिद्धच आहे. मूर्खपणाचा त्याचा तिटकाराही महशूर आहे. समाजातील वरचा वर्ग, त्याचप्रमाणे मध्यम वर्ग, त्या वर्गाचे सर्वसामान्य प्रतिनिधी या सर्वांविषयी त्याच्या मनात घृणा होती. दयेचा अवशेषही त्याच्या मनात नव्हता. औदार्याचा अंशमात्रही त्याच्या स्वभावात नव्हता. ज्या व्याधीने जन्मभर पाठपुरावा करून त्याला सतत छळले होते, त्या व्याधीच्या परिणामी रुग्णाचे संत्रस्त, अपमानकारक व लज्जास्पद असे जीवन जाणतेपणी त्याला कंठावे लागले होते. त्याच्या मनाचा तोल कायमचाच ढळलेला होता. तो वृत्तीने पराकाष्ठेचा असहिष्णू होता. स्वत: स्वप्नरंजनात कायम गढलेला असूनही त्या स्वप्नरंजनाचे भय त्याच्या मनात सतत दबा धरून होते.

'मदाम बोव्हारी'च्या या उद्वेगजनक अशा क्षुद्र कथेत फ्लॉबर्टने स्वत:ला झोकून दिले, ते सूडकरी माणसाच्या आवेगाने. ध्येयभूत आदर्शाची प्राप्ती जीवितात होऊ शकली नाही, म्हणून जीवितातील गलिच्छ सांडपाण्यात यथेच्छ लोळून फ्लॉबर्ट जणू काही आपल्या ध्येयवादावरच सूड उगवीत होता. देला मेअरची गोष्ट लिहून काढावयाची, असा निश्चय ज्या क्षणी त्याने आपल्या मनाशी केला, त्याच क्षणी त्याने स्वत:लाही अपरिहार्यपणे देला मेअरच्या कथेत गुंतवून टाकले. देला मेअरच्या कथेत ज्या असंख्य व्यक्ती आलेल्या आहेत, त्यांच्यापासूनही फ्लॉबर्ट स्वत:ला दूर ठेवू शकला, असे दिसत नाही.

पाचशे पृष्ठांच्या या कथेत अनेक स्त्रीपुरुषांशी आपली ओळख होते. त्यांपैकी एका डॉ. लॅरिविएरचा अपवाद केला, आणि डॉ. लॅरिविएर ही या कथेतील एक नगण्य अशी व्यक्ती आहे, –तर अशी एक व्यक्ती या कथेत नाही की, जी काही उदात्त अशा स्वभावविशेषाने उजळलेली आहे. या कादंबरीतील एकूण एक व्यक्ती क्षुद्र, मूर्ख, अधम आणि सर्वसामान्यांची प्रतिनिधी अशी आहे.

आता प्रत्यक्ष जगात काय दिसून येते? जगातील पुष्कळ माणसे अशीच असतात, असे नाही; पण जगातील एकूण एक सर्वच माणसे अशी असतात काय? गाव कितीही लहान असो, त्या गावात दोन किंवा तीन नसतील, पण निदान एक तरी माणूस असा आढळू नये काय की, जो चांगला आहे, शहाणा आहे, दयाळू आहे, परोपकारी आहे? पण 'मदाम बोव्हारी'च्या या कथेत अशा एकाही भल्या माणसाचे दर्शन वाचकाला घडत नाही!

सर्वसामान्यांचे प्रतिनिधी शोभतील, अशा काही व्यक्तींचा एक गट निवडावा; आणि त्या व्यक्तींच्या स्वभावातून व त्यांच्या सभोवारच्या वस्तुजातातून अपरिहार्यपणे निष्पन्न होतील, अशा घटना कल्पून योजाव्यात; हे फ्लॉबर्टचे येथे उद्दिष्ट आहे. आता त्याला ज्या प्रश्नाला तोंड द्यावयाचे होते, तो प्रश्नही समजून घेण्यासारखा आहे. त्याने बुद्धिपुरस्पर शोधलेल्या या अशा सर्वसामान्य क्षुद्र व्यक्तींमध्ये कोणत्याही वाचकाला रस वाटणार नाही. आणि म्हणून ज्या सामान्य घटनांचे निवेदन त्याला करावयाचे होते, त्या घटना वाचकाला कंटाळवाण्या होतील, असा संभव जरूर होता. यातून त्याने मार्ग कसा काढला, त्याचा विचार यथाक्रम पुढे होईलच. तत्पूर्वी आपले उद्दिष्ट गाठण्यात त्याने कोणत्या प्रमाणात यश मिळवले, त्या विषयी काही विचार येथे मांडणे मला इष्ट वाटते.

या कादंबरीतील सर्वच व्यक्तींचे चित्रण फ्लॉबर्टने असाधारण कौशल्याने केलेले आहे, हे प्रथम मला आवर्जून सांगावयाचे आहे. ज्या व्यक्तींच्या सत्यतेविषयी आपल्या मनात शंका राहत नाही, त्या व्यक्तींचे दर्शन एकदा घडले की, तत्क्षणी हाडामांसाची जिवंत माणसे म्हणून आपण त्यांचा स्वीकार करतो. शेजारचा वाणी, पलीकडचा डॉक्टर, त्यापलीकडचा हॉटेलवाला, ही सर्व माणसे आपल्याला जितकी खरी वाटतात, तितकीच फ्लॉबर्टची माणसेही खरी आहेत. कादंबरीतील नायक, नायिका, खलनायक इ. कल्पित पात्रे कल्पित आहेत, असे वाटतच नाही. हरघडी भेटणारी ही सर्व माणसे आहेत, असेच सदैव वाटत राहते.

येथे एकच उदाहरण सांगतो; या कादंबरीतील होमायस बघा. मिकॉबरइतकीच होमायसची व्यक्तिरेखा विनोदी आहे. प्रत्येक इंग्रजाला मिकॉबर जसा जवळचा वाटतो, तसाच प्रत्येक फ्रेंच माणसाला होमायस जवळचा वाटतो. पण या दोन व्यक्तींच्या चित्रणातील फरक लक्षणीय आहे. मिकॉबर हा आपल्यातील एक आहे, असे आपल्याला कधीच वाटत नाही, पण होमायस तसा वाटतो. अगदी आपल्यातलाच एक. मिकॉबरच्या वर्तनात संगती नाही, तर होमायसचे वर्तन सर्वथा सुसंगत असे आहे.

पण हे सर्व जरी खरे असले, तरी एमा बोव्हारी ही एका सामान्य शेतकऱ्याची मुलगी आहे, असे मी स्वत:ला पटवून देऊ शकत नाही. प्रत्येक स्त्रीच्या व पुरुषाच्या स्वभावातील काही विशेष तिच्या व्यक्तित्वात अविभाज्य असतात, याविषयी शंका नाही. ते खरेच आहे. एमाची प्रतिकृती त्याने कोणत्या स्त्रीवरून रेखाटली, असा प्रश्न कोणी त्याला विचारला, तेव्हा त्याने दिलेले मासलेवाईक उत्तर प्रसिद्ध आहे. तो म्हणाला की, माझ्या एमासाठी मॉडेल म्हणून मीच बसलो होतो. एमा मीच आहे!

आता एक गोष्ट अगदी खरी. आपण सर्वच रंगीबेरंगी स्वप्नांच्या जगात वावरत असतो, ती स्वप्ने पुष्कळ वेळा असंभव, अशक्य अशा घटनांविषयी असतात. स्वप्नात आपण स्वत:ला खूप श्रीमन्त झालेले बघतो, आपण सुंदर आहोत, अशी आपण कल्पना करतो, वैभवशाली ऐश्वर्याचे जीवन जगतो, सर्व यत्नांत यशस्वी होतो, अद्भुतरम्य अशा कथांचे नायक म्हणून आपण मिरवतो. पण ते सारे स्वप्नांत! पण तसे आपण सर्वजण शहाणे असतो, भित्रेही असतो. आणि अशा मोहक स्वप्नांत क्षणभर आपण गुंतून पडलो, तरी ते स्वप्न म्हणजे सत्य नव्हे, ही जाण आपल्या मनात सतत जागी असते. त्या स्वप्नांचा परिणाम वस्तुस्थितीवर होऊ शकत नाही आणि तसा तो होऊ नये, याविषयी आपण दक्ष असतो.

पण एमा तशी नाही. ती आपले स्वप्न प्रत्यक्षात उतरवण्याचा यत्न करते, या अर्थाने

ती अपवादात्मक आहे. तिचे सौन्दर्यही असेच असाधारण आणि म्हणून अपवादात्मक आहे. आपल्या कादंबरीतील एकूण एक सर्व घटना वास्तव व अपरिहार्य असाव्यात, असा फ्लॉबर्टचा कटाक्ष आहे.

पण एमाच्या आयुष्यातील सर्वच घटना केवळ अपरिहार्य आहेत, असे मला वाटत नाही. तिचा पहिला प्रेमिक तिला झिडकारून टाकतो, त्या वेळी मेन्दूच्या तापाने ती आजारी पडते. हा मेन्दूचा ताप त्रेचाळीस दिवस टिकतो. आणि तिला मरणाच्या दारात आणून सोडतो. आता ब्रेन–फीव्हर हा कादंबरीकाराचा एक आवडता आजार आहे, हे मला चांगले माहीत आहे. एखादी व्यक्ती काही काळ नकोशी झाली की, कादंबरीकार ब्रेन–फीव्हरच्या या युक्तीचा अवलंब हमखास करतात. आता गमतीची गोष्ट अशी की, ब्रेन–फीव्हरचा हा आजार वैद्यकशास्त्राला अजीबात माहीत नाही, हे मला माहीत आहे.

आता फ्लॉबर्टने त्रेचाळीस दिवसपर्यंत एमाला ब्रेन–फीव्हरची बळी केली, त्याचे कारण अगदी उघड आहे. दीर्घकाळपर्यन्त एखादा खर्चिक आजार तिने भोगावा, अशी त्याची इच्छा होती. नियतीची तशीच इच्छा असावी, असे मला वाटत नाही. ही घटना मला अवास्तव वाटते. या घटनेवर माझा विश्वास बसू शकत नाही. आणि तसेच विचाराल, तर डॉ. बोव्हारीच्या मृत्यूवरही माझा विश्वास बसू शकत नाही. तो बिचारा मरतो. त्याचे कारण एवढेच दिसते, की फ्लॉबर्टला आपले पुस्तक कोठे तरी म्हणजे येथे संपवावयाचे होते.

'मदाम बोव्हारी' ही कादंबरी अनैतिक आहे, असा आरोप ठेवून फ्रेंच सरकारने कादंबरीकार व प्रकाशक या उभयतांवर खटला भरला होता, हे प्रसिद्धच आहे. सरकारी व आरोपीच्या वकिलांनी या संबंधात कोर्टात जी भाषणे केली, ती मी वाचलेली आहेत. सरकारी वकिलाने 'मदाम बोव्हारी' तील जे कित्येक उतारे अश्लील म्हणून लागोपाठ वाचून दाखवले, ते आज परत वाचून पाहिले तर कोणालाही हसूच येईल ! आजचे कादंबरीकार ज्या रीतीने संभोगाची वर्णने करतात, ती पाहिली तर तुलनेने या कादंबरीतील वर्णने अत्यंत सभ्य, शिष्ट, श्लील ठरतील. त्या काळातही (इ. स. १८५७) सरकारी वकिलाला ही वर्णने अश्लील वाटली असतील, यावरही विश्वास बसण्यासारखा नाही.

आरोपीच्या वकिलाचे म्हणणे असे होते की, सरकारी वकिलाने वाचून दाखविलेले तथाकथित अश्लील उतारे कथानकास अत्यन्त आवश्यक असे आहेत. आणि शिवाय कथेच्या अन्ती मदाम बोव्हारीला आपल्या दुष्कृत्याचे शासन भोगावे लागत असल्यामुळे ही कथा नैतिक आहे, असेच म्हणावे लागेल.

आरोपीच्या वकिलाचा हा युक्तिवाद न्यायमूर्तींनी मान्य केला व आरोपींना दोषमुक्त ठरवून सोडून दिले. मदाम बोव्हारीच्या आयुष्याचा शेवट शोकपर्यवसायी झाला, त्याचे कारण तिचा व्यभिचार नसून कापडचोपडाची बिले भरण्याच्या बाबतीतील तिची असमर्थता हे होय, हे त्या वेळी कोणाच्याच कसे लक्षात आले नाही, त्याचे आज खरोखरच आश्चर्य वाटते. ती एका फ्रेंच शेतकऱ्याची मुलगी होती, असे फ्लॉबर्ट म्हणतो. ते जर खरे असेल, तर फ्रेंच शेतकऱ्याची अर्थधारणाही तिच्या रक्तात भिनली असली पाहिजे. आणि तसे असेल, तर लागोपाठ अनेक प्रेमिकांचा पाठलाग करणाऱ्या या स्त्रीवर अखेरचा करुणाजनक प्रसंग का ओढवावा, त्याचे सयुक्तिक कारणच समजत नाही.

एका महान ग्रंथातील काही किरकोळ दोष अशा रीतीने दाखविण्याचा मला कंटाळा तरी कसा येत नाही ? असा प्रश्न स्वाभाविकच कोणताही वाचक मला विचारील. त्यावर माझे उत्तर एवढेच आहे की, जे करावयास फ्लॉबर्ट उद्युक्त झाला होता, त्यात त्याला विशेष यश लाभलेले मला दिसत नाही. आणि त्याचे कारण उघड आहे. असाध्य ते साध्य करून दाखवण्याचा हा त्याचा अट्टाहास होता.

अखेरीस कादंबरी ही तरी काय वस्तू आहे ? ज्या प्रसंगातून अनेक स्त्रीपुरुष जातात अशा अनेक मनोरंजक प्रसंगाची एक विशिष्ट रचना म्हणजे कादंबरी होय. जे आयुष्य आपण जगतो, त्याची केवळ प्रतिकृती म्हणजेच कादंबरी होय. प्रत्यक्ष आयुष्यात जी संभाषणे जशी घडतात, ती संभाषणे जशीच्या तशी कादंबरीकार कधी उतरवीत नाही. कादंबरीतील संभाषणे केवळ सूत्ररूप अशी असतात. त्या संभाषणातून मूलभूत महत्त्वाच्या अशाच मुद्द्यांना व घटनांना स्पर्श केलेला असतो. ही संभाषणे अत्यंत त्रोटक पण पारदर्शक असतात. अशा संभाषणांना आपल्या आयुष्यात जागा नसते.

वस्तुस्थितीतील अपरिहार्य घटकांची रचना आपल्या योजनेस सर्वथा अनुकूल होईल, अशा मनोरंजक रीतीने कादंबरीकार करीत असतो. वस्तुस्थितीची ही विकृती आवश्यकच असते. असंबद्ध घटना आणि कंटाळवाणी पुनरुक्ती यांना कादंबरीत स्थान नसते. आता विचार करा, आपल्या दैनंदिन जीवनात असंबद्ध अशा घटना किती असतात ? आणि आपल्या खरोखरच्या आयुष्यात त्याच त्याच कंटाळवाण्या कृती आपण किती करीत असतो ? तेच तेच कंटाळवाणे शब्द आपण किती बोलत असतो ?

असंबद्ध घटनातील कालान्तर कादंबरीकार आपल्या सोयीप्रमाणे कमी-अधिक करून घेत असतो. ज्या कादंबरीत असंभव असा एकही प्रसंग नाही, अशा कादंबरीची मला तर कल्पनाही करता येत नाही. आणि म्हणूनच मला वाटते, असंभव अशा कादंबरीतील अनेक घटना वाचक गृहीतच धरतात. जीवनाची शाब्दिक प्रतिकृती उत्पन्न करून कादंबरीकाराचे भागण्यासारखे नाही. तो जर वास्तववादी लेखक असेल, तर जीवनाशी इमान राखणारे असे जीवनाचे शब्दचित्र काढण्याचा तो यत्न करतो. संपूर्ण आयुष्यच तो रंगवीत बसत नाही. ते शक्यच नसते म्हणा ! आणि तरीही जीवनसदृश असे चित्र तो खरोखरच रेखाटतो. तो जे लिहितो, त्यावर वाचकांचा विश्वास बसला, तर तो आपल्या कामात यशस्वी झाला, असेच म्हणावे लागेल.

—आणि फ्लॉबर्ट निःसंशय यशस्वी झाला आहे. 'मदाम बोव्हारीत'त उत्कट वास्तवाचा संस्कार अगदी निःसंदिग्ध उमटलेला आहे. मानवजीवनाचे एक साक्षात् दर्शन या कादंबरीत त्याने घडवले आहे. त्याने निर्माण केलेली सर्व व्यक्तिचित्रे वास्तव वाटतात, म्हणूनच केवळ त्याने हे यश संपादन केलेले आहे असे ठरत नाही. त्याची अवलोकनशक्ती केवळ असाधारण अशी होती. त्यामुळे वास्तवाची सूचना देणारा प्रत्येक तपशील त्याने कसा अचूक हेरलेला आणि नोंदलेला आढळतो. प्रस्तुत कथेची बांधणीपण तशी मोठी सुबक आहे.

काही टीकाकारांनी 'मदाम बोव्हारी'च्या संबंधात पुन्हा एक आक्षेप घेतलेला आढळून येतो. त्यांचे म्हणणे असे दिसते की, ती कथा जर एमाची आहे व कथेतील एमाचे स्थान जर मध्यवर्ती आहे, तर तिच्या कथेची सुरुवात तिच्या नवऱ्याच्या पूर्वायुष्यकथनाने का व्हावी ? त्याच्या पहिल्या लग्नाचा संपूर्ण तपशील एमाच्या कथेत कशाला ? आणि त्याच्या व्यक्तित्वाच्या ऱ्हासाने व विनाशाने एमाच्या कथेची अखेरी तरी का साधावी ? कथा जर एमाची, तर तिच्या नवऱ्याच्या तिच्या संबंधातील नव्हेत अशा पूर्वोत्तर आयुष्यातील घटनांचा एवढा बडिवार एमाच्या या कथेत काय म्हणून ? हे सर्व प्रश्न कोणालाही सहज सुचण्यासारखे आहेत

व आपल्या परीने ते सर्व रास्तच आहेत; यात शंका नाही.

आता याविषयी माझे मत काय आहे, ते सांगतो; नवऱ्याच्या कथेत बायकोची कथा का गुंतवून ठेवावी ? एखाद्या चित्राला जशी आपण चौकट घालतो, ती ते चित्र अधिक शोभिवन्त करण्याच्या अपेक्षेनेच, नव्हे काय? त्याचप्रमाणे बोव्हारीच्या कथेच्या चौकटीत मदाम बोव्हारीच्या कथेचे चित्र अधिक खुलून दिसेल, अशा अपेक्षेने दोन कथांची ही जोडणूक फ्लॉबर्टने केलेली असावी, असे मला वाटते.

बोव्हारीच्या पूर्वायुष्यापासून कथेस प्रारंभ करावा व त्याच्या जीविताच्या अखेरीने कादंबरीचीही अखेर साधावी, हे उद्दिष्ट डोळ्यांसमोर सतत वागवून त्याने आपल्या या कथेची अशी विशिष्ट रचना बुद्धिपुरस्सर केलेली आहे, अशी माझी कल्पना आहे. त्याचा हेतू जर मी बरोबर हेरला असेल, तर त्याने आपल्या कथेचा शेवट मनास येईल तसा व इतक्या घाईने करावयास नको होता, असे मात्र मला जरूर वाटते. फ्लॉबर्टच्या हेतुसंबंधातील माझे हे निदान बरोबर असेल, तर कथेच्या प्रस्तुत अखेरीने त्याचा कार्यभाग साधण्यास विशेष मदत होत नाही, अशी माझी कल्पना आहे.

प्रस्तुत कथेतील एक भाग असा आहे की, ज्याच्याकडे कोणत्याही टीकाकाराचे लक्ष वेधलेले मला आढळून आले नाही. म्हणून या कथाभागाकडे वाचकांचे लक्ष विशेष आवर्जून वेधावे, असे मला वाटते. कारण या कथाभागात फ्लॉबर्टच्या रचनाचातुर्याचे एक असाधारण दर्शन घडते. एमाच्या वैवाहिक आयुष्यातील पहिले काही महिने तिला तोस्तेस नावाच्या एका खेडेगावात काढावे लागतात. तेथील जीवनक्रमाचा तिला मनस्वी कंटाळा येतो. आपल्या कथेतील तोल राखावयाचा, तर कथेतील इतर सर्व भागांप्रमाणेच हाही कथाभाग त्याच रीतीने व तसाच तपशीलवार वर्णन करून सांगणे आवश्यक होते.

आता वाचकाला कंटाळा येणार नाही, अशा मनोरंजक रीतीने कंटाळवाण्या जीवनक्रमाचे वर्णन करणे फार कठीण आहे. ते सोपे तर मुळीच नाही. ते त्याने कसे साधले, हे जाणून घेण्याची उत्सुकता मला होती. म्हणून तो कथाभाग मी फिरून वाचून काढला. तेव्हा मला असे आढळून आले की, अनेक क्षुद्र घटनांचे वर्णन त्याने तपशीलवार केले आहे. पण प्रत्येक घटना नवी आहे, एकही पुनरावृत्त नाही.

या क्षुद्र घटनांचे वर्णन वाचीत असताना वाचक कंटाळत नाही, कारण सर्व वेळ नवे असे काही तरी तो वाचीत असतो. त्यातील प्रत्येक घटना कमालीची क्षुद्र– इतकी क्षुद्र की तिच्याविषयी मुळीच उत्साह वा उत्सुकता वाटू नये– अशी आहे. या कंटाळवाण्या घटनांच्या निवेदनातून एमाच्या कंटाळवाणेपणाचा जो अचूक प्रत्यय फ्लॉबर्टने वाचकास आणून दिलेला आहे, तो विलक्षण प्रत्ययकारक असा आहे.

तोस्तेसहून एमाच्या आग्रहाखातर बोव्हारी कुटुंब *यॉन्व्हिल* नावाच्या एका छोट्या गावी जाऊन स्थायिक होते. यॉन्व्हिलचे वर्णन ठराविक ठशातील आहे. पण या सर्व कादंबरीत असे वर्णन हे फक्त एकच एक आहे. अन्यथा खेड्याची असोत वा गावाची असोत, एकूण एक सर्व वर्णने विलक्षण कौशल्याने कथानकात गुंतवून एकजीव केलेली आहेत. त्या सर्व वर्णनांमुळे कथाभाग पुढे नेण्यास मदत होते. कादंबरीतील सर्व वर्णने अशीच असावीत.

आपल्या कथेतील व्यक्तींचा प्रथम परिचय फ्लॉबर्ट वाचकाला करून देतो, त्या वेळी ती व्यक्ती कोणत्या ना कोणत्या कृतीत गढलेली असते. नंतर त्या व्यक्तीचे रूप, तिचा जीवनक्रम इत्यादिकांचे ज्ञान वाचकाला यथाक्रम सहज होत जाते. प्रत्यक्ष आयुष्यात भेटणाऱ्या स्त्रीपुरुषांचा परिचय जसा आपल्याला यथावकाश होत जातो, तसेच येथेही घडते.

पूर्वी निर्देश करून सोडून दिलेल्या दुसऱ्या एका महत्त्वाच्या मुद्द्याकडे आता मी वळणार आहे. सर्वसाधारण माणसांच्या जीवनक्रमाविषयी लिहावयाचे तर, ती कहाणी कटाळवाणी ठरण्याचा धोका पत्करावाच लागतो. एक कलाकृती निर्माण करण्याच्या हेतूने फ्लॉबर्ट मदाम बोव्हारीची कथा सांगण्यास प्रवृत्त झालेला होता. त्याच्या कथाविषयात अद्भुतरम्य वा भव्योदात्त असे काहीच नाही. कथाविषय तसा पाहिला, तर अगदीच क्षुद्र. कथेत गुंतवलेल्या व्यक्ती अगदी सामान्य. तेव्हा अशा सामान्य स्त्रीपुरुषांची कथा मनोरंजक करून दाखवण्याचे एक विलक्षण आव्हान फ्लॉबर्टने स्वीकारलेले होते.

हे असाध्य ते साध्य करून दाखवण्याचे एकच एक साधन त्याला उपलब्ध होते, ते म्हणजे भाषाशैलीचे सौंदर्य. जन्मजात शैलीचा असा एखादा लेखक अस्तित्वात असू शकतो किंवा नाही; हे मला माहीत नाही. निदान फ्लॉबर्ट तरी असा जन्मजात शैलीकार नव्हता. त्याच्या हयातीत अप्रसिद्ध पण नंतर प्रसिद्ध झालेल्या त्याच्या सर्व पूर्वलेखनाचे स्वरूप अलंकारिक व शब्दबंबाळ असे आहे. आणि त्याची पत्रे तर अशुद्ध अशा फ्रेंच भाषेत लिहिलेली आहेत. त्या पत्रात भाषाशैलीचा वा सौंदर्याचा मागमूसही आढळत नाही. 'मदाम बोव्हारी'च्या प्रकाशनाने फ्रान्समधील महत्तम अशा शैलीकार लेखकांत एकदम त्याची गणना होऊ लागली.

आता मी तर परदेशी. फ्रेंच भाषेची जाण मला असली तरी, भाषाशैलीच्या संबंधात मी काही निर्णय देणे उचित ठरणार नाही. अर्थातच शैलीचे म्हणून जे विशेष असतात, ते फ्रेंच भाषा जाणणाऱ्या इंग्रज वाचकाच्याही लक्षात आल्यावाचून राहत नाहीत. आणि भाषांतरातून *तर मूळ* शैलीचे संगीत, औचित्य, ताल, लय, नादमाधुर्य इत्यादी शैलीविशेष तर पार लुप्त होऊन जातात. हे सर्व खरे असले, तरी फ्लॉबर्टचा हेतू काय होता आणि तो हेतू साधण्यासाठी त्याने काय काय सायास केले, ते स्पष्ट करून सांगणे मला योग्य वाटते. फ्लॉबर्टची भाषाविषयक धारणा व तदनुसार त्याने योजिलेली भाषा अभ्यासिली, तर तो अभ्यास कोणत्याही देशातील लेखकाला निश्चित उपकारक ठरेल.

चांगले लिहावयाचे असेल, तर लेखकाने चांगले भावले पाहिजे, चांगले विचारले पाहिजे व चांगले म्हटले पाहिजे, हे पफनचे भाषाविषयक सूत्र फ्लॉबर्टने आपलेसे केलेले दिसते. कोणतीही *गोष्ट दोन रीतींनी सांगता* येईल, यावर फ्लॉबर्टचा विश्वासच नव्हता. कोणतीही गोष्ट अचूक सांगण्याची रीती केवळ एकच एक असू शकते. आणि मोजा जसा हातावर मुलायम बसावयास हवा, त्याचप्रमाणे विचारवाचक असे नेमके शब्द योजावयास हवेत, अशी त्याची धारणा होती.

तर्कशुद्ध, नेमके, अचूक, प्रवाही, लयबद्ध, गतिमान व विविध असे गद्य लिहिण्याची कांक्षा तो मनात बाळगून होता. हे गद्य काव्याप्रमाणेच तालबद्ध, नादमधुर व संगीतमय असावे आणि तरीही गद्याचे सर्व गुणविशेष त्या भाषेत व्यक्त व्हावेत, असे गद्य निर्माण करण्याची इच्छा त्याच्या मनात बळावलेली होती. दैनंदिन जीवनाच्या बोलीतील *सर्व शब्द–मग ते कितीही गद्यप्रचुर व* सर्वसामान्य असोत–भाषेत गुंतविण्याची त्याची तयारी असे. त्याचे उद्दिष्ट एकच

होते. शब्द कोणतेही असोत, त्यांच्या जुळणीचा संस्कार सौंदर्यवाचक व्हावयास हवा.

आता हे उद्दिष्ट स्पृहणीय आहे, यात शंकाच नाही. परंतु कधी कधी या उद्दिष्टाबाबत तो अतिरेकाने वागत असे, असे सुचविण्याचे धाष्टर्य आता मी करणार आहे. 'माझ्या वाक्प्रचारात विसंगती वा पुनरावृत्ती आढळली की, मी अस्वस्थ होतो, हे खरे आहे. मी खोड्यात गुंतून पडत आहे, असे मला वाटू लागते.' हे त्याचे म्हणणे बरोबर मानले तरी, एकाच पृष्ठावर एक शब्द दोन वेळा वापरण्याची स्वतःलाच परवानगी द्यावयाची नाही, या हट्टाला काय म्हणावे? एका विशिष्ट ठिकाणी एक विशिष्ट शब्दच योजणे योग्य असेल, तर त्याच एका विशिष्ट शब्दाची योजना त्या ठिकाणी करणे प्राप्त आहे. मग त्या एका विशिष्ट शब्दाच्याऐवजी कोणताही प्रतिशब्द योजून भागणार नाही, हे उघड आहे.

शब्दयोजनेच्या संबंधात तालाची महती त्याने जरूर मानली. परंतु त्याबाबतीत अतिरेकी वृत्तीचा अवलंब त्याने कधीच केला नाही. तालाची लय बदलण्याच्या बाबतीत तो सदा दक्ष असे. शब्दार्थाचा अचूक वेध घेण्याची त्याची शक्ती असाधारण होती आणि केवळ विशिष्ट शब्दांच्या जुळणीतून वेग वा आळस, शिथिलता वा उत्कटता, किंबहुना जो कोणता भाव त्याच्या मनातून प्रगट करावयाचा असेल, त्याचा संस्कार वाचकाच्या मनावर घडवून आणण्यात त्याचा हातखंडा होता.

या विषयात मला विशेष ज्ञान असले तरी, फ्लॉबर्टच्या शैलीविशेषांचे सोदाहरण दर्शन घडवून देण्याइतपत अवसर वा अवकाश येथे उपलब्ध नाही. पण तरीही त्याचे विख्यात भाषाप्रभुत्व त्याने कसे संपादिले, याविषयी येथे थोडेसे विवेचन मी केले, तर ते अनाठायी ठरणार नाही, असे मला वाटते.

पहिली गोष्ट ही लक्षात ठेवावयास हवी की, श्रम करण्याची फ्लॉबर्टची ताकद जबरदस्त होती. कोणत्याही लेखनास सुरुवात करण्यापूर्वी त्या लेखनाशी संबंध असलेल्या एकूण एक सर्व ग्रंथांचे वाचन तो मोठ्या साक्षेपाने करीत असे. वाचीत असताना हवी असलेली माहिती तात्काळ नोंदवून ठेवण्याची त्याला सवय होती. प्रत्यक्ष लेखनास सुरुवात करण्यापूर्वी लेखनाचा एक कच्चा आराखडा तो फार काळजीपूर्वक तयार करीत असे. नंतर प्रत्यक्ष लेखन जे एकदा लिहून काढले, त्यातील नको असलेला मजकूर निष्ठुरपणाने छाटून टाकणे, हवा असलेला अधिक घालणे, शब्दांची उलथापालथ करून योग्य त्या शब्दांची कसोशीने निवड करणे, यात तो बराच वेळ घालवीत असे. हवा असलेला उचित तो संस्कार उमटेपर्यंत त्याचे लेखन अव्याहत चालूच असे.

बरे, एवढयानेही त्याचे समाधान मुळीच होत नसे. लिहून झालेल्या मजकुराचे कागद गोळा करून तो बाहेरच्या व्हरांड्यात जात असे आणि आपल्या लेखनातील वाक्प्रचार मोठमोठयाने ओरडून, बोलून पाहून त्यात आवश्यक त्या सुधारणा करीत असे.याविषयी त्याची एक पद्धती ठरलेली होती. लिहून झालेल्या वाक्यातील शब्दांचा नाद कानांना योग्य वाटला नाही किंवा सहजपणाने वाक्ये उच्चारता आली नाहीत, तर आपल्या वाक्यरचनेत काही दोष आहे, असे तो समजे. अशा रीतीने सर्व मजकूर मोठ्याने वाचून झाल्यावर मजकुराचे सर्व कागद परत आपल्या अभ्यासिकेत नेऊन मनाचे समाधान होईपर्यंत पुन्हा पुन्हा तोच तोच मजकूर एखाद्या बदललेल्या शब्दांसह लिहून काढण्याचा त्याला मुळीच कंटाळा नव्हता.

आपल्या दोस्ताला लिहिलेल्या एका पत्रात तो म्हणतो : 'गेला सोमवार आणि मंगळवार दोन्ही दिवस केवळ दोन ओळींच्या शोधात खर्ची पडले.' याचा अर्थ असा नव्हे की, दोन दिवसांत त्याने फक्त दोनच ओळी लिहिल्या. कदाचित दहा-बारा पाने त्याची लिहून झाली असतील. एवढाच याचा अर्थ की, त्या सबंध दोन दिवसांत मनाचे संपूर्ण समाधान होईल अशा फक्त दोन निर्दोष ओळींचे लेखन तो करू शकला. 'मदाम बोव्हारी'ची मुद्रित पावशे पृष्ठे लिहून काढण्यासाठी त्याने एकूण पंचावन्न महिने घेतले, यात आश्चर्य वाटावयास नको.

आणखी एका महत्त्वाच्या बाबीचा निर्देश करावयास हवा. 'मदाम बोव्हारी' नंतर त्याने 'सलाम्बो' नावाची आणखी एक कादंबरी लिहिली. ही कादंबरी सर्वानुमते अपेशी म्हणून समजली जाते. 'मदाम बोव्हारी'कडे वळण्यापूर्वी 'दि सेन्टिमेन्टल एज्युकेशन' नावाच्या एका कादंबरीचा कच्चा खर्डा तयार करण्यात त्याने अनेक वर्षे खर्च केलेली होती. पण त्या खर्ड्याने त्याचे समाधान मात्र मुळीच झालेले नव्हते. याही कथेची नायिका एलिसा श्लेसिन्जरच आहे. एका परीने तिच्यावरील त्याच्या उत्कट प्रेमाची


टोप्या, होजिअरी व अद्ययावत
तयार कपड्यांचे खरेदीसाठी
एन्. व्ही. गोखले
प्रार्थनासमाजाजवळ, गिरगांव,
मुंबई – ४.
यांचे दुकानीच जाणे श्रेयस्कर

सरदारगृह
राहण्याची व भोजनाची उत्तम सोय
हीरक महोत्सवानिमित्त विविध सुखसोयी
अद्ययावत् पद्धतीचे भोजनगृह
सरदारगृह प्रा. लि.
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २
मंगलकार्ये व मेजवानीसाठी उत्तम व्यवस्था
फोन : ३१४३३७

ही गाथाच आहे.

अनेक जाणकार टीकाकारांच्या मताने 'दि सेन्टिमेन्टल एज्युकेशन' ही त्याची सर्वोत्कृष्ट कलाकृती आहे. माझ्यासारख्या एका परदेशी वाचकाला हीही कादंबरी मनस्वी आवडते. पण सर्वच परदेशी वाचकांना ती आवडेल, असे मात्र मुळीच नाही. कारण या कादंबरीतील कित्येक प्रदीर्घ कथाभाग असे आहेत की, त्यात आजच्या वाचकांना मुळीच रस वाटणार नाही. या कादंबरीचे लेखन पुरे केल्यानंतर आणखी पुन्हा एकदा तो दोनवेळा लिहून संपविलेल्या 'दि टेम्प्टेशन ऑफ सेन्ट ॲन्थनी'कडे वळला.

फ्लॉबर्टसारख्या एका जगद्विख्यात कथाकाराला आपल्या कथांसाठी इतक्या थोड्या कल्पना सुचाव्यात, या गोष्टीचे मला सतत आश्चर्य वाटत आलेले आहे. त्याच्या यौवनावस्थेत ज्या कल्पनांनी त्याच्या मनाचा कबजा केलेला होता, त्याच कल्पनांकडे पुन्हा पुन्हा वळण्यात त्याच्या मनाला मोठे सुख वाटत होते, असे दिसते. जणू काही त्याच्या मनावर या पूर्वानुभवांचे असह्य असे ओझे लादलेले होते. आणि या पूर्वानुभवांना सर्वस्वी समाधानकारक असा शब्दाकार दिल्याशिवाय मनावरील त्या ओझ्यापासून आपली मुक्तता नाही, असेच त्याच्या मनाने घेतलेले दिसते.

कालान्तराने त्याची भाची कारोलिन ही लग्न करून आपल्या घरी गेली. नंतर क्रायसेत येथील घरात ते फक्त दोघेच उरले. फ्लॉबर्ट व त्याची आई. तदनंतर तीही मरण पावली. इ. स. १८७० मध्ये जर्मनीबरोबरच्या युद्धात फ्रान्सला पराभवाचा प्रचन्ड तडाखा सहन करावा लागला. त्या धामधुमीच्या काळातील आर्थिक घडामोडीत कॅरोलिनच्या नवऱ्यावर मोठीच आपत्ती ओढवली. तो संपूर्णपणे नागवला गेला. दिवाळखोरीपासून त्याचा बचाव करण्यासाठी आपली सर्व संपत्ती फ्लॉबर्टने त्याच्या हवाली केली.

क्रायसेत येथील आपले जुने निवासस्थान तेवढे त्याने स्वतःसाठीच मोठ्या कष्टाने राखून ठेवले. अनेक सुखद स्मृतींचा वारसा प्राप्त झालेल्या त्या घराचा वियोग त्याला केवळ असह्य झाला असेल. जोपर्यन्त त्याच्याजवळ अमाप संपत्ती होती, तोपर्यन्त पैशाकडे बघण्याचा त्याचा दृष्टिकोण काहीसा तुच्छतेचाच होता. पण स्वतःच्याच स्वार्थत्यागामुळे जेव्हा काहीशा दारिद्र्यात दिवस कण्ठण्याची पाळी त्याच्यावर आली, तेव्हा मात्र आर्थिक दुरवस्थेच्या विवंचनेत तो गढून गेला.

तत्पूर्वी दहा-बारा वर्षांच्या अवधीत तो तसा निरोगी होता. पण आता त्याची पूर्वीची व्याधी पुन्हा बळावली. तदनंतर जेव्हा जेव्हा तो पॅरिसला येऊन राहत असे, तेव्हा तेव्हा कोणत्याही मेजवानीच्या प्रसंगी त्याला धरून घेऊन जाण्याचे व परत घरी सुखरूप पोचवण्याचे काम मोपासा नित्यनेमाने न चुकता करीत असे.

त्याच्या सर्वच प्रेमप्रकरणात तो जरी दुर्दैवी ठरला असला, तरी स्नेहसंबंधातील त्याचे सुदैव लक्षणीय होते. काही निष्ठावन्त व प्रेमळ स्नेही त्याने कायमचे जोडून ठेवले होते. कालान्तराने तेही एकामागून एक सर्व त्याला सोडून गेले. अखेरची कित्येक वर्षे हा दुर्दैवी पुरुष संपूर्ण एकाकी असे जीवन कंठित होता. त्या काळात क्रायसेत त्याने क्वचितच सोडले असेल. त्याचे धूम्रपान व मद्यपान अतिरेकी स्वरूपाचे होते. ॲपल्-ब्रॅन्डी हे त्याचे आवडते पेय होते.

त्याने अखेरचा ग्रंथ जो प्रसिद्ध केला, त्यात एकूण तीन दीर्घकथा होत्या. तदनंतर 'बुवार्द एत् पेसुचेत' या नावाच्या एका प्रचण्ड कादंबरीच्या लेखनास त्याने सुरुवात केली. मनुष्यजातीच्या मूर्खपणावरील ही अखेरची प्रखर टीका लिहून आपल्या लेखनास विराम देण्याचा त्याचा मानस होता.

या प्रचण्ड कादंबरीच्या लेखनास सुरुवात करण्यापूर्वी त्याच्या मताने कथा–विषयाशी संबंधित असलेले एकूण पंधराशे ग्रंथ त्याने साक्षपाने वाचून काढले होते. या एकाच गोष्टीवरून आपल्या लेखनावरील त्याची निष्ठा व त्या लेखनासाठी अचाट श्रम करण्याची त्याची ताकद यांचा प्रत्यय येऊ शकेल. संकल्पित कादंबरी दोन भागात तो पुरी करणार होता. त्यापैकी पहिल्या भागाच्या जवळपास अखेरीपर्यंत तो येऊन ठेपलेला होता.

दि. ८ मे १८८० रोजी सकाळी अकरा वाजता घरातील मोलकरीण त्याचे जेवण घेऊन त्याच्या अभ्यासिकेत गेली. तेथे एका खाटेवर पडून विव्हळत असलेला फ्लॉबर्ट तिच्या दृष्टीस पडला. काही तरी बोलण्यासाठी त्याची निर्वाणीची धडपड चाललेली तिला दिसली. म्हणून ती त्याच्याजवळ गेली. व खाली वाकून त्याचे बोलणे समजून घेण्याचा तिने यत्न केला. पण त्याच्या पुटपुटण्यातील एक अवाक्षरही तिला समजले नाही. तेव्हा तेथून तडक ती जी निघाली, ती धावत पळत डॉक्टरकडे गेली. डॉक्टरला बरोबर घेऊन ती घरी परत आली. डॉक्टरची सर्व धावपळ व्यर्थ ठरणार होती. एका तासाभराच्या अवधीत फ्लॉबर्टचा निश्चेष्ट देह त्याला बघावा लागला.

एक वर्षानंतर त्याचा जुना दोस्त मॅक्झिम दु कॅम्प हा बेडन येथे उन्हाळ्यात राहण्यासाठी म्हणून गेला होता. एक दिवस शिकारीसाठी म्हणून तो बाहेर पडला व हिंडत हिंडत अचानक इलेनो येथील वेडघराच्या दारात अचानक येऊन ठेपला. त्याच क्षणाला वेडघराचे दार उघडले व दोन दोनांच्या गटाने आतील वेडे दररोजच्या शतपावलीसाठी म्हणून बाहेर पडले. त्या वेड्यातील एकाने मान लववून त्याला अभिवादन केले. जिच्यावर फ्लॉबर्टने आमरण विफल प्रेम केले होते, अशी ती एलिसा श्लेसिंजर त्याच्या जुन्या दोस्ताला ओळखून त्याला प्रणाम करीत होती!

ती आणि मी ! मी आणि ती. माझ्यात ती ? का तिच्यात मी ? आम्ही दोघी एकमेकींच्यात सामावलोय.

तिच्या अस्तित्वाचा शोध लागला मी एस्. एस्. सी.ला असताना. इंग्लिश पोएट्री शिकवायचे गोखले सर. मी तन्मय होऊन ऐकत असायची. पहिल्या बाकावर बसून. आणि शिकवता शिकवता सरांची नजर माझ्यावरून घरंगळायची. स्लीव्हलेस ब्लाऊझ-मधून दिसणाऱ्या गोऱ्यापान दंडावरून सर-कायची. माझ्या केसातल्या गजऱ्यावर स्थिर व्हायची.

माझ्या हे लक्षात आल्यावर इतका राग आला सरांचा. माझ्या वडिलांएवढे सर. पण त्यांची अशी बरबटलेली नजर. मी मनातून इतकी संतापले होते पण ती आपली खुदूखुदू हसत होती. गर्वानं फुलली होती. सौंदर्याच्या मस्तीत होती. झोपाळ्यावर बसून झोके घेत होती. उंच उंच झोके.

तीन चार दिवसानी परत गोखले सरांचा पिरिअड आला. त्यांना आवडणारा ड्रेस करायचा नाही. मी मनोमन ठरवलं होतं. पण ती कुठूनतरी हसत हसत आली. तिनं गजरा डोक्यात घालायला लावला. आणि स्लीव्हलेस पण. मस्तीत होती अगदी ती. मी निमूटपणे सगळं ऐकलं. आणि मग तिचं ऐकण्याचीच सवय लागली.

कॉलेजमध्ये गेल्यावर तर तिनं सगळं मनच व्यापून टाकलं. कुणाला काय आवडतं, कोण माझी कसली स्तुती करतं ह्याची बरो-बर नोंद असायची तिच्याजवळ.

कॉलेज सुटल्यावर घरी येताना नेहमी तो दिसायचा. ओठावर जळकी सिगरेट... बेदरकार डोळे... मानेपर्यंत वाढलेले केस. जणू मला बघण्यासाठीच तो तिथं उभा असायचा. मला ऐकू येईल अशा आवाजात म्हणायचा, ' आय लव्ह यू ! '

रस्त्यावरच्या एका घाणेरड्या मवाली माणसानं असं म्हणावं ? माझी मलाच चीड यायची. पण ती ? ती मला त्याच रस्त्याने जायला लावायची. एखाद्या दिवशी शेवटचा पिरिअड नसला तरी कॉलेजमध्ये थांबायला लावायची. ठरल्यावेळी ठरलेल्या रस्त्याने ती मला न्यायची.

मी चिडायची. माझ्यावर... तिच्यावर. सगळ्या जगावर. लग्नच करू नये. ती जर असा त्रास देणार असेल तर. मला वाटायचं. पण मी काय वाईट चालीची थोडीच होते ? मी कुणा परपुरुषाशी बोलतसुद्धा नव्हते.

अविनाशला बघितलं आणि मनानं ठर-वलं आता फक्त अविनाशची आवडनिवड बघायची. त्याच्या तंत्राने वागायचं. ती गर्विष्ठपणे बसली होती. तिलाही बजावलं. नुसतीच हसली ती.

माझा आणि अविनाशचा संसार सुरळीत सुरू झाला. तिला बजावलं होतं तरी ती अचानक यायची– कानाशी कुजबुजायची. ' अग, आज अविनाशचा मित्र येणार आहे म्हणे चहाला... त्याला सोज्वळ राहिलेलं आवडतं म्हणे... मागे अविनाशच म्हणाला होता तसं. सोनटक्क्याची फुलं घाल. पांढरी साडी नेस. वगैरे वगैरे.

...उद्या अमुक तमुक ठिकाणी पार्टीला जायचंय्. भुवया सेट करून घे. तुझ्या डोळ्यांवर तो खूश दिसला.

ती अनाहूत सल्ला द्यायची. मला तसं वागायला लावायची.

पण काही वेळा वेगळंच घडायचं. ती कुठेतरी कोपऱ्यात पडलेली असायची.

अगदी लहान होऊन. मग मी आणि अविनाश. मी त्याची लाडकी अनुराधा. राजीवची प्रेमळ आई

अविनाश म्हणायचा, ' अनु, आज भजी कर झक्कपैकी. '

राजीव म्हणायचा, ' आई आज डब्यात काय देशील ?'

' काय देऊ ? शंकरपाळे ? अं ? चालेल ? मी लाडालाडात विचारायची.



# आम्ही दोघी

**सौ. शुभदा साने**

रात्री माझ्या मोकळ्या केसांच्या सावलीत अविनाश रम्य स्वप्नं बघायचा.

तसं माझं आणि अविनाशचं छान जमलं होतं. कधी भांडण नाही. राग नाही. सगळं कसं मऊमऊ. गुळगुळीत.

पण एखादा दिवस...एखादी वेळ. एखादा क्षण असा यायचा की ती सगळं मन व्यापून टाकायची. अनुराधा कुठे उरायचीच नाही, असायची फक्त ती गर्विष्ठ सौंदर्यवती... तारुण्याने मुसमुसलेली.

त्या दिवशी असंच झालं. सोनेरी सकाळ नुकतीच उमलली होती. मन अगदी प्रसन्न होतं. आज मी गुलाबजाम करणार होते. राजीवला डब्यात द्यायला. त्याची फर्माईशच होती तशी. चहा पिता पिता अविनाश म्हणाला,

'अनु, आज पार्टीला जायचंय्. अजीतसिंगकडे. तुलाही बोलावलंय् त्यानं.'

'अजितसिंग म्हणजे तोच नारे? रस्त्यात भेटला होता एकदा. गोरापान. उंच आणि कोरीव मिशी असलेला?' मी विचारलं. मला आठवली त्याची नजर. माझ्या लांब वेणीवरून पुन्हा पुन्हा सरकणारी. माझा गोरा रंग खुलवणाऱ्या लाल साडीकडे कौतुकाने बघणारी.

...खरं म्हणजे मी हे विसरून सुद्धा गेले होते. पण *त्याच्याकडे पार्टीला जायचंय्* म्हटल्यावर तिनं आठवण करून दिली.

'संध्याकाळी तयार रहा हं!' ऑफिसला जाता जाता अविनाश सांगत होता.

झालं! हळूहळू तिनं मनाचा ताबाच घेतला. कामं भराभर आवरली. राजीवच्या डब्यात गुलाबजाम घातले. आणि संध्याकाळची वाट बघत मन पडून राहिलं.

जरा वेळ बाहेर बाल्कनीत जाऊन उभी राहिले. लांबून राजीव येताना दिसला. आज शाळा लवकर सुटली का काय? विचार करतच दार उघडलं.

राजीव घरात शिरला पण नेहमीप्रमाणे त्याने दप्तर कुठेतरी फेकून दिलं नाही. नुसतंच खाली ठेवलं. त्याचे डोळे जरासे लाल दिसत होते.

'हे काय राजीव? बरं नाही?'

'जरासं डोकं दुखतंय्. आणि डोळे जळजळतायत.'

'थांब हं! तुला डॉक्टरची गोळी देते. बरं वाटेल.' त्याच्या डोक्यावरून हात फिरवत मी म्हटलं.

त्याला औषधाची गोळी दिली आणि म्हटलं, 'झोप'

त्याला पांघरूण घातलं. झोप लागली त्याला जरा.

मी तयारीला लागले. नकळत सैलसर एकवेणी घातली. लालसाडी नेसले.

'आई कुठे निघालीस?' राजीव विचारत होता.

'त्या अजितसिंगकडे पार्टीला जायचंय् रेऽ!'

'लवकर येशील ना तू?'

'अगदी लवकर येईन. आणि हे बघ शेजारच्या काकूंना तुझ्या सोबतीला थांबायला सांगते हं मी.'

'हूड!' तो जडपणे म्हणाला.

अविनाशबरोबर स्कूटरवरून जाताना मन वाऱ्यावर सोडून दिलं. ते अगदी हलकं हलकं झालं. पिसासारखं.

पार्टी रंगली होती. *डिम लाइट्स.* मंद वाद्य संगीत. बिअरच्या बाटल्या.

अजितसिंगनं स्वागत केलं आणि मग त्याची नजर माझाच पाठलाग करायला लागली. तिची बोच त्याच्याकडे न बघताही मला जाणवायला लागली. त्याच्या नजरेत माझ्याविषयीचं कौतुक पुरेपूर भरलेलं होतं. काहीतरी बोलायच्या निमित्ताने तो सारखा माझ्याजवळ येत होता. मला खुलवत होता. बास! हीच सीमा. येथूनच सगळे परपुरुष मागे वळत.

...सुखानं सुस्त होऊन मी बसून राहिले होते. कधीतरी अविनाशनं हलवलं. 'चल, घरी जायची वेळ झाली.'

'यू आर लकी!' आम्हाला निरोप देताना माझ्याकडे बघत अजितसिंग अविनाशला म्हणाला.

धुंदीतच घरी आले. आज ती खूष होती. सगळ्यांनी कौतुक केलं होतं. तारुण्याचं. सौंदर्याचं. मी ऐटीतच जिना चढायला लागले. अविनाश म्हणाला, 'आज फारच मादक दिसतेयस.' मी मान वाकडी करून त्याच्याकडे हसून बघितलं. वेणी पुढे ओढली.

घरात आले तर राजीवच्या खोलीत दिवा दिसला. मी चरकले. हो! अनुराधा चरकली. शेजारच्या काकू राजीवजवळ बसून राहिल्या होत्या. ताप बराच वाढला होता.

'केव्हापासून राजीव तुमची वाट बघतोय. सारखं आई, आई चाललं होतं त्याचं.' ऐकून मन सुन्नच झालं. गेले दोन तीन तास मी राजीवला अजीबात विसरले होते. त्याला बरं नाही हे सुद्धा मला आठवत नव्हते. मन व्यापून टाकलं होतं तिनं. ती...ती. शाळा कॉलेजमध्ये असल्यापासून मला सतावणारी...' ती लांब हसत बसली होती. तिच्याकडे रागानंच बघितलं. आणि राजीवच्या जवळ जात म्हटलं, 'राजीव, बाळा मी आलेय रेऽ!' त्याच्या कपाळाला हात लावून बघितला. चांगलाच चटका बसला.


*माझ्या बाळाला मी अशी कशी विसरले?* कशी विसरले!

खरं म्हणजे तेथून लवकर यायला पाहिजे होतं, चुकलंच.

मन आक्रोश करत होतं. अनुराधा रडत होती.

आणि माझ्या मनाचा दुसरा भाग असलेली ती फक्त स्त्री होती. तरुण, सुंदर. ती अविनाश ओळखत नव्हती. राजीव जाणत नव्हती.

तिला सारखी पार्टीच आठवत होती. लोकांचं कौतुकच आठवत होतं....माझ्यातली आई रडत होती आणि बाई मात्र हसत होती. ●



टॉलस्टॉय एक माणूस
मॅक्झिम गॉर्की
यानंतर हा नवाच
विषय लेखिका
वाचकांसमोर ठेवीत आहे.

# श्वाइट्झर अखेरचे पर्व....

## सुमती देवस्थळे

१९६४ ची अखेर...

एरिका ॲण्डरसन् ही श्वाइट्झरची मानसकन्या आज अमेरिकेला जायची होती. लॅम्बरीनच्या आसमंताचा आणि श्वाइट्झरचा निरोप घेताना नेहमीच तिचे पाऊल अडखळत असे. परतण्याची ही एकोणिसावी वेळ होती... सामान बांधून झाल्यावर ती श्वाइट्झरचा निरोप घेण्यासाठी त्याच्या खोलीत गेली.

श्वाइट्झर एकाग्र चित्त करून लिहीत होता. नव्वदाव्या वर्षीसुद्धा सगळे लिखाण स्वहस्ते चालायचे. लोक विचारत, 'डॉक्टर, तुम्ही टाइपरायटर का नाही वापरत ? किती सोपे होईल तुमचे काम !' श्वाइट्झर म्हणे, 'एक तर टाइपरायटरचा आवाज येतो—तो मला

आवडत नाही. आणि दुसरे म्हणजे टाइप केलेल्या पत्राला आत्मीयतेचा सुगंध नसतो. पत्र हाताने लिहिलेले असले, म्हणजे स्नेहाचे धागे चटकन जुळतात.'

बराच वेळ झाला तरी, श्वाइट्झरचे एरिकाकडे लक्षच गेले नाही. शेवटी ती म्हणाली, 'डॉक्टर, निघाले मी.'

'निघालीस? चल. मी येतो तुला पोहोचवायला.' चटदिशी श्वाइट्झर उठला. डोक्यावर हॅट चढवली. खोलीच्या बाहेर पडायचे म्हणजे हॅट हवीच. आफ्रिकेत उष्माघाताच्या इतक्या केसेस त्याला बघाव्या लागत होत्या! मस्तकावरचे धगधगीत सूर्यकिरण म्हणजे साक्षात मृत्यूशी गाठ!... श्वाइट्झरला अन् एरिकाला बाहेर निघालेले पाहताच श्वाइट्झरची मुलगी ऱ्हीना ही पॅथॉलॉजी विभागातून चटकन आली अन् एरिकाबरोबर चालायला लागली.

### मानवतावादी भूमिकेतून

'डॉक्टर, तुम्ही आत्ता काय लिहीत होतात? तुमच्याकडे पाहिल्यावर वाटलं की तुम्ही फार महत्त्वाचं काहीतरी लिहिताय्. त्यात विक्षेप आणू नये. निरोप न घेता तसंच चालू लागावं.'

'शाबास! तशीच जाणार होतीस?...सध्या जरा महत्त्वाचा पत्रव्यवहार चालला आहे खरा. बर्ट्रांड रसेलना लिहीत होतो. केनडींच्या खुनाची चौकशी जागतिक न्यायालयात व्हावी यासाठी ते एक अपील काढत आहेत, अन् त्यावर त्यांना माझी सही हवीय.'

'दिलीत ना?'

'द्यायला वास्तविक काहीही हरकत नाही. पण मला त्या बाबतीतला काहीच अंतर्गत तपशील माहीत नाहीय. राजकारणापासून मी शक्यतो अलिप्त राहण्याचा प्रयत्न करतो. ते माझं क्षेत्र नाही. तरीही मानवतावादी भूमिकेवरून अणुस्फोटाविरुद्ध आवाज उठवल्यावर काय काय प्रतिक्रिया झाल्या ते माहीत आहे ना?

'पण पपा, त्या टीकेची धार पूर्णपणे वैयक्तिक नव्हती. बर्ट्रांड रसेल पीस फाउंडेशनच्या संस्थापकांपैकी तुम्ही एक आहात–तेव्हा...'

'ऱ्हीना, वैयक्तिक टीका असली, तरीही त्यामुळे मोडून जाण्याइतका मी दुबळा नाही. जी गोष्ट मला मनापासून पटते, त्यासाठी पडतील ते कष्ट करायला मी तयार असतो अन् म्हणून तर अमेरिकेच्या अध्यक्षपदासाठी उभ्या असणाऱ्या बॅरी गोल्डवॉटर यांच्या उमेदवारीला विरोध करावा असे मी सुचविले होते. माझ्या म्हणण्याला रसेलने मान्यताही दिली आहे. अणुशक्तीचा विध्वंसक उपयोग ज्यांना तत्त्वतः मान्य आहे अशा लोकांच्या हाती सत्ता देणे धोक्याचे आहे.'

एवढ्यात ५–६ महारोग्यांनी होडी अगदी किनाऱ्याला लावली. एरिकाचे सामान होडीत ठेवले गेले. प्रेमभराने हस्तांदोलन करताना तिचा गळा दाटून आला होता. नव्वद वर्षे पुरी होत आलेला हा पहाडी माणूस, सेवाव्रती–पुनश्च दिसेलच अशी शाश्वती वाटेना. सबंध हॉस्पिटलवर नजर फिरवीत ती श्वाइट्झरला म्हणाली, 'डॉक्टर, ह्या येवढ्या मोठ्या हॉस्पिटलचे, डॉक्टर आणि परिचारिकांचे, रोग्यांचे...या सर्वांचे तुमच्यामागे काय होईल?...आम्हाला अगदी पोरके वाटत राहील. तुम्ही इथे नसाल ही कल्पनाच मला सहन होत नाहीय.'

श्वाइट्झर म्हणाला, 'एरिका, प्रत्येकाला केव्हा ना केव्हा तरी मृत्यूला सामोरे जायचे असतेच. त्या बाबतीत मनाची तयारी केली पाहिजे. यापेक्षा मी तुला काय सांगणार? पण एक गोष्ट लक्षात ठेव. जोवर माझे विचार जिवंत असतील, अन् त्यानुसार काम करण्यास काही लोक तरी कटिबद्ध असतील, तोवर मी हयात आहे असे समज. जा आता...पोहोचलीस की कळव.'

एरिकाचे डोळे भरून आले होते. बोटीत पाऊल ठेवताना तिला वाटत होते, श्वाइट्झर काही पुन्हा भेटणार नाही. तिची होडी प्रवाहातून दूरदूर चालली होती. महारोगी नावाड्यांचे काम मोठ्या झपाट्याने करीत होते. होडी नजरेआड होईतो श्वाइट्झर किनाऱ्यावर उभा होता. आपल्या गढूळ डोळ्यांनी तिच्या होडीचा लहान होत जाणारा ठिपका पाहत होता...नदीचे वळण आले. ठिपका दिसेनासा झाला. श्वाइट्झर परत फिरणार तोच, टपाल घेऊन येणाऱ्या होडीचा ठिपका दिसू लागला—टपाल घेण्यासाठी तो थोडा-वेळ किनाऱ्यावरच थांबला. पोस्टाने १५–२० पत्रे आली होती अन् एक रजिस्टर्ड बुकपोस्ट. पुस्तक आले की, श्वाइट्झरला मनःपूर्वक आनंद व्हायचा. घाईघाईने तो खोलीत गेला. आलेल्या पत्रांवरून नजर फिरवली. आणि मग पुस्तक उघडले...

Verdict on Schweitzer लेखक–जिराल्ड मॅक्नाइट. कोण हा मॅक्नाइट?...हं...वर्षभरापूर्वी इथे येऊन आठवडाभर राहून गेला तो इंग्लिश पत्रकार...श्वाइट्झरला मॅक्नाइटचा प्रश्नही आठवला. 'तुम्ही इथे जे काम करता ते ख्रिस्तसदृश जीवन जगण्याचा प्रयोग करण्यासाठी, की आफ्रिकेतील आजारी माणसांना बरे करण्यासाठी?' श्वाइट्झरला हा प्रश्न आवडला नव्हता. त्याने उत्तर दिले नव्हते. परिणामी मॅक्नाइट श्वाइट्झरच्या जवळ फारसा आलाच नाही. लांबून लांबून चौकशी केली, फटाफट फोटो घेतले अन् तेवढ्या भांडवलावर पुस्तक लिहून टाकले. इथे फक्त एकच आठवडा राहून त्याला कसे मूल्यमापन करता येणार? तातडीने पुस्तक छापायची घाई लोक का करतात? असो. बांधकामावरील मंडळींना अद्याप काम नेमून द्यायचे आहे. पुस्तक रात्री वाचू, सावकाश पाहू असा विचार करून श्वाइट्झर 'फिलॉसॉफर्स पाथ'वरून महारोग्यांच्या वस्तीवर गेला.

बांधकामाचे कामगार हजर झाले होते. महारोग्यांसाठी भक्कम इमारती (बैठ्या) बांधायच्या होत्या. ते काम अद्याप चालूच होते. नोबेल प्राइझची रक्कम अशी सत्कारणी लागली होती. आफ्रिकन कामगार फार सावकाश व अनिच्छेने काम करीत होते. त्यांना श्वाइट्झरने चेतावणी दिली. आजच्या दिवसाकाठी किती काम पूर्ण व्हावे त्याचा तपशील सांगितला, अन् सर्व कामगारांना अभिवादन करून तो परतला...फार्मसीत...औषधोपचार व्यवस्थित होत आहेत की नाही यावर लक्ष...मग ऑपरेशन थिएटर...तिकडे जाऊ लागताच एक आदिवासी बाई रडत रडत आली...तिच्या हातात नवऱ्याचा तुटलेला पाय...तो पाय पुनश्च जोडून द्यावा म्हणून श्वाइट्झरला विनंती करीत होती...त्यासाठी तिची सकाळपासून धडपड. श्वाइट्झरने तिला शांत केले; शक्य तितके समजावून सांगितले. आत जाऊन पाहतो तर त्या रोग्याचे ऑपरेशन पूर्ण झाले होते, आणि दुसरा रोगी टेबलावर होता. हर्नियाचे ऑपरेशन सुरू होते. पलीकडल्या लेबररूममधून कोणीतरी बाळंतीण शेवटच्या कळा देत होती. लवकरच ट्यँहॅऽऽ...ऐकू आला...झाली सुटका!

दुपारी दीडला ब्रांझची बेल वाजली...सर्वांनी भोजनगृहाकड चलायचे. श्वाइट्झरचा 'छू छू' कुत्रा धन्याचे स्वागत करायला 'तय्यार' होऊन उभा राहिला. लाडक्या हरणीचे भावपूर्ण डोळे धन्याला शोधू लागले. आवडता पाणकोळी (पेलिकन) उडत उडत जवळ आला अन् एखाद्याचे बोट धरून त्याने तसे श्वाइट्झरला डायनिंग हॉलपर्यंत घेऊन आला.

एकेक करीत सर्व कर्मचारी हजर झाले. डॉक्टर्स, नर्सेस...हॉस्पिटलमध्ये काम करणाऱ्या इतर स्त्रिया-सगळ्या आल्या. ओल्गा डेटरडिंग (एका इंग्लिश कोट्याधीशाची मुलगी), जोन क्लेंट (इंग्लंडमध्ये आपली दोन मुले ठेवून, १००० मैलांचा प्रवास सायकलवरून करीत लॅम्बरीनपर्यंत आलेली स्त्री), ऱ्हीना (श्वाइट्झरची मुलगी), क्लॅरा उर्खर्ट (लक्षाधीश इंग्लिश स्त्री–सेवाव्रती–हॉस्पिटलला वाहून घेतलेल्या बाई), मरीया लेजंडीक (२७ वर्षे काम करणारी नर्स) माटिल्ड कोटमान (४५ वर्षे काम करणारी नर्स); डॉ. मुंझ (जर्मन), डॉ. ताकाहाशी (जपानी), डॉ. टिमथी री (कोरियन), अलि सिल्व्हर (ऑस्ट्रियाहून आलेली परिचारिका–श्वाइट्झरची सेक्रेटरी–१७ वर्षे नर्सिंग केलेली)...असे किती सांगावेत? श्वाइट्झर म्हणायचा, 'आमचे हॉस्पिटल म्हणजे युनायडेड नेशन्सची प्रतिकृती आहे.' जगाच्या कानाकोपऱ्यातून लोक श्वाइट्झरच्या हॉस्पिटलमध्ये काम करण्यास येत–पगार न घेता काम करीत.

### मॅक्नाइट्ची आरोपमालिका

जेवणाच्या वेळी कर्मचाऱ्यांबरोबर पाहुण्यांचाही समावेश असायचा. त्यावेळी कोणीही गंभीर विषयावर चर्चा करायची नाही, असा अलिखित नियम असे. हलकेफुलके विषय, कोट्या, थट्टामस्करी असे चालायचे. सकाळपासून केलेल्या कामाचा शीण कमी होईल असे वातावरण निर्माण करायचे. ही जबाबदारी मुख्यत: श्वाइट्झरची. पण आज अचानक कोणातरी पाहुण्याला बोलायची लहर आली. जेवण चालू असता मध्येच उभे राहून तो म्हणाला, 'डॉ. श्वाइट्झर यांनी फार श्रेष्ठ कार्य चालविले आहे...(वगैरे)... परमेश्वर त्यांना दीर्घ आयुरारोग्य देवो...आर्थिक अडचण न येवो...त्यांचे कार्य वृद्धिंगत होवो...' इत्यादी आशीर्वादमालिका परमेश्वरापाशी रुजू होऊ लागली. तेव्हा आपला एक डोळा मिस्कीलपणे मिटून श्वाइट्झर म्हणाला, 'हे सगळे भाषण देवाला ऐकू येत आहे, अशी आपण आशा करू या...' हास्याची लहर सर्वत्र पसरत गेली. इतक्यात कोणीतरी फळबागेतील फळे उतरविण्याचे काम अपूर्ण राहिल्याबद्दल सांगत होते...शेजारचे डॉक्टर म्हणाले, 'लक्ष ठेवल्याशिवाय इथे कामे होतच नाहीत.'

श्वाइट्झरच्या कानी 'लक्ष ठेवल्याशिवाय' एवढेच शब्द गेले. तो म्हणाला, 'हं! लक्ष ठेवलं पाहिजे. कामे करवून घेता आली पाहिजेत. ५० वर्षांपूर्वीची गोष्ट आहे...'

गोष्ट म्हटल्याबरोबर सर्वांनी कान टवकारले. काट्याचमच्याचासुद्धा आवाज येऊं न देता सर्वजण श्वाइट्झरची गोष्ट ऐकत राहिले. श्वाइट्झर म्हणाला. 'एक लाकडाचा व्यापारी होता. युरोपियन होता. लिब्रेव्हिल्मध्ये राहायचा. त्याचा एक डोळा खरा होता अन् दुसरा खोटा–बसवून घेतलेला होता. एकदा या व्यापाऱ्याला परगावी जायची वेळ आली. कामाचा तर ऐन हंगाम! लक्ष न दिल्यास मजूर स्वस्थ बसणार याची खात्रीच होती. तेव्हा आता काय करावे?... त्याने आपला कृत्रिम डोळा टेबलावर काढून ठेवला अन् मजुरांना तो म्हणाला, 'माझा डोळा मी इथे ठेवून जातोय. तुम्ही नीट काम करता की नाही हे तो मला आल्यावर बरोबर सांगेल. तेव्हा चुकारपणा करू नका.' चार दिवसांनी परत येऊन पाहतो, तर सर्व नेमून दिलेले काम पूर्ण झालेले. व्यापाऱ्याला अतिशय आनंद झाला. पुढच्या वेळी जेव्हा जावे लागले, तेव्हा त्याने पुन्हा तीच युक्ती केली. परत येऊन पाहतो तर काम, अजीबात झालेले नव्हते. कृत्रिम डोळाही दिसेना. जरा शोधाशोध केल्यावर त्याला डोळा दिसला...त्या डोळ्यावर कोणी तरी हॅट पालथी घालून ठेवली होती. अशा रीतीने 'नजर चुकवून' भरपूर आराम करायची यशस्वी योजना केली होती....' या गोष्टीची सर्वांना खूप गंमत वाटली. श्वाइट्झरने आपल्या डिश्मध्ये ब्रेडचे बारीक तुकडे मुद्दामच उरवले होते. उठल्यावर त्यातला एखादा हरिणाला, पाणकोळ्याला–नाही तर रोमिओ–ज्युलिएट–क्लिओपॅट्रा–यांच्यापैकी कुणाला तरी... (ही नावे माकड नर-मादी, व चिंपाझीची होती.) मुंग्यांना तर ब्रेड हवाच असायचा...त्यांनाही लहानसा तुकडा मिळे.

आता विश्रांतीचा तास. अडीच वाजेपर्यंत सर्वजण आपल्या खोलीत आराम करीत होते. श्वाइट्झरने पडल्या पडल्या आजच्या डाकेने आलेले पुस्तक वाचायला सुरुवात केली.

या इंग्लिश पत्रकाराने श्वाइट्झरला जणू आरोपीच्या पिंजऱ्यातच उभे केले होते. एकामागून एक दोषारोपांची मालिका सादर केली होती. आणि अखेरच्या संकलनात श्वाइट्झरची लायकी शून्यावर आणून ठेवली होती. श्वाइट्झर तो दृष्टिकोन वाचण्यात अगदी गढून गेला होता. हरिणी डोकावून गेली. मांजर नेहेमीसारखे पायाला अंग घाशीत राहिले...पोपट धन्याची हाक यावी म्हणून ओरडत होता. पण श्वाइट्झरला आपल्या लाडक्या प्राण्यांची आठवण झाली नाही. स्वत:च्या ५० वर्षांच्या कामाचे मॅक्नाइट्ने केलेले मूल्यमापन तो वाचीत होता. या भूमीचे विशिष्ट प्रश्न माहीत नसलेला एक सुमार बुद्धीचा माणूस इथे येतो, वरवर काहीतरी बघून–त्याची कार्यकारणमीमांसा लक्षात न घेता पुस्तक लिहिण्याचे धारिष्ट्य करतो, हेच मुळी अयोग्यच होते. असेना?...इथे प्रतिबंध असा मुळी कोणालाच


नूतन वर्षाभिनंदन

मध्यमवर्गीयांना उपयोगासाठी लागणारे
घरगुती सर्वप्रकारचे सुंदर, मजबूत
आणि टिकाऊ, तसेच हॉस्पिटल्स आणि
ऑफिसेस यांना लागणारे उत्तम फर्निचर
ऑर्डरप्रमाणे बनवून मिळण्याचे
एकमेव ठिकाण.

स्टॅंडर्ड फर्निचर वर्क्स

नूर बिल्डिंग, तुलसी पाईप रोड
दादर, (बी. बी.) रेल्वे स्टेशनजवळ,
मुंबई २८.

नव्हता. मॅक्नाइट्चे आरोप सुरू होते...

...श्वाइट्झरचे हॉस्पिटल पुरातन काळातले वाटते...

...वैद्यकशास्त्रातल्या प्रगतीचा श्वाइट्झरला गंध नाही...

...लॅम्बरीनमध्ये आधुनिक सुखसोयींनी युक्त असे सरकारी हॉस्पिटल आहे. त्यामुळे श्वाइट्झरच्या हॉस्पिटलची काहीही गरज नाही. ते खलास झाले तरी चालेल...

...श्वाइट्झरभोवती त्यांच्या अंतेवासी भगतगणांनी गूढतेचे धूम्रपटल तयार केले आहे. त्यामुळे तो पाहुण्यांशी मोकळेपणाने चर्चा करीत नाही...

...पाहुण्यांना दुराव्याने आणि संशयाने वागविले जाते. त्यातही पुन्हा आतले अन् बाहेरचे असा भेद केला जातो....

...श्वाइट्झरला ख्रिस्तसदृश जीवन जगण्याची महत्त्वाकांक्षा आहे; म्हणून...तो इथे आला. हा त्याचा ख्रिस्तसारखे जगण्याचा प्रयोग चालला आहे. पेशंटस्ना बरे करणे हे केवळ निमित्तमात्रच आहे...

...इथल्या स्वच्छतेच्या कल्पना अगदीच रानटी आहेत...

...सांडपाण्याची व्यवस्था (सॅनिटेशन) लज्जास्पद आहे...

...जंतुनाशकांचा वापर होत नाही...

...भरपूर पैसा मिळण्याची शक्यता असूनही हा अशा जुनाट, घाणेरड्या पद्धतीने राहण्याची सक्ती करतो...

...आफ्रिकन लोकांच्या ट्रेनिंगची व्यवस्था नाही...

...श्वाइट्झर स्वतःतच गुरफटलेला असतो. स्वतः स्वच्छ पाण्याने आंघोळ करतो, दोन अंडी खातो. पण स्टाफला मात्र ह्या सुविधा मिळत नाहीत...

...सर्व सत्तेचे केन्द्रीकरण श्वाइट्झरच्या ठिकाणी आहे. एखाद्या हुकूमशहासारखा हा वागत असतो...

...हे हॉस्पिटल म्हणजे आफ्रिकेवरची वाहती जखम आहे...

...श्वाइट्झरला प्रसिद्धीची हाव आहे. त्याची नम्रता वरवरची आहे. मुळात तो 'टायरंट' असून स्थानिक आदिवासींना अत्यंत कठोरपणे वागवतो...

...वीज सर्वत्र खेळविणे शक्य असूनही श्वाइट्झर तसे करू देत नाही. सरकार फोन देत होते तरी, श्वाइट्झरने फोनला नकार दिला!...

...आधुनिक पद्धतीचे उपयोजन का करीत नाही? असे विचारल्यास 'मी साध्या माणसांसाठी साधी पद्धती वापरतो–' असे उत्तर येते. परंतु गेल्या ५० वर्षांत आफ्रिकेत जी सुधारणा झाली, त्याचा त्याला गंधही नाही...

...आफ्रिकन राजकारणापासून अलिप्त राहतो, पण जागतिक राजकारणात मात्र मते देतो...

...श्वाइट्झर ही एक लोककथा आहे, मिथ् आहे अन् ती त्याच्याच अंतेवासियांनी तयार केलेली आहे...

...इथे फक्त विक्षिप्त, चक्रम व आयुष्यात अपयशी ठरलेल्या बायका कामे करायला येतात...

...कुटुंबप्रमुख या नात्याने पाहता श्वाइट्झर अगदीच अयोग्य आहे...

...त्याची प्रसिद्धी यंत्रणा भलतीच कार्यक्षम आहे...

...तत्त्वज्ञानात अंतर्विरोध आहे...

...आफ्रिकन लोक स्वातंत्र्य देण्याच्या योग्यतेचे आहेत असे त्याला वाटत नाही...

...आफ्रिकन पुढाऱ्यांना हे हॉस्पिटल म्हणजे त्यांच्या अस्मितेचा जिवंत अपमान वाटतो. हे महाशय गेले, म्हणजे त्यांच्या ख्रिस्तसदृश जीवनाची प्रयोगशाळा बनलेले हे हॉस्पिटलसुद्धा नाहीसे होईल. येथे येऊन त्याने स्वतःची अहंता फुलविण्याचा खूप मोठा उपक्रम केला आहे...

...हा माणूस खूप मोठा असला तरी, त्याचे दोषही तितकेच भयंकर मोठे आहेत...

## संकुचित राष्ट्रवाद्यांची व्यथा

श्वाइट्झरने मॅक्नाइट्चे ते पुस्तक अखेरपर्यंत वाचले. त्यातली टीका त्याला अपरिचित नव्हती–जॉन गुंथरने त्याच्या हॉस्पिटलला अत्यंत अस्वच्छ–निगा न राखलेले हॉस्पिटल असे म्हटलेच होते. डॉ. स्टॅन्स्ले ब्राउन यांना ते हॉस्पिटल म्हणजे तर चक्क 'लांच्छन' (disgrace) वाटत होते. डॉ. जॅक पेन या प्लॅस्टिक सर्जरी करणाऱ्या सर्जनला ते 'एक प्रचंड अपयश' (magnificent failure) वाटलेले होते.

...आधुनिक डॉक्टर, जे ज्ञानाचा नुसता व्यवसाय नव्हे, तर चक्क व्यापार करतात, अशा लोकांची टीका श्वाइट्झरने कधीही मनावर घेतली नाही. तज्ज्ञ काय म्हणतात, यापेक्षा आपले पेशण्टस् काय म्हणतात, त्यांना आपला कितपत फायदा होतो यावर श्वाइट्झरचे लक्ष असे. आधुनिक सुखसोयींच्या विरोधासही एक तात्त्विक भूमिका होती. ज्या लोकांसाठी हे हॉस्पिटल काढले आहे, ते सर्व रानटी लोक–आदिवासी लोक–त्यांना साधेपणानेच राहायची सवय असते. मोठे थोरले ६ मजली हॉस्पिटल बांधून त्यात अनेक सुविधा केल्या; तर कदाचित इथले स्थानिक आदिवासी रोगी इकडे येणारच नाहीत. रोगी येतात, ते सहकुटुंब सहपरिवार, शेळ्यामेंढ्यांसकट येतात–त्यांना अशा 'पॉश' ठिकाणी राहता यायचे नाही–परकेपणा वाटेल–म्हणूनच साधेपणाचा अट्टाहास धरला होता.

संकुचित राष्ट्रवादाने भारावलेले आफ्रिकेतले राजकीय पुढारी श्वाइट्झरला शत्रूच मानीत. 'चले जाव' असे ठणकावून सांगत–कारण सगळ्या गोऱ्यांना हाकलून द्यायचे होते ना! 'ही भूमी आमची आहे, श्वाइट्झरची नाही' अशा घोषणा दिल्या जात. आवारात येऊन कोणी पुढारी ठणकावून भाषण करून जाई. पण श्वाइट्झरने त्या संकुचित राष्ट्रवादाशी खिळून राहिलेल्या पुढाऱ्यांशी कधीही वाद घातला नाही. ही भूमी आफ्रिकनांची आहे हे मुळी मान्यच केले. वाद हवाच कशाला? पण गंमत अशी होती की, मतदानाची वेळ आली की, ते कागद घेऊन आदिवासी श्वाइट्झरकडे येत. काय करायचे ते विचारीत. 'अरे, तुम्हाला कॉलनी म्हणून राहायचंय्, की स्वतंत्र राष्ट्र म्हणून जगायचंय्?' तुमचे मत असेल तसे ते सांगा. या प्रश्नाचा अर्थ आदिवासींना समजतच नसे. अखेर ते म्हणत, 'आम्हाला तुम्ही इथे राहायला हवे आहात. तुम्हाला मत कसं द्यायचं ते सांगा!' 'अरे, पण मी निवडणुकीला उभाच नाही.' –'पण ज्यामुळे तुम्ही इथे राहाल असे करायला सांगा'

स्थानिक पुढाऱ्यांना असल्या भोळसटांचा भयंकर राग येई. प्रश्न

झाला; तर आम्हाला का विचारायला येत नाही? श्वाइट्झरकडे का जाता? ही पुढाऱ्यांची कायमची व्यथा...!

ज्यांच्यासाठी युरोपातले संपन्न जीवन, प्रतिष्ठित नोकरी व सुस्थिर कौटुंबिक जीवन सोडून तो इथे आला होता, ते आदिवासी त्याच्यावर प्रेमच करीत होते. चुकारपणामुळे तो रागावला, ओरडला तरी त्यांना त्याचे काहीही वाटायचे नाही. 'आमचे पपा रागावले हं!' असं ते म्हणत. अन् त्याबद्दल तुम्हाला काही वाटत नाही का? असे विचारल्यास उत्तर यई, 'मग काय? वडील रागावले तर त्यात काय झालं?'

## 'फार दिवस रेंगाळणे बरे नाही'

श्वाइट्झरला टीकेची जरी भरपूर सवय असली तरी, मॅक्नाइट्च्या पुस्तकात विखार भरला होता. लोक श्वाइट्झरचे उगाचच देव्हारे माजवीत आहेत, असा सर्व निवेदनाचा रोख होता. भयंकर अपमान होता

रात्रीच्या जेवणाच्या वेळी श्वाइट्झर भोजनगृहात आला. त्याची मुद्रा अगदीच मालवलेली होती. उदासीनता वेढून टाकीत होती. 'हेचि फळ काय मम तपाला?' हा प्रश्न मनात टुपत होता. जेवण झाल्यावर तो आपल्या सेक्रेटरीबाईला-अलिसिल्व्हंरला म्हणाला, 'आता माझी शवपेटिका तयार करायला हवी.'

ती एकदम चमकली. डॉक्टरांचे मन काही आज शांत नाही-उद्विग्न आहे, हे तिने आधीच ओळखले होते...स्वतःला सावरत ती म्हणाली, 'असं का म्हणता डॉक्टर? लवकरच तुमचा नव्वदावा वाढदिवस येतो आहे. आम्ही सगळेजण त्याची वाट पाहत आहोत...अन् तुमची प्रकृती तर अगदी ठीक आहे.'

'होय...तरी पण शवपेटिका तयार केलेली बरी-आयत्या वेळी नको गडबड व्हायला!...अन् आता फार दिवस रेंगाळणेही बरं नाही.'

दुसऱ्या दिवशी श्वाइट्झरने खरोखरच एक शवपेटिका घेतली. स्वतःच्या मापाची...ओक लाकडाची...यत्किंचितही कलाकुसर नसलेली...खडबडीत...सरसकट सर्वांसाठी केली जाते तसलीच.... □

कामानिमित्त श्वाइट्झर जगाच्या पाठीवर कुठेही असला, तरी त्याचे लक्ष आफ्रिकेतल्या हॉस्पिटलमध्ये गुंतलेले असायचे. वस्तुतः तो अल्सेशिअन्...जर्मनी व फ्रान्स या दोन देशांत त्याचे शिक्षण झालेले...दोन्ही देशांनी त्याच्यावर मानसन्मानांचा अक्षरशः वर्षाव केला होता. तथापि कोणत्याही देशात त्याने आपले घर केले नाही. लॅम्बरीन येथील हॉस्पिटल हीच त्याची कर्मभूमी आणि तेच त्याचे घर. उतारवयात (८५ वर्षांच्या पुढे तो स्वतःला उतारवयाचा म्हणवून घेई.) त्याला एकदा अमेरिकेत आंतरराष्ट्रीय समितीत काम करण्यासाठी आमंत्रण आले होते.-श्वाइट्झरने त्या आमंत्रणास सविनय नकार दिला. तो म्हणाला, 'आता दुसऱ्या लोकांनी तेथे जाऊन बोलले पाहिजे. मी आता म्हातारा झालो आहे. माझे बहुतेक सर्व आयुष्य आफ्रिकेतच गेले आहे. आता आयुष्याच्या अखेरीस जर मी या लोकांना सोडून गेलो, तर त्यांना ते पटायचे नाही.'

खरेच पटले नसते! आदिवासींना श्वाइट्झरच्या कामाची पूर्णपणे जाणीव होती. एवढेच नव्हे तर गॅबॉन स्वतंत्र झाल्यावर गॅबॉन रिपब्लिकने त्याला The Star of Gabon असा किताब दिला होता. अध्यक्ष एम्बा (M, BA) यांनी तर श्वाइट्झरला आफ्रिकेचे प्रतिनिधित्व परराष्ट्रात करण्याची विनंती केली होती. त्या विनंतीला श्वाईट्झरने स्पष्ट नकार दिला होता. 'शक्य नाही. माझ्या हॉस्पिटलला माझी जास्त गरज आहे,' हे त्याचे उत्तर.

हॉस्पिटलचा पसारा तरी किती वाढत गेला होता. ९०० हेक्टर तर नुसती जमीन. काही लागवडीखाली आलेली...अन् बाकीच्या जागी हॉस्पिटलच्या ७२ इमारती!...श्वाइट्झरची सतत ५० वर्षे डॉक्टर अन् जोडीला 'मास्टर बिल्डर' ही भूमिका होती...हॉस्पिटल स्वयंपूर्ण असावे म्हणून किती तरी फळझाडे लावली होती, शेती केली होती. स्वयंपूर्णतेसाठी जिवाचे रान केले होते. ६०० रोगी तेथे राहू शकत होते. खेरीज नुसते औषध घेऊन जायला येणारेही अनेक असत. येवढ्या रोग्यांसाठी केवढा मोठा स्टाफ लागायचा. नाना देशांतून डॉक्टर्स येत, नर्सेस येत, कामाला लागत...वेतनाची अपेक्षा न करता कामाला लागत. श्वाइट्झरच्या उदात्त ध्येयवादाची व लोकविलक्षण व्यक्तिमत्त्वाची किमया होती ती. ज्यांच्या मनात श्वाइट्झरची जीवनकहाणी रुजली, त्यांनी आपल्या जीवनमार्गात काही ना काही बदल केलेच.

राजकारण हा सारा सत्तेचा खेळ...नीतिमूल्यांशी फारसा संबंध नसलेले क्षेत्र...त्या क्षेत्राचे श्वाइट्झरला कदापि आकर्षण नव्हते. उलट कंटाळाच होता. परंतु हिरोशिमा आणि नागासाकीचा अणुस्फोटाने विध्वंस व्हावा-ऐंशी ऐंशी हजार माणसे एकेका स्फोटात बेचिराख व्हावीत, हे त्याला सहन झाले नाही. अणुस्फोटाविरुद्ध आवाज उठवला...त्या संदर्भात व्याख्याने देऊन लोकमत जागे केले. रसेल पीस फाउंडेशनचे कामही केले...१९५२ मध्ये श्वाइट्झरला शांततेसाठी प्रयत्न केल्याबद्दल नोबल प्राइझचा जागतिक सन्मान मिळाला. १९५५ मध्ये इंग्लंडच्या राणीने श्वाइट्झरला ऑर्डर ऑफ मेरिट हा किताब देऊन त्याचा बहुमान केला. जगातल्या अनेक विद्यापीठांनी त्याच्यावर सन्माननीय पदव्यांचा अक्षरशः वर्षाव केला. परंतु या मान-सन्मानांचे त्याला काहीही विशेष वाटले नाही. आपले आयुष्य आपण प्रामाणिकपणे सत्कारणी लावीत आहोत, शक्य तेवढी मानवतेची सेवा करीत आहोत ही कृतार्थतेची भावना त्याच्या मनात पुष्कळदा येत असे. सबंध हॉस्पिटल झोपी गेल्यावर उत्तर रात्रीच्या

टेलिफोन नं. ३५८६१३

दीपावली शुभचिंतन

**माधवाश्रम**

**प्रायव्हेट लिमिटेड**

गिरगावात राहण्याची उत्तम सोय

गिरगाव, मुंबई-४

काजळी अंधारातुन श्वाइट्झर हॉस्पिटलमधून चक्कर मारून यई. या विजनात नानाप्रकारच्या रोगराईने ग्रस्त झालेल्या आदिवासींना आपण थोडाफार तरी मदतीचा हात देऊ शकलो याबद्दल तो परमेश्वराचे मनःपूर्वक आभार मानीत राही. जे उत्कटतेने वाटले, त्यानुसार वागून दाखविण्याचे त्याचे मनोधैर्य असामान्यच म्हणायला हवे.

## वटवृक्षाच्या पारंब्या

नोबल प्राइझ मिळाल्यावर लॅम्बरीनला नाना तऱ्हेच्या लोकांची वर्दळ सुरू झाली. पत्रकार, समाजसेवक, लेखक, संगीतज्ञही लॅम्बरीनला येत–राहात–सर्व उपक्रम पाहून जात. प्रवासी मंडळी खूप असायची. आफ्रिका पाहायला आलेल्या यात्राकंपन्या असत. आफ्रिकेत पाहण्यासारखं काय काय आहे?...या प्रश्नाला उत्तर येई, 'व्हिटोरिया फॉल्स, पिरॅमिडस, अल्बर्ट श्वाइट्झर...वगैरे.' श्वाइट्झरकडे सतत पाहुणे असायचे–कोणी 'येऊ कां?' असे विचारून येत. कोणी नुसते 'आम्ही अमूक वेळी येणार आहोत,' एवढेच सांगून येत. आणि कोणी कोणी तर तेवढेही न कळवता येत. गळयात कॅमेरा...अन् उतरल्यावर म्हणत, 'कुठे आहे डॉक्टर श्वाइट्झर?' जणू काही पाहुण्यांपुढे फोटो घेण्यासाठी उभे राहणे एवढेच श्वाइट्झरचे काम! सगळे नमुने भेटायचे. पण शक्यतो कोणालाही नाराज न करता तो आपले काम करीत राही. पाहुण्यांना सर्व हॉस्पिटल दाखविणे हे एक नवेच काम होऊन बसले होते. डॉक्टर्स किंवा नर्सेस कामात असत. कोणी माहीतगार परिचारिका सर्वत्र हिंडून दाखवीत असे. श्वाइट्झरच्या कार्यामागची प्रेरणा स्पष्ट केली जाई. कोणाला ती आदरणीय वाटे, तर कोणाला अव्यवहार्य–स्वप्निल अशीही वाटत राही. येवढे मात्र खरे, की श्वाइट्झरकडे येऊन, त्याच्या कार्याने प्रभावित झालेले लोक अक्षरक्षः अगणित होते. कित्येकांनी आपल्या आयुष्याचा मार्गच बदलून टाकला होता, आणि श्वाइट्झरप्रमाणे विजनात, रोगराई जास्त असेल अशा जागी हॉस्पिटल काढले होते. कोरियाहून आलेले डॉ. टिमथी री, अमेरिकन डॉक्टर फर्गस पोप, स्वतः अक्षरशः कोटयाधीश व्यापारी असून, श्वाइट्झरच्या प्रेरणेने चव्वेचाळिसाव्या वर्षी डॉक्टर झालेले डॉ. लॅरिमन मेलन–दक्षिण फ्रान्समध्ये गोरगरिबांसाठी हॉस्पिटल चालविणारे डॉक्टर (श्री व सौ.) बार्थलोमी...आणि असेच कितीतरी! या वटवृक्षाच्या पारब्या देशोदेशी रुजल्या होत्या.

आणि आता...उतारवयात...पंचाऐंशीच्या पुढे गेल्यावर मात्र टीकेचे वादळ उठले होते. विश्लेषण, चिकित्सा, सत्यशोधन इ. गोंडस नावाखाली श्वाइट्झरचा सबंध उपक्रम अर्थशून्य ठरविण्याचा पद्धतशीर प्रयत्न चालला होता. अमेरिकेतल्या कॉकटेल पार्टीतला चर्चेचा विषय असे, 'काय हो, तुम्ही श्वाइट्झरच्या बाजूचे की विरुद्ध?'...श्वाइट्झर हे एक प्रचंड 'फ्रॉड' आहे असे आग्रहाने सिद्ध करू पाहणारा नवा संशयवादी वर्ग उत्पन्न झाला होता. लॅम्बरीनला चक्कर टाकायची–श्वाइट्झरचा पाहुणचार घ्यायचा, वरवर जे दिसेल तेवढे पटापट टिपून घ्यायचे, फटाफट फोटो काढायचे, अन् मायदेशी जाऊन पुस्तक लिहायचे–'फ्रॉड'चे स्पष्टीकरण करायचे! खोल जाऊन विचार करण्याइतका वेळ या पत्रकारांना कधीच नसायचा–तरी पुस्तक लिहायची घाई! श्वाइट्झरविषयी लोकांत जिज्ञासा आहे ना? मग पुस्तकै भरभर खपणारच! खेरीज 'फ्रॉड' उघडकीला आणल्याचे श्रेयही मिळत असेल, तर कोण सोडणार!

तथापि ज्या लोकांना श्वाइट्झरचे चरित्र आणि चारित्र्य माहीत होते, त्याची विद्वता, जबरदस्त प्रेरणा, प्रामाणिकपणा, कष्ट करण्याची तयारी आणि त्याची सहृदयता, माणुसकी हे माहीत होते, त्यांच्यावर वर्तमानपत्री प्रचाराचा काहीही परिणाम झाला नाही. उलट श्वाइट्झरविषयीची त्यांची आस्था दृढ होत गेली. परिणामतः त्याच्या नव्वदाव्या वर्षीच्या वाढदिवसानिमित्त फार मोठा सोहोळा करण्यात आला. करण्यात आला म्हणण्यापेक्षा सोहोळा झाला असेच म्हटले पाहिजे. कारण कोणालाही आमंत्रण नसता अनेक देशांचे प्रतिनिधी शुभेच्छांसह आले. नर्सेसना आणि डॉक्टरांना या दिवसाची अपूर्वाई वाटली. स्थानिक आदिवासी, रुग्ण, इ. सर्व त्या आनंदसोहळयात सहभागी झाले.

□

१४ जानेवारी १९६५...श्वाइट्झरच्या वयाला ९० वर्षे पूर्ण झाली होती. हा संस्मरणीय दिवस लॅम्बरीनमध्ये कसा साजरा केला जातो ते सर्वांना कळावे म्हणून B. B. C. तंत्रज्ञांची एक टीम लॅम्बरीनला हजर. अनेक मोठमोठ्या मासिकांनी आपापले प्रतिनिधी आफ्रिकेला धाडून दिले होते. अमेरिकेहून 'लाइफ'चा बातमीदार दोन दिवसांपूर्वीच आला होता.

आदल्या दिवशी एका ट्रकला अपघात होऊन बरेच आदिवासी जखमी झाले होते. अपघात खूप दूरवर घडला होता. जखमींना हॉस्पिटलपर्यंत आणीतो रात्र झाली होती. त्यांची देखभाल... इमर्जन्सीचे युनिट कामात...बऱ्याच डॉक्टरांना व नर्सेसना रात्री खूप जागरण झाले होते. पूर्वी अपघात होत, ते मगरी, सुसरी, गेंडे यांच्यापायी होत. आता त्यात यंत्रांचीही भर पडली होती. पाय तुटून गेलेल्यांचे तुटके पाय शोधण्याचा प्रयत्न चालला होता. हे गोरे लोक काय वाट्टेल तो चमत्कार करू शकतात–मग ते पाय नाही शिवून देणार?...ही भावना.

सकाळपासून श्वाइट्झरच्या खोलीजवळ माणसांची रीघ लागली. ६०० पेशण्टस, त्यांची कुटुंबे, अगणित सरकारी अधिकारी, डॉक्टर्स, नर्सेस...आपल्या पाळीव प्राण्यांसकट...प्राण्यांनीसुद्धा छान नट्टापट्टा केलेला...गळयात रिबिनीचे बो बांधलेले...लेपर्स व्हिलेजमधली मंडळी–असे सर्वजण आले होते. सर्व लेपर्स समूहगान करण्याचा इशारा मिळण्याची वाट पाहत होते.

७–३० ला श्वाइट्झर खोलीबाहेर आला...दुतर्फा माणसांच्या रांगा...प्रथम श्वाइट्झरच्या मातृभाषेत–अल्सेशिअन बोलीत–प्रार्थना झाली. त्यात श्वाइट्झरच्या व माटिल्ड कोटमान बाईंच्या पोपटानेही सूर लावला.

श्वाइट्झरवर अभिनंदनाचा वर्षाव झाला. सर्वांशी हस्तांदोलन करीत, त्यांना धन्यवाद देत श्वाइट्झर जनसमुदायातून फिरत होता. त्याचे निळसर डोळे आता गढूळ दिसत होते...भोजनगृहात ब्रेकफास्ट...नर्सेसनी मोठ्या चतुराईने ९ खूप मोठ्या मेणबत्त्या आणल्या होत्या...त्या तेवत होत्या...सर्वत्र लाल-हिरव्या पानांची सजावट होती. आफ्रिकेच्या विजनातही हे सुशोभन शक्य होते, आणि फार

पृष्ठ १५६ वर

# The R Document

**राजकीय वर्तुळात खळबळ उडवून देणाऱ्या**
**आयर्व्हिंग वॉलेस या जगप्रसिद्ध लेखकाच्या**
**'दि आर डॉक्युमेंट' या कादंबरीचा विस्तृत परिचय**

**अशोक जैन**

In 1787 after the delegates in Philadelphia signed The New United States Constitution, a women approached Benjamin Franklin. "Well, Doctor" she asked "What have we got, a Republic or a Monarchy?" Franklin replied, "A Republic, if you can keep it."

---

"Those who would give up essential liberty to purchase a little temporary safety deserve neither liberty nor safety"

-Benjamin Franklin

**अमेरिकन जनतेचें लोकशाही हक्क हिरावून घेणारी घटनादुरुस्ती आणि एक अॅटर्नी जनरल....**

# : प्रकरण पहिले :

ख्रिस्तोफर कॉलिन्सला आपल्याला भेटायला आलेल्या त्या माणसाचं मन दुखवायच नव्हतं. कारण तो तरुण संवेदनाशील, समंजस, मृदू स्वभावाचा होता. एरवी त्याच्याशी मनसोक्त गप्पा मारायला कॉलिन्सला आवडलंच असतं. परंतु आता त्याला वेळ नव्हता. टेबलावर कामाच्या फायलींचा ढीग पडला होता आणि रात्री व्हाईट हाऊसवर जायचं होतं. राष्ट्राध्यक्षांनी भोजनाला बोलावलं होतं.

अमेरिकेतील अंतर्गत गुप्तचर संघटना-'फेडरल ब्यूरो ऑफ इन्व्हेस्टिगेशन' चे (एफ. बी. आय.) डायरेक्टर व्हर्नान टी. टायनॅन यांच्याकडून तो आला होता. ही बाब खास महत्त्वाची होती. तो इसम टायनॅनचं आत्मचरित्र लिहून देणार होता. दुसऱ्याला पुस्तकं लिहून देणं हाच त्याचा पेशा होता. त्याचं नाव होतं इस्मेल यंग. टक्कल, बाजूबाजूनं केस, अंगभर मांसच मांस, इतकं की, करड्या रंगाच्या सूटातून ते बाहेर पडतंय्, असं वाटावं. गळ्याखाली इतकं मांस की, दोन हनुवट्या दिसत होत्याच व तिसरी दिसू लागली होती! सबंध खुर्चीत त्याचा देह ठासून भरलेला होता. एखाद्या छोट्या व्हेल माशासारखाच तो दिसत होता. धूळ साचलेला चष्मा व पाईप सोडला, तर तो लेखकासारखा मुळीच दिसत नव्हता. अशा 'घोस्ट रायटर'ला कॉलिन्सनं पूर्वी कधीच पाहिलं नव्हतं म्हणा.

इस्मेलनं डोकं वर करून प्रश्न विचारला तेव्हा, कॉलिन्सच्या मनातील ही विचारांची साखळी तुटली.

इस्मेलनं विचारलेला प्रश्न स्वतःशीच पुटपुटत कॉलिन्स म्हणाला, 'मला व्हर्नान टायनॅनबद्दल काय वाटतं?'

'हो, त्यांच्याबद्दल तुमचं मत काय?'

टायनॅनची मूर्ती कॉलिन्सच्या डोळ्यांसमोर उभी राहिली. छोटे डोळे, गोलाकार लहान डोकं, छोटीच पण भरदार मान, भक्कम छाती. माणूस उंचापुरा, धबधब्यासारखं धो धो बोलणं, आवाज कर्कश. टायनॅनचं हे बाह्यचित्र सुस्पष्ट होतं. परंतु त्याचं अंतरंग? ते मात्र सांगणं शक्य नव्हतं. निदान कॉलिन्सला तरी ते ठाऊक नव्हतं. प्रामाणिकपणं इस्मेलला हे सांगायचं आणि ही मुलाखत आटोपती घ्यायची या विचारानं तो म्हणाला, 'स्पष्टच सांगायचं तर, डायरेक्टर टायनॅनना मी फार ओळखत नाही. आता या अधिकारपदावर येऊन मला अवघा एक आठवडा झालाय्. कशाला वेळ मिळत नाही. त्यामुळं टायनॅन यांचा जास्त जवळून परिचय करून घ्यायला वेळच नाही झाला.'

कॉलिन्सच्या म्हणण्यात तथ्य असलं तरी, तो गेले दीड वर्ष न्यायखात्यात काम करीत होता. तसंच पूर्वीचे ॲटर्नी जनरल नोह बॅक्स्टर यांच्या हाताखाली तेरा वर्षं त्यानं डेप्युटी ॲटर्नी जनरलचं काम केलं होतं व आता तो ॲटर्नी जनरल झाला होता. इस्मेलला हे ठाऊक होतं. त्यानं या गोष्टींचा उल्लेख करून पुन्हा प्रश्न विचारला.

परंतु डेप्युटी ॲटर्नी जनरल असताना टायनॅनला भेटायची फारशी वेळ येत नसे. ॲटर्नी जनरल नोह बॅक्स्टर हे त्यांना वारंवार भेटत. ते दोघे चांगले मित्र आहेत असं कॉलिन्सनं सांगताच भिवया उंचावून इस्मेल म्हणाला, 'काय म्हणता, डायरेक्टर टायनॅन यांचा मित्र? त्यांना कोणी मित्र असेल असं मला नव्हतं वाटलं. त्यांचा असिस्टंट हॅरी ॲडकॉक हा त्यांचा एकमेव घनिष्ट दोस्त असावा. आणि ही मैत्रीदेखील व्यवसायामुळे असावी.'

'तुम्ही काही म्हणा, त्यांचा जवळचा मित्र म्हणजे ॲटर्नी जनरल बॅक्स्टरच. अर्थात तुमचं म्हणणं एका परीनं खरंच आहे. टायनॅन तसे एकाकीच आहेत. खरं म्हणजे एफ. बी. आय. चे सगळेच डायरेक्टर हे असेच एकाकी असतात. त्यांचं कामच असं असतं की, त्यामुळंही असं असेल. तर सांगायची गोष्ट म्हणजे टायनॅनची मला फारशी माहिती नाही.' कॉलिन्सनं सांगितलं.

इस्मेल तसा सहजासहजी हार खाणारा इसम नव्हता. तोंडातला जुनाट पाईप त्यानं बाहेर काढला. ओठांवरून जीभ फिरवली व तो म्हणाला, 'पाच महिन्यांपूर्वी ॲटर्नी जनरल कर्नल बॅक्स्टरना हृदयविकाराचा झटका आला आणि तुमची या पदावर हंगामी नेमणूक झाली. या देशातील न्यायसंस्थेचे तुम्ही अनधिकृत प्रमुख बनलात आणि आठवड्यापूर्वी ही तुमची नेमणूक अधिकृत करण्यात आली. आता एफ. बी. आय. हे तुमच्या नियंत्रणाखाली येतं. तेव्हा डायरेक्टर टायनॅन हे तुमच्या हाताखालचे अधिकारी आहेत. तेव्हा त्यांच्याशी तुमचा संबंध येत असणारच की...'

कॉलिन्सला मनापासून हसू फुटलं. तो म्हणाला, 'डायरेक्टर टायनॅन आणि माझ्या हाताखाली? अजून तुम्हाला सारं कळायला बराच वेळ लागेल. तुम्हाला बरंच काही शिकायचंय् अजून.'

'तेवढ्यासाठीच तर आलोय मी. एफ. बी. आय. च्या डायरेक्टरचे ॲटर्नी जनरलशी, राष्ट्राध्यक्षांशी, सी. आय. ए. शी, किंबहुना सरकारमधील प्रत्येकाशी नेमके काय संबंध आहेत हे समजल्याविना मी टायनॅन यांचे आत्मचरित्र लिहून देऊच शकत नाही. आता खुद्द टायनॅनना मी विचारले, पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे सरकारी यंत्रणेतील कामकाज पद्धतीविषयी व या यंत्रणेतील आपल्या स्थानाविषयी त्यांच्या कल्पना संदिग्ध आहेत.' इस्मेलनं सांगितलं.

मुलाखत निष्कारण लांबत चालली होती. पण तरीही एक गोष्ट आताच स्पष्ट करावी असं कॉलिन्सला वाटलं आणि तो म्हणाला, 'हे बघा, सरकारी मॅन्युअलनुसार एफ. बी. आय. चा डायरेक्टर हा ॲटर्नी जनरलच्या हाताखालचा अधिकारी हे खरं. पण प्रत्यक्षात मात्र ते खरं नाही. याचं कारण डायरेक्टरची नेमणूक कायद्यान्वये ॲटर्नी जनरल करत नाही. सेनेटची संमती घेऊन राष्ट्राध्यक्ष करतात. आता एफ. बी. आय. चा डायरेक्टर माझ्याबरोबर काम करीत असला, माझा सल्ला घेत असला तरी, त्याच्यावर नियंत्रण ठेवण्याचा अधिकार मला नाही. सेनेटची संमती न घेता केवळ राष्ट्राध्यक्षच त्याला त्या पदावरून काढू शकतात.'

डायरेक्टर टायनॅनबद्दल माझं मत हवं तर ऐकवतो, असं सांगून कॉलिन्स म्हणाला, 'टायनॅन हा धडाक्यानं काम करणारा माणूस आहे. डायरेक्टरच्या पदाला अगदी लायक असा तो माणूस आहे.'

'कोणत्या अर्थानं?'

'गुन्ह्याचा तपास करायचा हे त्याचं काम. माहिती खणून काढा-

यची व ती सादर करायची. आपल्या माहितीवर आधारित असा निष्कर्ष तो काढत नाही किंवा शिफारसही करत नाही. त्याच्या माहितीवर आधारित कायदेशीर कारवाई करायचं काम माझं आहे.'

'याचा अर्थ प्रत्यक्ष काम करणारे तुम्ही आहात ?'

कॉलिन्सनं जरा आदरानंच यंगकडं पाहिलं व तो म्हणाला, 'परंतु तसं घडत नाही. न्याययंत्रणेतील वकिलांपैकी मी एक वकील एवढंच माझं स्थान. आम्ही नेहमीच्या मार्गानं जातो. टायनॅन व त्याचे लोक हे धोक्याची कामं स्वत: हाताळतात. आता तुमच्या माहितीसाठी टायनॅनविषयी माझं एक मत सांगतो, एखादी गोष्ट त्याला पटली किंवा एखाद्या गोष्टीमागे त्याने खंबीरपणं उभं राह्यचं ठरवलं तर, मग तो त्याचा पुरा पिच्छा पुरवणार. आता घटनेतील ३५ व्या दुरुस्तीचंच पहाना ! विविध राज्यांकडून तिला अजून हिरवा कंदिल मिळायचाय. राष्ट्राध्यक्षांनी या दुरुस्तीची कल्पना काढताच टायनॅन त्याच्या पाठीशी खंबीरपणं उभा राहिला !'

यंग मध्येच म्हणाला, 'राष्ट्राध्यक्षांनी ३५ व्या दुरुस्तीची कल्पना काढली नाही, डायरेक्टर टायनॅननी काढली.'

कॉलिन्सला आश्चर्याचा धक्काच बसला. त्यांच्याकडं रोखून पाहत त्यांनी विचारलं, 'हे कोणी सांगितलं तुम्हाला ?'

'खुद्द टायनॅननीच. ही घटना दुरुस्ती म्हणजे आपलंच अपत्य आहे असं ते वारंवार सांगत असतात.'

'अर्थात ही दुरुस्ती अजून झालेली नाही. तीनचतुर्थांश राज्यांनी तिला मान्यता द्यायला हवी.'

'ते होईल. अजून दोन राज्यांचीच काय ती संमती बाकी आहे.'

'आणि आणखी तीन राज्यांची मतदाने व्हायचीत त्याचं काय ?'

'तिघांपैकी दोन राज्यांची मतदाने आज रात्री आहेत. मला वाटतं, ३५ वी घटनादुरुस्ती आज रात्रीच घटनेचा एक भाग होईल.' कॉलिन्सनं घड्याळावर नजर टाकली व म्हणाला, 'बराय्. मग...'

'श्रीयुत कॉलिन्स, फक्त एकच विचारायचं राहिलं...'

त्याच्या चेहऱ्यावरचे भाव पाहून कॉलिन्स थबकला.

'आता याचा माझ्या मुलाखतीशी संबंध नाही. परंतु मला तुमचं मत जाणून घेण्याचं औत्सुक्य आहे म्हणून विचारतो. तुम्हाला ही ३५ वी घटनादुरुस्ती पसंत आहे का ?'

कॉलिन्स क्षणभर शांत राहिला. प्रश्न अनपेक्षित होता. खरं तर त्यानं स्वत:ला, पत्नी कॅरेनलादेखील हा प्रश्न विचारला नव्हता. 'मला पसंत आहे का ?' त्यानं मनातल्या मनात स्वत:लाच विचारलं नि तो म्हणाला, 'खास पसंत आहे असं काही नाही. खरं तर मी याबद्दल विचारच केला नाही. माझ्या खात्याच्या पुनर्रचनेत मी इतका गुंतलोय की विचारू नका. राष्ट्राध्यक्ष व एफ. बी. आय. चे डायरेक्टर यांच्यावर मी याबाबत विश्वासून आहे...'

'परंतु त्याचा संबंध तुमच्याशी, तुमच्या खात्याशी पोचतो...'

कॉलिन्सच्या कपाळावर आठ्या पडल्या. तो म्हणाला, 'मला ठाऊक आहे ते; परंतु राष्ट्राध्यक्ष आपली जबाबदारी पार पाडायला समर्थ आहेत. माझी काही मतं आहेत. पण ते जाऊ दे.'

आपण यंगलाच ३५ व्या घटनादुरुस्तीबद्दल मत विचारावं असं कॉलिन्सला वाटलं नि त्यानं तसं विचारलंही...

'श्रीयुत यंग, तुम्हाला ही ३५ वी घटनादुरुस्ती पसंत आहे ?'

'आपलं बोलणं अगदी आपल्या दोघातच ठेवाल तर सांगतो.'

'हो.'

'मला या दुरुस्तीचा तिरस्कार वाटतोय. माणसांच्या मूलभूत हक्कांवर गदा आणणारं मला काहीही आवडत नाही.'

'आता हे तुमचं बोलणं थोडं अतिशयोक्तीचं आहे हं.'

'मूलभूत हक्कात सुधारणा किंवा ते हक्क स्थापित करणं हे या दुरुस्तीमुळं शक्य होईल. पण तेही काही ठराविक परिस्थितीत. देशात अंतर्गत आणीबाणीची परिस्थिती उद्भवून देशाचा विध्वंस होण्याची पाळी येऊन ठेपली, तरच हे करायचं असा या घटनादुरुस्तीचा अर्थ आहे ! आपण अनागोंदीच्या रोखानं चाललोय व त्यावर मात करण्यासाठी या ३५ व्या घटनादुरुस्तीची मदत होईल.' कॉलिन्सनं सांगितलं.

'त्यातून धाकदपटशा, दडपशाही सुरू होईल. शांततेची किंमत म्हणून माणसाला त्याच्या स्वातंत्र्याचा त्याग करावा लागेल !' इश्मेलच्या आवाजाला धार होती.

कॉलिन्स काहीसा चिडला नि म्हणाला, 'रस्त्यारस्त्यावर काय घडतंय् ते तुम्हाला ठाऊक आहे ? आपल्या इतिहासातील सर्वांत मोठी गुन्हे व हिंसाचाराची लाट उसळलीय्. दोन महिन्यांपूर्वी गुंडांच्या एका टोळक्यानं थेट व्हाईट हाऊसवरच हल्ला चढवला होता. बॉंबफेक, गोळीबार झाला. त्यात सुरक्षा अधिकारी व पहारेकरी मिळून तेराजण ठार झाले, सात पर्यटक नाहक बळी पडले व ईस्ट रुम जळाली. हे कोणा परकी शत्रूनं केलं नाही, तर अमेरिकनांनी अमेरिकनांविरुद्ध या गोष्टी केल्या ! तेव्हा सध्या कोणीही सुरक्षित नाही. आज सकाळी तुम्ही टी. व्ही. वरील बातम्या पाहिल्यात ? आजचे पेपर्स वाचलेत ?'

यंगनं नकारार्थी मान हलवली.

'मग ऐका : इलिनॉक्स येथील पेओरिओ इथं घटना घडली. पोलीस खात्यातील सकाळची बैठक संपवून पोलीस अधिकारी मोटर सायकली, मोटारी घेऊन ड्यूटीवर निघाले होते. तेव्हा दबा धरून बसलेल्या गुंडांच्या एका टोळीनं या पोलिसांवर हल्ले चढविले. रक्तपात झाला. पोलीस पथकापैकी एकतृतीयांश पोलीस ठार वा जखमी झाले. आता असंच घडत राहिलं तर करायचं काय ? अटलांटा शहरातील प्रत्येक ९ जणामागे एकाचा खून होतो असं एका गणितज्ञानं सांगितलंय्. कधी उद्भवला नव्हता इतका हा गंभीर पेचप्रसंग आहे. तो सोडवायचा तर मार्ग कुठला ? तुम्ही काय केलं असतं ?'

इश्मेल यंगनं हा विषय आधी चर्चिला होता, त्यामुळं त्याला उत्तर द्यायला वेळ लागला नाही. 'प्रथम मी माझं घर पुन्हा उभारीन, अगदी तळापासून. या सर्व गोष्टींचं कारण आहे गरिबी ! तेव्हा गरिबी दूर करण्याचा, आर्थिक दडपणं हटवण्याचा, विषमता, अन्याय, गुन्हेगारी दूर करण्याचा मी प्रयत्न करीन.'

'देशात सर्वांगीण फेरबदल घडवून आणायला आता वेळ नाही. मूलभूत काय काय गोष्टी केल्या पाहिजेत, याबाबत माझं दुमत नाही. या गोष्टी योग्य वेळी होतीलच.'

'एकदा का पस्तिसावी घटनादुरुस्ती झाली की, मग या गोष्टी होणारच नाहीत.' यंगनं सांगितलं.

**प्रथम मी माझं घर पुन्हा उभारीन, अगदी तळापासून. या सर्व गोष्टींचं कारण आहे गरिबी !**

त्याच्याशी आणखी वाद घालण्याच्या मूडमध्ये कॉलिन्स नव्हता. ' डायरेक्टर टायनॅनशीदेखील तुम्ही असं बोलता का ?'

खांदे उडवून त्यानं उत्तर दिलं, ' असं बोललो असतो तर, आज मी इथं येऊच शकलो नसतो. मी तुमच्याशी हे बोललो याचं कारण तुम्ही मला सभ्य गृहस्थ वाटता...'

' आहेच मी. '

' तुम्हाला राग येणार नाही असं वाटतं म्हणून आणखी एक प्रश्न विचारू ? तुम्ही ' या ' लोकांच्या कळपात कसे ?'

कॉलिन्सला या प्रश्नानं हादरा दिला. त्यानं अॅटर्नी जनरलचं पद स्वीकारायचं ठरवलं त्यावेळी देखील कॅरेननं हाच प्रश्न विचारला होता. त्या वेळी त्यानं काही उत्तरंही दिली होती. परंतु अनोळखी इसमाला ती सांगावीत असं त्याला वाटलं नाही.

कॉलिन्सनं आपल्या मनगटी घड्याळावर पुन्हा नजर टाकली. ' सॉरी, आता खरंच उशीर झालाय्. मला खूप कामं आहेत. रात्री व्हाईट हाऊसवर जायचंय. आपण परत भेटू. तुम्ही मला फोन का नाही करत !'

इस्मेल यंगनं नोटपेपर बाजूला ठेवला. आपला टेपरेकॉर्डर बंद केला आणि ' फोन करतो ' असं सांगून तो बाहेर जायला निघाला. त्याच्याशी शेकहँड करीत कॉलिन्सनं विचारलं, ' तुम्ही टायनॅनबरोबर किती काळ काम करताय ?'

दुबळं हास्य करीत यंग म्हणाला, ' हे काम केवळ पोटासाठी मी स्वीकारलं. हे काम मी पत्करावं म्हणून माझ्यावर काहीसं दडपण आणलं गेलं एवढंच. बराय. '

यंगनं उत्तर दिलं आणि तो निघून गेला.

कॉलिन्स घटकाभर स्तब्ध उभा राहिला. इस्मेलशी झालेलं बोलणं त्याला आठवलं. देशातील पेचप्रसंगावर मात करण्यासाठी सुचविण्यात आलेली घटनादुरुस्ती, डायरेक्टर टायनॅन इत्यादी अनेक विचार त्याच्या मनात तरंगून गेले. तो टेबलाशी आला. कामाचा नुसता ढीग पडला होता. भराभरा त्यानं एकेका फायलीचा निकाल लावायला सुरुवात केली. तो कामात गढला असला तरी, त्याला गालिचावरून चालत येत असलेल्या कुणाच्या तरी पावलांची चाहूल जाणवली. फाईलीतून त्याने डोकं वर काढलं. शेजारच्याच खोलीतून त्याची सेक्रेटरी मेरियन राईस घाईघाईने येत होती.

एक पाकीट त्याच्या हातात देत ती म्हणाली, ' आताच समोरच्या इमारतीतील ऑफिसातून हे पाठवण्यात आलंय. त्यावर ' अत्यंत गुप्त व महत्त्वाचं ' असं लिहिलंय. '

समोर जे. एडगर हूवर इमारत होती व तेथे एफ. बी. आय.चं ऑफीस होतं. सेक्रेटरी निघून गेल्यावर कॉलिन्सनं पाकीट फोडलं. त्यात पाच-सहा पानं कसली तरी आकडेवारी टाइप केलेली होती व त्यासमवेत एक पत्र होतं. डायरेक्टर टायनॅन यांच्या हस्ताक्षरातलं.

कॉलिन्सला आश्चर्य वाटलं. तो उत्सुकतेनं पत्र वाचू लागला--

' प्रिय ख्रिस--

देशातील गुन्हेगारीची सर्वांत अलीकडची आकडेवारी सोबत पाठविली आहे. आपल्या इतिहासात कधी नव्हे इतकी वाईट परिस्थिती सध्या देशात आहे. मी वर्तमानपत्राकडेही याची प्रत पाठवली आहे. खून, दंगली, सशस्त्र दरोडे, इत्यादींच्या संख्येत किती भरमसाठ वाढ झालीय् ते बघ. गुन्हेगार आणि संघटित क्रांतिकारक यांबद्दल मी सादर केलेले टिपणही वाच. आपण भलतेच पेचात अडकलो आहोत. घटनेत ३५ वी दुरुस्ती केली, तरच आपण आता वाचू शकतो. तेव्हा आज रात्री ही दुरुस्ती मंजूर होईल अशी प्रार्थना करू या. दोन्ही राज्यातील आमदारांना मी फोनवरून गुन्हेगारीची आकडेवारी कळविली आहे. म्हणजे आज रात्री मतदान करण्यापूर्वी त्यांना परिस्थितीची नीट कल्पना येईल. बरं आहे. तर मग काही तासांतच राष्ट्राध्यक्षांकडे जेवणाच्या वेळी आपण भेटूच. अच्छा,

--व्हरनॉन. '

कॉलिन्सनं आकडेवारीवरून नजर फिरवली. खुनांचं प्रमाण १८ टक्क्यांनी, बलात्कारांचं प्रमाण १५ टक्क्यांनी, चोऱ्या, दरोडे व हल्ले यांचे प्रमाण ३० टक्क्यांनी व दंगलीचं प्रमाण २० टक्क्यांनी वाढलं होतं. देशातील वाढत्या अराजकामुळे अटकांचे प्रमाण वाढले होते व त्यामुळे तुरुंग तुडुंब भरले होते. तो खुर्चीत रेलला. जणू प्रार्थना करीत आहोत या पद्धतीने हात छातीशी धरले. खरंच हा काळ अमेरिकेच्या इतिहासातील यादवी युद्धानंतरचा सर्वांत काळाकुट्ट काळ होता, याबद्दल त्याची खात्री झाली होती. अराजक आणि दहशत यांचा नंगानाच चालू होता. सकाळी उठलं की, रात्र पाहायला मिळेल की नाही याची शाश्वती नव्हती आणि रात्री झोपलं की दुसऱ्या दिवसाची पहाट पाहायला मिळेल की नाही, याचा भरवसा नव्हता.

इतक्यात फोन वाजला. त्याची गरोदर पत्नी कॅरेनचा फोन होता.

' व्हाइट हाऊसला जायला कितीला निघायचं ?' तिनं विचारलं.

' हे बघ, आता पावणेसात वाजले आहेत. तू मला सातला भेटायचंस. पंधरा मिनिटांत आपण व्हाइट हाऊसला पोहोचू. टी. व्ही.वर न्यूयॉर्क व ओहिओ राज्यांतील खास कार्यक्रम पाहायचे म्हणजे वेळेवर पोचलंच पाहिजे. माझी उपस्थिती तर अत्यावश्यक आहे. '

' तू तेथे उपस्थित राहणं इतकं अत्यावश्यक का ?'

' सकाळी सांगितलं ना मी ! तुझ्या लक्षात नाही वाटतं. परत सांगतो. पहिली गोष्ट म्हणजे मला राष्ट्राध्यक्षांनी बोलावलंय्. दुसरी गोष्ट म्हणजे मी अॅटर्नी जनरल आहे आणि आज रात्री ३५ व्या घटनादुरुस्तीवर मतदान व्हायचंय्, तो खास माझ्या अखत्यारीतला भाग आहे. तेव्हा मला इंटरेस्ट असणं स्वाभाविकच आहे. न्यूयॉर्क आणि ओहिओ राज्यांच्या कनिष्ठ सभागृहांची खास अधिवेशनं आज रात्री भरणार आहेत आणि ते त्याचवेळी टी. व्ही.वरही दाखवलं जाणार आहे. ज्या तीन राज्यांनी मतदान केलं नाही त्यांतील दोन राज्ये आज मतदान करणार आहेत. ३५ वी घटनादुरुस्ती मंजूर होऊन तो घटनेचा भाग बनण्यासाठी आणखी दोनच राज्यांची मंजुरी मिळणं आवश्यक आहे. आता कळलं ?'

' आलं लक्षात मग भेटू सात वाजता. ' असं म्हणून तिनं फोन बंद केला. ◻

कॉलिन्स कॅरेनबरोबर आपल्या कॅडिलॅक गाडीतून निघाला. व्हाईट हाऊसच्या परिसरात मोटार शिरली. हिरवळीवर, पत्रकार, टी. व्ही.चे




स्वस्तिक
परफ्यूम्ड
कॅस्टर हेअर ऑईल
केस दाट, निरोगी नि चमकदार बनविते



केस दिवसभर नीटनीटके राखण्यासाठी
स्वस्तिक परफ्यूम्ड कॅस्टर ऑईल,
जे तुमच्या कुटुंबातील सर्वांच्या पसंतीस पडेल.
आजच एक बाटली खरेदी करा.

स्वस्तिक
हाउसहोल्ड ॲण्ड
इंडस्ट्रियल प्रॉडक्टस्
लिमिटेड

Shilpi dm 27/76 mar

वार्ताहर, छायाचित्रकार यांची एकच गर्दी उसळली होती. कॉलिन्सचा शरीर-रक्षक एफ. बी. आय. चा एजंट माईक होगन हा फ्रंटसीटवर बसला होता. त्यानं मागं वळून कॉलिन्सला विचारलं, 'तुम्हाला कोणा पत्रकाराशी बोलायचंय ?'

'नको बुवा !'

मोटारीतून दोघं उतरले आणि व्हाईट हाऊसमध्ये शिरले पश्चिमेकडील कॅबिनेटरुममध्ये त्यांना नेण्यात आलं. तीस-चाळीस जणांना निमंत्रित केलं असावं, असा कॉलिन्सचा अंदाज होता. पण तिथं डझनभरच माणसं होती. हिरवे पडदे सोडलेले. दारं फ्रेंच पद्धतीची. तिथून बाहेरच्या गुलाबवाटिकेत जायला रस्ता होता. पुस्तकांच्या शेल्फशेजारी एक रंगीत टी. व्ही. ठेवलेला होता. समोर चामड्यानं मढवलेल्या खुर्च्या. त्यावर बसून निमंत्रित टी. व्ही. पाहत होते. अमेरिकेचे बोधचिन्ह, राष्ट्रध्वज व राष्ट्राध्यक्षांचा ध्वज या पार्श्वभूमीवर राष्ट्राध्यक्ष अॅन्ड्रयू वॅडस्वर्थ उभे होते व काही नेत्यांशी ते संभाषण करत होते.

कॉलिन्स व करेनशी त्यांनी हस्तांदोलन केलं.

ते कॉलिन्सला म्हणाले, 'न्यूयॉर्क व ओहियो यांच्या हातात आता सर्व काही आहे.'

हे बोलणं चालू असतानाच व्हर्नान टी. टायनॅन तेथे आला. त्याच्याशी हस्तांदोलन करीत राष्ट्राध्यक्ष म्हणाले, 'तू ती गुन्हेगारीची आकडेवारी अगदी वेळेवर पाठवलीस. तिचा उपयोग होईल. मला तर दोन्ही राज्यं घटनादुरुतीच्या बाजूने कौल देतील असा विश्वास वाटतो. दोन तासांनी ५० पैकी ३८ राज्ये या बाजूची असतील व घटनादुरुस्ती होईल. वेळ उद्भवली तर, या देशाचे रक्षण करण्याचे साधन आपल्याला मिळेल.'

पाहुण्यांना मद्य दिलं जात होतं. सर्वांनी आपापले ग्लास घेतले. इतक्यात टी. व्ही. सुरू होत असल्याची घोषणा झाली. जो तो आपापल्या खुर्चीत बसला. टी. व्ही. वर निवेदक पस्तिसाव्या घटनादुरुस्तीच्या निमित्ताने अमेरिकेच्या घटनेत दुरुस्ती कशी केली जाते हे सांगत होता. ५० पैकी ३८ (म्हणजे तीनचतुर्थांश) राज्यांनी जर दुरुस्ती मंजूर केली, तर ती दुरुस्ती घटनेचा अधिकृत भाग बनते असं निवेदकानं आपल्या माहितीच्या शेवटी सांगितलं.

कॉलिन्सनं सिगरेटचं थोटूक अॅशट्रेत टाकलं. मद्याचा ग्लास उचलला. त्याचे डोळे मात्र टी व्ही. च्या पडद्यावरच खिळलेले होते.

निवेदक झटझट नवनवी माहिती सांगतच होता. 'घटनेत दुरुस्ती करण्यासाठी वाटेल त्या सूचना पाठवल्या जातात. राष्ट्राध्यक्षांऐवजी एक त्रिसदस्य नियंत्रण मंडळ नेमावं, अमेरिकेचं 'युनायटेड स्टेटस् ऑफ अमेरिका' हे नाव बदलून 'युनायटेड स्टेटस ऑफ अर्थ' असं ठेवावं अशाही सूचना केल्या जातात. अमेरिकेच्या इतिहासात ५७०० घटना दुरुस्त्या सुचवण्यात आल्या. त्यांपैकी ३४ च मंजूर झाल्या. आता ३५ वी घटनादुरुस्ती सुचवलेली आहे. ही दुरुस्ती मंजूर होते की नामंजूर, हे आता ठरेल.'

खुर्च्या सरकवण्याचे आवाज येत होते. टी. व्ही. च्या कडेस दोन्ही बाजूंना गर्दी झाली होती. कॉलिन्सने पुन्हा टी. व्ही. वर लक्ष केंद्रित केलं.

निवेदक सांगत होता—

' वादग्रस्त ३५वी घटनादुरुस्ती ही पहिल्या दहा दुरुस्त्यांतील तरतुदी म्हणजेच मूलभूत हक्कांविषयीच्या तरतूदी स्थगित करू शकेल. अर्थात हे आणीबाणीच्या काळातच. अध्यक्ष वॅडस्वर्थ व अमेरिकन काँग्रेसचे नेते यांना देशात कायदा व सुव्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी 'हत्यार' म्हणून या दुरुस्तीचा वापर करता येईल.'

हत्यार म्हणून शब्द कानी पडताच राष्ट्राध्यक्ष काहीसे चिडले व म्हणाले, 'याला हत्यार म्हणण्यामागं निवेदकाचा उद्देश काय ? हे म्हणणं पूर्वग्रहदूषित आहे. मला वाटतं, अशा निवेदकांचादेखील दुरुस्त्या मंजूर करून बंदोबस्त करायला हवा.'

समोरच्या खुर्चीवर बसलेला टायनॅन पटकन म्हणाला, 'तेच तर करतोय आम्ही. या ३५ व्या घटनादुरुस्तीमुळं अशा साऱ्या उपद्रवकारक लोकांचा बंदोबस्त होईल.'

निवेदकाची टकळी सुरूच होती. अमेरिकन सेनेट व काँग्रेसमध्ये काहीसा तोंडी विरोध झाला, पण २/३ मतांनी ही दुरुस्ती मंजूर झाली. मग ती प्रत्येक राज्याकडे पाठवण्यात आली. पहिल्या काही राज्यात अगदी सहज ही घटनादुरुस्ती मंजूर झाली. पण नंतर नंतर मात्र विरोधकांनी आपली सारी शक्ती एकवटून विरोध करायला सुरुवात केली. त्यामुळं या घटनादुरुस्तीवर वादळं उठू लागली, वाद झडू लागले. आतापर्यंत ४७ राज्यांत मतदाने झाली. त्यांपैकी ११ राज्यांनी ही घटनादुरुस्ती फेटाळून लावली व ३६ राज्यांनी ती मंजूर केली. परंतु दुरुस्ती कायदेशीर व्हायला ३८ राज्यांची संमती हवी म्हणजे आणखी दोन राज्यांनी तिच्या अनुकूल मत देणं आवश्यक आहे. न्यूयॉर्क, ओहियो व कॅलिफोर्निया या तीन राज्यांनी अद्याप मतदान केलेलं नाही. न्यूयॉर्क व ओहियोतील मतदान आता थोड्याच वेळात संपेल. कॅलिफोर्नियात एक महिन्यानंतर मतदान होईल. परंतु आज न्यूयॉर्क व ओहिओनं दुरुस्तीच्या बाजूनं कौल दिला तर, कॅलिफोर्नियाची गरजच पडणार नाही. किंबहुना दोन्ही राज्यांनी नाकारली तरी, कॅलिफोर्नियाची आवश्यकता राहणार नाही. कारण ३८ मतं व्हायचीच नाहीत. तेव्हा आज न्यूयॉर्क व ओहियोतले मतदान अत्यंत महत्त्वाचे आहे. पुढील शंभर वर्षांचा अमेरिकेचा इतिहास आज बदलू शकतो. आता काही काळ जाहिरातीचे प्रसारण झाल्यावर थेट अलसनी (ओहियो), न्यूयॉर्क येथे टी. व्ही. तुम्हाला नेईल !'

काही जाहिराती दाखवल्यावर न्यूयॉर्कच्या विधिमंडळाचं दृश्य टी. व्ही. वर दिसू लागलं. कोणी एकजण दुरुस्तीच्या बाजूनं बोलत होता. ज्यांनी घटना तयार केली ते जुन्या मतांचे होते. आता काळ बदललाय. त्याला योग्य असे बदल घटनेत करायला हवेत. घटना ही काही अतिपवित्र गोष्ट नाही की, जिला स्पर्शही करू नये ! लोकशाहीचा कणा टिकवून ठेवायचा असेल तर, ३५ वी घटनादुरुस्ती मंजूर केलीच पाहिजे. तीच आपल्याला वाचवू शकेल असं त्यानं सांगितलं.

टी. व्ही. कॅमेऱ्यानं या वक्त्याचं भाषण संपताच आपला रोख इतर सदस्यांकडे वळवला. त्याच्या भाषणाला जोरदार टाळ्या पडल्या होत्या.

आपला सिगार हातात घेऊन राष्ट्राध्यक्ष उद्‌गारले, 'ब्रेव्हो !

आपल्या मागल्या एका अधिकाऱ्याकडे वळून ते म्हणाले, 'हा कोण वक्ता होता त्याचा शोध घ्या. तो चांगला वक्ता आहेच, तसेच




(आपल्या प्रिय पंतप्रधानांच्या २० कलमी सूत्राधारे
समाजांच्या सर्व थरांतील, विशेषतः आजपर्यंत
उपेक्षिलेल्या व गरीब जनतेच्याही घरांत
सुखसमृद्धीचा नंदादीप सतत तेवत रहावा म्हणून
शिफारस करण्यास आम्ही सदैव तत्पर

त्याचे विचारही सुस्पष्ट आहेत. व्हाईट हाऊसमध्ये त्याचा आपल्याला वापर करून घेता येईल.'

इतक्यात मतदान सुरू झालं. सर्वांच्या नजरा टी. व्ही. वर खिळल्या. न्यूयॉर्कच्या असेंब्लीत १५० सभासद होते. त्यांच्या मतदानाचे 'होय' 'नाही'चे आवाज घुमत होते. काही वेळाने घोषणा झाली. न्यूयॉर्क राज्याने ३५ वी घटना दुरुस्ती मंजूर केली! आता फक्त एकाच राज्यानं ही दुरुस्ती मंजूर करायची गरज होती...

कॅबिनेट रूममधील सारेच उभे राहिले. एका वेगळ्याच रोमांचकारी वातावरणानं साऱ्यांना भारून टाकलं.

राष्ट्राध्यक्ष वॅडस्वर्थ यांच्याभोवती गर्दी झाली. जो तो त्यांचं अभिनंदन करत होता 'ग्रेट न्यूज', 'ग्रेट न्यूज' असं व्हर्नान टायनॅन सर्वांना सांगत होता. राष्ट्राध्यक्ष त्याला म्हणाले, 'व्हर्नान, न्यूयॉर्कमधला हा विजय त्या सदस्यानं केलेल्या शेवटच्या भाषणामुळं झाला. त्याचं प्रभावी भाषण तूच लिहून दिलंस की काय, असं मला वाटलं!'

'शक्य आहे. मीच लिहून दिलं असेन ते भाषण!' टायनॅननं स्मित करीत उत्तर दिलं. त्यावर सर्वजण हसले. हे हसणं सहेतुक होतं. त्या सभासदाच्या भाषणातली ही गोम सर्वांनाच ठाऊक होती. कॉलिन्सला मात्र या हसण्यामागील रहस्य उमगलं नाही.

'जेवण तयार आहे,' असं कुणीतरी सांगितलं. बूफे डिनर होतं. जो तो हातात प्लेटस् घेऊन त्यावर एकेक पदार्थ वाढून घेऊ लागला.

पुन्हा टी. व्ही. सुरू झाला. ओहियो राज्यातील मतदान आता दाखवलं जाणार होतं. निवेदक ३५ वी घटना दुरुस्ती म्हणजे काय ते सांगत होता. 'अंतर्गत राष्ट्रीय आणीबाणीच्या काळात घटनेतील पहिल्या दहा दुरुस्त्यांतील तरतुदी पुढील पस्तिसाव्या दुरुस्तीन्वये स्थगित केल्या जातील. भाग १ क्र. १ : घटनेतील स्वातंत्र्य म्हणजे राष्ट्रीय सुरक्षिततेला धोका निर्माण करण्याचा परवाना असे समजता येणार नाही. क्र. २ : अध्यक्ष आणीबाणीच्या काळात राष्ट्रीय सुरक्षा समिती नेमतील. क्र. ३ : या समितीचे अध्यक्ष एफ. बी. आय. चे डायरेक्टर राहतील इत्यादी इत्यादी...'

कॉलिन्सनं या तरतुदी अनेक वेळा वाचल्या होत्या. परंतु आता पुन्हा ऐकताना त्या फार भडक आहेत असं त्याला वाटलं.

मतदानाला सुरुवात झाली. ९९ सभासद होते. 'होय' 'नाही'च्या घोषणा होऊ लागल्या. परंतु 'नाही' वाल्यांचा आवाज मोठा होता. मग तर सतत 'नाही'चाच गदारोळ ऐकू येऊ लागला. निवेदक सांगू लागला, 'घटनादुरुस्तीला विरोध असणाऱ्यांची संख्या वाढू लागलीय ही आश्चर्यजनक घटना आहे. घटनादुरुस्ती नामंजूर होणार अशी चिन्हे दिसतायत...'

सर्वत्र शांतता पसरली. जसजसे क्षण जात होते तसतसे मतदान वाढत होते आणि त्या कॅबिनेट रूममधला तणावही. आणि जितक्या अचानकपणं मतदान सुरू झालं तितक्या अचानकपणे ते संपलंही. ओहियोतील सभागृहानं ही घटनादुरुस्ती फेटाळली होती!

त्या दालनातलं वातावरण सुन्न झालं. निराशेचे चीत्कार ऐकू आले. जवळजवळ प्रत्येकाचाच चेहरा पडला होता. सारेजण राष्ट्राध्यक्षांभोवती जमा झाले.

राष्ट्राध्यक्षांनी स्टीडमॅनला विचारलं, 'असं कसं झालं रोनाल्ड?'

'चांगल्या मतानं आपला विजय होईल असा अंदाज होता. या सभागृहाच्या सदस्यांचा पोलही घेतला होता आम्ही. पण तो दीड दिवसापूर्वी. आता गेल्या दीड दिवसात काय जादू झाली कोणास ठाऊक?' स्टीडमॅननं उत्तर दिलं.

इतक्यात टी. व्ही. वरचा निवेदक पुन्हा काहीतरी सांगू लागला. सर्वांचं लक्ष टी. व्ही. कडे लागलं. पराभवाची मीमांसा करताना तो निवेदक म्हणाला, आमच्या माहितीनुसार काल रात्री मूलभूत हक्क रक्षणासाठी स्थापलेल्या संघटनेचे अँथनी पिअर्स—टोनी पिअर्स यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी जोरदार प्रचार मोहीम उघडली होती. घटनादुरुस्तीला महिन्यापूर्वीच स्थापन झालेल्या या संघटनेचा विरोध आहे. अनेक सदस्यांच्या त्यांनी काल व आज भेटी घेतल्या. ही घटनादुरुस्ती केली तर देशाचं कधीही भरून न येणारं नुकसान कसं होईल हे त्यांनी कागदपत्रांच्या पुराव्यासहित पटवून दिलं. आणि त्याचाच परिपाक म्हणजे ही घटनादुरुस्ती फेटाळण्यात आली! टोनी पिअर्स हे एकेकाळी एफ. बी. आय. चे एजंट होते. आता त्यांची माहिती सांगायची म्हणजे...'

डायरेक्टर टायनॅनच्या चेहऱ्यावर नुसता अंगार फुलला होता. टी. व्ही. पुढं उभा राहून व पडद्याकडे हात रोखून तो म्हणाला, 'त्याची सारी माहिती आम्हाला ठाऊक आहे. हरामखोर कुठचा!'

मग राष्ट्राध्यक्षांकडे वळून तो म्हणाला, माझ्या असल्या भाषेबद्दल क्षमा करा. पण हा नालायक टोनी पिअर्स मला चांगला ठाऊक आहे. विस्कॉन्सिन विद्यापीठात रॅडिकलस्च्या टोळक्यांचा हा म्होरक्या. व्हिएटनाम युद्धात मारे शेखी मिरवली व मग एफ. बी. आय. मध्ये शिरला. त्या लोकांना स्थानबद्ध करायचं त्यांना यानं चक्क सोडून दिलं. एफ. बी. आय. चे पूर्वीचे डायरेक्टर हूव्हर यांना थापा मारल्या. मग मीच त्याला एफ. बी. आय. मधून हाकलून लावलं. त्याच्या पत्नीचे कोणत्या चार गटांशी संबंध आहेत ते मला ठाऊक आहे. त्याला कायदेशीर सल्ला देणाऱ्या संस्थेचा कोणत्या संघटनांशी संबंध आहे हेही मला ठाऊक आहे. मूलभूत हक्करक्षण संघटनेचा तो प्रमुख बनला तेव्हाच त्याचा निकाल लावायला हवा होता. परंतु तो माजी एफ. बी. आय. एजंट असल्याने उगाच संघटनेला वाईट प्रसिद्धी नको म्हणून मी गप्प बसलो.'

'ते जाऊ दे. झालं गेलं ते आता संपलं. तो जर खरोखरच ओहियोतील आपल्या पराभवाला जबाबदार असेल तर असं पुन्हा घडणार नाही याची काळजी घ्यायला हवी.' राष्ट्राध्यक्षांनी टायनॅनची समजून काढीत सांगितलं.'

हे सारं पाहत असलेला कॉलिन्स काहीसा अस्वस्थ झाला. टायनॅनचा झालेला प्रक्षोभ, त्याचा उतू जात असलेला संताप तो प्रथमच पाहत होता. टायनॅनचं सारं बोलणं विलक्षण विखारी होतं. एफ. बी. आय. च्या डायरेक्टरची ही बाजू त्याला कधीच ठाऊक नव्हती.

कॅरेनचा हात हातात घेऊन कॉलिन्स बाहेर पडायचा विचार करत होता, इतक्यात राष्ट्राध्यक्षांनी त्याला बोलावलं. कॅरेनला सोडून तो त्यांच्याकडे गेला. तिथं टायनॅन होताच. राष्ट्राध्यक्ष म्हणाले, 'आता फक्त एकच राज्य उरलंय. कॅलिफोर्निया. त्यानं अनुकूल मत दिलं तरच ही घटना दुरुस्ती होऊ शकते. आपण आपले सारे प्रयत्न

**त्या दालनातलं वातावरण एकदम सुन्न झालं. सगळ्यांचेच चेहरे पडले...**

पणाला लावले पाहिजेत. तेथील सदस्यांबद्दल नक्की काही हमी देता येत नाही. तेव्हा ख्रिस व व्हर्नान, तुम्ही दोघांनी प्रयत्नांची शर्थ केली पाहिजे. आपल्याला विजय मिळालाच पाहिजे. '

दोघांनीही होकारदर्शक मान हलवली.

नवा सिगार शिलगावीत वॅडस्वर्थ म्हणाले, 'मला एक नवीन कल्पना सुचलीय. कॉलिन्स, तू कॅलिफोर्नियाचा आहेस ना ? '

'हो. मी मूळचा 'बे' भागातला. पण मी लॉसएंजल्सलाही वकिली केलीय. '

'ठीक. मला वाटतं पुढच्या एक-दोन आठवड्यांत तू कॅलिफोर्नियाला जा. तिथं तुला सभासदांमध्ये आपला प्रचार करता येईल.'

'पण मी किती प्रभाव पाडू शकेन याबद्दल शंका आहे. त्या भागातील लोकप्रिय व्यक्ती म्हणजे मुख्य न्यायमूर्ती मेनार्ड !'

मानेनं नकार देत राष्ट्राध्यक्ष म्हणाले, 'अ हं ! मेनार्ड नाही चालणार. तो नाही चालणार. तो आपल्या बाजूचा नाही असं मला कळलंय, आणि दुसरं म्हणजे राजकीय विषयावर न्यायमूर्ती बोलेल हे शक्य नाही तेव्हा मेनार्डची आपल्याला गरज नाही. तुझी आवश्यकता आहे. तू स्वत ला कमी का लेखतोस ? तू अॅटर्नी जनरल आहेस. तुझं लोक ऐकतील...'

खरं तर ही कल्पना कॉलिन्सला फारशी पसंत नव्हती. पण विरोध करण शक्यच नव्हतं. तेव्हा तो म्हणाला, 'आता इतकंच महत्त्वाचं असेल तर...'

त्याचं वाक्य तोडीत राष्ट्राध्यक्ष म्हणाले, 'महत्त्वाचं म्हणजे ? याहून दुसरं काही महत्त्वाचं असूच शकणार नाही. कॅलिफोर्नियात कोणाला तरी पाठवलंच पाहिजे. देशात काय चाललंय तुला कल्पना आहे ? थेट व्हाईट हाऊस-राष्ट्राध्यक्षाचं घर धोक्यात आहे. इथं त्यांनी घुसायचा प्रयत्न केला, मोडतोड केली. या व्हाईट हाऊसभोवती सुरक्षेचं कडं उभारलंय आणि आता सरक्षणासाठी विद्युत्-कुंपण उभारलं जाणार आहे. माझ्या घरात मी कैद होणार आहे. या हिंसाचारानं देशातील प्रत्येकाची अशीच स्थिती झालीय. हे मी चालू देणार नाही. या देशात सुसंस्कृतपणा पुन्हा आणायलाच हवा. ३५ वी घटना दुरुस्ती मंजूर व्हायलाच हवी. कॅलिफोर्नियात विजय मिळवून हे आपल्याला साधायचंय. '

इतक्यात मिस लेजर तेथे आली. बोलण्यात व्यत्यय आणला म्हणून राष्ट्राध्यक्षांकडे दिलगिरी प्रदर्शित करून ती कॉलिन्सला म्हणाली, 'तुमचा शरीररक्षक बाहेर आलाय. त्याला तुमच्याशी बोलायचंय. अत्यंत महत्त्वाचं असं तो म्हणतो...'

'थँक्स' कॉलिन्स म्हणाला. मग राष्ट्राध्यक्षांकडं वळून त्यानं सांगितलं, 'तुम्ही जे सांगाल ते करायला मी तयार आहे. '

'मी पुढील आठवडयात तुला काय करायचं ते कळवीन. '

कॉलिन्सनं कॅरेनला सोबत घेतलं. राष्ट्राध्यक्षांचे आभार मानले व त्यांना 'गुडनाईट' करून तो बाहेर पडला.

दाराशीच उभ्या असलेल्या शरीररक्षक होजानला त्यानं गाठलं नि विचारलं,

'काय झालं ?'

'सर, कर्नल नोह बॅक्स्टर शुद्धीवर आले. परंतु ते जिवंत राहण्याची शक्यता नाही. '

'अरे बापरे ! तुझी खात्री आहे ?'

'हो. सौ. बॅक्स्टर यांनीच फोन केला होता. तो आपल्या मोटारीतील फोनवर रिले करण्यात आला. कर्नल बॅक्स्टर शुद्धीवर येताच त्यांनी तुम्हाला भेटायचंय असं सांगितलं. तुम्ही त्यांना भेटलंच पाहिजे. त्यांना तुम्हाला काहीतरी महत्त्वाचं सांगायचंय. तुम्हाला ताबडतोब हॉस्पिटलमध्ये घेऊन या, असं सौ. बॅक्स्टरनं सांगितलं. '

कॅरेनचा हात धरून कॉलिन्स मोटारीकडे धावतच निघाला. 'एकही क्षण न दवडता आपण हॉस्पिटलमध्ये जाऊ या. ' मोटारीत बसत तो म्हणाला, कॅरेनकडे वळून तो म्हणाला, 'त्यांना मला काय बरं सांगायचं असावं ?'

मोटार केव्हाच हॉस्पिटलच्या दिशेनं धावू लागली होती. ◻

भरधाव वेगानं मोटार निघाली आणि काही मिनिटांतच हॉस्पिटलच्या दारात येऊन उभी राहिली.

दार उघडून कॉलिन्स हॉस्पिटलच्या रोखानं पळतच सुटला.

एका अधिकाऱ्यानं त्याला विचारलं,

'तुम्ही अॅटर्नी जनरल कॉलिन्स ?'

'होय.'

'माझ्याबरोबर चला. ते पाचव्या मजल्यावर आहेत. '

लिफ्टमध्ये कॉलिन्सनं विचारलं, 'कर्नल बॅक्स्टरची तब्येत कशी आहे ?'

'मी वीस मिनिटांपूर्वी खाली आलो तेव्हा त्यांच्यात अगदी थोडी धुगधुगी होती. प्राणज्योत केव्हा मालवेल याचा नेम नाही. '

'मला वाटतं मी वेळेवर आलोय. त्यांच्याबरोबर कोण आहे ?'

'त्यांची पत्नी व छोटा नातू रिक बॅक्स्टर, डॉक्टर, नर्सेस व फादर डुबिन्स्की. ही पहा आली त्यांची खोली. बाहेरच्या खोलीत पाहुण्यांची बसायची सोय आहे व आतल्या खोलीत बॅक्स्टर आहेत. '

कॉलिन्स बैठकीच्या खोलीत शिरला तेव्हा त्याला हुंदक्याचे आवाज ऐकू आले. आतल्या खोलीचं दार किंचित उघडं होतं. पलंगाचा काही भागच त्याला दिसत होता खुर्चीवर बॅक्स्टर यांची पत्नी–हॅना–रडत होती. बारा वर्षांचा नातू रिक आजीचा हात घट्ट पकडून उभा होता. त्याचा चेहरा गोंधळलेला होता आणि डोळे अश्रूंनी डबडबलेले होते. जवळच काळा झगा घातलेले फादर उभे होते.

'तुम्ही आलाय हे मी आत जाऊन सांगतो,' असं सांगून एका अधिकाऱ्यानं कॉलिन्सला बाहेर थांबवलं. कॉलिन्स अस्वस्थ झाला. एक सिगरेट काढून त्यानं पेटवली. बॅक्स्टर हे अॅटर्नी जनरल होते व कॉलिन्सचा कामापुरताच त्यांच्याशी संबंध होता. त्यांना आपल्याला इतकं महत्त्वाचं काय बरं सांगायचं असावं हा प्रश्न कॉलिन्सच्या मनात घोळत होता.

इतक्यात आतल्या खोलीचं दार उघडलं गेलं. कॉलिन्सनं सिगरेट विझवली. नर्स व रिक बाहेर आले. नंतर फादर डुबिन्स्कीही बाहेर आले नि खोलीचं दार त्यांनी लावून घेतलं. त्यांनी स्वतःची ओळख करून दिली.

कॉलिन्स अधीऱ्या सुरात म्हणाला, 'मला ठाऊक आहे. आता मी बॅक्स्टरना भेटू शकतो ? मला व्हाईट हाऊसमध्ये निरोप मिळाला

नि धावतच मी आलो. बॅक्स्टर शुद्धीवर आहेत ? मी भेटू त्यांना ?'

खाली पाहत फादर म्हणाले, 'आता काही उपयोग नाही. दहा मिनिटांपूर्वीच बॅक्स्टर यांचं प्राणोत्क्रमण झालं. देव त्यांच्या आत्म्याला शांती देवो.'

कॉलिन्सला शॉकच बसला. अशा दुःखद वेळी बॅक्स्टर यांना मला कशाला भेटायचं होतं हे विचारावं की नाही, हे त्याला समजेना. अखेर त्यानं धीर केला नि विचारलं, 'कर्नल बॅक्स्टर बोलू शकत होते का ?'

'ते थोडं बोलले.'

'मला कशासाठी भेटायचं होतं हे त्यांनी तुम्हाला किंवा सौ. बॅक्स्टरना सांगितलं का ?'

'नाही. तुम्हाला भेटणं अत्यंत महत्त्वाचं आहे, तुमच्याशी बोललंच पाहिजे, एवढंच ते म्हणाले.'

'त्यांनी मरताना तुमच्यापाशी काही कबुली (कन्फेशन) दिली ?'

'हो.'

'त्यांना मला जे सांगायचं होतं त्याबद्दल या कबुलीत काही आहे ?'

'मि. कॉलिन्स, कबुली ही गुप्त बाब आहे.'

'मला कळावं म्हणून त्यांनी काही सांगितलं असेल तर ?...'

'तुम्हाला कळावं म्हणून की, ईश्वराला कळावं म्हणून ते काही बोलले हे मी ठरवू शकत नाही. कर्नल बॅक्स्टर यांनी मृत्यूपूर्वी दिलेली कबुली ही गुप्त राहिली पाहिजे. मी त्याबद्दल काहीही सांगणार नाही. सॉरी.'

एवढं बोलून फादर डुबिन्स्की पुन्हा आतल्या खोलीत गेले नि कॉलिन्स बाहेर पडला.

ड्रायव्हरला मोटार घरी घ्यायला त्यानं सांगितलं. बॅक्स्टरच्या मृत्यूची व फादरशी झालेल्या बोलण्याची माहिती त्यानं कॅरेनला दिली.

तो म्हणाला, 'बॅक्स्टरना मला काय बरं सांगायचं असावं ? मी तर त्यांचा काही निकटचा मित्र नव्हतो !...'

'पण तू ॲटर्नी जनरल आहेस. त्यांच्यानंतर अधिकारपदावर आलेला. तेव्हा त्याबद्दल...'

'मी त्याचाच विचार करतोयं. माझ्या कामाबद्दल, देशातील घडामोडीसंबंधी त्यांना काहीतरी सांगायचं असावं. आपल्या सर्वांच्या दृष्टीनं महत्त्वाचं. मला याचा छडा लावलाच पाहिजे. हे कोडं उलगडलंच पाहिजे.' ¤

## : प्रकरण दुसरे :

आर्लिंग्टन राष्ट्रीय दफनभूमीत मे महिन्यातील पावसानं कुंद झालेल्या त्या सकाळी अमेरिकेचे माजी ॲटर्नी जनरल नोह बॅक्स्टर यांच्या पार्थिव देहाचं दफन झालं. त्यांचे नातेवाईक, चाहते, मित्रमंडळी, अमेरिकन मंत्रिमंडळातील मंत्री व खुद्द राष्ट्राध्यक्ष वॅड्स्वर्थ स्मशानभूमीत हजर होते. फादर डुबिन्स्की यांनी अखेरची प्रार्थना म्हटली.

डायरेक्टर टायनॅन, त्याचा बुटका असिस्टंट असोसिएट डेप्युटी डायरेक्टर हॅरी ॲडकॉक व ॲटर्नी जनरल ख्रिस्तोफर कॉलिन्स हे स्मशानभूमीवर हजर होतेच. अखेरचे संस्कार उरकल्यावर ते तिघेही शांतपणे परतू लागले. आजूबाजूला दिवंगत बड्या व्यक्तींची थडगी होती. पलीकडे जॉन एफ. केनेडी यांच्या थडग्याजवळील ज्योत फडकत होती. टायनॅनच्या बुलेटप्रूफ गाडीकडे सारे निघाले होते. एफ. बी. आय. च्या एका एजंटानं मोटरचं दार उघडलं तिघे आत बसले आणि मोटर चालू झाली.

कोणाला काही बोलावंसं वाटत नव्हतं. मग डायरेक्टर टायनॅननं प्रथम बोलायला सुरुवात केली, 'पस्तिसाव्या घटनादुरुस्तीची फलश्रुती पाहायला नोह बॅक्स्टर नाही याचं मला वाईट वाटतं. या घटनादुरुस्तीचं सर्व श्रेय राष्ट्राध्यक्षांना दिलं जातं. परंतु या कामी खरा पुढाकार घेतला, त्याला चालना दिली बॅक्स्टर यानंच. धर्मनिष्ठेसारखी त्याची यावर निष्ठा होती. कॅलिफोर्निया राज्यात ही दुरुस्ती मंजूर करून आपण त्याची अपुरी इच्छा पुरी करायला हवी.'

'आपण प्रयत्न करू.' कॉलिन्सनं सांगितलं.

'नुस्ता प्रयत्न नाही, नेटानं हे काम पार पाडलंच पाहिजे. ही घटनादुरुस्ती तातडीनं केली पाहिजे असं बॅक्स्टरचं मत होतं.'

मोटरच्या मागच्या सीटवर काहीशा अवघडून बसलेल्या कॉलिन्सनं 'तातडीनं' हा शब्द ऐकताच त्याच्या डोळ्यापुढं हॉस्पिटलमधील त्या रात्रीचा प्रसंग उभा राहिला. बॅक्स्टरना आपल्याला काय सांगायचं असावं, हा प्रश्न एखाद्या घंटेसारखा त्याच्या कानात सतत घणघणत होता. हे गूढ उकलण्यासाठी कोठून आरंभ करावा हेच त्याला सुचत नव्हतं. टायनॅनलाच का विचारू नये ? असं मनात येऊन तो म्हणाला, 'व्हर्नान, त्या दिवशी व्हाईट हाऊसमध्ये मला बॅक्स्टरच्या पत्नीचा निरोप आला. बॅक्स्टर शुद्धीवर आले होते व त्यांना मला भेटायचं होतं, काहीतरी अत्यंत महत्त्वाचं सांगायचं होतं. मी लगबगीनं तेथे गेलो. परंतु मला उशीर झाला होता. त्यांच्याशी माझी भेट होण्याआधीच ते मरण पावले होते. मृत्यूपूर्वी ते थोडंसं बोललेही, परंतु माझ्याशी नाही, फादर डुबिन्स्कींशी ! मी त्यांना त्याबद्दल विचारलं, परंतु ते म्हणाले, बॅक्स्टर यांनी कबुली दिली, पण मी तुम्हाला काही सांगणार नाही, याचं कारण कबुली ही गुप्त असते.'


'हे मात्र खरं आहे.'

'बॅक्स्टरना काय सांगायचं होतं, याचा तुम्ही काही अंदाज करू शकाल ? आपल्या खात्यातलं राहून गेलेलं एखादं अर्धवट काम किंवा तत्सम काही...कधी तुमच्याशी याबद्दल चर्चा केली असेल तर आठवतंय का पाहा.'

'मलासुद्धा कोडंच वाटतंय हे. पाच महिन्यांपूर्वी बॅक्स्टरना हृदयविकाराचा झटका आला. त्या आधी खास असं काही चर्चिल्याचं मला तर आठवत नाही. त्यांच्या मनात पस्तिसावी घटनादुरुस्ती व्हावी हाच विचार प्रामुख्यानं असे. त्याबद्दल काही सांगायचं असेल.'

'पण नेमकं काय ? मला वाटतं, पुन्हा त्या फादरलाच जाऊन विचारतो.'

कॉलिन्सचं हे म्हणणं ऐकताच टायनॅनचा असिस्टंट ॲडकॉक यानं मध्येच तोंड खुपसलं नि तो म्हणाला, 'हे धर्मोपदेशक कसे असतात



PRATIBHA 7631

हे तुम्हाला ठाऊक असतं तर, तुम्ही त्यांच्या कधी वाटेला गेला नसतात. कधी कोणाला काही सांगायचे नाहीत, फक्त तो ईश्वर सोडून !'

इतक्यात कॉलिन्सचं ऑफिस आलं. त्यानं टायनॅनं व अँडकॉकचा निरोप घेतला. जे. एडगर हूव्हर बिल्डिंगकडे मोटर निघाली. टायनॅन अँडकॉकला म्हणाला, 'तू सारं संभाषण ऐकलंस? बॅक्स्टरला मरतेवेळी काहीतरी महत्त्वाचं सांगायचं होतं आणि ते त्यानं फादरला सांगितलंही ! त्यानं काय सांगितलं, याचा शोध आपण घेतला पाहिजे. त्या फादरला बोलतं कर. सरकारची सुरक्षा धोक्यात येईल अशी माहिती कोणाकडं असेल तर, त्याला बोलतं करण्याचं एफ. बी. आय. चं कामच आहे. फादर डुबिन्स्की याला अपवाद नाही. तेव्हा तू ताबडतोब त्याची भेट घे. होली ट्रिनिटी चर्चमध्ये बॅक्स्टरनं त्याला काय सांगितलं हे शोधून काढ. डुबिन्स्कीला किती व काय ठाऊक आहे याचा अंदाज घे जे माहीत असायला नको ते जर त्याला ठाऊक असेल तर, त्याचं तोंड कसं बंद करता येईल याचा विचार कर.'

'मी काहीही करायला तयार आहे. परंतु या प्रकरणात आपल्याला यश येईल असं वाटत नाही.'

'मी तुला काही माहिती घेतल्याविना डुबिन्स्कीला जाऊन भेट असं नाही सांगितलं. त्या डुबिन्स्कीबद्दलची सारी माहिती मिळवा. हे ईश्वरभक्त इतर चारचौघांसारखेच असतात. शेवटी माणसंच. हा डुबिन्स्कीही काही वेगळा नसणार. त्यालाही व्यसनं असतील. तो गुपचूप दारू पीत असेल किंवा आपल्या नोकराणीशी त्याचं लफडं असेल. काहीतरी त्याच्याविरुद्ध सापडेल. त्या माहितीचा उपयोग करून तुला फादरला बोलतं करता येईल.'

हूव्हर बिल्डिंगच्या तळघरातील दुसऱ्या मजल्यावर टायनॅनच्या मोटरसाठी पार्किंगची व्यवस्था होती. मोटर तेथे पोचली. दोघेही बाहेर पडले.

'हे काम झालंच म्हणून समजा,' असं सांगून अँडकॉकनं टायनॅनचा निरोप घेतला. ◻

व्हर्नान टायनॅननं दोन तास काम केलं. नंतर एका कपाटातून 'ओसो' फाईल त्यानं काढली. 'ओसी' म्हणजे 'ऑफिशिअल अँन्ड कॉन्फिडेन्शिअल.' लिफ्टनं तो खाली तळघरात आला. ड्रायव्हरला खूण केली व अलेक्झांड्रियाला चलायला सांगितलं.

एफ. बी. आय. चा डायरेक्टर झाल्यावर दर शनिवारचा त्याचा हा ठरलेला कार्यक्रम होता. गोल्डन इयर्स सीनिअर सिटिझन्स व्हिलेज इथं एका फ्लॅटमध्ये टायनॅनची ८४ वर्षे वयाची आई रोझ टायनॅन राहायची. तिच्याबरोबर दर शनिवारी भोजन घ्यायला व्हर्नान टायनॅन येत असे.

त्या फ्लॅटची एक डुप्लिकेट चावी टायनॅनपाशी होती. तिनं दार उघडून तो आत गेला. त्याची आई रंगीत टी. व्ही. बघण्यात गर्क झाली होती. तिनं नुसतं हात हलवून त्याला अभिवादन केलं. टी. व्ही. वरील कार्यक्रम संपल्यावर दोघांनी जेवण घेतलं. इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्या. मग व्हर्नान म्हणाला, 'आता 'ओसी' फाईल वाचू ?'

ही त्याची आईला दर आठवड्याची खास भेट होती. एफ. बी. आय.च्या या अत्यंत गुप्त फायलीत अमेरिकेतील बड्या बड्या लोकांच्या लफड्यांची, कुलंगड्यांची माहीती अध्यक्षांना पाठविली जाई. एफ. बी. आय.चे पूर्वीचे डायरेक्टर जे. एडगर हूव्हर यांनी एफ. बी. आय.च्या एजंटांमार्फत अमेरिकेतील बड्या-बड्या व्यक्तींची खाजगी माहिती मिळवणे, त्यांच्या 'सेक्स' लाईफ व मद्यपानाच्या सवयींबद्दल माहिती जमा करण्याच्या या पद्धतीला सुरुवात केली होती.

या फायलीतली ही 'सेक्सलाईफ'ची वर्णनं ऐकणं हा एक रोझ टायनॅनच्या मनोरंजनाचा भाग होता. नेहमीप्रमाणे या फायलीतला काही मजकूर वाचायला टायनॅननं सुरुवात केली. 'एक नामवंत चित्रपट कलावंत लासव्हेगास येथील एका मसाज केंद्रात गेला. त्यानं सारे कपडे काढले. दोन नग्न तरुणींनी त्याला कॉटला बांधले व मग आपल्याला चाबकाने मारण्यास त्या तरुणींना त्याने सांगितले.' वगैरे, वगैरे. त्याची आई चित्त लावून एकेक भानगडी ऐकत होती.

टायनॅननं तासाभरात ड्रायव्हरला परत यायला सांगितलं होतं. वेळ होताच त्यानं आईचा निरोप घेतला आणि तो मोटारने पुन्हा ऑफिसकडे निघाला. ◻

अॅटर्नी जनरल ख्रिस कॉलिन्सचा सारा दिवस अत्यंत गडबडीत गेला. दुपारच्या जेवणालाही त्यानं टांग मारली. आणि आता सारं काम उरकल्यावर पत्नी कॅरेन, दोस्त पॉल हिलार्ड व त्याची पत्नी रूथ यांच्या समवेत एका हॉटेलात तो जेवायला आला होता. प्रत्येकानं थोडी थोडी स्कॉच घेतली. फ्रेंच ओनियन सूप घेतलं. हिलार्ड हा कॉलिन्सचा जुना मित्र, दोघं एकत्र फूटबॉल खेळलेले. आता हिलार्ड हा कॅलिफोर्नियाचा सीनेटर होता. गप्पांच्या ओघात पस्तिसाव्या घटनादुरुस्तीचा विषय निघणं साहजिक होतं.

'एकूण अंदाज काय ?' कॉलिन्सनं विचारलं. पाईप ओढून धुराचं एक वर्तुळ सोडीत हिलार्ड म्हणाला, 'घटनादुरुस्ती कॅलिफोर्निया मंजूर करणार असं दिसतंय. गव्हर्नर या आठवड्याअखेर स्वतःचा पाठिंबा जाहीर करणार आहेत.'

'त्यामुळं राष्ट्राध्यक्ष खूष होतील.'

'खरं सांगू तुला ? ही आपापसातली देवाणघेवाण आहे. गव्हर्नर

टेलिफोन नं. : ३५८६१३
दीपावली शुभचिंतन !
माधवाश्रम
प्रायव्हेट लिमिटेड
गिरगावात राहण्याची उत्तम सोय
गिरगाव, मुंबई–४

सीनेटसाठी पुन्हा उभे राहणार आहेत तेव्हा त्यांना वॅडस्वर्थचा पाठिंबा हवाय म्हणून आता घटनादुरुस्तीला त्यांचा पाठिंबा आहे! बडीबडी मंडळी या दुरुस्तीसाठी आपली सर्व प्रतिष्ठा पणाला लावताहेत असं दिसतं.'

'तू कुठल्या बाजूनं? मला तर वाटलं तू अनुकूल आहेस.'

'मी या दुरुस्तीच्या बाजूनं अगर विरोधी नव्हतो. पण आता एकूण सर्व घडामोडी पाहता त्याविरुद्ध मत द्यायचं मी ठरवलंय. या घटनादुरुस्तीतील तरतुदी जरूरीपेक्षा फारच कडक आहेत. उंदीर मारायला तोफेचा वापर करण्यासारखं आहे. नागरी हक्कांच्या रक्षणाचा पुरस्कर्ता टोनी पिअर्स म्हणतो त्यातही तथ्य आहे.'

'टोनी पिअर्सवर विश्वास टाकण्यात अर्थ नाही.' त्याला मध्येच तोडीत कॉलिन्सनं सांगितलं.

'का? टायनॅन म्हणतो म्हणून! पिअर्स एफ. बी. आय.मध्ये असताना तेथील कारवाया पाहून त्याचा भ्रमनिरास झाला. टायनॅन ज्यांना सतावत होता अशा स्पेशल एजंटांना त्यानं पाठिंबा दिला म्हणून त्याचा सूड घेण्याकरिता टायनॅन त्याला लांबवर कोणत्या तरी राज्यात पाठवायच्या विचारात होता, हे कळल्यावर पिअर्सनं राजीनामा दिला. तरीही आपण त्याची हकालपट्टी केली असं टायनॅननं स्वतःच सर्वत्र उठवून दिलंय.'

कॉलिन्स काहीशा अधीऱ्या सुरात म्हणाला 'त्यानं फारसं बिघडत नाही. तू घटनादुरुस्तीच्या विरुद्ध का आहेस? देशात उसळलेल्या हिंसाचाराच्या लाटेपासून ही घटनादुरुस्ती आपली बचाव करील.'

'हिंसाचाराची लाट? एफ. बी. आय.च्या आकडेवारीनुसार तू बोलत असशील तर किती मर्यादेपर्यंत विश्वास ठेवायला हवा हे ठरवलं पाहिजे. आकडेवारी खोटं सांगत नसते, परंतु खोटीच आकडेवारी बनवली असेल तर?' असं सांगून हिलार्ड म्हणाला, 'सॅनफ्रॅन्सिको येथील नव्याने निवडून आलेला प्रतिनिधी ओलिन कीफे याचा मला आज सकाळीच फोम आला होता. त्या भागातल्या दोन पोलीस अधिकाऱ्यांनी त्याला सांगितलं की, गुन्ह्याच्या ठिकाणी त्यांनी पाठवलेल्या आकडेवारीत नंतर बदल करून ती फुगवून मांडण्यात आली आहे. तुझ्या ऑफिसनंही गुन्ह्याची आकडेवारी प्रसृत केली आहे.'

'ते केवळ तांत्रिक बाब म्हणून. ही सर्व आकडेवारी एफ. बी. आय.चे डायरेक्टर आमच्याकडे पाठवतात व आम्ही ती प्रसृत करतो इतकंच.' कॉलिन्सनं सांगितलं.

'कीफेला वाटतं की, टायनॅन या आकडेवारीत हस्तक्षेप करून बदल करत असावा. मुद्दाम फुगवून जास्त आकडेवारी सांगत असावा. कॅलिफोर्नियाच्या बाबतीत तर घडलेल्या गुन्ह्यांची संख्या फारच वाढवून मांडलेली आहे.'

'पण हे कशासाठी?'

'हिंसाचार अतिशय प्रचंड प्रमाणात होतोय असं चित्र उभं करायचं की, त्यामुळं घाबरून कॅलिफोर्निया असेंब्लीच्या सदस्यांनी घटनादुरुस्ती मंजूर करावी.'

'ही दुरुस्ती मंजूर होण्यासाठी टायनॅननं कंबर कसली आहे हे मला ठाऊक आहे. परंतु खोटी आकडेवारी तो कशासाठी करील? त्याला त्यातून काय मिळवायचंय?'

'सत्ता.'

'सध्या त्याला पुरेशी सत्ता आहेच.' कॉलिन्सनं सांगितलं.

'पस्तिसावी घटनादुरुस्ती मंजूर झाली की, ज्या प्रकारची सत्ता राष्ट्रीय सुरक्षा समितीचा अध्यक्ष या नात्यानं त्याला मिळेल तिला तोड नाही. त्यासाठी त्याची सारी धडपड आहे.'

'मला नाही हे खरं वाटत. गेली दीड वर्ष मी न्यायखात्यात या ना त्या पदानं वावरत आहे. तो नवा सभासद कीफे, त्याला काही माहीत नाही असं दिसतं...'

हिलार्ड सहजासहजी नमतं घेणार नव्हता, तो म्हणाला, 'कीफेशी मी फोनवर बोलणं केलं. त्यानुसार त्याच्याकडे बरीच माहिती असावी असं दिसतं. तू त्याला भेटत का नाही?'

'माझी काहीच हरकत नाही. तू भेट ठरव. मी येईन.' एवढं बोलून कॉलिन्सनं मेनू उचलला आणि स्वीट डिश ऑर्डर केली. ◻

दुसऱ्या दिवशी दुपारी एक वाजता लेखक इस्मेल यंग ठरल्याप्रमाणं टायनॅनच्या ऑफिसकडे निघाला. त्यानं हूव्हर बिल्डिंगच्या तळघरात आपली गाडी पार्क केली. त्याची गाडी म्हणजे जुनी तांबडी स्पोर्ट्स कार होती. एफ. बी. आय. डायरेक्टरसाठी खाजगी लिफ्ट होती. दाराबाहेर स्पेशल एजंट ओडिआ होता. ओडिआनं इस्मेलला लिफ्टनं सातव्या मजल्यावर नेलं. एका हातात टेपरेकॉर्डर व दुसऱ्या हातात ब्रीफकेस घेऊन इस्मेल टायनॅनच्या ऑफिसकडे निघाला.

टायनॅनचं ऑफीस भलतंच प्रशस्त होतं. गोलाकार कॉफी टेबलाशी इस्मेल बसला. कागद टेबलावर मांडले. समोरच्या सोफ्यावर टायनॅन थोड्याच वेळात येऊन बसणार होते. टायनॅनची सेक्रेटरी बेथ हिनं आपल्या बॉससाठी बिअर व इस्मेलसाठी पेप्सी कोला आणून ठेवला. तसंच क्रीम ऑफ चिकन सूप, कॉटेज चीज आदी पदार्थ टायनॅनसाठी आणून ठेवले, तर पोटॅटो सॅलड, लोणचं व ओनिअन रोलवर अंड्याचं सॅलड इस्मेलसाठी आणलं आणि ती निघून गेली. बाहेरच्या खोलीतून टायनॅन आत आला. 'कोणाचेही फोन आत देऊ नका, राष्ट्राध्यक्षांचा सोडून–' अशी सूचना त्यानं आपल्या सेक्रेटरीला दिली. आत आल्यावर दोन्ही दारं त्यानं बंद केली, कुलूप लावलं. बाथरुममध्ये जाऊन तोंडावर पाणी मारून तो ताजातवाना झाला आणि सोफ्यावर बसून त्यानं बिअरचा एक घोट घेतला.

आपल्या आत्मचरित्रांच्या लिखाणासाठी इस्मेलबरोबर होणाऱ्या या बैठकी टायनॅनला नेहमीच आवडायच्या.

इस्मेलला मात्र हे मुळीच आवडत नसे. त्याला एफ. बी. आय. संघटना आवडायची, परंतु त्याचा डायरेक्टर मात्र आवडत नसे. आता एफ. बी. आय. आवडायची याचा अर्थ ती ज्या कारवाया करते त्या त्याला पसंत होत्या असं नव्हे. एफ. बी. आय. सारखी प्रचंड संघटना ज्या कार्यक्षमतेने, बिनचूकपणे, व्यवस्थित काम करत

## "आकडेवारी खोटं सांगत नसते....पण खोटीच आकडेवारी बनवली असेल तर?"

## फोनवर टायनॅन बोलत होता तेव्हा टेपरेकॉर्डर चालू होता हे इस्मेलच्या ध्यानात आलं....

असते त्याचं त्याला आश्चर्य वाटायचं. आय. बी. एम., रशियन कम्युनिस्ट पक्ष, व्हॅटिकन, माफिया व एफ. बी. आय. या संघटना काय करतात, यापेक्षा कशा पद्धतीनं ते करतात हे त्याला आवडायचं.

टायनॅन यांचं आत्मचरित्र लिहायचं काम त्यानं सहा महिन्यांपूर्वी स्वीकारलं. त्यावेळी अॅडकॉकनं त्याला या संघटनेचं काम कसं चालतं ते दाखवलं होतं. एफ. बी. आय. च्या संदर्भ विभागात २५०,०००,००० जणांच्या बोटांच्या ठशांचे नमुने होते. संघटनेच्या ८७०० फाईल कॅबिनेटसमध्ये नाना रहस्ये होती. 'टाईपरायटर स्टॅंडर्स' फाईल्समध्ये देशात बनवलेल्या प्रत्येक टाईपरायटरच्या खिळ्यांचे ठसे होते. वॉटरमार्क फाईल, बॅंक रॉबरी नोट फाईल, नॅशनल फ्रॉडयूलन्ट नोट फाईल अशा कितीतरी प्रकारच्या फायलींनी कपाटंच्या कपाटं भरली होती. त्याशिवाय 'सेरॉलॉजी' विभागातील शरीरातील द्रव्ये आणि रक्त याचे पृथक्करण करण्यात येई. 'स्पेक्ट्रोग्राफ' दालनात रंगाच्या कणांचे परीक्षण केले जाई. 'केस व तंतू' नावाचाही एक विभाग होता. एखाद्या मारामारीनं कपड्यांचे तंतू दुसऱ्याच्या कपड्याला चिकटतात. या विभागात कपड्यांच्या सर्व तंतूंचे विश्लेषण करून कोणी कोणावर हल्ला केला हे शोधून काढता येई. तेथील सुसज्ज प्रयोगशाळा हे तर गुन्हा शोधून काढण्याचं प्रभावी हत्यार होतं. रक्ताचा छोटासा थेंब, खाडाखोड केलेले कागदपत्र, चोरीच्या ठिकाणी सापडलेली काड्यापेटी, धुळीचा एखादा कण यांचे पृथक्करण करून गुन्ह्याचा तलास लावला जाई.

हे सारं पाहिल्यावर त्याची टायनॅनशी पहिली मुलाखत झाली. पहिल्या भेटीतच इस्मेलला टायनॅन आवडला नाही. टायनॅनला आत्मचरित्र लिहायचं होतं. इस्मेलचं नाव सुचवण्यात आलं. इस्मेलनं दुसऱ्यांना लिहून दिलेली दोन पुस्तकं टायनॅननं वाचली आणि इस्मेलच्या नावाला मान्यता दिली. टायनॅनची 'कीर्ती'(!) इस्मेलला ठाऊक होती म्हणून त्यानं हे काम नाकारायचं ठरवलं, पण ते तात्पुरतंच. कारण टायनॅननं इस्मेलला ब्लॅकमेल करून हे काम स्वीकारायला लावलं.

गेले सहा महिने त्यांच्या बैठका चालू होत्या. बिअरचे घुटके घेत घेत टायनॅन बोलत राहायचा. आज एफ. बी. आय. चे माजी डायरेक्टर हूव्हर यांच्याबद्दल बोलायचं ठरलं होतं. टायनॅननं खूण केली तेव्हा इस्मेलनं आपला टेपरेकॉर्डर चालू केला. बैठक सुरू झाली. टेपरेकॉर्डर चालू होताच. त्याचबरोबर इस्मेल मधून मधून नोटसही काढत होता. टायनॅन हूव्हरची स्तुती करत होता. त्यानं पार पाडलेल्या अनेक कामगिऱ्यांची प्रशंसा करत होता. एका बाजूला हे ऐकत असताना दुसऱ्या बाजूला हूव्हरच्या काळ्या कारवाया इस्मेलला आठवत होत्या. पीट हॅमिल या पत्रकारानं हूव्हरबद्दल लिहिलेला मजकूर त्याला आठवला. त्यानं लिहिलं होतं, 'हूव्हरनं आपला आपल्यावरचा विश्वासच संपवला. मुक्त समाज, आपल्या आशाआकांक्षा याबद्दलच्या साऱ्या कल्पनाच त्यानं कोसळवून टाकल्या. अनेकांच्या मागं गुप्तचरांचा ससेमिरा लावून, लोकांच्या खाजगी गोष्टीत लुडबुड करून आपण स्वतंत्र देशात राहू शकतो, ही जाणीवच त्यानं बोथट करून टाकली.'

टायनॅनची बडबड सुरू होतीच. त्यानं आपल्या पुस्तकात खुसखुशीतपणा असावा म्हणून हूव्हरचा एक किस्सा सांगितला. 'लिंडन जॉन्सन यांनी मला हे सांगितलं, असं पुस्तकात दडपून लिहायला हरकत नाही, कारण हूव्हर व जॉन्सन दोघंही मरण पावले आहेत, तेव्हा या किश्श्याचा खरे खोटेपणा कोणी ठरवू शकणार नाही!' असंही टायनॅननं सुचवलं.

'आता स्वर्गात हूव्हर बहुधा माझ्यावर जळफळत असणार, कारण अमेरिकेतल्या गुन्हेगारीवर मी रामबाण उपाय काढलाय. ३५ वी घटनादुरुस्ती!' हसत हसत टायनॅन म्हणाला.

इस्मेल त्यावर काही बोलणार इतक्यात टेलिफोनची घंटा वाजली. जरा त्रासिकपणेच टायनॅन फोन हातात घेत म्हणाला, 'बहुधा राष्ट्राध्यक्षांचा फोन आहे असं बेथ मला सांगणार.'

फोनवर तो म्हणाला, 'हं बेथ, कोण आहे हॅरी अॅडकॉक? त्याला म्हणावं जरा थांब. एवढं महत्त्वाचं काय आहे? काय?...' फोनवर बोलता बोलता तो एकदम उठून उभा राहिला. संभाषण चालूच होतं. 'बॅक्स्टरबद्दल... होली ट्रिनिटीबद्दल... काय?... हो! हो! कॉलिन्सनं सांगितलं ते? ठीक. हॅरीला सांग जरा मिनिटभर थांब.'

त्यानं रिसिव्हर ठेवला व तो मागं वळला. समोर इस्मेलला पाहताच त्याला खरोखरच धक्का बसला. 'तू... तू अजून इथंच आहेस हे मी विसरून गेलो होतो. तू फोनवरचं संभाषण ऐकलंस?'

'काय? कुठलं संभाषण?' बावचळल्यासारखी मुद्रा करून व आपल्याला काही ठाऊक नाही असं भासवण्याचा प्रयत्न करीत इस्मेलनं विचारलं.

'काही नाही.'

त्याच्या उत्तरानं टायनॅनचं समाधान झालं. तो म्हणाला, 'जरा महत्त्वाचं काम आलंय; तेव्हा आज आपली मुलाखत इथंच थांबवू या. पुढच्या आठवड्यात अर्धा तास जास्त बसू. ठीक आहे?'

'नक्की. तुम्ही म्हणाल तसं.'

इस्मेलनं आपले कागदपत्र आवरायला सुरुवात केली. त्यानं टेपरेकॉर्डर बंद केला. फोनवर टायनॅन बोलत होता तेव्हा टेपरेकॉर्डर चालू होता हे इस्मेलच्या ध्यानात आलं. घरी गेल्या गेल्या ते संभाषण पुन्हा ऐकायचं असं त्यानं ठरवून टाकलं. डायरेक्टर टायनॅनला आपल्यापासून काहीतरी लपवायचंय. फोनवरचं संभाषण आपल्या कानी पडलं की काय अशी त्याला भीती का वाटावी? माजी अॅटर्नी जनरल बॅक्स्टर व सध्याचे अॅटर्नी जनरल कॉलिन्स यांची नावं त्यानं फोनवर घेतली. म्हणजे त्यांच्याबद्दल काहीतरी असणार. तसंच 'होली ट्रिनिटी' हा सांकेतिक शब्द असावा किंवा चर्चचं नाव,

अशा नाना शंका त्याच्या मनात थैमान घालू लागल्या. कॉलिन्सलाच विचारावं का असंही त्याला वाटलं.

टायनॅनचा निरोप घेऊन तो हे शंकेचं ओझं घेऊन बाहेर पडला. ¤

इश्मेल बाहेर पडताच. टायनॅननं बेथला सांगितलं, 'कोणाचेही फोन आत देऊ नकोस; अर्थात व्हाईट हाऊसचे सोडून.'

तेवढ्यात हॅरी अॅडकॉक त्याच्या खोलीत आला. टायनॅननं विचारलं, 'बोल, हॅरी काय झालं?'

'होली ट्रिनिटी चर्चमधील धर्मोपदेशक फादर डुबिन्स्की यांची चौकशी केली. त्यांच्याविरुद्ध फारसं काही सापडलं नाही. मात्र काही वर्षांपूर्वी एका औषध प्रकरणात ते गुंतले होते. परंतु पोलिसांनी त्यांच्यावर कारवाई करण्याचा विचार सोडून दिला.'

'तेवढी माहिती पुरेशी होती. तिचा वापर करून फादरला बोलतं करायचं...'

'मी या माहितीचा वापर केला. किंबहुना डुबिन्स्कीला भेटूनचं मी इथं आलोय.'

'मग सांग ना तो काय म्हणाला ते! बॅक्स्टरनं आपल्या कबुलीत काय सांगितलं त्याला?'

हॅरी अॅडकॉक नेहमी घडलं तसं, त्या क्रमानंच सांगे. तेव्हा त्यानं सारं सांगायला सुरुवात केली. फादर डुबिन्स्कीला फोन करून सरकारी सुरक्षेच्या एका महत्त्वाच्या बाबीसंबंधी भेटायचंच असं त्यानं सांगितलं. त्यानुसार सकाळी ११ वाजून ५ मिनिटांनी त्यांची भेट घेतली. बॅक्स्टर मरण पावले त्या दिवशी मृत्यूपूर्वी त्यांनी 'कबुली' दिली. सरकारची अनेक गुपिते त्यांना ठाऊक होती. तेव्हा त्याविषयी काही महत्त्वाचं त्यांनी सांगितलं का अशी फादरकडे त्यानं विचारणा केली. धर्मगुरूकडे केलेली कसलीही कबुली ही गुप्त असते, ती सांगता येणार नाही असं त्यांनी स्पष्टपणे सांगितलं.

टायनॅन हे ऐकताच पुटपुटला, 'बॅस्टर्ड!'

त्यानं अॅडकॉकला विचारलं, 'मग पुढं काय केलंस तू?'

तो म्हणाला, 'ही माहिती कोणा व्यक्तीला नव्हे तर सरकारला हवी आहे असं मी सांगितलं. त्यावर ते म्हणाले, चर्चवर सरकारची हुकूमत नाही. दोन्ही स्वतंत्र यंत्रणा आहेत. मग मात्र मी कडक पवित्रा घेतला. धर्मोपदेशक असला तरी त्याला कायदा लागू आहे असं सांगून काही वर्षांपूर्वीची त्यांची औषधाची भानगड सांगितली. त्यावर ते एवढंच म्हणाले, 'अॅडकॉक, तुम्ही मला धमकी देताय?' मी सांगितलं, 'एफ. बी. आय. कधीही धमकी देत नाही. ते फक्त माहिती गोळा करते. त्या माहितीच्या आधारे न्यायखाते कारवाई करते. एवढं सांगितलं. दम भरला तरी त्यांनी काहीही सांगायला नकार दिला.'

टायनॅननं पुन्हा टेबलावर जोरानं मूठ आपटीत एक शिवी हासडली व त्याने विचारले.

'अजून एकदा प्रयत्न केला तर सांगेल का तो?'

'मला नाही वाटत ते काही सांगतील म्हणून! काही झालं तरी एक शब्द ते उच्चारणार नाहीत.'

'कबुलीच्या गुप्ततेचं पावित्र्य त्यांना महत्त्वाचं वाटतं. त्यामुळे ते बेइमानी करायचे नाहीत,' असं सांगून अॅडकॉकनं आपल्या टिपणांच्या कागदाची घडी करून खिशात ठेवली.

'चिफ, मग काय करायचं आपण?' त्यानं विचारलं.

टायनॅन खुर्चीतून उठला. आपल्या पॅंटच्या खिशात त्यानं हात घातले व तो येरझारा घालू लागला आणि मग एकदम थांबून म्हणाला,

'आपण काहीही करायचं नाही. एवढा धाकदपटशा दाखवून फादर डुबिन्स्कीनं काही सांगितलं नाही याचा अर्थ तो कोणाशीही काही बोलणार नाही. म्हणजे आपण सुरक्षित आहोत. तेव्हा हॅरी, तू तुझी कामगिरी चांगली पार पाडली आहेस. डुबिन्स्कीवर अधूनमधून जरा पाळत ठेवा म्हणजे पुरे. अच्छा. थॅंक्स.'

अॅडकॉक खोलीतून बाहेर पडत असतानाच फोनची घंटा वाजली. रिसिव्हर उचलून टायनॅन म्हणाला, 'हं, काय बेथ?... ठीक आहे. ठीक आहे, दे जोडून फोन.'

क्षणभर तो थांबला व म्हणाला, 'हॅलो मिस लेजर... ठीक आहे; ठीक आहे. राष्ट्राध्यक्षांना सांग. मी येतोच ताबडतोब.' ¤

टायनॅन व्हाईट हाऊसमधील त्या प्रसिद्ध ओव्हल ऑफिसात पोहोचला. आत शिरत असतानाच पूर्वीच्या आठवणींनी त्याच्या मनात गर्दी केली. एफ. बी. आय. चे दिवंगत डायरेक्टर जे. एडगर हूव्हर यांच्यासमवेत एफ. बी. आय. चा एक एजंट म्हणून तो अनेक वेळा या दालनात आला होता. तेव्हा जॉन केनेडी राष्ट्राध्यक्ष होते. राष्ट्राध्यक्ष वॅडस्वर्थ हे केनेडींचे अत्यंत चाहते. त्यामुळे केनेडींच्या वेळेस ओव्हल ऑफिस जसं होतं तसंच्या तसंच त्यांनी ते ठेवलं होतं. हिरवे पडदे, देशाचा, राष्ट्राध्यक्षांचा व सैन्यातील विविध शाखांचे असे एकूण सहा झेंडे फडकत होते. छतावर राष्ट्राध्यक्षांचे बोधचिन्ह होते. खालच्या तपकिरी हिरव्या गालिचावर गरुडाचं चित्र होतं. टायनॅनला क्षणभर वाटलं समोरच्या खुर्चीत केनेडी तर बसले नाहीत?

राष्ट्राध्यक्ष वॅडस्वर्थ टायनॅनला म्हणाले, 'व्हर्नान, बरं झालं तू आलास! ती खुर्ची ओढ आणि त्यातली ती वर्तमानपत्रं दे कचऱ्याच्या टोपलीत फेकून! लेकाची सारी आपल्या विरुद्ध आहेत! लांडग्यासारखी आपल्यावर तुटून पडताहेत. 'न्यूयॉर्क टाइम्स'चे संपादकीय बघ. ३५ व्या घटनादुरुस्तीला त्यांच्या राज्यानं मान्यता दिली ही घटना त्यांना नाचक्कीची वाटते! आता न्यूयॉर्क टाइम्सनं कॅलिफोर्नियातल्या असेंब्लीच्या सभासदांना तर अनावृत्त पत्र लिहून या घटना दुरुस्तीविरुद्ध मत देण्याचं आवाहन त्यांना केलं आहे. 'टाइम' आणि 'न्यूजवीक'चंही हेच धोरण आहे असं कळलंय मला.'

राष्ट्राध्यक्षांचा एक मदतनीस रोनाल्ड स्टीडमन म्हणाला, 'हॅं, हा तर त्यांचा शुद्ध स्वार्थ झाला. वृत्तपत्रांना आपल्या भविष्याची काळजी वाटतेय.'

'वाटायलाच हवी. आपल्या वर्तमानपत्रातून ते जे गरळ ओकत असतात ते गुन्हेगारी व हिंसाचाराइतकेच भयानक असतं.' असं सांगून टायनॅन म्हणाला, 'आपल्याही बाजूने बरेच लोक, वर्तमानपत्र आहेतच की!'

'मी तुझा सल्ला घेण्यासाठीच तर तुला बोलावलं आहे,' असं सांगून राष्ट्राध्यक्ष म्हणाले, 'अलीकडेच आपण कॅलिफोर्नियात

केलेल्या पाहणीनुसार तेथील मतदारांपैकी ४१ टक्के घटनादुरुस्तीच्या बाजूनं, २७ टक्के विरुद्ध आणि ३२ टक्क्यांचं मत अनिश्चित आहे, आणि सदस्यांपैकी ४० टक्क्यांनी अजून काही ठरवलेलं नाही. उरलेल्या ६० टक्क्यांपैकी ५२ टक्के बाजूचे व ४८ टक्के विरुद्ध आहेत, ही अनिश्चितताच मला फार काळजीची वाटते आहे.'

'या कुंपणावर बसलेल्यांना आपल्या बाजूला खेचलं पाहिजे.' टायनॅन म्हणाला.

'तेवढ्यासाठीच तर बोलावलंय तुला.' मग स्टीडमनचा राष्ट्राध्यक्षांनी निरोप घेतला. आता ते दोघेच त्या ऑफिसात होते. राष्ट्राध्यक्ष म्हणाले, 'कुठलीही कसूर होता कामा नये. तू काय ठरवलंयस ?'

टायनॅन म्हणाला, 'कॅलिफोर्निया राज्यातील गुन्ह्यांविषयीचा अहवाल आता दर महिन्याऐवजी दर आठवड्याला मागवलाय.'

'उत्तम ! पण व्हर्नान, नुसत्या आकडेवारीने सबंध परिस्थितीचं गांभीर्य लक्षात येतं असं नाही. त्यापेक्षा एखादं आवेशपूर्ण भाषण अधिक परिणामकारक ठरू शकतं. छोट्या छोट्या सभांतून भाषणं करण्यासाठी मी अनेक सदस्यांची नावं निश्चित केलीच आहेत, पण सर्वांत प्रभावी कोण ठरेल ?'

खुर्चीतच पुढे होत टायनॅन म्हणाला, 'एकच व्यक्ती आहे–सर्वांत प्रभावी ठरू शकेल–आणि ती म्हणजे तुम्ही ! ३५ व्या घटनादुरुस्तीच्या बाजूने तुम्हीच सर्वांची मनं वळवू शकाल.'

अध्यक्षांनी यावर विचार केला, पण तो क्षणभरच. नकारात्मक मान हलवीत ते म्हणाले, 'नाही व्हर्नान, मी बोललो तर कदाचित उलटच परिणाम व्हायचा. तू राजकारणी नाहीस तेव्हा तुला नाही कळायचं ते ! कुठल्याही राज्याला व त्यांच्या सभासदांना आपल्या स्वायत्ततेचा अभिमान असतो. तेव्हा राष्ट्राध्यक्षांनी त्याच्यावर काही मत लादणं हे त्यांना रुचायचं नाही.'

'मग मी जाऊ का कॅलिफोर्नियाला ?' टायनॅननं विचारलं.

'नाही. तूही नाही चालणार. तू पक्का सरकारी माणूस. तेव्हा तुला कोणी वस्तुनिष्ठ समजणार नाही. तुझा काही तरी मतलब आहे असाच साऱ्यांना संशय येईल...मी त्या दिवशी म्हटलं त्याप्रमाणं ॲटर्नी जनरल ख्रिस कॉलिन्सला का पाठवू नये ?'

'अंऽऽ मी पण विचार करीत होतो त्याच्याबद्दल. पण मला त्याची खात्री नाही देता येत. तो तितका प्रभावी ठरेल की नाही, याची मला शंका वाटते.'

'कसं बोललास ! त्याच्यातल्या या उणिवांचाच नेमका आपल्याला फायदा उचलायचा आहे. खरं म्हटलं तर मला त्याच्याबद्दल बिलकूल शंका नाही. तो आपल्याच बाजूचा आहे. त्याला कॅलिफोर्नियाला पाठवू या. पण नुसतं या कामासाठी पाठवलं तर त्याला प्रचाराचा वास येईल. तेव्हा काहीतरी निमित्त शोधून काढण्यासाठी मी मिस लेजरला सांगितलंय,' असं सांगून त्यांनी टेबलाजवळचं एक बटण दाबलं.

तात्काळ दूरचं एक दार उघडून मिस लेजर आत आली. वॅडस्वर्थनं तिला विचारलं, 'मिस लेजर, तुला आठवतं, कॅलिफोर्नियात कोणकोणत्या परिषदा आहेत हे शोधून काढायला सांगितलं होतं मी तुला ?'

'होय,' ती म्हणाली, 'सोमवार ते शुक्रवारपर्यंत अमेरिकन बार असोसिएशनची राष्ट्रीय वार्षिक बैठक आहे तिथं.'

राष्ट्राध्यक्ष आनंदून म्हणाले, 'व्वा ! उत्तमच की. हे बघ, तू अमेरिकन बार असोसिएशनच्या अध्यक्षाला ताबडतोब फोन कर आणि शेवटच्या दिवशी प्रमुख पाहुणे वक्ते म्हणून ॲटर्नी जनरल कॉलिन्सला बोलवा म्हणावं.'

मिस लेजर थोडीशी काळजीत पडली व म्हणाली, 'हे होणं मला इतकं सोपं वाटत नाही. त्यांचे सारे वक्ते ठरले आहेत. शेवटच्या दिवशीचे पाहुणे वक्ते आहेत मुख्य न्यायमूर्ती जॉन मेनार्ड !

'मग त्यात अवघड काय ? एकाच्या ऐवजी दोन पाहुणे वक्ते ते बोलवू शकतात ! मुख्य न्यायमूर्तींच्या आधी किंवा नंतर कॉलिन्सचं भाषण त्यांना ठेवता येईल. तेव्हा तू त्यांना तसं सांग.'

'मी ताबडतोब त्यांना कळवते,' असे सांगून मिस लेजर निघून गेली.

'चला. एक प्रश्न मिटला. मी आता कॉलिन्सला हे कळवीन. एक साधं भाषण करायला सांगीन आणि मग हळूच ३५ वी घटनादुरुस्ती ही भविष्यासाठी किती अत्यावश्यक आहे हे मांडायला सांगीन. मला वाटतं, श्रोत्यांमध्ये बरेच असेंब्लीचे सदस्य असणार. या निमित्तानं एखादी कॉकटेल पार्टीही कॉलिन्सला आयोजित करता येईल. त्यावेळीही तो मतं तयार करू शकेल. तेव्हा मग हे ठरलं,' असं म्हणून राष्ट्राध्यक्ष टायनॅनचा निरोप घेणार इतक्यात काहीतरी आठवून ते म्हणाले,

'अरे हो, एक राहिलंच. त्या एका टेलिव्हिजन कंपनीनं 'सर्च फॉर ट्रुथ' या आपल्या कार्यक्रमात 'घटनादुरुस्ती' हा विषय ठेवलाय. त्यात दोन वक्ते असतील. त्यांना दुरुस्तीच्या बाजूने बोलणारा वक्ता हवाय. तेव्हा तू का नाही बोलत ?'

'विरुद्ध बोलणारा कोण आहे ?'

टेबलावरील एका कागदाकडे दृष्टिक्षेप टाकून राष्ट्राध्यक्ष म्हणाले, 'टोनी पिअर्स !'

ताडकन टायनॅन म्हणाला, 'माफ करा, पण ज्यानं एफ. बी. आय. शी बेईमानी केली त्या एजंटच्या जोडीला एफ्. बी. आय. च्या डायरेक्टरनं बसणं योग्य ठरेल असं नाही मला वाटत. त्याच्याबरोबर वादविवादात भाग घेऊन त्याच्या मताला मी एवढी किंमत देणं


दीपावली अभिष्टचिंतन !

दादर ( पूर्व ) भागात राहण्याची उत्तम सोय !

**श्रीकृष्ण बोर्डिंग हाऊस**

हिंदु कॉलनी, १ गल्ली, दादर,
मुंबई ४०० ०१४

• टेलिफोन : ४४०२७८

(BYP)

योग्य नाही. त्यापेक्षा तुम्ही असं का नाही करत? कॉलिन्सला का नाही पाठवत? नाहीतरी बार कौन्सिलच्या परिषदेसाठी लॉस एंजलसला त्याच सुमारास त्याला जावंच लागणार आहे.'

'हं, हे ठीक होईल,' असं सांगून त्यांनी टायनॅनला निरोप दिला. मग त्यांनी रिसिव्हर उचलून सेक्रेटरीला कॉलिन्सला फोन जोडून द्यायला सांगितलं. ¤

आपल्या न्यायखात्याच्या ऑफिसात खांद्याच्या आधाराने फोनचा रिसिव्हर पकडीत कॉलिन्स नोटस् घेत होता. राष्ट्राध्यक्ष त्याला कॅलिफोर्निआतील भाषणांबद्दल सूचना देत होते व तो त्या लिहून घेत होता. पुढच्या शुक्रवारी दुपारी एक वाजता लॉस एंजलस येथे टी. व्ही. वर 'सर्च फॉर ट्रूथ' या कार्यक्रमात भाग घ्यायचा आणि मग तीन वाजता प्लाझा हॉटेलात अमेरिकन बार असोसिएशनपुढे भाषण, याची आठवण देऊन राष्ट्राध्यक्ष त्याला सांगत होते,

'आम्ही सर्वस्वी तुझ्यावर अवलंबून आहोत. जाण्यापूर्वी मला भेटून जा.' आणि त्यांनी फोन बंद केला.

खरं म्हणजे हे सारं कॉलिन्सला नापसंत होतं. आतापर्यंत घटनादुरुस्तीविषयी त्यानं जाहीर मतप्रदर्शन कुठेही केलं नव्हतं. किंचित अनुकूलता दाखविली होती इतकंच. आता मात्र त्याला उघडउघड सरकारची तरफदारी करायची होती. प्रचार करणं त्याच्यावर लादलं जात होतं. तो एका बाजूला या विचारात गढला असतानाच दुसरीकडे त्याचे काम झपाट्यानं चालू होतं. बाहेरच्या खोलीत फोन एकसारखा खणखणत होता. पण सेक्रेटरी मॅरियन परस्पर फोनवर उत्तर देत होती, त्यामुळे त्याच्या कामात व्यत्यय येत नव्हता. फायलीतून डोकं वर काढून त्यानं सहज खिडकीबाहेर नजर टाकली. हळूहळू काळोख वाढू लागला होता. बराच वेळ झाला होता. त्यानं भराभरा कागदपत्रं आपल्या बॅगेत भरायला सुरुवात केली व तो निघायच्या तयारीला लागला.

इतक्यात फोन वाजला. त्यानं तिकडं दुर्लक्ष केलं. पण मग इंटरकॉमवर मॅरियनचा आवाज आला, 'मिस्टर कॉलिन्स, कोणातरी फादर डुबिन्स्कीचा फोन आहे. ते माझ्याकडे काही निरोप द्यायला तयार नाहीत. त्यांना तुमच्याशीच बोलायचंय.'

कॉलिन्सने उत्सुकतेनं विचारलं, 'हो हो. दे ना फोन. तू आता जाऊ शकतेस. उद्या सकाळी भेटूच.'

कॉलिन्स खुर्चीत बसला व त्यानं फोन उचलला. पलीकडून आवाज आला.

'मी डुबिन्स्की. बॅक्स्टरच्या मृत्यूच्या दिवशी आपण भेटलो होतो.'

'हो, आठवतंय ना मला. खरं तर मीच तुम्हाला फोन करणार होतो. मला तुमच्याशी काही बोलायचंय.'

'तेवढ्यासाठीच तर फोन केला. मलाही तुम्हाला भेटायचंय. जेवढ्या लवकर भेटू तेवढं बरं. जमलं तर आज रात्रीच. नाही तर उद्या सकाळी. पण मी फोनवर काही सांगू शकत नाही.'

कॉलिन्स एकदम सावध झाला. त्याची उत्सुकता शिगेला पोचली. तो फोनवर म्हणाला, 'आज रात्रीच भेटू. खरं तर अर्ध्या तासात मी निघतो. कुठे भेटायचं?'

'होली ट्रिनिटी चर्च येथे भेटू या. ते ३६ व्या रस्त्यावर आहे. मात्र पुढल्या दारानं येऊ नका. बहुतेक आपल्यावर पाळत असण्याची शक्यता आहे. तेव्हा ३५ व्या रस्त्याने या.'

'ठीक आहे,' असं म्हणून कॉलिन्सनं फोन बंद केला. ¤

आपल्या कॅडिलॅक गाडीतून होली ट्रिनिटी चर्चकडे कॉलिन्स निघाला, तेव्हा त्याच्या मनात अनेक प्रश्नचिन्हं उभी होती. फादर डुबिन्स्की बॅक्स्टरच्या कबुलीबाबत आपल्याला काहीच सांगायला तयार नव्हते. मग आता एकाएकी आपल्याला का बोलावलं असावं? आणि चर्चच्या दारावर पाळत ठेवलीय् असं ते म्हणाले. कोणी व का ती पाळत ठेवली असेल? एवढ्यात तो चर्चजवळ पोचला. पण ३६ व्या रस्त्याने जाण्याऐवजी तो ३५ व्या रस्त्याने आत शिरला. चर्चच्या मागच्या दाराशी येताच आपोआप दार उघडलं गेलं व फादर डुबिन्स्कींचा आवाज आला, 'या मिस्टर कॉलिन्स.'

तेथे अंधुक प्रकाश होता. फादर त्याला एका खोलीत घेऊन गेला. तेथे एक टेबल व दोन खुर्च्या होत्या. भिंतीवर येशू ख्रिस्ताचं एक चित्र होतं. ते बसले. कॉलिन्सनं विचारलं,

'मला येताना कोणी पाहिलं नाही. पण प्रवेशद्वारावर पाळत ठेवलीय् कोणी?'

'एफ. बी. आय. नं.'

'एफ. बी. आय.?' कॉलिन्सला आश्चर्याचा धक्काच बसला. 'तुमच्यावर कशासाठी पाळत ठेवलीय?'

'सांगतो,' असं म्हणून फादर डुबिन्स्कीनं सरळ विषयालाच हात घातला.

'आज सकाळी एक माणूस मला भेटायला आला. त्यानं त्याचं नाव हॅरी ॲडकॉक असं सांगितलं. त्याच्याकडं त्याचं ओळखपत्रही होतं. तो एफ. बी. आय. चा डेप्युटी डायरेक्टर किंवा कोणीतरी आहे.'

'हां, बरोबर आहे. टायनॅनचा तो सहकारी आहे. तो कशाला आला होता इथं?'

'माजी ॲटर्नी जनरल कर्नल नोह बॅक्स्टर यांनी मरताना मला काय सांगितलं हे त्याला जाणून घ्यायचं होतं. त्या बोलण्याचा कदाचित अंतर्गत राष्ट्रीय सुरक्षिततेशी संबंध असावा असंही तो म्हणाला. आता ही चौकशी सद्हेतूने केली असती, तर मी कदाचित त्याला सहकार्य केलं असतं. पण मी नकार देताच ॲडकॉकनं मला धमकी दिली.'

अविश्वासाच्या सुरात कॉलिन्सनं विचारलं, 'काय, तुम्हाला धमकी दिली?'

'होय. आणि ही धमकी अप्रत्यक्ष किंवा सूचित नव्हती, तर उघडउघड होती. ब्लॅकमेलच करायचा प्रयत्न केला मला. माझं सारं पूर्वचरित्रच त्यानं तपासलं असणार. माझ्या जीवनात घडलेला एक दुःखद प्रसंग एफ. बी. आय. ने उकरून काढला. फार पूर्वी न्यू जर्सी इथं एका चर्चमध्ये काम करताना तिथल्या गरिबांसाठी मी औषधाची एक योजना आखली होती. पण काही उपद्व्यापी पोरांनी माझ्या खोलीत औषधं दडवून ठेवली. ती मी विकतो असा आळ आला. पण आमच्या बिशपनं पोलिसांना सांगितलं. माझी साक्ष खरी मानून मला सोडून देण्यात आलं. आता या गोष्टीचं भांडवल एफ. बी. आय.

करू पाहत आहे. आणि त्याच्या जोरावर अ‍ॅडकॉकनं मला धमकी दिली आहे.'

'मला हे अजूनही अविश्वसनीय वाटते. बॅक्स्टरनं मरताना जे सांगितलं त्याला टायनॅन एवढं महत्त्व का बरं देतोय?'

'आता मला तरी काय माहीत? मला वाटल, तुम्हाला माहीत असेल.'

'आता बॅक्स्टरनं मरताना तुम्हाला काय सांगितलं, हे मला माहीत नाही. तेव्हा आता मी तरी–'

'अ‍ॅटर्नी जनरल कर्नल बॅक्स्टरनं जे काही सांगितलं त्यातलं काही मी आता तुम्हाला सांगणार आहे.'

कॉलिन्सला आश्चर्याचा गोड धक्काच बसला. कानात प्राण आणून तो एकचित्ताने ऐकू लागला.

डुबिन्स्की म्हणाले, 'बॅक्स्टर यांना मरतेवेळी काहीतरी अतिशय महत्त्वाचं सांगायचं होतं. आणि तेही तुम्हाला. तुम्ही वेळेवर पोहोचू शकला नाहीत तेव्हा त्यांनी समोर जो दिसला त्यालाच सांगितलं. तो म्हणजे मी होतो. तेव्हा केवळ धर्मोपदेशक म्हणून ते माझ्याशी बोलले नाहीत, हे मला जाणवलं. त्यामुळं त्यांची शेवटची काही वाक्यं मी तुम्हाला सांगतो.'

डुबिन्स्कीनं खिशातून कागद काढला व ते म्हणाले, 'अ‍ॅडकॉक निघून गेल्यावर मी अतिशय संतापलो होतो. दिवसभर नीट विचार केला व मग तुमच्याशी बोलायचं ठरवलं. बॅक्स्टरशी झालेलं माझं बोलणं मी आठवलं. आणि काही चूक होऊ नये म्हणून ते लिहूनही काढलं.'

'त्यांचे शेवटचे शब्द असे होते–'फादर, माझ्याकडून पाप घडलंय्. महत्पाप. मला आता बोललंच पाहिजे–आता ते माझ्यावर नियंत्रण ठेवू शकत नाहीत. मी मुक्त आहे. ३५ व्या घटनादुरुस्तीच्या सदर्भात त्यांची आता मला भीती वाटायची गरज नाही.'

'३५ वी घटनादुरुस्ती...' कॉलिन्स पुटपुटला.

फादरनं पुन्हा हातातल्या कागदावरचा मजकूर वाचायला सुरुवात केली. 'हं, त्यांनी ३५ व्या घटनादुरुस्तीचा उल्लेख केला व बॅक्स्टर काहीसे अडखळले व म्हणाले–'आर डॉक्युमेंट. भयंकर धोकादायक आहे. कोठल्याही परिस्थितीत ते उघडकीस आणलंच पाहिजे. आर डॉक्युमेंट–' आणि मग ते पुन्हा अडखळले. त्यांना काय म्हणायचंय् ते मला नीट समजेना. पण माझी खात्री आहे की ते असं, नंतर असं म्हणाले–'मी पाहिलंय्...फसवलंय्–जा–पाहा–' आणि मग त्यांना एकदम श्वास लागला. काही क्षणांतच ते मरण पावले.'

कॉलिन्स बसल्या जागी थिजल्यासारखा झाला. त्यानं विचारलं, 'आर डॉक्युमेंट? असं म्हणाले ते?'

'दोनदा! आणि तेही अगदी स्पष्ट. त्याबद्दल त्यांना काही बोलायचं होतं. पण ते बोलू शकले नाहीत.'

'तुमची खात्री आहे ते आणखी काही बोलले नाहीत?'

'ते आणखी काही पुटपुटले. पण ऐकू आलं ते इतकंच.'

'फादर, हे आर डॉक्युमेंट काय आहे याची तुम्हाला कल्पना आहे?'

'मला वाटलं, ते तुम्हालाच ठाऊक असेल.'

'मी तर बुवा त्याबद्दल कधीच काही ऐकलं नाही.' असं सांगून कॉलिन्सनं क्षणभर विचार केला. अ‍ॅटर्नी जनरलपदाची सूत्रे हाती घेताना बॅक्स्टरना हाच महत्त्वाचा संदेश आपल्याला द्यायचा असावा तो म्हणाला,

'कोठल्या तरी प्रकरणात गुरफटल्यानं आपण पाप केलंय असं बॅक्स्टरला वाटतंय. बहुधा त्यांना बळजबरीनं यात गुंतवलं असावं. आणि ते जे काही प्रकरण असेल त्याचा ३५ व्या घटनादुरुस्तीशी व आर डॉक्युमेंटशी संबंध आहे. ही सारी फसवणूक आहे. धोकादायक आहे. आणि ती उघडकीस आणलीच पाहिजे हे त्यांना सांगायचं होतं. आणि तेही मला. त्यांनी राष्ट्राध्यक्षांना किंवा टायनॅनला, एवढेच काय, स्वत:च्या पत्नीलादेखील सांगितलं नाही. ते मलाच सांगितलं. असं का?'

'कदाचित राष्ट्राध्यक्ष किंवा एफ्. बी. आय.चा डायरेक्टर यांच्यापेक्षा तुमच्यावर त्यांचा जास्त विश्वास असेल किंवा पत्नीपेक्षा तुम्ही ते जास्त समजू शकला असतात, म्हणून तुम्हाला सांगायचं असावं.'

अस्वस्थ होत कॉलिन्स म्हणाला, 'हे आर डॉक्युमेंट असाव तरी काय?'

तो जणू हरवल्यासारखाच झाला.

जागेवरून उठत फादर म्हणाले, 'शक्य तितक्या लवकर शोधून काढा.' आपल्या हातातील कागद कॉलिन्सकडं देत ते म्हणाले, मला जे ठाऊक होतं ते तुम्हालाही माहीत झालंच. आता पुढचं सारं तुमच्याच हातात आहे. मला तर यात धोका वाटतोच. ईश्वर तुम्हाला मदत करो व तुम्हाला यश मिळो.' ◻


**दीपावली अभीष्टचिंतन**

जिच्या चवीने जिभेला सद्भावनेचा अंकूर फुटतो अशा
गोड साखरेशी निगडित नाव–

# कोल्हापूर केन शुगर वर्क्स लि.

कसबा बावडा, कोल्हापूर ४१६ ००६

## : प्रकरण तिसरे :

दुसऱ्या दिवशी सकाळी ऑफिसला जाताना कॉलिन्स 'आर डॉक्युमेंट'चाच विचार करत होता. खरं तर सारी रात्र त्यानं याच विचारात घालवली होती. कॅरेनला त्यानं ही भानगड सांगितली नव्हती. उगाच तिला चिंता वाटायला नको म्हणून त्यानं ही खबरदारी मुद्दाम घेतली होती.

'आर डॉक्युमेंट' च्या शोधाला सुरुवात कोठून करायची हेच त्याला उमजेना. बॅक्स्टर यांच्या फाईल्सपासून सुरुवात करायला हवी. मॅरिअनच्या ऑफिसात नेहमीच्या फायलींबरोबर बॅक्स्टर यांच्या सरकारी फायली ठेवल्या होत्या, त्यांच्या वैयक्तिक कागदपत्रांच्या फायली इतरत्र ठेवल्या होत्या. त्या पण पाहाव्या लागल्या असत्या. पण फायलीत शोधायचं काय ? 'आर 'खाली आर डॉक्युमेंट की 'ए' खाली अमेंडमेंट अथवा 'डी' विभागात डेंजर ? बॅक्स्टरच्या संदेशाचं स्वरूप ध्यानात घेतलं तर, इतक्या सहजासहजी आर डॉक्युमेंट हाती लागणं शक्य नव्हतं.

मग कोणाला तरी विचारू का नये ? डायरेक्टर टायनॅन ? पण मग बॅक्स्टर यांनी टायनॅनलाच का नाही बोलावून हे सांगितलं ? आणि दुसरं म्हणजे दफनभूमीत बोलताना बॅक्स्टरनं फादरना काही तरी मरताना सांगितलं याचा सहज उल्लेख केला तर, लगेच टायनॅननं फादरच्या मागं एफ. बी. आय.चा ससेमिरा लावला, त्याला दम भरला. तेव्हा टायनॅनला विचारावं की नाही ? एक मन म्हणत होतं काही हरकत नाही. पण दुसरं मन धोक्याचा इशारा देत होतं. कॉलिन्सला काही ठरवता येईना.

मग त्याला वाटलं, बॅक्स्टरची पत्नी हॅना हिलाच का विचारू नये ? तिला भेटणं शक्य होतं आणि त्याचे व हॅनाचे संबंधही फार चांगले होते

कॉलिन्स आपल्या ऑफिसात शिरला तेव्हा तो द्विधा मनस्थितीतच होता. आपल्या टेबलावर लिहून ठेवलेल्या निरोपाकडे त्याने दुर्लक्ष केले. त्याचं विचारचक्र चालूच होतं. इतक्यात मॅरियन त्याच्यासाठी नेहमीप्रमाणे कडक चहा घेऊन आली. त्यातल्या त्यात सोपा मार्ग अनुसरावा म्हणून त्याने तिलाच विचारलं,

'मॅरियन, कर्नल बॅक्स्टर यांच्या फाइल्स सध्या कुठं आहेत ?'

'त्यांच्या मुख्य ऑफिसच्या कामासंबंधीच्या फायली माझ्या ऑफिसात आहेत. याखेरीज त्यांच्या बऱ्याच वैयक्तिक फायली होत्या. त्यांत त्यांची खाजगी पत्रं वगैरे असत. आता या फायली बॅक्स्टर यांना हॉस्पिटलमध्ये दाखल केल्यानंतर एक महिन्यानंतर जॉर्ज टाऊन येथील त्यांच्या घरी हलविण्यात आल्या.'

'मग तिथे आहेत वाटतं सध्या या फायली ?'

'मी मिसेस बॅक्स्टरना फोन करू ?'

आर डॉक्युमेंटसंबंधी पहिल्यांदा बॅक्स्टरच्या विधवा पत्नीलाच विचारावं असं कॉलिन्सनं ठरवलं. तो म्हणाला,

'हो. तिला फोन कर आणि सांग, आज दुपारी मी तिला भेटायला येतो आहे.'

मॅरियन जायला निघाली. सहज विचारावं अशा पद्धतीनं कॉलिन्सनं विचारलं,

'मॅरियन, आर डॉक्युमेंट नावाचं एक टाचण शोधतोय. तुला आठवतंय त्याबद्दल काही ?'

आठवण्याचा प्रयत्न करीत ती म्हणाली,

'नाही. मला नाही बाई काही आठवत.'

'३५ व्या घटनादुरुस्तीसंबंधी हे टाचण होतं. आपल्या नेहमीच्या फायलीत जरा पाहशील ?'

'हो, आत्ताच बघते.'

चहा पिता पिता कॉलिन्सची अनेक कामे चालू होती. फोन येत होते. दुपारी मॅरियनने त्याला दोन महत्त्वाच्या गोष्टींबद्दल माहिती दिली. पहिली गोष्ट म्हणजे जनरल फायलीमध्ये आर डॉक्युमेंट नावाचे काहीही कागदपत्र नव्हते. दुसरं म्हणजे श्रीमती हॅना बॅक्स्टर यांनी दुपारी दोन वाजताची वेळ भेटण्यासाठी दिली होती.

आपल्या खाजगी डायनिंग रूममध्ये तिघा अॅटर्नींबरोबर कॉलिन्स जेवला आणि मग स्वतःच पत्करलेल्या आर डॉक्युमेंटचा शोध घेण्याच्या कामास त्याने प्रारंभ केला.

श्रीमती बॅक्स्टरना भेटायला तो जॉर्ज टाऊनला निघाला. पॅगानो मोटार चालवीत होता व शरीररक्षक होगान बरोबर होता. भरपूर झाडं असलेल्या त्या रस्त्यावर बॅक्स्टर यांच्या तिमजली घरापाशी ते आले. कॉलिन्सनं दारावरचं बेलचं बटन दाबलं. एका नोकरानीनं दार उघडलं.

'आता येतीलच श्रीमती बॅक्स्टर, तोवर तुम्ही जरा इकडं का नाही थांबत ?'

तिची ही सूचना कॉलिन्सनं मान्य केली. सरकत्या काचांच्या दरवाज्यातून तो बाहेर पडला. पोहण्याच्या तलावात त्याचं प्रतिबिंब दिसत होतं. तेथल्या एका खुर्चीवर तो विसावला आणि त्यानं सिगरेट शिलगावली.

'हाय, मिस्टर कॉलिन्स !' एका तरुण मुलाचा आवाज आला.

कॉलिन्सनं वळून पाहिलं. बॅक्स्टरचा नातू रिक त्याला हाक मारीत होता. एका छोटया कॅसेट टेपरेकॉर्डरशी तो काहीतरी करत बसला होता.

'हॅलो रिक, आज शाळेला दांडी वाटतं ?'

'नाही. ड्रायव्हर आजारी आहे तेव्हा आजी म्हणाली आज घरीच राहा.'

'त्या टेपरेकॉर्डरशी काय खेळतोयस ?'

'काहीतरी झालंय त्याला. चालतच नाही. आज रात्री टी. व्ही. वरचा एक कार्यक्रम मला रेकॉर्ड करायचाय.'

'जरा बघू. मी काही मेकॅनिक नाही. पण पाहतो प्रयत्न करून.'

रिकनं त्याला टेपरेकॉर्डर आणून दिला. कॉलिन्सनं सर्व बटणं बरोबर आहेत का हे आधी पाहिलं, मग त्यानं वरचं झाकण उघडलं. काय बिघडलंय हे त्याच्या लगेच लक्षात आलं. टेपमध्ये काहीतरी अडकत होतं. ते त्यानं काढून टाकलं. टेपरेकॉर्डर पुन्हा चालू झाला. बारा वर्षांच्या हुशार रिकला त्यामुळं एकदम आनंद झाला. 'खूप प्रकारचे कार्यक्रम, भाषणं टेप करायचा मला नादच आहे. एकदा माझा टेप्सचा संग्रह पाहा,' असं त्यानं सांगितलं.

इतक्यात हॅना बॅक्स्टर आल्या. कॉलिन्सनं उठून अभिवादन केलं. आलिंगन देत तिच्या गालाचं हलकंसं चुंबन त्यानं घेतलं. तिच्या

नवऱ्याच्या निधनाबद्दल कॉलिन्सनं दुःख व्यक्त केलं. ती बॅक्स्टरबद्दल भावविवश होऊन बोलू लागली. मरताना किती तळमळीनं त्यानं कॉलिन्सला भेटायची इच्छा व्यक्त केली होती ते पुन्हा सांगितलं. 'तू वेळेवर पोहोचू न शकल्यानं तुझ्याशी त्याला बोलताच आलं नाही.' असं ती म्हणाली.

त्याला काय सांगायचं होतं ते फादर डुबिन्स्कीमार्फत आपल्याला कळलंय हे सांगून टाकावं असं त्याला वाटलं. परंतु निष्कारण यात तिला गुंतवायला नको म्हणून तो काही बोलला नाही. उलट तो म्हणाला, 'मला बॅक्स्टरशी बोलायची संधी मिळाली असती तर फार बरं झालं असतं. काही गोष्टी विचारता आल्या असत्या. उदाहरणार्थ आता मला काही फाईल्सच सापडत नाहीत. ऑफिसातली सारी कपाटं आम्ही धुंडाळली पण काही उपयोग झाला नाही. बॅक्स्टर यांच्या काही वैयक्तिक फायली ते आजारी पडल्यावर घरी पाठवून दिल्या असं माझ्या सेक्रेटरीनं सांगितलं.'

'ते खरं आहे. बॅक्स्टरच्या अभ्यासिकेत त्या फायली मी ठेवल्या.'

'मी त्या फायली चाळू का?'

'आता त्या माझ्यापाशी नाहीत. बॅक्स्टरच्या मृत्यूनंतर व्हर्नान टायनॅन आला होता. महिना–दोन महिन्यासाठी फायली घेऊन जातो असं म्हणाला, त्यात काही राष्ट्रीय महत्त्वाचं गुपित नाही ना हे त्याला पाहायचं होतं. मी त्याला फायली न्यायला परवानगी दिली. तेव्हा तुला यासाठी टायनॅनला भेटायला हवं.'

हा टायनॅन सगळीकडं कडमडतो! आता बॅक्स्टरच्या वैयक्तिक फायली त्याला कशाला हव्या आहेत? परंतु त्याबद्दल विचार करायला आता वेळ नव्हता. कॉलिन्सनं विचारलं,

'हॅना, मी न्यायखात्याच्या काही कागदपत्रांच्या शोधात आहे. पस्तिसाव्या घटनादुरुस्तीसंबंधीचे हे कागदपत्र असून त्यांचं नाव 'आर डॉक्युमेंट' आहे. एखाद्या फायलीत हे कागदपत्र तुम्ही पाहिले का?'

'मी कधीच त्याच्या फायली पाहत नसे. तसेच आपल्या कामाविषयी तो माझ्याशी चर्चा करत नसे.'

'मग त्याचा कोणी मित्र सांगू शकेल? 'आर डॉक्युमेंट' विषयी तो कोणाशी तरी बोलला असण्याची शक्यता आहे?'

टेबलावरील सिगरेटच्या पाकिटाकडे बोट दाखवून तिनं एक सिगरेट मागितली. पतीच्या निधनानंतर तिनं धूम्रपान परत सुरू केलं होतं. सिगरेटचा एक झुरका घेत ती म्हणाली, 'नोहला जवळचे असे फार कमी मित्र होते. टायनॅन व ॲडकॉक यांच्यासमवेत तो बराच काळ घालवी, परंतु त्यांचे संबंध हे कामापुरते होते. त्याचा एकमेव जिवश्चकंठश्च दोस्त म्हणजे डोनाल्ड रॅडेनबॉग. पण तोही बिचारा तुरुंगात खितपत पडलाय.'

आधी डोनाल्ड रॅडेनबॉग नावाचा काही बोध कॉलिन्सला झाला नाही. त्यानं आठवायचा प्रयत्न केला तेव्हा वृत्तपत्रात झळकलेल्या ठळक बातम्या त्याच्या डोळ्यांसमोर उभ्या राहिल्या. तो म्हणाला, 'मला नेमकं आठवत नाही, पण २–३ वर्षांपूर्वी वर्तमानपत्रात ते सगळं प्रकरण आलं होतं. कोठल्यातरी पैशाच्या लफड्यात डोनाल्डला पकडलं होतं...'

'मला सर्व तपशील आठवत नाही. परंतु त्या प्रकरणात डोनाल्डला शिक्षा देणं म्हणजे संन्याशाला सुळावर चढवण्याचा प्रकार झाला. डोनाल्ड वॉशिंग्टन येथे वकिली करत असे. पुढे तो राष्ट्राध्यक्षांचा एक मदतनीस म्हणून काम करू लागला. सरकारची कंत्राटे घेणाऱ्या बड्या कंपन्यांकडून दहा लाख डॉलर्स उकळण्याचा आरोप डोनाल्डवर ठेवण्यात आला. खरं म्हणजे निवडणूक निधीसाठी बेकायदा रीतीनं हे पैसे जमा करण्यात आले होते. एफ्. बी. आय. नं या प्रकरणी हायलँड नावाच्या इसमाला पकडलं. परंतु तो सरकारच्या बाजूचा साक्षीदार झाला व त्यानं सारा दोष डोनाल्डवर ठेवला. डोनाल्ड पूर्णतया निष्पाप असूनही त्याला १५ वर्षांची सजा झाली. लेविसबर्ग तुरुंगात त्याला ठेवलाय. ही शिक्षा होण्याआधी बॅक्स्टर व तो घनिष्ठ दोस्त होते.'

'रॅडेनबॉगला 'आर डॉक्युमेंट' बद्दल काही ठाऊक असेल असं वाटतं तुम्हाला?'

'मी नक्की सांगू शकत नाही. परंतु टायनॅननंतर जर कोणाशी तो बोलला असेल, तर ते डोनाल्डशीच. तू ॲटर्नी जनरल आहेस तेव्हा तुरुंगात जाऊन डोनाल्डची भेट घेणं तुला कठीण नाही. मी त्याला पत्र लिहून सहकार्य दे असं कळवीन.'

'मी आठवड्याभरात भेटायला येईन असं डोनाल्डला कळवा. बरं झालं, तुम्ही ही माहिती दिली. थँक्स! कधी काही काम असेल तर अवश्य फोन करा,' एवढं बोलून कॉलिन्सनं तिचा निरोप घेतला.

मोटारीनं परतत असता कॉलिन्सच्या मनात एकच विचार घोळत होता. 'आर डॉक्युमेंट' बद्दल टायनॅनला विचारणं अपरिहार्य होतं. पण ते विचारावं कसं, असा प्रश्न त्याला पडला होता. ◻

दुसऱ्या दिवशी सकाळी साडेदहा वाजता जे. एडगर हूव्हर इमारतीतील सातव्या मजल्यावरील टायनॅनच्या ऑफिसशेजारील परिषद दालनात कॉलिन्सनं त्याची भेट घेतली. टायनॅनला त्याच्या ऑफिसात भेटावं असं कॉलिन्सनं ठरवलं होतं. त्या निमित्तानं बॅक्स्टरच्या फायलीचं कॅबिनेट तिथं आहे की काय, हे त्याला पाहायचं होतं. परंतु लिफ्टमधून बाहेर पडताच हॉलपाशीच टायनॅननं त्याचं स्वागत केलं व आपल्या ऑफिसच्याऐवजी परिषद दालनात त्याला तो घेऊन गेला. टेबलाजवळील मुख्य खुर्चीत त्यानं कॉलिन्सला बसायला लावलं व त्याच्या उजवीकडील खुर्चीत तो बसला.

त्याची सेक्रेटरी चहा–कॉफी आणून देत होती. तिच्याशी टायनॅन प्रसन्नपणे बोलत होता. फादर डुबिन्स्कीला भेटल्यापासून टायनॅनविषयी कॉलिन्सला संशय येत होता. परंतु आता ऑफिसात एकूण त्याचं वागणं पाहून एफ. बी. आय. चा हा डायरेक्टर वाईट इसम असणं शक्य नाही. फादरनं गैरअर्थ तरी लावला असावा, अथवा अतिशयोक्ती केली असावी असं कॉलिन्सला वाटलं.

आपल्या सेक्रेटरीला टायनॅन म्हणाला, 'आणि हे बघ, बेथ, आता

**आर डॉक्युमेंटबद्दल टायनॅनला विचारणं अपरिहार्य होतं. पण ते विचारायचं कसं?**

आम्हाला मध्ये डिस्टर्ब करायचं नाही.' तिनं जाताना दार लावून घेतलं. मग टायनॅन कॉलिन्सला म्हणाला, 'बोल ख्रिस, मी तुझ्यासाठी काय करू शकतो?'

'लॉस एंजल्स येथील भाषणाची मी तयारी करतोय.कॅलिफोर्नियातील गुन्ह्यांसंबंधी एफ. बी. आय. नं पाठवलेली ताजी आकडेवारी मी त्यात समाविष्ट करतोय.'

'हो, कालच मी तुला ती पाठवली. जरा त्यावर जोर दे. कॅलिफोर्नियात गुन्ह्यांचे प्रमाण सर्वांत जास्त आहे. तेव्हा घटनात्मक मदतीची तुम्हाला जास्त गरज आहे असं तिथल्या लोकांना पटवून दे.'

आपल्या पुढ्यातील कागद पाहत कॉलिन्स म्हणाला, 'इतर राज्यांच्या तुलनेनं कॅलिफोर्नियातील गुन्ह्यांची ही आकडेवारी जरा जास्तच वाटतीय. ही आकडेवारी अगदी अचूक आहे ना?'

'कॅलिफोर्नियातील पोलिसांनीच ही आकडेवारी दिलीय. तू तुझ्या भाषणात त्यांनी दिलेली माहितीच वापरणार आहेस.'

'ठीक आहे. पाया भरभक्कम आहे की नाही, एवढंच मला जाणून घ्यायचं.'

'पाया एकदम मजबूत आहे. पस्तिसाव्या घटनादुरुस्तीची भलावण करण्यासाठी हा आकडेवारीचा पाया चांगला मजबूत पडेल.'

कोमट झालेल्या चहाचा एक घुटका घेऊन कॉलिन्स म्हणाला, 'मी घटनादुरुस्तीबद्दल बोलणारच. परंतु ते 'जादा' होणार नाही याची काळजी मी घेणार आहे. टी. व्ही. वर वादात भाग घेणं मला आवडणार नाही. खरं म्हणजे हे घटनादुरुस्ती विधेयक, त्याचे परिणाम याचा अभ्यास करायला मला वेळच मिळालेला नाही.'

'तू कशाप्रकारे हा विषय हाताळशील याबद्दल मला शंका नाही. घटनादुरुस्तीबद्दल जितकं ठाऊक असायला हवं तितकं तुला माहीत आहे.'

'पण कदाचित–' काहीसा चाचरत कॉलिन्स म्हणाला, 'कदाचित मला सर्व ठाऊक नसेल.'

टायनॅननं भुवया उंचावून विचारलं, 'आता आणखी काय राहिलंय् माहीत असल्यासारखं?'

कॉलिन्सला हीच वेळ साधायची होती. आता विचारून टाकू या, असं ठरवून तो म्हणाला, 'या घटनादुरुस्तीला काहीतरी पुरवणी आहे! 'आर डॉक्युमेंट' नावाची. त्याबद्दल काय? पस्तिसाव्या घटनादुरुस्तीशी ही पुरवणी कितपत निगडित आहे?'

कॉलिन्सच्या चेहऱ्यावर निरागस उत्सुकतेचा फक्त भाव होता. टायनॅननं भुवया उंचावल्या. त्याचे गडद डोळे विस्फारल्यासारखे वाटले. परंतु त्यात कसल्याही भावनेचा अंश नव्हता. एकतर टायनॅन हा उत्कृष्ट नट असला पाहिजे किंवा त्याला 'आर डॉक्युमेंट'बद्दल काहीच ठाऊक नसावं.

कॉलिन्सनं पुन्हा विचारलं, 'आर डॉक्युमेंटबद्दल काय?'

'काय?'

'आर डॉक्युमेंट! मला वाटलं, तुम्ही त्याविषयी मला काही सांगाल. म्हणजे कोणी विचारलं तर, माझी सर्व तयारी असलेली बरी.'

'ख्रिस, तू काय बोलतोयस हे मला उमगत नाही. कोणी सांगितलं तुला? हे आर डॉक्युमेंट आहे तरी काय?'

'मलाही ठाऊक नाही. बॅक्स्टरचे काही जुने कागदपत्र काढीत असता एका मेमोवर आर डॉक्युमेंट असं लिहिलेलं आढळलं.'

'तुझ्याकडे तो मेमो आहे? मला जरा पाहू दे.'

'नाही. इतर काही कागदांबरोबर मी तो फेकून दिला. परंतु माझ्या लक्षात तो राहिला. म्हटलं, तुला त्याबद्दल विचारावं.'

टायनॅननं ठासून सांगितलं, 'नाही. मला त्याविषयी काही माहिती नाही. बहुधा घटनादुरुस्तीबद्दल सांकेतिक शब्द म्हणून बॅक्स्टर 'आर डॉक्युमेंट' हा शब्द वापरीत असावेत. दुसरं काही ते असेल असं मला वाटत नाही. ते काही असो. घटनादुरुस्तीबद्दल तुला आवश्यक ते सर्व काही ठाऊक आहे. त्या आधारे कॅलिफोर्नियात सरळ तू मुसंडी मारू शकतोस. कॅलिफोर्नियात आपला विजय व्हायलाच हवा.'

'हो. माझा त्यासाठीच प्रयत्न आहे.' असं सांगून कॉलिन्स बाहेर पडला.

लिफ्टकडे जाताना तो विचार करत होता. टायनॅननं काहीच सांगितलं नव्हतं. माणूस पक्का बिलंदर होता. एफ. बी. आय. च्या इमारतीसारखाच. मोकळी मोकळी वाटावी पण पोटात अनेक रहस्यं दडलेली. ठीक आहे, कॅलिफोर्नियात टायनॅनबद्दल आणखी काही समजेल, डोनाल्डलाही भेटता येईल. आर डॉक्युमेंटबद्दल काही कळेल.

बॅक्स्टरनं काहीही करून ही 'आर डॉक्युमेंट' नावाची कागदपत्रं उघडकीस आण असं सांगितलंय्. त्यानं आपल्याला अंधाराच्या किल्ल्यात लोटून दिलंय. पण याला कुठंतरी प्रकाशाचं दार असणारच, तेच शोधायला हवं. ◻

टायनॅन आपल्या ऑफिसात अस्वस्थपणं उभा होता. तो हॅरी ॲडकॉकची वाट पाहत होता. तो येताच त्यानं दार लावून घेतलं. 'आताच गेला कॉलिन्स.'

'काय हवं होतं त्याला?' ॲडकॉकनं विचारलं.

'माझ्याशी तो बनवाबनवी करू पाहत होता. लॉसएंजल्स येथे करावयाच्या भाषणाच्या तयारीसाठी मी आलो असं त्यानं सांगितलं. पण त्याला 'आर डॉक्युमेंट'बद्दल मला काही ठाऊक आहे का हे विचारायचं होतं.'

'तुम्हाला ठाऊक आहे ते?'

'छे! तो कशाबद्दल बोलतोय हेच मला कळेना.'

'त्यानं कुठं ऐकलं ते?'

'तेही मला माहीत नाही. बॅक्स्टरच्या जुन्या कागदपत्रात एक मेमो मिळाला, त्यावर म्हणे लिहिलं होतं, 'आर डॉक्युमेंट!' माझी खात्री आहे ही त्याची चक्क थाप होती. तो कॉलिन्स कशाच्या तरी मागे आहे हे नक्की.'

काही क्षण विचार करून टायनॅन म्हणाला, 'कॉलिन्स काहीतरी गडबड करणार असा मला संशय येतोय. मला वाटलं होतं हा आपला साधा बुद्धिवादी आहे, पण चलाख दिसतो. मला बनवायचा प्रयत्न केलान् त्यानं! पण ही इमारत जशी हूव्हरचं स्मारक आहे, तसं मला माझं स्मारक म्हणून ही घटनादुरुस्ती व्हायला हवीय. दुसऱ्या कशासाठी नाही, केवळ एवढ्या घटनेसाठी जनतेत मी ओळखला जावं अशी माझी इच्छा आहे.'

'तुमची इच्छा पुरी होईल.' ॲडकॉक म्हणाला.

'हो, पण हे त्या कॉलिन्सलाही कळलं पाहिजे;' असं सांगून टायनॅन म्हणाला, 'मला वाटतं, आपण त्याच्यावर पाळत ठेवू या. विशेषत: कॅलिफोर्नियातील त्याच्या हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवायला हवं. माझ्या डोक्यात काही कल्पना आहेत. आपण बोलू या त्याबद्दल...' ◻

## : प्रकरण चवथे :

वॉशिंग्टनहून कॅलिफोर्नियाला जाण्यास निघण्यासाठी आता दोनच दिवस राहिले होते. टी. व्ही. वर चर्चेत सहभागी होणे, बार असोसिएशनपुढे भाषण करणे, कॅलिफोर्नियातील दोघा ॲटर्नी जनरल्सना भेटणे, आपल्या लाडक्या सॅंट फ्रान्सिस हॉटेलात राहणे, असा सारा बेत ठरला होता. तसेच आपला १९ वर्षे वयाचा मुलगा जोश यालाही तो भेटणार होता. कॉलिन्सला पहिली पत्नी हेलनपासून झालेला हा मुलगा. हेलनने घटस्फोट घेतला व दुसरं लग्न केलं. कॉलिन्सनेही नंतर कॅरनशी विवाह केला. गेल्या आठ महिन्यांत तो जोशला भेटला नव्हता, तेव्हा अपॉइंटमेंट ठरविण्यासाठी त्यानं जोशला फोन केला.

'येत्या गुरुवारी मी सॅनफ्रान्सिस्कोला येतोय,' अशी सुरुवात करून आपल्या येण्याचं कारण त्यानं जोशला सांगितलं.

मग जोशनं विचारलं, 'डॅड, तुम्ही पस्तिसावी घटनादुरुस्ती तुमच्या भाषणात घुसडणार?'

'हो.'

'पण का?'

'ते माझं काम आहे. शासकीय प्रशासनाचाच मी एक भाग आहे.'

'मी त्या घटनादुरुस्तीविरुद्ध लढा देतोय. टोनी पिअर्सच्या गटात मी सामील झालोय. कॅलिफोर्नियात या दुरुस्तीविरुद्ध आम्ही मोहीम उघडणार आहोत.' जोशनं सांगितलं.

'मला वाटतं, तुमचा पराभव होणार. राष्ट्राध्यक्ष आपली सारी शक्ती पणाला लावताहेत...'

राष्ट्राध्यक्ष?' तुच्छतेच्या स्वरात जोश म्हणाला, 'राष्ट्राध्यक्षांचा मेंदू चेंडूसारखा पोकळ आहे, पोकळ! टायनॅनमुळं खरी काळजी आम्हाला वाटते. हा टायनॅन म्हणजे हिटलरची कार्बन कॉपीच आहे!'

'जोश, त्याची इतकी बदनामी करायची गरज नाही. तो कोणीही असेल पण हिटलर नक्की नाही.'

'तुम्ही चुकता आहात. हे मी सिद्ध करून दाखवू शकेन.' जोशनं ठासून सांगितलं.

'याचा अर्थ काय?'

'या घटनादुरुस्तीमागे जे लोक आहेत—म्हणजे तुम्ही नाही— टायनॅन आणि त्याची टोळी. सरकार उलथून पाडायचा प्रयत्न झाला, गंभीर आणीबाणी उद्भवली तर या घटनादुरुस्तीचा वापर करू असे जरी ते सांगत असले, तरी एकदा का ही दुरुस्ती मंजूर झाली की, बऱ्याचशा गोष्टी करायचा त्यांचा विचार आहे.'

'उदाहरणार्थ?'

'ते फोनवर नाही मला सांगता येणार, पण मी पुराव्यासहित माझं म्हणणं पटवून देऊ शकेन.'

'काय सिद्ध करणार?' कॉलिन्सनं आपला राग काबूत ठेवीत विचारलं.

'मी तुम्हाला तेथे घेऊन जाईन. आम्ही त्याचा सारा तपास केलाय. ते पाहिल्याशिवाय तुमचा विश्वासच बसायचा नाही. आमच्या राज्यात मतदान होण्याआधी काही दिवस ही गोष्ट आम्ही जाहीर करणार आहोत, पण तुम्हाला ती आधी दाखवली तर माझे सहकारी आक्षेप घेणार नाहीत. ती गोष्ट पाहून, कोणी सांगावं, तुमचं मत बदलेलही!'

'माझं मन खुलं आहे. मी अवश्य येईन. पण ती 'गोष्ट' आहे कुठे? माझ्यापाशी फारसा वेळ नाहीय्.'

'डॅड, तुमचा वेळ फुकट जाणार नाही. माझ्यासाठी तरी तुम्ही याच.'

कॉलिन्स हा शेवटी एक पिता होता. आपल्या मुलावर त्याचं प्रेम होतं. त्यानं त्याच्यावरोबर जायचं ठरवलं. ◻

सॅक्रॅमेन्टो इथं जोशनं बोलावलं होतं. त्यामुळं सॅनफ्रॅन्सिस्कोला न जाता तो विमानानं सॅक्रॅमेन्टो इथं आला होता. जोश त्याची वाटच पाहत होता. भाड्यानं घेतलेली एक मोटर तेथे तयार होती. दोघे निघाले. मागच्या मोटारीतून होगान येत होता.

वाटेत कॉलिन्सला वाटलं, हा सर्व शोध बहुधा निष्फळ ठरणार. परंतु त्यानं आपल्या मुलाला निरुत्साही केलं नाही. आता गाडी अगदी उजाड भागातून चालली होती. मग एकदम एके ठिकाणी छोटंसं गाव दिसू लागलं. तेथे एका पाटीवर लिहिलं होतं, 'नेव्हल.' मोटर थोडी पुढं गेल्यावर जोशनं ड्रायव्हरला गाडी थांबवायला सांगितलं.

'कुठं आलो आपण?' कॉलिन्सनं विचारलं.

'टूल लेक भागात.' जोशनं हर्षभरित होऊन उत्तर दिलं.

'टूल लेक' हे नाव कॉलिन्सनं ऐकलं होतं. तो आठवायचा प्रयत्न करू लागला इतक्यात जोशच भराभरा सांगू लागला,—

'पर्ल हार्बर' नंतर २ महिन्यांनंतर १९४२ साली छळ-छावण्या उभारण्यात आल्या होत्या. १ लाख १० हजार जपानी अमेरिकन्सना या छावण्यात ठेवलं होतं. त्यांपैकी काही छावण्या इथं होत्या. १८ हजार जपान्यांना इथं ठेवलं होतं.' जपानी अमेरिकनांचा इथं भयंकर छळ केला गेला, अशी माहिती देऊन जोशनं समोर हात करून विचारलं, 'ते समोर चाललेलं बांधकाम दिसतंय्? निरीक्षण मनोरा पुन्हा बांधतायत्. छोटे छोटे तुरुंगही बांधले जातायत्.'

'हे तुझं काहीतरीच. तिथे काहीतरी बांधकाम चाललंय् इतकंच.' कॉलिन्स म्हणाला.

'बांधकाम, पण कसलं ते जरा डोळे उघडून पाहा ना! या जागेभोवती विद्युत्कुंपण कशाला उभारतायत? आणि पहारा ठेवण्यासाठी पुन्हा मनोरा कशाला हवा. येथे पुन्हा आता नवी छळछावणी तयार होते आहे. पस्तिसावी घटनादुरुस्ती अंमलात आली की, मोठ्या प्रमाणावर धरपकड केली जाणार व त्या लोकांना या छावणीत आणून ठेवणार आहेत.'

कॉलिन्सला आश्चर्याचा धक्का बसला. हे कसं शक्य आहे? फुकट मुलाच्या नादी लागून दिवस घालवला. तो म्हणाला, 'वाटेल ते काय बडबडतोस? पुरावा काय याला?'

'आमच्या मार्गानं आम्ही माहिती मिळवलीय् व ती खरी आहे. हा एक सरकारी गुप्त प्रकल्प आहे.'

'हे शक्य नाही,' असं पुटपुटत त्यानं काम चालू होतं तिथल्या एका माणसाला या बांधकामाविषयी विचारलं. 'हा अमेरिकन नौदलाचा एक प्रकल्प आहे. पाणबुड्यांशी संपर्क साधता यावा म्हणून येथे दळणवळणाची साधने उपलब्ध करून दिली जातील,' अशी त्यानं माहिती दिली.

टूल लेकहून परतताना गाडीत कॉलिन्स म्हणाला, 'जोश, कोणती बाजू घ्यायची हे ठरवण्याचा तुला हक्क आहे. पण आरोप करताना जरा जबाबदारीनं करावेत. आता टूल लेकला नौदलाचं काम चाललंय व तू म्हणतोस, तिथं छळ-छावणी उभारतायत म्हणून! नौदलाचं काम चालू आहे हे मी सिद्ध करू शकेन.'

'तुम्ही पुराव्यासह सिद्ध करा. मी माझी चूक मान्य करीन.'

सॅक्रॅमेन्टोला ते पोचले. लॉस एंजलसला जाणारं विमान कॉलिन्सला पकडायचं होतं. त्यानं घाईघाईनंच आपल्या पोराचा निरोप घेतला.

◻

लॉस एंजल्स आंतरराष्ट्रीय विमानतळावर उतरताच तो थेट बेव्हर्ले हिल्स हॉटेलवर गेला. मागच्या बाजूचा तीन खोल्यांचा छोटा बंगला त्याच्यासाठी तयार ठेवण्यात आला होता. त्यानं तोंडावर पाण्याचा फवारा मारला. कपडे बदलले. बेव्हर्ले विलशायर हॉटेलात कॅलिफोर्निया असेंब्लीचा सभासद ओलिन कीफे याला १० वाजताची अपॉइंटमेंट दिली होती आणि आता तर १० वाजून ५ मिनिटं झाली होती.

यावेळी ओक्स हा शरीररक्षक कॉलिन्सबरोबर होता. दोघं गाडीत बसले व सनसेट बुलेवर्ड, विलशायर बुलेवर्डवरून ते बेव्हर्ले विलशायर हॉटेलात येऊन पोचले.

ओलीन कीफे त्याची वाटच पाहत होता. गुन्हेगारीची जी आकडेवारी पाठवली जाते तिच्यात बदल करून ती फुगवून सांगितली जाते असा आरोप कीफेनं एफ. बी. आय. वर केला होता. त्यासंबंधीच तो कॉलिन्सला भेटत होता. युर्कोविच व टोबियास या अन्य दोघा सदस्यांनाही त्यानं बोलावलं होतं. कॉलिन्सशी त्या दोघांची त्यानं ओळख करून दिली.

कॉलिन्स आरामखुर्चीत बसला. इतर दोघे सोफ्यावर स्थानापन्न झाले व कीफेनं कॉफी टेबलाजवळची एक खुर्ची ओढून त्यावर तो बसला. स्कॉच व्हिस्कीनं ग्लासेस भरण्यात आले. कॉलिन्सला भूक लागली होती. सॅंडविचेसची ऑर्डर देण्यात आली होती.

व्हिस्की घेत घेत त्यांच्या बैठकीला सुरुवात झाली. कीफेनं सरळ सरळ विषयालाच हात घातला, 'पस्तिसावी घटनादुरुस्ती मंजूर होण्यासाठी तुमचं खातं ज्या ज्या युक्त्यांचा वापर करते आहे,लांड्यालबाड्या करते आहे त्यामुळे इथले सदस्य वैतागले आहेत.'

'कसल्या लांड्यालबाड्या? मी इथल्या सभासदांच्या मतावर दडपण आणण्यासाठी काहीही केलेलं नाही. ही हमी मी तुम्हाला देतोय.'

'मग दुसरं कोणीतरी या कारवाया करीत असावं. पस्तिसावी घटनादुरुस्ती मंजूर व्हावी म्हणून इथल्या सभासदांना भयभीत केलं जातंय' टोबियसनं सांगितलं.

'हे जर खरं असेल, तर मला त्याची काहीही माहिती नाही. पण तुमचे आरोप संदिग्ध स्वरूपाचे आहेत, नक्की काय ते सांगाना–' कॉलिन्स म्हणाला,

मी सांगतो असं सांगून कीफे म्हणाला, 'ठीक आहे. आता तुम्ही जाहीर केलेली गुन्हेगारीची आकडेवारीच पहा. हे गुन्ह्यांचे आकडे एफ. बी. आय. मुद्दाम फुगवून सांगते आहे. म्हणजे लोक घाबरून जातील व घटनादुरुस्तीला पाठिंबा देतील असं त्यांना वाटतंय. मी स्वतः चौदा पोलिसप्रमुखांना भेटलो. त्यातल्या निम्म्या जणांनी तरी हे मान्य केलं की, आम्ही एफ. बी. आय. ला पाठवलेली गुन्हेगारीची आकडेवारी व न्यायखात्याने प्रसृत केलेली आकडेवारी यात बरीच तफावत आहे. कोणीतरी या आकडेवारीत फेरफार करतंय हे निश्चित.'

हादरलेल्या कॉलिन्सनं विचारलं, 'हा तुमचा आरोप अत्यंत गंभीर आहे. तुमच्याकडे या पोलीस अधिकाऱ्यांचं काही लेखी निवेदन आहे?'

'नाही. माझ्याकडे तसं लेखी काही नाही,' असं सांगून कीफे म्हणाला, 'असं लेखी कोण देणार? शेवटी एफ. बी. आय. ला कोण दुखावणार? या प्रकरणात तुमचा काही हात नाही हा तुमचा शब्द जसा आम्ही मानला तसं ही एफ. बी. आय. ची लांडीलबाडी आहे हे तुम्ही मान्य करावं.'

'मी केलही असतं मान्य. पण केवळ ऐकीव पुराव्यावर कसा विश्वास ठेवणार? त्या आधारे मी डायरेक्टर टायनॅनकडे जाऊन याचा जाब त्याला विचारू शकत नाही. आता तुम्ही जर या पोलिसांकडून काही लेखी मिळवू शकत असाल–'

असाहाय्यपणे कीफे म्हणाला, 'ते शक्य नाही. मी खूप प्रयत्न केला, पण त्याचा काही उपयोग झाला नाही.'

'मी बघतो प्रयत्न करून. ॲटर्नी जनरलकडे ते लेखी तक्रार देतीलही कदाचित. काय बरं नावं आहेत त्या पोलीस अधिकाऱ्यांची?'

'आत्ता सांगतो,' असं म्हणून कीफेने टेबलावरची आपली तपकिरी ब्रीफकेस उचलली. इतक्यात दारावरची घंटा वाजली. त्यानं जाऊन दार उघडलं. वेटरनं सॅंडविचेस आणले होते. तो गेल्यावर कीफेने ब्रीफकेस उघडली.

खरं तर कॉलिन्सची भूक मेली होती, पण आता खाल्लं नाही तर थोड्या वेळानं भूक लागेलच असं वाटून त्यानं एक सॅंडविच उचलला. कीफेने त्याला ज्या आठ पोलीसअधिकाऱ्यांनी मुलाखती दिल्या त्यांची नावं, पत्ते व फोन नंबर्स दिले. मग कीफे म्हणाला,

'तुमच्या खात्यातलं कुणीतरी कॅलिफोर्नियात भीतीचं वातावरण निर्माण करू पाहतं आहे. कुठल्याही परिस्थितीत ही ३५ वी घटनादुरुस्ती आमच्या घशाखाली उतरवायचा त्यांचा प्रयत्न आहे. केवळ या आकडेवारीतच फेरफार करतात असं नाही, तर वॉशिंग्टनचं कोणीतरी आमच्या जीवनातच हस्तक्षेप करू पाहतं आहे.'

'म्हणजे म्हणायचंय काय तुम्हाला?' कॉलिन्सनं विचारलं.

'असेंब्लीच्या इथल्या काही सदस्यांना सरळ सरळ ब्लॅकमेल करायचा प्रयत्न चालू आहे.'

ब्लॅकमेल हा शब्द ऐकताच कॉलिन्सला आठवलं की, फादर ड्रुबिन्स्कीनंही हाच शब्द वापरला होता आणि आता हा कॅलिफोर्नियाचा सदस्यही हाच शब्द वापरतो आहे. तो नीट लक्षपूर्वक ऐकू लागला.

कीफे सांगू लागला, 'ज्यांनी घटनादुरुस्तीबद्दल अनुकूल वा प्रतिकूल मत प्रदर्शित केले नाही त्यांच्याबद्दल हे *ब्लॅकमेलिंग* चालू आहे. सदस्यांच्या खाजगी जीवनातील काहीतरी बदनामीकारक प्रसंग उकरून काढन त्याच्या जोरावर दमबाजी चालू आहे. आता या युर्कोविचनाच विचारा की.'

युर्कोविच म्हणाला, 'आठ वर्षांपूर्वी मी दारूड्या होतो. नंतर मला उपचारासाठी एका सॅनिटोरियममध्ये ठेवलं होतं. मग मी खडखडीत बरा झालो. तेव्हापासून माझं सगळं व्यवस्थित चालू आहे, पण परवा पार्कहिल व नॉटन नावाचे एफ. बी. आय. चे दोघे एजंट माझ्या घरी येऊन थडकले. तुम्ही घटनादुरुस्तीस पाठिंबा द्या असं त्यांनी सुचविले. मी असं केलं नाही तर एकेकाळी मी सॅनिटोरियममध्ये उपचारासाठी होतो हे जाहीर केलं जाईल अशी धमकी मला त्यांनी दिली. आता माझ्यापुढं पर्यायच नाही. मला अनुकूल मतच द्यायला हवं.'

'माझ्याही पुढे काही पर्याय नाही.' असं तेथे बसलेला दुसरा सदस्य टोबियास म्हणाला.

'तुम्हालाही येऊन दम दिलाय?' कॉलिन्सनं विचारलं.

'जवळजवळ तसंच म्हणा. एफ्. बी. आय. चे एजंट माझ्याकडे आले नाहीत. माझी एक मैत्रीण आहे. तिच्याकडे ते गेले. आता मी पडलो मुलंबाळं असलेला विवाहित माणूस. माझ्या बायकोचं व माझं केव्हाच फाटलंय म्हणा. पण मुलांसाठी आम्ही एकत्र राहतोय. आणि सामाजिक प्रतिष्ठेसाठीही ते आवश्यक आहे. माझ्या मैत्रिणीची भानगड कोणालाही ठाऊक नव्हती. पण गेल्या आठवड्यात एफ्. बी. आय. चे लोक तिच्याकडे गेले. आणि मग सहज माझी चौकशी केली. मी काही सरकारी माहिती तिला सांगतो काय याचीही चौकशी केली. आता हे सारं मुद्दामच केलं असेल असं नाही. पण मी घटनादुरुस्तीस पाठिंबा द्यावा असं त्यांना सुचवायचंय हे नक्की.'

जोरजोराने मान हलवीत कॉलिन्स म्हणाला, 'विश्वासच बसत नाही यावर. माझ्या खात्याचा यात काही संबंध नाही. राष्ट्राध्यक्षांपासून ते टायनॅनपर्यंत कोणीही ही मोहीम हेतुपुरस्सर चालविली असू शकेल. मला तपास करायला हवा.' ◘

*बैठक संपवून कॉलिन्स बेवर्ले* हिल्स हॉटेल येथे परतला. काऊंटरवरून त्यानं बंगल्याची चावी घेतली. त्याच्यासाठी एक निरोपही होता. तासापूर्वी जोशनं फोन केला होता. टूल लेक येथील नौदलाच्या प्रकल्पाविषयी सरकारी कागदपत्रात कोठेही उल्लेख नाही. फक्त प्रोजेक्ट सॅग्विनचा उल्लेख आहे असं त्यानं कळवलं होतं.

टूल लेकसंबंधी चौकशी करण्याचं कॉलिन्स विसरूनच गेला होता. हॉटेलच्या पोलो लाऊंजमधील एका बूथवर जाऊन त्यानं डेप्युटी अॅटर्नी जनरल एड् ब्रेडर यांस घरी फोन केला. तेव्हा व्हर्जिनियात पहाटेचे तीन वाजले असणार. फोनवर झोपेनं पेंगुळलेला आवाज आला.

'हॅलो, आता हा रॉंग नंबर आहे असं सांगू नका.'

'एड्, अरे हा नंबर बरोबर आहे. मी बोलतोय, ख्रिस. अरे, एक चौकशी करायचीय महत्त्वाची. सकाळी उठल्या उठल्या काम कर हे. पाणबुड्याशी संपर्क साधण्यासाठी दळणवळणाचा इ एल एफ अथवा प्रोजेक्ट सॅग्विन नावाचा एक प्रकल्प आहे. उत्तर कॅलिफोर्नियात त्याचं बांधकाम चालू आहे. त्याबद्दल जरा अधिक माहिती काढून मला फोन कर बघू. अच्छा!'

फोन बूथमधून तो बाहेर पडला. मागल्या बाजूला बंगल्याकडे तो गेला. त्याच्यासमवेत आलेल्या शरीररक्षकाने त्याचा निरोप घेतला. कॉलिन्स अत्यंत थकला होता. दार उघडून तो आत गेला व कपडे उतरवू लागला. कीफे, युर्कोविच व टोबियास यांच्याबरोबर झालेल्या बैठकीतील संभाषण त्याला आठवत होतं. ही मंडळी खरं सांगत असतील. पण त्याची शहानिशा करून घ्यायला हवी. त्यांनी जे काही सांगितलं ते *राष्ट्राध्यक्षांना किंवा टायनॅनला किंवा अॅडकॉकला* सांगावं का? बघू. आता उद्या सकाळपर्यंत ठरवू. आपला शर्ट काढीत तो अंधाऱ्या बेडरूममधून तसाच बाथरूममधे गेला व तेथला लाइट त्यानं लावला. तोंड धुतलं. दात घासले. डोळ्याभोवतालची वर्तुळं न्याहाळली. तो पायजमा शोधू लागला. दारामागं त्याला तो सापडला नाही. बहुतेक नोकरानं पलंगावर उशीखाली ठेवला असावा असं वाटून तसाच नग्नावस्थेत अंधारातून चालत चालत पलंगाकडे तो जाऊ लागला. बाहेरच्या खोलीचं दार किंचित किलकिलं झालं होतं. प्रकाशाची तिरीप पलंगावरील पायजम्यावर पडली होती. पायजमा घ्यायला ख्रिस्तोफर खाली वाकला इतक्यात त्याच्या मांडीला कसलातरी रेशमी स्पर्श झाला. काय असेल असा विचार करतोय तोच दुसऱ्या हाताचा विळखा त्याच्या मांडीभोवती पडला. त्याच्या काळजाचे ठोके वाढले. तो ओरडला, 'कोण आहे?'

'झोपायला ये ना डार्लिंग?' एक लाडिक आवाज आला.

एका हातानं तिचे हात झटकीत दुसऱ्या हातानं त्यानं दिवा लावला. एक विशीतली तरुणी तिथं पहुडली होती. ती हसत हसत म्हणाली, 'मी किटी. मला वाटलं तुम्ही येताय की नाही.'

तिचा हात बळजबरीनं दूर करीत कॉलिन्स म्हणाला, 'कोण आहेस तू? तुझी काहीतरी चूक झालेली दिसतेय. तू चुकीच्या खोलीत आलेली दिसतेस.'

'अं. हं. याच बंगल्याचा नंबर मला दिला होता. आणि मिस्टर कॉलिन्सची वाट बघायला सांगितलं होतं.'

त्यानं विचारलं, 'कोणी सांगितलं तुला इथं यायला?'

'तुमच्या मित्रानं पाठवलेली ही एक गोड भेट आहे.'

'कुठला मित्र?'

'त्यानं नाव नाही सांगितलं. असे लोक कधी नाव नाही सांगत. मात्र त्यानं २०० डॉलर्स रोख दिलेत. तो मित्र म्हणाला, हे तुम्हाला

**राष्ट्राध्यक्षांपासून ते टायनॅनपर्यंत कोणीही ही मोहीम हेतुपुरस्सर चालवली असू शकेल.**

सरप्राइज आहे आणि ते तुम्हाला आवडेल. तेव्हा आता या ना.'

'पण तू आत आलीस कशी?'

'इथले काही नोकर माहीत आहेत मला. मी त्यांना बक्षिसीही चांगली देत असते.'

त्याला नीट निरखीत ती एकेरीवर येत म्हणाली, 'तू किती छान आहेस! चल या किटीबरोबर झोपायला. तुझा वेळ चांगला जाईल अशी हमी देते मी. मी रात्रभर राहणार आहे.'

तिला खसकन ओढीत तो म्हणाला, 'ताबडतोब येथून चालती हो. एक क्षणही इथं थांबू नकोस. कोणीतरी हा चावटपणा चालव-लेला दिसतोय.'

'मला पैसे दिलेत.'

'कपडे घाल आणि तोंड काळं कर इथून.' दोन्ही हातांनी तिला उठवीत तो म्हणाला.

'मला कधी कोणी अशी वागणूक दिली नव्हती.'

'मी देतोय ना पण आता.' पायजमा ओढीत तो म्हणाला, 'मी बाथरूममधून येईपर्यंत तू इथून गेली असली पाहिजेस.'

पायजमा घालून तो बाहेर आला. तेव्हा ती स्कर्ट चढवीत होती.

'आटप, आटप लवकर!'

'सुरुवातीला तू असं वागशील अशी मला तुझ्या मित्रानं कल्पना दिली आहे. तेव्हा आता थट्टा पुरे ना.' ती लाडं लाडं म्हणाली.

कॉलिन्सला राग अनावर झाला. त्यानं जवळजवळ तिला पुढच्या खोलीपर्यंत ढकललं व दारापर्यंत नेलं. त्याचा श्वासोच्छ्वास जोराने चालू होता. तो म्हणाला,

'सॉरी. कुणीतरी तुझा असा वापर करायचा प्रयत्न केलाय. गुड-नाईट.'

आणि त्यानं दार उघडलं. त्याला ओलांडून ती दाराबाहेर पडली. ती पुढचातून जात असता बंगल्याच्या कुंपणाखालून एक आकृती उभी राहत असलेली त्याला दिसली. त्या माणसाच्या हातात कॅमेरा होता.

कॉलिन्सच्या डोक्यात एकदम वीज चमकल्यासारखं झालं. तो दारामागे लपला. पण त्या गडबडीत तो खोलीत पडला. मात्र दार बंद झालं. हे घडत असतानाच कॅमेऱ्याच्या फ्लॅशचा प्रकाश चमकून गेला. कोणीतरी फोटो काढला होता. परंतु कॉलिन्सचा फोटो कॅमेरामनला घेता आला नाही. बाहेर उभ्या असलेल्या किटीचाच फोटो त्याला मिळाला असावा.

या प्रसगानं कॉलिन्स जबरदस्त हादरला. त्यानं दार लॉक करून घेतलं आणि मद्याचा प्याला तोंडाला लावला. ◻

आज दिवसभरात जे काही घडलं त्याबद्दल तो अनिश्चित होता. तरी आत्ता रात्री जे घडलं त्याबद्दल मात्र त्याला अगदी सुस्पष्ट कल्पना आली. कोणा जुन्या मित्रानं केलेला फाजिलपणा नव्हता. हे भयंकर होतं-महाभयंकर. सैतानी. कुणीतरी त्यास मुद्दाम कचाट्यात पकडण्याचा प्रयत्न केला होता.

पण कोणी केला असेल हा प्रयत्न? ३५ व्या घटनादुरुस्तीच्या


॥ श्री ॥

# त्रिमा शुगर लि., पुणे–३०

( दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि., च्या संपूर्ण मालकीची कंपनी )

**जैशी पूर्व दिशेच्या राउळीं। उदया येतांचि सूर्य दिवाळी।**
**कीं येरींही दिशां तियेचि काळीं। काळिमा नाहीं।**

– श्री ज्ञानेश्वरी

कंपनीने ४३ व्या वर्षात यशस्वी पदार्पण केले आहे. त्यानिमित्त भागधारक, ठेवीदार, व्यापारीवर्ग व हितचिंतकांचे बहुमोल आर्थिक सहाय्याबद्दल कृतज्ञतापूर्वक आभार

**साखरेचा नवीन हंगाम ऑक्टोबरच्या शेवटच्या आठवड्यात सुरू होईल!**

आमचे भागधारक, ठेवीदार व हितचिंतकांना दिवाळी व नूतन वर्ष सुख-समृद्धीचे व भरभराटीचे जावो.

फोन : ४४४९१ – पुणे.
टेलेक्स : ३८८ – पुणे.

**ज. चं. आगाशे**
चेअरमन

पाठिराख्यांनी. छे! अशक्य! अजून जाहीररीत्या तरी तो त्यांच्याच बाजूचा होता. मग घटनादुरुस्तीच्या विरोधकांनी केला असावा? तेही तितकंच असंभवनीय! पियर्स किंवा कीफे या थरापर्यंत जाणं शक्य नाही.

त्यानं मद्याचा आणखी एक घोट घेतला. सकाळ उजाडण्याची तो वाट पाहू लागला. त्याला वाटलं, दिवसाउजेडी प्रत्येक गोष्टीला जास्त अर्थ असतो.

¤

काल घडलेल्या घटनांनी कॉलिन्स अस्वस्थच होता. कॅलिफोर्निया असेंब्लीचा सदस्य कीफे यानं आठ पोलीस अधिकाऱ्यांची नावं, टेलिफोन क्रमांक दिले होते. त्यांतल्या एकेकाला फोन करायला कॉलिन्सनं सुरुवात केली. 'एफ. बी. आय. खरोखरच गुन्ह्यांचे आकडे फुगवून मांडते का?' असं या अधिकाऱ्यांना त्यानं विचारलं. ॲटर्नी जनरल आपल्याला हे विचारतायत असं समजल्यावर प्रत्येक पोलीस अधिकारी टाळाटाळ करू लागला. काहीतरी सबब सांगू लागला. एफ. बी. आय. च्या पाशवी सत्तेचा दराराच असा होता की, कोणाचीही तक्रार करायची हिंमत नव्हती. केवळ तिघा पोलीस अधिकाऱ्यांची ही गत पाहून इतरांना फोन करायचा बेतच त्यानं सोडून दिला.

आता काय करावं? असेंब्लीचे सदस्य युर्कोविच व टोबियास यांनी एफ. बी. आय. एजंटांची नावं सांगितली होती. युर्कोविचला पार्कहिल व नॉटन हे दोघे एजंट येऊन धमकी देऊन गेले होते, तर टोबियासच्या मैत्रिणीला भेटून गेलेल्या एजंटाचं नाव होतं लिंडेन मेयर. ही माहिती तपासून पाहू या, असा विचार करून कॉलिन्सनं आपली सेक्रेटरी मॅरिॲन हिला फोन केला. या तिघा एजंटांनी कॅलिफोर्नियात कोणाची भेट घेतली का, अशी माहिती काढण्यास त्यानं तिला सांगितलं. थोड्याच वेळात तिचा फोन आला. पार्कहिल, नॉटन व लिंडेन मेयर नावाचे एफ. बी. आय. चे एजंट कॅलिफोर्नियातच काय, पण सबंध देशात नाहीत! अशी माहिती तिनं दिली.

कॉलिन्सला याचा अर्थच समजेना. युर्कोविच व टोबियास यांनी एजंटांची नावं चुकीची लिहून घेतली असतील? पण ते अशक्यच होतं. किंवा कॉलिन्सला त्यांनी थाप मारली असेल? त्यात त्यांचा काहीच मतलब नव्हता. तेव्हा तेही शक्य नाही.

किंवा याचा आणखी एक भयंकर अर्थ होऊ शकतो. एफ. बी. आय. च्या एजंटांचं एक गुप्त पथक असावं. एफ. बी. आय. च्या रजिस्टरमध्ये त्यांची नावं नसतील. या पथकातील एजंट्स कॅलिफोर्नियातील सभासदांवर दडपण आणायच्या मोहिमेवर असावेत. असंच असावं बहुतेक.

हीच शक्यता त्याला अधिक जवळची वाटली. कॉलिन्स हा तसा कल्पनेचे मनोरे बांधणारा गृहस्थ नव्हता. तो पक्का वास्तववादी होता. परंतु दिवंगत ॲटर्नी जनरलने 'आर डॉक्युमेंट' व त्याच्या धोक्याचा उल्लेख केल्यानं कोठेतरी, काहीतरी भयंकर, पाशवी चालू आहे, असं त्याला वाटत होतं. त्यामुळं एफ. बी. आय. चं गुप्त पथक असावं ही शक्यता त्याचं मन नाकारीत नव्हतं.

मनाच्या या संभ्रमावस्थेतच कपडे करून बाहेर जायच्या तयारीला तो लागला. टी. व्ही. वरील चर्चेत भाग घेणे, नंतर बार असोसिएशनपुढे भाषण असे दोन महत्त्वाचे कार्यक्रम होते. त्यानं सूट चढवला. इतक्यात फोन वाजला. वॉशिंग्टनहून एड श्रेडर बोलत होता. त्याला पहाटे उठवून आपण 'टूल लेक' संबंधी चौकशी करायला सांगितलं होतं, हे कॉलिन्स साफ विसरून गेला होता.

अमेरिकन नौदलाचा ई. एल. एफ. किंवा सॅन्गविन प्रकल्प हा तीन वर्षांपूर्वीच पुरा झाला. या प्रकल्पातील इमारतींचं आता कुठंही बांधकाम चालू नाही किंवा आहेत त्या इमारतींची दुरुस्ती चालू नाही. 'टूल लेक'च्याजवळ तर नौदलाची कसलीही इमारत नाही, अशी माहिती त्यानं दिली. पेन्टॅगॉनमधील एका वरिष्ठ प्रवक्त्याकडून त्यानं ही माहिती मिळवली होती.

खुद्द कॉलिन्सनं 'टूल लेक' येथे एका अधिकाऱ्याला विचारलं असता त्यानं हे नौदलाचं केंद्र असल्याचं सांगितलं होतं आणि आता श्रेडर सांगत होता की, तिथं नौदलाचं काहीही नाही!

आपला मुलगा जोश, असेंब्लीचे सभासद कीफे, युर्कोविच, टोबियास हे सारं खरं बोलत असावेत, असं प्रथमच कॉलिन्सला वाटलं.

टी. व्ही. स्टुडिओकडे मोटारने जात असता त्यानं साऱ्या घटनांचा आढावा घेतला. धोकादायक आर डॉक्युमेंट, एफ. बी. आय. गुन्ह्यांची आकडेवारी वाढवून सांगते, टूल लेक इथं एक गुप्त तुरुंग उघडला जातोय्, हे सारं त्याच्या डोळ्यांपुढं उभं राहिलं आणि मग काल रात्री आपल्या बंगल्यावर घडलेला प्रसंग त्याला आठवला. त्याच्या खोलीत मुद्दाम एका तरुणीला पाठवून त्याला फशी पाडण्याचा व पुढे ब्लॅकमेल करण्यासाठी या घटनेचे फोटो काढण्याचा प्रयत्न झाला होता!

संशयाचं पिशाच्च त्याचा पिच्छा सोडेना. आपल्या भोवतालच्या माणसांवर, विशेषत: पस्तिसाव्या घटनादुरुस्तीच्या पुरस्कर्त्यांवर विश्वास टाकू नये असं त्याला वाटलं. घटनादुरुस्तीचाही त्याला संशय येऊ लागला. तिचं समर्थन करायचं त्याच्या जिवावर आलं. पोटात खड्डा पडला. त्याला वाटलं, दूरवर पळून जावं.

परंतु आता ते शक्य नव्हतं. त्याची मोटार टी. व्ही. स्टुडिओच्या आवारात शिरत होती.

¤

टी. व्ही. स्टुडिओच्या मेकपरूममध्ये आरशासमोर कॉलिन्स बसला होता. त्याला स्वत:चं प्रतिबिंब आरशात दिसत होतं. पण ते




नुसतं प्रतिबिंब नव्हतं. स्वतःच्या नकळत तो आपल्या मनाचंच प्रतिबिंब त्यात पाहू लागला. माणसाच्या स्वातंत्र्याविरुद्ध, मूलभूत हक्काविरुद्ध असलेल्या राष्ट्राध्यक्षांच्या बाजूला आपण का आहोत? घटनादुरुस्तीचं समर्थन करण्याचा झेंडा घेऊन आपण अग्रभागी का मिरवतो आहोत? आपल्यातली सदसद्‌विवेकबुद्धी गेली कुठं? आपण तिला गुदमरवून टाकली? नेहमी सत्याची चाड बाळगण्याची, शास्त्रशुद्ध विचार करून वागण्याची आपली वृत्ती जळून खाक झाली? केवळ महत्त्वाकांक्षेमुळं आपण हे सारं करतो आहोत का? त्याच्या मेंदूला मुंग्या आल्यासारखं झालं. मेकपमन त्याच्या चेहऱ्यावर क्रीमचे थर थापीत असला तरी त्याला, त्याआडचा आपला चेहरा विसरता येत नव्हता.

इतक्यात 'सर्च फॉर ट्रुथ' कार्यक्रमाची निर्माती मोनिका इव्हॅन्स तिथं आली. तिच्याबरोबर टोनी पियर्स होता. त्याच्याबरोबर चर्चेत भाग घेणारा, घटनादुरुस्तीला कडाडून विरोध करणारा टोनी! मोनिकानं त्याची ओळख करून दिली. टोनीला पाहून कॉलिन्सची निराशाच झाली. त्याला वाटलं होतं टोनी हा खलनायकासारखा असेल. पण तो तर मृदू स्वभावाचा, छान गोड इसम होता. त्याला पाहून कॉलिन्सचा मूडच गेला. आपली तर शत्रूशी गाठ पडेल अशी त्याची अपेक्षा; परंतु आता आपणच आपले शत्रू आहोत की काय, असा संभ्रम त्याला पडला.

ते स्टुडिओत गेले. कार्यक्रम सुरू झाला. निवेदकानं त्यांची ओळख करून दिली. कॉलिन्सला एक प्रश्न विचारण्यात आला. त्यानं उत्तर दिलं. अमेरिकेतील गुन्ह्यांची आकडेवारी तो सांगू लागला. १९७५ साली १ लाख अमेरिकनांमागे १० जणांचा खून झाला. आता हे प्रमाण १ लाखामागे २२ इतकं झालंय! हिंसा, खून, मारामारी यांची तुफान लाट उसळलीय्. ती थोपवण्यासाठी पस्तिसावी घटनादुरुस्ती आहे! तो बोलत होता पण त्याला आपला आवाज परका वाटत होता. त्यानं सुरुवातीचं निवेदन संपवलं. मग टोनी पिअर्स बोलू लागला. त्याचं प्रत्येक वाक्य धडाकेबाज होतं. तो सांगत होता, गेली अडीच हजार वर्षं मानव आपल्या स्वातंत्र्यासाठी झगडतोय्. जुलूमशाहीविरुद्ध झुंजतोय्. आपण पस्तिसावी दुरुस्ती मंजूर केली तर, मानवाची ही लढाई इथं अमेरिकेत संपणार आहे. या लढाईत मानव हरणार आहे. एफ. बी. आय. चा डायरेक्टर व त्याची राष्ट्रीय सुरक्षा समिती यांना लहर आली की, क्षणात आपले मूलभूत हक्क बेमुदत स्थगित केले जाणार आहेत.

'बेमुदत नाही,' कॉलिन्सनं चर्चेत हस्तक्षेप करीत म्हटलं. 'फक्त आणीबाणीच्या काळात, तात्पुरतंच, केवळ काही महिन्यांसाठीच.'

पियर्स शांतपणे उत्तरला, 'सुरुवातीला सारे असेच म्हणतात. जगात नेहमी असंच घडलेलं आहे. अल्पकाळापुरतंच आम्ही हे करतो आहोत असं सांगणं ही अशा लोकांची फक्त पहिली पायरी असते. इथंही तसंच कशावरून घडणार नाही? तसं घडलं तर आपले मूलभूत हक्क कायमचे निकालात निघाले असं समजा.' मग टोनीनं अमेरिकेच्या इतिहासात पूर्वीदेखील या ना त्या मार्गानं मूलभूत हक्क स्थगित करण्याचे प्रयत्न कसे झाले आणि त्यामुळे भयंकर प्रसंग कसे ओढवले त्याचा त्रोटक इतिहास कथन केला.

'एवढं झालं तरी लोकशाही जिवंत राहील!' कॉलिन्सनं सांगितलं.

'पण स्वातंत्र्यावर असेच हल्ले होत राहिले तर, एक दिवस लोकशाहीचा अंत होईल. चार्ल्स पेगॉयनं स्वातंत्र्यापेक्षा जुलूमशाही ही अधिक चांगली संघटित असते असं जे म्हटलंय,' ते खरंच आहे. आपल्या घटनेत मूलभूत हक्कांचा अंतर्भाव असतानाही मी मघा सांगितलेल्या त्या भयंकर गोष्टी घडल्या. मग जर हे हक्क काढून टाकले तर, किती अनर्थ ओढवेल ते पाहा! आपली घटना मूलभूत हक्कांच्या तरतुदींसह जगातल्या कोठल्याही घटनेपेक्षा अधिक काळ जिवंत राहिली आहे; तेव्हा आपण आपल्याच हातानं ती उद्ध्वस्त करता कामा नये.'

'पस्तीसावी घटनादुरुस्ती ही देशात शांतता जतन करण्यासाठी आवश्यक आहे ही दुरुस्ती आपण मंजूर केली नाही, तर बॉम्बस्फोट, खून, दंगली वाढतच राहतील. एक दिवस असा उगवेल की, देशच नष्ट होईल, असं सांगून कॉलिन्सनं विचारलं, 'जर देशच राहिला नाही तर तुम्ही मूलभूत हक्क देणार कोणाला?'

'स्वातंत्र्याविना देश असण्यापेक्षा देश नसलेलाच बरा.' असं ठासून सांगत टोनी म्हणाला, 'केवळ हुकूमशाही आणणं हा हिंसाचारावर नियंत्रण ठेवण्याचा एकमेव मार्ग आहे. दुसरेही मार्ग आहेत, लोकांना अन्न, वस्त्र, नोकऱ्या, समानता, न्याय या गोष्टी द्यायला आपण प्रारंभ केला पाहिजे.'

एकदा का मानवी हक्क हिरावून घेतले की मग, काही करता येणार नाही असं सांगून मूलभूत हक्क स्थगित केले की, काय होईल याबद्दल एका लेखकाच्या पुस्तिकेतील मजकूर टोनीनं वाचून दाखवला व हक्क गेले की, सरकार बेमुदत काळपर्यंत तरुणांना सैन्यात ठेवू शकेल. सरकारी धोरणाविरुद्ध आंदोलने करणाऱ्या विद्यार्थ्यांना तुरुंगात टाकलं जाईल, नुकसानभरपाई न देता कोणाही अमेरिकनाची मालमत्ता सार्वजनिक कामासाठी काढून घेता येईल. आपल्या भागातील काँग्रेस सदस्याला जो टीका करणारी पत्रं पाठवील त्याला पोलिसांच्या हवाली केलं जाऊ शकेल. सरकारवर टीका करणारे लेख आपल्या वृत्तपत्रात जे संपादक छापतील त्यांना कधीही अटक केली जाऊ शकेल...

टोनी एकामागून एक वाक्य वाचत होता आणि आपण ही लढाई हरतो आहोत याची बोचरी जाणीव कॉलिन्सला होत होती. मग त्यानं पुढच्या प्रश्नांना कशीबशी उत्तरं दिली, वेळ मारून नेली. शेवटी टी. व्ही. वरच्या कार्यक्रमाची वेळ संपली नि त्यानं सुटकेचा निःश्वास टाकला. घटनादुरुस्तीच्या बाबतीत आपण चुकीच्या बाजूला आहोत, हे त्याला जवळ जवळ पटलं होतं. ◻

तासाभरानंतर अमेरिकन बार असोसिएशनच्या वार्षिक बैठकीत कॉलिन्सचं भाषण होतं. तयार करून आणलेलं भाषण त्यानं पुन्हा चाळलं. जॉर्ज वॉशिंग्टन, थॉमस जेफर्सन आदींचे दाखले देऊन घटनादुरुस्तीचं समर्थन करणारे आपल्या भाषणातले तीन परिच्छेद त्याने कापून टाकले. आता भाषण थोडं सौम्य झालं. त्यात काहीसा लवचिकपणा आला. घटनादुरुस्तीचा मुद्दा चर्चा करायला खुला आहे असं ते भाषण ऐकणाऱ्याचे मत झालं असतं.

भाषणापूर्वी प्रमुख न्यायमूर्ती मेनार्ड यांची भेट कॉलिन्सनं घेतली. कार्यक्रम आटोपल्यावर पाच मिनिटं भेटायची इच्छा त्यानं व्यक्त

केली. मेनार्डनं त्याला लागलीच संमती दिली.

दोघांचीही भाषणं झाली. कार्यक्रम आटोपून कॉलिन्स मेनार्ड यांच्या खोलीवर गेला. वृद्ध मेनार्ड हे अमेरिकेतील आदरणीय व्यक्तींपैकी एक होते. शुभ्र केस, जाडजूड भिवया असलेले मेनार्ड वय झालं असलं तरी तरुण दिसायचे.

कॉलिन्सनं त्यांना विचारलं, 'पस्तिसाव्या घटनादुरुस्तीबद्दल तुमचं मत काय ?'

पाईपमध्यं तंबाखू भरीत मेनार्ड म्हणाले, 'सरकारच्या वतीनं विचारतोयस की, स्वतःहून विचारतोयस ?'

'तुम्हाला हा प्रश्न विचारायला मला कोणी सांगितलेलं नाही. मी स्वतःहूनच विचारतोय.'

पाईप पेटवून तो ओढीत मेनार्ड यांनी क्षणभर विचार केला. कॉलिन्सला निरखलं व मग ते म्हणाले, 'मी या घटनादुरुस्तीच्या विरुद्ध आहे. अशा जालीम कायद्याला माझा विरोध आहे. त्याचा गैरवापर केला गेला तर मूलभूत हक्क गुदमरतील, आपल्या लोकशाहीचे हुकूमशाही राज्यात रूपांतर होईल. आपल्या देशापुढं गंभीर प्रश्न आहेत हे खरं. गुन्हेगारी व अराजक कधी नव्हे इतक्या मोठ्या प्रमाणावर माजलंय हेही खरं, परंतु स्वातंत्र्यात कपात करणं हा त्यावरील कायमचा उपाय नव्हे. गरिबी ही गुन्हेगारीची जननी आहे. गरिबी दूर करा, गुन्हेगारी आपोआप संपुष्टात येईल. सुरक्षितता खरीदण्यासाठी स्वातंत्र्यावर पाणी सोडलं तर मग स्वातंत्र्य व सुरक्षितता हे दोन्ही मिळण्यास तुम्ही पात्र नाही, हे बेंजामिन फ्रँकलिनचं म्हणणं अगदी योग्य आहे. पस्तिसाव्या घटनादुरुस्तीनं तुम्ही सुरक्षितता मिळवू शकाल, परंतु त्यासाठी तुम्हाला स्वातंत्र्याचा सौदा करावा लागेल, तेव्हा माझा याला विरोध आहे.'

'तुम्ही तुमचे हे मत जाहीरपणे का नाही मांडत ?' कॉलिन्सनं विचारलं.

'मी का नाही मांडत ? तू अॅटर्नी जनरल आहेस, तू का नाही घटनादुरुस्तीविरुद्ध बोलत ?'

'मग मी अॅटर्नी जनरल राहणार नाही. दुसरं म्हणजे तुमच्याएवढा मी लोकांना माहीत नाही. येथील असेंब्लीचे सदस्य तुमचं ऐकतील.'

पाईप अॅशट्रेत ठेवत मेनार्ड त्याला अडवीत म्हणाले, 'जरा एक मिनिट. माझा जरा गोंधळ झालाय. तू घटनादुरुस्तीच्या बाजूनं आहेस असा माझा समज होता. तुझ्या आजच्या भाषणातही तू तसं सुचवलंस. तेव्हा...'

'माझं भाषण पूर्वीच तयार झालं होतं व तेही राष्ट्राध्यक्षांच्या देखरेखीखाली. कालपासून या घटनादुरुस्तीबाबत मी फार साशंक झालोय. या दुरुस्तीचा पुढे गैरवापर करतील या कल्पनेचीच मला भीती वाटतेय. या दुरुस्तीचं पुन्हा समर्थन करायची माझ्यावर पाळी आली तर, त्यापेक्षा राजीनामा देणं मी पसंत करीन. परंतु सध्या एक महत्त्वाचं काम मला पुरं करायचं आहे, तेव्हा मी आता राजीनामा देऊ शकत नाही. म्हणून मी तुम्हाला विनंती करतोय की, तुम्ही ही घटनादुरुस्ती हाणून पाडण्यासाठी प्रयत्न करा.'

आपण तसं का करू शकत नाही हे मेनार्ड यांनी कॉलिन्सला समजावून दिलं. ते म्हणाले, 'कोर्टापुढे येऊ न शकणाऱ्या एखाद्या कायद्यासंबंधी न्यायाधीशानं जाहीररीत्या चर्चा, भाषण, किंवा लिखाण करू नये असा संकेत आहे. आता घटनादुरुस्ती मंजूर झाली तर, न्यायमूर्ती या नात्यानं कोर्टात माझ्यावर त्याचा अन्वयार्थ लावायची पाळी येईल. तेव्हा मी तिच्याबद्दल जाहीर चर्चा करू शकत नाही. आता मी राजीनामा दिला तरच या घटनादुरुस्तीविषयी मी जाहीरपणे बोलू शकेन, परंतु इतकं कठोर पाऊल उचलावं इतकी सध्याची परिस्थिती गंभीर आहे असं मला वाटत नाही.'

'परिस्थितीच्या गंभीरतेविषयी खात्री पटली तर, राजीनामा देऊन तुम्ही दुरुस्तीच्याविरुद्ध खंबीरपणे उभे राहाल ?'

'या घटनादुरुस्तीच्या मागील लोक व त्यांचे हेतू वाईट आहेत, त्यामुळे देशाच्या लोकशाहीला ताबडतोब खराखुरा धोका आहे हे मला पटलं तर मी तसं करेनही.'

त्याक्षणी कॉलिन्सला 'आर डॉक्युमेंट'ची आठवण झाली. हे कागदपत्र खरा धोका असण्याची शक्यता होती. ते हाती लागले तर, मुख्य न्यायमूर्तींची खात्री पटेल. त्यानं मेनार्डनाच विचारलं, 'आर डॉक्युमेंट' बद्दल तुम्हाला काही ठाऊक आहे का ?

'आर डॉक्युमेंट ? नाही बुवा. काय आहे ते ?'

'मलाही ते ठाऊक नाही !' असं सांगून कॉलिन्सनं कर्नल बॅक्स्टर यांनी मरताना याबद्दलचा कसा उल्लेख केला व आपण त्याच्या शोधात कसे आहोत, हा सारा इतिहास सांगितला.

'आर डॉक्युमेंट अनिष्टसूचकच दिसतंय मला.' त्याचं म्हणणं एकल्यावर मेनार्ड उद्गारले.

'आर डॉक्युमेंटचा मी तलास लावला, ते उघड केलं आणि ते भयंकर धोकादायक असल्याचं लक्षात आलं तर, मग तुम्ही जाहीरपणे घटनादुरुस्तीविरुद्ध लढाल ?'

'ते त्याच्या स्वरूपावर अवलंबून राहील.'

'ठीक आहे. मी शोध घेणं चालू ठेवीन. मला आर डॉक्युमेंट सापडलं, तर सर्वांत प्रथम मी तुम्हाला कळवीन.'

मेनार्ड उभे राहिले व म्हणाले, 'मी वाट पाहतो. काय होईल ते कळवा. त्यानुसार मला निर्णय घेता येईल.'

त्यांच्या खोलीतून कॉलिन्स बाहेर पडला तेव्हा आपण कोठल्या बाजूचे आहोत हे त्याला समजले होते. आता त्याच्या मनात फारशी अस्पष्टता राहिली नव्हती. ◻

दुसऱ्या दिवशी सकाळी वॉशिंग्टनमधील हूव्हर इमारतीमधील एफ्. बी. आय. च्या कचेरीत दोन माणसं लक्षपूर्वक एक टेप ऐकत होती. ही माणसं म्हणजे व्हर्नान टायनॅन व अॅडकॉक. गेला पाऊणतास ते टेप ऐकत होते व आता ती संपत आली होती.

टेपरेकॉर्डवर संभाषण ऐकू येत होतं.

'या आर डॉक्युमेंटचा मी तलास लावला, ते उघड केलं आणि

## पस्तिसाव्या घटनादुरुस्तीनं तुम्ही सुरक्षितता मिळवू शकाल परंतु त्यासाठी तुम्हाला....

ते भयंकर धोकादायक असल्याचं लक्षात आलं, तर मग तुम्ही जाहीरपणं घटनादुरुस्तीविरुद्ध लढाल ?'

'ते त्याच्या स्वरूपावर अवलंबून राहिल.'

....................................

मग टेप संपली. टेपरेकॉर्डरचं यंत्र चालूच होतं. त्याचा मंद पण सतत आवाज येत राहिला.

टेबलावर जोरानं मूठ आपटीत टायनॅन म्हणाला, 'हरामखोर कुठला. या कॉलिन्सला चांगलाच धडा शिकवतो. आम्हाला हा सुरुंग लावू पाहतोय काय ? पण बच्चंमजी, सुटणार नाहीस माझ्या हातातून. पण मला खरी काळजी वाटतेय ती न्यायमूर्ती मेनार्डची. कॅलिफोर्नियामध्ये जाऊन ३५ व्या घटनादुरुस्तीबद्दल तो जर बोंबलत सुटला तर आपली खरी पंचाईत होईल.'

अॅडकॉकनं टेपरेकॉर्डर बंद केला व तो म्हणाला, 'पुरावा असल्याशिवाय मी काही बोलणार नाही असं मेनार्ड स्वतःच म्हणालेत की.'

'माझा विश्वास नाही त्याच्यावर. आपण कोठलाही धोका पत्करायला तयार नाही. या दोघांवर आपल्याला मात केलीच पाहिजे.'

'कॉलिन्सचा काय चुटकीसरशी निकाल लावता येईल. फक्त ही टेप राष्ट्राध्यक्षांना ऐकवायची. एका क्षणात ते अॅटर्नी जनरलची हकालपट्टी करतील.' अॅडकॉकनं सुचविलं.

'हॅरी, तू आणि तुझ्या साथीदारांनी लॉस एंजिल्स येथे जाऊन गुप्तपणे कॉलिन्स व मेनार्ड यांचं संभाषण टेप केलंत ही खरंच फार प्रशंसनीय गोष्ट आहे. या टेप्स तर मौल्यवान आहेतच, पण हे प्रकरण राष्ट्राध्यक्षांकडं न्यावं असं मात्र मला वाटत नाही.'

बोलता बोलता टायनॅन येरझारा घालू लागला.

अॅडकॉकनं विचारलं, 'मग आता काय करू या ?'

'आपल्याला आता तयारीत राहायला हवं. अॅटर्नी जनरल कॉलिन्सची कसून चौकशी करा. त्याच्यावर सतत पाळत ठेवा.'

'पण ते अॅटर्नी जनरल झाले तेव्हा त्यांची संपूर्ण चौकशी आपण केलीच.'

टायनॅन ताडकन उत्तरला, 'ती आपली नेहमीची चौकशी झाली. आता खास, कसून चौकशी केली पाहिजे. आपल्याकडच्या अत्यंत निष्णात एजंटांचं एक छोटसं पथकच नेमा या कामावर. त्याच्या आयुष्यात ज्या ज्या कोणाचा संबंध आला असेल त्या त्या सर्वांचा शोध घ्या. त्याची पहिली पत्नी हेलनला जाऊन भेटा. मुलाला भेटा. त्याची दुसरी बायको कॅरेन, त्याची हाऊसकीपवर, सगळ्या सगळ्यांना जाऊन भेटा. त्याच्या नातेवाइकांच्या मुलाखती घ्या आणि सिनेटर हिलियडसारख्या त्याच्या मित्राकडेही दुर्लक्ष करू नका. एका आठवड्यात ही चौकशी करून मला संपूर्ण अहवाल द्या.'

'ठीक आहे.' अॅडकॉकनं सांगितलं.

'तसंच मुख्य न्यायमूर्ती जॉन जी. मेनार्ड यांची पण चौकशी करा. त्यांची प्रत्येक कृती, प्रत्येक शब्द, लिहिलेली पत्रे, त्यांचे आर्थिक व्यवहार सगळ्यांची माहिती मिळवा.'

'मेनार्डच्या विरुद्ध जरी आपल्याला काही माहिती मिळाली तरी त्याचा फारसा काही उपयोग होणार नाही—कारण मेनार्डनं जर एकदा घटनादुरुस्तीला विरोध करायचं ठरवलं, तर काही झालं तरी ते नमणार नाहीत.' अॅडकॉकनं सांगितलं.


आमच्या ग्राहकांस दिवाळीच्या शुभेच्छा

तुमच्या सुंदर डोळ्यांचा संबंध चष्मा
किंवा कॉन्टॅक्ट लेन्सशी आल्यास....

शिरोडकर

हेच नांव डोळ्यासमोर येईल

दादर (पश्चिम) दादर (पूर्व) वान्द्रे
लंडन कॉन्टॅक्ट लेन्स सोसायटीचे सभासद

RADICAL

'तू म्हणतोस ते बरोबर आहे हॅरी. कॉलिन्सचा निकाल लावणं सोपं आहे, मेनार्डच्या बाबतीत मात्र ते कठीण जाईल. दुसरंच काही तरी करायला हवं. त्यासाठी पैसे लागतील. खूप पैसे!'

'राष्ट्राध्यक्षांचा निधी आहे की?'

'नाही. ते पैसे नाही घेता येणार. राष्ट्राध्यक्षांना मला यात गुंतवायचं नाही. पैसे तर हवे आहेत. पण ते कुठून मिळाले हे मात्र अगदी कोणालाही कळता कामा नये.'

आणि टायनॅन जवळजवळ किंचाळलाच,

'हॅरी, सुचलं काय करायचं ते!'

त्यानं तावडतोब इंटरकॉमचं बटण दाबलं आणि बेथला डोनाल्ड रॅडेनबॉग याची फाईल आणून देण्यास सांगितलं. तिनं तावडतोब फाईल हजर केली. टायनॅननं त्यातील काही पानं चाळली व तो डोळे मिचकावीत म्हणाला,

'अगदी मला पाहिजे तसंच हे प्रकरण आहे. याचा जर उपयोग करता आला तर माझी हुशारी सिद्ध होईल. आणि मग जर मुख्य न्यायमूर्ती काही ढवळाढवळ करायचा प्रयत्न करू लागले तर आपण त्यांचा व्यवस्थित समाचार घेऊ शकू. हे बघ हॅरी, लेव्हिसबर्ग तुरुंगाच्या वॉर्डन जेन्किन्सला माझा निरोप दे की, तुरुंगातील एकच कैदी डोनाल्ड रॅडेनबॉग याची आज मध्यरात्रीनंतर पहाटे दोन वाजता मला तुरुंगाबाहेर भेट घ्यायचीय तेव्हा त्याची काहीही करून व्यवस्था कर. ◻

## : प्रकरण पाचवे :

लेव्हिसबर्ग येथील तुरुंगाच्या वॉर्डननं ठरल्याप्रमाणं पहाटे दोन वाजता रॅडेनबॉगला तुरुंगातून बाहेर काढलं. बाहेर काळोख होता.' वॉर्डन जेन्किन्सनं कैद्याला मोटारीत बसवलं आणि ती तुरुंगाबाहेर काढली. मोटारीचे फक्त पार्किंग लाईटस लावलेले होते.

समोर दुसऱ्या एका मोटारीत टायनॅन व अॅडकॉक बसले होते. जेन्किन्स येतोय् असं पाहून टायनॅन मागच्या सीटवर जाऊन बसला. तो हॅरीला म्हणाला, 'मी इथं बसून रॅडेनबॉगशी बोलणी करतो. तू ड्रायव्हरच्या सीटवरच चूपचाप बसून राहा. मध्ये काहीही बोलू नकोस. जे काही बोलायचं ते मी बोलेन. तू फक्त ऐकत राहा. आपण दोघंही यात आहोत.'

समोरच्या गाडीचं दार उघडलं गेलं व बंद झालं. टायनॅननं आपल्या मोटारच्या खिडकीची काच खाली करत विचारलं,

'काय जेन्किन्स कसं काय?'

'उत्तम चाललंय. तुम्हाला जे हवं होतं ते मी आणलंय बरोबर.'

'काही अडचण आली?'

'काही नाही. पण तुम्हाला भेटायची त्याची फारशी इच्छा नव्हती.

'मी त्याला आवडत नाही.' टायनॅननं सांगितलं.

'परंतु तरी तो आला. कारण तो तसा उत्सुक आहे.'

'आता आणखी वेळ दवडण्यात अर्थ नाही. त्याला माझ्या मोटारीत घेऊन ये. आमचं बोलणं झाल्यावर कदाचित तुम्हाला मला परत बोलावं लागेल. तेव्हा तू मला पुन्हा भेट. आणि सर्वांत महत्त्वाचं म्हणजे ही भेट अत्यंत गुप्त ठेवायची. किंबहुना अशी भेट झालीच नाही असं समजून चालायचं.'

त्याला होकार देऊन वॉर्डन जेन्किन्स आपल्या मोटारीपाशी आला. मागचं दार उघडून त्यानं रॅडेनबॉगला बाहेर काढलं. मोटारीतून बसल्याजागी टायनॅनला त्याचा चेहरा दिसू शकला नाही. त्याचे हात मात्र एकमेकांवर ठेवलेले दिसले. टायनॅननं विचारलं, 'त्याला बेड्या घातल्यात?'

'होय.'

'तावडतोब बेड्या काढून घ्या, ही काही नेहमीची बैठक नव्हे.' टायनॅननं फर्मावलं.

बेड्या काढून घेण्यात आल्या नि रॅडेनबॉग मोटारीत टायनॅनच्या शेजारी येऊन बसला. तीन वर्षांच्या तुरुंगवासात त्याच्यात फारसा फरक पडला नव्हता. तो काहीसा वाळला होता इतकंच,

टायनॅननं त्याला सिगरेट दिली. रॅडेनबॉगला आपण निष्पाप असूनही आपल्याला शिक्षा झाली याचं अतीव दुःख झालं होतं. तुरुंगवासाला तो पार कंटाळला होता, हे हेरून टायनॅन त्याच्याबद्दल कोरडी सहानुभूती दाखवत म्हणाला, 'कर्नल बॅक्स्टर मरण पावले, त्यामुळं तुला सोडविण्याच्या दृष्टीनं प्रयत्न करू शकेल अशी आणखी एक व्यक्ती गेली.'

'आणखी एक कशी? शेवटचीच म्हणा.'

'नाही शेवटची नाही. कारण मी तुला तेथून सुटण्याची संधि देणार आहे,'

डोळे विस्फारीत रॅडेनबॉगनं विचारलं, 'तुम्ही?'

'हो! मी.' टायनॅन म्हणाला.

'मी तुझ्याशी सौदाच करायला आलोय्. तुला जे हवं ते मी देऊ शकतो. म्हणजे या तुरुंगवासातून मुक्तता. तू तुझ्यापाशी जे आहे ते मला त्याबदल्यात द्यायचंस–म्हणजे पैसे! तुझ्याकडे रोख दहा लाख डॉलर्स आहेत. फ्लोरिडात कुठंतरी तू ते दडवून ठेवलेले आहेस. हे पैसे तुझ्यापाशी आहेत की नाहीत, याची निरर्थक चर्चा करण्यात वेळ घालवायला नको. तुझ्यासंबंधीची फाईल मी बारकाईनं वाचलीय्. तीन वर्षांपूर्वी तू वॉशिंग्टनहून निघालास तेव्हा तुझ्यापाशी पैसे होते, हे शपथेवर सांगणारा साक्षीदार माझ्यापाशी आहे. हे पैसे तू मियामीत जाऊन कोणाला तरी देणार होतास. आपल्याला बनवण्यात आलं हे कळल्यामुळं तू हे पैसे दिलेच नाहीस. तुला पकडण्यात आलं तेव्हा तुझ्याकडं हे पैसे नव्हते. तेव्हा तू ते दडवून ठेवलेले आहेत.'

'कदाचित् माझ्याकडं खरंच पैसे नसतीलही. मी हे कदाचित खरं सांगत असेन–' शांतपणे रॅडेनबॉग म्हणाला,

'ठीक आहे. आपण 'कदाचित्' पैसे तुझ्याकडं आहेत असं धरून चालू. तू हे पैसे कुठंतरी दडवून, कुठं तरी पुरून ठेवलेले आहेस. या पैशाचा तुला सध्या काही उपयोग नाही. तुरुंगातून सुटल्याखेरीज तू त्या पैशाचा वापर करू शकत नाहीस. त्या दहा लाख डॉलर्सपैकी मला साडेसात लाख डॉलर्स हवे आहेत. तुला पंधरा वर्षांची सजा झालेली आहे. अजून बारा वर्षे जायची आहेत. पण मी तुझी आता उद्या किंवा दोन–चार दिवसांत सुटका करू शकतो. ते इतकं सोपं

नाही, परंतु मी त्याची व्यवस्था करीन. सुटका झाली की, मियामीला जाऊन तू पैसे जेथे लपवून ठेवले असशील तेथून ते आणायचे. साडेसात लाख डॉलर्स मला द्यायचे व उरलेले अडीच लाख घेऊन तू नवं जीवन सुरू करायचंस. तुला पटतो का हा सौदा ?

टायनॅननं रँडेनबॉगकडं पाह्यलं. त्यानं काहीही प्रतिसाद दिला नाही. तो आपल्याच विचारात गढला होता.

टायनॅननं पुढं सांगायला सुरुवात केली, ' तुझी सुटका करणं हे सोपं काम नाही हे मी मघा सांगितलंच. तुझी सुटका केली की, तुझं नाव बदलून टाकायचं. १९७० सालापासून एकूण ५०० खबरे सरकारी साक्षीदार आदींना अशी नवी नावं देऊन त्यांची सुटका करण्यात आली. तेव्हा तुला नवी ' आयडेंटिटी ' दिली की झालं. आधी ' डोनाल्ड रँडेनबर्ग ' ला गाडून टाकावं लागेल. हृदयविकारानं अथवा कोणीतरी भोसकल्यानं तू मेला आहेस, हे वॉर्डन् जेन्किन्स सर्वत्र जाहीर करील. किंवा तुला नैसर्गिक मृत्यू आला असं भासवील. मग तुझी सुटका करू. तुझ्या बोटांचे ठसे बदलून टाकू, तुझा चेहरा बदलू. तुला एकदम वेगळं नवं नाव देऊ. त्याच्या पुष्टयर्थ सर्व कागदपत्रं तयार केली जातील. तुला जे नवं नाव धारण करावं लागेल त्या नावाचा जन्मदाखला, सामाजिक सुरक्षा कार्ड, ड्रायव्हिंगचं लायसेन्स सर्व काही तयार केलं जाईल. हे नवं नाव घेऊन तुला जगात स्वतंत्रपणे राहता येईल. मग रँडेनबॉगचा पुन्हा विचार करायचा नाही. त्याला पूर्णपणे विसरून जायचं. तुला एक मुलगी व काही नातेवाईक आहेत. पण मन घट्ट करायचं. त्यांना भेटायचं नाही. तू मेलास असंच ते समजतील. स्वातंत्र्यासाठी तुला एवढी किंमत आणि अर्थात साडेसात लाख डॉलर्स मोजावे लागतील. '

टायनॅन क्षणभर थांबला. काचेतून त्यानं बाहेर पाह्यलं व मग त्यानं बोलणं पुढं सुरू केलं, ' आता वेळ संपत आलाय्. तेव्हा आता तू काय ते ठरव. तू नकार दिलास तर वॉर्डन जेन्किन्स तुला बेड्या घालून पुन्हा तुरुंगात नेईल. तेथे पुढील बारा वर्षं काय होईल कोणी सांगावं ? कैद्यांच्या भांडणात भोसकला गेलास तर मग कसले पैसे न कसलं काय ? आणि जर माझ्या म्हणण्याला होकार दिलास तर तुला पूर्ण स्वातंत्र्य मिळेल. सारी सुखाची दारं खुली होतील. आणि जवळ अडीच लाख डॉलर्सही असतील. तुरुंगातून तुझी सुटका करत असतानाच तुला नवा सूट दिला जाईल. त्यात मियामीचं विमानाचं तिकीट व हॉटेल रिझर्व्हेशन ठेवलेलं असेल. तेव्हा यातला कोठला मार्ग पत्करायचा हे आता सर्वस्वी तुझ्यावर अवलंबून आहे. तेव्हा तू काय ठरवलंस ? '

¤

त्यानंतर पाच दिवसांनी ॲटर्नी जनरल कॉलिन्स लेव्हिसबर्ग तुरुंगाला भेट द्यायला गेला. ' आर डॉक्युमेंट 'बद्दल बॅक्स्टरचा तुरुंगात असलेला मित्र रँडेनबॉग काही माहिती देईल काय हे अजमावयाला तो आला होता. परंतु आपला हा खरा उद्देश तो सांगू शकत नव्हता. ॲटर्नी जनरल या नात्यानं तुरुंगाची पाहणी करायची आहे असं त्यानं सांगितलं होतं.

वॉर्डन जेन्किन्सनं त्याला तुरुंगातले सर्व विभाग दाखवले. पाहणी संपत आली होती. मात्र कॉलिन्सच्या दृष्टीनं खरं महत्त्वाचं काम आता सुरू होणार होतं.


WITH BEST COMPLIMENTS FROM

**CHOWGULE STEAMSHIPS LIMITED**

**Registered Office :**
" Chowgule House "
Mormugao Harbour,
Goa – 403 803.

Telephone Nos. 2229, 2291 / 3
Telex Nos. 0191–208 / 209

**Operations Office :**
" Bakhtawar ", 3 rd Floor,
Nariman Point,
Bombay – 400 021.

Telephone No. 315796
Telex Nos. 011–2409 / 3101

OPERATORS OF
BULK DRY CARGO CARRIERS AROUND THE WORLD.

जेन्किन्सनं त्याला विचारलं, 'आणखी काय करू शकतो मी ?'

'फार कष्ट घेतलेत तुम्ही. निघतो मी आता,' असं सांगून कॉलिन्स निघाला खरा पण लागलीच मागे वळत आणि सहज काही तरी आठवल्यासारखं दाखवून त्यानं विचारलं, 'आमच्याकडे करासंबंधीचं एक प्रकरण चालू आहे. त्यात तुमच्या तुरुंगात असलेल्या एका इसमाचा वारंवार उल्लेख होतो. त्या इसमाला पाच–दहा मिनिटं एकांतात भेटायला मिळेल का ?'

'हो, का नाही? ' तुम्ही त्याचं नांव सांगा म्हणजे ताबडतोब बोलावून घेतो त्याला.'

'त्याचं नाव रँडेनबॉग, डोनाल्ड रँडेनबॉग. मला त्याला भेटायचंय.'

जेन्किन्सला आपल्या चेहऱ्यावरचं आश्चर्य लपवता आलं नाही. त्यानं विचारलं, 'आज सकाळची वर्तमानपत्रं तुम्ही वाचली नाहीत ? टी. व्ही. देखील पाहिला नाही ?'

'नाही.'

'डोनाल्ड रँडेनबॉग तीन दिवसांपूर्वी मरण पावला. हृदयविकाराचा झटका येऊन तो जागच्या जागी खाली कोसळला. त्याच्या जवळच्या नातेवाइकांशी संपर्क साधेपर्यंत आम्ही बातमी दिली नव्हती. त्यानंतर काल रात्री ती देण्यात आली. आजच्या वर्तमान पत्रात छापून आलंय की !'

'रँडेनबॉग मरण पावला ?' कॉलिन्स स्वत:शीच पुटपुटला. याचा अर्थ 'आर डाक्युमेंट 'चा शोध लागण्याची आशा संपलीच म्हणायची.

'त्याच्या नातेवाइकांशी तुम्ही संपर्क साधला ना ? तो कोणाशी ?'

'रँडेनबॉगची एक मुलगी फिलाडेल्फियात आहे. तिला आम्ही मृत्यूची बातमी कळवली. तिच्या परवानगीनंच तिच्या बापाच्या शवाचं दफन सरकारी खर्चानं करण्यात आलं.'

'तिचा पत्ता आहे तुमच्याकडं ?'

'संपूर्ण पत्ता नाही. फिलाडेल्फियाच्या टपाल कचेरीत तिचा एक पोस्ट बॉक्स क्रमांक आहे.' आपल्या टेबलाच्या ड्रॉवरमधून एक फाईल बाहेर काढून त्यातून जेन्किन्सनं पोस्ट बॉक्स क्रमांक सांगितला. '१५३, विल्यम पेन अॅनेक्स पोस्ट ऑफिस स्टेशन, फिलाडेल्फिआ, १९१०५.'

पत्ता टिपून घेतल्यावर आभार मानून कॉलिन्स तेथून बाहेर पडला. ◻

ठरल्याप्रमाणं सगळा बेत व्यवस्थित पार पडला होता. विश्वास बसणार नाही इतक्या कार्यक्षमतेनं व आतापर्यंत कसलीही अडचण न येता सर्व गोष्टी झाल्या होत्या.

तो एका मोटारबोटमध्ये बसला होता. गेल्या सहा दिवसांतील सर्व घडामोडी त्याला आठवत होत्या.

लेव्हिसबर्ग तुरुंगाबाहेर एफ. बी. आय. चे डायरेक्टर टायनॅनशी त्याची सहा दिवसांपूर्वी भेट झाली होती. त्यांनी सुचवलेल्या योजनेला डोनाल्ड रँडेनबॉगनं मान्यता दिली होती. आता तो रँडेनबॉग नव्हताच मुळी. त्याचं नवं नाव होतं हर्बर्ट मिलर !

टायनॅनची भेट झाल्यावर रँडेनबॉगला इतर कैद्यांपासून वेगळं काढून एका कोठडीत एकट्यालाच ठेवण्यात आलं होतं. तेथे त्याला रोज एकेक इसम भेटायला येई. पहिल्या इसमानं त्याच्या बोटांना अॅसिड लावून तेथील ठसे बदलले. दुसऱ्यानं त्याचा चष्मा काढून टाकला व त्याऐवजी कॉन्टॅक्ट लेन्सेस बसविले. तिसऱ्या इसमानं त्याच्या मिशा काढून टाकल्या नि त्याचे पिंगट केस रंगवून काळेभोर करून टाकले. शेवटी हॅरी अँडकॉक आला. त्यानं हर्बर्ट मिलर नावानं सारी कागदपत्रं तयार करून आणली होती. जन्माचा दाखला, ड्रायव्हिंग लायसेन्स, सैन्यातून सन्मानानं निरोप दिल्याचा दाखला आदी कागदपत्रं त्यात होती. गडद तपकिरी रंगाचा सूटही त्याला देण्यात आला होता.

तुरुंगातून बाहेर पडल्यावर काय करायचं याच्या तपशीलवार सूचनाही देण्यात आल्या होत्या. आधी विमानानं मियामीला जायचं. तेथे मिलर या नावानं बयामो हॉटेलात खोली रिझर्व्ह केलेली असेल. दुसऱ्या दिवशी त्यानं दडवून ठेवलेले दहा लाख डॉलर्स आणायचे. त्यावेळी त्याच्यावर पाळत ठेवली जाणार नाही. नंतर 'कोकोनट ग्रोव्ह' या उपनगरातील ठिकाणी राहणाऱ्या श्रीमती रेमोस यांना भेटायचं. ती एका प्लॅस्टिक सर्जनचा पत्ता देईल. त्याच्याकडं जायचं. तो डोळ्यांभोवती प्लॅस्टिक सर्जरी करील. त्याच दिवशी रात्री मियामी किनाऱ्यावरील म्युनिसिपल पिअरवर जायचं. तिथे एक मोटारबोट त्याची वाट पहात तयार असेल. त्या मोटारबोटीनं फिशर बेटावर जायचं. तिथे पहिल्या तेलाच्या मोठ्या टाकीजवळ त्याला कोणीतरी भेटेल. त्यानं परवलीचा शब्द दोनदा उच्चारायचा. परवलीचा शब्द आहे 'लिंडा.' मग ठरलेल्या ठिकाणी साडेसात लाख डॉलर्स रोख रक्कम असलेलं पार्सल ठेवायचं आणि मोटारबोटीनं मियामीला परतायचं. नंतर तो कुठंही जायला मुक्त राहील.

तुरुंगातून बाहेर पडताना मिळालेल्या नव्या सूटात मियामीला जाण्यासाठी विमानाचं तिकीट, फिशर बेटावर पैशाचं पार्सल कोठे टाकायचं याचा नकाशा, थोडे पैसे आदी गोष्टी होत्या.

ठरल्याप्रमाणे एकेक गोष्ट पार पडत होती. तो मियामीला गेला. बयामो हॉटेलात उतरला. नंतर एक मोटार भाड्यानं घेतली व मियामीच्या पश्चिमेस गेला. रस्त्यावर मोटार उभी करून दलदलीच्या ठिकाणी तो चालत गेला. तेथे तीन वर्षांपूर्वी एक लोखंडी पेटी त्यानं दडवून ठेवली होती. त्यात दहा लाख डॉलर्स होते. सामान आणायच्या पिशव्यात त्याने हे पैसे भरले व त्या पिशव्या सूटकेसमध्ये ठेवल्या. हॉटेलात आल्यावर आपल्या वाट्याचे अडीच लाख डॉलर्स त्यानं काढून घेतले व ते दुसऱ्या एका सूटकेसमध्ये भरून मियामी आंतरराष्ट्रीय विमानतळावरील लॉकरमध्ये त्यानं ती ठेवून दिली. विमानतळावरच 'मियामी हेरल्ड'चा अंक त्यानं खरेदी केला. सहाव्या पानावर डोनाल्ड रँडेनबॉगच्या मृत्यूचं वृत्त दिलं होतं. तीन वर्षांपूर्वीचा त्याचा फोटोही छापला होता, स्वत:च्याच मृत्यूची ही बातमी वाचताना त्याला काहीसं विचित्र वाटत होतं.

ठरल्याप्रमाणं श्रीमती रेमोसला तो भेटला. तिनं प्लॅस्टिक सर्जन

**रँडेनबॉग मरण पावला याचा अर्थ आर डॉक्युमेंटचा शोध लागण्याची आशाच संपली.**

गार्शियाचं नाव सांगितलं. तो बेकायदेशीररीत्या अमेरिकेत आलेला होता. तेव्हा बैठक गुप्त राहायला हवी असं तिनं सांगितलं. आज रात्री १०–१५ वाजता हॉटेलमधील खोलीतच डॉ. गार्शिया तुम्हाला भेटतील. तुमच्या खोलीची चावी देऊन ठेवा. हॉटेलमध्ये डुप्लिकेट चावी असतेच. डॉ. गार्शिया तुमची प्राथमिक तपासणी करतील व मग प्रत्यक्ष प्लॅस्टिक सर्जरी केव्हा करायची ते सांगतील' असंही रेमोस म्हणाली. रॅंडेनबॉगनं होकार दिला. खोलीची चावी दिली. मग दुपारी तो भटकला. सायंकाळी हॉटेलवर आला नि काळोख पडल्यावर साडेसात लाख डॉलर भरून ठेवलेली सुटकेस घेऊन तो बाहेर पडला. म्युनिसिपल पियरवर मोटारबोट तयार होती. आणि आता तो फिशर बेटाकडे निघाला होता. त्यानं खिशातून नकाशा काढला. फिशर बेटाचे क्षेत्रफळ २१३ एकर होते व त्या निर्मनुष्य बेटावर घनदाट जंगल होते.

थोड्याच वेळात मोटारबोट बेटावर पोचली. एका हातात फ्लॅश लाईट व दुसऱ्या हातात जड सूटकेस घेऊन तो निघाला. पहिल्या तेलटाकीजवळ पोचल्यावर काळोखातून एका इसमाचा आवाज आला.

'मिस्टर मिलर का?'

'होय.'

'फ्लॅश लाईट बंद कर. तुझा परवलीचा शब्द काय?'

'लिंडा, लिंडा.'

'बरोबर जे आणलं आहेस ते तिथंच ठेवून दे आणि आलास तसाच मोटारबोटीकडे परत जा.'

रॅंडेनबॉगनं जमिनीवर सुटकेस ठेवली व तो म्हणाला, 'ठीक आहे. मी आता जातो.'

समोरच्या काळोखात तो झपाझपा चालू लागला. फ्लॅश लाईट बंद करायला सांगितलं असल्यानं आपण कोठल्या दिशेनं जात आहोत हे त्याला समजत नव्हतं. आता पैसे दिल्यावर त्याला उगाचंच वाटलं, टायनॅनला कशाला एवढे पैसे हवे असतील?

इतक्यात त्याला समोर कंदिलाचा प्रकाश दिसला. कोणीतरी दोघेजण कुजबुजत होते. रॅंडेनबॉग झाडामागं उभा राहून त्यांचं बोलणं ऐकू लागला. त्यातला एकजण सुटकेसमधले पैसे मोजीत होता. दुसरा त्याला म्हणत होता, 'रॅमन एस्कोबार, आता तुम्ही एकदम श्रीमंत होणार.'

'फर्नांडिस, गप्प बसतोस की नाही.' एस्कोबारनं त्याला दरडावलं. मग ते दोघे स्पॅनिश भाषेत बोलू लागले. रॅंडेनबॉगला स्पॅनिश कळत नव्हतं. तेव्हा तो तेथून निघाला. एस्कोबार व फर्नांडिस हे एफ. बी. आय.चे एजंट असावेत, यावर त्याचा विश्वास बसेना. दोघे दिसायला गुंडांसारखे होते. डायरेक्टर टायनॅनशी त्यांचा काय संबंध हे रॅंडेनबॉगला उमगेना.

रस्ता सापडल्यावर तो मोटारबोटीपाशी आला आणि तिनं मियामीला परतला. आता तो स्वतंत्र होता. काहीही करायला मोकळा होता. मात्र एक गोष्ट अजून अपुरीच राहिली होती. प्लॅस्टिक सर्जन गार्शिया रात्री १०–१५ वाजता हॉटेलातील त्याच्या खोलीवर भेटायला यायचे होते. अजून १०–१५ वाजायला थोडा वेळ होता. रॅंडेनबॉगनं सकाळपासून काहीही खाल्लं नव्हतं. त्याला कमालीची भूक लागली होती. उपाशीपोटी हॉटेलवर जाऊन डॉ. गार्शियाची वाट पाहायची की, आधी कुठंतरी खाऊन घेऊन मग हॉटेलवर जायचं असा प्रश्न होता. खाऊन जायचं तर थोडा उशीर झाला असता. खोलीची चावी गार्शियाला द्यायला श्रीमती रेमोसनं त्याच्याकडून घेतली होती. तेव्हा थोडा उशीर झाला तरी हरकत नाही. गार्शिया खोली उघडून आत बसतील, त्यांच्यापाशी चावी आहेच, असा विचार करून रॅंडेनबॉगनं एका चांगल्या हॉटेलात जेवण घेतलं. टायनॅनशी केलेला सौदा पुरा झाला या आनंदात तो होता. त्यामुळं वेळेचं त्याला भानच राहिलं नाही. त्यानं घड्याळात पाहिलं तेव्हा अकरा वाजले होते. त्याला पाऊणतास उशीर झाला होता. त्यानं घाईघाईनं टॅक्सी पकडली आणि ड्रायव्हरला सांगितलं; 'बयामो हॉटेलला चल.'

बयामो हॉटेलकडे जाणाऱ्या रस्त्यावर टॅक्सी वळली आणि रॅंडेनबॉगनं समोर पाहिलं. हॉटेलच्या बाहेर मोठा घोळका जमलेला होता. अग्निशामकदलाचे कर्मचारी आले होते. दोन पोलीस गाड्या, आगीचे बंब उभे होते. एकच गडबड उडालेली होती. तो कोपऱ्यावरच टॅक्सीतून उतरला नि धावत धावत हॉटेलपाशी पोचला. बंबवाले तिसऱ्या मजल्यावर पाण्याचा जोरदार मारा करत होते. तेथून धुराचे लोट बाहेर पडत होते. आगीच्या ज्वाळाही दिसत होत्या. आपलीही खोली तिसऱ्याच मजल्यावर आहे हे रॅंडेनबॉगला आठवलं. त्यानं शेजारी उभ्या असलेल्या एका इसमाला अधीरतेनं विचारलं, 'काय झालं?'

'सुमारे तासाभरापूर्वी तिसऱ्या मजल्यावर कसलातरी स्फोट झाला. आग लागली व ४–५ खोल्या जळून खाक झाल्या. कोणीतरी एकजण भाजून मरण पावला व काहीजण जखमी झालेत म्हणे.'

रॅंडेनबॉग गर्दीतून वाट काढीत काढीत पोलिस अधिकाऱ्यांकडे जायचा प्रयत्न करू लागला. पोलीस अधिकारी व अग्निशामकदलाचे प्रमुख यांना वार्ताहर व छायाचित्रकारांनी घेरलं होतं. त्यांचं बोलणं रॅंडेनबॉग लक्षपूर्वक ऐकू लागला.

'या अपघातात एकच जण मृत्यू पावलाय ना?' एका वार्ताहरानं विचारलं.

'आतापर्यंतच्या माहितीनुसार एकच जण मरण पावलाय्. जेव्हा स्फोट झाला तेव्हा तो त्या खोलीत होता. जागच्याजागीच तो ठार झाला असणार. ती खोली संपूर्ण भस्मसात झाली त्यात हा माणूसही जळून खाक झाला.'

'त्याचं नाव कळलं का?'

'थांबा, पाहतो. तिथं काही कागदपत्रं मिळाली. त्यावरून त्याच नाव हर्बर्ट मिलर हे असावं!'

रॅंडेनबॉगला हे ऐकताना आश्चर्याचा धक्काच बसला.

'स्फोटाचं कारण काय? गॅसचा पाईप फुटला की, हा बॉंबस्फोट आहे?' दुसऱ्या वार्ताहरानं विचारलं.

'आताच काही सांगता येत नाही. सर्व चौकशी झाल्यावरच ते सांगता येईल.'

रॅंडेनबॉगचं सारं अंग थरथरत होतं. त्या घोळक्यातून तो हळूहळू मागे सरकला आणि शेजारच्या बोळातून चालू लागला. त्याच्या संवेदनाच बधिर झाल्यासारखं त्याला वाटलं. काय घडलंय् हे समजायला त्याला वेळ लागला. स्वतःचेच मृत्यू दोन वेळा पाहायची

पाळी त्याच्यावर आली होती. रँडेनबॉग तुरुंगात 'मेला' अशी वर्तमानपत्रात बातमी आली आणि तो ज्या नावानं वावरत होता तो हर्बर्ट मिलरही आता 'मेला' होता. याचा अर्थ रँडेनबॉगला आता नावच उरलं नव्हतं. तो बिननावाचा होता. टायनॅननं त्याचा विश्वासघात केला होता. स्वतःच्या कामासाठी त्यानं रँडेनबॉगचं नाव बदलून त्याची सुटका केली होती व साडेसात लाख डॉलर्स मिळाल्यावर हॉटेलात बॉबस्फोट घडवून त्याला ठार करायचं कारस्थान रचलं होतं. सुदैवाने रँडेनबॉग त्यातून वाचला. स्फोटात मेला असंच उद्या वर्तमानपत्रांत छापून येणार होतं, हे एका दृष्टीनं बरं होतं. कारण हर्बर्ट मिलर म्हणजेच रँडेनबॉग मरण पावला, हेच टायनॅन खरं मानून चालणार. त्यामुळे रँडेनबॉग सुरक्षित होता.

आता एकाच ठिकाणी त्याला जाणं शक्य होतं. त्यानं एक टॅक्सी केली व मियामी आंतरराष्ट्रीय विमानतळाकडे तो निघाला. ¤

इकडे कॉलिन्स रँडेनबॉगच्या मुलीचा पत्ता मिळवायच्या प्रयत्नात होता. त्याच्याकडे तुरुंगाचा वॉर्डन जोन्किन्सनं दिलेला पोस्टबॉक्स नंबर होता. डेप्युटी अॅटर्नी जनरलला त्यानं त्याआधारे तिचा संपूर्ण पत्ता मिळवायला सांगितलं होतं.

रँडेनबॉगच्या मुलीचं नाव होतं सुसॅन. तिचा संपूर्ण पत्ता मिळवून डेप्युटी अॅटर्नी जनरलनं कॉलिन्सला दिला. 'आर डॉक्युमेंट'विषयी काही माहिती मिळायची आता तेवढीच एक शेवटची आशा होती. दिवगत अॅटर्नी जनरल बॅक्स्टर आपला घनिष्ठ दोस्त रँडेनबॉग याच्याशी कधी 'आर डॉक्युमेंट'बद्दल बोलले असतील आणि ते जर रँडेनबॉगच्या मुलीनं ऐकलं असेल तरच काही माहिती मिळण्याची शक्यता होती. प्रयत्न तर करायलाच हवा होता. कॉलिन्सनं आपल्या सेक्रेटरीला फोन करून उद्या सकाळचं फिलाडेल्फियाचं विमानाचं तिकीट काढायला सांगितलं. तो सुसॅनला भेटायला जाणार होता. ¤

## : प्रकरण सहावे :

फिलाडेल्फियातील साऊथ जेसप रस्त्यावर रँडेनबॉगचं घर होतं. एका मोठ्या घरामागं ते छोटं घर लपलेलं होतं. कॉलिन्सनं बेलचं बटन दाबलं. परंतु काहीच हालचाल दिसेना. त्यानं दुसऱ्यांदा बटन दाबलं. काही क्षण गेले व मग दार किंचित किलकिलं झालं. एक तरुणी डोकावली. कॉलिन्सनं विचारलं, 'सुसॅन रँडेनबॉग ?'

तिनं मानेनंच होकार दिला. परंतु ती संशयानं त्याच्याकडे पाहत होती. 'मी कोणालाच भेटू शकत नाही,' असं सांगून ती दार लावून घ्यायला लागली. मग कॉलिन्सनं आपली ओळख करून दिली. तो अमेरिकेचा अॅटर्नी जनरल आहे, हे समजल्यावर तिनं त्याला घरात येऊ दिलं.

सुसॅन सव्वीस वर्षांची होती. आकर्षक व्यक्तिमत्त्व असलेली सुसॅन एका वर्तमानपत्रात नोकरी करत होती. तिचा चेहरा काहीसा मलूल नि साशंक वाटत होता. तिनं कॉलिन्सला हॉलमध्ये सोफ्यावर बसायला सांगितलं. पलीकडे एक बंद दरवाजा होता. तो बहुतेक बेडरूमचा असावा. सुसॅननं त्याला विचारलं, 'तुम्हाला कोणी पाठवलंय्. एफ. बी. आय. नं ?'

'मीच एफ. बी. आय. ला पाठवीत असतो. मी इथं आलोय् ते केवळ खाजगी कामासाठी.' कॉलिन्सनं हसत हसत उत्तर दिलं.

'आर डॉक्युमेंट'चा शोध घेण्याचा प्रयत्न आपण कसा सुरू केला याचा इतिहास त्यानं तिला ऐकवला. 'माजी अॅटर्नी जनरल बॅक्स्टर डोनाल्ड रँडेनबॉगशी यासंबंधी काही बोलले होते काय, हे शोधायला थेट तुरुंगात गेलो. तेव्हा तिथं समजलं की, रँडेनबॉग मरण पावला! आता त्याच्या मुलीला तरी काहीतरी ठाऊक असेल म्हणून इथं आलोय. तेव्हा तुला त्याबद्दल काही माहिती आहे का ?' त्यानं विचारलं.

'नाही. मी त्याबद्दल कधीच काहीही ऐकलं नाही.' तिनं ठामपणे उत्तर दिलं.

'माझं नशीबच फुटकं दिसतंय.' निराश होऊन कॉलिन्स म्हणाला, 'तुझे वडील व तू हा माझ्या आशेचा शेवटचा तंतू होता. तुला काही ठाऊक नाही आणि डोनाल्डला भेटायला गेलो तेव्हा मला उशीर झाला होता.'

सुसॅननं एकदम डोळे विस्फारले. ती कॉलिन्सच्या मागे पाहत होती. बेडरूमचं दार उघडून एक व्यक्ती बाहेर आली व म्हणाली, 'कॉलिन्स, यावेळी मात्र तुम्हाला उशीर झालेला नाही.'

ती व्यक्ती समोर आली. कॉलिन्स त्या व्यक्तीला ओळखत नव्हता. पण चेहरा त्याला अंधुक परिचित वाटला.

मग ती व्यक्ती म्हणाली, 'मीच तो डोनाल्ड रँडेनबॉग. तुम्हाला आर डॉक्युमेंटविषयी काय माहिती हवी बोला ?'

कॉलिन्स आश्चर्यानं अवाक् झाला. डोनाल्डनं त्याला आपली सारी चित्तथरारक कहाणी सांगितली. एका काळोख्या रात्री टायनॅन कसा तुरुंगाबाहेर भेटला, त्यानं सौदा कसा केला, हर्बर्ट मिलर बनवून तुरुंगाबाहेर कसं काढलं, साडेसात लाख डॉलर्स घेतले व नंतर 'मिलरला' ठार करायचा कसा प्रयत्न केला हे सारं त्यानं सांगितलं. तो म्हणाला, 'टायनॅन हा भलताच पाताळयंत्री इसम आहे. सर्व गोष्टींमागे तोच असतो. ही प्रस्तिावी घटनादुरुस्तीची कल्पना त्याचीच. कारण ही दुरुस्ती मंजूर झाली तर अमेरिकेतला तो सर्वांत जास्त सामर्थ्यवान माणूस बनेल! राष्ट्राध्यक्षांपेक्षाही तो अधिक बलाढ्य होईल.'

'मला इतकी माहिती नाही. पण 'आर डॉक्युमेंटबद्दल' काही समजलं तर सारा उलगडा होईल! तेव्हा मला वाटतं, आपण त्याबद्दल काही बोलू या.'

'माझी काही हरकत नाही. पण त्या आधी माझ्या तीन अटी आहेत. पहिली म्हणजे माझ्यावरची प्लॅस्टिक सर्जरी पुरी केली पाहिजे. सध्या मला कोणी ओळखेल असं वाटत नाही. पण ओळखले तर मात्र माझी धडगत नाही.'

'कार्सन शहरात एक सर्जन आहे. त्याच्याकडून हे काम पूर्ण करून घेऊ. मुख्य म्हणजे एफ्. बी. आय. ला हा सर्जन माहीत नाही हे महत्त्वाचं. तेव्हा कधी करायची प्लॅस्टिक सर्जरी ?' कॉलिन्सनं विचारलं.

'ताबडतोब! उद्यादेखील चालेल.'

'ठीक आहे. हे काम झालंच असं समज,'

'दुसरी अट म्हणजे मला आता नवं नाव पाहिजे. लेविसबर्ग येथे 'डोनाल्ड रँडेनबॉग' मेला. मियामीमध्ये 'हर्बर्ट मिलर' अपघातात ठार झाला, तेव्हा शेवटी मी कोणी तरी असलोच पाहिजे. तेव्हा नवं नाव हवं.'

'पाच दिवसांत ही कागदपत्रं करून देऊ आम्ही. आता तिसरी अट कुठली?'

'पुढे कधी शक्य झालं तर, तुम्ही सत्य जगजाहीर करावं. टायनॅननं मला काय केलं, माझा बनावट मृत्यू हे सारं उघड करायचं आणि मला माझं रँडेनबॉग हे नाव पुन्हा मिळावं; मग मला तुरुंगातून पॅरोलवर सोडावं किंवा शिक्षा माफ केली जावी.'

'आता हे कधी शक्य होईल हे मला आताच नाही बुवा सांगता येणार. पण कधी काळी जर हे शक्य झालं, तर मी नक्कीच तुला मदत करीन.'

मग रँडेनबॉग म्हणाला, 'आता मी तुम्हाला 'आर डॉक्युमेंट-विषयी' सांगतो.'

त्यानं आपल्या मुलीकडून सिगरेट मागून घेतली. ती पेटवून सिगरेटचा धूर सोडीत तो म्हणाला,

'मला 'आर डॉक्युमेंटविषयी' सगळीच काही माहिती नाही. पण जी माहिती आहे तिचा तुम्हाला उपयोग होईल असं वाटतं. आर डॉक्युमेंट हा पस्तिसाव्या घटनादुरुस्तीचा एक अलिखित भाग आहे. आता अलिखित एवढ्यासाठी की, तो जनतेपुढे मांडण्यात आलेला नाही. माजी ॲटर्नी जनरल बॅक्स्टर त्यामुळे फार अस्वस्थ झाले होते. घटनेविषयी त्यांच्या मनात आदर होता. घटनेचा गैर-अर्थ लावणं किंवा त्यात ढवळाढवळ करणं त्यांना पसंत नव्हतं. पण देशात गुन्हेगारीची लाट आणखीच वाढली व त्यांच्यावर प्रचंड दबाव टाकून त्यांची कोंडी करण्यात आली. कायदे बदलल्याशिवाय देशातील परिस्थिती स्थिर होण्याची लक्षणं नव्हती, हे त्यांना पटलं होतं. पण पस्तिसावी घटनादुरुस्ती अतिशय कडक आहे असं त्यांचं मत होतं. वरवर त्यांचा तिला पाठिंबा असला तरी, मनातून मात्र त्यांना त्याबद्दल खेद वाटत होता; त्यातून त्यांनी बाहेर पडायच ठरवलं, पण तेव्हा ते त्यांना शक्य नव्हतं. ते त्यात पार गुंतले गेले होते.

'अशाच एका अस्वस्थ मूडमध्ये असताना त्यांनी 'आर डॉक्यु-मेंट'चा माझ्याजवळ उल्लेख केला. या पस्तिसाव्या घटनादुरुस्तीत किंवा 'आर डॉक्युमेंट'मध्ये टायनॅननं आपल्याला ओढायला नको होतं असं ते म्हणाले.'

'टायनॅन?' कॉलिन्सनं आश्चर्यानं विचारलं. 'राष्ट्राध्यक्ष वॅड-स्वर्थ यांनी पस्तिसावी घटनादुरुस्ती सुचविली आहे ना?'

'नाही. हे सारं त्या टायनॅनचं काम. पस्तिसावी घटनादुरुस्ती व 'आर डॉक्युमेंट'चा निर्माता व लेखक तोच आहे.'

'काय आहे तरी काय हे 'आर डॉक्युमेंट?'

'आर म्हणजे 'रिकन्स्ट्रक्शन'—रिकन्स्ट्रक्शन डॉक्युमेंट!'

'रिकन्स्ट्रक्शन कशाचं? अमेरिकेचं?'

'एकदम बरोबर. पस्तिसाव्या घटनादुरुस्तीच्या अंमलबजावणी-साठी व त्याला पूरक ठरेल अशी गुप्त योजना म्हणजे 'आर डॉक्यु-मेंट.' गुन्हेगारीरहित अशा अमेरिकेच्या पुनर्उभारणीचाच हा आरा-खडा. हे 'आर डॉक्युमेंट' दोन भागात आहे. बॅक्स्टरना त्यातला एकच भाग ठाऊक होता. त्यावेळी दुसरा भाग टायनॅन तयार करीत होता. पहिल्या भागात एक प्रायोगिक प्रकल्प आहे.'

'प्रायोगिक प्रकल्प? कसला?' कॉलिन्सनं विचारलं.

'टायनॅनचीच ही कल्पना. गुन्हेगारीचं प्रमाण खाली यावं म्हणून काही नवे कायदे करावे लागतील. ज्या समाजात बिलकुल किंवा जवळजवळ काहीच गुन्हेगारी नाही अशा समाजरचनेचा अभ्यास करून कायदे सुचवावेत असं त्याला वाटलं. त्यानं आपली सारी माहिती कॉम्प्युटरला पुरवली आणि गुन्हेगारीपासून मुक्त असे समाजगट कोठले याची विचारणा केली. तेव्हा काही उत्तरं आली. त्यातील प्रत्येक समाजगट म्हणजे बड्या औद्योगिक कंपन्यांनी वसव-लेली शहरे होती.'

'कंपन्यांनी वसवलेली शहरे?'

'अमेरिकेत अशी शहरे कितीतरी आहेत. एखादी कंपनी आपल्या कर्मचाऱ्यांसाठी असे छोटे शहर वसवते. अशा शहरात प्रत्येक घर, दुकान, ऑफिस यांच्या इमारती कंपनीच्या मालकीच्या असतात. सर्व सुखसोयी कंपनीने पुरविलेल्या. आणि मग तेथल्या वसाहतीतील जीवनच कंपनीच्या नियंत्रणाखाली असते. अर्थात अशी सर्व छोटी शहरे गुन्ह्यांपासून मुक्त आहेत असं नाही. अतिशय कडक अशी आर्थिक व सामाजिक नियंत्रणं असली की, गुन्हे कमी होतात. टायनॅनला असं एक शहर सापडलं. त्याचं नाव 'ॲर्गो सिटी.' तेथे दीर्घकाळपर्यंत जवळ जवळ गुन्हेगारी नव्हती. हे शहर ॲरिझोनातील 'ॲर्गोस स्मेल्टिंग ॲन्ड रिफायनिंग' कंपनीच्या संपूर्ण मालकीचं होतं. टायनॅननं या शहराबद्दल चौकशी केली, तेव्हा त्याला कळलं की, तेथे घटनेतील 'बिल ऑफ राइट्स्'खाली जे जे मूलभूत हक्क, जे स्वातंत्र्य दिलं गेलं आहे ते स्थगित केलेलं होतं. जोपर्यंत आर्थिक व सामाजिक सुरक्षा आहे तोपर्यंत तेथे राहणाऱ्यांचा त्याला विरोधही नव्हता. या शहराच्या नियंत्रणाची कायदेशीर रचना लक्षात घेऊन त्या आधारे पस्तिसावी घटनादुरुस्ती टायनॅननं तयार केली. ॲर्गो सिटीमध्ये जर मूलभूत हक्क स्थगित करता येतात तर मग ते साऱ्या अमेरिकेतच स्थगित करता येऊ शकतील, असा अंदाज त्याने बांधला!'

'बाप रे! अघोरीच प्रकार दिसतोय हा सारा.'

'एवढ्यानं काय होतेय. टायनॅननं इथे काय उद्योग केलेत ते बघा. पस्तिसाव्या घटनादुरुस्तीतील प्रत्येक कलम प्रत्यक्षात कसे वापरता येईल याची चाचणी टायनॅनला घ्यायची होती. त्यासाठी ॲर्गो सिटीतील लोकांचा सरळ सरळ त्यानं वापर केला. त्याला आपले एजंटस् तेथे घुसवायचे होते. त्यासाठी त्याने आधी ॲर्गो स्मेल्टिंग ॲन्ड रिफायनिंग कंपनीची चौकशी केली, तेव्हा ते अनेक वर्षे कर बुडवत आहेत असं आढळून आलं. त्या माहितीच्या आधारा-वर त्याने कंपनीच्या अधिकाऱ्यांना ब्लॅकमेल केलं. ही माहिती उघड न करण्याच्या बदल्यात ॲर्गो सिटी चालवण्याचा अधिकार त्याने कंपनीकडून घेतला. पस्तिसावी घटनादुरुस्ती प्रत्यक्षात कशी अमलात येईल याचा प्रयोग त्यानं तेथे केला.'

'काय म्हणता काय? लोकांना मूलभूत हक्क नसलेले शहर अस्तित्वात आहे आपल्या देशात?'

'माझ्या माहितीनुसार तरी आहे,

' पण लोकशाहीत हे करता येणार नाही. हे बेकायदा आहे. '

' एकदा का कॅलिफोर्नियात पस्तिसावी घटनादुरुस्ती मान्य झाली की, ते सर्वत्रच कायदेशीर होईल. तर ते असो. या प्रयोगाचे निष्कर्ष आर डॉक्युमेंटच्या पहिल्या भागात आहेत. '

' आणि दुसऱ्या भागात ?'

' ते नाही बुवा ठाऊक !'

' एवढे दिवस हे सारं काही चालू आहे, यावर विश्वासच बसत नाही. मग अॅर्गो सिटीत केलं काय त्यांनी ?'

' तुम्ही स्वत:च ते पाहिलं पाहिजे. येताय तुम्ही तिथं ?'

' मला याचा छडा लावलाच पाहिजे. यात टायनॅनचं काय कारस्थान आहे ते शोधून काढलंच पाहिजे. पण आपण तेथे जाणं सुरक्षित आहे का ?'

' तिथं फारसे बाहेरचे लोक जात नसावेत असं मी ऐकलं आहे, पण आपण दोघं गेलो तर तसं कुणाच्या लक्षात येणार नाही. '

' कदाचित आपण तिघे असू. '

' तिघे ? मग मात्र ते धोकादायक होईल. ' रॅंडेनबॉग म्हणाला.

' हा धोका पत्करायलाच हवा. ' कॉलिन्सनं उत्तर दिलं. ¤

वॉशिंग्टनला परत जाताच ख्रिस कॉलिन्सनं अमेरिकेतल्या अशा कंपनीच्या नियंत्रणाखालील शहरांचा धडाक्याने शोध सुरू केला. विशेषत: अॅरिझोनातल्या अॅर्गो सिटीची त्याने माहिती मिळवली.

चार दिवसांत त्याच्याकडे या सगळ्या माहितीच्या कागदपत्रांचा ढीग जमला. कंपन्यांच्या शहरांविषयीच्या या फायली चाळता चाळता अॅर्गो सिटीविषयक फाइल जेव्हा त्यानं पाहिली तेव्हा इतर शहरांपेक्षा हे छोटं शहर किती वेगळं आहे, हे त्याच्या लक्षात आलं. अशा इतर शहरांमध्ये प्रत्येक बारीकसारीक गोष्ट न् गोष्ट कंपनीच्या मालकीची आणि तिथल्या लोकांवर कंपनीचं पुरेपूर नियंत्रण अशी स्थिती नव्हती. या शहरामध्ये लोक स्वत: घरं खरेदी करू शकत होते, कधी बाहेरचे लोक येऊन तेथे व्यापार-धंदा करू शकत होते, तसेच कंपनीत काम न करणारेही तेथे राहू शकत होते. पण अॅर्गो सिटीत मात्र ही परिस्थिती नव्हती. तेथलं प्रत्येक घर, प्रत्येक दुकान, प्रत्येक सार्वजनिक व सरकारी सेवा कंपनीच्या मालकीची होती आणि कंपनीचं त्यावर संपूर्ण नियंत्रण होतं. बाहेरच्या कोणालाही तेथे जाऊन घर खरीदता आलं नव्हतं, की दुकान थाटता आलं नव्हतं.

आणि गेल्या पाच वर्षांत तेथे कोणताही गंभीर गुन्हा घडला नव्हता.

हे सारं फार चांगलं होतं किंवा फार भयंकर तरी होतं ! प्रत्यक्ष जाऊन खरं काय ते पाहायलाच हवं होतं. रॅंडेनबॉग, आपण स्वत: तिथं जायचं, तसंच तिसऱ्या एका व्यक्तीलाही बरोबर नेणं आवश्यक होतं, कारण ती व्यक्तीच आता पस्तिसावी घटनादुरुस्ती रोखू शकणार होती.

त्यानं निर्णय घेतला आणि सेक्रेटरीला सांगितलं, ' मला जरा मुख्य न्यायमूर्ती मेनार्डना फोन लावून दे. ते घरी नसतील तर कुठं असतील तिथं शोधून त्यांना फोन लावून दे. मला आत्ताच्या आत्ता त्यांच्याशी बोललंच पाहिजे. ' ¤

जूनमधील शुक्रवारच्या त्या सकाळीदेखील हवेत उष्मा होता. अॅरिझोनातल्या त्या फिनिक्स शहरी तीन व्यक्ती वेगवेगळ्या ठिकाणांहून विमानातून यावयाच्या होत्या.

सर्वांत प्रथम बाल्टिमोरहून ख्रिस कॉलिन्स आला. त्यानं सी. कटशॉ हे नाव धारण केलं होतं. त्यानंतर डोनाल्ड रॅंडेनबॉग कार्सन सिटीहून आला. त्याचं विमान सव्वा तास उशीरा आलं. त्याचं नवीन नाव होतं. डोरियन शिलर.

आणि आता फक्त मुख्य न्यायमूर्ती जॉन जी. मेनार्ड न्यूयॉर्कहून यायचे बाकी राहिले होते. जोसेफ लॅंगेल हे नाव त्यांनी घेतलं होतं.

मेनार्डची वाट पाहायची नाही. त्यांनी परस्पर अॅर्गो सिटीत यायचं हे आधीच ठरलं होतं. विमानतळावर कॉलिन्सशी गाठ पडल्यावर रॅंडेनबॉग म्हणाला,

' मिस्टर कटशॉ ?'

' होय मिस्टर डोरियन शिलर ! ' मग त्याच्या हातात एक पाकीट देत हळू आवाजात तो म्हणाला, ' तू शिलर आहेस हे सिद्ध करणारी सारी कागदपत्रं या पाकिटात आहेत. '

मग दोघे टॅक्सीने अॅर्गो सिटीकडे निघाले. तिथं एक तांब्याची खाण होती. १४,००० वस्तीच्या त्या शहरातील बहुतेक पुरुष त्या खाणीवर काम करीत. थोड्याच वेळात शहराच्या मध्यावर ते येऊन पोचले. इमारती स्वच्छ, चांगल्या अवस्थेत दिसत होत्या. तेथे एक जनरल स्टोअर होतं. टपालकचेरी होती. एक थिएटर, एक छोटं उद्यान, सार्वजनिक ग्रंथालय, चर्च आणि ' बिगुल ' नावाच्या वर्तमानपत्राचं ऑफिस होतं. सर्वांत मोठी चार मजली इमारत होती कॉन्स्टिलेशन हॉटेलची. कॉलिन्स व रॅंडेनबॉग या हॉटेलात गेले. कटशॉ व शिलर नावानं त्यांनी खोल्या घेतल्या. आपल्या या भेटीमागील खरा उद्देश कोणाच्या ध्यानी येऊ नये म्हणून त्यांनी लोकांना पटेल अशी आपल्या भेटीबद्दल एक बनावट कथा रचली होती. कॉलिन्सनं आपल्या साहाय्यकाकडून फिलिप्स इंडस्ट्रीजची लेटरहेड मिळवली होती व त्यावर स्वत:च स्वत:चं परिचयपत्र टाईप केलं होतं. फिलिप्स इंडस्ट्रीजचे प्रतिनिधी म्हणून अॅर्गो सिटीमध्ये आम्ही दोघे आलो आहोत, अॅर्गो स्मेल्टिंग अॅन्ड रिफायनिंग कंपनीच्या या शहरामधील काही नागरी सुधारणांची पाहणी करण्याची परवानगी आम्हाला दिली आहे, अॅरिझोनामधील बिस्बी येथे फिलिप्स इंडस्ट्रीज शहराची पुनर्रचना करीत आहे, तेथे उपयोग करून घेण्याच्या दृष्टीने ही पाहणी आहे, अशी थाप मारण्याचे त्यांनी ठरविले होते.

' मेनार्ड कसली बतावणी करणार ? आपल्या भेटीचं कारण काय सांगणार ?' रॅंडेनबॉगनं विचारलं.

' ते एक पर्यटक म्हणून वावरतील. ते एक सेवानिवृत्त झालेले वकील असून लॉस एन्जलसहून टुस्कोन येथे असलेल्या आपल्या मुलाला व सुनेला भेटायला निघालेले आहेत. वाटेत अॅर्गो सिटीत

**कारण ती व्यक्तीच आता पस्तिसावी घटनादुरुस्ती रोखू शकणार होती.**




थांबलेत. केवळ विश्रांती घेण्यासाठी नव्हे तर, इथे एखादं घर खरीदता येईल का याचा अंदाज त्यांना घ्यायचा आहे. मागे ते एकदा येथे आले असता त्यांना हे शहर आवडलं होते. तेव्हा येथे स्थायिक होण्याचा त्यांचा विचार आहे.'

'ही बतावणी कितपत टिकेल याची मला शंकाच आहे.' रॅंडेनबॉग म्हणाला.

'इथं जे पाहायचंय ते आपलं चार तासांत पाहून होईल. तेवढ्यापुरती ही बतावणी टिकेल. आपली आजची दुपार फार महत्त्वाची आहे. इथे आपण जे शोधून काढू त्या आधारेच पस्तिसाव्या घटनादुरुस्तीचा पराभव होऊ शकेल.' कॉलिन्सनं आपल्या घड्याळाकडे पाहिलं. तो म्हणाला, 'जॉन मेनार्ड यायला पाहिजे आता.'

दहा मिनिटांनी मेनार्ड कॉलिन्सच्या खोलीत आले. त्यांचा अवतार इतका बदलला होता की, ते मुख्य न्यायमूर्ती म्हणून बिलकुल ओळखू येत नव्हते. कॉलिन्सनं त्यांची रॅंडेनबॉगशी ओळख करून दिली. कॉलिन्सकडं वळून मेनार्डन विचारलं–

'आपल्या तपासाला आपण कुठून सुरुवात करायची ?'

तयार केलेलं टाचण हातात घेत कॉलिन्स म्हणाला, 'मला वाटतं तुम्ही ॲग्रो सिटी रिॲल्टी कंपनीला आधी भेट द्यावी. कारण शेवटी तुम्ही इथं स्थायिक व्हायचा विचार करताय असं भासवायचंय ना! आणि मग सेवानिवृत्त वकील या नात्यान इथल्या न्यायाधीशाला आणि त्यांच्यामार्फत शेरीफला तुम्ही भेटू शकाल. जनरल स्टोअर, सुपर मार्केट इथल्या ग्राहकांशी बोलायचा प्रयत्न करा. इथलं वर्तमानपत्र आहे 'बिगुल' नावाचं. त्याच्या वार्ताहराची किंवा संपादकाची जमले तर भेट घ्या. त्यासाठी त्या वर्तमानपत्राचे काही अंक चाळायला लागतील इतकंच.'

'जरा कठीणच आहे काम. फार सावधगिरीनं करायला लागेल सारं.' मेनार्ड म्हणाले.

'कोणाला संशय येण्याआधीच आपण इथून पसार होणार आहोत. मी आणि डोनाल्ड टपालकचेरी, ग्रंथालय येथे जाऊन शहराच्या व्यवस्थापकाला भेटायचा प्रयत्न करू. जितक्या लोकांची गाठ घेता येईल तितक्या लोकांची गाठ घेऊ.' एवढं बोलून कॉलिन्सनं घड्याळाकडं नजर टाकली व तो म्हणाला,

'आता एक वाजून चौदा मिनिटं झालीत. माझ्या खोलीत आपण पुन्हा सायंकाळी पाचला भेटायचं. तोवर आपल्याला सत्य काय ते कळलेलं असेल. न्यायमूर्तिमहाशय, तुम्ही आता प्रथम निघा.'

मेनार्डनी हॅट चढवली व ते बाहेर पडले. त्यानंतर पाच मिनिटांनी कॉलिन्स व रॅंडेनबॉगही सत्याच्या शोधार्थ बाहेर निघाले. ◻

सोनेरी फ्रेमचा चष्मा घातलेला शहराचा व्यवस्थापक भेटायला आलेल्या त्या दोघांना सांगत होता, 'बस ! यापेक्षा अधिक वेळ मी आपल्याला देऊ शकत नाही. सव्वाचार वाजलेत. मला दुसरी अपॉइंटमेंट आहे.'

तो खुर्चीतून उठला आणि कॉलिन्स व रॅंडेनबॉगशी त्यानं हस्तांदोलन केलं. 'गेल्या पाच वर्षांत येथे कधीही सार्वजनिक अशांतता माजलेली नाही. लोक एकत्र जमू नयेत म्हणून सार्वजनिक कार्यक्रमावर आम्ही कायद्यान्वये बंदीच घातली आहे. आता कधी कधी

अढीत एखादा नासका आंबा असतो म्हणा. मी मघा सांगितलं ती इतिहासाची शिक्षिका ही त्यांपैकीच. पण मी आता तिची हकालपट्टी करतोय. बराय मग. बिस्बी शहराच्या पुनर्रचनेत तुम्हाला यश येवो. फिलिप्स कंपनीच्या मिस्टर पिटमनना माझा रामराम सांगा.'

त्याचे आभार मानून कॉलिन्स व रॅंडेनबॉग बाहेर पडले.

शहर व्यवस्थापकांची सेक्रेटरी धावतच त्याच्या खोलीत आली व म्हणाली,

'आता जे दोघे आले होते ते बिस्बी शहराच्या पुनर्रचनेविषयी काही बोलत होते ?'

'हो.'

'पण सर, काही तरी गडबड दिसतेय मला. बिस्बी शहराची संपूर्ण पुनर्रचना काही वर्षांपूर्वीच पुरी झाली आहे. माझ्याकडे त्यासंबंधीची फाईल पण आहे.'

शहर व्यवस्थापक बुचकळयात पडला, 'छे ! कसं शक्य आहे ? बघू ती फाईल.'

सेक्रेटरीनं ताबडतोब ती फाईल आणून दिली. त्यात बिस्बी शहराचे पूर्ण आराखडे व शहरांची पूर्ण पुनर्रचना झाल्यानंतरचे फोटो होते.

व्यवस्थापकाचा चेहरा आता गंभीर दिसू लागला. त्यानं ताबडतोब फिलिप्स इंडस्ट्रीजच्या पिटमन यांना फोन केला. नंतर शेरीफला फोन करून तो म्हणाला,

'मॅक, दोन अनोळखी माणसं आपण फिलिप्स इंडस्ट्रीजची माणसं आहोत असं सांगून वाटेल ती चौकशी करीत फिरताहेत. त्यांच्याकडे फिलिप्स इंडस्ट्रीजच्या पिटमन यांचं पत्र आहे. मी पिटमनकडं चौकशी केली तेव्हा आपण असं काहीही पत्र कुणालाही दिलं नाही, असं त्यांनी सांगितलं. मॅक, आपण त्यांना अटक करू या ?'

'नाही. ते कोण आहेत हे कळेपर्यंत तसं करता येणार नाही. तुला माहीत आहे आपल्याला तसे आदेश आहेत.'

'परंतु मॅक–'

'तू ते माझ्यावर सोडून दे. मी कीलेशी संपर्क साधतो. तो सांगेल काय करायचं ते.' ¤

कॉलिन्स व रॅंडेनबॉग तेथून अॅर्गो सिटी स्कूलमध्ये गेले. इतिहासाची शिक्षिका कुमारी वॅटकिन्स हिची त्यांनी भेट घेतली. बिस्बी येथील स्कूलबोर्डाचे आम्ही सदस्य आहोत अशी थाप मारून त्यांनी तिला माहिती विचारली. वॅटकिन्सला शाळेतून काढून टाकलं होतं. अमेरिकन इतिहास हा विषय शिकवताना तिनं अमेरिकन घटनेची माहिती मुलांना दिली आणि मूलभूत हक्क काय असतात हे सांगितलं होतं. हाच काय तो तिचा अपराध ! या कारणासाठी तिची हकालपट्टी झाली होती. तिला हे गावही सोडावं लागणार होतं. कारण नोकरी करणाऱ्यांनाच तिथं राहायची परवानगी होती. ¤

सायंकाळचे पाच वाजायला पाच मिनिटंच उरली होती. कॉन्स्टिलेशन हॉटेलमधील कॉलिन्सच्या खोलीत ते तिघेही जमले होते.

आपण व रॅंडेनबॉगनं काय चौकशी केली याचा तपशील कॉलिन्सनं थोडक्यात न्यायमूर्ती मेनार्डना सांगितला. शहराच्या व्यवस्थापकानं दिलेली माहिती व इतिहासाची शिक्षिका वॅटकिन्स हिची कहाणी ऐकवली. इतर काही ठिकाणी जाऊन त्यांनी बरीच माहिती मिळवली होती. गावातलं एकमेव किराणा व कापड दुकान कंपनीच्या मालकीचं होतं. सर्व खाणकामगार तेथून माल घेत. या कामगारांना कंपनीनं कूपनंही दिली होती. पैसे संपले की, कूपनवर माल मिळे. म्हणजे पुन्हा सर्व नाड्या कंपनीच्या हातात. त्या गावातील इंचन् इंच जमीन कंपनीच्या मालकीची होती. शेरीफचे ऑफिस, शाळा, रुग्णालय, थिएटर, पोस्ट ऑफिस, चर्च, शहरातलं एकमेव वर्तमानपत्र, एवढंच काय, पण हे हॉटेल देखील कंपनीच्याच मालकीचं. त्यांच्याच नियंत्रणाखाली या सर्व गोष्टी होत्या. येथला कंपनीचा ग्रंथपाल लैंगिक पुस्तकांपेक्षा राजकीय व ऐतिहासिक पुस्तकांवर बंदी घाले. येथल्या टपाल कचेरीत येणारे प्रत्येक पत्र व बाहेर पाठवलेले पत्र फोडून वाचले जाई. शिक्षकांनी काय शिकवावं हे स्कूलबोर्ड ठरवे. शेरीफ कोठल्याही फेरीवाल्याला वा विक्रेत्याला परवाने देत नसे. येथल्या हॉटेलात कोठल्याही बाहेरच्या इसमाला दोन दिवसांहून अधिक काळ राहू दिले जात नसे. कोणी तीन दिवस इथं राहिलं तर उगाच भटकल्याच्या आरोपावरून त्याला अटक होई. एकेक सांगावं. तितकं थोडंच होतं...

ही माहिती सांगितल्यावर कॉलिन्सनं मेनार्डना विचारलं, 'तुम्ही


**एकमेका सहाय्य करू अवघे धरू सुपंथ**

संतशिरोमणी संत तुकाराम महाराजांच्या उक्तीची प्रचीती

योजनाबद्ध सहकारी कार्याचा अनुकरणीय आदर्श

**भारतातील एक अग्रेसर सहकारी साखर कारखाना**

# श्री वारणा सहकारी साखर कारखाना लि., वारणानगर

**तालुका : पन्हाळा, जिल्हा : कोल्हापूर**

ता.– वारणासाकर वारणानगर — फोन नं. वारणानगर–३३

कारखाना उभारणीबरोबरच वारणा परिसराचा शैक्षणिक, सामाजिक, औद्योगिक, सांस्कृतिक, आर्थिक क्षेत्रात कायापालट करून सर्वच क्षेत्रांत स्पृहणीय यश मिळविले आहे.

**आमचा आर्थिक कार्यक्रम**

कामगारांसाठी जीवनावश्यक वस्तू भांडार, कार्यक्षेत्रातील लोकांसाठी वारणा सहकारी ग्राहक मंडळ, कामगारांचा एकमुखी दारूबंदी निर्णय, लघुउद्योगासाठी कामगार सोसायटी व वारणा बँकेमार्फत कर्जपुरवठा, बेकारांसाठी घरे, कार्यक्षेत्रातील सर्व भागांतून यशस्वी खरीप पीक पायलटयोजना– चालू वर्षी २००० एकराची ऊस पीक पायलट योजना हाती घेतली आहे.

पंतप्रधानांच्या २४ कलमी आर्थिक कार्यक्रमाच्या अंमलबजावणीस आम्ही बद्ध आहोत.

**नंदकुमार नाईक** — कार्यकारी संचालक

**निवृत्ती विठोजी घोरपडे** — चेअरमन

**वि. आ. तथा तात्यासाहेब कोरे**

संस्थापक

कुठं कुठं गेलात ? तुम्हाला काय काय आढळलं ?'

'थोडक्यात सांगायचं तर सारं भयंकर आहे, धक्कादायक आहे. मूलभूत हक्कांची एवढया मोठया प्रमाणावर पायमल्ली होत असेल असं वाटलं नव्हतं मला. १७९१ साली पहिल्या दहा दुरुस्त्यांनुसार जे जे 'बिल ऑफ राईट्स्'मध्ये मूलभूत हक्क म्हणून समाविष्ट करण्यात आले आहे त्या सर्वांना येथे पार धुडकावून लावले आहे. एका कॅफेटेरियात बसलो असता मी कागदावर याची सारी नोंदच केली आहे.'

असं म्हणून त्यांनी आपल्या खिशातून कागद काढले व ते वाचू लागले. 'बिल ऑफ राईटस्‌मधली पहिली दुरुस्ती आहे स्वातंत्र्याच्या हमीची. धर्म, वृत्तपत्रे, भाषण, एकत्र येण्याचा हक्क आदी स्वातंत्र्याचा त्यात अंतर्भाव आहे. या अॅगों सिटीत फक्त एकच चर्च आहे. 'बिगुल' हे एकच वर्तमानपत्र आहे. बाहेरच्या बहुतेक सर्व वृत्तपत्रांवर व मासिकांवर बंदी आहे. एकच टी. व्ही. स्टेशन असून ते कंपनीच्या नियंत्रणाखाली आहे. त्यावर ठराविकच कार्यक्रम दाखवले जातात. रेडिओचीही तीच गत. सर्व रेडिओंची विक्री कंपनीच्याच दुकानातून होते. या रेडिओत खास बॅन्ड फिल्टर्स बसवलेले असतात. त्यामुळं त्यावर इतर स्टेशन्स लागतच नाहीत. सभा, मोर्चे यांना परवानगी नाही. चार वर्षांपूर्वी एकदाच येथे निदर्शने झाली होती. निदर्शक कामगारांना अटक करण्यात आली. तुरुंगात त्यांना ठेवायला पुरेशी जागा नव्हती, तेव्हा वाळवंटातील एका छावणीत त्यांना पाठवण्यात आलं.'

'छावणी ?' कॉलिन्सनं विचारलं. 'टूल लेक' इथं अशीच छळ-छावणी उभारण्याचं काम चालू आहे हे त्याला आठवलं.

'होय. चार आठवडे या छावणीत ठेवल्यावर निदर्शकांचा विरोध समाप्त झाला. नंतर गेल्या ४ वर्षांत एकही निदर्शन झालं नाही. दुसऱ्या दुरुस्तीनुसार नागरिकाला शस्त्र बाळगण्याचा हक्क आहे, म्हणजे राज्याला फौज बाळगण्याचा हक्क आहे. पण अॅगों सिटीत मात्र तो नाही. तिसऱ्या दुरुस्तीनुसार कोठलाही सैनिक मालकाच्या परवानगीशिवाय खाजगी जागेत राहू शकत नाही. परंतु इथं आणीबाणीच्या काळात पोलीस कोणाच्याही घरी जाऊन मुक्काम करू शकतात. घराच्या अयोग्य झडतीविरुद्ध नागरिकांना चौथ्या दुरुस्तीअन्वये संरक्षण देण्यात आलं आहे. येथे शेरीफची माणसं वॉरंट नसतानाही कोणाच्याही घरात घुसतात. उरलेल्या इतर घटना दुरुस्ती कलमांच्या अंमलबजावणीबाबत हीच स्थिती आहे. इथं न्यायाधीशसुद्धा कंपनीच नेमते. हा सगळा प्रकारच संतापजनक आहे. निदान अॅरिझोना राज्यानं तरी याविरुद्ध काहीतरी उपाययोजना करायला नको ?'

'ते शक्य नाही. कारण अशा शहरांवर नियंत्रण ठेवणाऱ्या अॅरिझोना कॉर्पोरेशन कमिशनवर अॅगों स्मेल्टिंग अॅन्ड रिफायनिंग कंपनीचंच नियंत्रण आहे.' रॅडेनबॉगनं सांगितलं.

'आपल्या डोळ्यांदेखत हे घडत असता गप्प बसून चालणार नाही. अॅटर्नी जनरल म्हणून मला याबद्दल त्वरित कारवाई केली पाहिजे. अॅगों सिटीची चौकशी करण्यासाठी मला एक पथक पाठवता येईल.' कॉलिन्सनं सांगितलं.

'त्याहून भयानक गोष्ट म्हणजे अॅगों सिटीच्या १४ हजार लोकां-


सर्व ग्राहकांस दीपावली शुभचिंतन

**मालक : जी. आर. देशपांडे**

**पायोनियर रेडिओ क्राफ्टर्स**
अधिकृत विक्रेते :
रेडिओ : मर्फी
पंखे : जी. ई. सी., रॅली, क्रॉम्प्टन
रेफ्रिजरेटर : केल्व्हिनेटर, झेनिथ
टेलिव्हिजन : वेस्टर्न, स्टॅन्डर्ड, संजय, जेम

**फेमस रेडिओ कंपनी**
रेडिओ : बुश, स्टॅन्डर्ड
अधिकृत विक्रेते :
रेफ्रिजरेटर : ऑल्विन
बेगस्टन, स्टॅन्डर्ड टी. व्ही.

**एस. ट्रायो इलेक्ट्रॉनिक्स**
अधिकृत विक्रेते :
रेडिओ : मर्फी, टेलिफंकन
पंखे : उषा
रेफ्रिजरेटर : गोदरेज, जेम
टेलिव्हिजन : टेलिव्हिस्टा
मिक्सर : अॅनसंन

**पत्ता : सेनापती बापट मार्ग, दादर स्टेशनसमोर, ( वेस्टर्न रेल्वे )**

**दादर, मुंबई २८ फोन : ४५८०३५**

पुरतीच ही मूलभूत हक्काची गळचेपी मर्यादित राहणारी नाही. तूच सांगितलंस ना की, पस्तिसाव्या घटनादुरुस्तीच्या अंमलबजावणीची चाचणी अॅग्रो सिटीत घेतली जात आहे म्हणून ! काही वर्षांनी अमेरिकेचं काय होईल याची झलक इथं आपल्याला पाहायला मिळाली. दडपशाहीची ही प्रयोगशाळाच इथं गेली चार वर्षे चालू आहे ' हे सांगत असतानाच मेनार्ड उभे राहून येरझाऱ्या घालू लागले. त्यांच्या मनात प्रचंड खळबळ माजली होती. काही क्षण ते स्तब्ध उभे राहिले आणि मग कॉलिन्स व रॅडेनबॉगला म्हणाले, ' मंडळी, माझा निर्णय ठरला. पस्तिसावी घटनादुरुस्ती कॅलिफोर्नियात मंजूर होता कामा नये. '

आपला आनंद कॉलिन्स लपवू शकला नाही. त्यानं विचारलं, ' तुम्ही काय करणार आहात ?'

' लोकशाही खरंच धोक्यात आहे असा पुरावा सादर केलास, तर मी तुला जे वचन दिलं होतं ते मी आता पुरं करणार आहे. ' आर डॉक्युमेंट 'चा एक भाग तू मला दाखवला आहेस. सुरक्षिततेची किंमत म्हणून फॅसिझमचा उघड उघड स्वीकार इथं होतोय हे मला दिसतंय. हा फॅसिझम सबंध देशात आणायचं यांचं कारस्थान आहे आणि तेही कायद्याच्या बुरख्याखाली ! मी हे घडू देणार नाही. मी राष्ट्राध्यक्षांना फोन करणार. त्यांचं मन वळवायचा प्रयत्न करणार. त्यांनी घटनादुरुस्तीला विरोध करावा हे पटवून देण्याचा प्रयत्न करणार. त्यात अपयश आलं तर, मुख्य न्यायमूर्तिपदाचा राजीनामा देणार आणि मग जाहीरपणे घटनादुरुस्तीला विरोध करणार. कॉलिन्स, तू म्हणतोस ते जर खरं असेल, माझ्या शब्दाला काही मान असेल, तर कॅलिफोर्नियात ही घटनादुरुस्ती मंजूर होणार नाही. ' मेनार्ड यांनी सांगितलं.

कॉलिन्सनं मेनार्डचा हात प्रेमभरानं दाबला.

' चला, आता येथून निघू या. ' कॉलिन्सनं सांगितलं.

' मी माझं सामानसुमान घेऊन येतोच. ' मेनार्ड म्हणाले.

कॉलिन्स व रॅडेनबॉग यांनी आपलं सामान घेतलं व ते हॉटेलबाहेर पडले. दोन मिनिटांनी मुख्य न्यायमूर्ती मेनार्ड हेही बाहेर पडले. हॉटेलच्या दाराशीच एक गॉगल लावलेला अंध वृत्तपत्रविक्रेता उभा होता. ' बिगुल 'चा एक अंक मेनार्डनी खरेदी केला व विक्रेत्याजवळच्या पेटीत पैसे टाकले.

आपल्या मित्रांना त्यांनी गाठलं व अॅग्रो सिटीच्या बाहेर, मुक्त वातावरणाकडे त्यांची मोटार भरधाव निघाली. ¤

कॉन्स्टिलेशन हॉटेलच्या प्रवेशद्वारी उभ्या असलेल्या त्या अंध विक्रेत्यानं आपलं चंबूगबाळं घाईघाईनं आवरलं आणि पांढरी काठी टेकवीत टेकवीत तो एका सार्वजनिक फोनबूथपाशी गेला. त्यानं दार लावून घेतलं आणि कोणाचं लक्ष नाही असं पाहून गॉगल काढला फोनचा रिसिव्हर उचलून त्यानं ऑपरेटरला एक नंबर दिला.

पलीकडं फोनची घंटा घणघणत होती. मग तिकडून आवाज आला. विक्रेत्यानं सांगितलं, ' मला डायरेक्टर टायनॅनशी बोलायचंय. त्यांना सांगा की, फील्ड ऑफीस ' आर ' येथून स्पेशल एजंट कीलेचा फोन आहे. '

' बोल, काय झालं ?' टायनॅनचा आवाज आला. त्याच्या आवाजातील अधीरता जाणवत होती.

' डायरेक्टर टायनॅन ? मी कीले बोलतोय ' आर ' येथून. ते तिघेजण होते, पण मी फक्त दोघांनाच ओळखू शकलो. त्यांपैकी एक अॅटर्नी जनरल कॉलिन्स होते, तर दुसरे होते मुख्य न्यायमूर्ती मेनार्ड ! त्याबद्दल काही शंकाच नाही. मी त्यांना बरोबर ओळखलं...' ¤

## : प्रकरण सातवे :

दुसऱ्या दिवशी सकाळची गोष्ट.

गेल्या पंधरा मिनिटांत राष्ट्राध्यक्ष वॅडस्वर्थ यांचा दोन वेळा फोन आला होता. डायरेक्टर टायनॅननं आयुष्यात प्रथमच राष्ट्राध्यक्षांचा फोन घेणं टाळलं होतं. तो एक टेप ऐकण्यात गढला होता. एका तासापूर्वी मुख्य न्यायाधीश मेनार्ड यांनी राष्ट्राध्यक्षांना फोन केला होता. त्यांनी वॅडस्वर्थशी केलेल्या संभाषणाची ती टेप होती. एफ. बी. आय. न्यायमूर्तींवरही पाळत ठेवून होते व त्यांनी हे संभाषण टेप केलं होतं. ही टेप नीट ऐकल्यावरच राष्ट्राध्यक्षांशी टायनॅनला बोलायचं होतं. त्यामुळे पहिल्या वेळेस ' अजून ते ऑफिसात आले नाहीत ' आणि दुसऱ्या वेळेस ' येतीलच कोठल्याही क्षणी ' असं त्यांना सांगण्यास त्यानं सेक्रेटरीला सांगितलं.

टेप पूर्ण ऐकून झाल्यावर तो हॅरी अॅडकॉकला म्हणाला, ' मला यात काही आश्चर्य वाटत नाही. काल कीलेनं अॅग्रो सिटी येथून फोन केल्यावर मला हा अंदाज आला होता. तेव्हा आता राष्ट्राध्यक्षांना फोन करून त्यांची यावर काय प्रतिक्रिया आहे हे अजमावलं पाहिजे.'

टायनॅननं सेक्रेटरीला राष्ट्राध्यक्षांना फोन जोडून द्यायला सांगितलं.

राष्ट्राध्यक्ष म्हणाले, ' व्हर्नान, सगळंच मुसळ केरात जाणार ! आज पस्तिसावी घटनादुरुस्ती कायमची निकालात निघाली. '

आश्चर्य भासवीत टायनॅननं विचारलं, ' काय, म्हणताय काय ?'

' सकाळी मला मुख्य न्यायमूर्ती मेनार्ड यांचा फोन आला होता. अॅग्रो सिटी हे नाव कधी ऐकलंत का? असं त्यांनी विचारलं. काल रात्री एफ. बी. आय. च्या काही कामगिऱ्यांची माहिती देताना तू याविषयी काही बोलला होतास असं मला आठवलं. मी मेनार्डना सांगितलं, गेली अनेक वर्षे एफ. बी. आय. या शहराची चौकशी करतेय. खुद्द टायनॅन त्याचा प्रमुख आहे. लवकरच तो अॅटर्नी जनरल कॉलिन्सला त्याबद्दल आपला अहवालही सादर करणार आहे. '

' बरोबर. '

' पण मेनार्ड यांनी अॅग्रो सिटी येथील तुझ्या कामाचा वेगळाच अर्थ लावलाय !'

आपण बुचकळ्यात पडलोय, अशा रुक्ष सुरात टायनॅननं विचारलं, ' मला काही समजतच नाही. आता दुसरा कोणता मार्ग काढणार यातून ?'

' पस्तिसाव्या घटनादुरुस्तीची चाचणी घेण्यासाठी अॅग्रो सिटीचा वापर केला जातोय असं मेनार्ड यांचं म्हणणं आहे. आणि या प्रयोगाचे निष्कर्ष तुला समाधान देणारे असले तरी, त्यांना मात्र ते फार भयंकर वाटतात. मेनार्ड आता आपल्या विरुद्ध आहेत.

# एकदा का मेनार्ड यांनी घटनादुरुस्तीला जाहीरपणे विरोध केला की....कॉलिन्स खुशीत होता.

पस्तिसाव्या घटनादुरुस्तीविषयी एक शब्दही ते जाहीरपणे उच्चारणार नव्हते. पण आता ते त्याबद्दल जाहीर वक्तव्य करणार आहेत. त्यांनी मला धमकी देण्याचाही प्रयत्न केला. मी या घटनादुरुस्तीला असलेला पाठिंबा काढून घेतला, तर आपण घटनादुरुस्तीबद्दल चकार शब्दही उच्चारणार नाही आणि मी तसं करायला नकार दिला तर, मात्र जाहीरपणे घटनादुरुस्तीविरुद्ध आपण प्रचार करू असं त्यांनी सांगितलंय.'

'समजतात काय न्यायमूर्ती स्वतःला? राष्ट्राध्यक्षांना धमकी द्यायची म्हणजे काय? तुम्ही काय सांगितलंत मग त्यांना?' टायनॅननं विचारलं.

'मी पस्तिसाव्या घटनादुरुस्तीला सतत पाठिंबा देत आलोय आणि देत राहणार आहे. या दुरुस्तीवर माझा विश्वास आहे आणि ती मंजूर व्हावी अशी माझी इच्छा आहे, असं मी त्यांना सांगितलं.'

'मग त्यावर ते काय म्हणाले?'

'ते म्हणाले, 'मग आता तुम्हीच माझ्यावर ही पाळी आणताय. मी मुख्य न्यायमूर्तिपदाचा राजीनामा देऊन आता राजकारणात शिरणार.' आज दुपारी ते लॉस एंजलसला जाणार. तेथे पाम स्प्रिंग्ज येथील आपल्या घरी एक दिवस राहणार. दुसऱ्या दिवशी ॲम्बॅसॅडर हॉटेलात पत्रकार परिषद घेऊन सुप्रीम कोर्टातील मुख्य न्यायमूर्तिपदाचा राजीनामा दिल्याचे जाहीर करणार. कॅलिफोर्निया राज्याची असेंब्ली व सेनेट यांच्या न्यायालयीन समितीपुढे घटनादुरुस्तीविरुद्ध साक्ष देण्याची इच्छा जाहीर करणार. मी त्यांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला, परंतु ते ऐकायलाच तयार नाहीत. आता काही तासांत ते कॅलिफोर्नियाला जायला निघतीलच. त्यांनी घटनादुरुस्तीला विरोध जाहीर केला की, मग संपलंच सारं. असं काही घडेल याची स्वप्नातही कल्पना नव्हती. आपले सारे प्रयत्न, सारी तयारी एका माणसाच्या हस्तक्षेपामुळं वाया जाणार आहे. आपण आता काय करू शकणार?'

'अजूनही आपण त्याविरुद्ध लढू शकतो.'

'कसं?'

'आताच नक्की सांगता येणार नाही. परंतु काहीतरी मार्ग काढीन.'

'काहीतरी, कोणताही मार्ग शोधून काढ.'

'होय.'

टायनॅननं फोन बंद केला आणि डोळे मिचकावून तो हॅरीला म्हणाला, 'आपण नक्कीच 'काहीतरी मार्ग' शोधून काढू. नाहो?'

त्या दिवशी सायंकाळी कॉलिन्सचा मूड फार चांगला होता. गेल्या अनेक आठवड्यांतील ताण काहीसा कमी झाला होता. मुख्य न्यायमूर्ती मेनार्ड लॉस एंजल्स येथे सपत्नीक पोचले होते व त्यांनी तेथून कॉलिन्सला फोन केला होता. राष्ट्राध्यक्षांशी झालेलं बोलणं त्यांनी याला सांगितलं. एकदा का मेनार्ड यांनी जाहीरपणे घटनादुरुस्तीला विरोध केला की, मग टायनॅनचं सारं कुटिल कारस्थान उलथून टाकता येणार होतं, या कल्पनेनंच कॉलिन्स खुशीत होता.

या खुशीतच त्याने आपली पत्नी कॅरेनला बाहेर जेवायला घेऊन जायचं ठरवलं. जॉकी क्लबमध्ये ते जाणार होते. निघायच्या तयारीत ते होते. इतक्यात फोन वाजला. इश्मेल यंग बोलत होता. टायनॅनचं आत्मचरित्र लिहून देण्याचं काम करणाऱ्या इश्मेलला कॉलिन्सला तातडतोब भेटायचं होत. जॉकी क्लबमध्ये त्याला कॉलिन्सनं जेवायलाच बोलावलं.

ठरल्याप्रमाणं इश्मेल जॉकी क्लबमध्ये आला. कॉलिन्स व कॅरेननं त्याचं स्वागत केलं. व्हर्नान टायनॅन तुमची चौकशी करत आहेत, हे कॉलिन्सला सांगायला तो आला होता. एकदा टायनॅनच्या खोलीत नेहमीप्रमाणे इश्मेल मुलाखत घेत होता. इतक्यात फोन आला. इश्मेल बाथरुममध्ये गेला, पण त्यानं दार किंचित उघडं ठेवलं होतं. टायनॅन ॲडकॉकशी फोनवर बोलत होता. ते काय बोलत होते हे स्पष्ट ऐकू येत नव्हतं, परंतु कॉलिन्सबद्दल ते बोलणं होतं हे नक्की. 'प्रयत्न चालू ठेवा. इतरांचीही चौकशी करा,' असं टॉयनॅन सांगत होते.

कॅरेननं विचारलं, 'इतरांचीही? म्हणजे कोणाची?'

'ते नाही मला ठाऊक. पण मि. कॉलिन्स तुमची चौकशी चालू आहे हे नक्की. तुम्ही टायनॅन यांचे बॉस आहात. तुम्हाला त्यांनी या चौकशीबद्दल सांगायला हवं. इश्मेल म्हणाला.

ॲटर्नी जनरलपदी नियुक्ती होताना एफ. बी. आय. नं कॉलिन्सची तपशीलवार चौकशी केली होती. 'परंतु ही खास चौकशी कशासाठी कोणास ठाऊक? कदाचित माझ्याशी कधीकाळी कोणी संबंधित असेल त्याची माहिती मिळविण्याकरिता ही चौकशी करत असतील!' कॉलिन्स म्हणाला.

गप्पा चालू असताना त्या तिघांचे भोजनही चालू होते. इश्मेलनं आपण टायनॅनचा द्वेष करतो असं सांगितलं. बळजबरीनं पुस्तक लिहिण्याचं काम मला पत्करायला लावलं असं सांगून त्यानं आपली कर्मकहाणी कॉलिन्सला ऐकवली. पॅरिसमध्ये असताना एमी हेन्डरसन नावाच्या पोरीवर इश्मेलचं प्रेम होतं. ब्रिटनमधून हद्दपार करण्यात आलेल्या व अराजकाचा आरोप असलेल्या प्राध्यापकाची ती मुलगी. इश्मेलला तिच्याशी लग्न करायचं होतं. परंतु इश्मेल विवाहित होता. तो अमेरिकेला परतला. त्यानं बायकोला घटस्फोट दिला व एमीला अमेरिकेत आणण्याची तयारी चालविली. दरम्यान टायनॅनला आत्मचरित्र लिहून देण्यासाठी कोणीतरी इश्मेलचं नाव सुचवलं. त्यानं विचारलं, तेव्हा इश्मेलनं नकार दिला. कोणीही नकार दिलेला टायनॅनला आवडत नसे. त्यानं इश्मेलची एफ. बी. आय. मार्फत सारी चौकशी केली तेव्हा एमीचं प्रकरण त्याला समजलं. काम स्वीकारलं नाहीस तर हद्दपार बापाच्या पोरीला अमेरिकेत येण्यास मी प्रतिबंध करीन अशी धमकी देऊन त्यानं इश्मेलला काम स्वीकारायला लावलं होतं.

परंतु हे एवढ्यावरच थांबलं नव्हतं. टायनॅननं इश्मेलचा विश्वासघात केला होता. एमीला अमेरिकेत येण्याची मुभा देतो असं

त्यानं सांगितलं होतं, पण इस्मेलनं काम स्वीकारल्यावर दिवंगत ॲटर्नी जनरल वेंक्स्टर यांना एक पत्र पाठवून एमी हॅन्डरसनला अमेरिकेत प्रवेश देऊ नये असं त्यानं कळवलं होतं. त्यामुळ इस्मेल फार चिडला होता. एमीचं प्रकरण ॲटर्नी जनरलच्या अखत्यारीत येते. तेव्हा तिला अमेरिकेत प्रवेश मिळण्यासाठी अर्जाचा फेरविचार करा अशी विनती त्यानं कॉलिन्सला केली.

जेवण संपत आलं होतं. इस्मेल म्हणाला, 'टायनॅनइतकं दुसरं कोणीही या देशात सामर्थ्यवान आहे असं मला वाटत नाही. मि. कॉलिन्स, तुम्ही, तुमच्या पत्नी किंवा मी यांच्या जीवनातली एकही गोष्ट अशी नसेल की, जी टायनॅनला ठाऊक नाही. पस्तीसावी घटना दुरुस्ती मंजूर झाली तर, टॉयनॅन आणखीच सामर्थ्यशाली बनतील.'

'घटनादुरुस्ती मंजूर होत नाही. परवा दिवशी तिचा संपूर्ण पराभव होईल. तेव्हा तू टायनॅनची काही चिंता करू नकोस.'

कॉलिन्सन त्याला दिलासा देत म्हटल.

सध्या टायनॅन यांनी स्वत:चे कागदपत्र व वॅक्स्टर यांची काही खाजगी कागदपत्रे इस्मेलला पाहायला दिली होती. तो त्यांच्या नकला करून ठेवत होता. वॅक्स्टर यांची एक फाईल कॅबिनेटच त्याला पाहायला मिळाली होती. इस्मेलन हे कॉलिन्सला सांगितल. एमीबद्दलच्या कामाची आठवण देऊन त्यानं कॉलिन्स-दांपत्याचा निरोप घेतला. ◻

फिकट निळ्या रंगाचा नाईटगाऊन घालून कॅरेन जेव्हा बेडरूममध्ये शिरली तेव्हा पलंगाजवळचा एकच दिवा जळत होता. ख्रिस्तोफर कॉलिन्स झोपला होता. 'आजची सध्याकाळ छान गेली त्याबद्दल थॅंक्स–' कॅरेन त्याच्या कानाशी कुजबुजली. कॉलिन्स झोपेतच होता. त्यानं नुसता हुंकार भरला.

कॅरेनला आज काही केल्या झोप लागत नव्हती. तिला इस्मेल यंगचे शब्द आठवत होते. कॉलिन्सची गुप्त चौकशी केली जात होती. त्याबरोबर त्याच्या संबंधातील इतरांचीही चौकशी होत होती. छताकडे एकटक लावून पाहत असता ती विचारात गढली होती. टेक्सासमधील फोर्टवर्थ इथले आपले जुने दिवस तिला आठवले. ती अस्वस्थ झाली. आपण ते ख्रिसला सांगायलाच हवं, अगदी आताच असा विचार करून तिनं त्याला हलवीत म्हटल, 'ख्रिस, डार्लिंग मला तुला काहीतरी सांगायचंय. पूर्वी कधीही सांगितलेलं नाही असं. खरं तर ते या आधीच सांगायला पाहिजे होतं. पण ते असो. तुला भेटायच्या आधीची गोष्ट आहे–कॉलिन्स, ऐकतो आहेस ना?'

कॉलिन्सनं काहीही ऐकलं नव्हतं, कारण तो चक्क घोरत होता, मग त्याला काही सांगायचा नादच कॅरेनन सोडून दिला आणि तीही झोपी गेली. ◻

राष्ट्रीय गुन्हेगारी माहिती केंद्रात हॅरी ॲडकॉक मेरी लॅम्पर्टची वाट पाहत बसला होता. एफ. बी. आय. इमारतीच्या गणकयंत्र विभागातच हे माहिती केंद्र होतं. वेगवेगळ्या माहितीची ही प्रचंड पेढीच होती. केवळ अटक झालेल्यांचीच माहिती तिथं होती असं नाही, तर पुढं-मागं ज्या उपद्रवकारक ठरतील अशा व्यक्तींची. अमेरिकेवर टीका करणाऱ्यांची, सरकारी अधिकाऱ्यांची अमेरिकन कॉंग्रेसच्या सभासदांची माहिती तिथं होती. दहा वर्षांहून अधिक वय असलेल्या बहुतेक सर्वांची माहिती तिथं होती. यंदा वाहतुकीचे गुन्हे वगळून ९० लाख जणांना विविध गुन्ह्यांबद्दल अटक होईल असा अंदाज होता. यातील निम्म्या लोकांवर खटले भरले जाणार नाहीत; तरी त्यांची सारी माहिती या केंद्रात पाठवली जाईल. 'आयडेंटिफिकेशन डिव्हिजन' मध्ये बोटांच्या ठशांचे रोज ३४ हजार नमुने येत. त्यांपैकी १५ हजार ठसे पोलिसांकडून व १९ हजार सरकारी यंत्रणांकडून पाठविले जात.

या सर्व यंत्रणेतून कोणी निसटणं शक्यच नव्हतं. परंतु कॉलिन्सच्या बाबत मात्र कितीही करून चौकशी केली तरी त्याच्या पूर्वायुष्यात आक्षेपार्ह असं काहीच आढळत नव्हतं. टायनॅननं ॲडकॉकला कॉलिन्सची कसून चौकशी करण्याची आज्ञा दिली होती. पण त्याला यश येत नव्हतं. मेरी लॅम्पर्ट या विभागातील एक वरिष्ठ अधिकारी होती. कॉलिन्सबद्दल किंवा त्याच्या संबंधितांबद्दल आणखी काही माहिती मिळाली का हे विचारायलाच ॲडकॉक इथं आला होता.


समोरून मेरी येत होती. ती एखाद्या वरिष्ठ अधिकाऱ्यासारखी दिसत नव्हती. तशी आवश्यकता नव्हती. कारण तिच्या अनेक कामांपैकी ते एक काम होतं. ती टायनॅनची खास दोस्त होती. आठवड्यातून पाच दिवस एफ. बी. आय. कचेरीत काम करायचं आणि एक रात्र टायनॅनच्या उपनगरातील घरी घालवायची हे तिचं काम. दर शुक्रवारी रात्री ती टायनॅनच्या घरी जायची. अशा प्रकारे गेले तीन वर्ष ती आठवड्यातून एकदा टायनॅनची शय्यासोबत करत होती.

ॲडकॉकला पाहताच मेरी म्हणाली 'आनंदाची बातमी. ही माहिती आताच हाती आली' तिनं एक फाईल त्याच्यापुढं टाकली.

ॲडकॉक फाईल चाळू लागला. तो जसजसे एकेक कागद पाहत होता तसतसे त्याच्या चेहऱ्यावरचे भाव बदलत होते. बोटांच्या ठशांचं कार्ड, अन्य कागद त्याने न्याहाळले आणि त्याच्या तोंडून आश्चर्योद्गार बाहेर पडला, 'अरे बापरे!' ◻

सकाळी ८ वाजायला १० मिनिटं कमी होती. बाथरूममधल्या आरशापुढं उभा राहून कॉलिन्स दाढी करत होता. त्यानं ब्रशनं तोंडाला पुन्हा साबण फासला. रेझरनं दाढी करता करता त्याच्या

दिवाळी शुभचिंतन
काशिनाथ नारायण परांजपे
सोनें-चांदीच्या व मोत्यांच्या
दागिन्यांचे व्यापारी
७२ काऊलेन, घाटकोपरवाला चाळ, मुगभाट, मुंबई ४.
(फोन . ३५५१७६)


दीपावली शुभचिंतन
कमिन्स डिझेल
सेल्स ॲन्ड सर्व्हिस (इंडिया) लिमिटेड
कोथरुड, पुणे ४११ ०२९
वितरक:
किर्लोस्कर कमिन्स लिमिटेड, पुणे
कमिन्स इंजिन्स कंपनी, अमेरिका
कमिन्स इंजिन्स कंपनी, इंग्लंड
PRATIBHA 765

डोक्यात पस्तिसाव्या घटनादुरुस्तीचेच विचार चालू होते. दोन दिवसांपूर्वी न्यायमूर्ती मेनार्ड यांचा फोन आल्यापासून तो खूष होता. सॅक्रॅमेन्टो इथं मेनार्ड घटनादुरुस्तीला विरोध करणारे पहिले भाषण करणार होते. त्यांचं हे भाषण झालं की, मग टायनॅन आणि कंपनीचा पराभव हमखास ठरलेलाच होता.

कॉलिन्सनं तोंड स्वच्छ केलं, टॉवेलनं चेहरा पुसला व मग एक निळा शर्ट अंगावर चढवला. घड्याळाकडे त्यानं नजर टाकली बरोबर आठ वाजले होते. याचा अर्थ कॅलिफोर्नियात पहाटेचे पाच वाजलेले असणार. मेनार्ड उठले असतील. नंतर पाम स्प्रिंग्जहून ते मोटारने लॉस एंजल्सला जाणार. तो प्रवास दोन तासांचा आहे. तेथे पोचल्यावर पत्रकार परिषदेत ते आपल्या राजीनाम्याची घोषणा करणार, त्यामुळं सारा देश हादरेल. घटनादुरुस्तीविरुद्ध कॅलिफोर्नियानं मत द्यावं हे त्यांचं आवाहन ऐकून तर एकच खळबळ माजेल. दुपारी कॅलिफोर्निया असेंब्ली व सिनेटच्या न्यायसमितीपुढे ते भाषण करून आपला हा विरोध जाहीर करतील. हे सारं आठवून कॉलिन्स स्वत:शीच पुटपुटला, 'आता सत्याचा, लोकशाहीचा विजय व्हायला काहीच तास उरलेत.' कॅलिफोर्निया असेंब्ली व सिनेटमध्ये काही तासांनंतर मतदान होईल. खरं तर मेनार्ड यांच्या भाषणानंतर असेंब्लीतच ही घटनादुरुस्ती फेटाळली जाईल. सिनेट-पर्यंत ती जाणारच नाही. विजय मिळणार या कल्पनेनंच कॉलिन्स हुरळून गेला होता. आता या वयाला व पदाला शोभत नाही याची जाणीव असूनही तो आनंदी मूडमध्ये चक्क शीळ वाजवीत होता! तो टाय बांधू लागला. कॅरेनबरोबर न्याहारी करून त्याला ऑफिसला निघायचं होतं.

इतक्यात बाथरूमच्या दारावर टकटक झालं. कॅरेन आली होती.

'ख्रिस!'

'हं, बोल.'

'कोणीतरी तुला भेटायला आलंय. डोरियन शिलर असं नाव त्यानं सांगितलं. तुमचा मित्र आहे म्हणे तो'

'डोरियन शिलर?' बाथरूमचं दार उघडीत कॉलिन्स म्हणाला, 'डोनाल्ड रॅडेनबॉगचं ते नवं नाव आहे. त्याला हॉलमध्ये बसवून ठेव. मी येतोच एक मिनिटात.'

कॉलिन्स सूट घालीत विचार करू लागला. रॅडेनबॉग यावेळेला इथं कशाला आला असावा? ॲग्रो सिटीहून परतल्यावर एकदाच तो प्रत्यक्ष त्याला भेटला होता. बाकी सगळं फोनवरच बोलणं व्हायचं. मॅडिसन हॉटेलातील दोन खोल्यांत त्याची राहायची सोय केली होती. देशातील गुन्हेगारी आणि अशांतता यांचा बिमोड करण्यासाठी पर्यायी योजना सुचविण्याचं काम त्याच्यावर सोपविलं होतं. पस्तिसावी घटनादुरुस्ती नामंजूर झाली की, ही योजना कॉलिन्स राष्ट्राध्यक्षांना सादर करणार होता. रॅडेनबॉगनं सहसा हॉटेल सोडू नये. हे काम दिवसभर करत बसावं, असे त्याला सांगितलेलं होतं. असं असूनही तो इथं आला म्हणजे काहीतरी खास काम असावं, असा तर्क कॉलिन्सनं बांधला. हॉलमध्ये शिरताच हस्तांदोलन करीत तो म्हणाला,

'डोनाल्ड, तू येशील अशी कल्पना नव्हती माझी.'

कॅरेननं कॉफी, टोस्ट, सरबत वगैरे आणून ठेवले. रॅडेनबॉगचा चेहरा कसल्या तरी भयंकर चिंतेनं ग्रासलेला होता. तो थरथरतच म्हणाला,

'अत्यंत वाईट बातमी आहे. सकाळी उठलो की टी. व्ही. लावायची माझी सवय आहे. सकाळी सहा वाजल्यापासून 'ती' बातमी सांगताहेत. मी तावडतोब तुम्हाला फोन करायचा प्रयत्न केला. पण तुमचा खास फोननंबर लिहिलेला कागदच हरवला. त्यामुळे मी प्रत्यक्षच आलो.'

'पण घडलंय तरी काय असं? तू तर कमालीचा अस्वस्थ झालेला दिसतोयस्. काय झालंय काय?'

रॅडेनबॉग जोरजोराने श्वासोच्छ्वास घेत होता. 'कशी सांगू मी ती बातमी!–'

'अरे सांग ना!'

'मुख्य न्यायमूर्ती मेनार्ड व त्यांची पत्नी या दोघांचा काल रात्री एका घरफोड्यानं खून केला!'

कॉलिन्सच्या डोळ्यांसमोर एकदम अंधारी आली. त्याने अडखळत विचारलं,

'मेनार्ड–मेनार्डचा...खून, माझा...विश्वासच नाही बसत.'

'कॅलिफोर्नियातील पामस्प्रिंग्ज येथील आपल्या घरी मेनार्ड व त्यांची पत्नी ॲबिगेल गाढ झोपले होते. कोणीतरी मागच्या दाराने घरात शिरले. ती व्यक्ती त्यांच्या बेडरूममध्ये गेली. या हालचालीनं मेनार्डना जाग आली असावी. त्यांनी उठण्याचा प्रयत्न केला. इतक्यात त्या व्यक्तीनं त्यांच्या छातीवर व डोक्यावर गोळी झाडली. मेनार्ड तात्काळ मरण पावले. दरम्यान त्यांची पत्नीही जागी झाली. तेव्हा पिस्तुलधाऱ्यानं तिच्यावरही तीन गोळ्या झाडल्या.'

'किती निर्घृण. इतकी वाईट बातमी कधी ऐकली नव्हती.' कॉलिन्स अस्वस्थपणे एका हाताची मूठ दुसऱ्या पंजावर आपटीत येरझारा घालू लागला.

टी. व्ही. लावला तर सर्व बातमी समजेल असं रॅडेनबॉगनं सुच-विलं. कॉलिन्सनं टी. व्ही. चालू केला, पॉम स्प्रिंग्जमधील मेनार्ड यांच्या घराबाहेरील दृश्य टी. व्ही. वर दाखविण्यात येत होते. पोलिसांनी घराबाहेर कडं केलं होतं. साध्या कपड्यातील डिटेक्टिव्ह्ज् ये–जा करीत होते. टी. व्ही. चा एक वार्ताहर बोलू लागला.

'या जागीच आज पहाटे अमेरिकेचे मुख्य न्यायमूर्ती जॉन जी. मेनार्ड व त्यांची पत्नी ॲबिगेल यांचा अज्ञात व्यक्तीकडून खून झाला. दोघांची प्रेते एक तासाभरापूर्वी हलविण्यात आली. त्यांचा खुनीही सापडला. त्याचे नाव अजून कळले नाही. पोलिसांनी केलेल्या गोळी-बारात तो ठार झाला. त्याचेही प्रेत हलविण्यात आले आहे.' मग त्या वार्ताहराने थोडक्यात खुनाची हकीकत सांगितली. मेनार्ड यांच्या घरी जादा सुरक्षेच्या दृष्टीने पलंगाजवळच भिंतीवर धोक्याचा

**मेनार्ड....मेनार्डचा....खून....माझा विश्वासच नाही बसत....**

इशारा देणारे एक बटण बसविले होते. ते दाबले की, एकदम पोलिसांनाच इशारा मिळे. मारेकरी जेव्हा त्यांच्या बेडरूममध्ये शिरला तेव्हा त्यांनी हे बटण दाबलं असं पोलिसांचं म्हणणं आहे. तात्काळ पोलिसांची गाडी घटनास्थळी रवाना झाली. त्यावेळी या दोघांचा खून करून काही वस्तू चोरून पिस्तुलधारी इसम पळ काढीत होता. पोलिसांनी त्याचा पाठलाग सुरू केला, तेव्हा त्याने गोळ्या झाडायला सुरुवात केली. पोलिसांनी त्याला गोळीबारानेच उत्तर दिले. तो जागच्या जागी ठार झाला. त्याची ओळख पटेल असं काहीही त्याच्याकडे मिळालं नाही.

वार्ताहरानं आपला वृत्तान्त संपवीत म्हटलं, 'आता आम्ही तुम्हाला लॉस एंजल्स येथील आमच्या वृत्तकक्षात नेत आहोत. तेथे यासंबंधी आणखी काही माहिती सांगितली जाईल !'

कॉलिन्सला काही सुचेनासं झालं होतं. रँडेनबॉगनं त्याला सिगरेट दिली. ती घेत तो म्हणाला, 'आधी मला कॉफी हवीय्.'

आतून जाऊन त्याने कोमट कॉफी आणली व दोघांच्या कपात ओतली.

टी. व्ही. वरील कार्यक्रम चालूच होता. एक निवेदक सांगत होता, 'लॉस एंजल्स येथील परवा दिवशी मेनार्ड यांचं आगमन झालं. त्यांची भेट अनपेक्षित होती. सॅक्रॅमेंट येथील असेंब्लीचे सभापती व आपले मित्र जेम्स गफी यांना त्यांनी काल फोन केला होता आणि असेंब्लीच्या न्यायसमितीपुढे पस्तिसाव्या घटनादुरुस्तीबद्दल बोलण्याची इच्छा व्यक्त केली होती. तसंच येथल्या ॲम्बॅसॅडर हॉटेलात पत्रकार परिषदही ते घेणार होते. ते घटनादुरुस्तीच्या बाजूने बोलणार होते की विरुद्ध, पत्रकार परिषदेत त्यांना काय सांगायचं होतं हे आता आपल्याला कधीच समजायचं नाही. आताच हाती आलेल्या माहितीनुसार राष्ट्राध्यक्ष वॅडस्वर्थ हे मेनार्ड यांच्या निधनाबद्दल काही निवेदन करणार आहेत. तेव्हा आता तुम्हाला आम्ही व्हाइट हाऊसमध्ये घेऊन जात आहोत.'

राष्ट्राध्यक्षांचा शोकसंदेश हा नेहमीच्याच पद्धतीचा होता. मेनार्ड यांच्या कारकीर्दीची प्रशंसा त्यांनी या दुखवट्यात केली होती.

मेनार्ड यांच्या निधनाबरोबरच या देशातील लोकशाहीदेखील गतकाळात जमा होणार, मरण पावणार असं कॉलिन्सला वाटलं. मग उरेल ती फक्त पस्तिसावी घटनादुरुस्ती व टायनॅन. त्याच्या इच्छेनुसार देशात सारं घडत राहील हा विचारच रक्त गोठवणारा होता.

टायनॅनचा विचार त्याच्या मनात घोळत असतानाच त्याला टी. व्ही. वर टायनॅनचं नाव ऐकू आलं. निवेदक सांगत होता, 'आता एफ. वी. आय. चे डायरेक्टर टायनॅन मेनार्ड यांना श्रद्धांजली वाहतील.'

मग टायनॅन टी. व्ही. वर दिसू लागला. हातातील निवेदन तो वाचू लागला. 'देशातील एका असामान्य व्यक्तीची ही अमानुष हत्या आहे. ही पोकळी कधीही भरून येणारी नाही. मला आत्ताच कळलं की, त्यांच्यावर हल्ला करणाराची ओळख पटलेली आहे. एफ. वी. आय. काही वेळातच ते जाहीर करील. हा खुनी पूर्वी अनेक वेळा शिक्षा झालेला इसम असून आपल्या 'बिल ऑफ राइटस्'मध्ये

With The Best Compliments
Of

**SONADYES AND CHEMICALS**

3 Sea Breeze, Khan Abdul Gaffar Khan Road,
Worli, BOMBAY 400 018.

दिलेल्या हक्कांनुसार तो कोठेही खुशाल भटकत होता ! जर महिन्या-पूर्वी घटनादुरुस्ती झाली असती तर आजची दुर्घटना घडली नसती. बंधूभगिनींनो, यापासून आपण धडा शिकला पाहिजे.'

दातओठ खात कॉलिन्स म्हणाला, 'हा नालायक टायनॅन प्रेताच्या टाळूवरचं लोणीदेखील खायला कमी करणार नाही. मेनार्ड यांचा खून होऊन अवघे काही तास झाले नाहीत तोच, हा आपलं घटनादुरुस्तीचं घोडं पुढं दामटायला तयार !'

इतक्यात टी. व्ही. वर घोषणा झाली–, 'मुख्य न्यायमूर्ती मेनार्ड यांच्या खुन्याचं नाव एफ. बी. आय. नं जाहीर केलंय. त्याचे नाव आहे 'रॅमन एस्कोबार.' त्याचं वय ३२ वर्षांचं असून तो अमेरिकन नागरिक आहे. एफ. बी. आय.ने पाठवलेले या खुन्याचे हे काही फोटो.'

आणि मग लागलीच रॅमन एस्कोबारचे काही फोटो टी. व्ही.वर दाखविण्यात आले. मोठे कल्ले, गालफडं बसलेली, आणि जबडयावर व्रण असे त्याचे छायाचित्र पाहताच रॅडेनबॉग ओरडला,

'ओह–नाही. नाही...शक्य नाही...' रॅडेनबॉगचे डोळे विस्फारले होते. टी. व्ही.कडं बोट दाखवीत काहीतरी सांगायचा प्रयत्न तो करीत होता. उठून उभ्या राहिलेल्या रॅडेनबॉगला कॉलिन्सनं आधी खुर्चीवर बसवलं. तरी तो ओरडतच होता,

'हाच तो इसम. हाच–हाच.'

त्याला शांत करीत कॉलिन्सनं विचारलं, 'आधी काय झालं ते नीट सांग बघू.'

'तो पाहा मेनार्डचा खून करणारा इसम. त्याचं नाव टी. व्ही. वाल्यांनी सांगितलं रॅमन एस्कोबार. मी हे नाव फिशर बेटावर ऐकलंय. टायनॅननी मला साडेसात लाख डॉलर्स फिशर बेटावर जाऊन ज्याला द्यायला सांगितले होते तोच हा इसम. कंदिलाच्या प्रकाशात मी या एस्कोबारला व त्याच्या साथीदाराला नीट पाहिलेलं आहे. माझ्यावर विश्वास ठेवा. हाच तो इसम. याचा अर्थ मेनार्डचा काटा काढण्यासाठी टायनॅनला माझे पैसे हवे होते ! धंदेवाईक मारेकऱ्याला त्याला हे पैसे द्यायचे होते. हे पैसे कोठून आले याची कोणीही विचारणा करणार नाही अशी दक्षता त्याला घ्यायची होती. तेव्हा टायनॅनचंच हे सारं कारस्थान. पस्तिसाव्या घटनादुरुस्तीच्या बचावासाठी थेट मुख्य न्यायमूर्तींचा खून करेपर्यंत त्याची मजल गेली !'

'गप्प बस पाहू. हे काही तुला सिद्ध करता येणार नाही. माझा तुझ्यावर विश्वास आहे. पण तुझ्यावर दुसरं कोण विश्वास ठेवणार ?'

'मी पोलिसांकडे जाईन. काय घडले ते सांगेन. टायनॅनच्या वतीने मी या खुन्याला पैसे पोचवले असं सांगेन.'

मान हलवीत कॉलिन्स म्हणाला, 'त्याचा काही उपयोग होणार नाही.'

'का नाही होणार ? हॅरी ॲडकॉक, वॉर्डन जेन्किन्स यांना सत्य ठाऊक आहे की !'

'ते बोलणार नाहीत. आणि डोनाल्ड रॅडेनबॉग या नात्यानं तू हे सांगू शकला असतास. परंतु रॅडेनबॉग हा आता अस्तित्वातच नाही.'

'हा काय मी आहे ना ?'

'सॉरी, तू आता डोरिअन शिलर आहेस. तेव्हा तुला काहीही बोलता येणार नाही. आता मी सरळ राष्ट्राध्यक्षांनाच जाऊन भेटतो आणि सारी माहिती त्यांच्यापुढे मांडतो. टायनॅनच्या कारवाय सांगतो. मेनार्ड यांचा घटनादुरुस्तीला विरोध होता हेही त्यांच्य कानावर घालतो.'

८

## : प्रकरण आठवे :

व्हाइट हाऊसमधील आपल्या ओव्हल ऑफिसात राष्ट्राध्यक्ष वॅडस्वर्थ बसले होते. समोरच्या खुर्चीवर ॲटर्नी जनरल कॉलिन्स बसला होता.

'एफ. बी. आय.चा डायरेक्टर टायनॅनला मी काढून टाकावं असं तुझं म्हणणं आहे ?' वॅडस्वर्थनी विचारलं.

टायनॅनच्या सर्व कारवाया कॉलिन्सनं त्यांना तपशीलवार सांगितल्या होत्या. 'टूल लेक' येथे छळ-छावणी बांधण्याचं चालू असलेलं काम, 'आर डॉक्युमेंट'चा पहिला भाग, लेव्हिसबर्ग तुरुंगात जाऊन टायनॅननं रॅडेनबॉगची केलेली सुटका, त्याच्याकडं साडेसात लाख डॉलर्सची केलेली मागणी, ते पैसे ज्या रॅमन एस्कोबारला दिले त्यानंच मुख्य न्यायमूर्ती मेनार्ड यांचा खून केला. या सर्व गोष्टी सांगून त्यानं टायनॅनची एफ. बी. आय.च्या डायरेक्टरपदावरून हकालपट्टी करायची मागणी केली होती.

कॉलिन्सनं उत्तर दिलं, 'हो. तुम्ही टायनॅनला काढून टाका. त्यासाठी तुम्हाला पस्तिसाव्या घटनादुरुस्तीवर पाणी सोडावं लागेल, परंतु त्यामुळं घटना वाचेल. गुन्हे व अशांतता यांना आळा घालण्यासाठी एक पर्यायी योजना मी तुमच्यापुढं सादर करीन. अर्थात हे सारं टायनॅनची उचलबांगडी केल्यावरच होईल.'

पेपरनाईफशी चाळा करीत वॅडस्वर्थनी पुन्हा विचारलं, 'मी खरंच टायनॅनला हाकलून लावावं असं वाटतं तुला ? आपल्या प्रशासनातील तो अत्यंत कार्यक्षम व लोकप्रिय माणूस आहे. आणि त्याच्याविरुद्ध पुरावा काय आहे ? 'टूल लेक' इथं कोठली कंपनी बांधकाम करते आहे ? ॲर्गो सिटी इथं टायनॅननं चौकशी चालवली आहे. परंतु त्याचा तो गैरवापर करतोय हे सिद्ध करता येईल का ? रॅडेनबॉगशी त्यानं गुप्त करार केला याला पुरावा काय ? एस्कोबारला साडेसात लाख डॉलर्स नेऊन द्यायला टायनॅननं सांगितलं याला आधार काय ? 'आर डॉक्युमेंट'बद्दल प्रत्यक्ष बॅक्स्टर तुला बोलले काय ? कुठं आहे हे डॉक्युमेंट ? ते टायनॅननंच तयार केलं हे कशावरून ? तेव्हा कॉलिन्स, केवळ बिनबुडाच्या, पुरावा नसलेल्या आरोपांवर विश्वास ठेवून मी एका कर्तबगार अधिकाऱ्याला काढू शकत नाही.'

'याचा अर्थ तुम्ही त्याला व त्याच्या पस्तीसाव्या घटनादुरुस्तीला पाठिंबा देत राहणार ?'

'हो. त्याखेरीज मला दुसरा मार्गच नाही.'

'मलाही मग दुसरा पर्याय नाही.' खुर्चीतून उठत कॉलिन्स म्हणाला, 'तुम्ही जर टायनॅनला नोकरीत ठेवणार असाल, तर मग मी नोकरीवर राहू शकत नाही. ॲटर्नी जनरलपदाचा त्याग करण्याखेरीज मला दुसरा मार्गच नाही. ऑफिसात गेल्यावर राजीनाम्याचं

औपचारिक पत्र तुम्हाला पाठवून देतो. त्यानंतरचा प्रत्येक क्षण मी घटनादुरुस्तीच्या विरुद्ध लढण्यासाठी घालवणार आहे.'

बोलणं संपवून तो चालू लागला. राष्ट्राध्यक्षांनी त्याला हाक मारून परत बोलावलं. त्यांच्या चेहऱ्यावर निराशेची झाक होती. ते म्हणाले, 'ख्रिस, पुन्हा विचार कर. नाहीतर पश्चात्तापाची पाळी यईल. देशाच्या दृष्टीनं हा पेचप्रसंग आहे. आपण सारे एकाच बोटीतून चाललोय. तेव्हा ती उगाच हेलकावू देऊ नकोस.'

'मी बोटीतून उडी मारायचं ठरवलंय. पोहायचं किंवा बुडायचं ते स्वतःच्या हिंमतीवर असं मी ठरवलंय. तेव्हा अच्छा.' एवढं बोलून तो ओव्हल ऑफिसातून बाहेर पडला. ◻

कॉलिन्स ज्या दारानं निघून गेला त्या दाराकडे राष्ट्राध्यक्ष मिनिटभर पाहत राहिले. नंतर त्यांनी फोन उचलला. त्यांची वैयक्तिक सेक्रेटरी लेजरनं फोन घेतला. राष्ट्राध्यक्ष म्हणाले, 'एफ. बी. आय. चे डायरेक्टर टायनॅनला फोन कर. त्याला एकटयालाच मला भेटायचंय, तावडतोब, असं सांग.' ◻

राष्ट्राध्यक्षाकडून ऑफिसात आल्या आल्या ख्रिस कॉलिन्सनं कॅरेनला फोन केला. गेल्या काही आठवड्यांत आपल्या जीवनात झपाट्यानं घडणाऱ्या घटना तिला सांगायला त्याला वेळच मिळाला नव्हता. 'मी या पदाचा राजीनामा द्यायचं ठरवलंय. सर्व कागदपत्रांची आवराआवर करतो व मग घरी जेवायला येतो. जरा उशीर होईल इतकंच. तसंच रात्री उशिराचं विमान पकडून आपल्याला कॅलिफोर्नियाला जायचंय.' असं त्यानं तिला सांगितलं.

फोन बंद केल्यावर त्यानं आपली सेक्रेटरी मॅरिअनला बोलावून घेतलं. आजच्या, उद्याच्या, सबंध आठवड्यातल्या व त्यापुढील आठवड्यातील आपल्या सर्व अपॉइन्टमेन्ट्स रद्द करायला त्यानं तिला सांगितलं. हे ऐकून ती बुचकळ्यातच पडली. कॉलिन्स म्हणाला, 'नंतर मी तुला सारं काही सांगतो. अपॉइन्टमेन्ट्स रद्द कर व आज रात्रीच मी व मिसेस कॉलिन्सचं कॅलिफोर्नियाचं विमानाचं तिकीट रिझर्व्ह कर.'

'पण आज रात्री तुम्हाला शिकागोला जायचंय. एफ. बी. आय.च्या माजी एजंटांच्या परिषदेपुढे उद्या तुमचं शिकागो इथं भाषण आहे व नंतर टोनी पिअर्सला तुम्ही भेटणार आहात.' मॅरिअननं आठवण करून दिली.

'शिकागोला मी जाऊ शकत नाही, हे तेथल्या लोकांना कळवून टाक आणि टोनी पिअर्सला म्हणावं, शिकागोच्या ऐवजी सॅक्रॅमेन्टो इथं उद्या सकाळी मी त्याला भेटेन.' कॉलिन्सनं फर्मावलं.

मॅरिअन जाताच एकेक कागद निकालात काढायला त्यानं सुरुवात केली. त्या फायलींत एमी हेन्डरसनच्या कागदपत्रांची फाईल पाहून त्याला बरं वाटलं. ती इश्मेल यंगची प्रेयसी होती व तिला फ्रान्सहून अमेरिकेत यायचं होतं. तिला तशी परवानगी देणाऱ्या पत्रावर कॉलिन्सनं सही केली. 'हे पत्र तावडतोब 'इमिग्रेशन' खात्याला पाठवून दे व त्याची एक प्रत इश्मेल यंगला धाडून दे', असं त्यानं आपल्या सेक्रेटरीला सांगितलं.

मग त्यानं राजीनाम्याचं पत्र लिहिलं. मग त्याला वाटलं, हे टाईप करून घ्यावं. त्यानं ते पुन्हा वाचलं. ते हातात घेऊन आपल्या ऑफिसात व शेजारच्या परिषद दालनात तो येरझाऱ्या घालू लागला. ऑलिव्हर वेन्डेल होम्सचा संगमरवरी अर्धपुतळा तो निरखीत असता मॅरिअन तिथं आली व म्हणाली,

'डायरेक्टर टायनॅन तुम्हाला भेटायला आले आहेत.'

'टायनॅन? आणि इथं आलेत?'

'रिसेप्शनरूममध्ये ते थांबलेत.'

कॉलिन्सला आश्चर्याचा धक्का बसला. टायनॅनची ही भेट अत्यंत अनपेक्षित होती. 'त्यांना पाठवून दे आत.' त्यानं फर्मावलं.

हातात एक ब्रीफकेस घेऊन टायनॅन आत आला. 'सॉरी, पण काम महत्त्वाचं होतं, तेव्हा यावं लागलं.' हस्तांदोलन करीत त्यानं कॉलिन्सला सांगितलं.

'चला, माझ्या ऑफिसात बसू या.'

परिषद सभागृहात चौफेर नजर टाकून तो म्हणाला, 'नको, इथंच बरं. आपलं बोलणं कोणी ऐकता कामा नये.'

'व्हर्नान, माझ्या ऑफिसात मी कोणाचंही बोलणं चोरून ऐकत नाही. आपल्याकडे येणाऱ्या माणसांचे संभाषण टेप करावं अशी माझी प्रथा नाही,' कॉलिन्सनं त्याला डिवचीत म्हटलं.

'मुद्द्याचं बोलू या. मी राष्ट्राध्यक्षांकडे आताच जाऊन आलो. तू त्यांच्याकडं गेला होतास आणि तू त्यांना काय काय सांगितलंस हे मला समजलं. मात्र माझी हकालपट्टी करा, हे सांगण्यापर्यंत तुझी मजल पोचली ही मात्र कमाल आहे. आता माझ्या भानगडीत तू नाक खुपसलंस तेव्हा मीही तुझ्या भानगडींची चौकशी केलीय. दुसऱ्याच्या चांभारचौकशा करण्याआधी स्वतःचं घर नीट आहे की नाही, हे बघ.'

'म्हणजे?' कॉलिन्सनं विचारलं.

आपल्या ब्रीफकेसमधील एक फाईल काढून ती पुढे करीत टायनॅन म्हणाला, 'हे काय आहे ते बघ! संशयास्पद इतिहास असलेल्या एका बाईबरोबर तू लग्न केलेलं आहेस. तुझ्या बायकोचं मूळ नाव कॅरेन ग्रॅण्ट. तिनं थॉमस रॉबले नावाच्या इसमाशी लग्न केलं होतं. तुला लॉस एंजल्स येथे भेटण्याआधी ती कुठं होती?'

'मॅडिसन, विस्कॉन्सिन इथं.'

'असं तिनं तुला सांगितलं! प्रत्यक्षात ती टेक्सास येथील फोर्ट वर्थ इथं राहत होती.'

या चौकशीचा वैताग येऊन खुर्चीवरून उठत कॉलिन्स म्हणाला, 'ती कुठं राहत होती याला मी कवडीची किंमत देत नाही.'

'आधी ऐकून तर घे. तुझी बायको कशामुळं विधवा झाली?'

'अपघातात तिचा नवरा ठार झाला.'

'अपघातात? आमच्या एफ. बी. आय. च्या अहवालानुसार तो अपघातात मेला नाही. त्याचा गोळी घालून खून करण्यात आला व

**मी बोटीतून उडी मारायचं ठरवलंय. पोहायचं किंवा बुडायचं ते स्वतःच्या हिंमतीवर**

# थकलेल्या आवाजात कॉलिन्स म्हणाला, 'ठीक आहे. तू जिंकलास'

तुझ्या पत्नीनं त्याचा खून केला, असा पुरावा होता. परंतु तिचे दिवंगत वडील त्यावेळी मोठे राजकीय नेते होते. त्यांनी दडपण आणल्यानं तिची सुटका झाली. परंतु आता एफ. बी. आय. नं सारी चौकशी केली आणि एक साक्षीदार आम्हाला मिळालाय. या साक्षीदार स्त्रीनं कॅरेन व तिचा नवरा रॉवले यांच्यात उडालेला भांडणाचा खटका ऐकला. 'तुझा जीव घ्यावासा वाटतो,' असं कॅरेन नवऱ्याला म्हणाल्याचंही तिनं ऐकलं. नंतर आपल्या नवऱ्याच्या प्रेताजवळ हातात बंदूक घेऊन ती उभी असल्याचेही तिनं पाहिलंय.'

कॉलिन्सचा मेंदू बधिर व्हायची पाळी आली होती. पण तरी तो शांतपणे ऐकत होता. कॅरेन वडिलांकडे जाते असे सांगून ह्रोस्टनमधील लिंगपिसाटांच्या क्लबात ती जाई. तेथे विकृत लैंगिक चाळ्यात ती भाग घेई. हे तिच्या नवऱ्याला कळलं व त्यावरून भांडण झालं, असं जेव्हा टायनॅन म्हणाला तेव्हा मात्र कॉलिन्स म्हणाला, 'हे घाणेरडं आहे, असत्य आहे.'

'तसं असतं तर, मलाही बरं वाटलं असतं. पण हे सारं खरं आहे,' असं सांगून टायनॅन म्हणाला, 'आम्हाला मिळालेल्या साक्षीदार महिलेनं बंदुकीच्या गोळीचा आवाजही ऐकला आहे. हा नवा पुरावा सादर केला व या महिलेनं साक्ष दिली, तर तुझ्या पत्नीला तुरुंगात जावं लागेल. त्याची जाहीर चर्चा होईल. मात्र काही 'विशिष्ट परिस्थितीत' हे सारं टाळता येईल.'

कॅरेनबद्दलच्या माहितीमुळं कॉलिन्स चक्रावून गेला होता. त्याला टायनॅनची अत्यंत चीड आली. ब्लॅकमेल करण्याच्या त्याच्या पद्धतीची शिसारी वाटली. दुसऱ्या एखाद्या माणसाचा आपण कधी जीव घेऊ शकू असे त्याला यापूर्वी वाटले नव्हते. परंतु या क्षणी त्याला वाटलं की, टायनॅनचा गळा दाबावा! पण स्वतःवर संयम ठेवीत त्यानं विचारलं, ''विशिष्ट परिस्थितीत' म्हणजे काय?'

'तुझं सहकार्य.पस्तिसाव्या घटनादुरुस्तीला शेवटपर्यंत तुझा पाठिंबा हवा. तू आमच्याबरोबर राहिलं पाहिजेस. तसंच राजीनामा देणं, घटनादुरुस्तीचा निषेध करणारं पत्रक काढणं असं काहीही करता कामा नयेस.'

'निदान त्या नव्या साक्षीदाराचं नाव तरी सांग?'

'साक्षीदाराला भेटायचं झालं तर, मग एकदम कोर्टातच भेटू. या फायलीत सारे कागदपत्र आहेत. आणि तुझी बायको सांगेलच तुला काय ते! मला जे काही सांगायचं होतं ते सांगून झालं. तेव्हा तुझा काय निर्णय?'

थकलेल्या आवाजात कॉलिन्सनं उत्तर दिलं, 'ठीक आहे. तू जिंकलास. मला तुझ्या अटी कबूल आहेत.' ◻

लग्नानंतर प्रथमच त्या दिवशी घरी परतताना कॉलिन्सला वाईट वाटत होतं. टायनॅन निघून गेल्यावर विचार करत त्यानं ऑफिसातच बराच वेळ घालवला. त्याच्या मनात भावनांचा गदारोळ उठला होता. कॅरेनचा भूतकाळ अक्राळविक्राळ सावलीसारखा त्याच्यापुढं उभा होता. नवऱ्याच्या खुनाचा आरोप कॅरेनवर होता आणि त्याहून घाणेरडी गोष्ट म्हणजे लैंगिक चाळ्यात, विकृत पार्ट्यांत ती सहभागी होत असे म्हणे! त्यातल्या एकाही शब्दावर कॉलिन्सचा विश्वास नव्हता, परंतु त्याच्या मनातल्या शंकांच्या सावल्या हटत नव्हत्या.

उदास अवस्थेतच तो घरी गेला.

कॅरेननं विचारलं, 'कॅलिफोर्नियाला जायला निघायचं ना?'

'नाही.'

'तुम्ही राजीनामा दिला ना?'

'नाही.'

'म्हणजे, मला काही समजतच नाही.'

'मी राजीनाम्याचं पत्र लिहिलंही होतं. टायनॅन मला भेटून गेल्यानंतर मी ते फाडून टाकलं. मला फाडावंच लागलं.'

'माझ्यामुळं तुला राजीनामा परत घ्यावा लागला?'

'हो. पण तुला कसं कळलं?' त्यानं आश्चर्यानं विचारलं.

'कारण कधीतरी हे घडणार हे मला ठाऊकच होतं. तुला थांबवण्यासाठी टायनॅन वाटेल ते करील. त्या दिवशी रात्री इस्मेल यंगनं तुझी व तुझ्या नातेवाइकांची चौकशी एफ. बी. आय. नं चालवली आहे असं जेव्हा सांगितलं तेव्हाच मी घाबरून गेले. मी तुला सारं सांगणार होते. कितीतरी वेळा मी तसं ठरवलंही, परंतु जमेचना. त्या दिवशी रात्रीही मी तुला सांगायचा प्रयत्न केला, परंतु तू गाढ झोपला होतास. आता टायनॅननं तुझ्या कानात काय गरळ ओतलंय कोण जाणे! पण मी काय घडलंय ते सांगते.'

'मला आता काही ऐकायचं नाही. शिकागोला भाषण करायला मला जावं लागणार आहे. तिकडून परतल्यावर आपण बोलू या.'

'नाही. माझं ऐक. त्या दिवशी माझं रॉवलेशी नेहमीसारखंच जोरदार भांडण झालं होतं. मी धावत वडिलांकडं गेले. मग पुन्हा एकवार प्रयत्न करून पाहू म्हणून मी परत घरी आले. पाहते तो काय माझा नवरा जमिनीवर पडलेला. तो मेलेला होता. त्याला कोणी ठार केलं हे मला ठाऊक नाही. आमचं भांडण काहींनी ऐकलं होतं व रागाच्या भरात 'तुझा जीव घेईन,' असं मी म्हटलंही होतं. त्यामुळं मीच आरोपी ठरले. परंतु पुरावाच काही नव्हता आणि जो होता तो माझ्या बाजूचाच होता. त्यामुळं त्यांनी खटलाच काढून घेतला. आपण निष्पाप आहोत हे मला ठाऊक होते. तुझ्या प्रेमात पडल्यावर मी तुला हे सांगितलं नाही, कारण आपले संबंध त्यामुळं बिघडू नयेत असं मला वाटत होतं. असो. आता तरी तुला मी सारं सांगितलंय.'

'पण टायनॅनला कोणी नवा साक्षीदार मिळालाय. त्या साक्षीदार महिलेनं रॉवलेच्या प्रेतापाशी बंदूक घेऊन उभं राहिलेलं तुला पाहिलंय.'

'हे खोटं आहे. साफ खोटं आहे. मी घरी परत आले तेव्हा माझ्या नवऱ्याचा खून झालेला होता.'

तिला बोलताना ऐकून कॉलिन्सची खात्री पटली की, ती खरंच बोलते आहे. परंतु अजून शंकांच्या सावल्या त्याच्या मनात नाचतच

होत्या. 'त्या साक्षीदारानं तू लिंगपिसाटांच्या क्लबात जात होतीस असंही सांगितलं,' असं कॉलिन्सनं म्हणताच कॅरेन जवळ जवळ बेशुद्ध पडायची पाळी आली. 'नाही! नाही, ख्रिस, हे सारं खोटं आहे रे खोटं. तू मला ओळखत नाहीस का? आपल्याला होणाऱ्या बाळाची शपथ, हे सारं, साफ खोटं आहे.' ती म्हणाली.

'टायनॅननं तुझा खटला पुन्हा चालू करायची धमकी दिली म्हणून मग मी त्याचं म्हणणं मान्य केलं.'

'नाही ख्रिस. तुला घटनादुरुस्तीविरोधी झुंज दिलीच पाहिजे. टायनॅनला खटला पुन्हा सुरू करू दे. मी निष्पाप आहे.'

'कॅरेन, हे बघ, वीस मिनिटांत मला निघायला हवं. शिकागोत एफ. बी. आय. च्या माजी एजंटांच्या परिषदेत माझं उद्या भाषण आहे. तेव्हा आता मी तयारीला लागतो.' तिचं चुंबन घेऊन तो म्हणाला, 'माझं तुझ्यावर प्रेम आहे. तुला आणखी काही बोलायचं असेल तर मग उद्या रात्री आपण बोलू या.'

'ठीक आहे' आणि मग ती स्वतःशीच पुटपुटली, 'पण उद्याची रात्र असेल तर–' ¤

## : प्रकरण नववे :

शिकागो येथील अॅम्बॅसॅडर ईस्ट हॉटेलच्या फिकट सोनेरी रंगाच्या गिल्डहॉल बॉलरूममध्ये 'सोसायटी ऑफ फॉर्मर स्पेशल एजंटस् ऑफ द एफ. बी. आय.' या संघटनेची परिषद भरली होती. सहाशे जणांच्या त्या श्रोतृसमुदायापुढं कॉलिन्स भाषण करीत होता. अगदी जपून व सावधगिरीनं तो बोलत होता. पस्तिसाव्या घटनादुरुस्ती-बद्दल त्यात काहीही उल्लेख करणं त्याला आता शक्य नव्हतं. त्यानं कसंबसं भाषण संपवलं. 'आपण आता दुपारभर खोलीतच थांबणार आहोत, तेव्हा तुला बाहेर जाऊन यायचं असेल तर जाऊन ये,' असं सांगून आपला शरीररक्षक होगान याला त्यानं बाहेर पिटाळलं व मग कोणी पाहत नाही असं पाहून तो खाली पंधराव्या मजल्यावरील एका खोलीत गेला.

घटनादुरुस्तीविरोधी मोहिमेचा प्रमुख टोनी पिअर्स याची त्या खोलीत भेट ठरली होती. खोलीत कोणीच नव्हतं. थोड्याच वेळात टोनी पिअर्स तेथे येऊन दाखल झाला. टी. व्ही.वरील चर्चेच्या कार्य-क्रमानंतर कॉलिन्स त्याला प्रथमच भेटत होता. त्याच्याबरोबर व्हॅन अॅलेन व इंगस्ट्रप हे एफ. बी. आय.मधील दोघे माजी सहकारीही होते. डायरेक्टर टायनॅन व एफ. बी. आय. यांच्या कारवाया यांचा उबग येऊन या तिघांनी एफ. बी. आय. सोडलं होतं. परंतु ही मंडळी स्वस्थ बसणारी नव्हती. एफ. बी. आय.च्या काळ्या कारवाया उजेडात आणण्यासाठी काही माजी एजंटांच्या मदतीने ते काम करीत होते. त्यांनी प्रतिसंघटना उभारली होती. आपले हस्तक जागोजाग पेरून ठेवले होते. या संघटनेला अधिकृत असं काहीही नाव दिलेलं नव्हतं. परंतु ते तिला 'आय. एफ. बी. आय.' असं म्हणायचे. याचा अर्थ 'इन्व्हेस्टिगेटर्स ऑफ द एफ. बी. आय.!'

आपण घटनादुरुस्तीच्या विरोधी आहोत, परंतु जाहीरपणं आपण तसं करू शकत नाही. टायनॅननं आयत्यावेळी येऊन आपल्याला कसं ब्लॅकमेल केलं, हे कॉलिन्सनं त्यांना सांगितलं.

टायनॅननं आपल्याला कॅरेनचा गतइतिहास सांगून व तिच्यावर खटला भरण्याची कशी धमकी दिली, हेही त्यानं कथन केलं.

पिअर्स म्हणाला, 'तुमची पत्नी स्वतः निष्पाप आहे असे ती म्हणते आहे. तेव्हा आम्ही तुम्हाला मदत करू. आमच्या प्रतिसंघटनेचे एजंट या प्रकरणाची पूर्ण चौकशी करतील. टेक्सासमध्ये फोर्ट वर्थ इथं तर जिम शॅक हा आमच्या एका उत्कृष्ट एजंटांपैकी एक एजंट आहे. तुमच्या पत्नीबाबतची सर्व माहिती आमचे एजंट जमवतील. तसंच टायनॅन खरं बोलतोय का, त्याला खरंच कोणी साक्षीदार मिळालाय का हे पण ते शोधून काढतील.'

'ठीक आहे.'

'आज कॅलिफोर्निया असेंब्लीचं मतदान आहे ना?' टोनीनं विचारलं.

'आपण विसरलोच. आता टी. व्ही. वर मतदान दाखवत असतील' व्हॅन अॅलेन म्हणाला.

लगेच टी. व्ही. चालू करण्यात आला. खोलीतले चौघे एकाग्र चित्तानं पाहू लागले. या घटनादुरुस्तीत कोठली कोठली कलमे आहेत हे निवेदक तपशीलवार सांगत होता. तो म्हणाला, 'आता कॅलिफोर्निया असेंब्लीत मतदानाला आरंभ होईल. प्रत्येक सदस्यानं टेबलावरचा एक स्वीच दाबावयाचा आहे. अनुकूल मत असेल तर, हिरवा दिवा लागेल व प्रतिकूल असेल तर तांबडा दिवा लागेल. बाहेरच्या विद्युतफलकावर ज्याच्यात्याच्या नावापुढे हे दिवे लागतील. मतांची आपोआप बेरीज होईल. ४१ अनुकूल मतं पडली तर, पस्तिसावी घटनादुरुस्ती कॅलिफोर्निया असेंब्लीत मंजूर होईल. नंतर तीन दिवसांनी कॅलिफोर्निया नि सिनेटमध्ये ती मंजुरीसाठी पाठवली जाईल. समजा, असेंब्लीनंच ती फेटाळली तर मग, घटना-दुरुस्ती कायमची नामंजूर झाली. ती सिनेटकडे पाठवायची गरजच राहणार नाही, आता असेंब्लीत मतदान सुरू झालं आहे.'

मग मोठा विद्युतफलक दाखवण्यात आला. हिरव्या रंगाचे दिवे जास्त दिसत होते. जोरजोरानं बेरीज जाहीर केली जात होती. ३७, ३८, ३९, ४०, व ४१! ८० पैकी ४१ अनुकूल मतं पडली होती. टाळ्यांचा कडकडाट एकू येत होता. निवेदक सांगत होता, 'असें-ब्लीत या घटनादुरुस्तीला हिरवा कंदील दाखवला. आता सारं काही कॅलिफोर्निया सिनेटवर अवलंबून आहे. तेथील मतदानाला अवघे बहात्तर तास उरले आहेत.'

पिअर्सनं टी. व्ही. बंद केला. 'मला असं काही घडेल याची भीती वाटतच होती. आता कॅलिफोर्निया सिनेट हीच काय ती अखेरची आशा उरली आहे. तेव्हा आता कॉलिन्स–की नुसतं ख्रिस म्हटलेलं आवडेल तुम्हाला?–'

'हो. अवश्य.'

'ख्रिस, मग आम्हांला तुझी पुरेपूर मदत हवीय. आम्ही तुला मदत करू म्हणजे तू आम्हाला साहाय्य करायला मोकळा राहशील.'

'कॅरेनबद्दल म्हणतोयस् तू?'

'हो. टायनॅन तुला ब्लॅकमेल करतोय ना? फोर्ट वर्थ भागातील जिम शॅक व इतर दोघा एजंटांना मी चौकशी करायला सांगतो.'




PRATIBHA 2317

'ठीक आहे.तुम्ही तुमचे प्रयत्न सुरू करा. दुसरं मला तुम्हालाच एक विचारायचंय्. 'आर डॉक्युमेंट'बद्दल तुम्हाला काही माहिती आहे ? हे डॉक्युमेंट आपण शोधून काढलं, तर पस्तिसाव्या घटनादुरुस्तीचा कॅलिफोर्नियाच्या सिनेटमध्ये नक्की पराभव होईल.' कॉलिन्स म्हणाला.

तिघांनीही 'आर डॉक्युमेंट 'बद्दल आपल्याला काहीही माहिती नसल्याचं सांगितलं.

मग कॉलिन्सनं 'आर डॉक्युमेंट 'बद्दल (म्हणजे त्याच्या पहिल्या भागाबद्दल) त्याला जे माहीत होतं ते त्यांना तपशीलवार सांगितलं.

ते ऐकून पिअर्स म्हणाला, 'हा टायनॅन अत्यंत निर्दय माणूस आहे. यश मिळवण्यासाठी तो कोणत्या थराला पोचेल याचा नेम नाही. तेव्हा ख्रिस, तू सहकार्य दिलेस तर, आपण त्याच्याशी सामना देऊ शकू. आपली माजी एफ्. बी. आय. एजंटस् आणि खबरे यांची यंत्रणाच आपण या कामासाठी लावू. तू आज इथंच थांब. उद्या सकाळी वॉशिंग्टनला जा. भराभरा फोन करून आपण आपल्या लोकांना कामाला लावू. तुझी तयारी आहे ?'

'मी तयार आहे.' कॉलिन्स म्हणाला.

'उत्तम. आता 'आर डॉक्युमेंट 'साठी तू जिथे जिथे तपास केला तिथे तिथे पुन्हा जाऊन तपास केला पाहिजे. तू चांगलंच काम केलंयस. पण, एखादवेळेस ती माणसं पुन्हा सांगताना एखादी नवी माहिती देतील, त्याचा फायदा होईल आपल्याला. मी रॅडेनबॉगची मुलाखत घेतो. व्हॅन ॲलेन ॲर्गो सिटीला भेट देऊन येईल. फादर डुबिन्स्कीची मुलाखत इंगस्ट्रप घेईल. आणि मला वाटतं, तू बॅक्स्टरची पत्नी हॅना हिला परत जाऊन भेट.'

'ठीक आहे. मी भेटेन तिला.' असं सांगून कॉलिन्स म्हणाला, 'पण इस्मेलचं काय ?'

'तो टायनॅनचा फार जवळचा माणूस आहे. त्याच्या तोंडून एखादा शब्द चुकून गेला तर, साऱ्यावर पाणी पडेल–आणखी दुसरं काय ?'

कॉलिन्स म्हणाला, 'टायनॅनला आई आहे. आणि तो तिला आठवड्यातून एकदा भेटायला जातो असं इस्मेलनं मला सांगितलंय.'

'बंडलबाजी नाही ना ? टायनॅनची आई जिवंत आहे ? माझा विश्वास नाही बसत यावर ?'

'पण ते खरंय.'

'ठीक आहे. तिथंही काही तपास करता येईल. चला.आता केवळ सत्तर तासच आपल्या हातात आहेत. लोकशाहीचं भवितव्यच या काळात ठरायचंय.'

कॉलिन्स नंतर आपल्या खोलीकडे निघून गेला. ◘

दुसऱ्या दिवशी सकाळी कॉलिन्स वॉशिंग्टनला पोचला तेव्हा नऊ वाजून अठरा मिनिटे झाली होती. विमानतळावर त्याला घ्यायला त्याची गाडी आली होती. घरी पोचल्यावर स्वत:जवळील किल्लीनं त्यानं दार उघडलं. कॅरेन अजून झोपली असावी असा त्याचा अंदाज होता. बेडरूममध्ये त्याने डोकावलं. तिथं तिचा पत्ता नव्हता. स्वयंपाकघरातही ती नव्हती. तो पुन्हा बेडरूममध्ये आला. घरात एक विचित्र शांतता होती. तो बाथरूममध्ये शिरला. पाहतो तो काय, आरशावर एक चिठ्ठी टेपनं चिकटवलेली होती. तो घाईघाईने ती चिठ्ठी वाचू लागला–

'माझ्या लाडक्या,

मी विमानाने टेक्सासला जात आहे. मी तुझ्यापासून काही लपवायला नको होतं. तुझ्यासारख्या सार्वजनिक जीवनातील व्यक्तीवर दडपणं येऊ शकतात, हे मला पूर्वीच कळायला पाहिजे होतं. मी निष्पाप आहे. पण मी ते तुला पूर्णपणे पटवून देऊ शकलेले नाही. माझ्या-साठी तुला टायनॅनचं ऐकाव लागलं. पण मी आता त्याच्याशी सामना द्यायचं ठरवलंय. खुद्द टेक्सासला जाऊन टायनॅनला कोण नवी साक्षीदार स्त्री मिळाली आहे ते मी शोधून काढणार आहे. तुला, टायनॅनला, साऱ्या जगाला मी निरपराधी आहे, हे मी सिद्ध करून दाखवणार आहे.

मला शोधायचा प्रयत्न करू नकोस. फोर्ट वर्थ भागात मी माझ्या स्नेह्यांसमवेत राहणार आहे. या प्रश्नाची सोडवणूक करीपर्यंत मी तुझ्याशी संपर्क साधणार नाही. काही काळजी करू नकोस. माझं तुझ्यावर प्रेम आहे आणि तू माझ्यावर प्रेम करावंस, माझ्यावर विश्वास टाकावास असं मला वाटतं.

–कॅरेन.'

ती चिठ्ठी वाचून कॉलिन्स हतबुद्ध झाला. आपली गरोदर बायको एकटीच फोर्ट वर्थ भागात भटकते आहे, ही कल्पनाच त्याला सहन होईना. त्याला वाटलं, ताबडतोब विमानानं फोर्ट वर्थला जावं. पण तेथे गेल्यावर कॅरेनला शोधून काढणं हे गवताच्या ढिगाऱ्यातून सुई शोधण्याइतकंच अवघड होतं. इतक्यात फोन खणखणला. तो कॅरेनचा असावा अशी मनोमन प्रार्थना करीत कॉलिन्स फोनकडं धावला.

पण तो फोन कॅरेनचा नव्हता. टोनी पिअर्स बोलत होता. तो म्हणाला –

'मी आता वॉशिंग्टनला आलोय. टायनॅन उद्या रात्री न्यूयॉर्कला जाणार आहे आणि तेथून सॅक्रॅमेंटो येथे जाणार आहे.कॅलिफोर्नियाच्या सिनेटच्या न्यायसमितीपुढे तो स्वत: साक्ष देऊन पस्तिसाव्या घटना-दुरुस्तीचा पुरस्कार करणार आहे.'

हे बोलणं ऐकतानाही कॉलिन्सचं मन ठिकाणावर नव्हतं. तो आपल्या पत्नीचाच विचार करीत होता. तो पिअर्सला म्हणाला,

'सॉरी ! माझ्यासमोर दुसरंच एक संकट उभं राहिलंय. आताच मी घरी आलो तर, कॅरेननं लिहिलेली चिठ्ठी मला मिळाली. ती–'

'जरा थांब. तुझ्या फोनवरून याची चर्चा करू नकोस. तुझ्या आजूबाजूस सार्वजनिक फोन आहे का ?' पिअर्सनं विचारलं.

'हो. बरेच आहेत.'

'मग ताबडतोब काल रात्री मी दिलेल्या नंबरवर मला फोन कर. मी वाट पाहतो.' एवढं बोलून त्यानं फोन बंद केला.

कॅरेनची चिठ्ठी घेऊन कॉलिन्स बाहेर पडला. जवळच्याच सार्वजनिक फोनवरून त्यानं पिअर्सला फोन केला. कॅरेनची चिठ्ठी वाचून दाखवली व तो म्हणाला,

'मला तिच्या तपासाकरिता फोर्ट वर्थला जावंसं वाटतंय.'

'तू नको जाऊस. आम्ही तिचा शोध घेतो ना ! मी जिम शॅक

या आमच्या एजंटला तिचा तपास घ्यायला ताबडतोब सांगतो. फोर्ट वर्थ येथील काही स्नेह्यांकडे राहणार असं तुझ्या पत्नीनं म्हटलंय ना? तुझ्याकडे काही पत्ते आहेत का त्यांपैकी?'

'जुन्या पत्त्याच्या वहीत असतील, पण ती घरी आहे.'

'वही शोधून काढ आणि लागलीच मला कळव.'

'थँक्स! पण टोनी, तू टायनॅन म्हणतो त्या साक्षीदाराचं नाव कसं शोधून काढणार?'

'अगदीच सोपं आहे. एफ. बी. आय. च्या इमारतीत आमचे दोन हस्तक आहेत. त्यातला एक रात्रपाळीवर असतो. टायनॅन व अँडकॉक घरी गेले की, टायनॅनच्या ऑफिसात जाऊन कॅरेनवरची फाईल बघायला मिळेल. आम्ही इकडे जोरात कामाला सुरुवात केलीय. तू जातोयस ना आज हॅना बॅक्स्टरला भेटायला?'

'मी विमानतळावरूनच तिला फोन केला, पण ती आज भेटू शकत नाही. उद्या सकाळी दहा वाजता आमची मुलाखत ठरलीय.'

'ठीक आहे. विशेष काही असलं तर, मी तुला ऑफिसमध्ये फोन करीन. तुझा फोन टॅप होत नाही ना?'

'हल्ली मी रोज सकाळी ऑफिसला गेलो की, टेलिफोन नीट तपासतो व संभाषण चोरून ऐकण्यासाठी एखादं यंत्र त्यात ठेवलं असेल तर ते काढून टाकतो.'

'अच्छा.'

□

टायनॅन प्रथमच शनिवार सोडून दुसऱ्या दिवशी आपल्या आईला भेटायला निघाला होता. तो बुधवार होता. दहा मिनिटांपूर्वी आईशी फोनवर झालेल्या संभाषणामुळं तो अस्वस्थ झाला होता व त्यानं आईला लगेच भेटायचं ठरवलं होतं.

त्याची आई त्याला कधी फोन करीत नसे, पण आज मात्र काही वेळापूर्वी फोन करून तिनं व्हर्नानचे आभार मानले होते. तिचा टी. व्ही. सेट बिघडलेला होता व तो दुरुस्त करण्यासाठी टायनॅननं ताबडतोब मेकॅनिक पाठवला, यामुळं ती आनंदित झाली होती.

कदाचित चुकीचा पत्ता देण्यात आला असेल किंवा आणखी काही झालं असेल. एवढं मात्र खरं की, आपल्या आईचा टी. व्ही. सेट दुरुस्त करण्यासाठी त्यानं कोणाही मेकॅनिकला पाठवलं नव्हतं! त्यामुळं तो चिंतेत होता.

ताबडतोब तो आईकडे निघाला. 'गोल्डन इयर्स सीनियर सिटिझन्स व्हिलेज' येथे असलेल्या आपल्या आईच्या निवासस्थानी तो पोचला. त्यानं बाहेरची धोक्याचा इशारा देणारी यंत्रणा चालू आहे की नाही, हे तपासलं व तो आत गेला.

'काय झालं होतं तुझ्या टी. व्ही.सेटला?' त्यानं आईला विचारलं.

'चित्रं स्थिरच राहायची नाहीत.'

'मग काय सकाळी आला होता वाटतं मेकॅनिक? किती वाजता आला होता?'

'अकरा किंवा त्यानंतर.'

'त्यानं गणवेश घातला होता?'

'हो.'

'तो दिसायला कसा होता ते तुला आठवतंय का मॉम?'

'हा काय प्रश्न झाला? मेकॅनिकसारखाच दिसत होता तो. का?'

'नाही. त्यांनी आपला सर्वोत्कृष्ट मेकॅनिक पाठवला होता की नाही, याची खात्री करायची होती मला. किती वेळ होता तो इथे?'

'अर्धा तास.'

'तोवर तू या खोलीतच होतीस? का आत गेली होतीस?'

'एकदाच आत गेले होते.'

'ठीक आहे.'

टायनॅननं एक स्क्रूड्रायव्हर घेतला. मग त्यानं फोनचा रिसिव्हर उघडला. त्यात चोरून संभाषण ऐकण्यासाठी छोटासा मॉनिटर बसवलेला होता. त्यानं तो काढून टाकला.

त्याच्या आईनं विचारलं, 'टेलिफोन नादुरुस्त झाला होता?'

'हो. पण आता नीट केलाय मी.'

ज्या कोणी टेलिफोनमध्ये मॉनिटर दडवला होता, त्यानं आतापर्यंत या फोनवरचं काय काय संभाषण ऐकलं हे जाणून घेणं आवश्यक होतं. त्यानं आईला विचारलं,

'आज अकरानंतर तू कोणाशी बोललीस?'

'मिसेस ग्रॅसमनचा फोन आला होता.'

'काय चर्चा झाली तुमची?'

'एक नवीन पाककृती सांगितली तिनं.'

'एवढंच ना?'

'हो एवढंच. आणि हो, आज हॅना बॅक्स्टरशी मी खूप गप्पा मारल्या.'

'तुला आठवतंय का काय बोलणं झालं तिच्याशी?'

'तिला आपल्या नवऱ्याची फार आठवण येते. घरात फक्त ती व तिचा नातू रिक एवढे दोघेच आहेत. आता कधी कधी कोणीतरी भेटायला येतं म्हणा तिच्याकडे. उद्याच अॅटर्नी जनरल तिला भेटायला जाणार आहेत!'

'कोण ख्रिस्तोफर कॉलिन्स?'

'हो. हो. तेच उद्या सकाळी तिला भेटायला जाणार आहेत.'

'कशासाठी? काही बोलली का ती तुझ्याशी?'

'नाही. त्याबद्दल तिनं काही नाही सांगितलं.'

'मिसेस बॅक्स्टरना कॉलिन्स भेटायला जाणार.' कॉलिन्स स्वतःशी पुटपुटला. त्यानं आईला विचारलं, 'किती वाजता फोन आला होता तिचा?'

'फोन? मी कधी म्हटलं तिचा फोन आला होता म्हणून? आज सकाळी ती स्वतःच आली होती इथं.'

ते ऐकून टायनॅनचा जीव भांड्यात पडला. मला सांगितल्याशिवाय पुन्हा कोणाही मेकॅनिकला घरात घ्यायचं नाही,' असं आईला बजावून तो घराबाहेर पडला.

□

दुसऱ्या दिवशी सकाळी पाऊस पडत होता. जॉर्जटाऊन येथे

**मला सांगितल्याशिवाय कोणाही मेकॅनिकला घरात घ्यायचं नाही असं सांगून टायनॅन बाहेर पडला.**

राहणाऱ्या श्रीमती बॅक्स्टरना भेटायला कॉलिन्स निघाला तेव्हा आकाश अंधारून आलं होतं. काल पिअर्स व त्याचे सहकारी यांच्यापैकी कोणाचाही फोन आला नव्हता. करेनबद्दलही काही माहिती कळली नव्हती. उद्या दुपारी कॅलिफोर्नियाच्या सिनेटमध्ये मतदान व्हायचे होते. चाळीसपैकी एकवीस मते पडली तर, घटनादुरुस्ती मंजूर होणार होती. 'वॉशिंग्टन पोस्ट'मध्ये दिलेल्या एका बातमीनुसार तीस सदस्य या घटनादुरुस्तीला अनुकूल होते. आकाशाइतकंच भविष्यही काळंकुट्ट आहे, असं कॉलिन्सला वाटलं. तो बॅक्स्टरच्या घरी पोचला तेव्हा तिनं त्याचं आपुलकीनं स्वागत केलं. दिवाणखान्यात ते जाऊन बसले. हॅना सोफ्यावर बसली आणि तो पडद्यापुढे ठेवलेल्या एका आरामखुर्चीत स्थानापन्न झाला.

कॉलिन्सनं पुन्हा 'आर डॉक्युमेंट'ची चौकशी केली... पण तिनं आपल्याला काही माहिती नाही असंच उत्तर पुन्हा दिलं. तिनं विचारलं,

'डोनाल्ड रॅडेनबॉगला भेटलास का तू ?'

'मी प्रयत्न केला. पण मी भेटायला गेलो तेव्हा त्याआधीच तो मरण पावला होता.'

'मग तू व्हर्नान टायनॅनला विचारलंस 'आर डॉक्युमेंट'बद्दल ?'

'हो. पण त्यालाही काही ठाऊक नाही.'

हॅना म्हणाली, 'मला नाही वाटतं मग 'आर डॉक्युमेंट'बद्दल कोणी काही आता सांगू शकेल. टायनॅन व माझे पती नोह हे पस्तिसाव्या घटनादुरुस्तीवर एकत्र काम करीत होते. नोहला जेव्हा शेवटचा हृदयविकाराचा झटका आला त्या दिवशी इथं टायनॅन आणि हॅरी अ‍ॅडकॉक हजर होते. मध्यरात्रीपर्यंत चर्चा करीत असताना नोहला एकदम तो झटका आला '

कॉलिन्स हे प्रथमच ऐकत होता.

'तुमची नक्की खात्री आहे की, शेवटल्या रात्री टायनॅन इथं आला होता ?'

'हो. हो. व्हर्नानला काही करून त्या दिवशी नोहची भेट घ्यायचीच होती.'

'आणि हॅरी अ‍ॅडकॉक पण त्याच्याबरोबर होता ?'

'टायनॅनबद्दल मला खात्री आहे. पण हॅरी होता की नाही हे नोहच्या अपॉइंटमेंटस्‌ची वही बघून सांगते.' असं सांगून ती आत वही आणायला गेली.

*आपल्या आरामखुर्चीमागे पडद्याच्या इथं काही आवाज येतोय* असं वाटून कॉलिन्सनं मागं पाहिलं तो काय ! बॅक्स्टरचा नातू रिक तेथून बाहेर पडत होता. त्याच्या हातात त्याचा छोटा टेपरेकॉर्डर होता.

'पडद्यामागं काय करीत होतास रे ?'

रिकनं हसत सांगितलं, 'लपायला ती उत्तम जागा आहे.'

'कसा काय चाललाय तुझा टेपरेकॉर्डर ?'

'गेल्या वेळेस तुम्ही नीट केल्यापासून उत्तम चाललाय. आता हें *बघा ना. तुमचं आणि आजीचं संभाषणच मी टेप केलंय !' आणि* त्यानं ती टेप वाजवून दाखवली. रेकॉर्डिंग अतिशय चांगलं झालं होतं.

कॉलिन्स म्हणाला, 'पुढच्या वेळेसे इथं जपूनच बोलायला पाहिजे.'

टेपरेकॉर्डर बंद करीत रिक म्हणाला, 'काही घाबरू नका मिस्टर कॉलिन्स. मी काही सरकारी एजंट नव्हे. हा आपला माझा छंद आहे. इतकंच.'

कॉलिन्सनं म्हटलं, 'इतक्या हुशारीनं काम केलंस तर खरंच तुला एफ. बी. आय.मध्ये काम मिळेल.'

'या पडद्यामागं राहून मी शेकडो रेकॉर्डिंग केली असतील. पण कधी कोणाला मी इथं लपलेला पत्ता लागलेला नाही. आता एकदाच आजोबांनी मला पकडलं होतं म्हणा.'

'आजोबांनी तुला पकडलं होतं ?'

'पडद्याबाहेर आलेला माझ्या बुटाचा भाग दिसला त्यांना.'

'मग त्यावर काय म्हणाले ते ?'

'अशी 'ट्रीक' पुन्हा करायची नाही.'

'असं होय.'

त्याक्षणी कॉलिन्सच्या डोक्यात एकदम लख्ख प्रकाश पडला.

दोन मिनिटं तो स्वस्थ विचार करीत बसला.

नोह बॅक्स्टर यांच्या अखेरच्या शब्दात 'ट्रिक' हाच शब्द होता. शेवटच्या दिवशी टायनॅनशी बोलत असताना आपल्या नातवानं आपलं संभाषण टेप केलंय हे त्यांच्या ध्यानात आलं असावं. आणि मग हॉस्पिटलमध्ये शुद्ध आल्यावर त्यांना ते आठवलं असावं. त्यांचे शेवटचे शब्द होते—

'आर डॉक्युमेंट—इट इज—आय सॉ—ट्रिक—गो सी—'

'ट्रिक' याचा अर्थ 'रिक' तर नसावा ? किंवा रिकची ट्रिक मी पाहिली. ती जाऊन तू पाहा असं तर त्यांना सुचवायचं नसावं ? कॉलिन्सचं विचारचक्र जोरात चालू होतं. रिकनं टायनॅन व बॅक्स्टरचं शेवटचं गुप्त संभाषण टेप केलं असेल काय ? त्यावरून 'आर डॉक्युमेंट'चा काही मागोवा लागेल काय ?

कॉलिन्सनं रिकला विचारलं, 'आजोबांनी तुला पकडल्यानंतरही केलंस का काही तू टेप ?'

'हो. हो. कितीतरी वेळा.'

मग कॉलिन्सनं श्वास रोखीत विचारलं, 'शेवटच्या दिवशी टायनॅन आले होते तेव्हाचंही संभाषण टेप केलंयस तू ?'

'हो. हो. आजोबा आजारी झाल्याने गडबड उडाली त्या दिवशी. त्यामुळे रेकॉर्डिंगरूममध्ये अडथळा आला. पण त्याआधीचं सारं संभाषण व्यवस्थित टेप केलेलं आहे.'

'हे बघ. उगीच बंडला मारू नकोस. खरंच आहे का तुझ्याकडे ते संभाषण टेप केलेलं ?'

'म्हणजे काय ? तुम्ही आता बसलाय ना तिथंच टायनॅन बसले होते आणि सोफ्यावर आजोबा बसले होते. आणि आता तुम्ही आजीशी बोलत होतात ना त्याच कसल्याशा 'आर डॉक्युमेंट'बद्दल बोलत होते ते.'

'तू अगदी प्रत्येक शब्दन् शब्द ऐकलास ?'

'हो. आता जसा मी तुमचा प्रत्येक शब्द टेप केला तसाच त्यांचंही संपूर्ण संभाषण पडद्याआड लपून टेप केलं.'

*सहज विचारल्यासारखं भासवून कॉलिन्सनं रिकला प्रश्न केला.*

'मग काय पुसून टाकली का ती टेप ?'

'मी माझ्या टेप्स कधीच पुसून टाकत नसतो.'

'मग तुझ्याकडे आता आहे वाटतं ती ?'

'नाही. ज्याच्यावर आजोबांचा आवाज असे ती टेप मी नेहमी ए. जी. जी. (अॅटर्नी जनरल ग्रॅंडपा) असं लिहून त्यांच्या खास फायलींच्या कॅबिनेटमध्ये ठेवत असे 'ही पण टेप तसंच लिहून ठेवली. शिवाय त्यावर 'जानेवारी' हा महिनाही लिहिला.'

'आणि आता ती कॅबिनेट इथून हलविली आहे ना?'

'हो. तात्पुरती.'

'रिक, तुझे आजोबा व टायनॅन आर डॉक्युमेंटबद्दल बोलल्याचं तुला काही आठवतंय का?'

'आर डॉक्युमेंटबद्दल ते बोलत होते हे खरं. पण काय ते मला आता आठवत नाही. त्यांचं बोलणं चालू असतानाच आजोबा एकदम आजारी झाले. मी एकदम घाबरलो होतो. पडद्याखालून मी पळ काढला व थेट माझ्या बेडरूममध्ये गेलो.'

'एवढंच तुला आठवतंय?'

'हो.'

इतक्यात हॅना बॅक्स्टर आतल्या खोलीतून बाहेर आल्या. त्या म्हणाल्या, 'त्या रात्री टायनॅनबरोबर अॅडकॉक पण उपस्थित होता!'

'वाटलंच मला.' कॉलिन्स म्हणाला.

रिकची पाठ थोपटीत व बॅक्स्टर यांचे आभार मानीत तो बाहेर पडला. बाहेर पाऊस पडत होता. मात्र कॉलिन्सच्या मनात मात्र आशेचं लख्ख ऊन पडलं होतं. अर्थात एकच अडचण होती, बॅक्स्टरची वैयक्तिक फाईल कॅबिनेट शोधून काढण्याची. डायरेक्टर टायनॅनच्या ऑफिसमध्ये ती कॅबिनेट होती व त्यात ती महत्त्वाची टेप होती.

कॉलिन्सनं ड्रायव्हरला सांगितलं, 'पहिला सार्वजनिक फोन दिसेल तिथं गाडी थांबव. मला एक महत्त्वाचा फोन करायचा आहे.' ¤

## : प्रकरण दहावे :

त्या दुपारी ख्रिस्तोफर कॉलिन्स युनियन स्टेशनकडं निघाला होता. आपला कोणी पाठलाग करीत नाही ना हे त्यानं पाहून घेतलं. जेंव्हा टायनॅनचं म्हणणं त्यानं मान्य केलं तेव्हापासून 'आपला पाठलाग होणार नाही हे त्याला ठाऊक होतंच. तो युनियन स्टेशनवर पोचला. त्यानं एक वर्तमानपत्र विकत घेतलं व एका बाकावर बसून ते वाचण्यात आपण गढलो आहोत असं त्यानं भासवलं. खरं त्याचं लक्ष बाहेरच होतं. थोड्याच वेळात टोनी पिअर्स आला व एक मासिक घेऊन जवळच्या बाकावर बसला. दोघांचं संभाषण सुरू झालं.

'रिकनं सारं संभाषण टेप केलंय?'

'हो?'

'ती टेप कशी ओळखायची?'

'मेमोरेक्स कंपनीची ती कॅसेट टेप आहे. त्यावर ए. जी. जी. असं लिहिलं आहे, तसंच त्यावर 'जानेवारी' असंही लिहिलं असून बॅक्स्टरच्या फाईल कॅबिनेटच्या अगदी वरच्या ड्रॉवरमध्ये ती ठेवलेली आहे. ती तू मिळवणार कशी?'

'आज रात्री पावणेनऊपर्यंत टायनॅन त्याच्या ऑफिसात आहे. तेथून तो थेट विमानतळावर जाईल. तेथून न्यूयॉर्कला आणि तेथून ११ वाजता सॅनफ्रॉन्सिस्को इथं जाणारं विमान तो पकडणार आणि तेथून मोटारने सॅक्रेमेन्टोला जाणार आहे. तेव्हा त्याचं ऑफिस रिकामंच असेल. मी व तू एफ. बी. आय. इमारतीत जाऊ. दहाव्या रस्त्यावरील दारानं आपल्याला आत जावं लागेल. आमचा एक हस्तक तेथे रात्रपाळीला असल्याचं मी पूर्वीच तुला सांगितलं. तो या दारानं आपल्याला आत घेईल. तसेच डायरेक्टर टायनॅनच्या कचेरीचं दार उघडंच ठेवण्याचीही सोय तो करील.'

'पण बॅक्स्टरच्या कॅबिनेटला कुलूप असेल त्याचं काय?'

'ते फारसं अवघड नाही. ती जुनी कॅबिनेट आहे. मी त्याचं कुलूप उघडू शकेन.'

'वा. उत्तम!'

'आता तुझ्या पत्नीबद्दल–'

'हं काय झालं?'

'फोर्ट वर्थ इथं तुझी पत्नी कोणाकडं आहे हे जिम शॅंकनं शोधून काढलंय? ती सुखरूप आहे. तसंच टायनॅननं ज्या स्त्री साक्षीदाराचा उल्लेख केला तिचं नाव कळलंय. अॅडेल झूरेक हे तिचं नाव असून ती डल्लास इथं राहते. तुझ्या पत्नीची नेहमीची नोकरानी रजेवर असली की, झूरेक त्यावेळी काम करे. तिला आज दुपारी जिम भेटायला जाणार आहे. काही विशेष असेल तर तो फोन करणार आहे. बराय्! आता आज रात्री भेटू या. हूव्हर इमारतीच्या जवळच 'फिल-अप कॅफे' आहे, तेथे रात्री ८–३० वाजता तू ये.'

'हो. मी वेळेवर येईन.'

एकमेकांचा निरोप घेऊन दोघंही वेगवेगळया दिशेनं निघून गले. ¤

रात्री बरोबर साडआठ वाजता 'फिल-अप कॅफे' पाशी कॉलिन्स हजर झाला. त्या कॅफेतील एका कोपऱ्यातील टेबलाशी पिअर्स आधीच येऊन बसला होता. त्याच्या शेजारी बसत कॉलिन्स म्हणाला,

'मी जरा नर्व्हसच झालोय्'

'त्यात काय आहे नर्व्हस होण्यासारखं? आपण एफ. बी. आय. च्या डायरेक्टरच्या कार्यालयात जातोय्. तू तिथं अनेकदा गेलायस्.

'हो, पण डायरेक्टर नसताना कधी नाही गेलेलो.'

'हं. हे तुझं म्हणणं ठीक आहे. बरं, एकदा ही टेप मिळाली की, तू काय करणार?'

'मी ताबडतोब सॅक्रेमेन्टो इथं गव्हर्नरला फोन करणार. पस्तिसाव्या घटनादुरुस्तीवर परिणाम करू शकेल असा महत्त्वाचा पुरावा माझ्याकडं आहे असं त्यांना मी सांगेन व टायनॅनची न्यायसमितीपुढं साक्ष झाली की, त्यानंतर मी साक्ष देईन, ती टेप वाजवून दाखवीन.'

'बहुतेक उद्या या वेळी आपण आपला विजयोत्सव साजरा करीत असू.' पिअर्स म्हणाला, इतक्यात व्हॅन अॅलेननं तेथे येऊन सांगितलं. 'टायनॅन दहा मिनिटांपूर्वीच विमानतळाकडे रवाना झाला.'

'चला निघू या.' कॉलिन्स म्हणाला. पिअर्सनं बिल दिलं व दोघे तेथून बाहेर पडले.

एफ. बी. आय. चं ऑफिस असलेल्या प्रचंड हूव्हर इमारतीपाशी ते आले. दहाव्या रस्त्यावरून ते चालू लागले. अॅलेन वाहनतळापाशीच थांबला. 'समजा जर टायनॅन परत आला तर, त्याची मोटार इथं उभी राहील. तो वर पोचण्याआधी मी येऊन तुम्हाला खबर देईन' असं तो म्हणाला.

कॉलिन्स व पिअर्स प्रवेशद्वाराजवळ पोचले तेव्हा आतून ते कोणीतरी किलकिलं केलं. पिअर्सच्या हस्तकानं दार उघडलं. तो पिअर्सच्या कानात काहीतरी कुजबुजला. मग दोघे संकटप्रसंगी वापरावयाच्या जिन्यानं सातव्या मजल्यावर गेले. डायरेक्टर टायनॅनच्या ऑफिसचं दार नुसतं लोटून घेतलेलं होतं. दोघेही हलकेच आत शिरले. सोफ्याजवळचा टेबललॅंप लावलेला होता. त्या खोलीत कसलंही फायलीचं कपाट नव्हतं.

पिअर्सनं सांगितलं, 'शेजारच्या ड्रेसिंग रूममध्ये पाहा पाहू.' दोघे त्या रूममध्ये गेले. पिअर्सनं लाईट लावला. नोहू बॅक्स्टरचं फायलींचं कपाट तेथे ठेवलेलं होतं.

कपाटाला 'कॉम्बिनेशन लॉक' होतं व तेही तिसऱ्या ड्रॉवरला. पिअर्सनं प्रत्येक ड्रावर खोलण्याचा प्रयत्न केला, परंतु सर्वच ड्रॉवर्स बंद होते. मग त्यानं तिसरा ड्रॉवर उघडण्याची खटपट चालवली. त्यात तीन मिनिटं गेली तरी त्यावेळी ती तीन तासांसारखी भासली. अखेर पिअर्सनं पहिला ड्रॉवर उघडला. त्यात बॅक्स्टर वापरत त्या अगदी छोटया कॅसेटस होत्या व दुसऱ्या बाजूस रिक वापरत असे तशा काही कॅसेटस होत्या.

हे तपासाचं काम चालू असता एकदम बाथरूममधला दिवा लागला. एक इसम बाहेर आला व म्हणाला, 'मि. कॉलिन्स, कशाला उगाच त्रास घेता?'

दोघेही एकदम चमकले. तो इसम म्हणजे हॅरी अॅडकॉक होता! त्याच्या हातात एक टेप होती. 'तुम्ही हीच टेप शोधता आहात ना?' त्यान विचारलं.

मग त्या कॅसेटमधील ध्वनिफीत त्यानं एका बोटानं बाहेर काढली व बघा जवळून असं म्हणत बाथरूममध्ये नेऊन त्यानं कमोडमध्ये ती टेप फेकून दिली. पाण्याची साखळी ओढली. 'या टेपसारख्याच तुमच्याही साऱ्या आशाआकांक्षा वाहून गेल्यात,' असं तो म्हणाला. त्यानं कॉलिन्स व पिअर्सवर पिस्तुल रोखलेलं होतं. पिअर्सजवळचं पिस्तुल त्यानं आधीच काढून घेतलं होतं.

हॅरी म्हणाला, 'आर डॉक्युमेंट' हे कागदोपत्री नाहीच. ते आहे डोक्यात! त्याची टेप काढण्याची कधी कल्पना नव्हती. ही टेप त्या पोरामुळे चुकून काढली गेली होती. आणि मि. कॉलिन्स, एफ. बी. आय. चे अगदी सामान्य एजट होण्याची देखील तुमची लायकी नाही, तुमचं बॅक्स्टर यांच्या घरी रिक व श्रीमती बॅक्स्टर यांच्याशी काय बोलणं झालं ते सारं आम्ही टेप केलंय. टायनॅनच्या आईनं तुम्ही बॅक्स्टरकडे जाणार आहात हे आम्हाला सांगितलं होतं!'

पुन्हा रिव्हॉल्व्हर रोखून तो म्हणाला, 'आता दोघे आलात त्या वाटेनं जा कसे. दोन एजटस तुम्हाला खाली घेऊन जातील. या खेपेस मुख्य प्रवेशद्वारातून तुम्ही बाहेर पडू शकता.' ◘

ख्रिस कॉलिन्स, पिअर्स व अॅलेन तिघेही निराश मनाने मोटारीतून निघाले. कॉलिन्सच्या घरी पोचेपर्यंत तिघांनी एकही शब्द उच्चारला नाही. कॉलिन्सनं पुढचं दार उघडलं. तिघेही आत गेले. कॉलिन्सनं ग्लासात मद्य ओतलं. जणू आपलं दुःख त्यात बुडविण्यासाठीच ते मद्य घेत होते. त्यांच्या आशेचा शेवटचा तंतूही तुटला होता. अॅडकॉकनं ती टेप त्यांच्या डोळयादेखत नष्ट केली होती, याचं अतीव दुःख त्यांना झालं होतं.

फोन वाजू लागला. पिअर्सकडं पाहून कॉलिन्सनं विचारलं, 'फोन घ्यायला काही हरकत नाही ना?'

'तुझ्या घराची त्यादृष्टीने आम्ही नीट पाहणी केलीय. तसा काहीहो धोका नाही, तेव्हा फोन घे.'

तिकडं फोन वाजतच होता. कॉलिन्सनं रिसिव्हर उचलला. फोर्ट वर्थहून जिम शॅकचा फोन होता. तो म्हणाला, 'कॉलिन्स, आनंदाची बातमी. टायनॅनची साक्षीदार झुरेक हिला मी गाठलं. तुमच्या पत्नीनं रॉवलेचा खून केल्याचं तिनं पाहिलेलं नाही. तसंच कॅरेन लिंगपिसाटांच्या पार्टयांना जात होती, हेसुद्धा साफ खोटं आहे. झुरेक हिला टायनॅननं याच पद्धतीनं ब्लॅकमेल केलीय. कॅरेनच्याविरुद्ध साक्ष दे, तरच तुझ्या जीवनातील पूर्वीची भानगड कोणाला सांगणार नाही अशी धमकी त्यानं तिला दिली होती व त्यामुळे ती खोटी साक्ष द्यायला तयार झाली होती. मिसेस कॉलिन्सचा पूर्वीचा नवरा रॉवले याचं दुसऱ्या एका बाईशी लफडे होते. तिच्या नवऱ्यानं रॉवलेला ठार केलं. कॅरेनने नव्हे.'

'थॅंक्स! कॅरेन कशी आहे?'

'अगदी आनदात आहे. आता इथं हजर आहे ती. बोलतेय ती तुमच्याशी फोनवर.'

त्यानं क्षणभर वाट पाहिली. मग अश्रूत भिजलेला तिचा आवाज आला,

'बरं झालं एकदाचा सोक्षमोक्ष लागला ते. आता ख्रिस, तुला टायनॅनला घाबरायला नको. आता तू उद्या कॅलिफोर्नियाला जाऊन घटनादुरुस्तीविरुद्ध बोलू शकशील.'

हताशपणे कॉलिन्स तिला म्हणाला, 'आता काही उपयोग नाही. टायनॅननं आमच्यावर मात केलीय.'

'म्हणजे काय झालंय काय?' तिनं विचारलं.

'ते फोनवर नाही सांगता यायचं.'

'नाही, मला आत्ताच ऐकायचंय.' तिनं आग्रह धरला.

मग कॉलिन्सनं तिला सारं काही सांगितलं. आपल्या डोळयादेखत टेपचा पुरावा कसा नाहीसा झाला हे वर्णन करून तो म्हणाला, 'अशा रीतीने आपल्याला वाचवू शकेल असा अखेरचा पुरावाही कायमचा नष्ट झालाय.'

कॅरेन काही तरी सहानुभूती दाखवेल म्हणून तो बोलायचा थांबला. पण पलीकडून काहीच प्रतिसाद येईना तेव्हा त्यानं विचारलं,

**....एकदम बाथरूममधला दिवा लागला आणि एक व्यक्ती बाहेर आली. कोण होती ती?**

'कॅरेन, अजून आहेस ना तू फोनवर ?'

आणि मग एकदम उत्साहानं भरलेला तिचा स्वर त्याच्या कानी पडला.

'ख्रिस, रिक बॅक्स्टरनं केलेली टेप कदाचित शेवटचीच टेप नसावी. त्या टेपची कॉपी असण्याची शक्यता आहे.'

'कॉपी ? काय म्हणतेस काय तू ?'

'होय. तुला आठवतं त्या दिवशी आपण जॉकी क्लबमध्ये जेवायला गेला होतो ते ? इस्मेल यंग आपल्याबरोबर आला होता. त्या दिवशी टायनॅननं आपला विश्वासघात केला म्हणून तो फार चिडला होता. टायनॅननं आपलं आत्मचरित्र लिहिण्यासाठी उपयोगी पडावी म्हणून आपली खाजगी कागदपत्रं, टेप, बॅक्स्टर यांचीही कागदपत्रं व टेप इस्मेलला दिली होती. त्याच्यावरून त्यानं नकला तयार केल्या. तेव्हा कदाचित रिकच्या टेपची कॉपी त्याच्याकडे असण्याची शक्यता आहे.'

'कॅरेन, भलतीच चतुर आहेस तू. आताच आम्ही इस्मेलला गाठतो.' कॉलिन्स म्हणाला. ◻

इस्मेल यंग घरी नव्हता.

कॉलिन्सनं आपल्या फोनच्या वहीत पाहिलं. त्यात इस्मेलचा फोन नंबर नव्हता. व्हर्जिनिआ येथील फ्रेड्रिक्सबर्ग येथे तो कुठंतरी राहतो, एवढेच त्याला आठवत होते. त्या आधारे त्याने ऑपरेटरकडे चौकशी केली. लागलीच त्याला इस्मेलचा पत्ता व फोन नंबर मिळाला.

त्यानं ताबडतोब इस्मेलला फोन केला. पलीकडून आवाज आला पण तो संदेश टिपून घेण्याच्या मशीनवरचा होता. यंगचा तो टेप केलेला आवाज ऐकू आला,–

'हॅलो, मी इस्मेल यंग. मी आता बाहेर चाललोय. पहाटे एकपर्यंत येणार नाही. कृपा करून तुमचं नाव व फोन नंबर सांगा.'

कॉलिन्स फोन व पत्ता सांगण्याच्या भानगडीत पडला नाही–तो येईल तेव्हा त्याच्या घरी जाण्याचं कॉलिन्सनं ठरवलं. ते रात्री अकरालाच घराबाहेर पडले व सव्वाबाराला इस्मेलच्या घराजवळ पोचले. अजून तो आला नव्हता. एकला पाच कमी असताना एक तांबडी स्पोर्टस्कार तेथे थांबली. इस्मेल त्यातून उतरला. कॉलिन्स, पिअर्स व अॅलेन यांनी त्याला धावतच गाठलं. त्यांना पाहून तो आश्चर्यचकितच झाला. आपली प्रेयसी एमी हिला कॉलिन्सनं अमेरिकेत येण्याचा परवाना दिला याबद्दल इस्मेलनं त्याचे आभार मानले.

कॉलिन्स म्हणाला, 'ते ठीक आहे. आता मला तुझी मदत हवीय. टायनॅननी स्वतःच्या व बॅक्स्टर यांच्या खाजगी फायली व टेप्स तुला दिल्या आहेत असं तू सांगितलं होतंस. बॅक्स्टरच्या फायलींमधील प्रत्येक गोष्टीची कॉपी तू केली आहेस का ?'

'हो, जे जे टायनॅननी दिलं त्याची कॉपी काढली मी.'

'त्यात मोठ्या मेमोरेक्स कॅसेटस् होत्या ?'

'हो. त्यांच्यावरून दुसऱ्या टेप्स काढून मूळ त्यांना परत केल्या.'

'काय टेप केलंय ते आठवतंय का तुला ?'

'नाही. एका मशीनवरून दुसऱ्या मशीनवर मी त्या टेप्स थेट टेप केल्या. ऐकायच्या भानगडीत पडलो नाही. वेळच नव्हता. मात्र त्यांची एक सूची मी तयार केलीय.'

'ए. जी. जी. आणि 'जानेवारी' असं लिहिलेल्या एका टेपच्या शोधार्थ मी आहे. तुझ्याकडे आहे का ती ?'

'पाहतो हं आणि मग इस्मेलनं आपली सूची चाळायला सुरुवात केली. तो म्हणाला, 'हे काय, इथं आहे ना माझ्याकडे त्याची नोंद ! दुसऱ्या स्पूलवर पहिली टेप तीच आहे.'

'नक्की आहे तुझ्याकडे ? खात्रीपूर्वक ?'

'हो.'

कॉलिन्सनं इस्मेलला घट्ट मिठीच मारली. तो म्हणाला, 'तुला ठाऊक नाही, तू देशाची किती मोठी सेवा केली आहेस ?'

इस्मेलला काहीच कळेना. तो म्हणाला, 'मी काय केले ?'

'अरे, तू तर आम्हाला 'आर डॉक्युमेंट' दिलंस !'

'काय ?'

'मग सांगेन. आधी ती टेप वाजवून दाखव पाहू !' कॉलिन्सनं सांगितले.

इस्मेलनं टेप शोधून काढली. सर्व एकाग्र चित्तानं ऐकू लागले. टेप गरगर फिरू लागली आणि मग पुढच्या क्षणी टायनॅनच्या आवाजाने ती खोली भरून गेली......... ◻

## : प्रकरण अकरावे :

मागच्या सीटवर बसलेल्या कॉलिन्सनं ड्रायव्हरला पुन्हा एकवार सांगितलं, 'आणखी वेगानं नाही का जाता येणार ?'

'या वाहतुकीच्या गर्दीत जितक्या वेगानं मोटर नेता येईल तितका प्रयत्न मी करतोय.' ड्रायव्हरनं वेग वाढवीत उत्तर दिलं.

सॅनफ्रान्सिस्कोहून कॉलिन्स सॅक्रेमेन्टोला निघाला होता. त्याची अधीरता शिगेला पोचली होती. तो थोडासा नर्व्हसही होता. संपत आलेल्या सिगरेटवर त्यानं दुसरी सिगरेट पेटवली. सॅक्रेमेन्टोच्या पश्चिम भागात आपण शिरलो असून लौकरच कॅपिटॉल मालवर पोहोचू, याची त्याला कल्पना आली.

एवढं पराकाष्ठेचे प्रयत्न करून जे काही कमावलं ते केवळ निसर्गाच्या लहरीपणामुळे मातीमोल व्हायची पाळी यावी याचं त्याला आश्चर्य वाटत होतं. खरं तर, तो विमानानं दुपारी १२वाजून ९५ मिनिटांनी सॅक्रेमेन्टोला पोचणार होता. १ वाजता असेंब्ली सदस्य ओलिन कीफे डर्बी क्लबात त्याला भेटणार होता. तिथं असेंब्ली व सिनेटचे बरेच सभासद जेवायला यायचे. कॅलिफोर्निया सिनेटचे अध्यक्ष गव्हर्नर एडवर्ड डफील्ड यांनाही तो बरोबर घेऊन येणार होता. पस्तिसाव्या घटनादुरुस्तीवर दुपारी दोन वाजता सिनेटमध्ये मतदान व्हायचं होतं. त्याच्या आत 'आर डॉक्युमेंट' काय आहे, हे सिनेट सभासदांना सांगायचा कॉलिन्सचा विचार होता. परंतु सॅक्रेमेन्टो विमानतळावर घनदाट धुके असल्यानं विमान तिथं पोचू शकलं नाही. तेव्हा कॉलिन्स आता मोटरनं तिकडं निघाला होता. आपण मतदानाआधी सिनेट-नेत्यांना गाठू शकू, अशी मनोमन प्रार्थना तो करीत होता.

त्यानं घड्याळाकडं पाहिलं. दोन वाजायला आता फक्त एकोणीसच मिनिटं उरली होती.

एकदा का दोन वाजल्यावर मतदानाला आरंभ झाला की, मग ते कोणालाही रोखता येणं अशक्य होतं. एकदा मतदान झालं की, ते अंतिम ठरणार होतं. सिनेटला फेरविचार करायची संधी नव्हती. १९७२साली सत्ताविसावी समान हक्कदुरुस्ती व्हरमॉन्ट व कनेक्टिकट राज्यांनी आधी नामंजूर केली होती. नंतर त्यांनी आपला निर्णय फिरवला. परंतु आता असं करायला बहुतेक राज्यांत परवानगी नव्हती. कॅलिफोर्निया हे त्यांपैकीच एक राज्य होतं.

कालची सबंध रात्र कॉलिन्स व पिअर्स यांनी तयारी करण्यात घालवली होती. इस्मेलकडं 'आर डॉक्युमेंट'ची टेप मिळताच त्यांना अत्यानंद झाला होता. परंतु नुसता जल्लोष करून भागणारं नव्हतं. ही टेप कॅलिफोर्नियातील सिनेट सदस्यांना ऐकवण्याची आवश्यकता होती. टेपवरचा आवाज टायनॅनचाच कशावरून अशी शंका कोणी घेतली, तर त्याला उत्तर देता यावे म्हणून या टेपवरून 'व्हाईट प्रिंट' काढण्यात आला होता. पिअर्सनं जॉर्ज टाऊन विद्यापीठातील आपले मित्र व ध्वनितज्ज्ञ डॉ. लेनार्ट यांना फोन केला. 'आर डॉक्युमेंट'च्या टेपचा 'व्हाईट प्रिंट' आणि टायनॅननं अलीकडेच टी. व्ही. वर दिवंगत (खून करण्यात आलेले) न्यायमूर्ती मेनार्ड यांना श्रद्धांजली वाहिली होती त्याची टेप डॉ. लेनार्ट यांच्याकडे पाठवली. त्यांनी आपल्या प्रयोगशाळेत दोन्ही आवाजांचे पृथक्करण करून ते एकाच व्यक्तीचे आहेत असं मत व्यक्त केलं होतं. तसं लेखी पत्रही त्यांनी लिहून दिलं होतं.

आता कॅलिफोर्निया सिनेटपुढं अत्यंत महत्त्वाचा पुरावा सादर करायचा आहे, हे सांगायचं कुणाला? फोनवर हे कळवण्यात धोका होता. टायनॅन आधीच सॅक्रॅमेन्टो इथं पोचला होता. त्याला जर का या गोष्टीचा सुगावा लागला, तर वाटेल ते करून त्यानं 'आर डॉक्युमेंट'ची टेप नष्ट केली असती. तेव्हा फोनवर आपल्या भेटीचा हेतू कळवणं अशक्य होतं.

आपल्याला सिनेट सभासदांपुढे भाषण करायची संधी मिळाली की झालं. त्यासाठी आवश्यक तेवढंच फोनवर सांगायचं असं ठरवून त्यानं कॅलिफोर्निया सिनेटचे अध्यक्ष गव्हर्नर एडवर्ड डफील्ड यांना फोन केला. पण फोन कोणी उचलेना. पुन्हा एक-दोनदा फोन केला तरी, काहीच उत्तर आलं नाही. रात्री कोणी त्रास देऊ नये म्हणून रिसिव्हर काढून ठेवला असावा. नंतर सिनेटर एब ग्लास याला त्यानं फोन केला. तो बाहेरगावी गेला असून सकाळी येणार आहे असं त्याच्या पत्नीनं सांगितलं.

निराश झालेल्या कॉलिन्सला काय करावं हे समजेना. राष्ट्राध्यक्षांना हे सारं सांगून टाकावं. ते कॅलिफोर्नियाच्या सिनेटर्सबरोबर बैठक ठरवू शकतील असं त्याला वाटलं. परंतु पस्तिसावी घटनादुरुस्ती मंजूर व्हावी, असं वॅडस्वर्थ यांचं मत आहे, तेव्हा ते हे 'आर डॉक्युमेंट'चं प्रकरण उघड करतील की नाही, याची शंका होती. तेव्हा राष्ट्राध्यक्षांना हे सांगून काहीच फायदा नव्हता.

आपण पूर्वी कॅलिफोर्निया असेंब्लीचा सभासद ओलिन कोफेला भेटलोय, हे कॉलिन्सला आठवलं. त्यानं कोफेला पहाटे फोन केला. तो फोनवर भेटला. 'मी एक वाजता सॅक्रॅमेन्टो इथं पोचेन.


# शुभ दीपावली

दीपावलीच्या या शुभ दिनी लाखो देशबांधवांच्या घरातील अंधकार दूर होऊन लक्ष लक्ष दीप उजळू देत हीच मनःपूर्वक शुभकामना............।

**गोमंतकातील घरोन घर प्रकाशाने उजळून जावो! त्याकरता आम्ही प्रयत्नशील आहोत.**

※ मुंडकारांच्या ४२,००० कुटुंबांना आता स्वतःच्या मालकीचे घर आहे.

※ १००० भूहीन व्यक्तींना कसण्यासाठी आणि ९०० गृहहीनांना घरासाठी जागा देण्यात आल्या आहेत.

※ भूधारणा कायद्याच्या पाचव्या दुरुस्तीन्वये ५०,००० शेतकरी कुटुंबांना ते कसत असलेल्या जमिनीची मालकी प्राप्त होणार आहे.

※ ग्रामीण कर्जदाराकडून कर्जवसुलीस स्थगिती.

※ चोख वितरणव्यवस्था, शिधापत्रिकेवर अधिक धान्य, साठेबाजांना शिक्षा.

※ हातमाग उद्योगाचे पुनरुज्जीवन, कारागिरांना संपूर्ण साहाय्य.

※ विद्यार्थ्यांना वाढीव शिधा, सवलतीच्या दरात वह्या-पुस्तके, पुस्तक-पेढयांची सोय.

दलित आणि दुबळ्या जनतेला ही दीपावली अधिक प्रकाश व अधिक सामर्थ्य प्रदान करो.

माहिती आणि पर्यटन संचालनालयातर्फे प्रकाशित

**गोवा दमण आणि दीव सरकार**

**पणजी – गोवा**

पस्तिसाव्या घटनादुरुस्तीच्या संबंधी माझ्याकडं अत्यंत महत्त्वाचा पुरावा आहे. मतदानापूर्वी तो सभासदांनी ऐकलाच पाहिजे. लेफ्टनंट गव्हर्नर डफील्ड व सिनेटर ग्लास यांची मुलाखत तुम्ही ठरवाल का?' कॉलिन्सनं त्याला विचारलं.

'एक वाजण्याच्या सुमाराला हे दोघं 'डर्बी क्लब' इथं जेवायला गेलेले असतील. पावणेदोन वाजेपर्यंत ते तेथे असतील. मी त्यांच्याबरोबर तिथंच राहीन. तुमच्यासाठी त्यांना थांबवून ठेवीन.' कीफेनं सांगितलं.

'अत्यंत महत्त्वाचं काम आहे असं त्यांना सांगा.'

'हो, पण तुम्ही वेळेवर या. एकदा का ते सभागृहात गेले व मतदान सुरू झालं तर मग त्यांना गाठणं अशक्य होईल.'

'मी वेळेवर हजर राहीन.' कॉलिन्सनं सांगितलं.

वॉशिंग्टनहून तो शिकागोला वेळेवर पोचला होता. तेथून सॅक्रेमेन्टोचं विमानही वेळेवर सुटलं. तेथल्या विमानतळावर फार दाट धुकं असल्यानं ते विमान सॅनफ्रॅन्सिस्को विमानतळावर उतरवण्यात येत असल्याचं जाहीर करण्यात आलं. आणि आता सॅनफ्रॅन्सिस्कोहून तो मोटारनं सॅक्रेमेन्टोला चालला होता. यामुळं त्याला दीड तास उशीर होणार होता. सॅनफ्रॅन्सिको विमानतळावरून ओलीन कीफेला फोन करायचाही त्यानं प्रयत्न केला. परंतु तो फोनवर सापडेना. तेव्हा अधिक वेळ न दवडता तो सॅक्रेमेन्टोकडं निघाला.

इस्मेलच्या मोठ्या टेपवरून त्यात 'आर डॉक्युमेंट' विषयीचा जेवढा भाग होता तो एका कॅसेट टेपवर टेप करण्यात आला होता. छोटा पोर्टेबल टेपरेकॉर्डर व ती महत्त्वपूर्ण टेप कॉलिन्सकडं देण्यात आली होती.

मोटार प्रोझिज् कॉटेज येथील डर्बी क्लबपुढं थांबली. कॉलिन्सनं टेपरेकॉर्डर ठेवलेली अॅटॅची केस बरोबर घेतली व तो मोटारीतून उतरला.

त्यानं घड्याळ पाहिलं. दोन वाजायला अवघी नऊ मिनिटं कमी होती. त्याला ५१ मिनिटं उशीर झाला होता.

धावतच कॉलिन्स डर्बी क्लबमध्ये शिरला. तेथे कोणीच नव्हतं. बारपाशी फक्त ओलीन कीफे एका स्टुलावर बसला होता.

'मला वाटलं आता तुम्ही येत नाही.' कीफे म्हणाला.

'विमानतळावरच्या धुक्यानं सारा घोटाळा केला. मला सॅनफॅन्सिस्कोहून मोटारनं यावं लागलं. गव्हर्नर डफील्ड व ग्लास कुठं आहेत?'

'इतका वेळ मी त्यांना थांबवून धरलं होतं. परंतु दोन वाजायला आले तेव्हा ते आताच निघून गेले. आता दोनला सात मिनिटं उरली आहेत. दोन वाजता त्यांच्या चेंबरची दारं बंद होतील. त्याच्या आत त्यांना गाठलं तरच शक्य आहे-'

तेथून कॅपिटॉल इमारत जवळच होती. तिथंच मतदान व्हायचं होतं. कॉलिन्स व कीफे अक्षरशः धावत सुटले. वाटेत कीफे म्हणाला, सकाळी टायनॅनचं इथल्या न्यायसमितीपुढे भाषण झालं. घटनादुरुस्तीचं त्यानं जोरदार समर्थन केलं. न्यायसमिती प्रभावित झाली व बहुमतानं तिनं या घटनादुरुस्तीला मंजुरीही दिली. सिनेटमध्येही तिला असाच पाठिंबा मिळेल. अर्थात तुम्ही टायनॅनपेक्षा अधिक प्रभाव पाडू शकला तरच आता मतं फिरण्याची शक्यता आहे.'

'मला संधी मिळाली तर मी टायनॅनवर नक्कीच मात करीन.' आपली अॅटॅची केस दाखवीत कॉलिन्स म्हणाला, 'टायनॅनला खतम् करील असा साक्षीदार माझ्या या अॅटॅची केसमध्ये आहे.'

'कोण?

'खुद्द टायनॅनच!'

सिनेटच्या प्रवेशद्वाराशी ते दोघे पोचले. दारे बंद करण्याची वेळ येऊन ठेपली होती. सिनेटच्या चाळीस सभासदांपैकी बहुतेकजण सभागृहात आले होते. अध्यक्षांच्या खुर्चीवर गव्हर्नर डफील्ड बसले होते. कॉलिन्स प्रवेशद्वाराशीच थांबला. डफील्डची भेट घेण्यासाठी कीफे धावतच आत गेला. वाटेत एका रक्षकानं त्याला अडवलं, त्याच्याशी काहीतरी बोलून कीफे अखेर अध्यक्ष डफील्ड यांच्यापाशी पोचला. त्यानं त्यांना काहीतरी सांगितलं.त्यांनी नकारार्थी मान हलवली. भरलेल्या सभागृहाकडे बोट दाखवलं. मग पुन्हा कीफे त्यांना काही तरी सांगू लागला. कॉलिन्स जिथे उभा होता त्या दिशेला त्यानं निर्देश केला. मग नाराजीनंच डफील्ड खुर्चीवरून उठले व कीफेबरोबर प्रवेशद्वारापाशी आले.

कॉलिन्सची कीफेनं गव्हर्नर डफील्ड यांच्याशी ओळख करून दिली. डफील्ड म्हणाले, 'पस्तिसाव्या घटनादुरुस्तीच्या संबंधात काही महत्त्वाचा पुरावा तुमच्याकडं आहे...'

'तुम्ही व तुमच्या सदस्यांनी ऐकलाच पाहिजे असा हा पुरावा आहे.'

'अॅटर्नी जनरल कॉलिन्स, आता ते शक्य नाही. तुम्हाला उशीर झालाय्. गेले चार दिवस न्यायसमितीपुढे सुनावणी चालू होती. साक्षीदारांनी साक्षी दिल्या. आज सकाळीच टायनॅनचंही निवेदन झालं. आता या विषयावर चर्चा नाही. काही मिनिटांतच मतदानाला आरंभ होईल'

'चेंबरच्या बाहेर माझा पुरावा ऐका व तो ऐकेपर्यंत मतदान लांबणीवर टाका.'

'छे! हे नियमाला सोडून होईल.'

'माझ्याजवळचा पुरावा केवळ तुमच्याच दृष्टीने नाही तर अमेरिकेच्या दृष्टीनं महत्त्वाचा आहे. तो ऐकल्याविना तुम्ही मतदानच करू शकत नाही.'

त्याच्या शब्दातील तळमळीचा डफील्ड यांच्यावर थोडासा परिणाम झाला. 'तुमच्याकडं इतका महत्त्वाचा पुरावा असला तरी आता होणारं मतदान मी कसं थांबवणार?'

'सभागृहात पुरेशी गणसंख्या (कोरम) नसेल तर मतदान होऊ शकणार नाही ना?'

'म्हणजे बहुसंख्य सभासदांना सभागृहात हजर राहू नका म्हणून सांगायचं? पण ते शक्य नाही. अनुपस्थितांना सभागृहात आणण्यास सांगता येतं.'

**माझ्याजवळचा पुरावा केवळ तुमच्याच दृष्टीने नाही तर अमेरिकेच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे.**

' पण त्यापूर्वीच माझ्याजवळचा पुरावा ऐकून होईल.'

' किती वेळ लागेल ?'

' फक्त दहा मिनिटं. वीस–वीस सभासदांचे दोन गट करा. मी प्रत्येक गटाला टेप वाजवून दाखवीन. त्यांनी टेप ऐकली की, मग मतदान करावं.'

' ही तुमची विनंती साधीसुधी नाही.'

' माझ्याजवळचा पुरावाच असामान्य आहे ! कॉलिन्सनं ठासून सांगितलं. तो म्हणाला, ' ही टेप ऐकण्याचा काही मार्ग तुम्ही शोधून काढलाच पाहिजे. तुमचं मत बदलू शकेल अशी या जगात कोणतीही गोष्ट नाही का ?'

' ही घटनादुरुस्ती कपटपूर्वक सुचविलेली आहे व त्यात काही कारस्थान आहे हे जर सिद्ध करता आलं, तर फेरविचार करता येईल.'

' मी सिद्ध करू शकतो तसं ! यामागं फार मोठं राष्ट्रीय कारस्थान आहे. तेव्हा तुम्ही हा पुरावा ऐकाच. तुम्ही तो ऐकला नाही व मतदान केलं, तर तुम्हाला आयुष्यभर पश्चात्ताप होईल.'

त्याच्या बोलण्यानं प्रभावित होऊन डफील्ड म्हणाले, ' ठीक आहे. पुढील दहा मिनिटं सभागृहात कोरम राहणार नाही अशी व्यवस्था सिनेटर ग्लासला मी करायला सांगतो. तुम्ही चौथ्या मजल्यावर जा. लिफ्टच्याच जवळच्या कमिटीरूममध्ये जाऊन थांबा. आम्ही तिथं येतोच.'

कॉलिन्स कीफेबरोबर लागलीच चौथ्या मजल्याकडे निघाला. ¤

चौथ्या मजल्यावरील कमिटीरूममध्ये सिनेट अध्यक्ष डफील्ड, सिनेटर ग्लास, कीफे व कॉलिन्स जमले होते. ' आर डॉक्युमेंट'च्या शोधाचा सारा इतिहास कॉलिन्सनं त्यांना ऐकवला. ज्या दिवशी माजी अॅटर्नी जनरल बॅक्स्टर यांना हृदयविकाराचा झटका आला त्या दिवशी टायनॅन व बॅक्स्टर यांच्यात जे संभाषण झालं त्याची ही टेप होती. टेपरेकॉर्डरचा आवाज नीट आहे की नाही, हे कॉलिन्सनं तपासलं व मग तो म्हणाला, ' आता मी टेपरेकॉर्डर चालू करतो. प्रथम टायनॅनचा आवाज ऐकू येईल. मग बॅक्स्टरचा. हा टायनॅनचाच आवाज आहे याबद्दलचं ध्वनितज्ज्ञ डॉ. लेनार्ट यांचंही सर्टिफिकेट मी सोबत आणलंय. तर आता ऐका– ' आर डॉक्युमेंट ' नावाचं हे गुपित आहे.'

कॉलिन्सनं टेपरेकॉर्डवर ' प्ले ' असं लिहिलेली पट्टी दाबली. टेप चालू झाली आणि मग आवाज आला...

टायनॅनचा आवाज : ' नोह् बॅक्स्टर, आपण दोघेच इथं आहोत ना ?'

बॅक्स्टरचा आवाज : ' तूच म्हणालास ना एकांतात भेटायचं म्हणून ? त्याकरिता माझ्या घरासारखी दुसरी सुरक्षित जागा नाही !'

टायनॅनचा आवाज : ' ठीक आहे. ' आर डॉक्युमेंट 'चा शेवटचा भाग मी तयार केलाय्. हॅरी व मी आम्हा दोघांनाही ही योजना अगदी पक्की वाटतेय्. तेव्हा आता तुला आमच्याबरोबर शेवटपर्यंत राहायला पाहिजे. ऐनवेळी तू माघार घेता कामा नयेस. पस्तिसावी घटनादुरुस्ती अंमलात येण्यासाठी वाटेल तो त्याग आणि वाटेल त्याचा त्याग आपल्याला करावा लागला तरी तो आपण केला पाहिजे, असं आपण ठरवलंय. तू यात पुरेपूर गुंतलेला आहेस. तू ठरवलंस तरी, तुला आता यातून आपलं अंग काढून घेता येणार नाही.'

बॅक्स्टरचा आवाज : ' कशासाठी अंग काढून घ्यायचं ? व्हर्नान, तुला म्हणायचंय् तरी काय ?'

टायनॅनचा आवाज : ' जनता जे स्वतः करू शकत नाही ते आपण जनतेसाठी करायचं. त्यांना सुरक्षा मिळवून द्यायची. पस्तिसावी घटनादुरुस्ती मंजूर झाली की, ' आर डॉक्युमेंट 'चा प्रकल्प आपण ताबडतोब अंमलात आणू. पस्तिसाव्या घटनादुरुस्तीच्या आधारे आपण मूलभूत हक्क स्थगित करू...'

बॅक्स्टरचा आवाज : ' तसं नाही करता येणार. देशात खरोखरच आणीबाणीची परिस्थिती निर्माण झाली तरच पस्तिसाव्या घटनादुरुस्तीतील अधिकाराचा वापर करता येईल. तशी स्थिती नसेल तर काही करता येणार येणार नाही.'

टायनॅनचा आवाज : ' त्यात काय. आपण स्वतः देशात आणीबाणी निर्माण करू शकू. त्याची व्यवस्था मी केली आहे. इतरांच्या जीवितासाठी कोणा एकाचा त्याग करावा लागतो, बळी द्यावा लागतोच. तेव्हा तुला किंवा मला– बहुधा तुलाच टी. व्ही.वर जनतेला उद्देशून भाषण करून आणीबाणीची घोषणा करावी लागेल. ' आर डॉक्युमेंट 'मधील मुख्य योजना हीच आहे. मी तुझं भाषणही तयार केलेलं आहे. तू जनतेला उद्देशून म्हणायचंस, ' या शोकप्रसंगी मी तुमच्याशी बोलतोय्. काल आपले लाडके राष्ट्राध्यक्ष वॅडस्वर्थ यांचा खून झाला. आपण सारेच दुःखाच्या खाईत लोटले गेलो आहोत. या खुनामागं राष्ट्र उलथून पाडायचं कारस्थान होतं. आपल्या एका महान नेत्याचा बळी गेला आहे. अशा प्रकारची हिंसा पुन्हा होऊ नये म्हणून आपण दक्ष राहिलं पाहिजे. देशातील अराजकाला, अनाचाराला, दडपशाहीला आळा घालण्यासाठी नव्या अध्यक्षांच्या आदेशानुसार मी आणीबाणीची घोषणा करीत आहे. ' बिल ऑफ राईटस् ' पस्तिसाव्या घटनादुरुस्तीनुसार स्थगित करण्यात आले आहेत आणि आता राष्ट्रीय सुरक्षा समिती...'

बॅक्स्टरचा आवाज : ' अरे बापरे ! व्हर्नान, मी जे ऐकतोय त्यावर माझा विश्वास बसत नाहीय. याचा अर्थ तू घटनादुरुस्ती मंजूर झाली की, राष्ट्राध्यक्ष वॅडस्वर्थ यांच्या खुनाचा आदेश देणार ?'

टायनॅनचा आवाज : ' आपण फार सहृदय असल्याचा उगाच पुळका आणू नकोस. सबंध देश वाचवण्यासाठी एखाद्या व्यक्तीचा त्याग करावा लागला तर बिघडलं कुठं ?'

बॅक्स्टरचा आवाज : ' अरे, परमेश्वरा...'

टायनॅनचा आवाज : ' बॅक्स्टर...बॅक्स्टर...काय झालं एकदम ! बरं नाही वाटत का ? हॅरी, बॅक्स्टरला हृदयविकाराचा झटका तर नाही आला ? जरा त्याला धरून ठेव. मी हॅनाला हाक मारतो...'

टेप इथंच संपली होती.

डफील्ड, कीफे व ग्लास यांच्याकडे कॉलिन्सनं पाहिलं. तिघांना टेप ऐकून जबर धक्का बसला होता.

कॉलिन्सनं विचारलं, ' आता तरी न्याय मिळेल ?'

डफील्ड म्हणाले, ' महाभयंकर आहे हे. शेवटी सत्याचाच विजय

होईल. मी आताच सर्व सिनेट सभासदांना टेप ऐकायला पाठवून देतो.'

¤

वॉशिंग्टन येथील विमानतळावर धावपट्टीच्या दिशेनं क्षणाक्षणाला ते विमान खाली येत होते. वेळ रात्रीची होती. विमानाच्या खिडकीतून धावपट्टीवरचे दिवे हेलकावताना कॉलिन्सला दिसत होते. मग एक सौम्य धक्का बसला नि विमान धावपट्टीवर उतरलं.

विमानतळावर सर्वप्रथम शरीररक्षक होगान भेटला. त्यानं कॉलिन्सचं अभिनंदन केलं. टोनी पिअर्सही विमानतळावर हजर होता. खिशातून त्यानं एक वर्तमानपत्र काढून कॉलिन्सला दाखवलं. पहिल्याच पानावर ठळक टाईपात बातमी होती—

## राष्ट्राध्यक्ष व देशाविरुद्धचे कारस्थान उघड : टायनॅनवर आरोप
## पस्तिसावी घटनादुरुस्ती नामंजूर

'ख्रिस, तू कमाल केलीस.' पिअर्स हर्षभरित होऊन म्हणाला. 'आताच टी. व्ही.वर कॅलिफोर्नियाच्या सिनेटचं मतदान पाहून मी आलो. सर्वांच्या सर्व चाळीसही जणांनी घटनादुरुस्तीविरुद्ध मत दिलं! एकमतान घटनादुरुस्ती फेटाळण्यात आली. ख्रिस, तू जिंकलास. तू शेवटी बाजी मारलीस.'

'मी एकटयानं नाही. कर्नल बॅक्स्टर, फादर डुबिन्स्की, माझा मुलगा जोश, ओलिन कीफे, डोनाल्ड रॅंडेनबॉग, जॉन मेनार्ड, रिक बॅक्स्टर, इश्मेल यंग आणि तू स्वतः, आपण साऱ्यांनी हे काम केलंय.'

बोलत बोलत ते विमानतळाबाहेर आले. परंतु तेथे कॉलिन्सची नेहमीची मोटार नव्हती. राष्ट्राध्यक्षांची बुलेटप्रूफ गाडी होती. राष्ट्राध्यक्षांच्या शोफरनं कॉलिन्सला सलाम ठोकला. कॉलिन्सनं पिअर्सकडे प्रश्नार्थक मुद्रेनं पाहिलं तेव्हा तो म्हणाला,

'राष्ट्राध्यक्षांना तुला भेटायचंय. तू विमानतळावर आलास की, परस्पर तुला व्हाईट हाऊसवर घेऊन यायला सांगितलंय.'

'ठीक आहे,' असं म्हणून कॉलिन्स व पिअर्स मोटारीत बसले. मोटार व्हाईट हाऊसकडे निघाली. पिअर्स म्हणाला,

'ख्रिस?'

'बोल.'

'टायनॅन मरण पावला हे कळलं तुला?'

'नाही.'

'दोन तासांपूर्वी त्यानं आत्महत्या केली. आपल्या तोंडात पिस्तुलाची नळी ठेवून त्यानं गोळी झाडून घेतली.'

'हिटलरसारखाच त्यानं शेवट करून घेतला.' कॉलिन्स म्हणाला.

'आणि हॅरी ॲडकॉक गायब झालाय.'

'बोरमनसारखा.' कॉलिन्स म्हणाला.

व्हाईट हाऊसवर ते पोचले. ओव्हलरूममध्ये छोटीशी पार्टीच चालू होती. उपराष्ट्राध्यक्ष व अन्य वरिष्ठ मंडळी हजर होती. कॉलिन्सची पत्नी कॅरेनही तिथं आलेली होती. राष्ट्राध्यक्ष वॅडस्वर्थ तिच्याशी काहीतरी बोलत होते.

कॉलिन्सला पाहताच कॅरेन धावतच त्याच्याकडे आली. 'ओह, ख्रिस, तू मला किती आवडतोस...' असं म्हणत तिनं त्याला मिठी मारली.

इतक्यात राष्ट्राध्यक्ष स्वतः खुर्चीवरून उठले व त्याच्या दिशेने येऊ लागले. कॅरेनला मिठीतून मोकळं करीत कॉलिन्सही त्यांच्या दिशेने निघाला. त्याचा हात प्रेमभरानं दाबीत वॅडस्वर्थ म्हणाले, 'तू माझा जीव वाचवलास. इतकंच नाही तर, देशातील लोकशाहीही. या आधी मी तुझं ऐकलं नाही याबद्दल फार वाईट वाटतं. मी तुझे उपकार कधीही फेडू शकणार नाही. तुझं काही काम असलं, तर केव्हाही सांग...'

'मला दोन गोष्टी हव्या आहेत.'

'बोल.'

'पहिली गोष्ट म्हणजे 'आर डॉक्युमेंट' शोधण्याच्या कामी मला ज्या इसमाची मदत झाली त्याला तुरुंगवासातून पूर्ण माफी तुम्ही द्यायची व त्याला त्याचं मूळ नाव धारण करू द्यायचं. त्याचं नाव डोनाल्ड रॅंडेनबॉग, पण तो शिलर नावानं सध्या वावरतोय.' कॉलिन्सनं सांगितलं.

'त्याला माफी देण्याचा आदेश तयार कर. मी सही करतो.' राष्ट्राध्यक्ष म्हणाले.

'दुसरी गोष्ट म्हणजे आपल्या देशातील गुन्हेगारीचा प्रश्न आहेच. दडपशाहीने तो सुटणार नाही. त्यावर काहीतरी उपाययोजना आखायला हवी.'


'नक्कीच! मी त्याबद्दल विचार केलाय. सर्वांत आधी म्हणजे 'बिल ऑफ राईट्स' स्थगित न करता त्याचाच नीट वापर करून घेण्याचे मी ठरवले आहे. उद्या मी एका खास चौकशी मंडळाची घोषणा करणार असून, तू व टोनी पिअर्स यांची या मंडळाचे सदस्य म्हणून नेमणूक करणार आहे. एफ. बी. आय. ची पूर्ण चौकशी करून त्यात टायनॅनने घुसडलेल्या बेकायदा गोष्टी पूर्णपणे काढून टाकून एफ. बी. आय. चे शुद्धिकरण करणे हे या चौकशी मंडळाचे काम राहील. तसंच गुन्हेगारीला आळा घालू शकेल अशा आर्थिक व सामाजिक कायद्यांबाबतही मला तुझ्याशी बोलायचंय.'

कॉलिन्सनं संमतिदर्शक मान हलवली व राष्ट्राध्यक्षांचे आभार मानले.

राष्ट्राध्यक्ष म्हणत होते, 'उद्यापासूनच आपण कामाला लागू. आता या रात्री मात्र आपण लोकशाहीचा विजय सेलिब्रेट करू या.' त्यांनी मद्याचा ग्लास कॉलिन्सच्या हातात दिला.

दिवे चमचमत होते. त्या काळोख्या रात्रीही साऱ्या दिशा आश्वासक प्रकाशानं भरल्या आहेत, असं कॉलिन्सला जाणवलं.

**समाप्त**



## हिंदी चित्रसृष्टी ( ६० ते ७५ )

# तरंगणाऱ्या डोक्याची.... लटपटत्या पायाची....

शिरीष सहस्रबुद्धे          अरविंद भोमे

**का**य अजब चीज आहे ही हिंदी चित्रसृष्टी !

जगतातला पहिल्या क्रमांकाचा चित्रपट-व्यवसाय, आणि भारतातला दुसऱ्या क्रमांकाचा उद्योगधंदा अशासारखी बिरुदं अभिमानानं मिरविणाऱ्या या भारतीय–म्हणजे धंद्याच्या दृष्टीनं तरी फक्त हिंदीच–चित्रपटसृष्टीनं भरपूर उन्हाळे-पावसाळे पाहिले, भोगलेले आहेत. या प्रत्येक उन्हाळ्या-पावसाळ्याबरोबर ती थोडीफार बदलतही गेली आहे. कारण तसं म्हटलं तर चित्रमहर्षी दादासाहेब फाळक्यांचं आता नावकीर्तीशिवाय काय शिल्लक उरलंय् ?–तर सामाजिक संदर्भ बदलला, विषय–कथा बदलल्या, हाताळणीची धाटणी बदलली; तंत्र बदललं, थोडक्यात म्हणजे 'कृष्णाकाठी कुंडल आता पहिले उरले नाही,' वगैरे.

पण या सगळ्या अदलाबदलीत एक वैशिष्ट्य मात्र कायम राहिलं आहे. चित्रसृष्टीला मी अजब चीज म्हटलं ते तेवढ्यासाठीच.

अनिश्चितता. प्रचंड अनिश्चितता. वळवाच्या पावसासारखी अनिश्चितता.

अर्धशतकापेक्षा अधिक अवधीच्या आपल्या वाटचालीत हिंदी चित्रसृष्टीनं काय विलक्षण उलथापालथ अनुभवली आहे! क्षणाचाही भरंवसा नसलेला इतका पराधीन अनिश्चित व्यवसाय दुसरा नसेल. आज सूर्योदयाला यशकीर्तीच्या शिखरावर आरूढ असलेली मंडळी सूर्यास्ताबरोबरच इतक्या झपाट्यानं मावळून जातात की त्यांच्या वैभवशाली अस्तित्वाची नावनिशाणीसुद्धा उरत नाही; तर कालपर्यंत ज्याच्या अस्तित्वाची गंधवार्तासुद्धा या यक्षनगरीला नव्हती, त्याच्या बुटाच्या टोकाचं दर्शन घ्यायलासुद्धा आज चढाओढ सुरू होते, तीही नोटांच्या थप्प्या घेऊन! या घटना वास्तव आहेत. अतिशयोक्त किंवा काल्पनिक नव्हेत, आणि ही अनिश्चितता चित्रसृष्टीच्या नसानसात इतकी भिनलीय् की ते 'थ्रिल' झालंय्, ती एक नशा ठरलीय्, त्यात काही वाईट-वेगळं आहे, ही जाणीवच शिल्लक नाही. आणि म्हणूनच की काय, आज अर्धशतकानंतर हिंदी चित्रसृष्टीचं माथं आभाळात तरंगायला लागलं असलं तरी तिचे पाय मात्र लटपटतेच राहिलेत शेणामेणाचे! वर्षाला तीनचारशे चित्रपट निघतात खरे, पण त्यांच्या मुहूर्तापासून यशापयशापर्यंत सगळंच दैवाधीन!



नर्गिस
अभिनयसम्राज्ञी.
पण खांद्यावरूनच नव्हे, तर डोक्यावरून घट्ट पदर घ्यायच्या काळातली.
जमाना बदल गया!

पन्नाशी ओलांडलेल्या हिंदी चित्रपटसृष्टीच्या आयुष्यात असे कित्येक दैवाचे खेळ घडून गेले आहेत, कित्येक मैलाचे दगड मागे पडले आहेत, कित्येक हुकमी चित्रपटांनी आणि चित्रपटकारांनी सपाटून मार खाल्लाय् आणि कित्येक अपयशाचा शिक्का बसलेले चित्रपट सुपरहिट् ठरले आहेत. कित्येक रावांचे रंक आणि प्याद्यांचे फर्जी झालेले आहेत, कित्येक...

हे कित्येक बरेवाईट बदल न्याहाळण्यासाठीच हा लेखनप्रपंच. ¤

हिंदी चित्रपटसृष्टीच्या या प्रदीर्घ-प्रवासाचा आलेख काढण्याऐवजी गेल्या पंधरावीस वर्षांच्या कालखंडावरच लक्ष का केंद्रित करायचं?

कारणं बरीच आहेत.

व्यावहारिक सोय हे एक किरकोळ कारण झालं.

खरं तर असं की भूतकालात जमा झालेल्या हिंदी चित्रपटांचा आणि त्यांच्या दुनियेचा विचार आता करणं निरर्थक ठरेल. त्यातून अभिमान किंवा क्वचित वैफल्य या पलीकडे काही निर्माण व्हायची शक्यता नाही. तेव्हा ज्या चंदेरी दुनियेशी आपण निदान प्रेक्षक म्हणून नित्य संबंधित आहोत, ती कालबाह्य होण्यापूर्वीच तिचं पुनरावलोकन करणं अधिक लाभदायक ठरेल. साहित्याप्रमाणं चित्रपटातही आपण आधुनिक आणि समकालीन असा भेद केला पाहिजे असं आम्हाला वाटतं. या भेदातूनच लेखाच्या विषयावरच्या कालमर्यादेचं तिसरं कारण उद्भवतं ते असं की १९५५–६० आणि त्यानंतरचा काळ हा चित्रपटसृष्टीतला संक्रमणकाल म्हणायला हवा. याच सुमाराला हिंदी चित्रपटातला मनू पालटला, जमाना बदलला. आणि ज्याला काहीशा broad terms मध्ये 'आधुनिक हिंदी चित्रपट' म्हणता येईल, त्याचा उगम साधारण याच काळात शोधता येतो. आणि १९५५–५८ पूर्वीच्या सिनेमाचा विचार करता त्यानंतरच्या या पंधरावीस वर्षातील सिनेमा हा निश्चितच 'आधुनिक चित्रपट' या सदराखाली येईल. केवळ नव्या लाटेतले अलीकडचे चित्रपट, Art movies किंवा समांतर चित्रपट म्हणजे आधुनिक (modern) चित्रपट नव्हे, त्याला समकालीन (contemporary) चित्रपट म्हटलं पाहिजे. तर या आधुनिक चित्रपटाच्या प्रवाहाचा उगमापासून परिचय असावा. म्हणून त्याच्या इतिहासकहाणीची आवश्यकता—तीही कालमर्यादेसह. ¤

१९५५ च्या आसपास बऱ्याच महत्त्वाच्या घडामोडी घडल्या, बदल झाले, तेही मुळापासून झाले, चित्रपटांचा आविष्कार आणि आशय, दोन्हींमध्ये फरक पडला. एक तर रंगीत चित्रपटांची संख्या सावकाश पण निश्चितपणे वाढायला लागली. १९५४ मध्ये

एकही रंगीत चित्रपट निर्माण झाला नव्हता, तर दहा वर्षांनीच १९६४ मध्ये त्यांची संख्या चोवीस होती. नायक-नायिकायुगुलाप्रमाणे मेहमूद–शुभा खोटे यासारखी एखादी कॉमेडियन् पेअर 'कॉमिक् कम रोमँटिक रिलीफ्'साठी योजायला सुरुवात झाली. 'मदर इंडिया'च्या यशामुळे सुनीलदत्त, राजेन्द्रकुमार आणि राजकुमार हे तुलनेनं नवे असलेले अभिनेते चांगलेच 'सेट्' झालेले होते. पण त्यापेक्षाही वेगानं बदल झाला, पर्याय निर्माण झाले ते नायिकांच्या आघाडीवर. नर्गिस, सुरैय्या, कामिनी कौशल या श्रेष्ठ चित्रतारका जरा वेगानंच अस्तंगत होऊन मीनाकुमारी, वैजयंतीमाला, नूतन, वहिदा रेहमान, माला सिन्हा यांचं राज्य आस्तेकदम पण निश्चित स्थैर्यानं सुरू झालं. संगीतक्षेत्रातही जुने संगीतकार अगदी क्षणात नामशेष झाले नसले, तरी मदनमोहन, हेमंतकुमार, रवी, ओ. पी. नैय्यर, रोशन आणि सलिल चौधरी यांचा प्रभाव वाढला, उमेद वाढली. संगीताला व संगीताच्या चित्रीकरणाला प्रथम शिस्त आली आणि हळूहळू साचेबंदपणा आला. गाण्यांच्या Situations निरनिराळ्या चित्रपटांत सारख्याच आढळायला लागल्या. उदाहरणार्थ, दर्दभरी विरहगीते, निसर्गाच्या पार्श्वभूमीवरील युगुलगीते, भजने, गजल, कव्वाली, मुजरा, बोधप्रद, स्फूर्तिदायी गाणं, बालगीत, वाढदिवसप्रसंगीचं गाणं, दोन वेगळ्या चालीत एक गाणं, असे काही 'टाइप्स्' तयार झाले आणि प्रत्येक व्यावसायिक चित्रपटात यांतले तीन–चार तरी साचे वापरणं आवश्यक बनलं.

हे असं जे क्रांतिकारक परिवर्तन चित्रसृष्टीत घडून गेलं, त्याचं उगमस्थान कोणतं होतं, त्याला गती कशी मिळाली, हे काहीसं ढोबळमानानंच सांगता येईल.

सन एकोणीसशे अठ्ठावन्न.

पूर्वीच्या 'बांबे टॉकीज्' आणि 'फिल्मिस्तान'च्या एस्. मुकर्जींनी 'फिल्मालय' या चित्रनिर्मितिसंस्थेची स्थापना केली, आणि पहिला चित्रपट काढला– 'दिल देके देखो'. नवे कलाकार, म्युझिकल–रोमँटिक कॉमेडीचा हिट फॉर्म्युला आणि नासिर हुसेन हा ताज्या दमाचा दिग्दर्शक यांच्या मिलाफानं हे चित्र सुपरहिट ठरलं. त्याची गाणी तर उच्चांक करणारी लोकप्रियता मिळवून गेली, काही अजूनही ओठाओठांवर आहेत. हिंदी फिल्म इंडस्ट्री या काळात, हमखास यश मिळवून देणारा नवा फार्म्युला शोधतच होती. 'दिल देके देखो'नं हा मंत्र, ही दिशा इंडस्ट्रीला दिली. चटकदार भेळ–मिसळीसारखाच चटक लावणारा हा नवा फॉर्म्युला अजूनही चालतोय. चालवला जातोय्. यातली नायिका एकदम फॅशनेबल, चंचल आणि 'मॉड'– अर्थात तत्कालीन सदर्भात– तर नायक उच्छृंखल, थोडासा आवारा जातीचा. मध्यंतरापर्यंत दोघांचं प्रेम चांगलं शिजलं की, मग गैरसमज, खलनायकी चाळे किंवा जालिम जमाना अशा एखाद्या ठराविक विघ्नातून पोळून शेवटी क्लायमॅक्स; अर्थात तो गोडच. या कलेवरावर मग, गावंढळपणातून विनोदनिर्मिती करणारं एखादं पात्र, आधुनिक ऑर्केस्ट्रेशनसह संगीत, युवकांना रिझवतील अशी भडक नृत्यं वगैरे नक्षीची कलाबुतं चढवली जायची. युवकवर्ग हा चित्रपटाचा खरा शौकीन आश्रयदाता, तेव्हा त्याचं मन राखण्याच्या सर्व क्लृप्त्या या साच्यांमध्ये उदारहस्ते वापरलेल्या होत्या.

अर्थात 'दिल देके देखो'नं नवी वाट चोखाळली आणि दाखवली असली तरी तिचा प्रभाव काही क्षणकालात आणि सार्वत्रिकरीत्या पसरला नाही. १९६० चे गाजलेले चित्रपट आठवले तर, त्यांच्यावर परंपरेचाच प्रभाव अधिक असल्याचं ध्यानी येईल. के. आसिफ यांचा 'मुगल–ए–आजम' याच वर्षी पुरा झाला, प्रदर्शित झाला आणि हिट् ठरला. त्याच्या अपेक्षेबाहेर मिळालेल्या यशाला कारणंही तशी समर्थ होती. बराचकाळ निर्मिती अवस्थेत रेंगाळलेल्या या चित्राची तयार झालेली हवा, अवाढव्य खर्च करून उभं केलेलं बादशाही वैभवाचं वातावरण, पृथ्वीराज–दिलीप–मधुबाला यांसारखे बडे कलाकार, नौशादचं लोकप्रिय संगीत आणि मुख्य म्हणजे सलीम–अनारकलीची चटका लावणारी, नाट्यपूर्ण, एव्हरग्रीन लव्ह-स्टोरी अशा मजबूत खांबांवर उभारलेला हा चित्रपट अजूनही लागला तरी हाऊसफुल्ल चालतो. विदेशी 'टेन कमांडमेन्ट्स्' किंवा 'गॉन् विथ् द विंड्' सारखं हे चित्रही भव्य 'all-time hits' च्या यादीत जमा झालं आहे.

## रंगीत चित्रपटांची वाढ

रंगीत चित्रपटांची सुरुवात झाल्यानंतरही कित्येक वर्षं भारतात रंगीत चित्रपट हा *अपवादच होता. आज नियम ठरलेल्या या* रंगीत चित्रपटांच्या *संख्येत* कसकशी वाढ होत गेली ते दाखविणारा हा एक आलेख. अर्थात काही निवडक वर्षांची ही आकडेवारी केवळ हिंदी चित्रांची नसून सर्व भारतीय चित्रपटांची आहे.

| वर्ष | रंगीत चित्रपट | कृष्णधवल चित्रपट |
|---|---|---|
| १९३३ | १ | २१३ |
| १९३७ | १ | १७८ |
| १९३८ | १ | १७१ |
| १९४९ | १ | २८८ |
| १९५२ | १ | २२९ |
| १९५३ | ३ | २७० |
| १९५५ | ३ | २८४ |
| १९५६ | २ | २९४ |
| १९५७ | ६ | २८७ |
| १९६० | ५ | ३१५ |
| १९६१ | ८ | २८९ |
| १९६२ | ५ | ३०७ |
| १९६३ | १२ | २८७ |
| १९६४ | २४ | २७९ |
| १९६५ | ३२ | २९० |
| १९६६ | ३२ | २७६ |
| १९६७ | ४५ | २८५ |
| १९६८ | ५१ | २८२ |
| १९६९ | ३७ | २५८ |



शम्मीकपूर : जंगली स्टाईल

१९६० च्या सुमारास शम्मीने गाजवलेल्या या शैलीची पुढे अनेकांनी नक्कल केली. त्यानं स्वतःसुद्धा. –अर्थात त्या सगळ्या नकलाच ठरल्या.

'दिल अपना और प्रीत पराई' हा दिग्दर्शक कमाल अमरोहींचा चित्रपटही भावपूर्ण प्रेमकहाणी, ताकदीचे कलाकार आणि गोड–लोकप्रिय गाण्यांच्या बळावर रौप्यमहोत्सवी यश संपादन करून गेला. 'घूंघट' ('नौकाडुबी' या टागोरकथेमध्ये अधिक नाटयपूर्णता आणि गतिमानता आणून 'जेमिनीनं' काढलेला बोलपट), 'सिंगापूर' (भडक चकाकी असलेली हलकीफुलकी क्राइम स्टोरी); गुरुदत्तचा 'चौदहवी का चाँद', रोशननं गाजवलेला 'बरसात की रात', आर. के. नय्यर–साधनाचा 'लव्ह इन् सिमला', आणि दिलीपकुमारचा 'कोहिनूर' हे प्रामुख्याने करमणूकप्रधान असलेले आणखी काही चित्रपट १९६० गाजवून गेले. हृषिकेष मुकर्जींचा राष्ट्रपतिसुवर्णपदक विजेता 'अनुराधा' (कार्यमग्न पती आणि उपेक्षित पत्नीची व्यथा); आणि माणसाच्या पैशाच्या हावरेपणाचा उपहास करणारी स्व. बिमल रॉयची कॉमेडी 'परख' हे बॉक्सऑफिसवर यथातथाच गेलेले या वर्षीचे दोन दर्जेदार सुखद चित्रअनुभव. 'जिस देश में गंगा बहती है' हा डाकूंच्या जीवनावर राजकपूरनं काढलेला संगीतपट प्रदीर्घ लांबी, थोडा वेगळा विषय, गाजलेली गाणी, माफक सेक्स–व्हायोलन्स आणि भावनांचा महापूर अशा खमंग मसाल्यामुळे एव्हरहिट् पिक्चर्समध्ये जमा झाला. राजच्या जीवनातलं नर्गिस-पर्व संपल्यानंतरही त्यानं जिद्दीनं त्यात 'पद्मिनी'ला नायिका म्हणून उभं केलं हे विशेष.

वर नावं दिलेले सगळे गाजलेले चित्रपट संगीतमय होते, काही तर निव्वळ संगीतावरच तरले–तारलेले होते. हे संगीतही प्रामुख्यानं पारंपरिक ढंगाचंच होतं. शंकर-जयकिशन, नौशाद, सचिनदेव बर्मन वगैरे दिग्गजांनी निर्मिलेल्या या संगीतविश्वात 'अनुराधा' चित्रपटाद्वारे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे सतारवादक पं. रविशंकर यांनी प्रथमच पदार्पण केलं आणि मैफल जिंकलीही. पण बी. आर. चोप्रांनी या सर्वांवर कडी केली ती 'कानून' हे गीतविरहित रहस्यचित्र काढून. प्रारंभी एक धाडसी प्रयोग वाटणारा 'कानून', पकड घेणारी जबरदस्त कथा आणि तिचे प्रामाणिक 'प्रेझेंटेशन' यामुळे रौप्यमहोत्सवी यश मिळवून गाजला. फाशीच्या शिक्षेच्या इष्टानिष्टतेसारख्या महत्त्वाच्या सामाजिक समस्येचा ऊहापोह करू पाहणारा 'कानून' अजूनही तितकाच ताजा वाटतो. अर्थात, 'चित्रपटाच्या यशासाठी चांगलं संगीत अपरिहार्यच' हा संकेत बी. आर. चोप्राजींनी फोल ठरविला, तरीही तो अपवादच ठरला. ती वाट अजमावायचं साहस इतर कुणी केलं नाही.

१९६१ मध्ये हिंदी चित्रपटसृष्टीला पुन्हा एक धक्का बसला.

धक्का देणारे होते पुन्हा एस् मुकर्जींच. शम्मीकपूर-सायराबानूसारखी तुळनेनं नवी जोडी घेऊन त्यांनी 'जंगली' काढला आणि शुअर सक्सेसचा आणखी एक हिट फॉर्म्युला चित्रसृष्टीच्या हाती ठेवला. उत्तम छायाचित्रण–शक्यतो रंगीत–मोहक निसर्गदृश्यं, भडक सेट्स्, काश्मीर किंवा इतरत्र वनश्रीत आणि डोंगररांगात रोमान्स, हलकेसे सेक्स अपील आणि 'लाऊड' संगीत या साऱ्यांची गोळाबेरीज म्हणजे प्रेक्षकांना नशा आणि निर्मात्याला यश असा हा कित्ता आता मात्र अनेकांनी गिरवायला सुरुवात केली. 'जंगली' युग सुरू झालं. त्या साच्यातली बरीच चित्रं हळूहळू येऊ लागली. त्यांतली काही सपशेल पडलीही. 'याऽहू' शम्मीकपूरनं मात्र आपली जी प्रतिमा 'जंगली' मधून निर्माण केली, ती आजपर्यंत कुणालाच पुसता आली नाही–

अगदी त्यालाही. भल्याभल्यांनाही त्यानंतर त्या वाटेनं जायचा मोह आवरला नाही.

'जंगली 'च्याच बरोबरीनं, 'दिल देके देखो 'च्या नासिर हुसेनची कृष्णधवल रंगातली रोमँटिक म्युझिकल कॉमेडी—' जब प्यार किसी से होता है '—हीसुद्धा त्याच्या ढंगानं चालली. डाकूंच्या आयुष्यातली ओबडधोबड वास्तवता, 'जिस देश में—'पेक्षा थोडचा जास्त प्रामाणिकपणे चितारणारा, 'गंगा जमना ' हा दिलीपकुमारच्या जबरदस्त भूमिकेनं आणि नौशादमियांच्या ढंगदार चालींनी रंगलेला चित्रपटही याच वर्षी पडद्यावर आला. दक्षिणेकडून आलेल्या चित्रपटात 'ससुराल ' आणि ' नजराना ' गाजले. 'आस का पंछी ', ' घराना ', ' हम दोनो ', 'मॉडर्न गर्ल ', आणि ' संपूर्ण रामायण ', ही १९६२ ची इतर काही हिट् पिक्चर्स. हृषिकेषचा ' मेम दीदी ', बिमल रॉयचा ' काबुलीवाला', व्ही. शांतारामचा ' स्त्री ', आणि ' फूल और कलियाँ ' हा बालचित्रपट अशा काही चांगल्या चित्रपटांचाही उल्लेख करायला हवा.

'साहिब बीबी और गुलाम ' या गुरुदत्तच्या चिरंजीव कलाकृतीनं १९६२ सालावर आपलं नाव कोरून ठेवलं. आपली प्रतिमा जणू पणाला लावून काढल्यासारख्या या चित्रपटासाठी स्थलकालाचा केवढा विशाल कॅनव्हास गुरुदत्तनं निवडला होता ! चित्रपटाच्या melancholy mood ला साथ देणाऱ्या हेमंतकुमारच्या संगीतानं, चित्राचा प्रभाव आणि टिकाऊपणा,दोन्हीत भर घातली. याच वर्षीचे, ' सूरत और सीरत ' (दिग्दर्शक, रजनीश बहल) हा आपल्या काळापुढे धावणारा चित्रपट, बिमल रॉयचा ' प्रेमपत्र ', केदार शर्मांचा ' हमारी याद आयेगी ', महेश कौलचा ' सौतेला भाई ' (शरदबाबूंच्या कादंबरीवरून निर्मित) हे चित्रपट काही एक कलात्मक उंची गाठणारे होते पण बी. आर्. चोप्राजींच्या ' धर्मपुत्र ' प्रमाणे त्यांनी बॉक्सऑफिसवर मार खाल्ला.

'प्रोफेसर ' आणि ' बीस साल बाद ' ही १९६२ ची दोन सुपरहिट्स्. ' जंगली ' च्या [साच्यातनं काढलेला शम्मीकपूरचाच 'प्रोफेसर '; त्याची नायिका होती कल्पना. नायिकेच्या शरीरप्रदर्शनाचा आज मवाळ वाटणारा त्यातला प्रयत्न लक्षणीय होता. ' बीस साल बाद ' हा हेमंतकुमारचा रहस्यपट बुद्धीला आव्हान देणारा बनवण्यापेक्षा धक्के देणारा बनवण्यावर जास्त भर देऊन काढला होता, आणि कथा आधारित व मुख्य गाणं ' कहीं दीप जले कहीं दिल ' हे जुन्या ' महल ' मधल्या ' आयेगा आनेवाला ' च्या धर्तीवर, अशा वैगुण्यांसकट सफल ठरलेल्या या चित्रपटानं चित्रसृष्टीला आणखी एक लोकप्रियतेची वाट दाखवली. याच्या यशानं प्रेरित होऊन ' वह कौन थी ', ' गुमनाम ' वगैरे रहस्यपट थोडयाच काळात हजर झाले आणि बरेचसे चाललेही. तथापि रहस्याची मांडणी बुद्धिनिष्ठ किंवा तर्कनिष्ठ करण्यापेक्षा भयरोमांचकारी करण्याकडेच त्यांचे लक्ष होते. त्यामुळेच चित्रपटातील अमानवी भ्रमांचे स्पष्टीकरण ते करू शकले नाहीत, तसा प्रयत्नही झाला नाही. दक्षिणेकडून आलेल्या ' राखी ' या यशस्वी चित्राचा आधार होता मानवी नाती आणि धार्मिक भावना हरियाली और रास्ता, मैं चुप रहूँगी, मेहंदी लगी मेरे हाथ, बाँबे का चोर, दिल तेरा दिवाना, चायना टाऊन, आणि एक मुसाफिर एक हसीना ही या वर्षीची कमीअधिक सक्सेसफुल गेलेली इतर काही पिक्चर्स. यांतल्या फारच थोडयांनी नवीन काही दिलं. बहुसंख्य चित्रपटांत गाण्यांची भरमार आणि जुनाच मसाला होता. फिल्म इंडस्ट्रीवरचा पलायनवादाचा प्रभाव मात्र वाढतच असलेला दिसून आला. साधना, आशा पारेख आणि नंदा यांच्यापासून सुरू होणारी नायिकांची तिसरी पिढी यावर्षी चांगली प्रस्थापित झाली. अर्थात नावं बदलली तरी भूमिकांचे साचे बहुश: तेच राहिले.

१९६३. फिल्म इंडस्ट्रीचं सुवर्णमहोत्सवी वर्ष.

मद्रासच्या श्रीधरचा ' दिल एक मंदिर ' (राजकुमार-मीनाकुमारी-राजेंद्रकुमार) हा त्रेसष्टचा महोत्सवी यश मिळविणारा चित्रपट. कॅन्सरग्रस्त पती आणि डॉक्टर प्रियकर यांच्यामध्ये सापडलेल्या तरुणीद्वारे जुनाच प्रेमत्रिकोण मांडणाऱ्या या चित्राचं वळण थोडं वेगळं होतं, आणि शंकर-जयकिशनचं समर्थ संगीत होतंच. इतर यशस्वी चित्रपटात



वाळवंटातली हिरवळ : गुरुदत्त—वहिदा रेहमान

हिंदी चित्रसृष्टीचा एक बुलंद बुरुंज
अशोककुमार
अजूनही नाबाद !



खलनायकाच्या 'इमेज' बाहेर
यशस्वीपणे पडलेला 'शेर'
—नव्हे, 'जंजीर'चा शेरखान.
खलनायकाची वस्त्रं उतरली
तरी अभिनयाची अस्त्रं राहिली,
प्राण राहिला !



फिर वही दिल लाया हूँ (रोमँटिक कॉमेडी), ताजमहल (अर्ध-ऐतिहासिक), गहरा दाग (गुन्हेगारी वळण), ब्लफ मास्टर (हास्य-चित्रपट), आणि हमराही (कौटुंबिक नाटच) यांचा समावेश करावा लागेल. 'अपराध मीच केला' वरून 'ये रास्ते हैं प्यार के' सारखा तर्कशून्यता-अवास्तवतेला वाव देणारा चित्रपट काढून फसलेल्या सुनीलदत्तनं दरोडेखोरी जीवनातलं क्रौर्य, शौर्य, भडक नाटच उघड करणाऱ्या वास्तवतापूर्ण 'मुझे जीने दो' मध्ये डाव जिंकला. 'हम दोनो'त तुफान उठवलेल्या जयदेवनं यातही संगीताची बाजी मारली. नौशादनंही 'मेरे महबूब' ही मुस्लिम सामाजिक प्रीतिकथा सच्च्या सुरांनी दरवळून सोडली.

या व्यावसायिकदृष्ट्या यशस्वी चित्रपटांबरोबरच त्रेसष्ट सालानं दिलेल्या काही कलात्मक किंवा किमान चाकोरीबाहेरच्या चित्रपटांचा उल्लेख करायलाच हवा. बी. आर. चोप्रांचा 'गुमराह', बिमल रॉयचा 'बंदिनी' आणि के. ए. अब्बासजींचा 'शहर और सपना' हे अशा प्रकारचे तीन प्रमुख चित्रपट. 'विवाहितेचे परपुरुषावरील प्रेम' ही थीम् असलेला 'गुमराह' एक तपापूर्वीच्या वातावरणात एक धाडसी प्रयोग होता. तथापि एकूण समस्या काहीशी सौम्य करून आणि अपरिहार्य तिथे व्यावहारिक तडजोडी करून (उदा. चित्राचा शेवट) चोप्राजींनी तो पब्लिकच्या गळयाखाली उतरवला. मुंबईत स्वतःच्या घराच्या शोधात असलेल्या एका तरुण जोडप्याची कथा सांगणारा 'शहर और सपना' मात्र बाजारात फार तग धरू शकला नाही.

इंडस्ट्रीच्या या सुवर्णमहोत्सवी वर्षाअखेरीस काही मोठे प्रश्नही उभे राहिलेले दिसतात. एक तर प्रामुख्यानं चित्रनिर्मितीच्या सर्व अंगांवर बॉक्स ऑफीस demands चं वर्चस्व वाढायला लागलं. साहजिकच चित्राच्या कलात्मक उंची किंवा दर्जापेक्षा चित्र किती आठवडे हाऊसफुल्ल जाईल याला महत्त्व आलं आणि याचाच उघड परिणाम दुसरी समस्या निर्माण होण्यात झाला—पलायनवादी चित्रपटांची संख्या झपाट्यानं वाढली. चवीपुरतं वास्तवतेचं तोंडीलावणं ठेवून बाकीचा भरपूर पलायनवादी करमणूकप्रधान मालमसाला भरायच्या सार्वत्रिक प्रवृत्तीनं चित्रसृष्टीला ग्रासलं. या अपराधाचे धनी होऊनही त्याची खंत बाळगणाऱ्या निर्मात्यांनी public demand वर ठपका ठेवला. थकलेल्या जिवांना विरंगुळा, स्वप्नांची सौदागरी वगैरे भाषा सर्रास वापरली जाऊ

लागली. याउलट समीक्षक-रसिकांनी अभिरुचिहीन चित्रपट सादर करीत राहिल्याचा दोष निर्माते-दिग्दर्शकांच्या माथी मारला. दुसरीकडे वाढता करमणूककर, भरमसाठ फुगत जाणारे निर्मितिखर्च वगैरे कारणांमुळे तिकिटांचे दर बरेच वाढले आणि एकंदर महागाई वाढल्याने ही करमणूकही महाग वाटू लागली. साहजिकच प्रेक्षकही पैसेपैशाचा मोबदला वसूल करून देणारी चित्रे पसंत करू लागले. हा वाद अजूनही अनिर्णित राहिला असला तरी, प्रेक्षक व निर्माते दोघेही या गैरव्यवहारात सारखेच दोषी आहेत ही गोष्ट उघड आहे. १९६२ व १९६५ च्या युद्धानंतर कलात्मक चित्रपटांच्या प्रेक्षकांच्या संख्येत जी लक्षणीय घट होत गेली, तीही दोन हातांनीच टाळी वाजल्याचा पुरावा नव्हे काय ?

या अडचणीच्या परिस्थितीतही १९६४ मध्ये 'एप्रिल फूल', 'कश्मीर की कली', 'जिद्दी', 'आयी मिलन की बेला', 'गीत गाया पत्थरोंने', 'जिंदगी', 'बेटी बेटे', 'हकीकत' आणि 'दोस्ती' हे चित्रपट झक्क चालले तर 'संगम' हा राजकपूरचा पहिला रंगीत संगीतपट सुपरहिट ठरला. हकीकत आणि दोस्ती हे दोन्ही चित्रपट कृष्णधवल रंगातले होते आणि भावनात्मक आवाहन आणि हृदयस्पर्शी गीतप्रसंग ही त्यांच्या यशाची दोन प्रमुख कारणे ठरली. हकीकत हा चेतन आनंदचा बोलपट, भारताचा पहिला प्रामाणिक युद्धपट म्हणता येईल. भारत-चीन युद्धावर आधारलेल्या 'हकीकत'ला १९६२ नंतरच्या राष्ट्रप्रेमाच्या लाटेचाही आधार मिळाला. 'दोस्ती'च

## काही महत्त्वाचे घडले.....

*ज्या काळाचा विचार आपण केला—करीत आहोत, त्यातील हिट् वा फ्लॉप् चित्रपटांबरोबरच महत्त्वाच्या घडामोडीही नमूद केल्या पाहिजेत.*

१९६० : १८ मे रोजी 'सुप्रीम कौन्सिल ऑफ मोशन पिक्चर प्रोड्यूसर्स'ची स्थापना. १ कोटी रु. अधिकृत भांडवलासह फिल्म फायनान्स कॉर्पोरेशनची कामाला सुरुवात. 'अनुराधा' या हृषिकेशच्या चित्रपटाला त्या वर्षीचे राष्ट्रपती सुवर्णपदक.

१९६१ : फिल्म इन्स्टिट्यूट, पुणे कार्यान्वित झाली. Censorship Crisis. 'भगिनी निवेदिता'ला राष्ट्रपती सुवर्णपदक.

१९६२ : गेल्या दहा वर्षांतील चित्रनिर्मितीचा नीचांक. अनधिकृत सेन्सॉर सल्लासमिती मुंबईत स्थापन. दादा ठाकुर (बंगाली) राष्ट्रपती सुवर्णपदकविजेता.

१९६३ : फिल्म इंडस्ट्रीचा सुवर्णमहोत्सव. IMPEC ची स्थापना.
करमणूक करात वाढ. चित्रपटाच्या खेळाच्या शेवटी राष्ट्रगीत ऐकविण्यास सुरुवात.

१९६४ : नॅशनल फिल्म अर्काइव्हचे कार्य सुरू.
'स्क्रीन ॲक्टर्स गिल्ड'ची स्थापना. अध्यक्ष—देव आनंद.
एस्. फत्तेलाल (२४ जाने.), शांता आपटे (२५ फेब्रु.), मेहबूबखान (२८ मे), यू. एस्. सनी (१ ऑक्टो.), गुरुदत्त (७ ऑक्टो.), मोहनलाल शाह (२२ ऑक्टो.) वगैरे मान्यवर व्यक्तींचे निधन.

१९६५ : कलकत्ता—मद्रासमध्ये हिंदीविरोधी चळवळीमुळे हिंदी चित्रांचे प्रदर्शन स्थगित. करमणूक करात अनेक राज्यांमध्ये वाढ.
चारुलता (बंगाली)ला राष्ट्रपती सुवर्णपदक.

१९६६ : फिल्म इंडस्ट्रीच्या राष्ट्रीयीकरणाचा तिसरा प्रयत्न राज्यसभेत फसला.
[दि. १६ नोव्हें.] कलरफिल्म्स्चा तुटवडा.
रेडिओ सिलोनशी निर्मात्यांचे मतभेद. शेवटी समेट.
बिमल रॉय (८ जाने.) व शैलेन्द्र (१४ डिसें.) यांचे निधन.

१९६७ : उटी येथील इंडू (I. N. D. U.) फिल्म फॅक्टरीचे उद्‌घाटन श्रीमती इंदिरा गांधी यांनी केले. कलर फिल्म्स् पुरवठ्याचे नवे धोरण.
फ्रँकफुर्टच्या चित्रपटमहोत्सवात 'यादें'ला ग्रँड प्री ॲवॉर्ड.
विविध भारतीवर पहिला जाहिरात—कार्यक्रम (दि. १ नोव्हें.).
राजकमल कलामंदिराचा रौप्यमहोत्सव. करदार स्टुडिओ बंद.
रोशन व बाबूराव पेंढारकर यांचे निधन.
लता मंगेशकरच्या पार्श्वगायन—कारकीर्दीचा रौप्यमहोत्सव.

१९६८ : जी. डी. खोसला समिती चित्रसुधारासाठी नियुक्त.
चित्रइतिहासात प्रथमच, ३१ मार्चपासून ४५ दिवसांइतक्या प्रदीर्घ काळात, चित्रनिर्मितीचे काम स्थगित.

१९६९ : ६ ऑगस्ट रोजी खोसला कमिशन रिपोर्ट लोकसभेत सादर. त्यात अनेक क्रांतिकारक सूचना.
'प्रेमपुजारी'तील चुंबनावरून देव आनंद व सेन्सॉरचे वादंग.
मधुबालाचे निधन.

१९७० : फिल्म फायनान्स कॉर्पोरेशनची मदत लाभलेला मृणाल सेनचा 'भुवन शोम' प्रकाशित. समांतर सिनेमाच्या लाटेचा एक उगम. संजीवकुमार—रेहाना सुलतान यांना 'दस्तक'साठी 'भरत' व 'उर्वशी' ही राष्ट्रीय पारितोषिके व किताब.
अनेक नवनवे कलाकार इंडस्ट्रीत आले.

१९७२ : मीनाकुमारी, पृथ्वीराज कपूर, गीता दत्त, महेश कौल, तरुण बोस यांचे निधन.

संगीत लक्ष्मीकांत-प्यारेलालनी गाजवलं. 'स्टार्स' नसलेली low budget चित्रेही यशस्वी होऊ शकतात, हा धडा दोस्तीनं दिला. तथापि फारच थोड्यांनी त्याचं अनुकरण केलं. दोस्ती छापाची काही चित्रं निघाली, पण तीही बहुश: पडलीच. 'फिल्म ऑफ द इयर' म्हणता येईल अशा 'संगम' मध्ये दिसला तो जुनापुराणा प्रेमत्रिकोणच. तोही अगदी सामान्य स्वरूपात. तथापि रोमान्स, संगीत आणि परदेशातील शूटिंग यांचा संगम त्याला सुपरहिट करून गेला. याचा एक परिणाम असा झाला की, काश्मीर उटीची गर्दी जरा ओसरली आणि संपन्न निर्माते तत्काळ स्वित्झर्लंड-रोम-पॅरिसकडे धावले. तथापि हे विदेशी आकर्षण प्रेक्षकांना फार काळ मोहू पाडू शकलं नाही. 'अशा शूटिंगमुळे हिंदीला फॉरेन मार्केटस् मिळतील', हे समर्थनही लटकंच ठरलं.

या काळात प्रेमत्रिकोणाइतकाच, किंबहुना त्यापेक्षाही जास्त जोरात चालला तो 'A boy meets a girl' हा फॉर्म्युला. बडे कलाकार आणि चलनी संगीतकार हे चित्रपटाचे टेकू बनले. व्ही. शांतारामसारख्या एखाद्याच दिग्दर्शक-निर्मात्याने नव्या चेहऱ्यांना वाव दिला, एरवी इंडस्ट्रीवर बड्या स्टार्सचंच प्रभुत्व कायम राहिलं. बहुसंख्य 'स्टार्स' आपापली एक खास 'स्टाइल' निर्माण करण्यामागं लागले. त्यांच्या वाढत्या लोकप्रियतेबरोबरच त्यांच्या नावावरच चित्रपट झपाट्याने विकले जाऊ लागले. साहजिकच धंदेवाइकांच्या दृष्टिकोनातून कथा किंवा अन्य कशापेक्षाही अशा स्टार्सचं महत्त्व प्रमाणाबाहेर वाढलं. कालांतरानं पक्क्या establish झालेल्या 'स्टार सिस्टिम'चा पाया इथंच घातला गेला.

आरजू, गुमनाम, हिमालय की गोदमें, जब जब फूल खिले, खानदान, वक्त, जानवर, काजल–ही १९६५ ची काही हिट टायटल्स. यांतले तीन तर सरळच a boy meets a girl या साच्यातले होते, दोन family drama मध्ये बसणारे होते, तर 'गुमनाम' रहस्यपट होता. वक्त आणि काजल हे आजच्या मल्टिस्टारकास्ट पिक्चर्सचे पूर्वज म्हणायला हरकत नाही. विनोद आणि देशभक्तीचं कॉकटेल बनवणारा, 'जोहर मेहमूद इन् गोवा' सफल ठरला आणि 'somebody in some place' हा एक नवा फॉर्म्युला उगवतोयसं वाटू लागलं, तथापि तसलीच इतर चित्रे टिकाव धरू शकली नाहीत. मेहमूदचा 'भूतबंगला' हा पासष्टचा गाजलेला दुसरा हास्यपट.

या सर्वांपेक्षाही अधिक लक्षवेधी ठरला तो वाङमयीन मूल्य असलेला दुर्मिळ चित्रपट–देवआनंदचा रंगीत 'गाईड.' नवकेतनच्या या चित्रपटाची हाताळणी दिग्दर्शक विजय आनंद यांनी अगदी वेगळ्या प्रकारे केली होती. तथापि लोकप्रिय संगीत, नृत्ये आणि माफक सेक्स–अपील यांच्याद्वारा त्यांची नजर अर्थातच बॉक्स-ऑफिसवर होती.

विशेष म्हणजे १९६६ मध्येही अनुपमा, आसरा, मेरे लाल आणि छोटा भाई ही चारही कृष्णधवल चित्रे अपेक्षेबाहेर यशस्वी झाली. याचं प्रमुख कारण समर्थ कथावस्तू हे होतं आणि वैयक्तिक–कौटुंबिक मानवी संबंधांवर त्यात भर दिलेला होता. तथापि ६६ चा सर्वाधिक यशस्वी चित्रपट होता 'फूल और पत्थर.' धर्मेंद्र–मीनाकुमारीला एकत्र आणणाऱ्या या चित्रपटाची वैशिष्टचे होती नाटयपूर्ण कथानक आणि भावनात्मक आवाहन. या रंगीत चित्राप्रमाणेच 'ममता' आणि 'मेरा साया' ही दोन फॉर्म्युल्यापासून थोडी बाजूला रोहिलेली रंगीत चित्रेही नाटयमय विषयाची ताकदवान हाताळणी आणि संगीतामुळे गाजली. 'दस लाख', 'लव्ह इन टोकियो' (म्युझिकल रोमान्स), 'आये दिन बहारके', 'दादी माँ' (कौटुंबिक), 'प्यार किये जा' (हास्यप्रधान), 'सूरज' (पोशाखी वैभवशाली नाटय) आणि 'तीसरी मंजिल' (समर्थ प्रतिभेचे दिग्दर्शन) ही या वर्षीची इतर हिट् पिक्चर्स. शैलेन्द्र-बासू भट्टाचार्यचा राष्ट्रपतिपदकविजेता 'तीसरी कसम' आणि चेतन आनंदचा 'आखरी खत' यांचाही उल्लेख केला पाहिजे. ग्रामीण पार्श्वभूमीवरची कलात्मक 'तीसरी कसम' बॉक्स ऑफिसवर मात्र उभी राहू शकली नाही.

१९६५ पासूनच हिट् चित्रपटांचे प्रमाण थोडे उतरलेले दिसते. १९६७ मध्ये तर, पडेल चित्रांचा आकडा चांगलाच फुगला आणि पालकी, अमन, नूरजहाँ, अराऊंड दि वर्ल्ड, असे भरवंशाचे महत्त्वाकांक्षी चित्रपटही साफ कोसळले. याचवेळी वाढते कर, कलाकारांचे वाढते मानधन, थिएटर्सची भाडेवाढ, अनिश्चित यश आणि पैशासाठी गळेकापू स्पर्धा या सर्वांना ऊत आला आणि ६७ सालचा अखेरचा भाग आणि १९६८ हे दीड वर्ष चित्रसृष्टीला संकटाचीच गेली. वितरकांचा दबाव वाढला आणि गुंतवणुकीविषयी ते सावध, साशंक बनले. तथापि अशाही परिस्थितीत ज्युएल थीफ, हरे काँच की चुडियाँ, हमराज, मद्रासचे मिलन व मेहरबान (नाटकी करमणूक+संगीत), राम और श्याम (दिलीपचा डबलरोल), फर्ज (बाँडछाप इंपोर्टेड गुप्तहेरगिरी), शागिर्द (हास्यसंगीत मिश्रण) हे चित्रपट १९६७ मध्ये तर दो कलियाँ, पत्थरके सनम, ब्रह्मचारी आणि शिकार हे १९६८ मध्ये हिट् ठरले. मात्र १९६५ ते ६८ या चारही वर्षातली बहुसंख्य हिट् पिक्चर्स ही फॉर्म्युला पिक्चर्स होती. नवी मोलाची भर फारच थोडी घातली गेली. दो कलियाँसारख्या चाकोरीबाहेरच्या वाटणाऱ्या चित्राची कल्पना परकीय होती. मनोजकुमारच्या 'उपकार' (१९६७) या चित्रपटात ग्रामीण–शहरी समस्या एकत्रितपणे व प्रगल्भतेने दीर्घकाळाने हाताळल्या गेल्याने तो यशस्वी झाला. अनोखी रात, रात और दिन, मंझली दीदी, संघर्ष आणि बंबई रात की बाहों में ही या दोन वर्षातली उल्लेखनीय चित्रे–जी विशेष चालली नाहीत. दोन वर्षांच्या combine box-office collection मध्ये बाजी मारली ती फर्ज आणि शागिर्द अशा चित्रपटांनी.

एक फूल दो माली, जीने की राह, आराधना आणि इत्तेफाक हे चार चित्रपट १९६९ च्या हिट्सच्या top list मध्ये असले तरी movie of the year म्हणता येईल इतका महत्त्वाचा आणि वैशिष्टचपूर्ण होता बी. आर्. चोप्रांचा इत्तेफाक. कानूनसारखा हा गीतविरहित चित्रपट, म्हणजे मार्केटात हुकुमी ठरलेला एक सहसी प्रयोगच होता. चित्रपटाचे कलानिर्देशक आणि छायालेखक नवेकोरे होते आणि त्यांनी केवळ ३० दिवसांच्या सलग चित्रीकरणातून हा चित्रपट पुरा केला. सप्टेंबर ६९ मध्ये तयार झालेला इत्तेफाक नोव्हेंबर ६९ पर्यंत संपूर्ण देशात प्रदर्शित झालाही होता. पक्कड घेणारी कथा असलेल्या या चित्रपटात नायिकेची भूमिका चक्क खलनायिकासदृश होती; तर यातल्या

मनोविकृत नायकाची आणि 'आराधना 'तील प्रियकराची अशा दोन्ही भूमिका करणारा राजेश खन्ना १९६९ चा टॉप स्टार ठरला. याच वर्षी बऱ्यापैकी चाललेल्या इतर काही चित्रपटांत मन का मीत, मेरे हुजूर, आशीर्वाद, इन्तकाम, संबंध, अनोखी रात, धरती कहे पुकारके, चंदा और बिजली, बडी दीदी, सरस्वतीचंद्र आणि आँसू बन गये फूल यांची नावं घेतली पाहिजेत. मन का मीतमुळे चार ताजे चेहरे पडद्यावर आले आणि त्यातले विनोद खन्ना व लीला चंदावरकर टिकून राहिले. संजीवकुमारने आपल्या योग्य स्थानाकडे झपाट्याने वाटचाल सुरू केली. हृषिकेशचे दिग्दर्शन आणि अशोककुमारचा विलक्षण प्रत्ययकारी अभिनय यांचा अपूर्व मिलाफ 'आशीर्वाद 'मध्ये झाला होता. १९६९ मध्येच प्रिन्स, तुमसे अच्छा कौन है, प्यार ही प्यार, दुनिया, एक श्रीमान एक श्रीमती, राजासाब, हसीना मान जायेगी, दिल और मुहब्बत, आया सावन झूमके, प्यार का सपना, अनमोल मोती, माधवी वगैरे बिगबजेट म्युझिकल रोमान्सेस बहुधा फ्लॉप गेले किंवा साधारण जेमतेम चालले. हीच परंपरा १९७० मध्येही चालू राहिली आणि मेरा नाम जोकर, तलाश, प्रेमपुजारी, आदमी और इन्सान, धरती, आणि गीत हे भरंवशाचे बिगबजेट पिक्चर्स पत्त्यांच्या बंगल्याप्रमाणे कोसळली. विशेषत: मेरा नाम जोकरचं अनपेक्षित अपयश काही दूरगामी परिणाम करणारं ठरलं. १९७० चं विक्रमी यश मिळवलं ते देव आनंदच्या 'जॉनी मेरा नाम' नामक साहस–सेक्स–संगीतादी मालमसाल्यानं तुडुंब भरलेल्या चित्रपटानं. या वर्षीचे इतर उल्लेखनीय चित्रपट :–खिलौना, खामोशी, सच्चा झूठा, जीवनमृत्यू, राहगीर, सावन भादो, यादगार, सफर, भुवन शोम, पवित्र पापी, ज्योति, प्रिया, दो दूनी चार, गुस्ताखी माफ, सत्यकाम, आणि अभिनेत्री. विशेष म्हणजे वैयक्तिक अभिनयनैपुण्याच्या क्षेत्रात अभिनेत्रींनी अभिनेत्यांवर सार्वत्रिक मात केल्याचं क्वचितच आढळणारं दृश्य या वर्षी दिसलं. खामोशीत वहिदा रहेमान, खिलौनामध्ये मुमताज, जीवनमृत्यूमध्ये राखी, यादगारमध्ये नूतन, सफर व सत्यकाममध्ये शर्मिला, प्रियामध्ये तनुजा आणि अभिनेत्रीमध्ये हेमामालिनी यांच्या performance चा उल्लेख जरूर करायला हवा. अभिनयाच्या आघाडीवरचं आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे १९६९–७० मध्ये भरपूर नवे चेहरे पडद्यावर आले आणि त्यांतले बरेच यशस्वी ठरले. १९६९ च्या विनोद खन्ना–लीनानंतर १९७० मध्ये राखी, रेखा, नवीन निश्चल, ऋषिकपूर, शत्रुघ्न सिन्हा, रणजीत, आशू, पेंटल आणि असरानी असे बरेच 'फ्रेश ' चेहरे चमकले; तर उत्पल दत्त व शारदा या प्रादेशिक चित्रपटातल्या दोन नावाजलेल्या मोहऱ्यांनी हिंदी रजतपटावर प्रथमच पदार्पण केलं. 'उमंग ' या आत्मारामजींच्या याच वर्षीच्या चित्रानं अनेक नवे प्रयोग केले. त्यातले सर्व कलाकार नवोदितांपैकीच होते.

□

## अभिनयाचा दर्जा आणि नवे कलाकार

अभिनेते–अभिनेत्रींच्या तीन पिढ्या बदलल्या, त्याबरोबरच हिंदी चित्रपटातला अभिनयाचा सर्वसाधारण दर्जाही खालावत चालला आहे. हा दोष कुणाचा ?

अर्थातच या कलाकारांचा. याची कारणे तीन–चार. एकतर एकावेळी डझनांनी चित्रपट स्वीकारणे, त्यामुळेच डबल शिफ्टमध्ये काम, सर्वत्र उशीर, बेपर्वाई, शारीरिक व मानसिक ताण. तिसरी गोष्ट हातातल्या चित्रांची संख्या आणि प्रत्येकाला मिळणारा 'रेट ' हेच यशाचं मोजमाप मानणं आणि चौथं कारण लोकप्रियतेसाठी जुनीच चाकोरी repeat करीत राहून नव्याचं आव्हान न स्वीकारणं

एकाचवेळी भारंभार पिक्चर्स साइन् करण्याच्या मोहापासून सदैव कटाक्षानं दूर राहिलेला अभिनेता दिलीपकुमार याविषयी एका पत्रकाराला म्हणाला होता,

'चित्रपटसृष्टीच्या क्षितिजावर एखादा नवा 'तारा ' झळकतो, आणि त्याच्या विक्रमी यशाची बढाईखोर भविष्यं वर्तवली जातात, तेव्हा मी त्याचं बारकाईनं निरीक्षण करीत असतो–

तो अभिनेता सुरुवातीला तीन आणि मग हळूहळू तीस चित्रपट स्वीकारताना मी पाहतो.

किती डबलशिफ्ट्समध्ये तो राबतोय ते मी पाहतो.

रात्री उशिरापर्यंत तो किती समारंभांना हजर राहतोय् ते मी पाहतो.

–आणि मग मी त्याच्याकडे पाहायचं अजीबात सोडूनच देतो !'

हिंदी चित्रसृष्टीच्या प्रवाहातला एक दशकाचा कालखंड आपण जवळून पाहिला. यानंतरचा प्रवास थोड्या वेगळ्या ढंगानं करायचाय. लहानसहान तपशीलांपेक्षा सर्वसामान्य सूत्र–तत्त्वांवर भर द्यायचाय्.

कारण १९६० प्रमाणेच १९७० नंतरही हिंदी चित्रपटांनी एक नवीन वळण घेतलं.

बॉक्स ऑफिसचा चित्रपटांवर पूर्णपणे वरचष्मा झाला. व्यवसायानं कलेची कोंडी केली. 'ज्यामुळं गल्ला भरेल ते काहीही चित्रात चालेल, ' या तऱ्हेवाईक उफराट्या तत्त्वज्ञानातून बाहेर पडलं ते क्राइम–सेक्स व्हायोलन्सचं, cheap entertainment चं हलाहल. टिकाऊ वस्तूपेक्षा चटकन विकाऊ वस्तूची मागणी वाढली आणि मागणी तसा पुरवठाही सुरू झाला. 'मेरे जीवनसाथी ', 'व्हिक्टोरिया २०३ ', 'जवानी दीवानी ', 'शादी के बाद ', 'गरम मसाला ', 'बॉबी ', 'बेइमान '. हे १९७१ पासून १९७४–७५ पर्यंतचे काही चित्रपट वानगीदाखल पाहिले, तरी चित्रपटधंद्यानं चित्रपटकलेची गळचेपी केल्याचा निष्कर्ष काढता येईल. या गळचेपीचे अनेक प्रकार आहेत. एक तर पूर्वी अडल्यापडल्याला तरी उभी राहणारी वास्तवता आता औषधालाही दिसेनाशी झाली. चित्रपटातल्या गीत–संगीताला आणि त्याच्या टेंकिगलाच फक्त नव्हे, तर चित्रपटांच्या गाभ्यामध्येच– कथानकातच– एकसाचीपणा, एकसुरीपणा वाढत चालला. पात्रांचं व्यक्तिरेखाटनही धूसर आणि टाइप्ड् किंवा नगण्य होत चाललं, वगैरे. याच इष्टानिष्ट बदलांचा तपास लेखाच्या यानंतरच्या भागात सर्वसामान्य पातळीवरून केला आहे.


अर्थात या पाच वर्षांत दर्जेदार, कलात्मक, किंवा अभिरुचिसंपन्न चित्रपट अजीबात निर्माणच झाले नाहीत, असं नव्हे. उलट कट्टर व्यावसायिक चित्रसृष्टीच्या घसरत्या

दर्जाची प्रतिक्रिया म्हणूनच की काय, हाताच्या बोटांवर मोजण्याइतक्याच, पण खऱ्या कलाकृती दरवर्षी निश्चितपणे तयार होत राहिल्या. हृषिकेशचे 'आनंद', आणि 'गुड्डी', राजेंद्रसिंग बेदीचा 'दस्तक', बी. आर. इशारांचे 'चेतना', 'जरूरत' इ., बासू भट्टाचार्यांचे 'अनुभव' व 'आविष्कार', शिवेन्द्र सिन्हांचा 'फिर भी', मणी कौलचे 'उसकी रोटी' व 'आषाढ का एक दिन', कुमार सहानीचा 'माया दर्पण' विजय आनंदचा 'तेरे मेरे सपने', सुनीलदत्तचा 'रेश्मा और शेरा', मृणाल सेनचा 'एक अधुरी कहाणी', प्रेम कपूरचा 'बदनाम बस्ती', गुलजारचे 'मेरे अपने', 'परिचय', 'खुशबू', 'आंधी', बासू चतर्जीचे 'रजनी-गंधा' व 'छोटी सी बात' आणि श्याम बेनेगलचे 'अंकुर' व 'निशांत' अशी अगदी समकालीन चित्रपटांपर्यंत आणि समांतर चित्रपटांपर्यंत अनेक नावं घेता येतील. वाळवंटातल्या हिरवळीप्रमाणे सुखाव-णाऱ्या अशा चित्रपटांचा आवाका, श्रेय, लोकप्रियता, प्रसार व्यापारी चित्रांच्या तुलनेत दुर्दैवाने अजूनही नगण्य आहेत. आणि म्हणून लेखाच्या यापुढील भागात मांडलेले काहीसे सामान्यीकृत–generalized–स्वरूपा-तील विचार हे समकालीन चित्रपटांतील समांतर चित्रांची लाट वगळता, गेल्या पाच वर्षांतली व्यावसायिक चित्रसृष्टी प्रामुख्याने नजरेसमोर ठेवूनच मांडले आहेत. अर्थात तत्पूर्वीच्या दशकाची पार्श्वभूमी त्यांना लाभ-लेली आहेच. थोडक्यात म्हणजे प्रेक्षकांना रुचणाऱ्या चित्रपटांकडे समीक्षकांच्या नजरे-तून पाहायचा हा एक प्रयत्न ! ◻

## दिग्दर्शन आणि दिग्दर्शक

हिंदी चित्रपटांच्या साचेबंदीकडं पाहताना पहिला प्रश्न अर्थातच दिग्दर्शक आणि दिग्दर्शनाबद्दल पडतो. अर्थात आपल्याकडे फारसे चित्रपट दिग्दर्शकाचे नसतातच. एकतर त्याला बिचाऱ्याला तेवढी अक्कल नसते, किंवा, निर्मीतिसंस्था त्याची नसली तर प्रोड्युसर, फायनान्सर म्हणतील ती कला, आणि त्याहून महत्त्वाचं म्हणजे आपले नट-नट्या एकदम 'स्टार' वगैरे असल्याने त्याला वावच मिळत नाही. त्यामुळंच चित्र-पटात प्रसंगचित्रणाऐवजी हिरो-हिरॉईनचे

बंदुकीनं आखलेली लक्ष्मणरेषा ?
लेकिन आस्ते कदम शशी !
व्हायोलन्स स्ट्रिक्टली प्रोव्हिबिटेड !



ही मात्र लक्ष्मणरेषा नव्हे
चक्क काठीनं लठ्ठालठ्ठी !
पण संजीव-अशोकचा हा मुकाबला
अभिनयातही झक्क जमतो.
आणि अभिनयक्षेत्राला आधाराची काठी
अशोकनंतर संजीवच आहे !



चार्मसूच टिपले जातात. (क्लोजअप्‌चा उपयोग केवळ त्यासाठीच. बाकी काही विवक्षित भावना वगैरेंसाठी नाही.) करमणूक-मूल्य (असल्यास) वाढावं म्हणून कथा नसणं जास्त चांगलं. लांबलचक, अवास्तव, अतिनाटयात्मक संवाद असले की झालं. सिनेमाला क्लोज्-अप मिडियम म्हणतात काय, मग राजेश खन्नाच्या चेहऱ्यावरची फुटकी, न फुटलेली मुरुमं मोजा, संजय फिरोजखानच्या अंगावरची लव पाहा, प्रत्येक नटीचं स्टॅटिस्टिक्स पाहा. कॅमेऱ्यासमोर आपले तारेतारका पुढे-मागे न हलता कर्णाच्या दिशेनं (डायगोनली) हलतात, त्यामुळे छायाचित्रणातली अंतरं ही तिसरी डायमेन्शन्-जवळजवळ जाते. विशेषतः जिथे त्रिमितीचा भास होणं अत्यंत आवश्यक आहे, अशा निसर्गदृश्यांना एक पसरटपणा येतो. पण बघणाऱ्या प्रेक्षकांतले बहुसंख्य मागच्या डोंगराकडं बघताना पडद्यावरच्या नटनटयांकडं बघत नाहीत आणि नटनटयांकडं बघताना मागचा हिमालय पाहणं हे त्यांच्या शरीरधर्माविरुद्ध जातं. कॅमेऱ्याला एक विशिष्ट कल दिला, तर चेहऱ्याला एक अपील येतं. पण भावना बघायच्यात, ह्या बघा भावना अशा शैलीत आपल्याकडे सर्व काही चाललेलं असतं. प्रादेशिक चित्रपटापेक्षा सामग्री जास्त, तंत्र प्रगत आणि परिणाम कमी हा प्रकार त्याचाच परिणाम. तंत्राचा उपयोग हा सिनेमातलं नाटच (–सिनेमात नाट्य असलंच पाहिजे, हा आमच्या बिचाऱ्या डायरेक्टरांचा खाक्या– ) भडक करण्यासाठी आणि आपण भलतंच काहीतरी ग्रेट वगैरे पाहतो आहोत असा भास निर्माण करण्यासाठी केला जातो. संमिश्र तत्त्वं आणि परस्पर विसंगत भावनांचा गोपालकाला केल्यामुळे चित्रपट सर्वसाधारणपणे कुठल्याही एखाद्या व्याख्यात विभागात (Defined Compartment) मोडत नाही. चित्रपटात काहीही घडू शकतं एवढंच नव्हे, तर एकाच चित्रपटात सर्व काही घडू शकतं. उदाहरणार्थ, शेवटच्या रिळात व्हिलनचा मृत्यू, जुळ्या भावांचे-हिरोहिरॉईनचं थोडक्यात, बिछुडलेल्या आशिक दिलांचं मिलन, मागच्या पिढीतल्या खानदानकी इज्जत मिट्टीमें मिलादीवाल्यांच किंवा चंबळच्या डाकूंच परिवर्तन होतं–अर्थात जेहत्ते कालाचे ठायी शेवट गोड होतो. मध्येमध्ये वादळी आकाश, उगाचच उडणारे पक्षी, झुलता कंदील, अचानक मिसळणाऱ्या लाटा, उंच झाडांच्या राया वगैरे येऊन जातात. सरळस्पष्ट मांडणीपेक्षा आपल्याला हे घुळघुळगाडंच जास्त आवडतं.

बव्हंशी चित्रपटांचं असं अतिनाटय किंवा सिनेमाचा मेलोड्रामा होत असला तरी काही वैयक्तिक धाडसांचा उल्लेख इथं करणं आवश्यक आहे. 'दो बिघा जमीन' सारखी वास्तव प्रामाणिक शोकान्तिका देणारे बिमल रॉय, ढोबळमानानं कलात्मक इतिहासपट म्हणता येतील असे 'सिकंदर', 'पुकार' काढणारे सोहराब मोदी, 'अंदाज' सारखा वर्तमानात शिरण्याचा प्रयत्न करणारे आणि रोटी, औरतच्या निमित्तानं सामाजिक आदर्श वगैरेंचा ओव्हरडोस् पाजणारे मेहबूब ह्यांचा एक जमाना होता. 'साहिब बिबी–' 'चौदहवी का चांद–' सारखे थोडे काव्यात्म, कलात्म चित्रपट काढणारा गुरुदत्त ही वेगळाच पठडीतला मानायला हवा. व्ही. –शांतारामांच्या 'दुनिया ना माने–' सारख्या चित्रपटांनी दिलेली समाजसुधारणेची हाक किंवा ख्वाज्या अहमद अब्बासच्या 'दो बूंद पानी', 'धरती के लाल' सारख्या समाजदोष आणि आर्थिक विषमतेचं नातं स्पष्ट करणाऱ्या चित्रांनी मात्र दोघांना भारतीय चित्रपटसृष्टीच्या सामाजिक उद्रेकाचे जनक ही संज्ञा मिळवून दिली. 'सीमा-' सारखी चित्रं देणाऱ्या अमिया चक्रवर्तींचाही उल्लेख या संदर्भात करायला हवा. राजकपूर आणि बी. आर. चोपरा हे दोन गृहस्थ मात्र वेगळेच मानायला हवेत ते अशासाठी की, चित्रात्मक कलामूल्य शाबूत ठेवून या दोघांनी ती व्यवसाय म्हणूनही लोकांच्या गळी उतरवली. राजकपूरनं पाश्चिमात्य रोमान्स आयात केला तरीही तो गरीब, पीडित वगैरेंचा प्रतिनिधी राहला. बीआरनंसुद्धा वक्त –कानून–धूल का फूलसारख्या चित्रांतून करमणुकीचा बोजड भडीमार न करता सिनेमॅटिक एलिमेंटस् कायम राखली आहेत. 'दस्तक-' मध्ये मनोविश्लेषणात घुसलेला वेदी मात्र 'फागुन' मध्ये केवळ वाङमयीन ठोकळेबाजीच देऊन गेला. 'चेतना' मध्ये आपल्या समाजाच्या लव्ह कन्सेप्टची बुरखाफाड करेल अशी आशा दाखवणारा बी.आर.इशारा मात्र शेवटच्या रिळातच संपला. हृषिकेश, गुलजार ह्यांची चित्रंही फॉर्म्युला चित्रांपेक्षा खूपच उच्च म्हणता येतील. तीसरी कसम, अनुभव, आविष्कारमध्ये त्याच साचेबंद कथानकाला वेगळी खोली देणारा, पॉलिश आणि क्लृप्तीची ट्रीटमेंट देणारा बासू भट्टाचार्यसुद्धा प्रशंसनीय आहे. 'भारतीय वेस्टर्न' मधला दादा-राज खोसला–मेरा गांव मेरा देश–कच्चे धागे–वाला करमणूक भरपूर देऊनही शेवटी का होईना थोडासा दिग्दर्शक दाखवतो हे कबूल करणं भाग आहे. शक्ती सामंतांचंही नाव घेता येईल. प्रेमाचे त्रिकोण-चौकोन शाबूत ठेवूनच एका सफाईनं आणि अभिरुचीनं तेच गणित मांडणारे बेनेगल, वासू चतर्जीसारखे दिग्दर्शक प्रगतीच्या निश्चित खुणा दर्शवितात. दारिद्र्य, टंचाई, महागाई, सामाजिक-आर्थिक विषमता, संधीचा अभाव आणि भ्रष्टाचारामुळं असह्य वाटणारी वास्तवता जर 'बाहेर' वाखाणली आणि 'घरात' रिकामी खपणार असेल तर, निर्मात्यांच्या दृष्टीनं तो केवळ सद्हेतूनं केलेला भविष्यहीन अविचारच ठरेल. अशा वेळी पचनास सोपा 'प्रेमळ' चित्रपट जर कला म्हणून वर नेता आला, तर कदाचित थोडीफार सुधारणा होऊ शकेल.

## हिंदी चित्रपट आणि प्रेक्षक

एकूण प्रेक्षागृहे ७८००(१९७३-७४), एकूण कपॅसिटी ४७, १९, ७००, म्हणजे पंचावन्न कोटी लोकसंख्येच्या ८.६ टक्के लोक सिनेमा पाहू शकतात. इतर देशांतील हीच टक्केवारी अशी–कॅनडा-३२ टक्के, फ्रान्स-४९ टक्के, झेकोस्लोवाकिया - ८१ टक्के, ब्रिटन-२८ टक्के, अमेरिका ३५ टक्के, थिएटर्सची दारुण टंचाई इतकी स्पष्ट आहे.

## थीमस्-स्क्रीप्टस्

संख्यात्मक बाहुल्याच्या दृष्टीनं एकाच साच्यात घडलेली कथानकं बहुधा 'स्टार' नक्की झाले की तयार होतात. गाणी कुठं टाकायची हे ठरतं आणि मग राहिलेली जागा लांबलचक नाटयात्म संवादांनी भरली जाते. गाजलेले परदेशी (विशेषतः अमेरिकन) चित्रपट किंवा अगदी देशीसुद्धा उचलून थीम बनवली जाते. भावनांची अतिशयोक्ती पचवली जाते, अतिनाटयाचा अर्क ओतला जातो, योगायोगाचा मसाला आणि त्यायोगे

चित्रपटातले विनोद, कुटुंब, समाज असे सब्-चित्रपट रंगवले जातात आणि काय हा दैव-दुर्विलास अशी प्रेक्षकांची सहानुभूती मिळाली की एकदम कोलांटी मारून शेवटच्या रिळात सुखात्म शेवट केला जातो. चित्रपट ही प्रेक्षकांना हातोहात बनवणारी प्रभावी कला असल्यामुळे अशक्य कोटीतल्या गोष्टी केवळ शक्यच वाटतील अशाच नव्हे, तर अगदी जिवंत, वास्तव वाटतील अशा प्रकारे योगायोगांची गुंतागुंत करून मांडल्या जातात.

आमच्या चित्रपटात सामाजिक संघर्ष उभा राहतो तोही संकरित स्वरूपात. दोन भावातला, किंवा प्रियकर-प्रेयसी आणि त्यांच्या कुटुंबातला, किंवा कधीकधी झोपडीतली हिरॉईन आणि बंगल्यातला हिरो असल्या प्रसंगातनं समाज वगैरे शब्द ऐकायला मिळतात. मग विभक्त कुटुंबपद्धती मोठ्या प्रमाणावर प्रचलित असतानाही एकत्र कुटुंबातले ठरीव ढोबळ झगडे मांडले जातात. 'सासू 'सारख्या फालतू भूमिकांनाही महत्त्व येतं. परिणामी चित्राची लांबी वाढते. शरच्चंद्रांना सामाजिक असंतोषाचं प्रतीक वगैरे मानून त्यावेळच्या समस्या आजही तंतोतंत त्याच ठशात गृहीत धरून सामाजिक वगैरे ओरड केली जाते. पण इथं केवळ समाजदोषांचं चित्रण केलं जातं. त्यांची उकल, फोड केली जात नाही. त्यामुळे आपल्याकडचे हे चित्रपटसुद्धा विचारांना 'खाद्य ' पुरवून मेंदूला सुस्ती आणतात. नवे विचार पेटवून अस्वस्थ करण्याची क्षमता त्यांची नसते. आपल्या पराभूत मनोवृत्तीचंच हे प्रतिबिंब मानायला हवं.



'खुशबू 'मध्ये
हेमा मालिनी

असा सुगंध
अपवादानंच का दरवळावा ?

## स्पेक्टॅकलस्‌चं चित्रवैभव

चित्रपट हा दृक्‌श्राव्य अनुभव तेव्हा चित्रवैभव म्हणून ज्याचा डंका पिटतात त्या 'स्पेक्टॅकल् मुव्हीज् 'चाही इथं विचार करायला हवा. याचे साधारणतः तीन वर्ग होऊ शकतील. इतिहासपट, पौराणिक चित्र आणि खास मद्रास-मेड 'राजा और रंक ' सारखे संकर चित्रपट. या चित्रपटांची लोकप्रियता ही प्रेक्षकांच्या मनोविश्लेषणावर अवलंबून असते. चिंता, काळज्या, समस्या वाढल्या की, ग्लॅमरची ओढ वाढते, उथळपट्टीची खाज वाढते, पळवाटीची साधनं माणूस शोधू लागतो. चित्रपटांना कालसंगती (Chronology) असून चालत नाही. तो विस्कळीतच हवा. इतिहासपटासाठी नटाप्रमाणे 'नवा इतिहास ' घडवला जातो (आता याला 'क्रांतिकार्य ' म्हणता येईल), भावनांचा मसाला भरला जातो आणि बाह्यवैभवानं (अंधेरी येईपर्यंत) डोळे दिपवायचा यत्न केलेला असतो. चरित्रपट असला तर, राजा निवडणं चांगलं, म्हणजे वैभवाचा पसारा मांडता येतो. पुराणातल्या वांग्यांचं भरीत करताना प्रेक्षकवर्ग बव्हंशी ग्रामीण असून त्याला कथानक माहीतच आहे तेव्हा त्याच्या भक्तिफुग्याला टाचणी न लागेल अशी काळजी घेऊन सनसनाटी दृश्यं दाखवून त्याला खूष ठेवलं जातं. जोडीला ट्रिकसीन्स वगैरे असतातच. व्हायोलन्स देव-दानव युद्धात येतो, राक्षस हे खलनायक आणि अप्सरा आल्या म्हणजे सेक्स. बाकी आपल्या पुराणातच सेक्स, व्हायोलन्सचा कच्चापक्का मसाला भरपूर असल्यानं त्यांना फारसं डोकं वेगळं चालवावं लागत नाही.

कल्पनाविलास (फँटसी) आणि भयानकता (हॉरर) या दोन अतिअवास्तव पद्धतीनं मांडल्या जाणाऱ्या गोष्टीही चित्रवैभवाचा दुबळा आभास निर्माण करतात. स्वप्नगीतं ( ड्रीम सिक्वेन्सेस् ) हा असलाच एक प्रकार. आपले पुराणपुरुष जसे ट्रीकसीन्स संपवून शेवटच्या रिळात मानवी भावनांवर घसरतात तशीच आपली मूर्तंही माणसाची

खुन्नस वगैरे गुण बाळगून राहतात. स्वप्न-गीतांमधली प्रणयदृश्ये किंवा रोमान्समुळे दाखवलेला अश्लील भागही स्वप्न म्हणून सेन्सॉरला खपू शकतो, प्रेक्षकांना गुदगुल्या करतो.

### व्हायोलन्स

हाही बहुचर्चित चोथा विषय. त्यातून परत सेन्सॉरच्या कात्रीची भीती. त्यामुळं जळजळीत व्हायोलन्स पुढे आणण्यापेक्षा त्याला सामाजिक वगैरे रंग फासला जातो. भावनिक पातळीवर हिंसा दाखवणं परवडत नाही, झेपत नाही. त्यामुळे ती जास्त शारीरिक पातळीवर येते. शिवाय जळजळीत हिंसेनं बधीर होण्याचीच शक्यता जास्त.

साधारण आपल्या व्हायोलन्स फिल्मसूचे दोनचार साचे ठरलेले आहेत. भारतीय 'वेस्टर्न्स' डाकूपट वगैरे सुंदर नैसर्गिक पार्श्वभूमीवर, त्यामुळे मधूनमधून बरे दिसतात. आपले डाकू मात्र अजूनही मध्ययुगीन दुर्दैवाचे बळी, सामाजिक अन्यायाचं भक्ष्य वगैरे असतात. ते कायदेभंगही करतात पण पोलिसांपेक्षाही जबानके सच्चे, कणखर, नीतिमान असतात. हिरो–व्हिलनच्या मारामारीत लपून बसलेले पोलीस शेवटच्या रिळात आयत्या व्हिलनला रेडिमेड पकडून नेतात आणि ''कायदाच ह्याचा निवाडा करेल'असा कायदा जिवंत असल्याचा निर्वाळा देतात. मग मात्र इतका वेळ कायदेभंग करून थकलेला हिरो हिरॉईनच्या मिठीत गुडुप होतो. राज खोसला आणि सुनील दत्त या दोन इसमांची चित्रं मात्र थोडी जास्त प्रामाणिक वाटतात. मुझे जीने दो तर सरळ सरळ समस्याचित्र वाटतं. आर. के. चं जिस देशमें म्हणजे विनोबांच्या सर्वोदयी 'अॅप्रोच डाकू'–अॅप्रोच आहे, बाकी सगळा फॉर्म्युलाच. दुसरा प्रकार हेरपटांचा. ही अमेरिकन चित्रपटांची सरळ नक्कल. फरक एवढाच की, त्यांचा हेर एखादी महत्त्वाची व्यक्ती असतो आणि आपला होतकरू हेर स्वतःसाठी हेर बनलेला असतो. प्रेक्षकांना सहज कळणाऱ्या चिजा त्याला 'गुपितं' वाटतात. आपला हेरपट हा अनेक बाँडपटांचं मिश्रण असतो. बाँडस्टाईल सेक्स डिस्प्ले शक्य नसल्यानं त्याबाबतीत मात्र तो जुन्या वळणाचा असतो. तो जवळची शस्त्रं फारशी वापरत नाही.



खोसला समिती V/S सेन्सॉर बोर्ड
एका चुंबनासाठी झालेल्या या युद्धातून
फिरोझ–मुमताज यांनी
हा तडजोडीचा मध्यम मार्ग
तर शोधला नसेल ना ?

**डोक्यावरूनही पदर घेणाऱ्या नर्गीस, वहिदा रहेमान, नूतन या**



मनात संकोच नसला म्हणजे पदराचं ओझं इतक जड होतं ?

सुलक्षणा पंडीत

तिकडचा हेर थंड डोक्याचा बिनधास्त मारेकरी ज्याला फारशी नीतीची वगैरे चाड नसते. पण कडक सेन्सॉरमुळे आपल्याकडच्या हेराला मात्र नीतिमत्ता आणि विश्वबंधुत्व वगैरेंचा बाळंतकाढा पाजलेला असतो. अर्थातच बाळ गोंडस व गुटगुटीत असतं. दारासिंगचे सर्कसपट म्हणजेही असलाच प्रकार. तीन तास काहीना काही धाडस करीत राहणं आणि शक्यतो हातापायांनी फ्रीस्टाईल करणं हा यांचा खाक्या. युद्धपटसुद्धा वेगळ्या प्रकारचे हिंसात्मक चित्रपटच. पण युद्धाच्या वेळी ते तयार होणार आणि सालाबादप्रमाणे युद्धबंदीनंतर रिलीज् होणार. त्यामुळे सिंहावलोकनाचाच भाग राहतो. शेवटी युद्ध एक शिस्तबद्ध सामुदायिक कवायत न राहता केवळ वादळी गोंधळच ठरतो.

## सेक्स आणि रोमान्स

थोडंसं व्याख्याबद्ध शब्दात सांगायचं तर सेक्स ही एक उघड शारीरिक घटना आहे तर रोमान्स ही उत्तेजित मानसिक आणि शारीरिक विकारांची प्रक्रिया आहे ( विकृत आणि अविकृतही ). भारतीय समाजाच्या ढोंगी बुरख्याआड दडलेलं sexual frustration आणि तिखट सेन्सॉर यामुळे आपल्या चित्रात बेडरूमच्या दाराशी 'सेक्स' संपतं आणि मग आपले वाकबगार दिग्दर्शक अत्यंत सूचक आणि प्रभावी प्रक्षोभक अशा रोमान्समधून अपील निर्माण करतात. 'काय झालं' हे सांगण्यापेक्षा यापुढे काय काय होऊ शकेल हा प्रश्न ते रसिक प्रेक्षकांसमोर टाकतात. आणि आपल्या प्रेक्षकांची स्वैर कल्पनाशक्ती मग चौखूर घोडे उधळीत धावू लागते. स्त्री ही सार्वजनिक जीवनात पवित्रच असली पाहिजे. शरीरहीन वैचारिक, पवित्र, वत्सल मूर्ती : मग ती कितीही कृत्रिम असली

**अभिनेत्रींचा जमाना हळू हळू अस्तंगत होत गेला आणि नव्या लाटेवर या नव्या नट्या स्वार झाल्या...**





**चुनरी सम्हाल गोरी....**

अरुणा इराणी — मल्लिका साराभाई

तरी चालेल. एका चुंबनानंसुद्धा तिचं लवचिक पावित्र्य विरघळतं–असली अनंत सामाजिक ढोंगं पुढं करून 'सेक्स' वर बंदी घातली गेली आहे. शिल्पकला, चित्रकला आणि वाङ्मयात सेक्स चालतं, गौरवलं जातं; पण सिनेमात मात्र त्याच्यावर बंदी आहे. सेक्सचा जर एवढा नॉशिया असेल तर खजुराहोच्या शिल्पांचा अभिमानानं उल्लेख का ?

'रोमँटिक' सीनला आपल्या बायकोनं नावं ठेवली नाहीत तर नवराच तिच्याकडे संशयाने बघेल. पण तोच सीन मित्रांबरोबर बघताना enjoy करील, बायकोही मैत्रिणींबरोबर बघताना enjoy करील. ही 'सेक्स' विषयीची ढोंगी धारणा. स्त्रीनं पुरुषाला हातापायातला जीव गेल्यागत मिठी मारावी, पण एका स्त्रीनं दुसरीला मात्र कडकडून मिठी मारावी हे हिंदी चित्रपटातलं दृश्य लेस्बियन अंतःप्रवाह दाखवत नाही काय ? हे सेक्शुअल फ्रस्ट्रेशन सूचित आणि प्रदर्शित करणारं चित्र अर्ध्या मिनिटात संपणाऱ्या चुंबनदृश्यापेक्षा जास्त चाळवणारं नाही का ? साधं उदाहरण म्हणजे चुंबनाचं दृश्य; त्याच्यावर बंदी. मग हिरो हिरॉईनच्या भलभलत्याच भागाचं चुंबन घेतो, तिच्या ऐवजी दगडाला, झाडाला मिठी मारतो (उदा. शर्मिली), झाडामागे जाताच द्वंद्वगीतात खंड पडतो, झाडांचे पर्णसंभार एकमेकात मिसळतात, हलणारं पाणी दोघांच्या छाया मिसळून टाकतं, पक्षीही सुस्वरे आळवितात. 'नेमकं याचवेळी नायकनायिकेचं चुंबन चाललंय बरं–' थोडक्यात, चित्राची लांबी आणि आउटडोअर शूटिंगचा खर्च वाढतो. सीन लांबल्यामुळं प्रेक्षागृहात उमटणारे चेकाळते स्वर हे सेन्सॉरवंद रोमान्समुळे हलक्या भावना (!) दर्शवतात की त्यात केवळ 'आम्ही ओळखलं. अय् अय् आम्ही पाह्यलं' ही भावना असते, याचा विचार व्हायला हवा.

'सेक्स' विषयी समाजाचा, सिनेमाचा जास्त प्रामाणिक दृष्टिकोन तयार होत नाही तोपर्यंत बहुधा या सूचक प्रक्षोभाच्या 'रोमान्स' चं प्रव्होकिंग चित्रण चालू राहणार आणि अनीतीला पायबंद घालायच्या पोकळ कल्पनेखाली अत्यंत हीनदर्जाचं मनोरंजन वाढत जाणार.

हिंदी सिनेमा मेलोड्रॅमॅटिक असल्यानं सच्ची कॉमेडी नाहीच. जो विनोद म्हणून पुढं येतो तो नाटकातलाच एक छोटचा नाटकाचा भाग–सिनेमात बनून राहतो. आपले मेहमूद, जॉनी वॉकरसारखे विनोदी नट विक्षिप्त तरी असतात किंवा स्वतःचीच टर उडवतात. आपला विनोद दोन प्रकारचा. दृश्य–केळीवरनं पाय घसरला स्टाईल–तोचतोचपणा फार. शाब्दिक विनोद–फार ताणला गेल्यानं पचका होतो–(उदा. चुपके चुपके.) परिस्थितिजन्य विनोदालाही हीच रस्सीखेच होते. नाही म्हणायला 'श्री चारसो बीस', दिल दौलत दुनिया, पडोसन, आजकी ताजा खबर, हलचल या बऱ्यापैकी कॉमेडीज् आहेत. बासू चतर्जींचा छोटीसी बात ही नुसती हलकीफुलकी कॉमेडी नसून त्याचबरोबर प्रोटोटाईपचं विडंबन करणारी मॉक् मुव्ही आहे असं म्हणावं लागेल. दृश्य विनोद ढोबळ, सहजस्पष्ट असले, तरच लोकांना कळतात. नटांना पडद्यावर नट म्हणून आणणं (उदा. गुड्डी) किंवा सरदारजींसारख्या प्रादेशिक गोष्टींवर चिमटे काढणं या गोष्टीही तशा लोकप्रिय आहेत.

## स्टार सिस्टिम व फिल्मी कॅरॅक्टर्स

गौहर, देविकाराणी वगैरे जुन्या नटचा स्वतःच्या कपडचांना हातानं रफू करायच्या; कारण त्यावेळी नटनटचा 'स्टार' बनल्या नव्हत्या. महायुद्धानंतर चित्रपटसृष्टीतले बाँबे टॉकी, प्रभात, न्यू थिएटर्स आर्थिकदृष्टचा कंगाल होते आणि त्याचवेळी इतर मार्गांनी गडगंज पैसा मिळवलेले शेठलोक उत्साहानं चित्रसृष्टीत आले. चांगल्या कथेसाठी भरपूर पैसे द्यायचे, की चांगल्या कलाकारांसाठी द्यायचे या प्रश्नचिन्हात दुसरा वर्ग वरचढ ठरला. त्यामुळे सर्व ॲक्टर मंडळींचे 'स्टार्स' झाले. व्यक्तिमत्त्व आणि शारीरिक चार्मसचं महत्त्व वाढलं, हिरो, हिरॉईन तरुणच असले पाहिजेत, निदान दिसले पाहिजेत, असा दंडक झाला. म्हाताऱ्या लोकांना फुटकळ कामं (–चित्रसृष्टीत पुनरागमन वगैरे स्टाईल–) आणि मध्यवयीन लोकांना जवळजवळ हाकलूनच देण्यात आलं म्हणानात. एकोणीसशेतीस–चाळीस दरम्यान आमच्या बहुतेक नायकांचं स्वरूप उदार श्रीमंत किंवा प्रेमळ, घरात हवाहवासा तरुण, क्वचित फुटकळ



रुपेरी पडद्यावर वाघ–पण एक नव्हे, दोन !
धर्मेंद्रशी सामना करणाऱ्यांचा हा शेवट असतो.
हेमाचे इतर चाहते हीरोज्,
बिवेअर ऑफ टायगर्स; बट बिवेअर मोअर ऑफ टायगर-किलर्स !

बंडाळी करणारा लोकशाहीवादी असायचा. पण नंतर समाजाचा रंग वाढत गेला आणि सगळे श्रीमंत वाईट, प्रत्येक गरीब चांगला या सिद्धान्ताप्रत हिंदीदिग्दर्शक पोचले. १९४० ते १९५५-६० हा काळ, राज, दिलीप, देवानंद या त्रयीनं गाजवला. स्टार सिस्टीम भक्कम झाली ती या काळात. पाश्चात्य रोमान्स आयात करून ग्लॅमरस असणारा आणि तरीही बंडखोर, लोकशाही समाजवादी तत्त्वप्रणाली मांडणारा असा 'पुरुषोत्तम' नायक राजनं आणला, तर भावनांनी ठासून भरलेल्या शोकान्तिकांमध्ये अथक रडणारा, पराभूत होणारा शोकनायक म्हणून दिलीप सर्वांत ग्रेट स्टार बनला. चिकण्या देवआनंदनं आपल्या गुलहौशी व्यक्तिमत्त्वाचा पुरेपूर उपयोग करून घेतला आणि फारसं बंड न करता फॉर्म्युल्यात फिट् बसल्यामुळे तो सहज टिकू शकला. या काळाच्या शेवटच्या काही वर्षांत राजेंद्र-कुमार, सुनील दत्त, शशी, शम्मीकपूर, राज-कुमार या मंडळींनाही थोडाफार भाव आला होता. मीनाकुमारी, वहिदा, नर्गिस, नूतन यांनीही हिरो मंडळींच्याबरोबर रजतपट चमकवला. एक मात्र खरं, नूतन, मीनाकुमारी सोडल्या, तर आमच्या नायिका फारच पर-प्रकाशी (किंवा हिरोप्रकाशी) बनल्या. वजयंतीमाला, माला सिन्हा, आशा पारेख कंपनीही बऱ्यापैकी प्रभाव गाजवून होती. एकोणीसशे साठ-सत्तरच्या कालावधीत मात्र ही तीन हिरोंची कोंडी फोडून राजेश खन्ना बाहेर आला. बिनचूक हिरोचा फॉर्म्युला बनवून तो सुपरस्टार झाला आणि मग नवनवीन चेहऱ्यांची एक भरतीच सुरू झाली. शत्रुघ्न आणि विनोद खन्ना-असरानी हे असेच पुढे आले. संजीवला चांगला ब्रेक मिळाला. हळूहळू पण निश्चितपणे त्यानं स्वतःचं वेगळं स्थान तयार केलं. कपूरांची तिसरी पिढी नाचू लागली आणि आजचं फिशमार्केट तयार झालं. या सगळ्यांत कायम राहिलेली एक गोष्ट म्हणजे हिरोहिरॉईनचे लुकस्-सुंदर, रोमॅंटिक आणि 'खळाळत्या तारुण्याचे झरे' वगैरे वाहू लागले. आणखीन एक टिकून राहिलेली गोष्ट-अशोककुमार-(नूतनसुद्धा). बदलत्या इंटस्ट्रीत बदलत जाऊन त्यानं वेगळी जागा-ऋषितुल्य पीठ का कायसं मिळवलं. प्राणही बेटा टिकून राहिला.

हिंदी चित्रपटातले हिरोसुद्धा दोन प्रकारचे. एक शामळू म्हणजे सज्जन. आपल्याच प्रेयसी-समोर माफक लाजणारा, आईचं, देवाचं ऐकणारा, आणि शेवटी दिग्दर्शकाचं ऐकून खान्दानची इज्जत मिट्टीत मिसळणारा बाळ! तर दुसरा डमी वापरणारा, ढिश्यॅव-ढिश्यॅव आवाज काढणारा, व्हिलनला मार-णारा, छाती उघडी टाकणारा ही-मॅन! तिसरा आपला व्हिलन. तो बहुतेक वेळेला मुळातच व्हिलन-उर्दू डायलॉग टाकणे, हस-ताना दात इतरांना मोजता येतील अशी काळजी घेणे, हिरॉईनशी हिरोपेक्षा जास्त मन लावून रोमान्स करणे, दिग्दर्शकानं सांग-ताच बलात्कार करणे, मोठी गॅंग बाळगणे, चैनीत राहणे आणि शेवटच्या रिळात मरणे किंवा सरकारी पाहुणचार घेणे अशी विविध कामे तो करतो. कधी कधी तो परिस्थितीनं बिचारा व्हिलन होतो. मग प्रेक्षकांना कंप-लसरिली त्याचं तत्त्वज्ञान ऐकावं लागतं.

नटयांचेही असेच प्रकार. सर्व दडपणांना बळी जाणे, कायम घरात बसणे, ठोकरा-अन्याय-दुःख सहन करीत ग्लिसरीनच्या साहाय्यानं रडण, कधीही बंड न करणे, आपल्याला काही प्रतिक्रिया नाहीत ह्याची जाणीव ठेवून मूग का काय ते गिळून बसणे हा एक साचा! तर दुसरा प्रकार म्हणजे फूट-दीड फूट फिल्मभर हिरोशी खोटंखोटं भांडून मग त्याच्याबरोबर नाचत गाणी म्हणणे, उद्यानात सहलीला जाणे, परवानगी मिळाल्यास हिरोला, न मिळाल्यास पप्पांना किंवा आपल्याच मैत्रिणींना मिठी मारणे, गाण्याच्या दर कडव्यात कपडे बदलणे, व्हिलननं मिठी मारताच दातांनी (आपलाच) ओठ चावणे ही कामे करणारा! व्हॅम्पस् किंवा फ्रीविमेन हा तिसरा प्रकार-आपल्याला एक-दोनच अवयव आहेत हे जाणून ते लोकांना जाणवून देणे, व्हिलनची कामे करणे (प्रतिष्ठित मोलकरीण), शामळू हिरोचा मामा बनवणे आणि मॅनली हिरोच्या प्रेमात पडणे व शेवटच्या रिळात स्वर्गस्थ किंवा पश्चात्तापदग्ध होणे ही यांची पद्धत!

बाकीचे नातेवाईक हिरो-हिरॉईनचे आईबाप गाळलेल्या जागा भरतात-कथेच्या (आणि सेन्सॉरच्या कापलेल्या जागाही). नोकर विनोद करण्यासाठी आणि गरीब बिचारी लहान मुलं कारुण्य वाढवण्यासाठी वापरावीत, असा संकेत आहे. काही चित्र-पटांत उंदीर, मांजर, नाग, वाघ, सिंह, हत्ती, कुत्रा मंडळी मन लावून काम करतात. त्यामुळे बिचाऱ्या हिरोची मात्र पंचाईत होते.

## पाचा उत्तराची कहाणी

जाता जाता एका गोष्टीचा उल्लेख करतो. आज या चित्रव्यवसायात कमालीचा विस्कळीतपणा, 'स्टार्स'चा वर-चष्मा, योजनेचा, तंत्रज्ञानाचा अभाव, असंख्य विखुरलेले निर्माते आणि कल्पनातीत करांचं ओझं यांमुळे हा चित्रपटव्यवसाय बाळसं धरण्याऐवजी सूज आल्यासारखा दिसतो आहे. केवळ चार संस्था स्थापून आणि पाच कमिट्या नेमून ही घट भरणार नाही, तर योजनाबद्ध प्रयत्न, करविषयक निश्चित धोरणच व्यवसायाला वाचवू शकेल. निर्मात्यानं एखादा चित्रपट चांगला दिला, तर त्याला दुसऱ्या चित्रपटासाठी आधार मिळाला पाहिजे. एकाकी झगडणारे चांगले कलाकार एकत्र येऊन 'युनायटेड आर्टिस्टस्' सारखं रचनात्मक धाडस करू शकले तरच बहुसंख्य लोकांची ही एकमेव करमणूक काही दर्जा गाठू शकेल, टिकवू शकेल.

पंधरा-वीस वर्षांच्या या मोठ्या कालखंडातील हजार-दोन हजार चित्रपट पाहणं किंवा त्यांचा प्रत्यक्ष अभ्यास करणं अशक्यच असल्यानं, जरूर तिथे संदर्भसाहित्याचा योग्य तेवढा वापर केलेला आहे. आवश्यक ते संदर्भग्रंथ व अन्य साहित्य अगत्यानं उपलब्ध करून दिल्याबद्दल 'नॅशनल फिल्म अर्काईव्हचे आभार.

# श्वाइट्झर : अखेरचे पर्व

पृष्ठ ७८ वरून

सुंदर परिणाम साधीत होते. न्याहारीला खास पदार्थ म्हणून श्वाइट्झरच्या आवडत्या बटाटयाच्या काचऱ्या केल्या होत्या. त्यानंतर भेटवस्तूंचा स्वीकार...वस्तू केवळ व्यक्तिगत उपयोगाची असेल, तर स्वीकारताना श्वाइट्झर अवघडून जाई. अखेर श्वाइट्झरने जर्मनमध्ये भाषण केले...तो म्हणाला, ' हे हॉस्पिटल चालू करताना मला बराच त्रास झाला असेल. पण ज्या लोकांनी मला हे हॉस्पिटल चालू ठेवायला आणि वाढवायला मदत केली त्यांना मला आज मनःपूर्वक धन्यवाद द्यावेसे वाटतात. हे हॉस्पिटल अतिशय साधेपणाने चालवावे, उदात्त विचारांची प्रेरणा घेऊन चालवावे अशी माझी फार इच्छा होती. त्या माझ्या इच्छेचा आदर करणारे अनेक सहकारी होते. त्यांना माझे धन्यवाद. पन्नास वर्षांपूर्वी भेटलेल्या दोन व्यक्तींच्या स्मृतीला मी विशेष आदराने अभिवादन करतो. ही दोन माणसे कॅथलिक मिशनमध्ये काम करीत असत. एक मेनेन सॉली आणखी दुसरा बेसिल म्हणून होता. त्यांच्यापैकी एकाच्या पत्नीचा मी जीव वाचविला होता, अन् दुसरा आपला केवळ स्नेहामुळेच आला होता. ते दोघेजण मला नदीच्या बाजूला घेऊन गेले अन् म्हणाले, 'तुम्ही इथे हॉस्पिटल बांधायचे म्हणता...पण असं अगदी स्वर्गात असल्यासारखं नका बांधू...जमिनीवरच बांधा !'

'प्रथम मला त्यांच्या म्हणण्याचा काही अर्थबोध झालाच नाही. पण नंतर मला समजले, की इथल्या काळ्या लोकांसाठी बांधलेले हॉस्पिटल कसे असावे याची त्यांना स्पष्ट कल्पना होती. त्यांना मोठ्या सहा मजली इमारती नको होत्या, तर बैठी घरं हवी होती ...की जिथे राहिल्यावर इथल्या लोकांना (नेहमीच्या सवयीनुसार) खोलीबाहेर जाऊन स्वयंपाक करता येईल. त्याप्रमाणे आम्ही आमचे काम सुरू केले अन् ते यशस्वी झाले. त्या दोन साध्या माणसांनी मला जे शिकविले, ते इतर कोणीही मला शिकवू शकले नसते. त्यांची स्मृती माझ्या मनात अखंड राहील.

'...तुम्हा सर्वांना धन्यवाद. जे लोक हे उत्कृष्ट काम यशस्वी करण्यासाठी निरनिराळी मदत करतात, निधी देतात, त्यांनाही धन्यवाद. आणि अशा तऱ्हेने माझी कृतज्ञता व्यक्त करण्याची मला जी संधी मिळत आहे, तीच या दिवसातली सर्वोत्कृष्ट घटना आहे.'

जर्मनी, झेकोस्लोव्हाकिया, फ्रान्स, अमेरिका इ. देशांतून आलेले प्रतिनिधी आणि सबंध हॉस्पिटलचा परिवार श्वाइट्झरचे निवेदन ऐकत होता...भाषणानंतर लेपर्स रुग्णाइतांचे समूहगान—वगैरे उरकल्यावर श्वाइट्झर स्वतःच्या खोलीत गेला. ग्रीटिंग कार्डांचे ढीग येऊन पडले होते. ते बाजूला सारून ठेवतो तोच अमेरिकेच्या अध्यक्षांची तार. प्रेसिडेंट जॉन्सन यांनी लिहिले होते—

'जगातील सर्व माणसांचे महद्भाग्य म्हणून आपण ९० वर्षे जगलात. सत्य आणि सेवा या मूल्यांशी आपण जी बांधिलकी स्वीकारलीत, त्यामुळे आपणास अपरिचित अशा कोटयवधी लोकांच्या मनातही आपणास फार मोठे स्थान आहे. सर्व अमेरिकन लोकांच्या वतीने मी आपणास प्रणाम करतो.'

दुपारी तीन वाजता लॅम्बरीनच्या मेयरसाहेबांच्या अध्यक्षतेखाली समारंभ होता. त्यासाठी तीन मैल नदीतून प्रवास...स्वातंत्र्य चौकात समारंभ...मेयरसाहेबांनी सर्वांतर्फे सत्कार केला. कृतज्ञता व्यक्त करताना मेयर म्हणाले—

'...गेल्या वर्षी इथे एक युरोपीय बातमीदार आला. अन् त्याच्या देशात गेल्यावर त्याने काय वाटेल ते लिहून प्रसिद्ध केले. डॉक्टर श्वाइट्झर रोज माकडाप्रमाणे नारळाच्या झाडावर चढतात अन् नारळ काढतात, असले काहीच्या बाही लिहिले होते. काय हे ? सबंध जगाला आम्ही कंठरवाने सांगू इच्छितो, की डॉक्टर श्वाइट्झर इथे आले ते केवळ आमच्यासाठी. आमच्यासाठीच ते जगाच्या या मागासलेल्या भागाकडे वळले. नाहीतर युरोपात मोठ्या आरामात त्यांना राहता आले नसते काय ?'

उत्तरादाखल श्वाइट्झरने अगदी चुटपुटते भाषण केले. धन्यवाद वगैरे दिल्यावर तो म्हणाला, ' आफ्रिकन बंधूंनो, मी इथे राहू की नको ? मी मायदेशी परत जावे अशी तुमची इच्छा असेल, तर मी जायला तयार आहे.'

सर्वांनी एकदम गिल्ला केला—' नाही जायचे. तुम्ही आमचे आहात. आम्ही तुम्हाला जाऊ देणार नाही...'

रात्रीचे जेवण...नंतर हळूहळू पियानोजवळ जाऊन वाजविलेली प्रार्थना संगीताची गत...शांत लयीत सर्वांनी एकमेकांचा घेतलेला निरोप...हेदेखील तपशील टेलिव्हिजनवाल्यांनी टिपले. असल्या गोष्टींना विरोध करून करून तो दमला होता...कोणी ऐकत नव्हते... विरोधाचा उपयोग होत नाही हे पाहून तो हल्ली निमूटपणे सारे सहन करायला शिकला होता.

☐

नव्वदाव्या वर्षीही श्वाइट्झर नित्याचे काम व्यवस्थित करीत होता. विजनात बसून जगाशी संपर्क साधीत होता. अलीकडे ऱ्हीना त्याच्याजवळच राहत होती. हॉस्पिटलमध्ये पॅथॉलॉजिस्ट म्हणून काम करीत होती. नुकताच तिने भरपूर प्रवास केला होता. स्कँडिनेव्हियन् देश, दक्षिण अमेरिका, जपान इ....जपानमधली तिची खटपट फारच यशस्वी झाली होती. जपानी लोकांना श्वाइट्झरची विचारसरणी फार चटकन् पटली होती. जपानी शाळांमधून श्वाइट्झरची पुस्तके मुले हौशीने वाचत होती. ऱ्हीना परतली तेव्हा श्वाइट्झर ठीक होता. पण १९६५ च्या जूनमध्ये डायबिटिसची शंका आली. साखर वर्ज...पण श्वाइट्झर पथ्य पाळीत नसे—हाताशी गोड केक दिसला तर घेण्याकडे प्रवृत्ती... एकंदर तो काही आज्ञाधारक पेशण्ट नव्हता. त्याच्या प्रकृतीत आता चढउतार होऊ लागले. पण ते लोकांना कळू न देण्याची कोशीस सुरू असे. कारण लोकांना समजेल तर पत्रकारांतर्फे त्याची बातमी व्हायची, अन् मग जो पत्रांचा ढीग येईल, त्याला उत्तरे कोण लिहिणार ?

आपण ठाकठीक आहोत, हे सर्वांना दाखवून देण्यासाठी हॉस्पिटलमध्ये चक्कर टाकावी लागे. २–३ दिवस तो दिसला नाही की, तर्कवितर्क सुरू होत—म्हणून दवाखाना, चालू बांधकाम...भोजन.

गृह...सर्वत्र हळूहळू जायचे. अली सिल्व्हरला डॉक्टरांची ही दगदग योग्य वाटत नसे. ती जूनपासून डॉक्टरांच्याच खोलीत एका हॅमॉक्-मध्ये झोपायची. त्याला रात्री काही लागले तरी चटकन उठायची.

१२ ऑगस्टला युरोपहून पुष्कळ दिवसांपासून यायचे होते ते पाहुणे आले. श्वाइट्झर–हॉस्पिटलशी संलग्न अशा महत्त्वाच्या कार्य-कर्त्यांचा गट यायचा होता. त्यात गुन्सबाखची एमी मार्टिन (सेक्रेटरी); चार्लस मायकेल (स्ट्रॅसबूर्गच्या असोसिएशनचे खजिनदार), आणि अशाच स्वरूपाचे काम करणारे लोक होते. त्यांच्या स्वागतासाठी श्वाइट्झर किनाऱ्यावर उभाच होता. वयाच्या मानाने त्याची प्रकृती ठीक दिसत होती–फक्त चालणे जरासे वाकून अन् संथ वाटत होते. होडीतून एमी मार्टिन उतरलेली पाहताच श्वाइट्झर मनाने ११ वर्षे मागे गेला...१९५४ मधला प्रसंग...

१९५४ मध्ये नोबेल प्राइझचा स्वीकार करण्यासाठी तो युरोपात गेला होता. प्रथम गुन्सबाखला जाऊन मग ऑस्लोला जायचे होते. त्याच्या आयुष्यातला तो सर्वश्रेष्ठ सन्मानाचा दिवस होता...पण त्या दिवसाच्या आनंदाला दृष्ट लागली होती. हेलनची प्रकृतीच्या अशक्ततेमुळे सतत चिडचीड चालायची. पण त्यात आता दुस्वासाची भर पडली होती. पाऊणशे वयमान झालेली ती म्हातारी ऐंशीच्या घरातल्या आपल्या सहचराचा संशय घेत होती–श्वाइट्झरवर रुसून बसली होती. 'तुम्ही एमीला ऑस्लोला नेऊ नका. ती येणार असेल, तर मी येणार नाही, सांगून ठेवते.' वगैरे भाषा सुरु झाली. बिचारी एमी...सत्तरी उलटून गेलेली...श्वाइट्झर हॉस्पिटलसंबंधीचा युरोपातील सर्व पत्रव्यवहार तीच बघत असे. छोटयामोठ्या वर्गणी-दारांचा तिच्याशी परिचय होता, म्हणून तिला नेणे सयुक्तिक होते. पण हेलनला ते पटेना. 'तिला न्यायचे नाही–तरच मी येईन,' हा ठेका सुरू. असल्या प्रकारांचा श्वाइट्झरला कधीच सराव नव्हता. एमीची त्याला मदत होणार होती म्हणून तिला न्यायचे ठरलेलेच होते–त्याप्रमाणे तो गेला. ऑस्लोला एरिका होती, क्लॅरा उर्खर्ट होती, चार्लस् जॉय, मेल्विन् अर्नाल्ड हेही स्नेही होते. जनमानसातला श्वाइट्झरविषयक आदरभाव टोकाला गेला होता...तोच...

'ऱ्हीनाची तार आली...'आई ऑस्लोला यायला निघाली आहे. जाहीरपणे घटस्फोट घेण्याची धमकी देणार आहे ती...समारंभाचा विचका होण्याची शक्यता.' श्वाइट्झरने उलट टपाली तार केली, 'खुशाल येऊ दे तिला!'

ती आली. सबंध समारंभात श्वाइट्झरबरोबर वावरली...पण त्याच्याशी एक शब्द बोलली नाही. त्यापायी निर्माण झालेल्या मानसिक अस्वस्थतेचा परिणाम त्याच्या भाषणावर झाल्याशिवाय राहिला नाही. एखादे लादलेले कर्तव्य पार पाडावे त्याप्रमाणे त्याने आपले भाषण वाचून काढले इतकेच.

लवकरच तो त्या तंद्रीतून सावरला. पाहुणे अतिथीगृहाकडे गेले. एमी या वेळी भरपूर कागदपत्रांचे बाड घेऊन आली होती. ते वाचून सर्व सव्यापसव्य उरकावे लागले...पाहुणे असले तरी, नित्याच्या कामात बदल नव्हता... असे दहा दिवस सुरळीत गेले.

☐

२३ ऑगस्ट १९६५ रोजी श्वाइट्झरला मृत्यूची चाहूल लागली. निरवानिरव करून टाकणं आवश्यक होते. जेवणाच्या नंतर बायबल वाचण्याऐवजी त्याने आपल्या मरणोत्तर व्यवस्थेविषयी स्पष्ट सूचना दिल्या. हॉस्पिटलच्या व्यवस्थापनाची जबाबदारी ऱ्हीनाकडे सोपविली. प्रमुख डॉक्टर म्हणून डॉ. वॉल्टर मुंझ यांची नेमणूक केली.... त्या दिवसांनंतर तो नियमाने भोजनगृहात येईनासा झाला. काय जे थोडे फार खायचे असेल, ते खोलीतच घ्यायचे.

गुरुवारी त्याने सबंध हॉस्पिटल बघून येण्याची इच्छा व्यक्त केली एका जीपमधून संथ गतीने हॉस्पिटलभर तो हिंडला. प्रत्येक इमारतीचा जणू तो नजरेने निरोप घेत होता. कितीतरी सुंदर स्मृती मनात उसळत होत्या. दोन इमारतींमधल्या बाकावर बसून 'मध्यरात्री नभघुमटाखाली' तासनतास चिंतन केले होते. कधी एकट्याने तर कधी सुजाण मित्रांच्या सहवासात. क्लॅरा उर्खर्ट आली म्हणजे किती तरी वेळा अपरात्री या बाकावर तो तिच्यासह बसून राही... निःशब्द! आकाशातल्या चांदण्यांकडे पाहत चिंतन चालायचे.

नॉर्मन् कझिन्स या अमेरिकन पत्रकाराबरोबरही तो उत्तररात्री येऊन बसला होता... अवेळी वाजविलेल्या ऑर्गनवरची गत ऐकण्या-साठी हा पत्रकार खोलीत आला...आणि मग दोघे फिरत फिरत बाकापर्यंत आले. श्वाइट्झर कधी बोले, तर कधी अमूर्त विचारात गढून जाई... निःशब्द!...कझिन्सही भारावून गेलेला असे...त्याला वाटे, श्वाइट्झर हा किती विलक्षण माणूस आहे! याची कुठली प्रतिमा सर्वांत प्रभावी आहे? डॉक्टर? कलावंत? इंजिनीअर? तत्त्वज्ञ? सेवाव्रती? मानवताधर्माचे मूर्तिमंत उदाहरण? शांतता-वादी?... कसले अलौकिक रसायन घेऊन जन्माला आलाय हा? नॉर्मन् कझिन्सला श्वाइट्झरचा सहवास अत्यंत स्फूर्तिदायक वाटे... श्वाइट्झरला त्या बाकाकडून जीपमधून जाताना अनेकांच्या आठवणी आल्या. त्यात भारतातल्या अमीय चक्रवर्तीचीही आठवण आली. श्वाइट्झरच्या स्मृतिकोषात त्यांनाही स्थान होते.

शुक्रवारी सकाळी पुनश्च स्मृतिकोषात बुडी मारावीशी वाटली. जीप अगदी दाराशी आणली. श्वाइट्झर पुनश्च सारे पाहून घेत होता...पण जास्ती वेळ बसवेना. मध्येच त्याने जीप माघारी वळ-वायला सांगितले.

अजून बागेचा नाही निरोप घेतला! संध्याकाळी डॉ. मुंझ आल्यावर श्वाइट्झर काठीचा आधार घेत मुंझबरोबर बाहेर आला... प्रचंड बागाईत पसरलेली होती... कडेला उभे राहून त्याने स्वतः लावलेली काही झाडे मुंझला दाखविली... प्रत्येक झाड नावाने ओळखले. त्यांची उत्तम निगा राखली जाते आहे, सरसरून वाढ होते आहे, हे पाहून समाधान वाटले. 'पाहा डॉक्टर, मी लावलेली ही झाडे कशी तरारून वाढली आहेत! किती सुंदर दिसताहेत!'... हे श्वाइट्झरचे उद्गार!... भोवती पसरलेल्या इमारतीही दृष्टि-क्षेपात येत होत्या... त्यांच्याकडे पाहात श्वाइट्झर म्हणाला, 'पूर्वी जेव्हा लोक माझी अतोनात स्तुती करत, तेव्हा मी तिकडे लक्ष देत नसे. आता कुठे निंदेचा सूर आला तर त्याकडे कशाला लक्ष द्यायचं?...पण काही झाले तरी हे हॉस्पिटल किती चांगले आहे, नाही?'

शनिवारी २८ ऑगस्टला श्वाइट्झर जेव्हा न्याहारीला आला, तेव्हा त्याची चर्या पार बदलून गेली होती. सर्व डॉक्टरांना कळून

चुकले की, आता काही खरं नाही. कोणत्याही क्षणी देहावसान होणार! ऱ्हीना सतत श्वाइट्झरजवळ घोटाळत असे...संध्याकाळी तो तिला म्हणाला, ' हे बघ, माझ्यामागे माझ्या पुस्तकांच्या मानधनापैकी १० हजार डॉलर्स तू एरिकाला दे. तिने आपल्याकडे पंधरा वर्षे नानाप्रकारचं काम केलं... हरतऱ्हेची मदत पोहोचवली...कधी पैंची अपेक्षा केली नाही. तिला तेवढे पैसे पोहोचते करशील ना?'

' जरूर देईन मी. पण पपा, ती ते पैसे घेईल का?'

' नाही घ्यायची. हॉस्पिटललाच देऊन टाकील...पण ते तू स्वीकारू नकोस. तिनंच ते घेतले पाहिजेत. त्याचा ती उत्तम उपयोग करील.'

' ठीक आहे पपा, देईन मी ते पैसे.'

' दमलोय मी... पार थकून गेलोय....'

श्वाइट्झरच्या प्रकृतीकडे सर्व डॉक्टरांचे लक्ष केंद्रित झाले होते आणि अतःपर कोणताही उपाय करण्यात अर्थ नाही हेही स्पष्ट होते. ऱ्हीनाने आपल्या नातेवाइकांना तारा करून टाकल्या...रात्री तो तिला म्हणाला, ' ऱ्हीना, माझा अंत्यविधी अगदी साधेपणाने अन् ताबडतोब उरकून टाका. उगीच अवडंबर माजवू नका...अखेरच्या क्षणी तू माझ्याजवळ आहेस याचा मला फार आनंद वाटतो.'

नंतर तो नुसता पडून होता...कोणी भेटायला आले तर, हस्तांदोलन करी...४-२ शब्द बोले...पण उठला नाही. बाख संगीताच्या ध्वनिमुद्रिका त्याला ऐकवण्यात येत होत्या...स्वतःनेच वाजविलेले वाद्यसंगीत त्याला फार आवडत होते...तो अगदी मनःपूर्वक ऐकत होता...मध्येच त्याला पत्र लिहावेसे वाटले. अली सिल्व्हरच्या मदतीने उठला...टेबलाशी जाऊन बसला. पेनही हाती घेतले–पण मग मात्र कोसळला...जवळच्या डॉक्टरांनी त्याला नीट निजविले.

श्वाइट्झर अत्यवस्थ असल्याची बातमी आसमंतात पसरली. स्थानिक आदिवासी लोक श्वाइट्झरच्या प्रकृतीची विचारपूस करायला आवारात घोटाळू लागले. कोणालाही बोलावले नव्हते. तरीही सर्वांना काळजी वाटत होती. सारं संपत आल्याची जाणीव झाली होती. नदीप्रवाहाच्या दोन्ही बाजूंनी स्थानिक मंडळींच्या होडचा येऊ लागल्या. पेशण्टस्, डॉक्टर्स आणि नर्सेस–सगळ्यांचे चेहरे कोमेजून गेले होते. सर्वांना स्फूर्ती देणाऱ्या तेजस्वी माणसाची प्राणज्योत विझत आली होती.

...कुणीतरी प्रार्थना म्हणायला सुरुवात केली... हळू आवाजात सर्वजण प्रार्थना करीत होते...

मध्येच एक आदिवासी म्हणाला, ' आम्हाला असं समजलंय् की युरोपातले लोक आमच्या डॉक्टरांविरुद्ध बोलतात. त्यांनी आमचे कल्याण केले नाही असे म्हणतात... पण डॉक्टरांनी आम्हाला किती प्रकारे मदत केलीय् ते त्यांना काय माहीत? आम्ही जाणतो ते! त्यांनी आमच्यासाठी फार कष्ट घेतले आहेत बरं!'

...दुसरा म्हणाला ...' युरोपातले लोक हे हॉस्पिटल घाणेरडे आहे असं म्हणतात ना? म्हणू देत. काही झालं तरी आम्ही इथेच येतो, आणि ठणठणीत बरे होऊन घरी जातो. आमचे आईवडीलसुद्धा इथेच यायचे.'

रात्र दाटत होती... शब्द मुके झाले... मृत्यूची थंडगार चाहूल आली. श्वाइट्झर अतिशय शांत दिसत होता. मुद्रेवर कृतार्थतेचे समाधान दिसत होते... देह वाळून गेलेला होता... रात्री ११॥ वाजता त्याचा श्वास थांबला– कायमचा. अखेरच्या क्षणी त्याची एकुलती एक मुलगी ऱ्हीना, अलि सिल्व्हर, माटिल्ड कोटमान, डॉक्टर मुंझ, डॉ. फर्गस् पोप ही मंडळी जवळ होती. ऱ्हीना खोलीबाहेर येऊन म्हणाली, ' पपा आताच निधन पावले आहेत.'

❑

दुसऱ्या दिवशी रविवार– ५ सप्टेंबर १९६५. सकाळी ५॥ ला ब्राँझची घंटा वाजविण्यात आली...मग महारोग्यांच्या वस्तीवरील घंटानाद... मग स्थानिक लोकांनी ढोल वाजविले... दूरवर निरोप देणारे... सकाळी सहापासून लोकांची रीघ लागली. हॉस्पिटलमधला स्टाफ, रोगी, त्यांचे कुटुंबिय स्थानिक लोक... आदिवासी आयाबाया... ओळीने दर्शन घेऊन गेल्या. बायकांच्या डोळ्यातले अश्रू फार फार सांगून जात होते. प्रत्येकीला केव्हाना केव्हा तरी श्वाइट्झरने औषधपाणी दिले होते– दिलासा दिला होता.

अंत्यविधी दुपारी तीनला झाला. डॉक्टरांच्या खोलीनजीकच चिरविश्रांती घ्यायची होती. हेलन्च्या क्रॉसशेजारीच दफनाची तयारी... श्वाइट्झरच्या शवपेटिकेत त्याची नेहमीची हॅट ठेवली... कृमिकीटकांना अन् पक्ष्यांना ज्या पिशवीतून तो धान्याचे कण घालीत असे, ती नित्याची पिशवी धान्यकण भरून हाताशी ठेवण्यात आली. अंगावर नेहमीचा कोट पसरला. गुन्सबाखच्या घरावर चढविलेल्या लालसर पानांच्या वेलीचे एक रोप इथेही रुजविले होते. त्या वेलीची थोडीशी पाने शवपेटिकेत ठेवली... वर साधा लाकडी क्रॉस आणि रानटी फुलांचा एक झुपका– अत्यंत साधेपणाने अंत्यविधी व्हावा ही श्वाइट्झरची इच्छा अक्षरशः पाळण्याचा प्रयत्न चालला होता.

पण श्वाइट्झरचा देह– ' The Star of GABON 'चा देह– इतक्या तातडीने नजरेआड करणे सरकारला इष्ट वाटले नाही. गृहमंत्री, संरक्षणमंत्री, आरोग्यमंत्री– इ. बडी मंडळी तातडीने हजर झाली. अध्यक्षांच्या वडिलांचे देहावसान झाल्याने ते मात्र येऊ शकले नाहीत. सर्व प्रशासकीय अधिकारी– कॅथॉलिक व प्रॉटेस्टंट मिशन्चे प्रतिनिधी, फ्रान्स, जर्मनी, इंग्लंड, अमेरिका, इस्रायल या देशांचे प्रतिनिधी आवर्जून आले. पोलिसांनी अखेरची मानवंदना दिली. डॉ. मुंझ यांनी अखेरचे धार्मिक विधी केले... अनेकांची भाषणे... श्वाइट्झरविषयीचा परमादर आणि कृतज्ञता व्यक्त करणारी... चुटपुटती... अखेर डॉक्टरांच्या जन्मभूमीहून–अल्सेसहून–आलेले डॉक्टर्स आणि नर्सेस यांनी श्वाइट्झरला फक्त एका वाक्यात निरोप दिला, ' प्रिय डॉक्टर, तुम्ही आजवर सर्वांसाठी जे कार्य केलेत, त्या सर्वांबद्दल आम्ही तुम्हाला मनःपूर्वक धन्यवाद देतो.'

चार आफ्रिकन् आणि चार युरोपीयन् लोक पुढे आले. त्या सर्वांनी मिळून श्वाइट्झरची शवपेटिका भूमातेच्या स्वाधीन केली. उपस्थितांपैकी प्रत्येकाने मूठ मूठ माती घालून खड्डा भरून टाकला. तोवर प्रार्थना म्हटल्या जात होत्या. नव्वद वर्षांपूर्वी हजारो मैलांवर जन्मलेला श्वाइट्झर आफ्रिकेच्या मातीत कायमचा विसावला.

आफ्रिकेच्या मातीशी एकरूप होण्याचे स्वप्न त्याने कित्येक वर्षे जपलेले होते. तो म्हणे, ' इथले कृमिकीटकही म्हणतील की, श्वाइट्झरच्या देहाचा शेवटचा घाससुद्धा किती गोड लागत होता बरं!'

मृतात्म्याच्या कबरीजवळ रात्ररात्र ढोल वाजविण्याची आदि-

वासींची प्रथा होती. श्वाइट्झरला असला शांतताभंग आवडत नसे. आपल्या हॉस्पिटलच्या व खेड्याच्या परिसरात रात्री १० नंतर ढोल वाजविण्याला त्याने बंदी केली होती. एक स्थानिक आदिवासी श्वाइट्झरला म्हणाला; 'डॉक्टर, तुम्ही गेलात, की आम्ही चांगले आठ दिवस ढोल वाजवू.'

श्वाइट्झर म्हणाला, 'ते ऐकायला मी ह्यात नसेन ही उत्तम गोष्ट आहे!'

□

श्वाइट्झरच्या ह्यातीत– अखेरच्या ५–६ वर्षांत काही उथळ पत्रकारांनी त्याच्यावर निंदेची झोड उठवली होती खरी. पण तो गेला, आणि त्याच्या कर्तृत्वाची, माणुसकीची, सेवाव्रताची, जीवनमात्राविषयी आदरभाव बाळगण्याच्या अट्टाहासाची, त्याच्या संगीतकलेची, विद्वत्तेची सर्वांना महती वाटू लागली. अमेरिका, द. अमेरिका, कॅनडा, युरोपातले अनेक देश, कोरिया, जपान, न्यूझीलंड इ. देशांत श्वाइट्झर–केन्द्रे स्थापन झाली; आणि तेथे अनेक प्रकारची सेवेची कामे सुरू झाली. एरिका ॲण्डरसनला दिलेल्या १०,००० डॉलर्समधून तिने श्वाइट्झर फ्रेंडशिप हाऊस सुरू केले. त्या ठिकाणी श्वाइट्झरसंबंधीचे सर्व साहित्य, फिल्मस्, टेप्स्, ध्वनिमुद्रिका, पत्रे इ. जतन करून ठेवले आहे. नवोदित पिढीच्या मनात जीवमात्राविषयी आस्था उत्पन्न व्हावी, प्रेम, सद्भावना व करुणा यांचे मूल्य त्यांनी जाणून घ्यावे यासाठी तेथे अनेक प्रकारचे उपक्रम केले जातात. श्वाइट्झरच्या गुन्सबाख येथील घराचे तर श्वाइट्झर आर्चिव्हस्मध्ये रूपांतर केले आहे. तेथे त्याच्या सर्व वस्तू, लाडका ऑर्गन्, टेप्स्, फिल्म्स्, साहित्य आणि श्वाइट्झरवर लिहिलेले सर्व साहित्य यांची एक प्रचंड लायब्ररीच आहे. तेथील सर्व काम अलि सिल्व्हर ही श्वाइट्झरची लाडकी मानसकन्या पाहत असते. एमी मार्टिन् आता अतिशय वृद्ध झाली असल्याने काम करू शकत नाही.

श्वाइट्झरसंबंधी आस्था असणाऱ्या जगातील सर्व 'श्वाइट्झरियन्स्'-चा प्रतिवर्षी मेळावा भरत असतो. त्याच्या कल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी आपण काय करीत आहोत, काय करू शकतो इ. विषयांवरील विचारांची देवाणघेवाण चालते. कित्येक स्त्रिया Kindness clubs चालवतात आणि मुलांच्या मनोवृत्तीत बालपणापासूनच प्रेम आणि करुणा या मूल्यांचे संस्कार करतात. हे कार्य महत्त्वाचे आहे, वाढत राहिले पाहिजे, त्याविना जागतिक शांतता सतत धोक्यात राहील, याबद्दल कोणालाही संदेह नाही... अगदी अणुशास्त्रज्ञांनासुद्धा!


**M/s. U. K. Paper Mart**

IS NEWSPRINT A PROBLEM ?

Contact Promptly
for requirement of newsprint
on Reels and in Sheets :

Arch No. 5
Under Mahalaxmi Over Bridge.
BOMBAY - 34
Phone : 377302

Direct Importers of
Newsprint and
Suppliers of
Newsprint on Reels
and in Sheets
as well as
Cutting Specialists

FOR
SUPPLY
OF
NEWSPRINT

CONTACT

**JOSHI A. V. AGENCIES**

Abdul Sattar Building
Above Give & Take
Near Mallam market
Grant Road Crosslane
BOMBAY - 7
Gram
VENIVASTA
Bombay - 7

Phones
Off. 393628
Res. 573688



दीपावली
हा मुहूर्त शुभ प्रारंभाचा,
नव्या आशांचा, आनंदाचा,
सुख-समृद्धीसाठी
प्रार्थना करण्याचा !
आणि हाच मुहूर्त आहे
तुम्ही बँक ऑफ बरोडामध्ये
फेस्टिव्हल
डिपॉझिट
अकाउंट
उघडण्याचा.
BANK OF BARODA
बँक ऑफ बरोडा
(भारत सरकारचा उपक्रम)


CAM 547
सारस्वत बँक
20
वीस कोटी रुपयांहून अधिक ठेवींचा
वीस कलमी आर्थिक कार्यक्रमासाठी
वीस शाखांद्वारे यशस्वी वापर
पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी जाहीर केलेल्या आर्थिक कार्यक्रमामुळे वीस या आकड्याला राष्ट्रात महत्त्व प्राप्त झाले तसेच ते सारस्वत बँकेलाही ! या बँकेच्या ठेवी आता वीस कोटी रुपयांवर गेल्या असून हा पैसा पंतप्रधानांच्या वीस कलमी आर्थिक कार्यक्रमासाठी बँकेच्या वीस शाखामार्फत यशस्वीपणे वापरला जात आहे. गेल्या वर्षी या बँकेच्या ठेवींमध्ये अठ्ठावीस टक्के वाढ झाली. सहकारी कायद्यानुसार कमाल म्हणजे बारा टक्के डिव्हिडंड देणारी ही पहिली सहकारी बँक होय. व्यापारी बँकांपेक्षा सारस्वत बँकेत ठेवींवर अर्धा टक्का व्याज जास्त दिले जाते.
ती. रा. वेरेकर
सेक्रेटरी
डॉ. श्री. प. आडारकर
उपाध्यक्ष
डॉ. प. वा. रेगे
अध्यक्ष
दि सारस्वत कोऑपरेटीव्ह बँक लि.
मध्यवर्ती कार्यालय अप्सरा सिनेमा बिल्डिंग,
दुसरा मजला, डॉ. दादासाहेब भडकमकर मार्ग,
मुंबई-४०० ००७